# संशोधन
## स्वरूप आणि पद्धती

संपा. प्रा. डॉ. भास्कर शेळके




अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*40807*

पुस्तक जपून वापरावे.

# संशोधन : स्वरूप आणि पद्धती

संपादक
प्रा. डॉ. भास्कर शेळके
(मराठी विभाग प्रमुख)
श्री शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर (पुणे)

001.42 SHE

Agasti Arts, Commerce & Dadasaheb Rupwate Science College, Akole
POST GRADUATE LIBRARY
Acc.No. 40807
Price 320/- Dt. 15/2/2013

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

अगस्ति कॉलेज ग्रंथालय
*40807*

Sanshodhan: Swaroop Aani Paddhati

**संशोधन : स्वरूप आणि पद्धती**

संपादक : प्रा. डॉ. भास्कर शेळके

© डॉ. अविनाश भास्कर शेळके

मोबा. ९७६६९२१३२१

**प्रकाशक** : सौ. तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि. पुणे, ४१० ५०२
मोबा. ९८२२४४८१८१

**प्रकाशन क्रमांक** : १

**प्रथमावृत्ती** : १२.१२.२०१२

**मुखपृष्ठ** : दिव्याणी संपत नाईक, शेणगाव, कोल्हापूर

**अक्षरजुळणी** : श्री. भूषण विजय नांगरे
मे. विज्वास सायबरवर्ल्ड,
मंचर (पुणे).

**मुद्रक** : न्यू भारत प्रिंटर्स, पुणे

**मूल्य** : ₹ ३२०/-

891.46072
SHE

ISBN No.: 978-81-924997-1-0

# अर्पणपत्रिका

भारताचे माजी उपपंतप्रधान आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री
**मा. कै. यशवंतरावजी चव्हाण साो.** यांच्या
जन्मशताब्दी वर्षानिमित्त,
भारताचे केंद्रीय कृषिमंत्री **मा. ना. शरदरावजी पवार साो.**
यांच्या वाढदिवसानिमित्त
या साहित्यरसिकांना
आणि
निरपेक्ष प्रेम आणि कौतुक करणारे तसेच
लेखन संशोधनास सदैव प्रेरणा देणारे आदरणीय
**मा.श्री. दगडू रामजी शेळके,**
(मा. पोलीस पाटील, आडगाव बु.।।, ता. राहाता, जि. नगर)
**मा.श्री. सयराम शेळके** आणि **सौ. मिनाक्षी शेळके,**
(प्रवरानगर)
**मा.श्री. भागवत शिंदे** आणि **सौ. सुशीला शिंदे,**
(वाघापूर, ता. संगमनेर)
यांना सविनय

# मनोगत

'संशोधन : स्वरूप आणि पद्धती' हा माझा संशोधनपर संपादित ग्रंथ आज प्रकाशित होत आहे. हा ग्रंथ आपल्या समोर ठेवताना मला विशेष आनंद होत आहे. विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत महाविद्यालयात दिनांक २६,२७ मार्च २०१२ रोजी 'संशोधन स्वरूप आणि पद्धती' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. पदवी व पदव्युत्तर वर्गाला महाराष्ट्रातील सर्वच अकृषी विद्यापीठात संशोधन हा विषय शिकविला जातो. विद्यार्थी प्राध्यापकांना हा विषय समजण्यास सुलभ व्हावा. म्हणून साहित्य समीक्षा संशोधन या क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ संशोधक प्राध्यापकांनी संशोधनाशी निगडित शोधनिबंध सादर केले. प्राध्यापक सहकाऱ्यांनी आणि विद्यार्थी प्राध्यापक मित्रांनी या राष्ट्रीय चर्चासत्रातील निबंध ग्रंथ रूपाने प्रकाशित व्हावे अशी मनोकामना माझ्याजवळ व्यक्त केली. या मनोकामनेतूनच 'संशोधन : स्वरूप आणि पद्धती' हा ग्रंथ सिद्ध झाला आहे.

सदर ग्रंथ संपादन करताना मा. अध्यक्ष ॲड. संजय काळे, त्यांचे मा. विश्वस्त मंडळ, मा. प्राचार्य डॉ. कांतीलाल पुराणे, सहकारी प्राध्यापक श्री. व्ही. के. मगदुम, त्यांचे सर्व सहकारी, चतुर्थश्रेणी कर्मचारी, विद्यार्थी ग्राहक भांडाराचे सर्व कर्मचारी, संपादक मंडळातील सदस्य यांचे मोलाचे मार्गदर्शन सहकार्य लाभले. या सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

या संपादित ग्रंथाचे काम वेळेत पूर्ण व्हावे म्हणून मला सतत मदत करणारे आणि प्रोत्साहन देणारी माझी पत्नी सौ. तारादेवी शेळके आणि चि. डॉ. अविनाश शेळके यांचाही ग्रंथ संपादन कार्यात मोलाचा सहभाग आहे. या ग्रंथ निर्मितीचे समाधान माझ्यासह सर्व कुटुंबीयांना आहे.

या संपादित संशोधनपर ग्रंथाचे डी.टी.पी.चे कौशल्यपूर्ण काम श्री. भूषण नांगरे व श्री. प्रसाद नांगरे यांनी पूर्ण केले. त्याबद्दल त्यांचेही आभार मानणे मला महत्वाचे वाटते. मुखपृष्ठाची कल्पना कु. दिव्याणी नाईक हिची आहे. वरवर साधे वाटणारे परंतु अत्यंत आकर्षक आणि अर्थपूर्ण असे हे मुखपृष्ठ केल्याबद्दल तिचेही मनःपूर्वक आभार आहेतच.

प्रस्तुत ग्रंथातील सर्वच निबंधलेखक तज्ज्ञ आहेत. त्यांनी व्यक्त केलेली मते ही त्यांची स्वतःचीच आहेत. त्यामुळे हा ग्रंथ अधिकाधिक परिपूर्ण आणि संशोधनाच्या कसोटीला उतरणारा असाच झाला आहे.

हा ग्रंथ पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक आणि प्राध्यापक यांना निश्चितच मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. रसिक वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**संपादक**
**डॉ. भास्कर शेळके**

## प्रस्तावना

भूतलावर मानवाच्या अस्तित्वाची चाहूल लागली आणि 'संशोधन' या शब्दाला नवे आयाम प्राप्त झाले. संशोधन या शब्दाला अस्तित्व प्राप्त झाले. भूतलावर जन्माला आलेल्या अगदी लहान बालकामध्ये उपजत कुतूहल प्रवृत्ती असते. निसर्गातील प्रत्येक वस्तूकडे ते बारकाव्याने पाहत असते. प्रत्येक वस्तुविषयी, घटनेविषयी त्याला प्रश्न पडतात आणि या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा ते प्रयत्न करत असते. त्याचे हे प्रयत्न म्हणजेच संशोधन असते. संशोधनाला Research हा पर्यायी प्रतिशब्द वापरला जातो. Research म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. हा शोध ज्ञानाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर अव्याहतपणे चालू असतो. वास्तविक संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. या बौद्धिक प्रक्रियेतूनच मानव विश्वातील रहस्य उलगडायला लागला. तथ्य शोधून काढायला लागला. एखाद्या वस्तूची, गोष्टीची बारकाव्याने उकल करू लागला. सतत नवीन नवीन शोधण्याच्या हव्यासातून त्याने संशोधन या ज्ञानशाखेला नवा अर्थ प्राप्त करून दिला.

संशोधन प्रक्रियेत प्रत्येक ज्ञानशाखेतली नवनवीन तत्त्वे आणि तथ्ये शोधून त्यांचा चिकित्सक आणि पद्धतशीर, सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. संशोधनात व्यक्तिगत आवड-निवड, इच्छा, आकांक्षा, राग, लोभ, मत्सर, द्वेष, पूर्वग्रहदूषितपणा या हेतूने संशोधन करून निर्णय देता येत नाही. समजा, अशा प्रकारचे संशोधन झालेच तर ते अपुरे ठरण्याची जास्त शक्यता असते. संशोधनामध्ये ज्ञानाकडून अज्ञानाकडे प्रवास केला जातो. अज्ञानाचा शोध घेऊन नवीन तर्क लावले जातात. उपलब्ध ज्ञानाच्या जोरावर संशोधक अज्ञाताचा नव्याने अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतो आणि त्याने लावलेला अन्वयार्थ समाजजीवनात, समाज मनात रूढ-प्रस्थापित झाला की, त्या संशोधनाला मानवी जीवनात, मानवी विकासात अर्थ प्राप्त होतो. ते संशोधन काळाच्या ओघात दीर्घकाळ टिकते.

संशोधन ही संकल्पना अत्यंत व्यापक आणि दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. संशोधनामध्ये स्पष्टीकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असते. विशेष म्हणजे संशोधनामध्ये जर एखादे तथ्य शोधून काढले तर त्याचा अनुभव सर्वांना सारखाच येणे आवश्यक असते. उदा. चिंच हा पदार्थ आंबट आहे किंवा मीठ हा पदार्थ खारट आहे. संशोधनाअंती निर्णय प्रक्रियेत प्रत्येक व्यक्तीला या पदार्थांची सारखीच चव लागणे आवश्यक आहे. परंतु प्रत्येक

संशोधकाने वेगवेगळे अनुमान काढले तर ते संशोधन वस्तुनिष्ठ न होता व्यक्तिनिष्ठ ठरेल आणि संशोधन प्रक्रियेत अडथळा निर्माण होईल. थोडक्यात संशोधनात वैयक्तिक आवडी-निवडीला अजिबात स्थान नसते तर वस्तुनिष्ठतेला अनन्यसाधारण महत्त्व असते.

संशोधनामध्ये जे ज्ञान अज्ञात आहे ते ज्ञात करून घेणे महत्त्वाचे ठरते. उपलब्ध माहितीतून नवीन नवीन तत्त्वे शोधून काढणे, नवीन सिद्धांत प्रस्थापित करणे, विश्वातील रहस्य उलगडणे या बाबी संशोधनात महत्त्वाच्या आहेत. वास्तविक मानवी जिज्ञासेतूनच संशोधनाची निर्मिती झालेली आहे. जिज्ञासू वृत्तीमुळेच मानवाला अनेक प्रश्न पडतात. त्या प्रश्नांची मानव चिकित्सा करायला लागतो. मानवाच्या या चिकित्सक वृत्तीतूनच संशोधनाचा जन्म होतो. संशोधन ही कृती म्हणजे वेळ घालवण्याचे अथवा हौसेने काम करणे नव्हे तर निष्ठेने परिश्रमपूर्वक ध्येयाने प्रेरित होऊन जिद्दीने आणि चिकाटीने काम करण्याचे महत्त्वाचे कार्य आहे. तेथे मानवाला प्रश्न पडायला सुरुवात होते, तिथेच संशोधनाचा जन्म झाला असे मानणे क्रमप्राप्त ठरते.

थोडक्यात प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा विस्तृत करणे, ज्ञानात भर घालणे, ज्ञान घासून पुसून नव्याने तपासून घेणे आणि प्रमाणित ज्ञानाचा संशोधन व्यवहारासाठी उपयोग करणे या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त होते.

संशोधनाचे अनेक प्रकार पडतात. उदा. शास्त्रीय संशोधन, सामाजिक संशोधन, साहित्यिक संशोधन, अर्थशास्त्रीय संशोधन इ.

**शास्त्रीय संशोधन :**

जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे ही मानवाची उपजत आणि मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियाचा उपयोग करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो व त्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो. बुद्धीच्या जोरावर मिळवलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करतो. यावरून असे प्रकर्षाने जाणवते की, शास्त्र हे केवळ सैद्धांतिक नसून ते उपयुक्त असे आहे. येथे ज्ञान आणि तथ्य विशिष्ट पद्धतीने व्यवस्थित रूपाने संकलित करावी लागतात. या तथ्यात विशिष्ट असा क्रम असतो आणि क्रम कार्यकारण भावावर आधारित असतो. या संशोधन पद्धतीत वास्तववाद विशेष महत्त्वाचा आहे. म्हणूनच सर्वच प्रकारच्या संशोधनात या पद्धतीला अवास्तव महत्त्व आहे.

**समाजशास्त्रीय संशोधन :**

सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक घटकांचा कालसुसंगत अभ्यास होय. या सामाजिक घटनांचा अभ्यास म्हणजे समाजसुधारणा व समाज प्रगती

यासाठी अत्यंत उपयुक्त असा दस्तऐवजच आहे. या संशोधनामुळे समाजाला व्यावहारिक पातळीवर समाजातील दुष्ट प्रवृत्तींची व दुष्परिणामांची जाणीव होते. या संशोधन पद्धतीत ज्ञान दोन प्रकारचे असते. अ) तात्त्विक अथवा सैद्धांतिक आणि ब) व्यावहारिक अथवा कार्याभिमुख.

म्हणून ही संशोधन पद्धती अत्यंत उपयुक्त अशी आहे. या संशोधन पद्धतीमुळे पूर्वीच्या ज्ञानातील उणिवा दूर होतात. रूढी, परंपरा, समजुती नाहीशा होतात. अज्ञान नाहीसे होऊन ज्ञानप्राप्ती होते. थोडक्यात मानवी जीवनात प्रकाश किरणे निर्माण होतात.

**साहित्यातील संशोधन :**

मानवी जीवनात साहित्य आणि कलेला अत्यंत महत्त्वपूर्ण असे स्थान आहे. मानवी मन, भावना, विचार यांच्या आविष्कारातून साहित्य निर्मिती होते. मानवी मनाची धारणा, विचारांचे स्वरूप, संवेदनात्मकतेची जाणीव या जितक्या सामाजिक बाबी आहेत, तितक्याचा त्या व्यक्तिगतही आहेत. मानवाने आपल्या प्रतिभेच्या जोरावर साहित्याचे आणि कलांचे विलोभनीय विश्व निर्माण केले आहे आणि त्यामुळेच अलीकडच्या काळात साहित्याचे समाजशास्त्र ही एक नवीन अभ्यास शाखा विकसित झाली आहे. एवढेच नव्हे तर साहित्याचे समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अध्ययन देखील केले जाते.

शास्त्रीय संशोधन, सामाजिक संशोधन आणि साहित्य संशोधन या तीनही संशोधन प्रकाराला मानवी जीवनात नेहमीच महत्त्व राहिले आहे. या तीनही संशोधन प्रकारांमुळे मानवी जीवनाचा चेहरामोहरा बदलून गेला आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे आज मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. या बदलत्या जीवनप्रवाहात साहित्यक्षेत्रातही परिवर्तन झाले आहे. साहित्य हे मानवी जीवनातील प्रतिबिंबाचा आरसा असेल तर साहित्यातील परिवर्तन हे नक्कीच लक्षणीय असल्याचे आपल्याला दिसते. या परिवर्तनाचा शोध घेणे हे साहित्याच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाचे ठरते.

सामान्यतः विद्यापीठीय, महाविद्यालयीन स्तरावर पदव्युत्तर अभ्यासक्रमापासून सुरुवात होते. असे असले तरी प्रत्येक व्यक्ती अगदी जन्मतः हा संशोधक असते. लहान मूल आपल्या आईला वेगवेगळे प्रश्न विचारून भंडावून सोडते. यातूनच त्याच्या संशोधन कार्याला सुरुवात झालेली असते. आपण मात्र जाणीवपूर्वक त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्याच्यातील संशोधक लोप पावायला सुरुवात होते. जर त्याच्या प्रत्येक कृतीला दुजोरा मिळत गेला तर संशोधन शास्त्राला एक नवीन अधिष्ठान प्राप्त होईल यात शंका नाही.

प्रस्तुत संशोधनपर ग्रंथात पाच विभाग असून विभाग 'अ' मध्ये संशोधनाची संकल्पना, स्वरूप, परंपरा, व्याप्ती स्पष्ट केल्या आहेत. त्याचबरोबर संशोधनाच्या विविध तज्ज्ञांच्या व्याख्या, संशोधनाची गुणवैशिष्ट्ये, संशोधन तंत्र आणि पद्धती विस्ताराने स्पष्ट केल्या आहेत. तर विभाग 'ब' मध्ये वाङ्मयीन संशोधनाची अभ्यासक्षेत्रे स्पष्ट करताना लेखकाचा अभ्यास कसा करावा? भाषिक संशोधन कसे करावे? किंवा एक लेखक आणि कालखंड यांचे संशोधन करताना कोणती पथ्ये पाळावीत? वाङ्मयाची ऐतिहासिक आणि तौलनिक संशोधन कसे करावे या विषयावर अभ्यासपूर्ण मते निबंधलेखकांनी नोंदविलीली आहेत. विभाग 'क' मध्ये आंतरविद्याक्षेत्रीय संशोधन आजच्या आधुनिक युगात महत्त्वाचे आहे. वाङ्मयाचा इतिहास, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र, विज्ञान, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, इ. विषयांशी घनिष्ट संबंध आहे. हे विषय साहित्यापासून अलिप्त राहूच शकत नाहीत. म्हणूनच अलीकडच्या काळात आंतरविद्याशाखीय संशोधनाला वेगळा अर्थ प्राप्त झाला आहे. विभाग 'ड' मध्ये मराठीतील वेगवेगळ्या संशोधन परंपरा स्पष्ट केलेल्या आहेत. विशेषतः लोकसाहित्य, महानुभावीय साहित्य, संतसाहित्य, दलित साहित्य, आदिवासी साहित्य, इ. साहित्य परंपरांचा देखील आज मोठ्या प्रमाणात संशोधन होते आहे, हे प्रस्तुत ग्रंथातील निबंधांवरून लक्षात येते. शेवटचा विभाग 'इ' संकीर्ण स्वरूपाचा असून मराठीतील साहित्य प्रकार, साहित्य प्रवाह, त्याचबरोबर खाउजा धोरणाचा मराठी साहित्यावर होणारा विपरित परिणाम याही अंगाने आज संशोधन होत आहे.

नव्याने अभ्यास करणाऱ्या अभ्यासक संशोधकांना हा ग्रंथ अत्यंत मोलाचा आणि उपयुक्त मार्गदर्शन करणारा असाच आहे. या संपादित ग्रंथातील प्रत्येक लेख अभ्यासू वृत्तीने लिहिला असून संशोधनाच्या संदर्भात आपल्या ज्ञानात भर पाडणारा असाच आहे. महाविद्यालययीन, विद्यापीठीय संशोधन आणि अध्ययन करणाऱ्या विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधक अभ्यासकांना हा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल यात शंका नाही. रसिक अभ्यासक, वाचक या ग्रंथाचे निश्चितच स्वागत करतील अशी मला अशा वाटते.

**डॉ. शशिकांत साळवे**

# अनुक्रमणिका


**विभाग 'अ' – संशोधन : संकल्पना व स्वरूप.....................११-७०**

१. संशोधन/मीरा देठे/१२
२. संशोधन संकल्पना : स्वरूप व व्याप्ती/संभाजी शिंदे/१७
३. संशोधन : स्वरूप, परंपरा आणि प्रक्रिया/नंदा कराड/२२
४. संशोधन आराखडा : स्वरूप व महत्त्व/बाळासाहेब सोनवणे/२६
५. संशोधन : स्वरूप आणि पद्धती/भाऊसाहेब गव्हाणे/३०
६. संशोधन : स्वरूप आणि पद्धती/देविदास शेटे/३३
७. संशोधन : स्वरूप व पद्धती/संदीप चपटे/३५
८. संशोधन : व्याख्या/लता पवार/३९
९. संशोधनाचे तंत्र आणि गुण वैशिष्ट्ये/अनिल बढे/४६
१०. संशोधन तंत्र/दादा मरकड/५१
११. संशोधन पद्धती/चंद्रकांत रुद्राक्ष/५६
१२. संशोधन संकल्पना साधने/वसंत गावडें/५९

**विभाग 'ब' – वाङ्मयीन संशोधनाची अभ्यासक्षेत्रे..................७१-११७**

१. वाङ्मयीन संशोधनाची अभ्यासक्षेत्रे/गोपाळ गावडे/७२
२. विशेष लेखकांचा अभ्यास : तंत्रे/नाना पवार (कवडे)/७७
३. भाषिक संशोधन/विजया पाटील/८५
४. एक लेखकः शोध आणि बोध/राजेश्वर दुडूकनाळे/९०
५. कालखंडनिहाय संशोधन/नवनाथ चौधरी/९७
६. वाङ्मयीन इतिहास संशोधन/राजाभाऊ भैलुमे/१०१
७. इतिहासाचे पुनर्लेखन/संतोष बनसोड/१०४
८. तौलनिक साहित्य आणि उत्तर वसाहतवाद/शिरीष लांडगे पाटील/१०९
९. तौलनिक संशोधन पद्धती/अनिल गर्जे/११३

**विभाग 'क' – आंतर्विद्याक्षेत्रीय संशोधन..........................११८-१९०**

१. साहित्य आणि मानसशास्त्र/ज्ञानेश्वर वाल्हेकर/११९
२. साहित्य आणि सौंदर्यशास्त्र/राजेंद्र सलालकर/१२१
३. वैज्ञानिक, सामाजिक व साहित्यक्षेत्रीय संशोधन/शारदा मोरे/१२९
४. साहित्य आणि चित्रपट/राजेंद्र थोरात/१३४
५. साहित्य संशोधनात तंत्र साधनाचे महत्त्व/दत्ता पाटील/१४०
६. साहित्यक्षेत्रीय संशोधनेः एक आकलन/सुलोचना साळुंखे/१४६
७. मानसशास्त्र आणि साहित्य/लक्ष्मण देवरे/१५१
८. राज्यशास्त्र आणि साहित्य/अभिजित पाटील/१५५
९. समाजभाषा वैज्ञानिक संशोधन/सारीपुत्र तुपेरे/१६१

१०. आदिवासी साहित्य आणि संशोधन/मंदा नांदुरकर/१६६
११. साहित्य संस्कृती आणि तत्त्वज्ञान/सुभाष आडावतकर/१७१
१२. समाजशास्त्रीय संशोधन पद्धती/सुवर्णा गुंड-चव्हाण/१८१
१३. समाजशास्त्रीय संशोधन/गोपीनाथ बोडके/१८४
१४. मानसशास्त्रीय संशोधन पद्धती/अशोक लिंबेकर/१८८
**विभाग 'ड' - मराठीतील संशोधन परंपरा............................१९१-२५८**
१. लोकसाहित्य संशोधन व अभ्यास/सुभाष आहेर/१९२
२. महानुभावीय चरित्रग्रंथ संशोधन/अण्णा वैद्य/१९५
३. संत साहित्याचे स्वरूप आणि दिशा/मंगला डोंगरे/२०१
४. लोकसाहित्याचे पाश्चात्त्य अभ्यासक/सीताराम निघुट/२०८
५. मराठीचे पाश्चात्त्य संशोधक/अपर्णा पांडे/२१२
६. लोकसाहित्यविषयक संशोधन/महादेव देशमुख/२१७
७. मराठी लोकसाहित्याच्या संशोधनाची दिशा/लक्ष्मीकांत येळवंडे/२२३
८. लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा/नवनाथ शिंदे/२२८
९. ग्रामीण साहित्याच्या संशोधनाचे स्वरूप आणि अपेक्षा/वामन जाधव/२३८
१०. संशोधनातील स्त्रीवादी सिद्धांकनाची वाटचाल/शोभा तितर/२४१
११. बालसाहित्याच्या संशोधनाचे स्वरूप/शोभा इंगवले/२४८
१२. दलित साहित्याचे संशोधन/शशिकांत साळवे/२५२
१३. लोकसाहित्य व लोककलांचे संशोधन/दिलीप कसबे/२५५
**विभाग 'इ' - संकीर्ण....................................................२५९-३१८**
१. मानवी जीवन समृद्ध करणारी अभिक्रिया/लता देशमुख/२६०
२. शिलालेखातील मराठी/गणेश मोहोड/२६३
३. जागतिकीकरण - कविता/विनोद कांबळे/२६८
४. कादंबरीविषयी विद्यापीठीय संशोधन/गोमटेश्वर पाटील/२७४
५. मराठी कादंबरी समीक्षा आणि संशोधन/कैलास दौंड/२९७
६. भारतीय खेडी आणि मराठी हिंदी ग्रामीण कविता/कैलास सार्वेकर/३०२
७. महादेव कोळी आदिवासींची लोकगीते/एस. डी. लांडे/३१०
८. साहित्य आणि बदलते सामाजिक वास्तव/राजेंद्र खंदारे/३१५

# विभाग 'अ'
# संशोधन : संकल्पना व स्वरूप

# संशोधन

प्रा. मीरा देठे

**प्रस्तावना :**

आपल्या भोवतालच्या जगातील माणसे, वस्तू आणि घटना यांचे अस्तित्व माणसाला जेव्हापासून जाणवायला लागते, तेव्हापासून हे काय आहे, कसे आहे, हे आपल्या ज्ञानद्रियांचा उपयोग करून जाणून घेण्याची त्याची खटपट सुरू होते आणि हे जाणून घेणे म्हणजे संशोधन होय. मानवामध्ये असणारे कुतूहल ही संशोधनाची जननी आहे. हे कुतूहल माणसाला संशोधनाची प्रेरणा देते. संशोधनाला इंग्रजीत Research म्हटले जाते. Research म्हणजे पुन्हा शोध घेणे होय .

**संशोधन म्हणजे काय ?**

सं + शुद्ध म्हणजे संपूर्णपणे सर्वांगीण शुद्ध करणे. दोष काढून टाकून चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध निर्मळ करणे असा हा मूळार्थ. अर्वाचीन काळात संशोधनाचा अर्थ शोध घेणे, नवे ज्ञान उपलब्ध करून देणे असा करण्यात आला. इतिहास सिद्ध करण्यासाठी लागणाऱ्या साधनांचा शोध म्हणजे ऐतिहासिक किंवा पौराणिक कागदपत्रे, वंशावळी, करारपत्रे, शिलालेख, ताम्रपट, याद्या, सनदा इत्यादींचा शोध घेण्यास प्रारंभ झाला. इतिहासाची ही जुनी साधन सामुग्री शोधून ती प्रकाशात आणणे या कृतीस इतिहास संशोधन संबोधण्यात आले. संशोधन म्हणजे जुन्यांचा शोध असा रूढार्थ झाला. संशोधन म्हणजे जुने साहित्य मिळविणे त्यावर यथायोग्य संस्कार करणे. त्यासंबधीची तौलनिक माहिती सिद्ध करणे, ती प्रकाशात आणणे असा अधिक नवा अर्थ रूढ झाला व तो चांगला स्थिरावला. कारण हे कार्य दोनपेक्षा अधिक पिढ्यांना सातत्याने करावे लागते व अजूनही ते संपले नाही.

आपल्याकडे संशोधनाची पहिली पिढी आली ते केवळ वाङ्मयीन संशोधन करणारी नसून ती इतिहास, धर्म, संप्रदाय, भाषा, व्याकरण इत्यादींचा एकत्र शोध घेणारी व त्यातून वाङ्मयीन संशोधन करणारी पहिली पिढी आली. त्यामुळे वाङ्मयीन संशोधन या संकल्पनेला इतिहास, पुराण, धर्मग्रंथ, भाषा, व्याकरणादीचा अभ्यास यांची जोड मिळाली. हे कार्य करणाऱ्या

जो तो वाङ्मयाचा संशोधक म्हणून मान्यता पावू लागला. म्हणून अलीकडे इतिहास संशोधन व वाङ्मयीन संशोधन हे एकमेकांत मिसळले आहे.

संशोधन हे मूलत: शास्त्र आहे. संशोधनाची म्हणून जी एक शास्त्रीय पद्धती आहे. तिचा अवलंब संशोधकाला करता येतो.

संशोधन वृत्तीचा उगम प्रबोधनाच्या चळवळीतील ती एक प्रकृती आहे. आपल्या देशात संशोधनाची पायाभरणी ब्रिटिशांनी केलेली असावी. महाराष्ट्रात ती राष्ट्रभिमानातून निर्माण झाली. युरोपात संशोधनाची वेगवेगळी क्षेत्रे उपलब्ध असल्याने संशोधनाबाबतची पाश्चात्त्य कल्पना बरीच व्यापक आहे.

**संशोधनाची व्याख्या :**

१) सं + शोधन म्हणजे शोध घेणे चौकशी करणे.
२) काळजीपूर्वक तपास करून सत्य शोधण्याचा शास्त्रीय प्रयत्न करणे.
३) संशोधन ज्या शास्त्रीय पद्धतीने केले जाते, त्या शास्त्राला संशोधन शास्त्र किंवा शोधविद्याशास्त्र म्हणतात.
४) संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा माहिती मिळविणे.
५) संशोधनात अतिशय पद्धतीशीरपणे व बिनचूक व तज्ज्ञतेवर आधारलेली सूक्ष्म पाहणी अपेक्षित असते. हाती घेतलेल्या प्रश्नासंबंधी अगोदर किती काम झाले आहे याची संशोधकाला जाणीव झाली पाहिजे.
६) संशोधनात तर्कशुद्धता , वस्तुनिष्ठता ह्या गोष्टी असतात.
७) संशोधनात गुणाचा विचार करून मिळविलेल्या माहितीची किंवा ज्ञानाची पूर्व संघटना केलेली असते.

मानवाच्या ठिकाणी बुद्धी, मन आणि भावना असतात. तसेच प्रबळ जिज्ञासा आणि बाह्यविश्व व अंत:विश्व यांच्या संबंधाविषयीच्या जिज्ञासेतून पडणाऱ्या प्रश्नातून शोध घ्यायचा ध्यास सुरू होतो व त्यातून संशोधनाच्या अभिक्रियेला सुरुवात होते. वैज्ञानिक, सामाजिक व साहित्य जगतातील सर्व संशोधनापाठीमागे मानवी जीवन समृद्ध करणे, संपन्न करणे अशी अदम्य ज्ञानपिपासा कार्यरत असतात व त्यातून शोध लागतात. आधुनिक युगात जीवनाची सर्व क्षेत्रे संशोधनाने व्यापली आहेत. संशोधन हा आधुनिकतेचा कणा आहे. वैज्ञानिक संशोधनांचा विषय वस्तू, सामाजिक संशोधनाचा विषय माणूस तर साहित्याचा विषय साहित्य हे आहेत.

वरील तिन्हीमध्ये संशोधन पद्धती समान आहेत. शंका उपस्थित करणे, स्वरूप न्याहाळणे, समस्या सोडविण्यास अंदाज बांधणे व काही गृहीत

कल्पना निश्चित करणे, तिच्या साह्याने मूळ अनुभवापर्यंत जाणे आणि निष्कर्ष काढणे याही अभिक्रिया समान आहेत. इतर संशोधनापेक्षा साहित्यसंशोधन एक सर्जन असते. त्यात समीक्षेची सार्थ दृष्टी जशी आवश्यक आहे. तशीच सहानुभूतीपूर्वक विचारग्रहण करण्याची ताकद आणि आवश्यक ती कल्पनाशक्ती व सौंदर्यदृष्टीही असली पाहिजे. विषयाचा अभ्यास आवड, निपक्षपातीपणा, निर्भेळ शोधकता, जिज्ञासा या बाबी संशोधकांकडे आवश्यक असतात.

'A Great Research is always new Research.'

**संशोधन पद्धती :**

संशोधन, सत्याकडे प्रवास करणारा अभ्यासपूर्ण मार्ग आहे. कष्ट आणि विशिष्ट प्रकारच्या नियोजनामुळे संशोधनाच्या माध्यमातून सत्यप्रत पोहोचवता येते. विविध शास्त्रांच्या चिकित्सापूर्ण अभ्यासातून संशोधनाचे समाधान मिळविता येते. अलीकडे विविध शाखांमध्ये संशोधन व्यावसायिक आणि व्यावहारिकदृष्ट्या आवश्यक झालेले दिसते.

संशोधनाच्या विचारातून वाटचाल करत असताना मानवी जीवन हे विज्ञानाचे युग आहे. सूक्ष्म अणुरेणू पासून प्रत्येक गोष्टींमध्ये आगळे-वेगळे संशोधन करता येते. परंतु रिसर्च (Research) म्हणजे शोधणे नावीन्याचा शोध घेणे. जुन्यातून नवीन उदय घडविणे. Research to Research या फ्रेंच धातूपासून त्याची उत्पत्ती झाली. म्हणून कोणतेही क्षेत्र असो त्यामधील शोध घेणे To Research ही प्रक्रिया संशोधकाची असते.

संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. त्यामध्ये समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, सर्वेक्षण संशोधन पद्धती, तुलनात्मक संशोधन पद्धती या संशोधन पद्धतींचा त्यामध्ये प्रामुख्याने समावेश करता येईल.

**१) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती :**

समाजशास्त्रीय संशोधनाचा आढावा घेत असताना आपल्या असे लक्षात येईल की "Man is social animal." मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. माणूस माणसासाठी, समाजासाठी, राष्ट्रासाठी संबंध साधत असतो. कारण या जगात विविध क्षेत्रातून मनुष्य प्राणी वाटचाल करीत असतो. त्यामध्ये देवसंस्था, धर्मसंस्था, सामाजिक रूढी, नीतिशास्त्र आदीचा सामाजिक दृष्टिकोणातून हा अभ्यास केला जातो. भ्रष्टाचार, वाढती महागाई, रोगराई, वाढती लोकसंख्या अशा विविध गोष्टींचा अनुभव संशोधकाला येत असतो. तेव्हा विशिष्ट हेतू नजरेसमोर ठेवून संशोधक संशोधन करत असतो. त्याला आपले नाते

समाजाशी जोडून स्वत:च्या पायावर उभा राहून मनातील अभ्यास करावा लागतो. यासाठी त्याला समाजशास्त्रीय अभ्यासकांचा सल्ला घ्यावा लागतो.

**२) ऐतिहासिक संशोधन पद्धती :**

संशोधनाच्या ऐतिहासिक अभ्यास पद्धतीत गतकालीन घटनांचा मागोवा घेतला जातो. त्याचे स्वरूप कितीही गुंतागुंतीचे असले किंवा अस्पष्ट असले तरी ही त्याचा गुंता सोडवणे हे एक आव्हानच असते. संशोधनात गतकालीन घटनांच्या अभ्यासाला महत्त्वपूर्ण स्थान असते. याचे कारण असे की सामाजिक समूह, संस्था व व्यक्ती यांच्यामध्ये सातत्याने कमी अधिक प्रमाणात बदल होत असतात. साहजिकच व्यक्तीच्या सामाजिक भूमिकेत व संस्थाच्या स्वरूपात परिवर्तनाची प्रक्रिया चालूही होते. त्याचे आकलन नीट होण्यासाठी सामाजिक घटनांची तपासणी सुरुवातीपासून करणे अगत्याचे असते. अशावेळी ऐतिहासिक अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो. संशोधनाची प्रक्रिया इतिहासाचा आधार घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. कागदपत्रे, आत्मचरित्र, रोजनिशी, पत्रे, कैफियती, शासकीय माहितीच्या आधारे ऐतिहासिक संशोधन करता येते.

**३) सर्वेक्षण संशोधन पद्धती :**

सर्वेक्षण संशोधन पद्धती ही सुद्धा एक सामाजिक तथ्ये शोधून काढण्यासाठी उपयुक्त आहे. या पद्धतीत एक किंवा एकापेक्षा अनेक माणसांचा सहभाग असतो. व्यक्तिगत पातळीवर एकटा संशोधकसुद्धा माहिती मिळवू शकतो. परंतु त्यासाठीचा अभ्यास विषय मर्यादित असतो. अभ्यास विषयाचे स्वरूप विस्तारित आणि व्यापक असेल तर समूह पातळीवरून विविध घटकांचे सर्वेक्षण केले जाते. सर्वेक्षणाला इंग्रजीमध्ये survey म्हणतात. हा शब्द re आणि search म्हणजे पाहणे या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. चिकित्सक पाहणी करणे म्हणजेच सर्वेक्षण होय. विशिष्ट प्रश्नासंबंधी चिकित्सक पाहणी करणे व त्या संबंधी सर्व तऱ्हेची साद्यंत माहिती घेणे म्हणजेच सर्वेक्षण करणे होय. समाजाच्या विशिष्ट अंगाविषयीची साद्यंत माहिती गोळा करण्याच्या हेतूने सर्वेक्षण हाती घेतले जाते. गाव, शहर, कुटुंब, कूळ, जात, जंमात, वर्ग, समूह असा कोणताही घटक घेऊन त्यातील लोकांची अगर अभ्यास विषयातील प्रश्नांशी निगडित असणाऱ्या अंगाविषयी पद्धतशीरपणे माहिती घेण्याचे कार्य सर्वेक्षणाच्या आधारे करता येते.

**४) तुलनात्मक संशोधन पद्धती :**

तुलनात्मक संशोधन पद्धतीत विश्वसनीय माहिती अपेक्षित असते. तुलनात्मक पद्धतीचा आधार तुलना शक्य आहे. कोणत्याही एक किंवा दोन

किंवा त्यापेक्षा अधिक घटना प्रसंगाच्या संबंधित असणाऱ्या तथ्यांची तुलना या पद्धतीने केली जाते. ही अभ्यास पद्धती फार जुनी नसून अर्वाचीन काळातील आहे. तुलनात्मक संशोधन पद्धतीमध्ये केवळ तुलना अपेक्षित नसून त्यातील साधर्म्य, वैधर्म्य म्हणजेच सारखेपण व वेगळेपण या दोहोंचा विचार अभिप्रेत आहे. तुलनात्मक पद्धतीद्वारे अनेक प्रकारचे निष्कर्ष काढण्याची पद्धत संशोधन प्रक्रियेत असल्यामुळे संशोधक ही पद्धत अंगीकारत असतो. तुलनात्मक पद्धतीने अत्यंत योग्य पद्धतीने निष्कर्ष काढून त्याचा अहवाल तयार करावा लागतो.

संशोधनाच्या वरील महत्त्वपूर्ण पद्धतीशिवाय प्रायोगिक संशोधन पद्धती (Experimental Design), परीक्षणात्मक पद्धती (Experimental Method), प्रश्नावली (Questionaire Method), निरीक्षण पद्धती (Observation Method), मुलाखत (Interview), तथ्य संकलन (Data Collection) आदी संशोधन पद्धतींचा समावेश आहे. संशोधक संशोधन करीत असताना एका विशिष्ट पद्धतीचा अवलंब करीत नाही तर त्याला अनेक पद्धतींचा अवलंब करावा लागतो. एकूणच संशोधकाने केलेल्या संशोधनातून एक नवीन माहिती वाचकांपुढे येऊन ती समाज उपयोगी ठरली पाहिजे.

❀❀❀

# संशोधन संकल्पना : स्वरूप व व्याप्ती

प्रा.संभाजी शिंदे

प्रास्ताविक :

मानवी जीवन व्यवहारातील अनुकूल, प्रतिकूल व्यवहार हाच कलेचा मुख्य प्रांत असतो. परंतु मानवी जीवन हे सदा सर्वकाळ एकसारखेच असते असे मात्र नाही. कारण बदलता जीवनक्रम हे निसर्गचक्राचे महत्त्वपूर्ण लक्षण असल्यामुळे जीवनव्यवहार बदलला की तत्त्वज्ञान आणि कलाव्यवहाराचे तत्त्वचिंतनही बदलणे आवश्यक ठरते. अशा बदलाची प्रक्रिया घडत असताना कलाव्यवहाराचे अंतरंगावर आणि बाह्यरंगावर परिणाम होणे शक्य असते. त्याविषयी काही अनुकूल स्वरूपाचे मत असते तसेच प्रतिकूल मतही असू शकते. यातूनच संशोधक वृत्तीला प्रारंभ होतो. संशोधनाच्या अभिक्रियेत पुनःपुन्हा भर पडली की संशोधनाला नव्याने चालना मिळते. परंतु केवळ शोधन म्हणजे संशोधन नव्हे, यावरून शोध घेणे, शोधन करणे ही संशोधनाची पहिली पायरी ठरू शकते. वास्तविक संशोधन ही प्रक्रिया मानवी कल्पनेपेक्षा बुद्धितत्त्वाला प्रमुख प्राधान्य देणारी अभिक्रिया ठरते. कारण या अभिक्रियेने संपूर्ण मानवी जीवन व्यापून टाकलेले असते. त्यामुळे साहजिकच संशोधन हा एक मानवी बौद्धिक व्यवहार ठरतो. त्याबरोबरच कोणतेही एक मर्यादित स्वरूपाचे क्षेत्र त्याला बंदिस्त करू शकत नाही.

विस्तीर्ण मानवी समूहाच्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणामध्ये ज्या ज्या क्षेत्रात त्याचा संचार आहे त्या सबंध क्षेत्रात तो शोध घेऊ शकतो. शोधनाच्या याच प्रक्रियेतून संशोधनाची अभिक्रिया सुरू होते. त्यामुळे संशोधन हे क्षेत्र असे आहे की, ते कोणत्याही एका विशिष्ट मर्यादेत कार्यरत नसते तर सजीव मानवी प्राण्याच्या सद्सद्विवेकबुद्धीला दैनंदिन जीवनव्यवहार जगत असताना असंख्य प्रश्न पडतात. संबंधित प्रश्नाविषयीचे कुतूहल चाळविले जाते. याबरोबरच जीवनव्यवहाराशी संबंधित काही मूलभूत स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात यातूनच संशोधन प्रक्रियेला प्रारंभ होतो. ज्ञात - अज्ञाताचा शोध घेणे ही मूळ मानवी प्रवृत्ती असल्यामुळे ही मूळ प्रवृत्ती तो स्वतःच्या सुखासाठी, स्वतःच्या जीवनव्यवहारासाठी किंवा स्वतःच्या अभिवृद्धीसाठी राबवित असतो. त्यामुळे संशोधन क्षेत्रे ही नित्य नवी आणि

व्यापक रूप धारण करताना दिसतात. त्यामुळे साहजिकच संशोधन प्रक्रिया ही अधिक लवचीक, व्यापक मानवी जीवन आविष्कृत करणारी याबरोबरच मानवी जीवनाशी संबंधित अनुबंधाची अभिक्रिया असते, हे यावरून स्पष्ट होते. त्यामुळे साहजिकच संशोधन ही प्रक्रिया नित्य नव्या स्वरूपाची तर आहेच याबरोबरच सातत्यपूर्ण नावीन्याकडे वाट दाखविणारी आणि नावीन्याचा ध्यास घेणारी अशा स्वरूपाची आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संशोधनाची नेमकी प्रक्रिया स्पष्ट करण्याबरोबरच संशोधन ही नेमकी संकल्पना व्यापक पातळीवर स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधन संकल्पना व स्वरूप :**

साधारणतः एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून अखिल विश्वामध्ये वाङ्मय निर्मिती ही प्रचंड वेगाने व अखंडपणे चालू आहे. तत्पूर्वीही वाङ्मय निर्मिती केली जात होती. परंतु तिचे स्वरूप मर्यादित होते. साधारणतः पंधराव्या शतकापासून वैज्ञानिक स्वरूपाच्या संशोधनाला प्रारंभ झाला. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये विज्ञानयुगाची सुरुवात झाली आणि वर्तमान मानवी जीवनाची सर्व क्षेत्रे संशोधनांनी व्यापली गेली आहेत. त्यापैकीच एक साहित्य हे होय. सर्वप्रथम साहित्य आणि संशोधन याविषयीच्या नेमक्या संकल्पना समजून घेणे क्रमप्राप्त ठरते.

**१) साहित्य** : साहित्य हे अत्यंत चंचल द्रव्य स्वरूपाचे असते. याबरोबरच मानवी जीवनाच्या मनाच्या सर्व अगांना अनेक तऱ्हेने स्पर्श करण्याचे सामर्थ्य साहित्याच्या ठिकाणी असते. साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व हे त्यांचे निर्मितीक्षेत्र असते. सामाजिक, सांस्कृतिक, वांशिक प्रकृतींचा प्रभाव लेखकाच्या व्यक्तिमत्त्वावर पडतो. यातूनच साहित्यनिर्मिती घडत असते.

**२) संशोधन** : गंभीरतेने,वैचारिक दृष्टीने, संशोधनाची शिस्त पाळून केलेले प्रबंधरूपी लेखन म्हणजे संशोधन होय.उपरोक्त दोन्ही व्याख्या ध्यानात घेता संशोधनासाठी लेखन Methodology तंत्र - Technology या दोन्ही संकल्पनापैकी Methodology ही संकल्पना महत्त्वाची ठरते. परंतु त्यातील तांत्रिक बाजूही दुय्यम मानून चालणार नाही. गांभीर्याने केलेल्या कोणत्याही लेखनामध्ये १) अभ्यास २) संशोधन ३) समीक्षा या स्वरूपाच्या लेखनांचा समावेश होतो. नव्हे तर या तीन घटकांना केंद्रवर्ती मानून संशोधन होणे गरजेचे असते. परंतु हे तिन्ही घटक एक नव्हेत हे लक्षात ठेवून संशोधनाचा अवलंब करणे क्रमप्राप्त ठरते.

उपरोक्त साहित्य आणि संशोधन या दोन्ही संकल्पनेच्या विवेचनानंतर संशोधन या शब्दाची व्युत्पत्ती व व्याख्या आणि स्वरूप

याविषयीचे विवेचन पुढीलप्रमाणे, संशोधनाचे नेमके तंत्र जाणून घेण्यापूर्वी संशोधन या संकल्पनेसाठी हिंदीमध्ये शोध हा पर्यायी शब्द वापरला आहे. 'नवीन शोध विज्ञान' या ग्रंथामध्ये या संकल्पनेची व्युत्पत्ती पुढीलप्रमाणे विशद केली आहे, ''शोध के पर्यायों को भाषा की दृष्टी से दो भागों में बाँट सकते है।
१) हिन्दी - भाषा के शोध - पर्याय,
२) अंग्रेजी भाषा के शोध पर्याय - तंत्र
१) हिन्दी -भाषा के शोध पर्याय निम्नलिखित है-
१. शोध, २. अनुसंधान, ३.अन्वेषण, ४. गवेषण, ५. अन्वीक्षण, ६. अनुशिलन, ७. परिशीलन, ८.खोज।''[१] यामध्ये अभ्यासकाने शोध या संकल्पनेला दोन भागांमध्ये विभाजित केले आहे. ही विभागणी करताना त्यांनी हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेसाठी वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पर्यायी शब्दांचा समावेश केला आहे. तर शोध या संकल्पनेची व्युत्पत्ती याच ग्रंथामध्ये स्पष्ट केली आहे ती अशी,''शोध शब्द शुध धातु से बना है । शुध का मूल अर्थ है शुद्ध करना, परिमार्जित करना,संदेह रहित बनाना, निर्भान्त बनाना तथा प्रामाणिक बनाना। इसप्रकार शोध का अर्थ हुआ निर्मल , परिशुद्ध, सर्वग्राह्य, प्रामाणिक अथवा मानक । यह शोध शब्द का विस्तृत अर्थ है । इस अर्थ में विश्व का कोई भी पदार्थ परिशुद्ध रूप में शोध होगा।''[२] थोडक्यात 'शोध' हा शब्द शुध् या धातुपासून बनला आहे की ज्याचा अर्थ शुद्ध करणे, परिमार्जन करणे, कोणत्याही शंका विरहित करणे, भ्रांत विरहित बनविणे याबरोबरच प्रामाणिक बनविणे या अर्थी विचार केल्यास 'शोध' या शब्दाचा नेमका अर्थ निर्मळ, शुद्ध, सर्वग्राह्य, प्रमाणिक किंवा मान्य असलेले. या सिद्धांताबरोबरच शोध या संकल्पनेची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे,''अनुसंधान के क्षेत्र में अज्ञात तथा विस्तृत तथ्यों को नवीन दृष्टी से संदेहरहित तथा विस्तृत तथ्यों को सर्वग्राह्य बनाना तथा ज्ञात तथ्यों को नवीन दृष्टी से संदेहरहित तथा निर्भान्त बनाना शोध कहलाता है।''[३] या व्याख्येवरून एक बाब स्पष्ट होते ती म्हणजे संशोधनाच्या प्रांतात अज्ञात किंवा अप्रस्तुत सत्यांना सर्वसमावेशक बनविले जाते, याबरोबरच नव्या दृष्टीच्या माध्यामातून परिपूर्ण व भ्रांतरहित बनविणे यालाच शोध असे म्हटले जाते. हिंदीतील शोध या संकल्पनेलाच मराठीत संशोधन हा पर्यायी शब्द वापरला जातो.

साहित्यविश्वाला सजीवता प्राप्त करून देणाऱ्या संशोधन या प्रक्रियेची नेमकी अवस्था स्पष्ट होण्यासाठी वेगवेगळ्या व्याख्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.यापैकी दु. का. संत यांनी त्यांच्या 'संशोधन पद्धती,प्रक्रिया,अंतरंग' या ग्रंथामध्ये पुढीलप्रमाणे व्याख्या स्पष्ट केली आहे,''एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी

विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा साक्षेपी व पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन.''[४] म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयाची माहिती प्राप्त करण्यासाठी विशिष्ट प्रकारचा हेतू किंवा उद्देश मनात असणे आवश्यक असते. अशा प्रकारचा उद्देश मनात ठेवताना संबंधित विषयाचा साक्षेपी व पद्धतशीर अभ्यास होणे ही बाब देखील तितकीच महत्त्वाची ठरताना दिसते. संशोधन ही प्रक्रिया नेमकी काय आहे हे स्पष्ट करण्याबरोबरच संशोधनाची सूत्रबद्ध व्याख्या उषा देशमुख यांनी त्यांच्या 'मराठी संशोधनविद्या' या ग्रंथामध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे, ''माणूस सतत अज्ञाताचा शोध घेतोच असेही नाही म्हणजे दगडावर दगड घासला की अग्नी निर्माण होतो हा शोध घेत थांबत नाही. किंवा दुसरे उदाहरण घेऊ या पृथ्वी गोल आहे. या निष्कर्षापर्यंत पोहचल्यावर पुनः पुन्हा तोच सिद्धांत सांगत बसणे म्हणजे मानवी बुद्धीने स्थिरशील (Static) होण्यासारखे आहे. एकदा तो शोध लागला, तो नीट पडताळून घेतला गेला की, त्यापुढे पाऊल टाकण्याचे कार्य संशोधक करतो व त्याची व्यवस्था लावतो. आपल्या चिंतनाचे व्यवस्थापन करतो. या अभिक्रियेला 'संशोधन' असे म्हणता येईल.''[५] या व्याख्येवरून संशोधन हे नेहमी चल स्वरूपात असते हे स्पष्ट होते ते केव्हाही अस्थिर किंवा अचल स्वरूपात कार्यरत राहत नाही. प्रामुख्याने संशोधन हे दोन प्रकारचे असते. एक शास्त्रीय व दुसरे साहित्यिक यापैकी शास्त्रीय संशोधन हे प्रयोगप्रधान असते. या संशोधनामध्ये उत्पादकता महत्त्वाची असते. या संशोधनामध्ये उत्पादकता महत्त्वाची असते. त्यासाठी संशोधकाला काही घटिते (फॅक्टस्) तयार करून घ्यावी लागतात. याबरोबरच विशिष्ट अशा तंत्राचा अवलंब करून माहिती हाती आल्यावर विगमन तर्कपद्धतीचा अवलंब करून निष्कर्ष काढणे आवश्यक ठरते.

याउलट वाङ्मयीन संशोधन हे पृथ्थकरण - प्रधानतेवर (ॲनॅलेसिस) आधारलेले असते. फरक इतकाच की शास्त्रीय संशोधनात जी माहिती प्रत्यक्ष प्रयोगांच्या साहाय्याने मिळविली जाते तीच माहिती येथे ग्रंथांच्या माध्यामातून मिळविली जाते. ग्रंथाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या संशोधनामध्ये सर्वप्रथम ग्रंथ वाचून माहिती संकलित केली जाते, त्यानंतर संबंधित माहितीचे विश्लेषण व परीक्षण करून निष्कर्ष नोंदविले जातात. थोडक्यात एकंदरीत पद्धती तीच परंतु जी सामग्री किंवा माहिती मिळविली जाते ते प्रयोगपद्धतीने काढलेल्या माहितीप्रमाणे प्रत्यक्ष स्वरूपात नसते किंवा निरपवाद व विश्वसनीय स्वरूपाची नसते. कारण विश्वसनीयता निर्माण होण्यासाठीची मूल्यवर्धित साधने आपल्याकडे उपलब्ध नाहीत. साहित्याविषयीचे संशोधन करीत असताना

विषयाच्या निवडीपासून ते प्रत्यक्षात संशोधन पूर्णत्वास जाईपर्यंत अभ्यासकाला वेगवेगळ्या कसोट्यांवरती उतरावे लागेल. त्यासाठी अशा विषयाची निवड करावी की जो विषय आपल्या संशोधन दृष्टीच्या आवाक्याबाहेरचा असू नये. साहित्य संशोधनाविषयीचे काही मूलभूत टप्पे, दु. का. संत यांनी त्यांच्या 'संशोधन पद्धती, प्रक्रिया आणि अंतरंग' या ग्रंथामध्ये सांगितले आहेत. त्यापैकीच काही टप्पे संक्षिप्त स्वरूपात असे.

१. पहिला प्रकार म्हणजे अगदी नवीन माहिती उजेडात आणणे, 'सं-शोधन' ( रि-सर्च) या शब्दामागील भूमिका हीच आहे.
२. संशोधनाचा दुसरा प्रकार म्हणजे अगोदर उपलब्ध झालेली माहिती उपयोगात आणून तिची संगती नव्याने लावणे, नव आशय, अर्थ, शोधण्याचा प्रयत्न करणे, नवे स्पष्टीकरण (इंटरप्रिटेशन) नवे संबंध (रिलेशनशिप) प्रस्थापित करणे इ. वाङ्मयीन व सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रातील संशोधन हे ह्या प्रकारचे असते.
३. संशोधनाचा तिसरा प्रकार म्हणजे कोणत्यातरी तात्त्विक प्रश्नाचे परीक्षण, छाननी तपासणी इत्यादी करून नवा सिद्धांत प्रस्थापित करणे हे अतिशय उच्च स्वरूपाचे संशोधन होय.

उपरोक्त सर्व प्रकारांच्या संशोधनातून एक बाब प्रकर्षाने स्पष्ट होते ती म्हणजे साहित्य संशोधनाची प्रमुख दृष्टी ही एखादी नवीन माहिती उजेडात आणणे ही असते. या नव्या माहितीच्या परिष्करणाबरोबरच एखादा तात्त्विक प्रश्न निश्चित करून या प्रश्नाच्या उत्तराच्या अनुषंगाने सिद्धांत प्राप्त करणे या स्वरूपाचे नवनवोन्मेष अशा प्रकारचे कार्य साहित्याविषयीचे संशोधन करीत असताना घडत असते नव्हे प्रस्थापित करावे लागते हे या ठिकाणी दुर्लक्षून चालणार नाही.

साहित्यपरंपरेमध्ये शोध घेणे, शोधन करणे या पहिल्या पायरीपासून सुरू झालेली संशोधनाची परंपरा मानवी जीवनात कल्पनेपेक्षा बुद्धितत्त्वाला प्राधान्य देऊन कार्यरत राहणारी अभिक्रिया आहे. ही अभिक्रिया प्रामुख्याने कल्पनेपेक्षा बुद्धितत्त्वाला प्रमुख प्राधान्य देऊन मानवी जीवनात कार्यरत राहते. साहित्य आणि संशोधन या दोन परस्परपूरक प्रक्रिया आहेत. यामध्ये संशोधन करणे म्हणजे एखाद्या विशिष्ट बाबीच्या मूळ सिद्धांतापर्यंत पोहचणे. परंतु त्यासाठी संदर्भांची अत्यंत आवश्यकता असते. साहित्यविचारामध्ये संदर्भविरहित विधानांना थारा असत नाही.

❀❀❀

# संशोधन : स्वरूप, परंपरा आणि प्रक्रिया

प्रा. नंदा कराड

'ज्ञानासाठी कोश' या अर्थानेच 'संशोधन' हा शब्द सर्वसामान्य व्यवहारात प्रचलित आहे. बौद्धिक आणि व्यावहारिक समस्यांची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा प्रयत्न आहे. त्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. संशोधन ही अत्यंत काळजीपूर्वक व टीकात्मक स्वरूपाची चौकशी असून त्याद्वारे तथ्य आणि तत्त्वे शोधून काढली जातात.

मानवाच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्राणिमात्राला जे शक्य झाले नाही, ते मानवाने करून दाखविले आहे. मानवाच्या विकासामध्ये भाषेचा मोठा सहभाग आहे. कारण भौतिकशास्त्राच्या म्हणजे विज्ञानाच्या विकासामध्ये चाकाला जेवढे महत्त्व आहे, त्यापेक्षा कितीतरी जास्त महत्त्व भाषेच्या शोधाला आहे. कोणताही शोध लावण्यासाठी विचार, चिंतन, कल्पना, मनन करण्याची आवश्यकता असते. निसर्गाने रहस्य शोधून काढण्याचा जसा त्याचा अट्टाहास चालू आहे, तसेच आपल्या आजूबाजूला काय आहे नि काय चालू आहे, याचा अर्थ लावून घेण्याचा प्रयत्न तो करीत आहे. माणसामाणसांतील संबंध आणि त्या संबंधाचे स्वरूप यांची उकल करून त्यांचे मूळ शोधून काढण्याचा तो प्रयत्न करीत आहे. त्यासाठी भाषा हे माध्यम अत्यंत महत्त्वाचे आहे. भाषेच्या बळावरच मानवाने आपली प्रगती साधली आहे. मानवाला कोणतेही काम करण्यास भाषा महत्त्वाची असते. संशोधनामध्ये ज्ञान व जिज्ञासा हे दोन गुण आवश्यक आहे. या दोन गुणांवर माणसाने हवे ते मिळवले आहे. ज्ञानाची भूक भागविण्यासाठी त्याची साधना चालू आहे.

संशोधनाला इंग्रजी भाषेमध्ये Research असे म्हटले जाते. Re आणि search असे दोन शब्द आहेत. Re म्हणजे पुन्हा आणि search म्हणजे शोध घेणे होय. म्हणून Research म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये संशोधन कार्य अपरिहार्य आहे. ज्ञानाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये, शाखांमध्ये संशोधनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक युगात नवीन तथ्य, नवीन विचार स्वीकारण्यात आलेले आहेत.

**संशोधनाच्या व्याख्या व स्वरूप :**

संशोधनाच्या अनेक व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही व्याख्या आपण येथे घेतल्या आहेत.

**१) य.रा. दाते** : संपादित शब्दकोशात, ''संशोधन म्हणजे नवीन शोध लावण्याची क्रिया तपासणी चौकशी होय.''

''संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा माहिती मिळवणे. तिचा पायाभूत माहिती म्हणून उपयोग करणे आणि ही माहिती अत्यंत विश्वसनीय साधनापासून मिळवणे होय.''

''संशोधन म्हणजे पद्धतशीर बिनचूक व तज्ज्ञतेवर आधारलेली सूक्ष्म माहिती होय.''

**२) जे. डब्ल्यु. बेस्ट** : ''संशोधन म्हणजे वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासण्याची प्रक्रिया होय.''

**३) वेबस्टर** : यांच्या शब्दकोशातील व्याख्या, ''तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम.''

**संशोधनाचे स्वरूप :**

संशोधनाच्या मागे जी चिकित्सक वृत्ती आहे, ती आपल्याकडे बरीच आधुनिक आहे. आधुनिक युगाच्या प्रमुख प्रेरणांपैकी ती एक आहे. संशोधन हे अगदी अर्भकावस्थेत म्हणजे दुपट्यात गुंडाळलेले मूल असते. मूल तोंडापाशी येईल त्या वस्तूचे तोंडानेच ज्ञान करून घेते. दुपट्याबाहेर पडले की लुकलुकत्या डोळ्यांनी पाहू लागते. आई ओळखू लागते. बंद मुठी उघडून वस्तू हातात धरू लागते. हे सर्व त्याच्यात असलेल्या कुतूहलामुळे होते. कुतूहल ही संशोधनाची जननी आहे. कुतूहल माणसाला संशोधनाची प्रेरणा देते. संशोधन कृती करायला प्रवृत्त करते.

**संशोधनाची वैशिष्ट्ये :**

१) संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा माहिती मिळवणे व तिचा प्रामुख्याने पायाभूत माहिती म्हणून उपयोग करणे. ही माहिती किंवा ज्ञान अत्यंत विश्वसनीय अशा साधनांपासून मिळवणे होय. कित्येक वेळा एखादे तत्त्व विवरणासाठी शोधून काढून ते आधारास घेतलेले असते.

२) संशोधनात अतिशय पद्धतशीर, बिनचूक व तज्ज्ञतेवर आधारलेली सूक्ष्म पाहणी अपेक्षित असते. हाती घेतलेल्या प्रश्नांविषयी किंवा विषयाविषयी अगोदर किती काम झाले आहे, याची संशोधकाला योग्य जाणीव असावी लागते.

३) संशोधनात तर्कशुद्धता व वस्तुनिष्ठता ह्या गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. मिळविलेली पायाभूत माहिती शक्य तेवढ्या कसोट्या लावून पारखून घेतलेली असते.

४) संशोधनात गुणांचा विचार करून मिळवलेल्या माहितीची व ज्ञानाची पुनर्संघटना काम अतिशय दक्षतेने घ्यावे लागते.

संशोधन वृत्ती ही जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. गरज ही शोधाची जननी असते, असे म्हटले जाते. जे आहे ते जसेच्या तसे स्वीकारणे ही संशोधनाची वृत्ती नव्हे. जे आहे ते काय आहे? कसे आहे? व त्याच्यापुढे काय असू शकते? ह्याचा शोध घेणे म्हणजे संशोधन होय.

**संशोधनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

विद्यापीठीय शिक्षणाचे स्वरूप संशोधनात्मक असावे हे मत सर्वसंमत झाले आहे. भारतातील सर्व विद्यापीठातून विविध शाखातून महत्त्वाचे संशोधन करत आहेत. मूलभूत संशोधन करण्यासाठी काही स्वतंत्र विषयात संशोधनात संशोधन संस्थांची निर्मिती होऊ लागली आहे. ब्रिटिशांनी भारत सोडला तेव्हा १८ विद्यापीठे भारतात राहिली होती. त्यांची संख्या आता २२७ च्या जवळपास गेली आहे. त्यात काही मुक्त विद्यापीठे आहेत. अनेक ज्ञानशाखेत संशोधन होत असून विद्यापीठ अनुदान आयोग सातत्याने विविध पद्धतीने मदत करत आहे. पंडित नेहरूंच्या आग्रहाने विज्ञानाच्या अनेक शास्त्रीय प्रयोगशाळा निर्माण झाल्या आहेत. अनेक शास्त्रांच्या साहाय्याने विविध विषयाला विद्यापीठे आहेत. परंतु विद्यापीठात पदवीधराचे शिक्षण घेणाऱ्यांना संशोधनाचे हे कार्य जमेलच असे सांगता येत नाही. राष्ट्राला म्हणजे समाजाला सर्व क्षेत्रातील विवेकशील नेतृत्व पुरविणे, जीवनाच्या सर्व शाखांना तज्ज्ञांचा पुरवठा करणे, विद्या व ज्ञानाचा प्रसार करणे ही परंपरा कायम राखणे, सांस्कृतिक वैज्ञानिक प्रगतीत एक जागृती निर्माण करणे अशी अनेक उद्दिष्टे असतात.

युरोपमध्ये १५ व १६ व्या शतकात चिकित्सक वृत्तीचा उदय झाला. प्रबोधनाच्या चळवळीमुळे ज्या काही प्रमुख वृत्ती उदयास आल्या त्यापैकी चिकित्सक वृत्ती ही होय. १७ व्या व १८ व्या शतकात या वृत्तीचा विकास होऊन आधुनिक बुद्धिवादाचा उदय झाला. आजच्या आपल्या व्यक्तिगत आणि सामाज़िक जीवनात या शास्त्रीय दृष्टीला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त झाला आहे.

प्रबोधनाच्या चळवळीला विद्येच्या पुनरुज्जीवनाची चळवळ असे म्हटले आहे. विद्वान विचारवंत लोकांचे लक्ष प्रथम जुन्या काळातील श्रेष्ठ

वाङ्मय कृतीकडे गेले आहे. त्याच्या हस्तलिखित प्रती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. मुद्रणाने त्याला साथ दिली व जुने अभिजात ग्रंथ छापले गेले.

आपल्याकडे संशोधनाची पायाभरणी ब्रिटिशांनी केली. विल्यम जोन्स याने १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगोल' ही संस्था स्थापन केली. तिचे उद्दिष्ट आशियाचा प्राचीन इतिहास, अवशेष, कला, शास्त्रे व वाङ्मय इत्यादीचा अभ्यास करणे हे आहे. आशियातील हा संशोधन विषयक पहिला प्रकल्प होता. अशा प्रकारचा उपक्रम महाराष्ट्रात सर जेम्स मॉकिटॉश यांनी इ.स. १८०४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे' ही संस्था स्थापून केला. १८५७ मध्ये नवी विद्यापीठे निर्माण झाल्यामुळे सुशिक्षितांच्या पिढ्या पुढे आल्या. त्यांचे लक्ष प्रामुख्याने इतिहास संशोधनाकडे वळलेले दिसते. न्यायमूर्ती रानडे यांनी प्राचीन संतांच्या कार्याचे मूल्यमापन केले व 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' हा ग्रंथ याच दृष्टीने लिहिला. महाराष्ट्रात संशोधनास श्री. वि. ज. कीर्तने यांच्या 'ग्रॅड डफ'च्या इतिहासातील निबंधाने १८६७ मध्ये झाली. इ.स. १८७८ मध्ये 'काव्येतिहाससंग्रह' या मासिकाने संशोधनाचे नवे युग महाराष्ट्रात निर्माण केले. साने, खरे, पारसनीस व राजवाडे यांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधनाचे एक नवे युग निर्माण केले. संशोधनाची एक परंपरा महाराष्ट्रात तयार झालेली दिसते.

१९१५-२० च्या सुमारास भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था पुणे, प्रज्ञा पाठशाळा वाई यासारख्या संस्था या कार्यास वाहिलेल्या दिसतात. संशोधन म्हणजे इतिहास संशोधन प्राच्य जीवनसंस्कृती. इतिहास सिद्ध करण्यासाठी लागणाऱ्या संशोधनाचा शोध म्हणजे ऐतिहासिक कागदपत्रे, वंशावळी, करारपत्रे, दानपत्रे, शिलालेख, ताम्रपट इत्यादीचा शोध घेण्यास प्रारंभ झाला. इतिहासाची जुनी साधनसामग्री शोधणे, प्रकाशात आणणे या वृत्तीस इतिहास संशोधन म्हणतात. संशोधन म्हणजे 'जुन्याचा शोध' असा अर्थ रूढ झाला.

**सारांश :**

वरील विश्लेषणातून अशा निष्कर्षापर्यंत पोहोचता येते की, संशोधन प्रक्रिया ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली प्रक्रिया आहे. संशोधन वृत्ती ही जीवनभर चालणारी आहे. संशोधनातून ज्ञानाची भूक भागविली जाते, त्यासाठी भाषा हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे.

❀❀❀

# संशोधन आराखडाः स्वरूप व महत्त्व

**डॉ.बाळासाहेब सोनवणे**

प्रस्तावना :

विद्यापीठ अनुदान आयोगाने यापुढील काळात संशोधनाला प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले आहे. यामुळे संशोधनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. जागतिकीकरणाच्या काळात संशोधनाच्या जुन्या पद्धती कालबाह्य होऊन तौलनिक संशोधन पद्धती, सांस्कृतिक संशोधन पद्धती या सारख्या नव्या पद्धती रूढ होत आहे. जागतिकीकरणाच्या काळात संशोधनात होणाऱ्या बदलास अनुरूप संशोधने होण्याची गरज आहे. आपल्या देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी पुढील काळात सर्व विद्यापीठांनी संशोधनावर लक्ष द्यावे यावर जोर दिला आहे. त्यासाठी संशोधकांना अनुदान देण्याची योजना सुरू केल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

संशोधन ही एक चक्रीय स्वरूपाची प्रक्रिया आहे कारण संशोधनामध्ये एक मूलभूत समस्या निवडून त्या समस्येची उकल करण्यासाठी कार्यवाहीच्या दृष्टीने अधिक स्पष्टीकरण व्हावे म्हणून मूळ समस्या परत स्वीकृत व अस्वीकृत गृहीत कृत्याच्या स्वरूपात मांडली जाते. दुसरे कारण असे सांगता येते की, एका समस्येच्या शोधलेल्या उत्तरातून दुसऱ्या समस्येची निर्मिती होत असते.संशोधकाचे संशोधन कोणत्या प्रकारचे आहे हे संशोधन आराखड्यावरून समजते. ज्याप्रमाणे एखादी इमारत बांधण्यापूर्वी आर्किटेक्ट त्या इमारतीचा आराखडा तयार करतो व नंतर त्या आराखड्याप्रमाणे इमारत तयार होते. त्याप्रमाणेच संशोधकाला संशोधन सुरू करण्यापूर्वी आराखडा तयार करावा लागतो. हा संशोधनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. संशोधन करताना सर्वच संशोधन आराखडे हे सारख्या स्वरूपाचे नसतात ते संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार बदलतात.

संशोधन आराखडा हा संशोधनातील महत्त्वाचे पाऊल आहे. समस्येच्या निवडीनंतर प्रत्यक्ष संशोधन सुरू करण्यापूर्वी संशोधकाला संशोधनाचा आराखडा तयार करावा लागतो. संशोधन आराखड्यामुळे संशोधनविषयक संकल्पना सुस्पष्ट होण्यास व पुढील कार्यवाहीची दिशा ठरविण्यासाठी मदत होते. नियंत्रित व अनियंत्रित, वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ

अशा सर्व प्रकारच्या संशोधनात तयार केली जाणारी अभ्यासाची दिशा म्हणजेच संशोधन आराखडा होय. संशोधन आराखडा म्हणजे प्रत्यक्षात संशोधन कार्यास सुरुवात करण्यापूर्वीच संशोधकाने तयार केलेली पूर्वयोजना होय. म्हणजेच असे म्हणता येते की, संशोंधनाची नियोजित रूपरेषा निश्चित करण्यासाठी संशोधन आराखडा तयार केला जातो. गृहीतकृत्याची मांडणी केल्यानंतर संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधनाचा आराखडा तयार करताना जमा केलेल्या माहितीचे तर्कशुद्ध विश्लेषण करण्यासाठी केलेले तर्कशुद्ध नियोजन होय. यामुळे संशोधनात वेळ, श्रम, पैशाची बचत होते. म्हणजेच संशोधक आपले संशोधन कोणत्या पद्धतीने पूर्ण करणार आहे याची लिखित स्वरूपातील पूर्वयोजना म्हणजे संशोधन आराखडा होय.
संशोधन आराखडा तयार करताना माहिती कशा प्रकारे गोळा केली जाईल, तथ्यांचे मापन करण्याच्या पद्धती कोणत्या आहेत, तथ्य विश्लेषण कसे केले जाईल, तथ्याचे मापन करण्याच्या पद्धती कोणत्या आहेत, तथ्य विश्लेषण कसे केले जाईल. इत्यादींचा समावेश होतो. थोडक्यात सांगण्याचे म्हणजे गृहीतकृत्य स्वीकारल्यापासून ते अंतिम निष्कर्षास पोहोचेपर्यंतच्या अनेक बाबींचा समावेश संशोधन आराखड्यात होतो.

संशोधन आराखड्याचे स्वरूप सर्व ठिकाणी सारखे नसते विषयानुरूप, वेळ व काळानुरूप संशोधन आराखड्याचे स्वरूप बदलत असते. आराखडा जर चांगल्या प्रकारे तयार केला तर संशोधन कार्यात कुशल मार्गदर्शकाची भूमिका तो बजावतो. दर्जेदार, नेमके, शिस्तबद्ध संशोधन होण्यास मदत होते. बदलत असते. आराखडा जर चांगल्या प्रकारे तयार केला तर संशोधन कार्यात कुशल मार्गदर्शकाची भूमिका तो बजावतो. दर्जेदार, नेमके, शिस्तबद्ध संशोधन होण्यास मदत होते.

**संशोधन आराखड्यांचे प्रकार:**

संशोधकांच्या संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार संशोधन आराखड्यांचे प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधन आराखडा
२) वर्णनात्मक संशोधन आराखडा
३) निदानात्मक संशोधन आराखडा
४) प्रयोगात्मक संशोधन आराखडा

संशोधन आराखड्याचे प्रमुख **चार घटक** आहेत ते पुढीलप्रमाणे;

**अ. नमुना चाचणीविषयक आराखडाः** नियोजित संशोधन कार्यासाठी निवडलेल्या व्यक्ती, वस्तूं अथवा घटनांची निवड कशी व कोणत्या प्रकारे केली जाणार आहे यासबंधी माहिती दिली जाते.

**ब. निरीक्षणविषयी आराखडा :** या प्रकारच्या संशोधन आराखड्यामध्ये संशोधकाने संकलित केलेल्या तथ्यांचे निरीक्षण करण्याच्या पद्धतींची माहिती या प्रकारच्या आराखड्यामध्ये दिली जाते.

**क. संख्याशास्त्रीय आराखडा :** संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करून माहिती दिली जाते.

**ड. कार्यान्वित आराखडा :** वरील तिन्ही प्रकारच्या आराखड्यामधील कार्य योजना पार पाडण्यासाठी वापरण्यासाठीची तंत्रे यामध्ये दिली जातात.

**संशोधन आराखडा प्रकार :**

**अ. अन्वेषणात्मक अथवा परिचयात्मक संशोधन आराखडा :** एखाद्या घटनेच्या मूळ कारणांचा शोध घेणे हा अन्वेषणात्मक संशोधनाचा उददेश असतो. घटना किंवा समस्येची निवड केल्यानंतर गृहीतकृत्य निर्माण करण्यासाठी हा उद्देश उपयोगी ठरतो.

**ब. वर्णनात्मक संशोधन आराखडा :** या संशोधन आराखड्यामध्ये एखाद्या विषयाशी संबंधित वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन केलेले असते. यथार्थ आणि पूर्ण माहिती प्राप्त करून घेण्यासाठी वैज्ञानिक तंत्राचा वापर केला जातो.

**क. निदानात्मक संशोधन आराखडा :** ज्ञानप्राप्ती व समस्या निराकरण हे संशोधनाचे उद्देश असतात. कोणत्याही समस्याचे वास्तविक ज्ञान घेऊन ही समस्या निर्माण होण्यासाठी कारणे जाणून समस्या निराकरणासाठी उपाययोजना निदानात्मक संशोधन आराखड्यात सुचविली जाते.

**ड. प्रयोगात्मक अथवा परीक्षणात्मक संशोधन आराखडा** नियंत्रित परिस्थितीत निरीक्षण, परीक्षणाद्वारे केल्या जाणाऱ्या पद्धतशीर अभ्यासाला प्रयोगात्मक अथवा परीक्षणात्मक संशोधन असे म्हणतात.

वरील प्रकारे संशोधन आराखडे तयार केले जातात.

**संशोधन आराखड्याचे महत्त्व :**

संशोधन आराखडा तयार करताना संशोधक हा आपली आवड व गरज लक्षात घेऊन तयार करत असल्याने संशोधन आराखडा संशोधकाच्या गरजेनुसार बनविल्याने संशोधन करण्यासाठी सोपे जाते.

संशोधन आराखडा बनविला नाही तर संशोधन करत असताना घेतलेले निर्णय चुकीचे ठरू शकतात. त्यामुळे संशोधनाचे निष्कर्ष चुकीचे येण्याची शक्यता असते.

संशोधन करताना संशोधनात कोणत्या अडचणी येऊ शकतील, तथ्य संकलन करताना निर्माण होणा या समस्यांचे कोणत्या प्रकारे निवारण करता येऊ शकेल याचा विचार संशोधन आराखडा तयार करताना केला जाऊ शकतो. आराखड्यामुळे संशोधनात विश्वासार्हता येऊन संशोधन दर्जेदार होऊ शकते.

**समारोप :**

संशोधन आराखडा तयार केल्यामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. पूर्वनियोजनामुळे वेळ, शक्ती, पैशाची बचत होते. संशोधकाने कोणती तथ्ये जमवावी. कशाप्रकारे जमवावी? कोणते तंत्रे वापरावे? या गोष्टींची माहिती होऊ शकते.

# संशोधन : स्वरूप आणि पद्धती

प्रा. भाऊसाहेब गव्हाणे

मानवी जीवनामध्ये कुतूहल जन्मापासूनच निर्माण झालेले असते. या जिज्ञासेतूनच संशोधनाचा जन्म झालेला आहे. ही प्रक्रिया मनुष्याच्या विचाराला व बुद्धीला प्रेरणा देणारी ठरते. संशोधन प्रक्रियेमुळे मानवाचे संपूर्ण जीवन व्यापलेले आहे. यामध्ये बुद्धी या घटकाला विशेष महत्त्व असते. आज कोणत्याही क्षेत्रामध्ये संशोधनाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. मानवाने ज्या ज्या विभागात प्रवेश केला तेथे संशोधन पोहचलेले दिसून येते. शोध घेण्याच्या जिज्ञासेतून संशोधनाची प्रक्रिया सुरू होते. म्हणूनच संशोधन क्षेत्रे ही एकसारखी असतीलच असे नाही. जेथे मानवी बुद्धी झेपावते तेथे त्याला प्रश्न पडतात. अज्ञानाचा ज्ञानाचा शोध घेणे ही वृत्ती असून मनुष्य स्वत:च्या सुखासाठी व व्यवहारासाठीही संशोधन करताना दिसतो. मानवाने लावलेले विविध शोध हे मानव जातीला उपयुक्त ठरत असतात. आजच्या जगात नित्य नव्या शोधांची भर पडत आहे. त्यामुळे ही प्रक्रिया अतिशय लवचीक व मानवी जीवन क्षेत्राशी संबंधित झालेली आहे. 'संशोधन' या शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर सं+शुध असा दिसतो. म्हणजे संपूर्णपणे शुद्ध करणे किंवा दोष काढून टाकून चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध करणे असा अर्थ होतो. आधुनिक काळात 'संशोधन' शब्दाचा अर्थ शोध घणे, नवे उपलब्ध करून देणे असा दिसून येतो. संशोधन म्हणजे काळजीपूर्वक केलेली चिकित्सक तपासणी किंवा परीक्षण होय' असे म्हणता येते. 'संशोधन म्हणजे दक्षतापूर्वक केलेली एखाद्या समस्येची चौकशी किंवा समस्येमागील कारणांचा घेतलेला शोध कोणत्याही क्षेत्राशी निगडित असलेली समस्या सूक्ष्म पातळीवर जाऊन अभ्यासली जाते तेव्हा त्याला संशोधन असे म्हणतात. अशी व्याख्या ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये केलेली दिसून येते.

संशोधन ही एक सतत चालणारी अशी चिंतन प्रक्रिया आहे. एखाद्या गोष्टीचा शोध घेणे म्हणजे संशोधन नव्हे. तर तो संशोधनाचा पहिला घटक ठरत असतो. परंतु त्या घटकाचे संश्लेषण, विश्लेषण करणे, त्यावर पुन:पुन्हा विचार करणे, कोणत्यातरी मूलभूत अशा नव्या सिद्धांतापर्यंत पोहचणे या प्रक्रियेमुळे संशोधनाला परिपूर्णता प्राप्त होत असते. तरीही कोणतेही संशोधन हे कधीही परिपूर्ण होत नाही. याचे कारण माणसाची चिंतनप्रक्रिया सतत चालू

राहणारी आहे. साहित्य, विज्ञान, कला, समाज यांचे माणसाच्या जीवनात महत्त्व असल्याचे नेहमीच दिसून येते.या सर्व गोष्टीमुळेच माणसाचे जीवन विकसित होत असते. आजही संशोधक म्हटल्यावर काही नावे आपल्या मन:चक्षूसमोर उभी राहतात. त्यामध्ये इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, का. ना साने, वासुदेवशास्त्री खरे, म. म. पोतदार अशी संशोधकांची नावे येतात. तसेच वि. ल. भावे, ल. रा. पारगावकर, ज. र. असजगावकर, अ. का . प्रियोळकर इ. मंडळी वाङ्मयेतिहासाच्या कार्याशी संबधित दिसून येतात. परंतु अलीकडच्या काळात वेगवेगळ्या क्षेत्रात संशोधन संस्थात्मक व गुणात्मक दृष्टीने पुढे जाताना दिसते. त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती निर्माण होऊ लागल्याचे दिसून येते. संशोधन हे मुळात एक शास्त्र आहे. म्हणून कोणत्याही संशोधनाला या शास्त्राच्या पद्धतीनुसारच संशोधन करावे लागते. संशोधनामध्ये सामाजिकशास्त्रे, विज्ञान, वाङ्मय या सर्वांचा समावेश होतो. ऐतिहासिक, वर्णनात्मक, तौलनिक विकासात्मक इ. संशोधन पद्धती दिसून येतात. ऐतिहासिक संशोधन पद्धती महत्त्वाची दिसून येते सामजिक शास्त्रामध्ये इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, नीतिशास्त्र, देवसंस्था, धर्मसंस्था, इ.अनेक विषयांचा अभ्यास सामाजिक शास्त्र संशोधनात केला जातो. सामाजिक शास्त्रांच्या अभ्यास विषय वस्तुनिष्ठ नसून तो व्यक्तिनिष्ठ असतो असे म्हणावे लागते. कारण माणूस हा येथे महत्त्वाच्या घटक दिसून येतो. याठिकाणी माणसाचा माणसाशी संबंध, माणसाचा समाजाशी येणारा संबंध, एका समाजाचा दुसऱ्या समाजाशी संबंध, देशा-देशांतील संबंध हे अभ्यासाचे विषय दिसून येतात. सामाजिक शास्त्राचा विस्तार खूप मोठा असलेला दिसतो. त्याचे पृथकरण निरनिराळ्या रीतीने करतो येते. सामाजिक शास्त्रांना ऐतिहासिक महत्त्व दिसून येते. विज्ञान शास्त्राप्रमाणे केवळ तात्त्विक वा पृथक्करणात्मक भूमिकेवरून त्यांचा अभ्यास करता येत नाही. त्यांच्या अभ्यासासाठी सतत ऐतिहासिक व संशोधनात्मक दृष्टी स्वीकारावी लागते. ऐतिहासिक संशोधनामध्ये इतिहास अपेक्षित असला, तरी त्यासाठी आजची अभिरुची ही महत्त्वाची असते. ऐतिहासिक संशोधनाचा अभ्यास करताना त्या काळातील राजवट, त्या राजवटीचा वाङ्मयावर व इतर गोष्टीवर झालेला परिणाम याचा विचार करावा लागतो. आधुनिक काळाचे विचार करताना त्यासाठी प्राचीन काळात जावेच लागते. कारण त्याची पाळेमुळे ऐतिहासिक कालखंडात रुतलेली असतात. कोणतीही कलाकृती विशिष्ट काळात विशिष्ट परिस्थितीमध्ये विशिष्ट संदर्भासह निर्माण होत असते. एखाद्या कलाकृतीच्या निर्मितीच्या वेळी ऐतिहासिक परिस्थिती कशी

होती व कलावंताच्या भोवतालच्या परिसरात कोणते विचार होते हे या पद्धतीने ठरवता येते या सर्व गोष्टीचा विचार करून संशोधन करावे लागते त्या त्या काळाचा एक युगधर्म असतो. जेव्हा एखादी कलाकृती कोणत्या प्रदेशात कोणत्या सांस्कृतिक, सामाजिक, परिस्थितीत, कोणत्या हेतूने निर्माण झाली याचा विचार येथे अपेक्षित असतो. ऐतिहासिक संशोधनामध्ये जणू काही समाजाचे व समूहाचे चरित्राचा अभ्यास करावा लागतो असे म्हणावे लागते.

तौलनिक संशोधन पद्धती ही देखील अलीकडच्या कालखंडातील महत्त्वाची आहे. तौलनिक साहित्य अभ्यासाची संकल्पना स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याकडे आलेली दिसते. तौलनिक संशोधन म्हणजे दोन किंवा अधिक राष्ट्रीय साहित्यांचा तुलनात्मक दृष्टीने केलेला अभ्यास होय. 'तौलनिक साहित्य म्हणजे अभ्यासकाच्या समयकालीन संस्कृती सापेक्ष स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषा प्रथम पक्क्या आखून, सांस्कृतिक राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी वाङ्मय व इतर कला, साहित्य आणि शास्त्रे, विज्ञान आणि नवी जुनी ज्ञानक्षेत्रें तसेच मानवी अभिव्यक्तीच्या परस्पर व्यामिश्र संबधीची अनेक विद्याशाखीय दृष्टिकोण वापरून विविध पातळ्यांवर केलेली तुलनात्मक चिकित्सा होय.' अशी व्याख्या डॉ. आनंद पाटलांनी केलेली आहे. प्रस्तुत व्याख्या तुलनात्मक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करणारी दिसून येते. त्या काळातील स्वत्वाचे अभ्यासकाला पूर्ण ज्ञान होण्यास मदत होते. राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा ओलांडणे यासाठी ही पद्धत महत्त्वाची ठरते. विविध पातळ्यांवरील साहित्याची तुलना करणे या पद्धतीने शक्य होते. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील भाषा, जीवन, साहित्य या गोष्टी तुलनात्मकतेला पूरक ठरतात. आजच्या जागतिकीकरणाच्या युगात वेगवेगळ्या देशांची संस्कृती, परंपरा एकमेकांत मिसळलेल्या दिसून येतात. अशा काही प्रभावी घटकांचा अभ्यास तौलनिक साहित्य अभ्यासात महत्त्वाचा मानला जातो. जग हे आज जवळ येत चालले आहे. तसतशा संस्कृती परस्परांमध्ये विरघळत चालल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे ठरते. वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये ती कलाकृती अथवा विषय वस्तू केंद्रस्थानी असते.एखादी साहित्यकृती कविता असेल तर तिला काव्यात्मकता कशी प्राप्त झाली आहे? तिच्यात कोणते सौंदर्य आहे? ती सुंदर कशी बनली आहे? तिच्यात कोणकोणते सौंदर्यकारक गुण आहेत? याचा विचार वर्णनात्मक संशोधन पद्धतीमध्ये केला जातो. प्रत्येक कलाकृती स्वतंत्र असते तिची स्वत:ची एक ओळख असते. तिची एक संशोधनाची वेगळी मागणी असते असे म्हणावे लागते.

# संशोधन : स्वरूप आणि पद्धती

**प्रा. देविदास शेटे**

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. मनोहर जाधव म्हणतात की, ''आजच्या संशोधकाच्या अंगी विषयाकडे पाहण्याचे गांभीर्य नाही आणि ते खरे वाटते. आज किती संशोधक संशोधन करण्याच्या उद्देशाने या क्षेत्राकडे येतात. नोकरीमध्ये पदोन्नती मिळते, म्हणून संशोधन करायचे असाच उद्देश बऱ्याच प्राध्यापकांचा दिसून येतो. खऱ्या संशोधनाकडे वळण्याची मात्र कोणाचीच मानसिकता नसते आणि हे आपल्याला एखादा पीएच. डी. झालेला संशोधक जेव्हा 'पी.एच.डी.' असा शब्द लिहितो त्यावरून लक्षात येते.''

संशोधन करणे हा फक्त विद्यापीठीय पातळीवरचाच विषय आहे असे मला वाटत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नागनाथ कोतापल्ले आपल्या मराठीचे विद्यापीठीय पातळीवरील 'संशोधन: स्वरूप आणि अपेक्षा' या आपल्या निबंधात असे म्हणतात की, ''विद्यापीठे ही संशोधनासाठी अनुकूल ठिकाणे होत हे गृहीत धरलेले आहे. नुसते शिकविणे हे विद्यापीठीय शिक्षकाकडून अपेक्षित नाही. त्याने संशोधन केले पाहिजे, ज्ञानक्षेत्रात आपापल्या कुवतीप्रमाणे भर घातली पाहिजे असे येथे गृहीत धरले जाते.'' त्यांचे हे मत एका दृष्टीने खरे वाटते, पण आज ते मागे पडले आहे असे वाटते. कारण आज संशोधन हे महाविद्यालयीन शिक्षणापासून सुरू झाले आहे आणि त्यामुळे महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग सुद्धा संशोधनाच्या क्षेत्रामध्ये अग्रेसर असला पाहिजे. तरच संशोधनाला गती मिळेल आणि संशोधनाला नावीन्य प्राप्त होईल.

संशोधन हा पुस्तके आणि ग्रंथ वाचून करण्यासारखा विषय नाही. संशोधन जर करावयाचे असेल तर संशोधकाला खऱ्या अर्थाने गोडी वाटली पाहिजे. आवड असली पाहिजे, तरच ते संशोधन दर्जेदार होईल. आजही ७० ते ७५ टक्के संशोधक मार्गदर्शकाने दिलेल्या विषयावर अवलंबून राहतात. मार्गदर्शकाने आपल्याला जो विषय सुचवला आहे. त्या विषयात खरोखर आपल्याला गोडी आहे का याचा विचार न करता त्या विषयाला प्राधान्य देतात आणि खऱ्या अर्थाने तेथूनच निकृष्ट संशोधनाला सुरुवात होते. ज्या विषयात आपल्याला आवड नाही तो विषय सुरुवातीला आपल्याला आवडेल.



40807

पण जसजसे त्या विषयावर आपण काम करू तसातसा तो विषय आपल्याला कंटाळवाणा वाटू लागेल आणि म्हणून संशोधन करण्याआधी सर्वात सुरुवातीला जर कोणती खबरदारी घ्यायची असेल तर ती म्हणजे विषय हा मार्गदर्शकाने न सुचवता संशोधकानेच निवडला पाहिजे तरच संशोधकाला त्या विषयात रस वाटेल.

विद्यापीठाबरोबरच अनेक उच्च महाविद्यालये, संशोधन संस्था संशोधनासाठी झटताना दिसतात. संशोधनाचे महत्त्व पटवून देताना दिसतात. म्हणजे संशोधन होते ही एक गरज आहे. हे आपल्याला दिसून येते. पण संशोधनाला महत्त्व देत असताना संशोधन चांगल्या प्रतीचे कसे होईल, याकडे संस्थांनी आणि महाविद्यालयांनी लक्ष केंद्रित केले पाहिजे. डॉ. स. दा. कऱ्हाडे हे आपल्या 'संशोधन सिद्धांत आणि पद्धती' या पुस्तकात संशोधनाविषयी मार्मिक मत मांडतात ते म्हणतात ''संशोधन हे काही हौसेचे कार्य नाही अथवा वेळ घालवण्याचे साधन नाही. ते पूर्ण वेळेचे, निष्ठेने करावयाचे कार्य आहे. काही काळापुरती स्वीकारायची ती वृत्ती नाही. जिज्ञासा, निष्ठा, निर्भयता, परिश्रमशीलता, चिकाटी हे सर्वच प्रकारच्या संशोधनासाठी आवश्यक असणारे गुण विशेष आहेत. अभ्यासकाची भूमिका पूर्वग्रहदूषित नसावी. वस्तुनिष्ठ आणि नि:पक्षपाती असावी. ज्ञानोपासकाच्या भूमिकेवरून संशोधन झाले पाहिजे.'' असे त्यांचे म्हणणे मनोमन पटते.

संशोधनामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे जिज्ञासा, कारण जिज्ञासा असेल तरच संशोधक चांगल्या प्रकारचे संशोधन करू शकेल. जिज्ञासूवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्य निर्णय करण्याची जी प्रक्रिया तिला संशोधन म्हणता येईल.

संशोधकामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आज संगणकीय ज्ञान हा झालेला आहे. अनेक संदर्भ हे संगणकावरून इंटरनेटच्या माध्यमातून दिले जातात. इंटरनेटच्या वाढत्या प्रभावामुळे संशोधनाचे स्वरूप आणि पद्धती सुद्धा खूप बदलत आहे. दर्जेदार संदर्भ, टीपा, इंटरनेटवर उपलब्ध होत आहे. ही संपूर्ण पद्धत आत्मसात करण्यासाठी मराठी मधील संशोधकाला आता केवळ संगणकीय साक्षरतेच्या पातळीवर राहून चालणार नाही. अधिक वरच्या पातळीवरची संगणकीय क्षमता आता संशोधकाने स्वत:च्या अंगी बाळगणे आवश्यक ठरत आहे. संगणक युगात संगणक साक्षरता असणे खूप गरजेचे आहे, पण इंटरनेटवर खूप संदर्भ उपलब्ध आहेत, म्हणून त्यावरच अवलंबून राहणेसुद्धा, संशोधनाच्या दृष्टीने हानिकारक ठरू शकते.

# संशोधन : स्वरूप आणि पद्धती

प्रा. संदीप चपटे

**प्रास्ताविक :-**

कोणत्याही विषयाला ज्ञानाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी त्या विषयात सातत्याने संशोधन होणे आवश्यक असते. संशोधन हे कोणत्या न कोणत्या स्वरूपात समाजापुढे मांडले जाणे आवश्यक आहे. संशोधन हे नियतकालिकांतील लेख, विनिबंध, परिषदांचे इतिवृत्त्च, संशोधन अहवाल अशा विविध स्वरूपांत प्रसिद्ध केले जाते. संशोधक हे या विविध माध्यमांचे उत्पादक व उपभोक्ते असतात.

**संशोधन म्हणजे काय?** (Meaning of Social Research)

संशोधनाला इंग्रजी भाषेत Research म्हटले जाते. हा इंग्रजी प्रतिशब्द योग्यच आहे. Research म्हणजे पुन; पुन्हा शोध घेणे.

**वेबस्टरच्या** कोशातही ''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान शाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्संक व पद्धतशीर अभ्यास'' अशी व्याख्या दिलेली आहे.

अर्थात, जुन्या ज्ञानाचे परीक्षण, नवीन ज्ञान संपादन हे दोन्ही घटक त्यात आहेतच. हे ज्ञान संपादन करण्यासाठी जे पद्धतशीर प्रयत्न केले जातात त्यांचाही समावेश त्यात आहे.

संशोधन किंवा अनुसंधान ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. त्यातून जुन्या उणिवा दूर करून ज्ञानात नवी भर घातली जाते.

**संशोधनाच्या विविध व्याख्या:-**

''संशोधन ही एक व्यवस्थित क्रिया होय की, ज्याद्वारे शोध घेतला जातो आणि संघटित ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो''.

**मोझर** - ''साहित्याच्या संदर्भात सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय''.

**स्टीफेन्सन** - '' प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात सुधारणा करणे व ज्ञान प्रमाणित करणे व त्या ज्ञानाचा व्यवहारासाठी उपयोग करणे''.

**जे.डब्ल्यू वेस्ट** – " संशोधन म्हणजे सुव्यवस्थित व नियमबद्ध अभ्यासण्याची प्रक्रिया होय".

"एखादे तत्त्व अथवा वस्तुस्थिती शोधून काढताना तसेच एखाद्या गोष्टीची निश्चिती करण्याकरिता केलेले परिश्रमपूर्वक अन्वेषण, काळजीपूर्वक, चिकित्सापूर्ण चौकशी अथवा तपासणी म्हणजे संशोधन."

"नव्याने उपलब्ध झालेल्या वस्तुतपशीलांच्या प्रकारात पूर्वस्वीकृत निष्कर्षांवर पुनर्दृष्टिक्षेप टाकण्याच्या हेतूने केलेले चिकित्सक आणि परिपूर्ण अन्वेषण अथवा प्रयोगीकरण म्हाजे संशोधन."

"जिज्ञासुवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्यनिर्णय करण्याची जी प्रक्रिया, तिला संशोधन म्हणतां येईल."

**संशोधनाचे स्वरूप :-**

'संशोधन' ही संज्ञा इंग्रजीतील Research या संज्ञेची पर्यायवाची संज्ञा म्हणून रूढ आहे. हिंदी भाषेत Research ला 'अनुसंधान' हा पर्यायवाची शब्द आहे. 'अनुसंधान' या शब्दाला कोशगत (संस्कृत) अर्थ-परीक्षण, परिशीलन, लक्ष्यीकरण संशोधनही एक ज्ञानशाखा आहे. ती बौद्धिक प्रक्रिया आहे. तथ्य शोधून काढणे अथवा तथ्यनिर्णय करणे हे या बौद्धिक प्रक्रियेचे 'लक्ष्य' असते या लक्ष्याच्या दिशेनेच एखाद्या विषयाची सतत चौकशी अथवा परीक्षण करणे हे या बौद्धिक प्रक्रियेचे स्वरूप वैशिष्ट्य आहे.

Research इंग्रजी शब्दाचाही कोशात अर्थ चौकशी अथवा शोध असाच आहे. सृष्टीमध्ये अनेक रहस्ये दडून राहिली होती. निसर्गाच्या सानिध्यात निसर्गाशी समायोजन करून राहतानाच मनुष्याने आपल्या बुद्धीच्या बळावर ती रहस्य उघडकीस आणण्याचा, उलगडून दाखवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. 'रिसर्च' ही बौद्धिक प्रक्रिया प्रथम सृष्टीच्या बाबतीत सुरू झाली. भौतिक विकासाबरोबर निरनिराळ्या भौतिकविद्या व भौतिक शाखाही विकसित झाल्या. 'रिसर्च' ही बौद्धिक प्रक्रिया निर्देशित करणारी 'संज्ञा' प्रथम सृष्टिविज्ञानात (Natural Sciences) योजिली गेली आणि समाजाच्या विकासाबरोबर यथावकाश ही बौद्धिक प्रक्रिया समाजविज्ञानात (Social Sciences) आणि मानव्यविज्ञान (Humanities) रूढ झाली या विवक्षित बौद्धिक प्रक्रियेच्या मुळाशी मनुष्याची जिज्ञासू वृत्ती असते. 'जाणून घेण्याची' तीव्र इच्छा असते. माणूस समाज करून राहू लागला तेव्हापासून सामाजिक संबंध प्रस्थापित होत गेले. माणूस आणि समाज यांच्यातील परस्पर संबधाची विचारप्रणाली सिद्ध होत गेली आणि मानवी

संबंधही प्रस्थापित होत गेले. सामाजिक संबंध आणि सामाजिक व्यवहार, मानवी संबंध आणि मानवी व्यवहार यांचीही रहस्ये जाणून घेण्याची वृत्ती मनुष्यात बळावली आणि तथ्याचा शोध घेण्याची अथवा तथ्याची सखोल चौकशी करण्याची बौद्धिक प्रक्रिया समाजविज्ञानात तसेच मानव्यविज्ञानात सुरू झाली.

'संशोधन' ही संकल्पना व्यापक स्वरूपाची आहे. ही केवळ पारिभाषिक संज्ञा (Technical Term) नाही. पारिभाषिक संज्ञेची जी लक्षणे आहेत, त्यात एकार्थता आणि स्पष्टार्थता ही प्रमुख लक्षणे आहेत. नव्या तथ्याचा शोध आणि उपलब्ध तथ्यांचे पुनर्नुसंधान करणे ही संशोधनाची बौद्धिक प्रक्रिया असते. वस्तुत: 'तथ्य' हे जड तत्त्व आहे. परंतु मानवी जीवनाचा स्पर्श झाल्यामुळे ते चैतन्यशील बनते आणि नवनव्या रूपात प्रकट होते. विशेषत: मानव्यविज्ञानात असे अनुभवाला येते. साहित्य संशोधन हे मानव्यविज्ञानांतर्गत येते. संशोधन हे पूर्णवेळेचे, निष्ठेने करावयाचे कार्य आहे. काही काळापुरती स्वीकारायची ती वृत्ती नाही. जिज्ञासा, सत्यनिष्ठा, निर्भयता, परिश्रमशीलता, चिकाटी हे सर्वच प्रकारच्या संशोधनातही आवश्यक असणारे गुणविशेष आहेत.

जिज्ञासू वृत्तीने ज्ञानोपासकाच्या भूमिकेवरून संशोधन करणे गरजेचे आहे.

**साहित्य संशोधनाच्या विविध पद्धती खालील प्रमाणे :-**

१) वैज्ञानिक व प्रयोगनिष्ठ पद्धती
२) सर्वेक्षणात्मक शोधपद्धती
३) ऐतिहासिक शोधपद्धती
४) संख्याशास्त्रीय शोधपद्धती
५) विगमनात्मक आणि निगमनात्मक पद्धती
६) मानसशास्त्रीय शोधपद्धती
७) तौलनिक संशोधन पद्धती इ.

**संशोधनकर्ता किंवा शोधकर्त्यांचे आवश्यक गुण :-**

संशोधनाचे यश हे बऱ्याच प्रमाणात संशोधन कर्त्यांच्या व्यक्तिगत गुणांवर अवलंबून असते. संशोधनकर्त्यांच्या वैयक्तिक गुणांचा संशोधनावर बराच प्रभाव पडतो. म्हणून संशोधन योग्य पद्धतीने करण्यासाठी संशोधनकर्त्यांमध्ये काही विशिष्ट गुण असणे आवश्यक आहे. याबाबत काही गुणांचा निर्देश केला जातो. सर मायकेल फॉस्टर यांनी पुढील गुणांचा निर्देश केला आहे.

१) विषयाचे ज्ञान (Knowledge of the Subject)
२) संशोधन पद्धतीचे ज्ञान (Knowledge of the Research Method)
३) संशोधनात व्यक्तिगत रुची (Personal Interest in the Research)
४) निष्पक्षता (Unbiased)
५) अनुभव (Experience)
६) जिज्ञासा (Curiosity)
७) कल्पनाशक्ती आणि अंतर्दृष्टी (Imagination and Insight)
८) चिकाटी (Persevernance)
९) विचारांची स्पष्टता (Clarity of Thinking)
१०) साहित्य संपदा
११) जागरूक वृत्ती
१२) विषयाशी व उद्दिष्टाशी तादात्म्य
१३) बौद्धिक ईमानदारी (Intellectual Honesty)
१४) सर्वसामान्य निष्कर्ष
१५) आत्म-नियंत्रण (Self Control)

इ. गुण संशोधनकर्त्याजवळ असणे आवश्यक आहे.

**साहित्य संशोधनाचे प्रकार :-**

डॉ. विलास खोले यांनी साहित्यसंशोधनाचे पुढील प्रकार सुचविले आहेत.

**१) तथ्यलक्ष्यी संशोधन** (Factfinding)

तथ्य निर्णय करणे हेच प्रमुख उद्दिष्ट समोर ठेवून केलेले संशोधन.

**२) संहितानिष्ठ संशोधन** (Textual Research)

पाठचिकित्सा आणि पाठशुद्धी यांच्या आधारे मूळ संहिता संशोधित व संपादित करणे.

**३) अन्वयार्थप्रधान संशोधन** (Interpretative Research)

एखाद्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेताना काही नवी माहिती उपलब्ध होते. एखादे तत्त्व अथवा एखादा सिद्धान्त नव्याने हाती लागतो. त्या अनुषंगाने संशोधन विषयाचे निर्वचन (Interpretation) अथवा पुनर्निवचन (Re-interpretation) केले जाते.

म. वा. धोंड यांचे ज्ञानेश्वरीच्या संबंधातले संशोधनपर शोधनिबंध याच प्रकारचा आहे.

❀❀❀

# संशोधन : संकल्पना व स्वरूप

प्रा. लता पवार

**संशोधन : व्याख्या, प्रकार, प्रयोजन, प्रेरणा, संशोधकाचे अंगी असणारे गुण संशोधन प्रक्रियेतील टप्पे (आराखडा)**

संशोधन म्हणजे पुन्हा पुन्हा शोध घेणे होय. नवीन तत्त्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे किंवा तथ्यांच्या परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय. संशोधन हे नवीन ज्ञानाचे संपादन करणे तसचे जुन्या ज्ञानाचे परीक्षण करण्यासाठी केले जाते. संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया असून या प्रक्रियेद्वारे ज्ञान मिळविले जाते. ही प्रक्रिया वैज्ञानिक पद्धतीनुसारच कार्यान्वित होत असते. वैज्ञानिक पद्धत हा संशोधनाचा प्राण आहे.

**संशोधनाची व्याख्या :**

(१) "कोणत्याही प्रकारचे तथ्य शोधण्याच्या दृष्टिकोणातून अगर तत्त्व शोधून काढण्याच्या उद्देशाने, जिज्ञासू वृत्तीने, काळजीपूर्वक केलेली चौकशी तसेच एखादे तथ्य शोधून एखादी गोष्ट निश्चित करण्यासाठी परिश्रमपूर्वक केलेले काम म्हणजे संशोधन होय." -वेबस्टर शब्दकोश.

(२) "ज्ञानाची कक्षा रुंदावणे, त्यात दुरुस्ती करणे किंवा त्यात फेरफार करणे या उद्देशाने एखादी गोष्ट, संकल्पना किंवा प्रतीके यांचे कौशल्य/कसब एखाद्या सिद्धांतासाठी साहाय्यकारी होत आहे किंवा नाही तसेच ते एखाद्या कलेत उपयोगी पडत आहे किंवा नाही हे तपासणे म्हणजे संशोधन होय." - एन्सायक्लोपिडिया ऑफ सोशल सायन्सेस.

(३) "काही वस्तुस्थिती/सत्यस्थिती शोधून काढण्याच्या दृष्टीने त्या विषयाची केलेली तपासणी म्हणजे संशोधन होय. यामध्ये टीकात्मक तसेच शास्त्रीय चौकशी केली जाते." शॉर्टर ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी

संशोधनाचे दोन प्रकार पडतात. ते संशोधनाचा दृष्टिकोण, उद्देश आणि संशोधनाचे स्वरूप या आधारावर पडतात.

**अ.१) शुद्ध संशोधन** : यामध्ये सामाजिक जीवन आणि घटना यांच्या आधारावर मौलिक सिद्धांत किंवा नियम शोधून काढले जातात. हेतू - ज्ञान प्राप्त करणे, ज्ञानात वृद्धी करणे, भर टाकणे, तसेच उपलब्ध असलेल्या जुन्या

ज्ञानाची पुनर्परीक्षा करून त्याचे शुद्धीकरण करणे हा या संशोधनाचा हेतू असतो. यामध्ये नवीन तथ्ये आणि घटनांचे अध्ययन केले जाते आणि जुने अथवा पूर्वीचे प्रचलित सिद्धांत वर्तमान परिस्थितीच्या संदर्भात योग्य आहेत किंवा नाहीत याचा शोध घेतला जातो.

**अ.२) सैद्धातिक स्वरूप :** विद्यमान परिस्थितीच्या आव्हानाचा सामना यशस्वीपणे करण्यासाठी नवनवीन ज्ञानाच्या आधारे नवीन नियम किंवा सिद्धांत शोधून काढणे. असा सिद्धांत वर्तमान परिस्थितीशी मेळ खाणारा असावा लागतो.

**शुद्ध संशोधनाचे उद्देश :**

१) ज्ञानाची प्राप्ती करणे

२) ज्ञानवृद्धी व ज्ञानाची शुद्धी करणे

३) सत्याचा शोध घेणे.

४) प्रमेयाची किंवा सिद्धांताची मांडणी करणे.

शुद्ध संशोधनात एखाद्या घटनेचे अथवा समस्येचे केवळ मूळ कारण शोधले जाते. परंतु त्या समस्येचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना सुचविली जात नाही.

**ब) व्यावहारिक संशोधन :** रॉबर्ट लिंड हे व्यावहारिक संशोधनाचे पुरस्कर्ते त्यांच्या मते सामाजिक जीवनाच्या व्यावहारिक गोष्टींशी व्यावहारिक संशोधनाचा संबंध असतो.

**व्यावहारिक संशोधनाचे विषय :**

१) सामाजिक नियोजन २) सामाजिक फायदे ३) धर्म ४) आरोग्य ५) शिक्षण ६) संरक्षणासंबंधीचे नियम इ.

या विषयीसंबंधीचे कार्यकारण आणि तर्कशुद्ध ज्ञान या संशोधनातून मिळविले जातो.

**प्रेरणा :** संशोधनाच्या प्रेरणा दोन प्रकारच्या असू शकतात.

**अ) लौकिक पातळीवरच्या प्रेरणा**

१) यामध्ये पीएच.डी. केल्यास मला नोकरी मिळेल म्हणून पीएच.डी. करणारे येतात.

२) मला नोकरीमध्ये प्रमोशन मिळेल

३) पीएच.डी. मुळे पगारात वाढ होईल.

४) पीएच.डी. केल्यास माझा सन्मान वाढेल नावापुढे डॉक्टर लागेल.

अशा स्वरूपाच्या प्रेरणा ह्या लौकिक प्रेरणा होत ह्या स्वार्थापोटी निर्माण झालेल्या प्रेरणा आहेत.

**ब) मूलभूत प्रेरणा :**

१) स्वानंद तृप्तीसाठी मला संशोधन करण्यात आनंद वाटतो म्हणून संशोधन करणारे .

२) ज्ञानाचा शोध घेण्याची जिज्ञासा. काय आहे हे असे का ? घडते ह्या जिज्ञासा तृप्तीसाठी संशोधन करणारे उदा. न्यूटन

३) शोधाची तळमळ (जनकल्याणासाठी) उदा. डॉ. ए.पी.जे. कलाम यांनी एकदा एका पोलिओग्रस्त मुलाला हातावर चालताना पाहून त्यांना वाईट वाटले आपण याच्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे वाटल्यामुळे त्यांनी संशोधन करून खूप कमी वजनाचा अपंग, पोलिओग्रस्तासाठी बूट तयार केला.

४) काही व्यक्तींमध्ये ज्ञानासाठी एक उपजत झपाटलेपण असते. त्यांना वेगळं काहीतरी करून दाखवण्याची उर्मी असते. त्यांच्या आतमध्ये एक ड्रायव्हिंग फोर्स असतो. त्यातून ते स्वयंप्रेरणेने काम करतात. असे संशोधक हे खरे संशोधक असतात. ते स्वत:च स्वत:ला अशा कामांसाठी वाहून घेतात. त्यामुळे ते कोणत्याही अडचणीवर मात करू शकतात. उदा. बाबा आमटे.

५) काही वेळा विशिष्ट प्रसंगावर मात करण्यासाठी संशोधन केले जाते. उदा. अमेरिकेने भारताला सुपर कॉम्प्युटर देण्याचे नाकारले ती टोचणी मनाला लागून शास्त्रज्ञ विजय भटकर यांनी जिद्दीने आणि स्वप्रयत्नाने परम संगणक तयार केला. आंध्रप्रदेशात सलग दोन वर्षे भाताचे पीकच आले नाही. तेव्हा जैवशास्त्रज्ञांना तेथे बोलावून त्यांच्या शेताची पाहणी केली असता, असे लक्षात आले की, भात उगवणीच्या वेळी जो कोंब फुटतो, त्या कोंबाला खाणाऱ्या बारीक किटकाला बेडूक खाऊन टाकतात. परंतु तेथील शेतकरी दोन वर्षापासून बेडूक निर्यात करत होते. त्यामुळे त्या किटकांचे प्रमाण वाढून संपूर्ण भातशेतीच नष्ट झाली होती. हे गरजपूर्तीसाठी केलेले संशोधन होय. याला व्यावहारिक संशोधन म्हणता येईल.

संशोधनाची दोन प्रकारात विभागणी करता येईल.

(१) वेगवेगळ्या विद्यापीठातून चालणारे संशोधन

(२) विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन

विद्यापीठीय संशोधन बऱ्याच वेळेला व्यावसायिक आवश्यकतेतून होत असल्याचे दिसते. खरे संशोधन विद्यापीठापेक्षा विद्यापीठाबाहेरच अधिक निष्ठेने चाललेले दिसून येते. आपण डिस्कव्हरी चॅनल, जिऑग्राफीक चॅनल बघता जंगलात पक्षांच्या जीवनासंबधी दिनचर्येसंबंधी संशोधन करताना ते संशोधक प्राण्यांच्या निवासस्थानाबरोबर सूक्ष्म कॅमेरे लावून त्यांचे जीवन चित्रित करत निरीक्षणातील माहितीचे निवेदन करून प्राणी पक्ष्यांचे जीवन स्वरूप स्पष्ट

करतात किंवा स्थलांतर करणाऱ्या पक्षांना पकडून त्यांच्या पायात कड्या अडकवल्या जातात. त्या कडीवर वर्ष, महिना, ठिकाण, देश छापलेले असते. हेच पक्षी परदेशातील संशोधक पकडतात, तेव्हा त्याच्या पायातील कड्यावरची नोंद ते घेतात. त्याचबरोबर दुसरी कडी त्या, पक्षाच्या पायात अडकवतात. तिच्यावर वरीलप्रमाणे नोंद केलेली असते. तेच पक्षी इकडे आल्यावर त्या पक्षाच्या स्थलांतराच्या प्रवासाची उकल होते. कधी कधी पक्षांच्या पिसामध्ये सूक्ष्म कॅमेरे, सूक्ष्म गणकयंत्र लावून त्या पक्षाच्या प्रवासाचा माग घेतला जाते. त्याची संशोधनात नोंद घेऊन त्याचा अभ्यास केला जातो. हे जसे पक्षाबाबत, तसे प्रयोगशाळेत विविध रसायने, पेशी यांच्या घडामोडींचे जैवतंत्रज्ञानाद्वारे संशोधन केले जाते. अशा संशोधनात वर्षानुवर्षाचा कालावधी लागत असतो. विशिष्ट वातावरणात मायक्रोस्कोपखाली पेशींच्या हालचाली त्यांची लक्षणे वाढ इ. नोंदी घेतल्या जातात. अनेक नोंदीवरून निष्कर्ष काढले जातात.

**संशोधकाच्या अंगचे गुण :**

संशोधन करण्यासाठी व्यक्तीकडे संशोधनवृत्ती असणे खूप गरजेचे आहे. तसेच अंगभूत चिकाटीही खूप महत्त्वाची आहे. ह्या गुणांच्या जोरावर अडाणी, अशिक्षित माणूसही संशोधन करू शकतो. याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे चंद्रपूरच्या खोब्रागडे नावाच्या अडाणी माणसाने एचएमटी १००१ या तांदळाच्या वेगवेगळ्या जाती शोधून काढल्या. त्याचे संशोधन आंतरराष्ट्रीय मासिकात छापून आले. विविध शास्त्रज्ञांनी येऊन त्याच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या सुनेला माहेरची थोडी जमीन मिळाल्यावर त्यांनी त्या जमिनीत भात लावला. त्या भाताच्या शेतात त्यांना तांदळाच्या दोन रोपांच्या ओंब्या इतर ओंब्यांपेक्षा वेगळ्या दिसल्या. भात निघेपर्यंत त्यांनी त्या संशोधकाच्या अंगी नम्रता हवी, आपल्यापेक्षा जगात खूप हुशार लोक आहेत, आपण त्यांच्याकडून नवे काही शिकू शकतो, ही वृत्ती बाळगणारा हवा. सृजनशीलता हवी, संयम हवा, सहनशक्ती हवी. पुन्हा पुन्हा पडताळा घेण्याची क्षमता हवी. आपल्या संशोधनकार्याबाबत निष्ठा हवी.

आपल्या संशोधनाला आवश्यक वाचन, अवलोकन, विविध चाचण्या घेणे, मुलाखती घेणे, त्यासाठी फिरण्याची वाट्टेल त्या परिस्थितीत स्वतःच्या ॲडजेस्ट करून राहण्याची तयारी असावी. आळस अजिबात असू नये, वेळचे काम वेळीच करण्याची तयारी हवी. विशेषतः निरीक्षणे, नोंदी, वेळच्या वेळी घेण्यासाठी हा गुण खूप उपयुक्त ठरतो. माझे संशोधन अंतिम नाही हेही लक्षात ठेवायला हवे. भावनेपेक्षा बुद्धीने विचारपूर्वक काम करायची सवय अंगी

बाणवून घ्यावी. शक्यतो कुणावरही टीका करू नये. माहिती, ज्ञान, मुलाखत इ. साठी समाजात वावरावे लागते तेव्हा संशोधकाने चांगले संभाषण कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. ह्या तांदळाच्या जाती शोधून काढणारे खोब्रागडे मूळचे भूमिहीन शेतमजूर होते. ओंब्यावरती लक्ष ठेवले आणि सोंगणी करताना त्या दोन रोपांच्या ओंब्यांतील तांदूळ वेगळेच ठेवले. त्यांच्या असे लक्षात आले होते की, त्या ओंब्यांतील तांदूळ इतर तांदळांपेक्षा अधिक बारीक लांबीला जास्त आणि उत्पन्नातही जास्त होते. पुढच्या वर्षी त्यांनी ते वाटीभर तांदूळ बियाणे म्हणून वापरले ते वेगळ्या वाफ्यात लावले. असे दोन वर्ष केले असे करताना त्यांना पुन्हा काही नवीन प्रकारच्या ओंब्या आढळल्या. त्याचेही त्यांनी वेगळे बी जतन केले. नंतर आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या लक्षात आले की, त्यांच्या शेतातील उत्पन्न आपल्यापेक्षा दुपटीने येते. आणि तांदळाची जातही उत्कृष्ट आहे. तेव्हा त्यांनी कोणते बियाणे वापरले याची सर्वांनी चौकशी केली ते बियाणे आम्हालाही द्या असे सांगितले. श्री. खोब्रागडे यांनी सगळा तांदूळ बियाणे म्हणून विकला आणि तो बियाण्यामध्ये दर्जेदार नाव असलेल्या कंपन्यांच्या किंमतीपेक्षा चार पटीने महाग विकला तरी त्यांच्याकडे बियाणे शिल्लक राहिले नाही उलट पुढच्या वर्षासाठी लोकांनी आधीच बुकिंग करून ठेवले. ही बातमी कृषी अधिकाऱ्यांपर्यंत गेली. कृषी अधिकाऱ्यांनी खोब्रागडेंना विचारले असता हे मी स्वत: शोधून काढलेले बियाणे आहे असे त्यांनी सांगितले. त्याचे संशोधन केले असता त्यांच्या लक्षात आले की, ही तांदळाची नवीनच जात होती. त्यांनी ते आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या कृषी प्रयोगशाळेत पाठवून त्यांच्या नावीन्यतेबद्दलची खात्री करून घेतली आणि खोब्रागडेंचे निरीक्षण संशोधन म्हणून नोंदवण्यात आले. नवीन तांदळाच्या नवीन जाती शोधून काढणारे म्हणून चंद्रपूरच्या खोब्रागडेंचा आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरव झाला. तर संशोधन हे असे चिकाटी आणि निरीक्षणातूनही करता येते. त्यात सातत्य मात्र हवे. वेगळेपण हेरण्याची क्षमता आपल्याकडे हवी. इथे खोब्रागडेंना हा प्रश्न पडला होता की, शेतातील सर्व ओंब्यांपेक्षा ह्या एकाच रोपाच्या ओंब्या वेगळ्या का? त्यांच्यातील वेगळेपणा कोणकोणत्या बाबतीत आाहे. त्याची वाढ विकास, कालावधीत बदल आहे का? त्याचा नेमका कसा उपयोग करून घेता येईल. इ. गोष्टींचा त्यांनी पाठपुरावा केला व नवीन संशोधन हाती लागले. हे एक संशोधनाचे सर्वसामान्य उदाहरण झाले.

तर संशोधनकर्त्याला आधी प्रश्न पडायला हवा. सफरचंद झाडावरून खालीच का पडते? हा प्रश्न न्यूटनला पडला आणि त्याने त्याचा पाठपुरावा केल्यावर गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला.

**संशोधनाच्या पद्धती :**

संशोधनाच्या अनेक पद्धती आहेत. आपल्या विषयानुसार अभ्यास पद्धती निश्चित करून घ्यायची असते. उदा. लोकसाहित्याचे संशोधन असेल तर क्षेत्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करावा लागतो. संशोधन कार्याला सुरूवात करण्यापूर्वी त्या कार्याचे पद्धतशीर नियोजन, रचना अथवा मांडणी ठरवावी लागते. यालाच संशोधन आराखडा असे म्हणतात. या आराखड्यामध्ये संशोधनाचा उद्देश, क्षेत्र, कालावधी, आवश्यक माहिती गोळा करणे, माहिती संकलनाच्या पद्धती, माहितीची साधने, माहितीचे विश्लेषण, नमुना निवडीचे आधार ठरविणे, संभाव्य अडचणी इ. चा आगाऊ विचार करून संशोधनाची योजना ठरवावी लागते. आराखडा बनवल्यामुळे कामात सुसूत्रता येते, वेळ व शक्ती आणि पैसा कमी खर्च होतो. येणाऱ्या अडचणींची आधीच जाणीव होते व त्यांचे निराकरण करता येते.

**संशोधन आराखड्याची व्याख्या :**

एफ. एन. करलिंगर – ''संशोधन आराखडा संशोधनाची एक योजना, संरचना आणि एक रणनीती आहे की ज्याद्वारे संशोधन प्रश्नांची उत्तरे प्राप्त केली जातात आणि भिन्नत्व प्रसारणावर नियंत्रण ठेवले जाते.''

कोणत्याही संशोधनात आधी संशोधन आराखडा तयार करून घ्यायला हवा. त्यामुळे संशोधनातील संभाव्य अडचणी लक्षात येतात व त्यावर उपाययोजना करता येते.

**संशोधन आराखड्यातील टप्पे :**

**१) पूर्वीच्या वाङ्मयाचे अवलोकन :** यात संशोधन क्षेत्रातील उपलब्ध वाङ्मयाचे अवलोकन करायचे असते. यातून निवडलेल्या विषयाशी संबंधित उपलब्ध माहितीचा आढावा घेणे आवश्यक असते. निवडलेला विषय मागील संशोधनाशी कसा संबंधित आहे, हे दर्शविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर उपलब्ध वाङ्मयापेक्षा हाती घेण्यात आलेले कार्य कसे वेगळे आहे, हे दर्शविणेही महत्त्वाचे असते. असे करण्याने संशोधनकर्त्याला त्या समस्येची सखोल जाण होते.

**२) माहिती स्त्रोत ओळखणे :** ह्या टप्प्यावर संशोधनकर्त्याला माहितीच्या विविध स्त्रोतांची ओळख करून घेणे गरजेचे असते. उदा. काही व्यक्तीच्या भेटी, प्रकाशित, अप्रकाशित, अहवाल, सांख्यिकीय माहिती, हस्तलिखिते, पत्र दैनंदिनी इ.

**३) संदर्भ ग्रंथाची यादी :** उपलब्ध स्त्रोतांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न सुरू केल्याबरोबर संदर्भ ग्रंथाची यादी तयार करण्यास सुरवात करावी. प्रत्येक

संदर्भाची नोंद स्वतंत्र कागदावर करावी. नोंद करताना ग्रंथकाराचे आडनाव, नाव नंतर संदर्भग्रंथाचे नाव, प्रकाशकाचे नाव आणि प्रकाशनाची तारीख या क्रमाने नोंद करावी. कोणते संदर्भ साहित्य लागेल याची यादी करावी ते साहित्य जमा करावे.

**४) अभ्यासाच्या स्वरूपाची निश्चिती :** यात संशोधनाचा प्रकार आणि स्वरूप स्पष्ट निर्धारित करून त्याची नोंद आराखड्यात करावी. संशोधन हे सांख्यिकीय, तुलनात्मक, व्यक्तिगत, प्रयोगात्मक, विश्लेषणात्मक किंवा संयुक्तपणे असू शकते.

**५) संशोधनाची उद्दिष्ट्ये :** संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये स्पष्टपणे नमूद करावीत गृहीतकृत्ये असल्यास ती स्पष्टपणे नमूद करावीत तसेच त्यांचा पूर्वीच्या संशोधनाशी असलेला संबंध स्पष्ट केला पाहिजे.

**६) अभ्यासाच्या कालावधीची निश्चिती :** आपणास कोणत्या कालावधीचे अध्ययन करायचे असते ते संशोधन आराखड्यात नमूद करावे. त्यामुळे समस्येचे स्पष्टीकरण सहजपणे आणि स्पष्टपणे करणे शक्य होते.

**७) अभ्यासाचे पैलू :** ठरविलेली गृहीतके स्पष्टपणे आराखड्यात नमूद केलेली असावीत तसेच प्रस्थापित संशोधनाच्या मर्यादाही स्पष्टपणे नमूद केलेल्या असाव्यात. नवीन संकल्पनाच्या व्याख्या द्याव्यात. संशोधन विषय ज्या संकल्पनावर मांडलेला आहे ते नमूद करावे.

**८) तथ्य निवडीचे आधार :** विशिष्ट नमुना निवड करून त्या आधारावर अभ्यास करणे संशोधनातील एक छोटासा भाग निवडून विश्लेषण करावे अशा विश्लेषणातून विश्वाला लागू होतील असे निष्कर्ष काढता येतात. संशोधन आराखड्यात अशा नमुना निवडीची पद्धत स्पष्ट करणे गरजेचे असते.

**९) अभ्यासाची तंत्रे :** संकलनासाठी वापरण्यात येणारे तंत्र निश्चित करावे उदा. प्रश्नावली तंत्र, अनुसूची किंवा मुलाखत पद्धत इ. कधी कधी सर्व तंत्राचा एकत्र अवलंब केला जातो.

**१०) चाचणी साधनांची विश्वासार्हता आणि वैधता निश्चिती :** संशोधनातील चाचणी साधनांची विश्वासर्हता आणि वैधता सिद्ध करण्यासाठी विशिष्ट निकष स्पष्ट करावेत. त्यानंतर संकलित तथ्यांचे मूल्यमापन करणे अत्यंत महत्त्वाचे असते.

**११) प्रकरणांची रूपरेषा आखणे :** आराखड्याचा अंतिम नमुना अभ्यासाच्या स्वरूपावर निश्चित केला जातो. या अभ्यासातील प्रकरणांची संख्या आणि यांचे मथळे पृष्ठ क्रमांक आराखड्यात स्पष्टपणे नमूद केले पाहिजेत.

❀❀❀

# संशोधनाचे तंत्र व गुण वैशिष्ट्ये

प्रा. अनिल बडे

प्रस्तावना :

मानवी मनाला अस्वस्थ करणाऱ्या बहुविध समस्यांच्या सप्रमाण व विवनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या आधारसामग्रीचे, तथ्यांचे, माहितीचे संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्थाबद्ध प्रक्रिया म्हणजे संशोधन होय. आपल्या समस्येचा वैज्ञानिक पद्धतीने काळजीपूर्वक अभ्यास करून तिचे निराकरण करण्याचा मार्ग शोधणे म्हणजे संशोधन करणे होय.

आपल्या विविध भौतिक गरजा अधिक चांगल्या रीतीने भागवून जीवन सुखी करण्यासाठी, प्राप्त परिस्थिती बदलण्याची हौस भागविण्यासाठी, आपल्या जिज्ञासापूर्तीसाठी, अगोदरच्या संशोधनांची सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठी व त्यातील उणिवा दूर करण्यासाठी तसेच विशुद्ध ज्ञानलालसा शमविण्यासाठी संशोधन हाती घेतले जात असते.

मौलेच्या मते, संशोधन म्हणजे नेमक्या समस्येच्या समाधानासाठी केलेला सुव्यवस्थित, वस्तुनिष्ठ व बिनचूक शोध होय.

सोप्या शब्दांत मांडावयाचे म्हणजे वैज्ञानिक पद्धतीचा वापर करून आपणासमोर असलेल्या समस्येचे निराकरण करणे म्हणजे संशोधन होय.

**शास्त्रीय संशोधनाच्या व्याख्या:**

**लुंडबर्ग:** वैज्ञानिक पद्धतीत तथ्यांचे क्रमबद्ध निरीक्षण, वर्गीकरण आणि निर्वचन यांचा समावेश असतो. आपल्या दैनंदिन जीवनातील सामान्यीकरण व वैज्ञानिक निष्कर्षामध्ये मुख्य फरक हा औपचारिकताची मात्रा, दृढता, सत्यपन करण्याची योग्यता आणि व्यापक स्वरूपात समप्रमाणता यामध्ये असते.

**कार्ल पियर्सन:** शास्त्रीय पद्धतीमध्ये खालील लक्षणे आढळतात. तथ्यांचे काळजीपूर्वक आणि तंतोतंत वर्गीकरण आणि त्याचा सहसंबंध व क्रमाचे निरीक्षण, रचनात्मक कल्पनेच्या साहाय्याने शास्त्रीय नियमांचा शोध, स्वटीकात्मक आणि सामान्य बुद्धिवानाकरिता सामान्य मान्यतेची अंतिम कसोटी.

**मॅक्गयूगण :** वैज्ञानिक पद्धत ही एक अशी क्रमबद्ध प्रक्रिया आहे की जिच्याद्वारे सर्व शास्त्रे आपल्या प्रश्नाचे उत्तर मिळवितात.

**बर्नाड :** शास्त्राची व्याख्या ही सहा प्रमुख प्रक्रियांच्या रूपात केली जाते. या प्रक्रिया परीक्षण, सत्यापण, व्याख्या, वर्गीकरण, संघटन, आणि निर्धारण ज्यामध्ये पूर्वानुमान/भविष्यकथन आणि प्रयोग यांचा समावेश असतो.

**वूल्फ :** विस्तृत अर्थाने कोणतीही संशोधनाची विधी, जिच्याद्वारे शास्त्र निर्माण झाले किंवा त्याचा विस्तार केला जात आहे, त्यास शास्त्रीय पद्धती असे म्हणतात.

**इनसायक्लोपिडिया ब्रिटानिका :** शास्त्रीय पद्धती म्हणजे एक सामूहिक शब्द असून त्याद्वारे शास्त्रीय आधारशीला ठेवली जाते. व्यापक अर्थाने संशोधनाची कोणतीही पद्धती की ज्यामुळे शास्त्रीय अथवा इतर भेदभावरहित आणि पद्धतशीर ज्ञानाचे संकलन केले जाते त्या पद्धतीस शास्त्रीय पद्धती असे म्हणतात.

**टॅव्हर्स :** शैक्षणिक संशोधन म्हणजे अशी कृती की जी शैक्षणिक परिस्थितीमधील वर्तनशास्त्राच्या प्रगतीच्या दिशेने गतिमान झालेली असते. अतिशय प्रभावी पद्धतीने आपली ध्येय प्राप्त करण्यास अध्यापकांना मदत करणारे ज्ञान प्राप्त करून देणे हे या शास्त्राचे अंतिम ध्येय आहे.

**व्हीटने :** शास्त्रीय तत्त्वज्ञानात्मक पद्धतीने शिक्षण क्षेत्रातील समस्यांच्या उत्तराचे ध्येय ठेवून त्या दिशेने केलेले कार्य हे शैक्षणिक संशोधनाचे उद्दिष्ट असते.

**स्लेसिंजर व स्टिफेन्सन :** संशोधन म्हणजे सामान्यीकरणाच्या हेतूने वस्तू संकल्पना व प्रतीकांची हाताळणी होय. संशोधनाने प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढतात. वर्तमान ज्ञानात सुधारणा होते किंवा ज्ञान प्रमाणित होते. प्रमाणित ज्ञानाचा उपयोग सिद्धांन्तनिर्मितीसाठी व व्यवहारात केला जातो.

**स्टेनहाऊस लॉरेन्स :** संशोधन हे व्यवस्थित आणि अविरत, नियोजित आणि आत्मपरीक्षणात्मक असे अन्वेषण असून ते यथासम्भव सार्वजनिक समालोचना व प्रायोगिक परीक्षणाच्या अधीन असते.

**एफ. एन. केरलिंगर :** शास्त्रीय संशोधन हे व्यवस्थित नियोजित आणि अनुभवजन्य असते आणि त्याद्वारे नैसर्गिक घटनांमधील संभवनीय संबंधांच्या गृहीत कृत्याचे टीकात्मक परीक्षण केले जाते.

**जे. डब्ल्यु. बेस्ट :** संशोधन ही एक व्यवस्थित क्रिया होय की ज्याद्वारे शोध घेतला जातो आणि संघटित ज्ञानाच्या अंगाचा विकास केला जातो.

**वेबस्टरच्या शब्दकोशानुसार :** संशोधन म्हणजे तथ्ये व तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परीक्षण होय.

**हेरिंग :** शास्त्रीय संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. विशेषत: सामाजिक शास्त्रामध्ये ती एक नकारात्मक प्रक्रिया सुद्धा आहे. केवळ ज्ञान संपादन करूनच नव्हे तर कालबाह्य गृहीतके रद्द करून सुद्धा सृजनक्षमता विकसित होऊ शकते.

**संशोधकाची गुणवैशिष्ट्ये :**

पुढील गुणवैशिष्ट्ये अंगी असणारा चांगला संशोधक होऊ शकतो.

**१) संबंधित विषयाचे चांगले ज्ञान :** ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे एखाद्या विषयातील अद्ययावत व परिपूर्ण ज्ञान प्राप्त करणे आज खूपच कष्टप्रद आहे. तथापि संशोधकाने जो विषय संशोधनासाठी निवडला आहे त्याची परिपूर्ण व अद्ययावत माहिती त्यास असणे हे अत्यावश्यक आहे. संबंधित साहित्याचे व संशोधन अहवालांचे अध्ययन करून संशोधक ही माहिती प्राप्त करू शकतो.

''संशोधकाला आपल्या समस्येसंबंधी व आपल्या संबंधित विषयासंबंधी किती माहिती असावी?'' असा जर प्रश्न विचारला तर, ''इतर कोणत्याही व्यक्तीपेक्षा थोडी अधिक'' एवढेच याचे उत्तर देता येईल. संबंधित विषयाचे चांगले ज्ञान असल्याशिवाय संशोधन करताना जी मर्मदृष्टी हवी ती प्राप्त होणार नाही.

**२) शास्त्रीय दृष्टिकोण :** जॉन ड्युईने शास्त्रीय दृष्टिकोणाचा संबंध उत्साहपूर्ण चौकसपणा, निर्मितीक्षम कल्पकता व प्रयोगाच्या आधारे माहिती मिळविणे याबद्दल प्रेम या तीन गुणांशी जोडला आहे.

संशोधकामध्ये वरील तीन गुणांचा समन्वय म्हणजेच शाास्त्रीय दृष्टिकोण हवा. शास्त्रीय दृष्टिकोण हा संशोधकाचा मूलभूत आवश्यक गुणधर्म आहे. संपूर्ण संशोधन प्रक्रियाच या गुणधर्मामुळे यशस्वी होऊ शकते. या शास्त्रीय दृष्टिकोणाबद्दल सर फ्रान्सिस गाल्टन यांना असे वाटते.

ज्ञानपथावर जाताना सामर्थ्य देणारी व यशाच्या शिखरावर पोचवणारी ही एक आंतरिक चेतनाशक्तीच होय.

**३) समर्पण प्रवृत्ती :** संशोधन ही फावल्या वेळेत करण्याची बाब नव्हे. संशोधक जेव्हा संशोधनप्रक्रियेमध्ये कायावाचामने एकजीव होतो तेव्हाच ती प्रक्रिया यशस्वी होते. सतत संशोधनाचाच ध्यास, सतत हाती घेतलेल्या संशोधन विषयासंबंधी वाचन, मनन, चिंतन केले तरच ते खरे संशोधन. या संबंधात जॉन हॉवर्डचे उदाहरण लक्षात ठेवण्यासारखे आहे. या विद्वान

संशोधकाने तुरुंगातील जीवनासंबंधी संशोधन करताना प्रत्यक्ष तुरुंगात वास्तव्य केले व त्या वास्तव्यातच त्यास अखेर मरण आले. संशोधनप्रक्रियेसाठी केवढी ही समर्पण प्रवृत्ती!

**४) नि:पक्षपातीपणा :** हाती घेतलेल्या संशोधन विषयाकडे नि:पक्षपातीपणे पाहणे हे संशोधकाच्या दृष्टीने आवश्यक असते. संशोधनातून बाहेर पडणारे निकर्ष काही वेळा प्रचलित संकल्पनांच्या विरुद्ध असण्याची शक्यता असते, संशोधकाच्या परिकल्पना काही वेळा त्याज्य ठरतात, काही निकर्ष त्याच्या मनोभूमिकेच्या विरूद्ध जाणारे असतात. त्याने यापैकी कोणत्याही बाबीचा विचार करता कामा नये. केवळ निकर्षच नव्हे तर संशोधनप्रक्रियेतील लहानातील लहान बाबही पक्षपातीपणे करू नये. कोणतीही एक बाजू, एक भूमिका घेऊन केलेले संशोधन हे खरे संशोधनच नव्हे. संशोधकामध्ये संपूर्ण संशोधनप्रक्रिया नि:पक्षपातीपणाने पार पाडण्याची क्षमता हवी.

**५) मानसिक सुदृढता :** संशोधक मानसिकदृष्ट्या सुदृढ हवा. संशोधन प्रक्रिया व्यवस्थित, सुरळीतपणे चालण्यासाठी, त्यात अडचणी न येता पूर्णत्व प्राप्त होण्यासाठी प्रतिसादकांचा प्रामाणिक प्रतिसाद मिळण्यासाठी संशोधक मानसिकदृष्ट्या सुदृढ हवा. मानसिकदृष्ट्या सुदृढ हवा म्हणजे काय? त्याला समाजाबद्दल प्रेम हवे व त्याची समाजाबद्दलची दृष्टी विधायक हवी. त्याला नैतिक मूल्यांची जाण, त्यावर श्रद्धा व त्याप्रमाणे त्याचे आचरण हवे. तो सुस्वभावी, साहसी, विनोदप्रिय व स्पष्टपणे बोलण्याची क्षमता असणारा हवा. संशोधकाला संशोधन प्रक्रिया ही समाजात राहून समाजाच्या सहकार्याने पूर्ण करायची असते. वरील गुणांच्या अभावाने म्हणजेच मानसिक सुदृढता नसेल तर संशोधकाला संशोधन प्रक्रियेत समाजाचे अपेक्षित सहकार्य मिळू शकणार नाही.

**६) शारीरिक सुदृढता :** संशोधन-प्रक्रियेत कधी तासनतास वाचन करणे, मुलाखतीसाठी अनेक ठिकाणी भेटी देणे, कसोट्या देणे, माहितीचे संकलन, वर्गीकरण करणे इत्यादी प्रक्रिया कराव्या लागतात या सर्व प्रक्रिया अशा आहेत की जेथे शारीरिक सुदृढतेची आवश्यकता असते. .

**७) संशोधनातून दृग्गोचर होणारी सामाजिक जाणीव :** अखेर सर्व संशोधनाचा हेतू त्या विशिष्ट विषयाची प्रगती करणे, पर्यायाने त्या विषयाद्वारे समाजातील लोकांची वैचारिक, नैतिक, भौतिक प्रगती करणे. जे संशोधन या तीन क्षेत्रांत मानवाची काही प्रगती करते ते श्रेष्ठ होय. म्हणजेच संशोधकामध्ये संशोधनाद्वारे मानवाची, समाजाची प्रगती घडवून आणण्याची जाणीव

हवी  व तशी त्याची मनोभूमिकाही हवी. संशोधकाने सामाजिक बांधीलकी मानावी.

**८) संशोधन-प्रक्रियेची ओढ, त्याबद्दल आनंद व त्याचे महत्त्व ज्ञात असणे :** संशोधकाला संशोधन प्रक्रियेची ओढ हवी. ती गोष्ट करावीशी वाटावी. त्यात आनंद वाटावा. केवळ पदवी प्राप्त करणे असे उद्दिष्ट न ठेवता संशोधन प्रक्रियेमध्ये ओढ, आवड व आनंद वाटायला लागला तर संशोधकाचे  सर्व उद्देश सफल होतात. याचबरोबर त्याने या प्रक्रियेतील सर्व बारीकसारीक कृती आनंदाने  व मन लावून केल्या पाहिजेत. त्या विषयाचे-संशोधन विषयाचे-लोकांच्या दृष्टीने असणारे महत्त्व संशोधकाला प्रथमपासून ज्ञात हवे.

**९) कॉम्प्युटरचे अद्ययावत ज्ञान :** संशोधनकर्त्यांना कॉम्प्युटरचे अद्ययावत असले पाहिजे. ज्याद्वारे संशोधक संदर्भ साहित्याचा आढावा  घेवू शकतो. तसेच संगणकामुळे मिळालेल्या माहितीवर सांख्यिकीय प्रक्रिया करणे सोपे जाते. एस.पी.एस.एस.स्टॅटिस्टीकल प्रोसेस  इन  सोशल  सायन्स  तसेच संशोधनासंबंधी  नोंदी स्वत:ला करता येतात. ईमेल  सारख्या  माध्यमाद्वारे संपर्क  ठेवता  येतो तसेच  सोशल  साईटच्या. माध्यमातून आपली माहिती प्रसारीत करता येते तसेच माहिती मिळविता येते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, एका यशस्वी आणि आदर्श संशोधनकर्त्यांकरिता एकाधिक गुणांची आवश्यकता आहे. संशोधनकार्य हे काही साधारण कार्य नाही. म्हणून साधारण  व्यक्तीद्वारे  हे  कार्य  संपन्न केल्या जाऊ शकत नाही. त्याकरिता अनुभवी, योग्य कुशल उद्यमशील व्यक्तींची आवश्यकता असते. त्याचबरोबर अशा व्यक्तींमध्ये संशोधनकर्त्यांकरिता आवश्यक असलेले गुण असल्यास ते संशोधनकार्य अधिक  चांगल्या तऱ्हेने करतील.

❀❀❀

# संशोधन तंत्र

**प्राचार्य डॉ. दादा मरकड**

**प्रास्ताविक :**

संशोधनाला इंग्रजीमध्ये Research म्हटले जाते. संशोधन करताना संशोधकाला अनेक गोष्टींची काळजी घ्यावी लागते. संशोधन करताना काही तंत्र माहीत असावे लागते. काही प्राथमिक गोष्टींची माहिती असावी लागते. संशोधनाचे तंत्र समजून घेतल्यानंतर अभ्यासांती संशोधक उत्तम प्रकारचे संशोधन अभ्यासकांसमोर मांडू शकतो. संशोधकाने केलेले संशोधन लघुशोधनिबंध किंवा प्रबंधाच्या रूपात वाचकासमोर येते. तसे पाहिले तर लघुशोधनिबंध आणि प्रबंध याविषयी निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. परंतु अशा प्रकारची व्याख्या शब्दकोशात प्रबंधाविषयी सापडते. त्याचबरोबर अशी लघुशोधनिबंधाविषयी व्याख्या शब्दकोशात सापडते. पृष्ठसंख्येच्या आधारे लघुशोधनिबंध व प्रबंध यामध्ये भेद करणे योग्य नाही. परंतु लघुशोधनिबंधापेक्षा प्रबंधाचा आकार मोठा असतो. जास्त लिखाण, जास्त आधार, टीकात्म विवेचन प्रबंधामध्ये अपेक्षित असल्यामुळे प्रबंधाचा आकार लघुशोधनिबंधापेक्षा मोठा होत असला तरी संशोधनाचे स्वरूप आणि तंत्र मात्र दोन्हीमध्ये सारखेच असते. प्रबंध आणि लघुशोधनिबंधाच्या शिस्तीमध्ये फारसा फरक असत नाही. एम.फिल. पदवीसाठी लघुशोधनिबंध तर पीएच.डी. पदवीसाठी प्रबंध सादर करणे अपेक्षित असते.

**विषयाची निवड :**

एम.फिल. किंवा पीएच.डी. पदवीसाठी विद्यार्थ्यांनी संशोधन करण्यापूर्वी कोणत्या विषयावर आपल्याला संशोधन करावयाचे आहे हे अगोदर स्वत:च्या मनामध्ये स्पष्टपणे ठरवावे. संशोधनासाठी विषय निवडताना विद्यार्थ्यांनी अतिशय दक्ष असावे. कारण त्याने निवडलेल्या विषयावरच त्याच्या संशोधनाचे बरेच स्वरूप अवलंबून असते. विषयाची निवड करताना त्या विषयाचा व्याप किती आहे, याचा विचार करावा. कारण विषयाचा व्याप अतिजास्त असला, तर संशोधनाचे काम पूर्ण करणे अवघड होऊन जाते. तर विषयाचा व्याप मर्यादित स्वरूपाचा असेल, तर लिखाणावर मर्यादा येतात. त्याचबरोबर आपल्या मनाची ठेवण, आपली आवडनिवड याचाही विचार

विषय निवडताना करावा लागतो. आपल्या विषयाशी संबधित साधने, पक्ष, व्यक्ती यांच्याकडून किती सहकार्य मिळेल याचा विचार करून आपण निवडीत असलेल्या विषयावर किती संशोधन झालेले आहे याचा अभ्यास करून विषय निवडावा. त्यामुळे संशोधनाला सुरुवात केल्यानंतर त्यामध्ये अडचणी निर्माण होत नाहीत व संशोधनाचे कार्य निर्विघ्नपणे पूर्ण होऊ शकते. विषयाची निवड करताना आर्थिक बाबींचा विचार करून उपलब्ध माहितीचे स्थान कोठे आहे, कोणते आहे याचा विचार करावा. उदाहरणार्थ लोकसाहित्याचा अभ्यास करताना अनेक ठिकाणी फिरावे लागणार आहे याचा विचार करावा. कोकणी बोलीचा अभ्यास करण्यासाठी कोकण भागात प्रवास करावा लागणार आहे याचा विचार करून विषयाची निवड करावी. आपण निवडलेला विषय पूर्णपणे नवीन असल्यास त्यासंबंधित विषयाची माहिती मिळू शकेल का? याचा विचार करावा लागतो. अर्थात सर्वांगीण विचार करून विषयाची निवड करावी लागते.

**प्रबंधाचे शीर्षक :**

संशोधनामध्ये प्रबंधाच्या शीर्षकाला अतिशय महत्त्व असते. शीर्षकामधून आपल्या विषयाची पूर्ण कल्पना प्रबंध वाचकाला यायला हवी. आपण निवडलेल्या शीर्षकामधून त्या शीर्षकाचा नेमका व अचूक अर्थ निघायला हवा. जो अर्थ शीर्षकामधून वाचकांना जाणवतो तोच अर्थ मला अभिप्रेत आहे का याचा विचार शीर्षकाची निवड करताना संशोधकाने करावा. शीर्षक ठरविताना काळजी घेतल्यास लिहिण्यात आलेली माहिती आणि देण्यात आलेले शीर्षक यात सहसंबंध निर्माण होतो.

**संशोधनातील गृहीतपक्ष :**

संशोधनाचा विषय व शीर्षक ठरविल्यानंतर संशोधक आपल्या संशोधनातील समस्येचे तात्पुर्ते उत्तर शोधत असतो. त्याला संशोधनातील गृहीतपक्ष किंवा कल्पितपक्ष म्हटले जाते. कल्पितपक्ष हा गृहीत धरलेला असतो. त्यामुळे तो संशोधनांती सिद्ध होतो अथवा खोटा ठरतो. कल्पितपक्ष खोटा ठरला तरी आपले संशोधन वाया जात नाही. कल्पितपक्ष सिद्ध झाला तर संशोधकाला एक वेगळाच आनंद प्राप्त होतो. तसे पाहिले तर कल्पितपक्ष हा संशोधनाचा केंद्रबिंदू असतो. त्या कल्पितपक्षाच्या दिशेने संशोधन मार्गक्रमण करीत असते. संशोधक आपल्या संशोधन विषयाचा विचार करून कल्पितपक्ष ठरवित असतो. अर्थात कल्पितपक्ष हा संशोधकाच्या विचार प्रक्रियेचा भाग असतो. हा भाग पूर्ण झाल्यानंतर संशोधक आपल्या संशोधनाच्या दिशेने वाटचाल सुरू करतो.

**प्रबंध लेखन :**

संशोधक विद्यार्थ्याने आपली संशोधन समस्या हातावेगळी केल्यानंतर संशोधक संशोधनातील अंतिम टप्प्याकडे वळतो. प्रबंध लेखनाची एक वेगळी शिस्त असते. अन्य प्रकारचे लेखन आणि संशोधनातील लेखन यामध्ये फरक असतो. प्रबंधात लिहिलेले लेखन हे साधार द्यावे लागते. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर समस्या आणि समस्येचे निराकरण मांडणे संशोधनात अपेक्षित असते. विज्ञान शाखेचे संशोधन प्रयोगशाळेमध्ये होते तर साहित्यातील संशोधनासाठी वाचनालयाचा व समाजाचा उपयोग करून घ्यावा लागतो. वाचनालयाचा वापर करतानां त्याची एक विशिष्ट पद्धत असते. त्या पद्धतीचा अभ्यास करावा. काय वाचावे हे जसे महत्त्वाचे आहे तसेच कसे वाचावे हेही तितकेच महत्त्वाचे असते. त्यामुळे आपल्या संशोधनाचे स्वरूप लक्षात घेऊन संशोधकाने वाचन करावे. केलेल्या वाचनाची टिपणे काढावीत. वाचनालयाचा वापर करताना वाचनालयाचे विविध प्रकार असतात याकडे लक्ष द्यावे. त्यामुळे आपल्याला आवश्यक असलेले ग्रंथ कमी श्रमामध्ये व लवकर उपलब्ध होऊ शकतात. उपलब्ध झालेल्या ग्रंथाचे वाचन साधारणत: दोन तीन वेळेस करणे आवश्यक असते. प्राथमिक स्वरूपाचे वाचन केल्यानंतर संशोधनकार्याचे स्वरूप हळूहळू स्पष्ट होऊ लागते. ग्रंथाची टिपणे कांढण्याची एक विशिष्ट पद्धत विकसित करता येते. विशिष्ट तंत्र वापरून टिपणे काढल्यास या टिपणाचा फायदा अधिक होऊ शकतो. टिपणे घेताना महत्त्वाचा मुद्दा कोणता, कोणते विधान संदर्भ म्हणून टाकता येईल, कोणत्या भागाचा सारांश टाकणे गरजेचे आहे याचा विचार संशोधकाने विषयाच्या स्वरूपावरून करावा. त्याचबरोबर टिपणे घेताना पुढील गोष्टींची नोंद घ्यावी.

१) प्रत्येक मुद्यासाठी स्वतंत्र कागद घ्यावा.

२) कागदाला दोन्ही बाजूस समास सोडावा.

३) डाव्या कोपऱ्यात त्या विशिष्ट ग्रंथालयाचे नाव, पुस्तकाचा इंडेक्स नंबर लिहावा.

४) शीर्षकात पुस्तकाचे नाव, लेखक, प्रकाशनाचा कालावधी, प्रकाशकाचा पत्ता, आवृत्तीचा क्रमांक, पृष्ठ क्रमांक इत्यादी गोष्टींचा उल्लेख करावा.

अशा प्रकारे टिपणे काढल्यानंतर या टिपणाची एका स्वतंत्र कागदावर अनुक्रमणिका तयार करून ठेवावी. त्यामुळे मुद्यांचा अंदाज येऊन कोणता मुद्दा कोणत्या ठिकाणी आहे याची माहिती लवकर मिळते. त्याचबरोबर आपण काढलेले मुद्दे कोणत्या ग्रंथामधून काढलेले आहेत याची त्या त्या वेळी नोंद

करून ठेवल्यास प्रबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची तयार करताना त्याचा उपयोग होतो.

प्रबंधलेखनाची प्राथमिक तयारी झाल्यानंतर व अभ्यासांती संशोधकाने प्रत्यक्ष प्रबंधलेखनाला सुरवात करावी. प्रबंध शिस्तबद्ध होण्यासाठी प्रबंधाचे साधारणत: तीन वेळा लिखाण करावे. अर्थात प्रत्येकाच्या प्रतिभाशक्तीवर या लिखाणाच्या संख्येत बदल होऊ शकतो हे गृहीत धरावे. प्रथम लिखाणामध्ये आपण काढलेले मुद्दे एकत्रित करून भाषेकडे फारसे लक्ष न देता माहिती संकलनात्मक स्वरूपाचे लिखाण करावे. या लिखाणामधून स्वत:लाच अनेक गोष्टी कळू लागतात. अनेक मुद्दे स्पष्ट होत जातात. मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली त्या मुद्यांचा अभ्यास करून आपल्या विषयाच्या संशोधनाला गती द्यावी. प्राथमिक लिखाण पूर्ण झाल्यानंतर काही काळ त्यावर अभ्यास करून चिंतन करावे. त्यानंतर द्वितीय लिखाणाला सुरवात करावी. पहिल्या प्रकरणापासून ते निष्कर्षांपर्यंत साऱ्या प्रबंधाचा आवाका लक्षात घेऊन विषयाची मांडणी सुरू करावी. भाषेवर लक्ष केंद्रित करून लिखाण सूत्रबद्ध, वाचनीय करण्याचा प्रयत्न करावा. या द्वितीय लिखाणात महत्त्वाच्या मुद्यावर लक्ष केंद्रित करावे. अलंकारिक भाषा टाळून आपले म्हणणे स्पष्ट शब्दात मांडावे. प्रबंधात कोठेही विरोधाभास असणार नाही याची काळजी घ्यावी. संशोधनासाठी आवश्यक निर्दोषता दुसऱ्या लिखाणात किती प्रमाणात येईल हे सर्वस्वी अभ्यासकावर व अभ्यासविषयावर अवलंबून आहे याचाही संशोधकाने विचार करावा. दुसऱ्या लिखाणानंतर साधारणत: प्रबंधाचे अंतिम लिखाण करावे. या लिखाणाला सुरुवात करण्यापूर्वी आपण संशोधनार्थ घेतलेल्या समस्येचे योग्य उत्तर आपल्याला सापडले आहे का, आपण कल्पितपक्षाविषयी व्यवस्थित स्पष्टीकरण केले आहे का, यापूर्वी या विषयावर केलेल्या संशोधनावर आपण प्रकाश टाकला आहे का, आपल्या अभ्यासाच्या मर्यादा, परिस्थिती, महत्त्वाच्या शब्दाच्या परिभाषा यांचा विचार केला आहे का, निष्कर्षाची मांडणी व्यवस्थित केली आहे का या बाबींचा विचार करावा. त्यानंतर प्रबंधाच्या अंतिम लिखाणाकडे वळावे. अंतिम लिखाण करताना प्रबंध लेखनाची एकच शैली ठरवून घ्यावी. त्याच शैलीमध्ये शेवटपर्यंत लिखाण करावे. प्रबंधात आधार देताना विशेष काळजी घेतली जावी. आधार देण्याचे विविध प्रकार समजून घेवून आपल्या मताच्या समर्थनार्थ आधार द्यावा. त्याचबरोबर तळटीप देताना एकच पद्धत पाळावी. प्रबंधाचे लिखाण करताना ज्याप्रमाणे मुख्य शीर्षकाकडे लक्ष दिले जाते त्याप्रमाणे उपशीर्षकाकडेही लक्ष द्यावे. प्रकरणाला दिलेल्या शीर्षकामधून व

प्रकरणातील इतर उपशीर्षकामधून त्या त्या मुद्यांची व्याप्ती स्पष्ट व्हायला हवी. प्रबंधातील तालिका, कोष्टक, नोंदी, आकडेवारी साधार द्याव्यात. विविध ठिकाणीच्या माहितीचे संकलन करून त्यावर अभ्यास करून प्रबंधाचे लेखन करावे.

**संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट :**

संशोधनाचे कार्य करीत असताना वेगवेगळ्या ग्रंथांची, नियतकालिकांची, अहवालांची, मुलाखतींची संशोधकाला मदत होत असते. याविषयीची सविस्तर माहिती प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूचीच्या रूपाने द्यावी लागते. ही संदर्भ ग्रंथ सूची देण्याची विशिष्ट पद्धत असते ती संशोधकाला माहीत असावी लागते. त्या पद्धतीचा अभ्यास करून प्रबंधाच्या शेवटी संदर्भ ग्रंथ सूची देण्यात यावी. संदर्भ ग्रंथ सूची नंतर साधारणत: परिशिष्ट लिहिण्याची पद्धत आहे. प्रबंध लिहीत असताना काही जागा अशा असता की ज्या ठिकाणी एखाद्या विषयावर, मुद्यावर थोडे विस्तृत लिखाण आवश्यक असते परंतु त्याचवेळी प्रत्यक्ष प्रबंधात त्या विशिष्ट ठिकाणी लेखन केले तर लेखन प्रवाह खंडित होण्याचा धोका असतो. त्याचबरोबर अशा मुद्यावर न लिहूनही चालणार नसते. तेव्हा अशा मुद्यावर प्रबंधाच्या शेवटी लिखाण करावे लागते त्याला परिशिष्ट म्हणतात. अशा प्रकारचे परिशिष्ट देण्याची एक विशिष्ट पद्धत आहे एका पेक्षा जास्त परिशिष्ट असल्यास परिशिष्ट अ, ब, क इत्यादी क्रम देऊन त्याचे लिखाण करावे लागते.

अशा प्रकारचे प्रबंधाचे लेखन केल्यानंतर प्रबंधाच्या तांत्रिक बाबींचा विचार करून प्रबंधाची रचना करावी. प्रबंधाचे मुखपृष्ठ, प्रबंधाची प्रस्तावना, प्रबंधाची अनुक्रमणिका, ऋणनिर्देश, प्रबंधाची प्रकरण रचना, प्रबंधातील निष्कर्ष, संदर्भ ग्रंथ सूची, परिशिष्ट इत्यादींची सूत्रबद्ध मांडणी करून प्रबंधाची रचाना पूर्ण करावी.

**समारोप :**

आज संशोधनाकडे अनेक संशोधक वळत आहेत. विशेषत: पीएच.डी. पदवीसाठी लेखन करताना प्रबंधाचे लेखन करावे लागते. संशोधन करीत असताना बरेच संशोधक नवीन असतात त्यामुळे संशोधनात त्यांच्या समोर अनेक अडचणी निर्माण होतात. संशोधनाच्या क्षेत्रात नव्याने पाऊल ठेवणाऱ्या संशोधकांनी संशोधनाला सुरवात करण्यापूर्वी संशोधन तंत्र समजून घेतले व त्याप्रमाणे अभ्यास केला तर संशोधक आपले संशोधन निर्विघ्नपणे पूर्ण करू शकेल.

❁❁❁

# संशोधन पद्धती

प्रा. डॉ. चंद्रकांत रुद्राक्ष

एखाद्या पदवीच्या निमित्ताने करत असलेल्या संशोधनात अनेकदा कलाकृतीचा आपल्या भाषेत नव्याने आशय सांगणे, त्या संदर्भात अनेकांनी व्यक्त केलेली मते उधृत करणे, प्रसंगी लेखकाची माहिती मिळविताना त्याची प्रकट मुलाखत घेणे. या बाबींनाच आपण संशोधन समजून कामाला सुरवात करतो. तथापि या गोष्टी संशोधनाला पूरक आहेत पण त्या करणे म्हणजे संशोधन नाही. संशोधनात शोध या प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे. शोध हा फक्त जुन्याचाच घेता येतो असे नाही, तर कोणत्याही काळातील कोणत्याही गोष्टीचा, अभ्यासपूर्ण सबळ पुराव्याने शोध घेता येतो. असा शोध घेताना केवळ स्वत:च्याच मताला प्राध्यान्य देऊ नये. इतर सर्व प्रकारच्या मतांची दखल घेऊन विविध प्रयोगांचा विचार करून साधक-बाधक पुराव्यानिशी एखाद्या निष्कर्षाप्रत जाणे म्हणजे संशोधन म्हणता येईल. संशोधन ही एक बौद्धिक व मानसिक शिस्त आहे. यासाठी संशोधकाला कोणतेही विधान नोंदविण्यापूर्वी अथवा निष्कर्ष नोंदविण्यापूर्वी अंतर्गत व बाह्य पुरावे, संदर्भ गोळा करावे लागतात. त्याच्या मदतीने आपले निष्कर्ष पारखून, तपासून पडताळून पहावे लागतात. तरच आपले निष्कर्ष तर्कसंगत वाटू लागतात. म्हणूनच संशोधन हे एक पद्धतीशास्त्र आहे. याची आपल्याला सतत जाणीव ठेवावी लागते. त्यात कोणत्यातरी नावीन्यपूर्ण गोष्टीचा शोध घ्यायचा असतो. त्यासाठी चिकित्सक दृष्टीचा अवलंब करणे महत्त्वाचे असते, याचेही आपल्याला भान येते.

खरे पाहता प्रत्येक साहित्यकृतीही आशयनिष्ठ असते. कोणताही लेखक आशयाला, अनुभवाला, जीवनाला केंद्रवर्ती ठेवून आपल्या कलाकृतीची निर्मिती करीत असतो. कलाकृतीतील हा आशयच आपले लक्ष वेधून घेत असतो. त्या आशयाचे आकलन व्हावे, लेखकाची भूमिका आपल्या लक्षात यावी, त्याचा समाज, संस्कृती, शिक्षण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण इत्यादींबरोबर साहित्यविषयक दृष्टिकोण समजावा या भूमिकेने आपण कलाकृतीचे वाचन करीत असतो. हे वाचन सुरू असताना वरील घटकांना अनुलक्षून अनेक प्रश्नांची गुंतवळ आपल्या मनात तयार होते. ही गुंतवळ

सोडविण्यासाठीं बऱ्याचदा आपण कलाकृतीचे पुन्हा पुन्हा वाचन करतो, प्रसंगी तर्कसंगत युक्तिवाद घालतो, अन्य इतर कलाकृतींचा त्यातील काही समर्पक उदाहरणांचा आधार घेऊन योग्य त्या अर्थनिर्णयापर्यंतची मनन चिंतनाच्या साहाय्याने आपण मजल गाठतो. त्याबरहुकूम आपण त्या कलाकृतीचे मूल्यमापन करतो, तिची सरसनिरसता निश्चित करतो, तिच्या गुणावगुणांची तपासणी करतो, अशी आज एकूण साहित्याच्या आशयनिष्ठ संशोधानाची पद्धती सर्रास सर्वच अभ्यासक वापरत आलेले पाहावयास मिळतात. विद्यापीठीय संशोधनात या आशयनिष्ठ संशोधन पद्धतीचा सातत्याने वापर होत आहे. त्यामुळे संशोधन क्षेत्रात तोच तो एकसुरीपणा बळावत चालला आहे.

वस्तुत: संशोधक आणि संशोधनाची क्षेत्रे यांच्याकडून समाजाच्या, लेखक वाचक सूज्ञ मर्मज्ञ जाणकार अभ्यासकाच्या काही अपेक्षा असतात नव्हे आहेतच किमान त्यांची परिपूर्तता करणारे संशोधन होणे गरजेचे आहे. दुर्दैवाने या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप, ठसा, मोहर उमटविणारे संशोधक एकतर प्रकृती अस्वास्थ्याने आपल्या संशोधकीय लेखनाकडे दुर्लक्ष करीत आहेत. तर दुसरीकडे स्वर्गीय डॉ. र. बा. मंचरकरांप्रमाणे अकस्मात निधन झाल्यामुळे अनेकांचे संशोधकीय लेखन खंडित झाले आहे. डॉ. गं. ना. जोगळेकर, डॉ. अ. वा. कुलकर्णी, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. र. बा. मंचरकर यांनी सकस, दर्जेदार वस्तुनिष्ठ, निरपेक्ष भावनेने चौफेर दृष्टिकोणातून केलेले संशोधन अभिजात संशोधनाचे उत्कृष्ट नमुने म्हणता येईल. या महनीय संशोधकांबरोबरच इतरही अनेक उत्तम दर्जाच्या संशोधकीय कार्याला वाहून घेतलेल्या पिढीच्या मार्गदर्शनाने घडलेल्या नवोदित संशोधकांवर आता या क्षेत्राची भिस्त आहे. त्यासाठी संशोधनाच्या विविध पद्धती आणि पायऱ्यांचे स्वरूप थोडक्यात तपासता येईल. उपरोक्त निर्देशित साहित्याच्या आशयनिष्ठ संशोधन पद्धती प्रमाणेच साहित्याच्या प्रकारनिष्ठ दृष्टीचा अवलंब करून साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करणे शक्य आहे. साहित्यप्रकार या संकल्पनेला केंद्रवर्ती ठेवून साहित्यप्रकाराचा इतिहास, त्याची परंपरा, तुलना, त्याच्या निर्मितीची कारणे, प्रेरणा त्या निर्मिती परंपरेतील मोलाचे योगदान, प्रकारांचे वेगळेपण, त्याच्या निर्मितीचे निकष, इत्यादी गृहीतकांच्या आधारे संशोधकाला साहित्यकृतीचे आकलन, अर्थनिर्णयन, आणि मूल्यांकन करता येते. तथापि आज साहित्याचे आकलन करण्याच्या विविध पद्धती अस्तित्वात आहेत. साहित्यकृती, तिचा लेखक, तिची भाषा, आणि साहित्यकृतीचे रूप यांना अनुसरून समीक्षेची चरित्रात्मक पद्धती, ऐतिहासिक पद्धती, मानसशास्त्रीय, आदिबंधात्मक समाजाशास्त्रीय, मार्क्सवादी पद्धती इत्यादींचा

तात्त्विक विचार करून कलाकृतीचे संशोधन करता येते. अर्थात या पद्धतीपैकी कोणत्या पद्धतीचा अवलंब करणे शक्य आहे याचे संशोधकाने भान ठेवणे महत्त्वाचे ठरते. या पद्धती संशोधनाला कशा उपयुक्त आहेत याचेही भान असणे महत्त्वाचे ठरते. या पद्धतींच्या अवलंबनात व्यक्तिगत मतांचा वापर टाळणेही हितकारक ठरते.

बऱ्याचदा कलाकृतीचे रूप विचारात घेऊन संशोधनाची रूपवादी, संरचनावादी पद्धतीही स्वीकारून कलाकृतीचे मूल्यमापन करता येते. कलाकृतीच्या रूपावर विशेष भर दिला जातो. वाचकांचा दृष्टिकोण विचारात घेऊनही साहित्यकृतीचे संशोधन करताना, आस्वादक, निर्णायक, संस्कारवादी अथवा तुलनात्मक पद्धतीचा वापर करून संशोधन करता येते. अलीकडे स्त्री-लेखिकांनी स्वतंत्रपणे स्त्रियांच्या समस्या चित्रित करणारे लेखन मोठ्या प्रमाणात केले आहे. स्त्री स्वातंत्र्याच्या आणि मुक्तीच्या चळवळीचा विचार होऊन अशा प्रकारच्या लेखनात स्त्रीच्या सामाजिक स्थानावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे स्त्रीवादी भूमिकेतून या प्रकारच्या लेखनाचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. या पद्धतीत स्त्रीवाद, स्त्रीवादी समीक्षा, स्त्रियांचे लेखन, त्यातील स्त्रीनिष्ठ जाणिवा, समस्या इत्यादींचा बारकाव्यानिशी विचार करणे क्रमप्राप्त ठरते. एखाद्या कलाकृतीचा भाषिकदृष्ट्या अभ्यास करणेही शक्य आहे. शैली विज्ञानाच्या साहाय्याने एखाद्या कलाकृतीचा भाषिक अभ्यास करताना ध्वनी, पद, वाक्य, अर्थस्तरावरील विश्लेषण, पदबंध, विविध भाषिक घटकांची निवड साधर्म्य, वैधर्म, विविध छंद, यमक, वृत्ते, अलंकार आणि इतरही घटकांचा वापर यांच्या साहाय्याने साहित्यातील सौंदर्यभाव शोधण्यास सहज मदत होऊ शकते. याशिवाय बोलीभाषा, साहित्याची भाषा, लेखकाची निवेदन प्रधान भाषा यांच्या माध्यमातून कलेचा आस्वाद सहज टिपता येऊ शकतो. अर्थाचे अनेक प्रदर त्यातून उलगडत जातात. लेखकाच्या मनीचा भाव सहज आत्मसात करता येईल. याशिवाय विविध सामाजिक शास्त्रांच्या मदतीने कलाकृतीच्या योग्य त्या मूल्यमापनापर्यंत पोहचता येते. उदा. मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजभाषाविज्ञान, रसशास्त्र, अलंकार शास्त्र, विज्ञान यांच्या मदतीने कलाकृतीचे मूल्यमापन होऊ शकते. पात्राच्या कृतीचा अर्थ लावणे सोपे होते. विज्ञानाची विज्ञानलक्षी पद्धती सहज वापरता येऊ शकते. साहित्याच्या तौलनिक अभ्यासाची पद्धती वापरून नव्याच्या तुलनेत जुन्याचे मूल्यमापन करणेही संशोधनाच्या पातळीवर आज महत्त्वपूर्ण मानले जात आहे. याशिवाय संशोधनाची आंतरविद्याशास्त्रीय पद्धतीचा अवलंब करूनही साहित्याच्या संशोधनाकडे जाता येते.

# संशोधन : संकल्पना, स्वरूप व साधने

प्रा. वसंत गावडे

आजचे युग हे संशोधनाचे क्रांतिकारी युग म्हणून सर्वत्र मान्यता पावले आहे. ज्ञानाच्या प्रत्येक शाखेत संशोधन होत आहे. संशोधन ही प्रक्रिया प्रत्येक क्षेत्रात वेगवेगळी असते. विज्ञानातील संशोधन सामाजिक शास्त्रातील संशोधन साहित्यातील संशोधन हे तिन्ही प्रकार वेगवेगळे आहेत. संशोधन हे तीन पातळीवर चालते. व्यावसायिक संशोधन पातळी. संस्थानात्मक संशोधन पातळी. व्यक्तिगत संशोधन पातळी या सर्व संशोधनात वस्तुनिष्ठतेला जास्त महत्त्व आहे. कुतूहल माणसाला संशोधनाची प्रेरणा देते.एवढेच नाहीतर कृती करायला प्रवृत्त करते.

कोणत्याही विषयासंबंधी केलेले संशोधन हे जसे व्यक्तीला उपयुक्त असते. तसेच ते समाजालाही उपयुक्त ठरत असते. संशोधन हे समाज व राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे मानले जाते. संशोधनाचे कार्य हे वास्तववादी असते म्हणून संशोधनाला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे. विज्ञानात चालणाऱ्या संशोधनाचा केंद्रबिंदू पदार्थ अथवा वस्तू असतो सामाजिक शास्त्रातील संशोधनातील केंद्रबिंदू हा मानवी वर्तन व्यवहार असतो. साहित्याचे संशोधन हे व्यापक आहे तसेच त्याचा कालखंडही व्यापक आहे साहित्य संशोधन आणि वाङ्मयाचा इतिहास यांचा परस्पर संबंध असतो. संशोधन केल्यावाचून वाङ्मयाचा इतिहास सिद्ध होत नाही. संशोधनासाठी समीक्षेची जोड लागते.

संशोधन हे कालानुरूप बदलत जाते. संशोधनाची प्रक्रिया अखंड चालूच राहते. प्रत्येक नवे संशोधन हे जुन्या संशोधनाला पोटात घेत असते असे सतत होत राहते. हाती आलेल्या आधारांच्या. पुराव्यांच्या आधारे सर्व गोष्टी मांडणे संशोधकाला गरजेचे असते. नवे काही सांगणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. जे उपलब्ध आहे त्यापेक्षा काही तरी वेगळे सांगणे त्याचा शोध गेणे हे महत्त्वाचे आहे. संशोधनात सतत प्रश्न पडावे लागतात. त्या प्रश्नांसाठी पुन्हा पडणारे प्रश्न या साखळीतून जेव्हा प्रश्न पूर्ण होऊन उत्तरे मिळतात. तेव्हा संशोधनपूर्ण होते. कुठल्याही संशोधनासंबंधी विचार करायला लागल्यावर त्याविषयी संबंधी येणारे विचार हे स्वाभाविक

असतात त्यालाच अभ्युपगम असे म्हणतात संशोधन करत असताना त्या विषयाची चिकित्सा करायची म्हणजे. त्या प्रश्नांचा खोलातून विचार करायचा जो निष्कर्ष आपल्या हाती येईल तो निष्कर्ष समप्रमाण. तर्कशुद्ध मांडता येतो की नाही यावर संशोधन मांडता येते. साहित्यकृत्तीचे संशोधन करत असताना मूलभूत प्रश्नांची निर्मिती करणे नवे. नवे प्रश्न विचारून त्यावर उत्तरे देणे म्हणजे संशोधन होय.

संशोधन कार्याचे यश बऱ्याचशा प्रमाणात संशोधकाच्या व्यक्तिगत गुणांवर अवलंबून असते. संशोधनाच्या निष्कर्षावर संशोधकाच्या वैयक्तिक गुणांचा बराच प्रभाव पडतो. संशोधनाविषयाचे ज्ञान संशोधन पद्धतीचे ज्ञान, संशोधकाची तादात्मवृत्ती, संशोधनात व्यक्तिगत अभिरुची, संशोधकाची जागरूकता, निःपक्षता, अनुभव, अज्ञानासंबंधी जिज्ञासा, नीतिमत्ता, कल्पकता, साधनांची परिपूर्णता, मनोधैर्य, चिकाटी, विचारस्पष्टता, सावधानता, प्रामाणिकपणा, संशोधन संघटन, आत्मनियंत्रण, सर्वमान्य निष्कर्ष, संगणकाचे ज्ञान इ. सर्व गुण आदर्श संशोधकाजवळ असलेच पाहिजेत. या सर्व गुणांमधून संशोधन आकाराला येते व पूर्णत्वाला पोहोचते.

एकविसावे शतक हे संशोधनाचे शतक आहे. आधुनिक काळात संशोधनाला असणारे महत्त्व दिवसेंदिवस वाढतच आहे. संशोधन करणे हे शोध कार्य आहे संशोधन म्हणजे पायाभूत स्वरूपाचे आणि विश्वसनीय साधना पासून मिळविलेले तत्त्व ज्ञान किंवा माहिती होय पुढील काही व्याख्यांमधून संशोधनाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते.

**समाजविज्ञान विश्वकोश** : संशोधन हे वस्तू. संकल्पना प्रतीके इत्यादींना कुशलतापूर्वक व्यवस्थित करते. ज्याचा मुख्य उद्देश सामान्यीकरणातून ज्ञानाचा विकास. प्रामाणिकता अथवा वास्तविकतेचे परीक्षण असतो. मग ते ज्ञान व्यावहारिक उपयोगितेचे असो की कलेचे.

**डॉ.पी.एल.भांडारकर** : नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांत पुन्हा तपासून पाहण्यासाठी केलेली सखोल चिकित्सक चौकशी किंवा प्रयोग म्हणजेच संशोधन होय

**य.रा.दाते** : नवीन शोध लावण्याची क्रिया तपासणी चौकशी म्हणजे संशोधन

**रेडमेन आणि मोरी** : संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पद्धतशीर केलेले प्रयत्न

**जॉर्ज ए. लुण्डबर्ग** : अवलोकित तथ्यांचे व्यवस्थित व वस्तुनिष्ठ वर्गीकरण सामान्यीकरण आणि प्रामाणिकरण करणे म्हणजेच संशोधन होय.

**जे. डब्लू. बेस्ट** : संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते

**सी. ए. मोझर** : सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबद्ध प्रयत्न होय.

**हेरिंग** : शास्त्रीय संशोधन ही एक संचयी प्रक्रिया आहे. विशेषतः सामाजिक शास्त्रामध्ये ती एक नकरात्मक प्रक्रिया सुद्धा आहे. केवळ ज्ञान संपादन करूनच नव्हे तर कालबाहय गृहिते रद्द करून सुद्धा सर्जनक्षमता विकसित होऊ शकते

**डॉ. इमोरी एस. बोगाड** : संघटित व्यक्तींच्या जीवनात ज्या मूलगामी प्रक्रिया कार्यरत असतात. त्याचे अन्वेषण म्हणजेच सामाजिक संशोधन होय

**वेबस्टरच्या शब्दकोशानुसार** : संशोधन म्हणजेच तथ्ये वा तत्त्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परीक्षण होय

**स्लेसिजर व स्टीफेन्सन** : संशोधन प्रक्रियेचे तीन पैलू आहेत.

१. सामान्यीकरणाच्या हेतूने.संकल्पना व प्रतीके यांची हेतुपूर्वक हाताळणी

२. प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा काढविणे ज्ञानात सुधारणा करणे व ज्ञान प्रमाणित करणे

३. प्रमाणित ज्ञानाचा सिद्धांत निर्मितीसाठी व व्यवहारासाठी उपयोग करणे.

या विविध व्याख्यांमधून संशोधनाची संकल्पना व स्वरूप समजण्यास मदत होते.

अज्ञानासंबंधीची जिज्ञासा. कार्यकारण भाव. जाणून घेण्याची इच्छा. नवीन अभ्यास प्रक्रियांचा शोध व जुन्या कार्यपद्धतीचे पुनर्मूल्यांकन हे सामाजिक प्रगतीला साहाय्यक ठरते. 'विविध नवीन आणि अनपेक्षित अशी परिस्थिती निर्माण होणे या प्रेरणेमधूनच संशोधन होत असते. विविध गोष्टीबाबतचे ज्ञान मिळविणे हा संशोधनाचा हेतू असू शकतो संशोधनामध्ये ज्ञानकक्षा विस्तारित होतात.

कोणत्याही शास्त्रीय संशोधनाची सुरुवात त्याचवेळी होते जेव्हा एखादी व्यक्ती काही वस्तुस्थितीदर्शक माहिती गोळा करते. निरीक्षण व वर्गीकरणाच्या आधारावर केलेले संभाव्य विधान म्हणजे गृहीतकृत्य होय. नवीन ज्ञान प्राप्त करणे.पूर्व ज्ञानात भर टाकणे पूर्व ज्ञानाचे पुनर्परीक्षण करून शुद्धिकरण करणे इ. साठी मौलिक संशोधन केले जाते शुद्ध, मौलिक संशोधन हे मूलभूत स्वरूपाचे व सैद्धांतिक असते मिळालेल्या ज्ञानाची

पद्धतशीर मांडणी करून त्यामधून एखादा सिद्धांत किंवा निष्कर्ष काढला जातो. व्यावहारिक, क्रियाभिमुख संशोधनाचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी असतो. त्यामुळे समाजहिताच्या दृष्टीने त्यास महत्त्व आहे म्हणूनच शुद्ध, मौलिक संशोधन व व्यावहारिक क्रियाभिमुख संशोधन महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची साधने :**

संशोधन करणाऱ्या व्यक्ती जवळ संशोधनाची सर्व साधने उपलब्ध असली पाहिजेत संशोधनाचे कार्य साधन परिपूर्ततेमुळे सुलभ होत असते. संशोधनाच्या व्यापकतेवर साधनांची मर्यादा अवलंबून असते. संशोधन विषयाशी संबंधित संपूर्ण साहित्य मिळणे ही संशोधकाची प्रथम गरज आहे. संशोधनकार्यासाठी मानसिक तयारीबरोबरच पैसा, पुस्तके दुर्मीळ ग्रंथ, ग्रंथालय, संगणक व शांत वातावरण इत्यादींची आवश्यकता असते. संशोधन कर्त्यास अनेक साधनांचा वापर करूनही निष्कर्ष काढण्यास वेळ लागतो. कारण उपलब्ध साधनात अपुरेपणा असेल तर ते पूर्ण करण्यासाठी नवीन साधने कठोर परिश्रमाने मिळवावी लागतात.

प्राथमिक तंत्रात प्रत्यक्ष निरीक्षण प्रश्नावली अनुसूची इत्यादींचा उपयोग होतो. परंतु यात संशोधक आवश्यक तो बदल करू शकतो दुय्यम माध्यमात आत्मचरित्रे, जीवनचारित्रे, रोजनिशी, पत्रे, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यातील माहितीत बदल करता येत नाही. संशोधकास मात्र तथ्य जमा करताना काळजी घ्यावी लागते. संशोधन चांगल्या दर्जाचे होण्यासाठी साधनभिन्नता तपासूनच निष्कर्ष मांडावे लागतात.

संशोधनात ज्ञानसाधनेची परंपरा ही महत्त्वाची असते शास्त्रे आणि कला या दोन्ही क्षेत्रात ज्ञानसाधनेची परंपरा दिसते ज्ञान म्हणजे माहिती आणि जाणीव, गुरू परंपरा, शिक्षणपरंपरा, शोध परंपरा, संशोधन परंपरा ह्या महत्त्वाच्या असतात.

प्रागऐतिहासिक, ऐतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक, उत्तरआधुनिक यामध्ये ही ज्ञान परंपरा महत्त्वाची आहे. शास्त्रांमध्ये भौतिकशास्त्रे आणि सामाजिक शास्त्रे मानवशास्त्रे तत्त्वज्ञान यांना ज्ञानसाधनपरंपरेत महत्त्वाचे स्थान आहे. कला या ज्ञानसाधनेत चौसष्टकला, अभिजातकला, साहित्य संगीत, नृत्य, चित्र, शिल्प इ. कला महत्त्वपूर्ण असतात. प्रसंगी या सर्वांचा आंतरविद्याशाखीय संशोधन करत असताना विविध प्रकारची माहिती इंटनेटवरून घेऊन त्याचा फायदा संशोधकांना होताना दिसतो आहे.

संशोधनकार्यात प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण, निरीक्षण या सामग्री संकलनाच्या पद्धती उपयोगी पडतात. संशोधनामध्ये दिलेल्या माहितीच्या समर्थनार्थ काही महत्त्वाच्या कागदपत्रांच्या प्रती शेवटी जोडाव्या लागतात. अनुसूची, प्रश्नावली, इत्यादीचा प्रत, आलेख, कोष्टके, पत्रक महत्त्वाचा दस्तऐवज, नकाशे इ. जोडले जातात. ते संकलन पत्र हे सर्व संशोधनात महत्त्वाचे कार्य करत असतात. कार्यशाळा, परिसंवाद, परिषदा, संशोधन लेख व शोधनिबंध, विविध विषयांच्या संशोधन पत्रिका, एम.फिल., पीएच.डी यासाठी तयार झालेले प्रबंध मार्गदर्शक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत असतात. संशोधन करताना कोणत्या पद्धतीचा पुरावा किंवा साधन सामग्री आवश्यक आहे ते सांगता आले पाहिजे आपल्या तर्क शक्तीचा व पूर्वज्ञानाचा उपयोग करून आवश्यक अशा साधनसामग्रीचे व पुराव्याचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर प्रत्यक्ष आवश्यक व उपलब्ध साधन सामग्री पुराव इ. जमवून त्यांच्या आधारावर जे निष्कर्ष निघतात ते आपण मानलेल्या अभ्युपगमाशी जुळते आहेत का? याची खातरी करून घेणे महत्त्वाचे असते उपलब्ध झालेले पुरावे साधनसामग्री किंवा वास्तवदर्शक तथ्ये यांच्या आधारवर निघालेले निष्कर्ष गृहीत धरलेला अभ्युपगमाशी मिळते जुळते पाहिजेत.

संशोधनाचे तथ्य संकलन करणे महत्त्वाचे असते. त्याचे मुख्य दोन स्त्रोत आहेत.

१. **प्राथमिक स्त्रोत** : प्रथम प्रयत्नातून तथ्ये संकलित करण्याच्या स्त्रोतांना प्राथमिक स्त्रोत म्हणतात. संशोधक हा संशोधन क्षेत्रात स्वतः जावून तथ्य संकलनाचे कार्य करतो प्रत्यक्ष निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची, इत्यादीद्वारे संकलन केले जाते संशोधकाने स्वतः तथ्य संकलन केल्यामुळे तथ्यांची विश्वसनीयता वाढते संशोधक व्यक्ती समस्या घटनांशी थेट संपर्क राखतो.

२. **द्वितीयक दुय्यम स्त्रोत** : स्वतः प्रत्यक्ष तथ्य संकलन न करता इतरांनी केलेले संशोधन कार्यासाठी वापरणे दुय्यम स्त्रोताद्वारे शक्य होते. या मध्ये व्यक्तिगत प्रलेख व सार्वजनिक प्रलेख असे दोन भाग पडतात व्यक्तिगत प्रलेखामध्ये आत्मचरित्र, दैनंदिनी, पत्रे, संस्मरणे लेख इ. तर सार्वजनिक प्रलेखामध्ये अभिलेख, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके, वार्षिके विविध संघटनांची प्रकाराने विशिष्ट वृत्त, सांख्यिकीय प्रकाराने इ. समावेश होतो.

३. **संशोधनपत्रिका** : संशोधन पत्रिका संशोधन संस्थाद्वारे किंवा विश्वविद्यालयाद्वारे प्रकाशित केलेल्या असतात. त्या नवीन संशोधना

बाबतची व संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या नवीन पद्धती व प्रविधीबाबत समग्र माहिती दिलेली असते. म्हणून संशोधन विषयाशी संबंधित ज्या ज्या संशोधन प्रक्रियांचा उपयोग संशोधकाने आपल्या संशोधनात केला आहे ते समजते.

**४. अहवाल :** शासकीय, अशासकीय किंवा संशोधन संस्था वेळोवेळी आपला अहवाल प्रसिद्ध करीत असतात. अहवालातील माहिती व आकडेवारी ही विश्वसनीय व प्रमाणित असते. म्हणून तिचे जसेच्या तसे उदाहरण संशोधनात करता येते.

**५. दस्तऐवज :** शासकीय व गैरशासकीय दस्तऐवज ज्यांचा उपयोग संशोधनात करण्यात आला आहे त्यांना प्रस्तुत करावे लागतात.

**६. अप्रकाशित स्त्रोत :** ज्या ज्या अप्रकाशित स्त्रोतातून माहिती संशोधनासाठी प्राप्त केली आहे त्या त्या स्त्रोताचे जितके विवरण देता येईल तेवढे द्यावे पर्याप्त विवरण असेल तरच सारणीत द्यावे. साधनसामग्रीचे संकलन करताना पूर्तता, सुसंगती, अचूकता, एकजीनसीपणा या गोष्टी निष्कर्ष काढण्यासाठी उपयोगी पडतात.

**७. वाङ्मयीन संशोधन साधने :** ऐतिहासिक कागदपत्रे, पोवाडे, करारनामे, ताम्रपट, शिलालेख, मूर्ती, शिल्प, नाणी, कालनिर्णयपद्धती, कालगणना, साधन चिकित्सा, दैवत शोध, सूची साहित्य, कोशनिर्मिती, नियतकालिकांचे संशोधन.

**८. संशोधन ज्ञानकोष :** यात शिक्षण क्षेत्रातील निरनिराळ्या विषयाबद्दल झालेल्या संशोधनाची माहिती व विवेचन असते प्रत्येक विषयातील एकंदर संशोधनाचा आढावा घेऊन त्याबद्दल आवश्यक संशोधन क्षेत्राचे निदर्शन करण्यात आलेले असते.

**९. शब्दकोश :** शब्दकोशासारख्या ग्रंथाच्या उपयोगाने संशोधनासा लागणाऱ्या निरनिराळ्या अभिव्यक्तीबद्दल निश्चित अर्थबोध होणे शक्य आहे.

**१०. वार्षिके :** युनोस्को व इतर संस्था शिक्षण क्षेत्रातील विविध विषयांवर सखोल व समावेशक माहिती देणारी वार्षिके प्रकाशित करीत असतात.

**११. संशोधनविषयक नियतकालिके :** शैक्षणिक व मानसशास्त्रीय संशोधनाला वाहिलेल्या नियतकालिकामध्ये निरनिराळ्या विषयावरील संशोधनाचे वृत दिलेले असते. संशोधनाच्या विविध पद्धती साधने तंत्र निष्कर्ष इत्यादीबद्दल त्यातून विपुल माहिती व मार्गदर्शन होणे शक्य आहे.

**१२. बुलेटिन, हस्तपुस्तके, मार्गदर्शिका, गोषवारे :** अनेक संस्था व प्रकाशकाकडून प्रकाशित होणाऱ्या शिक्षण व शैक्षणिक संशोधनासंबंधी

पुस्तिका व पत्रिकांचा उपयोग प्रास्ताविक संशोधनासाठी आवश्यक माहिती व मार्गदर्शन प्राप्त करण्याकरिता करता येतो.

**१३. प्रशासनाकडून होणारी प्रकाशने** : राज्य व केंद्रीय स्तरावरील शिक्षण क्षेत्रातील प्रगती व विकासासंबंधी इतिवृत्त प्रशासनाकडून वेळोवेळी प्रकाशित होत असते.

**१४. संशोधन प्रतिवृत्त** : विद्यापीठाने स्वीकृत केलेले प्रतिवृत्त हे प्रत्येक विद्यापीठ ग्रंथालयात असते अशा प्रतिवृत्तात प्रस्तुत विषयाच्या इतर पैलूबद्दल पुढे करता येण्यासारख्या संशोधनाचे निर्देशक करण्यात आलेले असते. या सूचनांचा पुढील संशोधनाकरिता उपयोग करून घेता येतो.

**१५. झालेल्या संशोधनाचा गोषवारा व सूची** : पूर्ण झालेल्या संशोधनाचा गोषवारा अनेक संस्थांद्वारा प्रकाशित झालेला असतो. तसेच विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या संशोधन विषयाची सूची निरनिराळया ग्रंथांलयांनी तयार केलेली आहे. याचा उपयोग संशोधन विषयाची निवड व त्यासाठी उपयुक्त पद्धतीच्या मार्गदर्शनासाठी फायद्याची आहे.

**१६. ग्रंथ व पुस्तके ग्रंथ व पुस्तके** : ग्रंथालय हे संशोधकाचे महत्त्वाचे अभ्यासक्षेत्र असते. ग्रंथालयातील निरनिराळया 'सूची' चे ज्ञान विषयसूची, ग्रंथकार नाम सूची, ग्रंथनामसूची इ. प्रकारच्या सूची आवश्यक असतात या शिवाय चांगल्या ग्रंथालयात अनेक प्रकारच्या सूची असतात. उदा. नियतकालिकसूची, विशिष्ट विषयांना वाहिलेला अभ्यास वा संशोधन कालिकांची रिसर्च जर्नल सूची, निरनिराळ्या अहवालांची यादी सूची इ. साधनसामग्री संशोधनात उपयोगी पडते. संशोधनाच्या वेळी विशिष्ट दृष्टीने पाठ्यपुस्तके वाचली असता पुष्कळ फायदा होतो. चांगले पाठ्यपुस्तक हे एखाद्या प्रमाणभूत ग्रंथाइतकेंच महत्त्वाचे असते.

ज्या ग्रंथातून व पुस्तकातून लिखित सामग्री संशोधनात वापरली आहे. त्या सर्वच लेखकांची किंवा संपादकांची आकार विषयानुसार सूची बनवावी. त्यातील लेखकांच्या अथवा संपादकांच्या नावापुढे त्यांनी लिहिलेले किंवा संपादित केलेल्या ग्रंथाचे किंवा पुस्तकाचे शीर्षक लिहावे व त्यापुढे प्रकाशकाचे नाव, ठिकाण, वर्ष, आवृत्ती लिहावी.

संशोधन करणाऱ्या अभ्यासकाला समृद्ध ग्रंथालयाची व ग्रंथाची मदत ही घ्यावीच लागते. अशा ग्रंथालयात सरकारी कागदपत्रांची इतिवृत्ते, वृत्तपत्रांची संकलने, महत्त्वाचे इतिहास ग्रंथ, विविध संदर्भ ग्रंथ, ग्रंथकारांच्या समग्र आवृत्या, विविध प्रकारचे आलेख उपलब्ध असतात. बृहत ग्रंथसूची, वार्षिक ग्रंथ सूची, ग्रंथकार सूची, तालिका, चरित्रकोश, शब्दकोश येथे

मिळतात उदा. दाते सूचींचे दोन्ही खंड पाहिले तरी बरीच माहिती मिळू शकते. ग्रंथालय ही ज्ञानाची सदावर्ते आहेत काही ग्रंथालये विशिष्ट हेतूने अस्तित्वात आलेली असतात. ह्या ठिकाणी अभ्यासकाला बरीचशी साधनसामग्री मिळण्याची शक्यता असते. विशिष्ट विषयांना वाहिलेली अनेक ग्रंथालये असतात.

**१७. हस्तलिखिते** : आपण निवडलेल्या विषयावर तत्सदृश विषयावर किंवा समांतर विषयावर कोणी पूर्वी काम केलेले असल्यास ते पाहणे खचितच मार्गदर्शक ठरते. असे प्रबंध विद्यापीठातून व संशोधन संस्थातून हस्तलिखित स्वरूपात पडून राहिलेले असतात. ते पाहून आपल्या कच्च्या वा तात्पुरत्या साधन सूचीत भर टाकता येते. वाङ्मयीन संशोधनात साधनचिकित्सतेत हस्त लिखितांचा विचार महत्त्वाचा ठरतो. किंबहुना भारतीय पातळीवर संशोधनातील हस्तलिखिते ही एक महत्त्वाची साधन सामग्री ठरते. मुद्रणकलेचा शोध हा अगदी अलीकडचा असल्याने त्यापूर्वीचे लेखन हे मौखिक परंपरेने आणि पठण पद्धतीने संग्रहित केले जायचे. मौखिक साहित्य लिपिबद्ध झाल्याने हस्तलिखितांची निर्मिती होऊ लागली. हस्तलिखित याचा अर्थ आहे हाताने लिहिलेले. हस्तलिखितातील लेखन प्रक्रिया लिपीबद्धता अक्षरनिविष्टता आणि त्यातून निर्माण होणारी शब्दरूपे तसेच त्या हस्तलिखितांच्या काळाच्या ओघात झालेल्या नकला यांची छाननी संशोधकाला काळजीपूर्वक व मोठ्या जिव्हाळ्याने करावी लागते. खरे तर यातूनच पाठ चिकित्सापद्धती तयार झाली आहे. हस्तलिखित म्हणजे लेखकाने स्वतः लिहिलेले वा लिहून घेतलेले असते. मराठी साहित्य संशोधनात हस्तलिखित विचार हा साधन चिकित्सेचा विषय ठरलेला आहे.

हस्तलिखिताचा अभ्यास करताना पुढील गोष्टींचा शोध घ्यावा लागतो. लेखनाची साधने माध्यमे, आकार, ओळी, पृष्ठसंख्या, चित्राकृती, खाडाखोडीच्या खुणा, टिप्पणी, लेखन, इ. हस्तलिखितांची शैली, बांधणी, धावती संहिता, मूल संहिता, भावार्थ, निरूपण इ. आशयाचे स्वरूप, वाङ्मयप्रकार, ऐतिहासिक सर्वेक्षणात्मक शोध, स्वर-व्यंजनांची मांडणी, कोरीव लेख अशा अनेक गोष्टी महत्त्वाच्या असतात.

एकूणच देवळे, दर्गे, पंडितांची घरे, पिढीजात विद्वानांचे वाडे, जुने जमीनदारांचे वाडे यातून हस्तलिखिते मिळतात. संशोधक त्याचा शोध घेतात आणि त्याचे अस्सलपण शोधतात. उदा. महानुभावांची अनेक हस्तलिखिते उपलब्ध झाली. त्यांची सांकेतिक लिपी उलगडत गेली आणि महानुभाव साहित्य एकेक करून उजेडात आले.

**१८. नियतकालिके :** नियतकालिकांचा उपयोग करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक नियतकालिक विश्वसनीय व प्रामाणिक असेलच असे नाही. म्हणून संशोधकाने प्रमाणित व विश्वसनीय नियतकालिकांचाच वापर करावा. नियतकालिकांची मांडणी करताना प्रकाशन अवधीचा आधार मानून वर्गीकृत करून मांडावे म्हणजेच प्रथम दैनिक साप्ताहिके नंतर मासिक नंतर त्रैमासिके नंतर वार्षिक अंक या क्रमात मांडणी करावी.

वाङ्मयीन नियतकालिके व अनियतकालिके हे संशोधनाचे एक मोठे साधन बनू शकते या वाङ्मयीन नियतकालिकांत युगवाणी, महाराष्ट्र साहित्यपत्रिका, ज्योत्स्ना, धनुर्धारी, सत्यकथा, अभिरुची, ललित, प्रतिष्ठान, अनुष्टुभ, समाजप्रबोधन पत्रिका तसेच काही दर्जेदार दिवाळी अंक विशेषांक स्मरणिका या अनेक दिशांनी उपयुक्त ठरतात आपल्याला या सर्वांचा योग्य वापर करता आला पाहिजे. उदा. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत सर्व महत्त्वाच्या वार्षिक वाङ्मय समालोचन, साहित्यप्रकार व साहित्यिक या संबंधीचे महत्त्वपूर्ण विशेषांक तसेच भाषा व्याकरण व्युत्पत्ती, साहित्यसंशोधन, समीक्षा, वाङ्मयीन वाद इ. विषयांवरचे लेखन आढळते. प्रत्येक वाङ्मयीन नियतकालिकांची एक ऐतिहासिक व वाङ्मयीन कामगिरी निश्चितच महत्त्वाची असते. संशोधकाने आपल्या संशोधनात त्याचा उपयोग करावा.

**१९. कोशवाङ्मय :** कोश म्हणजे शब्दांचा विविध माहितीचा वा ज्ञानाचा केलेला व्यवस्थित संग्रह.

**कोशवाङ्मयाचे चार वर्ग :**

१. शब्दकोश २. विश्वकोश ३. कोशसदृश वाङ्मय ४. सूचीवाङ्मय

**शब्दकोश प्रकार :** सर्वसंग्राहक शब्दकोश, विशिष्ट शब्दकोश, परिभाषा कोश, व्युत्पत्तिकोश,

**विश्वकोश :** सर्वसंग्राहक विशिष्ट विषयावर. भारतीय संस्कृती कोश, चरित्र कोश इ.

**कोशसदृश वाङ्मय :** हे प्रत्यक्ष कोश पद्धतीने रचलेले नसते. परंतु त्याचा उद्देश एखादा विषयासंबंधी बहुविध माहिती संकलित करून वाचकांना बहुश्रुत करणे हाच असतो.

**सूची वाङ्मय :** सूची ही अभ्यासाची सुरुवात आहे. एखाद्या ग्रंथाच्या अखेरी येणारी त्या ग्रंथातील व्यक्ती विषय व ग्रंथ यांची यादी, शब्द सूची, संदर्भ सूची, निर्देशसूची असे विविध प्रकार सूचीचे पडतात संशोधकाचा व सूचीचा

फार जवळचा संबंध असतो उदा. मराठी नियतकालिकांची सूची. कोशवाङ्मयातून संशोधकाला माहितीचा खजिना प्राप्त होतो.

**संगणक व इंटरनेट संगणक व इंटरनेट :** जगातील दिग्गज सॉफ्टवेअर कंपनी मायक्रोसॉफ्टने २६ भाषांचा अनुवाद करणारे सॉफ्टवेअर विकसित केले आहेत मराठी भाषेत संशोधन करणाऱ्यांसाठी ते निश्चित उपयोगात येईल. इंग्रजी सह २६ विविध भाषांचा अनुवाद करण्यास ते सक्षम आहे. 'युनिव्हर्सल ट्रान्सलेटर' असे त्याचे नाव आहे. वॉशिंग्टनच्या रेडमंड येथील मायक्रोसॉफ्टच्या मुख्यालयातील 'फ्रँकसुंग' आणि 'रिक रशीद' यांनी त्याची निर्मिती केली. या दोघांनी बीजिंगमधील मायक्रोसॉफ्टरिसर्चच्या सहकार्याने हे सॉफ्टवेअर विकसित केले असून हे आशियातील सगळ्यात मोठे संशोधन केंद्र आहे.

संपूर्ण संगणक ज्ञानच मराठीतून उपलब्ध करण्याचा यशस्वी प्रयोग बारामती येथील विद्याप्रतिष्ठानच्या सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांनी केला आहे. संगणकाच्या बेसिक ज्ञानापासून विंडोज एक्सपी, टॅली आदींचे संपूर्ण ज्ञान मराठीतून देण्याचा प्रयत्न सुरू करून त्यात त्यांना यशही आले. 'सोमाय सोल्यूशन्स' या नावाने या डिव्हीडीची निर्मिती व प्रकाशन करून आता यश पाब्लिकेशनच्या माध्यमातून त्या डि.व्ही.डीचे वितरण ही सुरू केले आहे. या डी.व्ही.डी. द्वारे ७५० रुपयांत संगणकाचे संपूर्ण ज्ञान मराठी भाषकांना अगदी साध्या सोप्या मराठी भाषेत उपलब्ध होणार आहे. जगातील बहुतेक महत्त्वाची वर्तमानपत्रे आणि नियतकालिके आता इंटनेट वर उपलब्ध होतात. केवळ संगणकीय महाजालात अस्तित्वात असणारी व छापील स्वरूपात उपलब्ध नसणारी काही संगणकीय नियतकालिकेही आता सुरू झालेली आहेत. या नियतकालिकांमध्ये नियमितपणे संशोधनात्मक निबंध. चर्चा. परीक्षणे इ. लिहिली जातात. 'गुगल सर्च इंजिन' ही वेध यंत्रणा तुम्हाला पाहिजे त्या विषय उपविषयांवर उपलब्ध असणाऱ्या माहितीच्या साठ्यांची एक प्रचंड यादीच क्षणार्धात उपलब्ध करून देते.

इंटनेटवर आता ग्रंथ, नियतकालिके, विश्वकोश वगैरेचे प्रचंड मोठे साठे उपलब्ध होऊ लागल्यामुळे या साधनांचे संदर्भ देण्यासाठी सुस्पष्ट व सुटसुटीत पद्धत वापरणे आवश्यक ठरत आहे. नेहमीच्या लेखांचे वा ग्रंथांचे संदर्भ देताना जसे लेखकनाम आणि लेखाचे वा ग्रंथाचे शीर्षक दिले जाते तसे येथे ही दिले जाते मात्र वापरलेले विशिष्ट संदर्भ साधन इंटरनेटवर

कधी पाहिले. त्याची नोंद द्यावी लागते आणि इंटरनेटवर कोणत्या स्थळावर ते उपलब्ध झाले त्याचा संगणकीय पत्ता द्यावा लागतो.

मराठीमधील संशोधकाला आता केवळ संगणक साक्षर होऊन चालणार नाही अधिक वरच्या पातळीवरची संगणकीय क्षमता आता संशोधकाने स्वतःच्या अंगी बाणवणे आवश्यक ठरते आहे. संशोधन करत असताना वेगवेगळी निरीक्षणे नोदवावी लागतात. चर्चा करावी लागते क्षेत्र पाहणी करावी लागते. प्रश्नावली. मुलाखतीच्या माध्यमातून निष्कर्ष मांडावे लागतात. विविध ग्रंथाचे वाचन करावे लागते. अनुसूचीचा वापर करावा लागतो. संशोधनाच्या साधनांनमध्ये विविध पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, कोशवाङ्मय सूची, वाङ्मय हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट इ. वापर केला जातो. आधुनिक काळात संगणक व इंटनेटचा वापर केला जातो. कुठल्याही विषयाचा अभ्यास करताना एका विशिष्ट विषयाला वाहून घेऊन निपुणता प्राप्त होत नाही तर त्या विषयाला योग्य न्याय देण्यासाठी विविध विषयांचा मूलभूत अभ्यास असावा लागतो. म्हणूनच संशोधकाला संशोधन करताना विविध साधने वापरावी लागतात. संशोधन कार्यात या सर्व साधन सामग्रीचे अत्यंत मोलाचे कार्य असते.

**निष्कर्ष :**

१. ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्यांच्या शोधासाठी काळजी पूर्वक केलेले अन्वेषण किंवा परीक्षण हेच संशोधन. हे जगाच्या प्रगतीचे व सुधारणेचे मूल स्रोत संशोधन हेच आहे.
२. संशोधनकार्याचे यश बऱ्याच प्रमाणात संशोधकाच्या व्यक्तिगत गुणांवर अवलंबून असते.
३. तथ्य संकलन हा संशोधन कार्याचा आत्मा आहे.
४. तथ्य म्हणजे वास्तविक स्वरूपात घडून आलेली घटना अथवा विद्यमान घटना की जी सर्व लोकांना मान्य असते त्या घटनेचा सत्य म्हणून स्वीकार केला जातो.
५. संकलित सामग्रीत अचूकपणा व काटेकोरपणा सतत पाहिजे.
६. पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे संशोधनात साधन म्हणून महत्त्वाची असतात.
७. विविध ज्ञानशाखांना छेदून जाणारे संशोधन आज हवे आहे.
८. कोशवाङ्मय सूची, वाङ्मय हस्तलिखिते, शिलालेख, ताम्रपट यांना ही संशोधनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

९. संशोधकाजवळ संशोधनाची सर्व साधने अत्याधुनिक साधनांसह उपलब्ध असावीत.
१०. जिज्ञासा ही शोधाची आणि संशोधनाची जननी आहे.
११. शास्त्रे आणि कला या दोन्ही क्षेत्रात ज्ञानसाधनेची परंपरा दिसते.
१२. मानवी ज्ञानसाधनेची परंपरा ही संशोधनाच्या प्रेरणेच्या मुळाशी असते.
१३. आधुनिक काळात माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे विविध प्रगत साधने व आयुधे यांचा वापर करून संशोधन कार्यास गती प्राप्त होत आहे.

# विभाग 'ब'
# वाङ्मयीन संशोधनाची अभ्यासक्षेत्रे

# एका लेखकाचा अभ्यास : तंत्रे

प्रा. डॉ. गोपाळ गावडे

**प्रस्तावना :**

संशोधन ही अनादी कालापासून चालत आलेली एक महत्त्वाची संकल्पना आहे. माणसाच्या दैनंदिन जीवनात उपयुक्त असणाऱ्या शुल्लक गोष्टीपासून ते ग्रह, उपग्रहापर्यंतचे संशोधन सतत सुरू असते. त्याच पद्धतीने वाङ्म्याचे संशोधन ही देखील एक संशोधनाची महत्त्वाची शाखा आहे. मानवी विचार, भावना, कल्पनांचे, समाजातील क्रिया-प्रतिक्रियांचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत असते. जीवनपद्धतीची सत्यासत्यता पडताळून पाहणे, लेखकाची शैली, त्याची भाषा, लेखकावर परिणाम करणारे इतर बाह्य घटक इत्यादी अशा विविध घटकांच्या साहाय्याने वाङ्मयाचे संशोधन करता येऊ शकते.

**वाङ्मयीन संशोधनाचे स्वरूप :**

वाङ्मयीन संशोधनामध्ये अधिक सूक्ष्मता येण्यासाठी वाङ्मयाचा वेगवेगळ्या दृष्टिकोणातून अभ्यास केला जातो. काही वेळा साहित्यकृती केंद्रभागी ठेऊन अभ्यास केला जातो. तेव्हा समाजशास्त्रीय, ऐतिहासिक, मार्क्सवादी, आस्वादात्मक, तौलनिक, भाषाशास्त्रीय, लोकतत्त्वीय, इ. अशा अनेक समीक्षापद्धतींचा आधार घेतला जातो. काही वेळा कविता, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, ललित साहित्य अशा वाङ्मयप्रकारानुसार साहित्याचा अभ्यास केला जातो. वाङ्मयीन लेखनाचा कालखंड निश्चित करूनही वाङ्मयाचा इतिहास अभ्यासला जातो. लेखकाला केंद्र मानून एका लेखकाचा अभ्यास केला जातो.

एका लेखकाचा अभ्यास करताना लेखकाच्या वाङ्मयीन कार्याचा, जडणघडणीचा, निर्मिती प्रक्रियेचा शोध घेण्यासाठी लेखकाला केंद्रभागी ठेवणे गरजेचे असते. परंतु लेखकाची कलाकृती अथवा साहित्यकृती हेच त्याच्यापर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे साधन आहे. अशा स्वरूपाचा अभ्यास करताना काही गृहीतके नजरेसमोर ठेवावी लागतात. जसे की,

१. लेखक आणि त्याचे वाङ्मय यात अनोन्यसंबंध आहे.

२. लेखकाची विशिष्ट कलाकृती त्याचे अपत्य आहे.

३. साहित्य हे लेखकाचे आत्मचरित्र असते.
४. लेखकाचे वाङ्मयीन कार्य अजरामर असते.
५. लेखकाची स्वतंत्र जीवनदृष्टी असते.
६. लेखक विशिष्ट वाचकवर्गाची अभिरुची घडवत असतो.
७. लेखकाच्या नावाचे (लेखन वैशिष्ट्यांचे) वर्तुळ झालेले असते. ते दिशादर्शक असते.

या स्वरूपाची गृहीतके समोर ठेऊन केलेला अभ्यास अधिक उपकारक ठरू शकतो. एका लेखकाचा अभ्यास करताना चरित्रात्मक, ऐतिहासिक, मार्क्सवादी, इ. अनेक समीक्षापद्धतींचा मेळ घालावा लागतो. लेखकावर विशिष्ट विचारप्रवाहांचा असलेल्या प्रभावातून लेखकाच्या वाङ्मयीन कार्याचा अभ्यास केला जातो. लेखकाचे साहित्य हे त्या त्या काळचे, त्यातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतराचे प्रतिनिधित्व करत असते. कालसापेक्षता हा त्याचा विशेष असतो. एखाद्या लेखकाने विविध वाङ्मयप्रकार हाताळलेले असतील तर त्या त्या साहित्यप्रकारामध्ये संबंधित लेखकाने दिलेले योगदान त्याच्या साहित्यकृतींचा अभ्यास करताना लक्षात घ्यावे लागते. वाङ्मयीन क्षेत्रातील लेखकाचे योगदान लेखकाचा अभ्यास करण्यास प्रवृत्त करत असते. अशा स्वरूपाचे योगदान हे वाङ्मय इतिहासामध्ये चिरकालीन असते.

उदाहरणासाठी आपण भा.वि. तथा मामा वरेरकर यांच्या साहित्याचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

संशोधनामध्ये अभ्यासकाची भूमिका, संशोधनाचा उद्देश सांगणे आवश्यक असते. हा उद्देश संशोधनाची दिशा ठरवत असतो. आपल्या संशोधनाने वाङ्मयाच्या अभ्यासामध्ये भर टाकणे गरजेचे असते. लेखकाचे वाङ्मयीन क्षेत्रातील कार्य किती महत्त्वपूर्ण आहे यावर संशोधन विषयाचे महत्त्व अवलंबून असते. संशोधनाचे स्वरूप, संबंधित लेखकाचा का व कोणत्या दृष्टिकोणातून अभ्यास करणार आहोत हे भूमिकेमध्ये संशोधकाने स्पष्ट करणे गरजेचे असते.

**भूमिका :**

भा. वि. ऊर्फ मामा वरेरकर हे मराठी साहित्यामधील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी १९०८ पासून १९६० पर्यंत सातत्यपूर्ण व निष्ठेने कथा, कादंबरी आणि नाट्यलेखन केले आहे. त्यांची लेखन कारकिर्द स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील टिळक युगाचा अस्त, गांधी युगाचा आरंभ, प्रत्यक्ष स्वातंत्र्यप्राप्ती आणि संयुक्त महाराष्ट्रासारखी अस्मितावादी चळवळ अशा

मराठी माणसाच्या जीवनातील प्रमुख घटनांचे साक्षीदार आहे. अशा विस्तृत कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेल्या वरेरकरांच्या साहित्याचा अभ्यास होणे ही काळाची गरज होती.

**प्रकरण पहिले–मामा वरेरकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडण–घडण :**

मामांचा जन्म २७ एप्रिल १८८३ तर मृत्यू २३ सप्टेंबर १९६४. वरेरकरांचे शिक्षण जेमतेम सातवीपर्यंतच झाले असले तरी मराठी बरोबर संस्कृत, हिंदी, इंग्रजी आणि बंगाली भाषा अवगत होत्या. अठराविश्वे दारिद्र्य भोगलेल्या वरेरकरांनी संगमेश्वर, सावंतवाडी, रत्नागिरी, बेळगाव, मुंबई, दिल्ली असा जीवनप्रवास करत पोस्ट खात्यातील एका सामान्य नोकरीपासून नाटककार, कादंबरीकार, कथाकार, भाषांतरकार ते पार्लमेंटचे मेंबर होण्यापर्यंतचा सांस्कृतिक प्रवास केला. पोस्ट खात्यातील नावडती नोकरी १९ वर्षे केल्यानंतर नोकरीचा बिनशर्त राजीनामा देऊन निष्ठेने साहित्याची सेवा केली. ४४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. १९५६ साली राज्यसभेवर निवड झाली. तर १९५९ साली त्यांना 'पद्मभूषण' या सन्मानाने गौरविण्यात आले.

**प्रकरण दुसरे – वरेरकरांच्या नाट्यवाङ्मयाचा अभ्यास :**

वरेरकरांनी १९०८ पासून नाट्यलेखनाला प्रारंभ केला. त्यांनी एकूण ३४ नाटके, ६ लघुनाटके आणि बारा एकांकिका लिहिल्या आहेत. त्यांनी कुंजविहारी, सोन्याचा कळस, हाच मुलाचा बाप, सत्तेचे गुलाम, संन्याशाचा संसार, सारस्वत, भूमिकन्या, सीता इत्यादी अनेक महत्त्वाची नाटके लिहिली आहेत. पौराणिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक असे चौफेर त्यांचे नाट्यलेखन झालेले आहे. पाश्चात्त्य रंगभूमीचा अभ्यास केला. भारतभर भ्रमंती करून भारतीय रंगभूमीचा अभ्यास केला आणि त्यानुसार मराठी रंगभूमीवर सुधारणा घडवून आणल्या. नाट्यतंत्रामध्ये बदल घडवून आणले. स्वगते हद्दपार केली. नाटकातील पदसंख्या कमी केली. गुंडाळी पडद्यांऐवजी निश्चल भिंतींचा रंगभूमीवर वापर केला. एकूणच मामाच्या नाट्यकार्याविषयी बोलायचे झाले तर मराठी रंगभूमी सर्व बाजूंनी सुधारून तिला समाजाभिमुख करण्याचे अवघड कार्य वरेरकरांनी चिकाटीने पूर्ण केले. म्हणूनच प्र. के. अत्रे मामा वरेरकरांचा उल्लेख 'आधुनिक रंगभूमीचे सुधारक' असा करतात.

**प्रकरण तिसरे – कादंबरीकार मामा वरेरकर**

वरेरकरांनी नाटकांबरोबर कादंबरीलेखनही केलेले आहे. 'चिमणी', 'विधवा कुमारी', 'गोदू गोखले', 'सात लाखातील एक', 'फाटकी वाकळ', 'मी

राम जोशी', 'धावता धोटा' अशा एकूण त्यांनी सत्तावीस कादंबऱ्या लिहिल्या. गांधीवाद, साम्यवाद आणि मार्क्सवाद या तीनही विचारप्रणालींचा प्रभाव वरेरकरांच्या लेखनावर असलेला दिसतो. स्वदेशी चळवळ, गिरणी कामगारांचे प्रश्न, हुंडा प्रश्न, दारू बंदी, गांधी विचारांचा प्रचार, अस्पृश्योद्धार, तमाशा, जातिभेद, प्रांतभेद इत्यादी तात्कालिक प्रश्नांबरोबर बालविधवांची समस्या सांगून स्त्रियांच्या हक्काचा, स्वातंत्र्याचा प्रचार व पुरस्कार 'विधवा कुमारी' व 'गोदू गोखले' या कादंबरीतून केला आहे. वरेरकरांनी समाजातील जवळ-जवळ महत्त्वाच्या प्रत्येक समस्येला आपल्या कादंबरीचा विषय बनविलेला आहे. त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून उपेक्षित वर्गाकडे किंवा समाजाकडे दुर्लक्षित केलेल्या वर्गाकडे वाचकांचे लक्ष वेधले आहे. तसेच वरेरकरांनी कसे सांगावे यापेक्षा काय सांगावे याकडे अधिक लक्ष दिलेले आहे.

**प्रकरण चौथे - वरेरकरांचे कथावाङ्मय**

नाटक, कादंबरीबरोबर वरेरकरांनी कथालेखनही केलेले आहे. 'स्वैरसंचार', 'षोडशी', 'वैमानिक हल्ला' आणि 'एकादशी' हे चार कथासंग्रह वरेरकरांच्या नावावर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कथांतून स्त्रीजीवन आणि त्यांचे प्रश्न, गरिबांचे सावकारीतून होणारे शोषण, व्यसनाधीनता, रूढी-परंपरा, धर्मांतर, युद्ध आणि त्याचे सामाजिक दुष्परिणाम इत्यादी अनेक समस्यांचा ऊहापोह झालेला आहे. त्यांच्या एकूणच कथांचा विचार केल्यानंतर नाटक लिहिण्यामागची त्यांची निखळ भावना त्यांच्या कथेत दिसत नाही. त्यांच्या कथांचे विषय, मांडणी, शीर्षक, भाषा इत्यादी घटक पाहता वरेरकरांनी सामाजिक सुधारणांच्या प्रचारासाठी कथेचा साधन म्हणून उपयोग केलेला आहे.

**प्रकरण पाचवे - वरेरकरांचे आत्मचरित्र 'माझा नाटकी संसार'**

वरेरकरांनी हे आत्मचरित्र वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी लिहायला सुरुवात केली. आपल्या नाट्यजीवनाची हकिकत त्यांनी आत्मचरित्राच्या पाच भागात सविस्तरपणे सांगितली आहे. हे आत्मचरित्र त्यांच्या समग्र जीवनाची सविस्तर माहिती देणारे नाही, ते परिपूर्ण नाही, तरीही वरेरकरांचे हे आत्मचरित्र म्हणजे मराठी रंगभूमीचा इतिहास आहे. या आत्मचरित्रात काही ठिकाणी आत्मस्तुती, आत्मदर्शन, व्यक्तिचित्रणातील पक्षपाती भूमिका व काही अनावश्यक गोष्टींचा निर्देश आल्यामुळे या आत्मचरित्राला थोडा उणेपणा येतो. वरेरकरांची नाटकाविषयीची तळमळ, नाटकासाठी केलेली भ्रमंती, नाटकासाठी दिलेले योगदान यासाठी हे आत्मचरित्र उल्लेखनीय आहे. एक आदर्श कर्तृत्ववान पुरुष म्हणून वरेरकरांची या आत्मचरित्रातून ओळख होते.

**प्रकरण सहावे – उपसंहार**

एकूण पाच प्रकरणांमध्ये वरेरकरांच्या समग्र साहित्याचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेल्या निष्कर्षांची नोंद उपसंहारामध्ये करता येते.

मामा वरेरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण या पहिल्या प्रकरणामध्ये वरेरकरांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा स्थूल परामर्श घेतला. वरेरकरांना पोटदुखी, अर्धांगवायू यासारख्या काही व्याधींचा आयुष्यभर त्रास होत होता. परंतु त्यांच्या साहित्यलेखनावर या शारीरिक व्याधींचा व आर्थिकदृष्ट्या हलाखीच्या परिस्थितीचा परिणाम झालेला नाही. पोस्ट खात्यातील कारकुनाच्या नोकरीपासून नाटककार, कादंबरीकार, कथाकार, अनुवादकार ते पार्लमेंटचे सदस्य असा सांस्कृतिक जीवनप्रवास करणाऱ्या वरेरकरांना आयुष्याच्या अखेरीस अनेक मानसन्मान मिळाले. यातून एका लेखकाची वाङ्मयीन निष्ठा व प्रयोगशील वृत्ती दिसून येते.

नाट्यकार्यासाठी वाहून घेणाऱ्या वरेरकरांची नाट्यलेखनामागील भूमिका रंगीभूमीवर सुधारणा घडवून आणण्याची होती. वरेरकरांच्यावरती इब्सेन, मोलिअर यांचा प्रभाव होता. नाटक हे प्रचाराचे व लोकराधनाचे प्रभावी माध्यम आहे याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच वरेरकर नाटकाच्या माध्यमातून समाजसुधारणा करण्याचे ध्येय साकारताना दिसतात. वरेरकरांनी चित्रपटाकडे वळणारा प्रेक्षकवर्ग रंगभूमीशी जोडून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य केले. वरेरकरांनी उपेक्षित किंवा समाजाने दुर्लक्षित केलेल्या वर्गाकडे वाचकांचे लक्ष वेधून घेण्याचे कार्य केले आहे. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी-परंपरांची वरेरकरांनी कठोर निर्भत्सना केली आहे. प्रेमविवाह, आंतरजातीय विवाह व स्त्री-पुरुष व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यातून केला आहे. हे एका समाजसुधारकाचे काम आहे.

सारांश, एका लेखकाचा अभ्यास करताना त्याच्या साहित्यकृतींचे मूल्यमापन करताना अनेक समीक्षा पद्धतींचा मेळ घालावा लागतो. समकालीन लेखकांच्या संदर्भात संबंधित लेखकाच्या साहित्याचे योगदान नोंदवावे लागते. त्यातून संशोधनाचे महत्त्वही अधोरेखित होत असते. लेखक, त्याचे व्यक्तिमत्त्व आणि त्याचे वाङ्मयीन कार्यकर्तृत्व यांच्यातील परस्परसंबंधातून हे महत्त्व उलगडत असते. अशा महत्त्वपूर्ण व्यक्तीविषयीचे व तिच्या कर्तृत्वाविषयीचे संशोधन होणे गरजेचे असते. अशा प्रकारचे संशोधन पक्षपाती असू नये. संबंधित लेखकाच्या उणिवा देखील मांडणारे संशोधन गुणवत्तापूर्ण ठरते. अशा संशोधनाने वाङ्मयाच्या अभ्यासामध्ये भरच पडत असते.

# विशेष लेखकाचा अभ्यास : तंत्रे

प्रा.डॉ.एन.डी.पवार (कवडे)

महाराष्ट्रातल्या सर्व विद्यापीठातून आज संशोधन गतिमान झाले आहे. या संशोधनाबद्दल बरे-वाईट बोलले जात असले, तरी नवे नवे विषय आणि अपारंपरिक वर्गातून आलेला संशोधक, या दोन बाबी निश्चितच नव्या आणि वेगळ्या आहेत. सांस्कृतिक दृष्टीने यांना महत्त्व आहेच. इतर अनेक विषयांबरोबर मराठीमध्येही संशोधन वाढले आहे. विशेषतः एम.फिल. आणि पीएच.डी. या पदव्यांसाठी हे संशोधन प्रामुख्याने केले जाते. वरची वेतनश्रेणी आणि इतर प्रलोभने या संशोधनामागे नाहीतच, असे नाही; परंतु यातील काही प्रबंध निश्चितच लक्षणीय असतात.

प्रबंधाचा विषय निवडताना मार्गदर्शकाचा सल्ला घेतला जातो. तरीही तेच तेच विषय संशोधनासाठी निवडले जातात, असा आरोप या विद्यापीठीय संशोधनावर केला जातो. त्यात तथ्य नाही असे नाही. आज तर चिकित्सक अभ्यास एकाच पठडीतून होत आहे. 'विशेष लेखकांचा अभ्यास' फार मोठ्या प्रमाणात केला जातो आहे. परंतु विशेष लेखकाचा अभ्यास नेमका कसा करावा, याबद्दल मात्र फारसे काही लिहिले अगर बोलले जात नाही.

**लेखकाची निवड :**

एखाद्या विशिष्ट लेखकाचा वाङ्मयीन अभ्यास करताना लेखकाची निवड काळजीपूर्वक करणे आवश्यक असते. बऱ्याचदा असा अनुभव येतो की, एखाद्या विशिष्ट कालखंडात एक लेखक आपल्याला भारून टाकतो. परंतु काही वर्षांनी तो सर्वसामान्य वाटू लागतो. उत्साहाच्या भरात हाती घेतलेले त्यांच्यावरील संशोधन अशा वेळी निरस काम वाटू लागते. त्यामुळे लेखकाच्या आपल्यावरील प्रभावाचे आपण परीक्षण करणे आवश्यक ठरते. यासाठी सर्वसाधारणपणे पुढील तत्त्वे मार्गदर्शक ठरू शकतील.

**(१) वाङ्मयप्रकाराचे सर्वांगीण ज्ञान :**

जो लेखक आपण अभ्यासणार आहोत त्याने हाताळलेल्या वाङ्मयप्रकाराचे सखोल, सर्वांगीण ज्ञान लेखक निवडीच्यावेळी असणे आवश्यक आहे. उदा. सदानंद देशमुख यांच्यावर संशोधन करावयाचे ठरले तर त्यांच्या कादंबरींचा घाट, रचना-तंत्र यांच्याविषयी सर्वसाधारण स्वरूपाची संपूर्ण माहिती संशोधकाजवळ असली पाहिजे. काही वेळा निवडलेला लेखक

हा एकापेक्षा अधिक वाङ्मयप्राकर हाताळीत असतो. अशा वेळी या सर्व वाङ्मयप्रकारांची सरमिसळ न करणे हे बहुतेक वेळा योग्य होईल. चिं.त्र्यं. खानोलकरच्या कादंबऱ्या व त्याची नाटके यांमधून फक्त त्यांच्या नाटकाची निवड करणेच उचित होईल. दुसरा एक मार्ग म्हणजे संशोधनप्रकल्पाचे दोन वेगळे भाग करून खानोलकरच्या कादंबऱ्या व नाटके या दोहोंबद्दल स्वतंत्र स्वरूपांचे निष्कर्ष काढणे. अर्थात नेहमीच ही पद्धत उपयुक्त होईल असे नव्हे. शेक्सपिअरचा कवी म्हणून अभ्यास करावयाचा असेल तर त्याची सोनेट्स आणि त्याची नाटके या दोहोंतले काव्य शोधणे आवश्यक होईल. खानोलकरांच्या कादंबऱ्या व नाटके या दोहोत संशोधकाला एखादा सर्वसाधारण दुवा आढळत असेल; तर दोन्ही वाङ्मयप्रकराबद्दल काही मर्यादित तरी एकत्रित चर्चा करणे योग्य.

ज्या वाङ्मयप्रकरात आपण निवडलेला लेखक लिहितो, तो आपल्या आवडीचा असणेही जवळजवळ अनिवार्य असते. विजय तेंडूलकर हा नाटककार संशोधकाचा आवडता असेल, पण नाटक या वाङ्मयप्रकाराविषयी त्याला विशेष आत्मीयता नसेल, तर त्याने हा नाटककार न निवडणेच बरे.

**(२) काल व परंपरा यांची जाणीव :**

आपण निवडलेला लेखक योग्य त्या संदर्भात बसवूनच त्याच्याकडे बघण्याचा दृष्टिकोण पक्का करावा. 'कोणत्याही स्वरूपाचे वाङ्मय हे त्या काळाचे अपत्य असते.' लेखकांचा थोरपणा हा तत्कालीन वाङ्मयीन प्रवाहापासून वेगळे होण्यात बऱ्याच प्रमाणात अवलंबून असतो, हे खरे असले तरी रेनानने म्हटल्याप्रमाणे आपला काळ व आपला समाज याविरुद्ध बंड करूनही शेवटी आपण त्या काळात वावरत असतो.

याचमुळे आपण निवडलेल्या लेखकाचे समकालीन लेखक (विशेषत: त्याचा वाङ्मयप्रकारातील) आणि परंपरेने श्रेष्ठ मानलेले लेखक यांचाही अभ्यास करावा लागतो. र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्यावर संशोधन-प्रकल्प हाती घेताना र. वा. दिघे संशोधकाचे आवडते कादंबरीकार असतील, तरीही विसाव्या शतकातील वाङ्मयीन प्रवाह व त्यात दिघे यांचे स्थान, तसेच मराठी कादंबरीची परंपरा व तिच्यात दिघे यांचे स्थान यांचा विचार आपली निवड पक्की करण्याआधीच करावा. हा विचार पुढे प्रकल्प सुरु असतानाही अधिक खोलवर करावा लागेल. पण त्याकडे एक दृष्टिक्षेप आधीच टाकणे जरुरीचे आहे.

### (३) नवीन शोधाची अपरिहार्यता

आपली एखाद्या लेखकावर श्रद्धा आहे म्हणून त्याच्यावर संशोधन करण्यापेक्षा एखाद्या लेखकाचे काही पैलू अद्याप अज्ञात राहिले आहेत म्हणून त्याच्यावर संशोधन करणे अधिक योग्य ठरेल. ज्या लेखकाची आपण निवड केली त्याच्याबद्दल नवीन काही सांगणे मोलाचे ठरणार आहे काय? तितका तो लेखक महत्त्वाचा आहे काय? याच ठिकाणी संशोधकावर आपल्या लेखकावरील आधीची समीक्षा वाचण्याची वेळ येते. त्यामुळे सोपा मार्ग म्हणून ज्याच्यावर फार कमी लिहिले गेले आहे, असा लेखक निवडावा की काय, असा विचार संशोधकाच्या मनात येतो. अत्यंत उपेक्षित किंवा अगदीच नवा असा लेखक त्यामुळे काही संशोधक निवडतात. हा मोह टाळणे हे संशोधकास केव्हाही उपकारकच ठरेल. अशा उपेक्षित किंवा नवखा लेखक निवडून पदवी पदरात पाडून घेणे हे स्वार्थीपणाचेच होईल. मात्र या ठिकाणी हे आवर्जून सांगावेसे वाटते की, उपेक्षित लेखक हा नि:संशय थोर आहे याची संशोधकास खातरी असेल, तर त्याने निश्चितपणे आपल्या संशोधनाद्वारे त्याच्या स्थानावर प्रकाश टाकला पाहिजे. उदाहणार्थ - राजन गवस या कादंबरीकारावर फारसे संशोधन झालेले नाही. परंतु काही संशोधकांना हे चांगले आाव्हान वाटू शकेल. दुसरे उदाहरण वसंत आबाजी डहाके या लेखकाचे देता येईल. अर्थातच वर म्हटल्याप्रमाणे अशा परिस्थितीत संशोधकावर मोठीच जबाबदारी येते आणि म्हणूनच असा विषय निवडण्याआधी संशोधकाने स्वत:चीच पुन्हा पुन्हा खातरी करून घ्यायला हवी.

सारांश, आपण निवडलेल्या लेखकाबाबत आपल्याला नवीन काही सांगता येईल, असा विश्वास निर्माण झाल्याखेरीज लेखक निवडणे म्हणजे संशोधनाच्या मूळ गाभ्यालाच धोका निर्माण करण्यासारखे आहे.

### (४) इतर काही तत्त्वे

एखाद्या सुप्रतिष्ठित लेखकाचे खरे स्थान संशोधनाद्वारे आपण उघड करू शकतो काय ? उदाहरणार्थ, नाटककार हा लेखक म्हणून निवडताना त्याच्या नाटकांचे प्रयोग संशोधकाने बघितले असले पाहिजेत किंवा ते बघता येतील याची खात्री त्याला असणे आवश्यक आहे. विजय तेंडूलकर किंवा गिरीश कर्नाड हे नाटककार निवडताना काळजी घेणे जरुरीचे आहे.

संशोधकला येत नसलेल्या भाषेतील लेखकाच्या साहित्याचा अभ्यास (भाषांतराच्या साहाय्याने) करता येईल की नाही, याबद्दल मत-मतांतरे आढळतात.

भाषांतर होत असताना वाङ्मयाचे स्वरूप थोड्या प्रमाणात तरी बदलते आणि त्यामुळे संशोधन करताना भाषांतरावर विसंबून राहणे अयोग्य आहे, असे म्हटले जाते. बऱ्याच प्रमाणात हे मत पटणारे आहे. कन्नड भाषा येत नसताना त्या भाषेतील साहित्याचा अभ्यास मराठी भाषांतरावरून करणे चुकीचेच ठरेल. त्यामुळे जी भाषा संशोधकाला येत नाही, त्या भाषेतील साहित्य अभ्यासार्थ न निवडणेच उचित.

**(५) लेखक - अभ्यासाच्या दोन पद्धती**

लेखक-अभ्यासाच्या पद्धतींचा विचार करीत असताना प्रचलित काळात ग्रंथ लेखनासाठी केला जाणारा अभ्यास आणि संशोधनासाठी केला जाणारा अभ्यास असे दोन प्रकार संभवतात. मराठीतील पुस्तकांमध्ये लेखकाचे थोडक्यात चरित्र, त्यांच्या वाङ्मयाच्या स्वरूपाची ओळख आणि त्याच्या प्रमुख कलाकृतींचे सविस्तर विश्लेषण यांचा समावेश केला जातो. थोडक्यात म्हणजे

''व्यक्ती आणि वाङ्मय'' या पद्धतीचे ग्रंथ या मालेत समाविष्ट होतात. परंतु लेखक-अभ्यासाची ही पद्धती आता जवळजवळ कालबाह्य ठरली आहे असे म्हणणे चुकीचे होणार नाही.

वरील प्रकारच्या लेखक-ग्रंथ-अभ्यासात नवीन काही सांगणे हा उद्देश असतोच असे नाही. बहुधा विविध समीक्षकांनी घेतलेले विविध दृष्टिकोण एकत्रित स्वरूपात देणे हेच अशा ग्रंथामागचे मुख्य सूत्र असते. संशोधनासाठी केला जाणारा लेखकाचा अभ्यास हा मात्र संशोधकाच्या सर्जनशीलतेच्या पायावरच आधारलेला असतो. हा पाया जितका भक्कम, तितके संशोधन अधिक जोरकस आणि हा पाया जितका ठिसूळ तितकी संशोधनकृती ही कमकुवत असल्याचे आढळून येते. प्रस्तुत लेखातील विवेचन हे बहुतांशी संशोधनासाठी केलेल्या अभ्यासासच लागू पडते. संशोधनासाठी केलेल्या अभ्यासामध्ये (Thesis form) विवेचनासाठी एखादे सूत्र किंवा एखादा विचार हा आधारभूत असतो. प्रबंधातील संपूर्ण विवेचन हे ह्या सूत्राच्या पुष्ट्यर्थ, ते सूत्र सिद्ध करण्यासाठी किंवा अधिक स्पष्ट करण्यासाठी केलेले असते. अस्सल संशोधनकृतीत माहितीवजा चर्चेस किंवा मान्यताप्राप्त दृष्टिकोणास विवेचनाच्या भागात फारसे महत्त्व दिले जात नाही. अशी माहिती ही गृहीत धरली जाते. अशा रीतीची माहिती हे संशोधकाचे केवळ माध्यम असते. ह्या उलट वरील परिच्छेदात उल्लेखिलेल्या ग्रंथमालांमध्ये अशी माहिती देणे हाच उद्देश असतो. अर्थातच अनेक संशोधन प्रबंधात पाने वाढविण्यासाठी माहितीवजा मजकूर (Padding) अनावश्यक रीतीने वापरला जातो. अनेक

संशोधन प्रबंधात माहितीवजा मजकूर हा संशोधित किंवा सर्जनशील अशा मजकुरापेक्षा जास्त असतो. अर्थातच हे खऱ्या संशोधकाचे लक्षण नव्हे. तात्पर्य, अस्सल संशोधन हे माहितीवजा विवेचन अनावश्यक समजून त्यास संपूर्णपणे फाटा देते आणि आपण शोधून काढलेले सूत्र योग्यरित्या मांडण्यासाठीच प्रबंधाचा वापर करते.

**(६) लेखक- अभ्यासाकडे बघण्याचे विविध दृष्टिकोण**

संशोधनासाठी केलेल्या लेखकाच्या अभ्यासाबाबत अधिक विचार करताना लेखक अभ्यासाच्या विविध बाजू (aspects) ध्यानात घ्याव्या लागतात. लेखकाची निवड झाल्यानंतर त्या लेखकाचा अभ्यास कुठल्या दृष्टिकोणातून करावयाचा हेही निश्चित करणे जरुरीचे असते. एखाद्या विशिष्ट काळात सामाजिक दृष्टिकोणातून केल्या जाणाऱ्या अभ्यासास लोकमान्यता मिळते म्हणून तो दृष्टिकोण स्वीकारणे योग्य होणार नाही. तसेच एखाद्या लेखकाच्या आयुष्याबद्दल आपल्याला जवळून माहिती आहे म्हणून चरित्रात्मक दृष्टिकोण स्वीकारणे हेही चुकीचे ठरेल. संशोधकाने ह्यासंबंधीची निवड ही आपला स्वत:चा कल, कुवत आणि मुख्य म्हणजे आपण निवडलेल्या लेखकाच्या वाङ्मयाचे स्वरूप ह्या गोष्टी विचारात घेऊन काळजीपूर्वक करावयास हवी. ह्यानंतर आपण ह्या विविध बाजूंबद्दल थोडक्यात चर्चा करू.

**अ. लेखकाचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून अभ्यास :**

सर्वसाधारपणे चांगला लेखक हा त्याच्या काळाशी कधीही अप्रामाणिक नसतो. लेखक आणि त्याचा काळ ह्यांच्यातले हे अन्योन्य नाते स्पष्ट करणारा अभ्यास हा नेहमीच महत्त्वाचा असतो. अर्थात ह्या ठिकाणी हेही नमूद करावयास हवे की, अशा प्रकारच्या दृष्टिकोणास अवास्तव महत्त्व दिल्यास काळाच्या मर्यादा ओलांडून पलीकडे झेप घेणाऱ्या थोर लेखकांच्या प्रतिमेवर अन्याय होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांचे त्यांच्या काळाशी नाते जोडणारा अभ्यास हा काही बाबतीत उपयोगी ठरेल. परंतु याच वेळी सात शतकांनंतर ज्ञानेश्वरांचे कायम असलेले महत्त्व विसरून चालणार नाही.

**ब. समाजशास्त्रीय दृष्टिकोण :**

कलाकृती ज्याप्रमाणे एखाद्या काळाचे अपत्य असते, त्याचप्रमाणे ती विशिष्ट समाजाचे व वातावरणाचे अपत्य असते. वातावरण व समाज ह्यांच्या लेखकाच्या वाङ्मयीन होणाऱ्या परिणामाचे विवेचन करणारा अभ्यास हादेखील संशोधनात्मक लेखक-अभ्यासात समाविष्ट होतो. या प्रकारच्या दृष्टिकोणाचा प्रभाव मार्क्स आणि एंगल्स यांच्या विचारसरणीमुळे विसाव्या शतकावर

बऱ्याच प्रमाणात पडला आहे. ह्या दृष्टिकोणातून केलेले मूल्यमापन हे लेखकाच्या काळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी बाबींचा विचार करून केलेले असते.

ह्यातूनच सामाजिक बांधीलकीचा वादग्रस्त प्रश्न निर्माण होतो. सामाजिक संदर्भापासून वाङ्मय संपूर्णपणे वेगळे करणारा विचारप्रवाह आणि सामाजिक बांधीलकी ह्या एकमेव दृष्टिकोणातून वाङ्मयाकडे बघणारा विचारप्रवाह ह्या दोहोंचा समतोल साधणे हे बहुतेक वेळा कठीण काम होऊन बसते. हा दृष्टिकोण कितपत स्वीकारावा ह्या प्रश्नाचे उत्तर संशोधकाने निवडलेल्या लेखकाचा पिंड कोणत्या प्रकारचा आहे, त्यावर अवलंबून असते. म्हणूनच हा दृष्टिकोण स्वीकारताना लेखकाच्या वाङ्मयकृतीचा त्या दृष्टीने काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक असते.

**क. लेखकाने मांडलेल्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यास :**

वास्तविक पाहता कलावंत आणि तत्त्वज्ञानी ही दोन्हीही अत्यंत परस्परभिन्न अशी व्यक्तिमत्त्वे आहेत. काही विशिष्ट अपवाद वगळता कलावंत आपल्या कलाकृतीतून कुठलेही मूर्त स्वरूपाचे तत्त्वज्ञान मांडताना आढळत नाही. (तत्त्वज्ञान याचा अर्थ- सुसंगत तत्त्वांच्या संचाची सुसूत्रपणे केलेली मांडणी असा येथे गृहीत धरला आहे.) मात्र तरीही चांगल्या कलाकृतीत कथानक, पात्रे यासारख्या घटकांइतकाच लेखकाचा जीवनाबद्दल दृष्टिकोण हाही महत्त्वाचा घटक असतो. अशा रीतीच्या कल्पनांचा किंवा विचारांचा अभ्यास हा खऱ्या संशोधकाच्या बुद्धीला आव्हान देऊ शकतो. ह्या ठिकाणी हे गृहीत धरले आहे की, लेखकाची एक कृती ही दुसऱ्या कृतीपेक्षा वेगळी असली, तरीही त्या दोहोत काही सर्वसाधारण सूत्र आढळते. उदाहरणार्थ, जयवंत दळवी यांच्या अनेक कादंबऱ्यातून वेड ही मानसिक अवस्था व कामप्रवृत्ती यांचा शोध घेतलेला आढळतो.

**ड. तुलनात्मक अभ्यास :**

दोन लेखकांमधील समान गुणधर्म शोधून तौलनिक विचार मांडणे हाही लेखक-अभ्यासाचा एक प्रकार आहे. तुलनात्मक अभ्यासासाठी लेखक निवडताना ते कुठले निवडावे यासंबंधी काळजी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ, विजय तेंडूलकर आणि गिरीश कर्नाड यांचा तुलनात्मक अभ्यास हा उचित ठरेल. कारण दोघेही समकालीन, समदेशीय, अस्तित्ववादी विचारवंत आहेत. परंतु बऱ्याचदा असे दिसते की, तौलनिक विचार हा संशोधनासाठी सोयीचा असल्याने कमी श्रमात संशोधन-पद्धती मिळविण्यासाठी तुलनात्मक अभ्यास स्वीकारला जातो. उदाहरणार्थ मराठी, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड, गुजराती इ.

भाषेतील लेखक व कवी यांची तुलना. अशा रीतीच्या संशोधनामध्ये एखादाच साधर्म्याचा दुवा शोधून त्यावर दूरान्वित (far stretched) संकल्पनांचा थर दिला जातो आणि त्यावर संशोधनाचा डोलारा उभा राहतो.

**इ. लेखकाच्या चरित्राचा अभ्यास :**

लेखकाचे वाङ्मय व त्याचे चरित्र यांतील संबंध शोधणारा अभ्यास हाही संशोधन पद्धतीतील रूढ प्रकार आहे. लेखकाबद्दलच्या आठवणी, त्याने लिहिलेली पत्रे, आत्मचरित्रात्मक लेखन इत्यादी स्वरूपाची सामग्री ही संशोधकाची साधनसामग्री असते. सर्व प्रकारचे वाङ्मय हे मुळात 'वैयक्तिक' अनुभवांतून सुरू होते आणि त्यामुळे लेखकाच्या वाङ्मयाचा त्याच्या चरित्राशी घनिष्ठ संबंध असतो हे खरे आहे. दुसरे असे की, आपल्या आवडत्या लेखकाच्या चरित्राबद्दल अनेक वाचकांना कुतूहल असते. इतर क्षेत्रांतील थोर व्यक्तिमत्त्वाच्या चरित्रात जसा आपल्याला रस असतो, तसाच तो वाङ्मयीन क्षेत्रातील थोर व्यक्तींच्या चरित्रातही असतो.

परंतु या ठिकाणी उदभवणारा मुख्य प्रश्न म्हणजे हा अभ्यास वाङ्मयीन ठरेल काय? वर म्हटल्याप्रमाणे सामाजिक दृष्टिकोण, ऐतिहासिक दृष्टिकोण इ. वाङ्मयावर अधिक प्रकाश टाकण्यास केव्हाही उपयुक्त ठरतात. परंतु लेखकाच्या चरित्राचा अभ्यास करून त्याच्या वाङ्मयाची जाण वाढते काय? आणि जरी ती वाढत असली, तरी ती वाङ्मयीन पद्धत होईल काय? लेखकाच्या चरित्रातील कुठला मुद्दा याबाबत उपयोगी पडेल आणि कितपत हे कळणे अत्यंत कठीण आहे. आपल्याला दुर्लक्षणीय वाटलेली एखादी गोष्ट त्याच्या आयुष्यात अत्यंत महत्त्वाची असेल आणि या उलट त्याच्या आयुष्यातील यातना, दु:खे आणि खडतर जगणे यांचा त्याच्या वाङ्मयाशी काहीही संबंध नसेल. लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व हे त्याच्या लौकिक व्यक्तिमत्त्वापेक्षा वेगळे असते, हे मानणारा कोणीही समीक्षक हे मान्य करील की, लेखकाचा चरित्रात्मक अभ्यास हा वाङ्मयीन दृष्टिकोणातून करणे म्हणजे केवळ अनुमानांवर आधारलेल्या तर्काचा आधार घेऊन संशोधनाचा शास्त्रशुद्ध पाया झिडकारणे आहे.

**(७) निष्कर्ष :**

लेखकाचा अभ्यास एक प्रकारे त्याच्या मनाचा, समग्र व साकल्याने वाङ्मयीन जीवन प्रवासाचा- व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा शोध असतो. अर्थात हा शोध अनिवार्य असतो आणि अर्थात महत्त्वाचे म्हणजे हा शोध प्रवास कधी संपत नाही. सर्वसाधारणपणे पुढील निष्कर्षांच्या साहाय्याने लेखकाच्या अभ्यासाची चौकट आखणे शक्य आहे.

१) एकाच लेखकाचे साफल्याने वाङ्मयीन संदर्भात आकलन.

- लेखकाची जडणघडण (व्यक्तिमत्त्वाची व विकासक्रमाची)
- वाङ्मयीन व अन्य संस्कार (पूर्व व समकालीन परंपरा)
- निर्मिती प्रेरणा-प्रकियांचा शोध
- विशिष्ट वाङ्मयप्रकारातील साहित्यकृतीच्या संदर्भात लेखनाचा अभ्यास करणे.

२) लेखकाचा काल व कृती यांतील संबंध-शोध आणि त्याद्वारे लेखनातील कालतत्त्व व चिरंतनतत्त्व यांचा शोध घेणे.

३) लेखकाचा साहित्यकृतीचा निर्मितीक्रम लक्षात घेऊन लेखन प्रगतीचा आलेख तयार करणे.

४) त्याने हाताळलेले विविध वाङ्मयप्रकार लक्षात घेऊन त्या त्या वाङ्मयप्रकारातील लेखकांच्या श्रेयाचा विचार करणे

५) लेखन कृतीत लेखकाच्या जीवननिष्ठांचा ठसा कितपत आहे आणि त्यामुळे त्यांचे कोणते परिणाम

लेखनकृतीत दिसतात, हे लक्षात घेऊन कोणते लेखनविशेष निर्माण झाले त्याचा शोध घेणे.

६) संबंधित साहित्यप्रकारात लेखकाचे ध्येय काय आणि मराठी साहित्यात त्याने कोणती भर घातली याची चिकित्सा करणे.

७) निरनिराळया वाङ्मयकृतीतून लेखकाच्या श्रेयाचे तौलनिक चित्र स्पष्ट करणे.

**समारोप :**

लेखकाचा वाङ्मयीन अभ्यास करताना लेखकाची निवड ही महत्त्वाची असते. ती करताना आपल्या आवडीबरोबरच इतर गोष्टींचाही विचार अभ्यासकाने करावयास हवा. लेखक निवडल्यानंतर त्याच्या वाङ्मयाकडे बघण्याचा दृष्टिकोण लेखकाच्या वाङ्मयाची प्रकृती बघून निश्चित करावा आणि त्यानंतर कुठल्याही तऱ्हेचा सोपा मार्ग न स्वीकारता, कठोरपणे व परिश्रमपूर्वक संशोधनास शास्त्रशुद्ध पाया देणे, हेच खऱ्या संशोधकाचे कार्य मानणे आवश्यक आहे.

❀❀❀

# भाषिक संशोधन

प्रा. डॉ. विजया पाटील

**संशोधनाची संकल्पना / स्वरूप :**

संशोधन हा शब्द इंग्रजीतील Research या शब्दासाठी प्रतिशब्द आहे. Re म्हणजे पुन्हा आणि search म्हणजे शोध घेणे, पुन्हा पुन्हा शोध घेणे किंवा झालेल्या संशोधनावर पुन्हा पुन्हा संशोधन करून नवीन तथ्य, नवीन सत्य आणि नवीन वस्तुस्थिती अभ्यासणे म्हणजे संशोधन होय. Research म्हणजे उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे वस्तुनिष्ठ पद्धतीने परीक्षण करणे किंवा नवीन ज्ञान प्राप्त करणे, संपादन करणे होय. नवीन तत्त्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तत्त्वे किंवा तथ्यांच्या परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास म्हणजे संशोधन होय. संशोधन हे नवीन ज्ञानाचे संपादन करणे तसेच जुन्या ज्ञानाचे परीक्षण करण्यासाठी केले जाते. संशोधन ही सतत चालणारी बौद्धिक प्रक्रिया आहे. सत्य शोधून काढणे आणि त्याद्वारे निर्णय घेणे हे बौद्धिक प्रक्रियेचे अंगभूत लक्षण समजले जाते.

सर्वसामान्य भाषेमध्ये ज्ञानाचा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. एखाद्या विषयासंबंधीची समर्पक माहिती गोळा करण्यासाठी जे पद्धतशीर आणि शास्त्रशुद्ध अन्वेषण केले जाते त्याला संशोधन म्हणतात. शास्त्रीय शोधांची कला म्हणजे संशोधन होय. संशोधन ही एक विद्याविषयक कृती आहे. संशोधन प्रक्रियेचा पाया व्यक्तीची जिज्ञासू वृत्ती हा असतो. मनुष्य हा स्वभावत:च जिज्ञासू आहे. जेव्हा एखादी अपरिचित अज्ञात अशी वस्तू, गोष्ट व्यक्तीच्या नजरेस पडते तेव्हा तिला त्याबद्दल उत्सुकता वाटते. जिज्ञासा ही सर्व ज्ञानाची जननी आहे. आणि ज्ञान मिळविण्याची पद्धत म्हणजे संशोधन होय. उपलब्ध ज्ञानामध्ये मूलभूत योगदान करून ते अधिक समृद्ध, संपन्न केले जाते. अध्ययन, निरीक्षण, तुलना आणि प्रयोग यांच्या मदतीने सत्याचा मागोवा संशोधनाद्वारे घेतला जातो. शास्त्रीय पद्धतींचा उपयोग करून उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रमुख उद्देश कोणत्याही संशोधनामागे असतो. अदयापही ज्ञात नसलेले, अप्रकट, लुप्त सत्य शोधून काढणे हा संशोधनाचा हेतू असतो.

**संशोधनाची उदिष्ट्ये :**

१. अन्वेषणात्मक किंवा सूत्रीकरणात्मक संशोधन - एखाद्या घटनेचा परिचय करून घेणे किंवा त्याविषयी नवीन माहितीचा शोध लावणे.

२. वर्णनात्मक संशोधन - एखादी व्यक्ती परिस्थिती अथवा समूह यांच्या गुण वैशिष्ट्याबाबत अचूक चित्रण करणे म्हणजे वर्णन करणे.

३. निदानात्मक संशोधन - या प्रकारच्या संशोधनात एखादी घटना किती वेळा घडते किंवा तिचा अन्य एखाद्या गोष्टीशी संबंध आहे काय? याचा शोध घेतला जातो.

४. उपसिद्धांत अथवा अभ्युपगम (गृहीतकृत्य) तपासणी - यामध्ये दोन गोष्टींमध्ये काय संबंध आहे हे तपासले जाते.

**संशोधनाची सर्वसामान्य वैशिष्ट्ये :**

१) संशोधन म्हणजे नवीन ज्ञान किंवा माहिती मिळविणे. तिचा प्रामुख्याने पायाभूत माहिती म्हणून उपयोग करणे. ही माहिती किंवा हे ज्ञान अंत्यंत विश्वसनीय अशा साधनांपासून मिळवलेले असणे.

२) संशोधनात अतिशय पद्धतशीर, बिनचूक व तज्ज्ञतेवर आधारलेली सूक्ष्म पाहणी अपेक्षित असते.

३) संशोधनात तर्कशुद्धता, वस्तुनिष्ठता ह्या गोष्टी अंतिम महत्त्वाच्या आहेत.

संशोधन ही एक प्रवृत्ती असून ती कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित नसते. तिने जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहेत. संशोधन हे जीवनाच्या सर्व क्षेत्रांचा कणा झालेले आहे. म्हणूनच विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी एक प्रकारची संशोधन मनस्कता असावयास हवी.

ज्ञानाच्या शाखेतील बदलाबरोबर संशोधनाचे स्वरूपही बदलते. आजच्या ज्ञानशाखांचे वर्गीकरण सामान्यत: पहिली ज्ञान शाखा विज्ञान शास्त्रांची, दुसरी मोठी ज्ञानशाखा सामाजिक शास्त्रांची आणि व्यक्तिगत भावना, विचार, तत्त्वज्ञान, आविष्कार इ. ना प्राधान्य असणाऱ्या साहित्य - कला-तत्त्वज्ञानाची तिसरी ज्ञानशाखा असे करता येते. ही सारी शास्त्रे आज बरीच विकसित झालेली आहेत. व प्रत्येकात नव्या नव्या संशोधनाची भर पडत आहे. प्रत्येक क्षेत्रातील संशोधनाचे स्वरूप जरी भिन्न असले तरी त्यामागील वृत्ती वा भूमिका ही समान आहे.

**साहित्य - कलाक्षेत्र व संशोधन :**

संशोधनाचे तिसरे क्षेत्र म्हणजे कलांचे व वाङ्मयाचे क्षेत्र होय. मानवी जीवनात वाङ्मयाचे व कलेचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी मनाचा, विचारांचा , भावनांचा, आत्म्याचा आविष्कार म्हणून वाङमय व कला

निर्माण झालेल्या आहेत. मानवी मनाची धारणा, विचारांचे स्वरूप, संवेदनात्मकतेची जाणीव व मानवी आत्म्याला लागलेल्या कळा ह्या जितक्या सामाजिक आहेत तितक्याच त्या व्यक्तिगतही आहेत. त्यांच्यातील व्यक्तिगतता, सामाजिकता व सार्वत्रिकता सर्वकाळ चिंतनाचा चर्चेचा, विवेचनाचा विषय राहणार आहेत. ह्या क्षेत्रातील गूढता व अगम्यता सर्जनशीलतेने निर्माण होते. भाषिक व साहित्यिक संशोधन हा प्रामुख्याने विद्यापीठांच्याच कक्षेतील विषय आहे.

साहित्यक्षेत्रीय संशोधनाची मूलभूत भूमिका ही इतर क्षेत्रीय म्हणजे वैज्ञानिक व सामाजिकशास्त्रांच्या क्षेत्रांतील संशोधना प्रमाणेच आहे. कोणतातरी एखादा प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे. ही गोष्ट सर्वच संशोधनात समान आहे. वाङमयीन संशोधनात ग्रंथालयाचे स्थान अत्यंत मोलाचे आहे. एखादा विषय निवडल्यानंतर अनुषंगाने मिळवण्याची माहिती प्रामुख्याने ग्रंथांद्वारे मिळवावी लागते. साहित्य क्षेत्रीय संशोधनाचे स्वरूप पाहण्यापूर्वी साहित्याचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक आहे. साहित्य ही लेखकांच्या दृष्टीने केवळ अभिव्यक्ती व रसिकांच्या दृष्टीने जरी केवळ कला असली तरी, साहित्य हा एक अत्यंत महत्त्वाचा व विश्वसनीय असा सामाजिक दस्तऐवज आहे. त्याप्रमाणे साहित्याचे अत्यंत लक्षणीय वैशिष्ट्य असे की वाङ्मय हे संस्कृतिरूप आहे. मानवी संस्कृती ही साहित्य व कला यांच्या रूपाने माध्यमाने साकार होते व त्या स्वरूपातच टिकून राहते. त्यामुळे कोणत्याही देशाच्या संस्कृतीचा विचार करताना त्या देशातील वाङ्मय, कला यांचाच आधार प्रामुख्याने घ्यावा लागतो.

साहित्य हे सामाजिक परिस्थितीतून निर्माण होत असले तरी त्या जीवनाला विशेष प्रकारची संपन्नता ते प्राप्त करून देते. साहित्याचा संबंध मानवी भावना विश्वाशी असतो. मानवाचे भावना विश्व समृद्ध करणे हे साहित्याचे महत्त्वाचे कार्य असते. हे लेखकाच्या व्यक्तिगत अनुभवातून साकार होत असते. ह्या अनुभवांचे स्वरूप बहुविध प्रकारचे असते. कधी वैचारिकता, कधी भावना, संस्कार तर कधी कलात्मक जाणीव प्रभावी असते. साहित्याच्या ह्या वैशिष्ट्यामुळे त्याचे संशोधन अधिकाधिक गुंतागुतीचे होत जाते. मानवी भावनांचा संबंध असल्याने गुंतागुंत अधिक असते.

**भाषिक संशोधन :**

साहित्य हे खऱ्या अर्थाने वाङ्मय म्हणजे भाषा रूप असते. भाषा ही एक अतिशय महत्त्वाची मानवी संस्था आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर ती उत्क्रांत झालेली आहे. साहित्याचे माध्यम जे ग्रंथ ते

भाषारूप असतात. भाषा ही अतिशय गूढ अशी मानवी निर्मिती आहे. ती सामाजिक निर्मिती व ठेव आहे. संस्कृतीचे वाहन हेच आहे. ह्या भाषेचा अभ्यास हा एक चिरंतन महत्त्वाचा असा वाङ्मयीन संशोधनाचा विषय आहे. वाङ्मयाच्या संशोधनात प्राचीन ग्रंथाभ्यासाच्या खालोखाल भाषाभ्यासाला महत्त्व आहे. भाषाभ्यासामध्ये अनेक विषय येतात. भाषेच्या स्वरूपाविषयी तात्त्विक स्वरूपाचे संशोधन करणे विशिष्ट ग्रंथातील व विशिष्ट कालातील भाषा व तिचे स्वरूप पाहणे भाषेबरोबर व्याकरणाचा अभ्यास करणे प्रामुख्याने असे विषय सांगितले जातात. साहित्य हे शब्दांचे बनलेले असते, भाषा ही शब्दांची बनलेली असते. त्यामुळे वाङ्मयीन संशोधनात भाषाविषयक अभ्यासाला प्राधान्य मिळावे हे स्वाभाविक आहे. शब्दामागे काहीतरी विशेष सांगण्याचा व्यक्त करण्याचा नवनिर्मिती करण्याचा, अनुभवांना धार देण्याचा उद्देश असतो.

भाषा ही माणसाचे सर्व जीवन व्यापून टाकणारी संस्था असल्यामुळे तिच्या अभ्यासाचे क्षेत्र फार व्यापक आहे. मानवी जीवन जेवढेगूढ, गुंतागुंतीचे आहे तेवढीच भाषा पण गूढ गुंतागुंतीची आहे. त्यामुळे ती अभ्यासकांसमोर नित्य नवी आव्हाने उभी करत राहिलेली आहे. भाषेच्या अभ्यासाला खूप मोठी परंपरा असली तरी गेल्या तीन शतकांमध्ये त्या अभ्यासाने घेतलेली गती आणि झेप लक्षणीय आहे. सध्या भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात जे विविध प्रकारचे संशोधन चालू आहे त्याचे दोन विभागात वर्गीकरण केले जाते. स्थूलमानाने १. सूक्ष्म भाषाविज्ञान आणि २. स्थूल भाषाविज्ञान या आजच्या भाषाविज्ञानाच्या विस्तारात पुढील क्षेत्रे विशेषत्वाने नजरेस पडतात.

१. १९ व्या शतकाच्या वारशाने आलेले ऐतिहासिक भाषाविज्ञान
२. भाषेचे स्वरूप व अंतर्गत संरचना यांचा विचार करणारे वर्णनात्मक भाषाविज्ञान
३. समाजविज्ञान, मनोविज्ञान, मानववंशविज्ञान यांच्या सहकार्याने भाषिक प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या जोड अभ्यास शाखा
४. भाषेचा गणिती पद्धतीने विचार करणारी तांत्रिक शाखा
५. उपयोजित भाषा विज्ञानांतर्गत येणाऱ्या विविध शाखा

ही अभ्यास क्षेत्रे ढोबळ मानाने सांगता येतात. त्यांचे एकमेकांत संमिश्रण असते. भाषांच्या तौलनिक अभ्यासातून त्यांच्या इतिहासाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणारी भाषाविज्ञानाची शाखा म्हणजे ऐतिहासिक भाषाविज्ञान होय. ब्लूमफील्ड, चॉम्स्की यांनी भाषेच्या वर्णनाची उपपत्ती मांडली. १९६० नंतर भाषेच्या सामाजिक संदर्भाचा विचार करणाऱ्या समाजभाषाविज्ञान या एका स्वतंत्र अभ्यास शाखेचा उदय झाला.

समाजभाषाविज्ञान हे समाजात वापरल्या जाणाऱ्या भाषाभेदांचा अभ्यास करते. कोणताही समाज एकसंध भाषा वापरत नाही. त्यामध्ये अनेक बोली असतात. एका भाषेच्या क्षेत्रात बोलींचे निरनिराळ्या स्तरांवरून अनेक प्रकार आढळतात. त्याप्रमाणेच अन्य भाषांच्या संपर्कातून निर्माण झालेले संमिश्र भाषा प्रकारही आढळतात. समाजात अनंत प्रकारचे भाषाभेद आढळतात. समाजाप्रमाणेच व्यक्तींची भाषा देखील एकसंध कधीच नसते. व्यक्ती समाज घटक म्हणून वावरत असताना निरनिराळ्या भूमिका वठवत असते. अनेक भिन्न समाज मिळून राष्ट्र तयार होते. त्यातही अनेक भाषा आढळतात. निरनिराळया स्तरांवरील या सगळ्या बोलीभेदांचा व भाषाभेदांचा समाजभाषाविज्ञानात अभ्यास होत असतो.

संरचनावादी पद्धतीने नवीन भाषेचा अथवा बोलीचा अभ्यास करताना सर्वेक्षणाच्या मदतीने सामग्री गोळा केली जाते. या सामग्रीच्या साहाय्याने भाषेचे एक स्थिर, आदर्श व्याकरण तयार करण्यात येते. त्यासाठी गोळा केलेल्या प्रत्यक्ष उच्चारण सामग्रीला गौण ठरवून त्यामागची आदर्श, अमूर्त व्याकरण पद्धती शोधून काढणे हेच या प्रकारच्या अभ्यासाचे वैशिष्ट्य असते पण समाजभाषा विज्ञानाच्या अभ्यासकाला भाषाभेदांचीच नोंद करावयाची असल्याने संबंध समाज हाच त्याचा निवेदक असतो. समाजभाषाविज्ञानात प्रत्यक्ष भाषण व्यवहाराचा अभ्यास करायचा असल्याने अभ्यासक समाजातील निरनिराळ्या क्षेत्रांत फिरून निरनिराळ्या प्रसंगांचे प्रत्यक्ष भाषण व्यवहार टिपत असतो. समाजातील विविध भाषाभेदांची प्रत्यक्ष स्वाभाविक नोंद घेण्यावर त्याचा भर असतो. समाजाचे प्रतिनिधित्व होईल अशा समाजातल्या विविध स्तरांवरील निवेदकांची निवड करून ध्वनिव्यवस्था, वाक्यरचना, शब्दरचना या अंगांकडे लक्ष दिले जाते. भाषाभ्यासाचे हे क्षेत्र खूप व्यापक आहे. त्यामुळे आज त्यासंबंधी जे संशोधन चालू आहे त्यात खूप विविधता आहे असे दिसते. या संशोधनाचा लाभ घेऊ न आज ज्या अनेक बोली भाषा लुप्त पावत आहेत लयाला जात आहेत त्यांचा अभ्यास करायला मोठे क्षेत्र उपलब्ध आहे. काही बोली उदा.- नंदुरबार सारख्या आदिवासी बहुल भागात मावची, पावरी, भिल्ली, कोकणी, गुजराऊ, आदिवासी या बोली फारशा कुणाला माहीत नाहीत. या भाषांच्या संशोधनाचे अभ्यासाचे मोठे क्षेत्र अभ्यासकांसाठी खुले आहे. त्यात काम करण्याची गरज आहे.

❀❀❀

# एक लेखक : शोध आणि बोध

**प्रा. राजेश्वर दुडूकनाळे**

साहित्य हा मानवी मनाचा सहजसुंदर आविष्कार असतो. 'अभिव्यक्त' होणे ही प्रत्येक माणसाची मूलभूत गरज असते. त्याच्या या 'अभिव्यक्ती' ला जेव्हा कलात्मक दर्जा प्राप्त होतो तेव्हा ती 'अभिव्यक्ती' साहित्याचे रूप धारण करून रसिकांसमोर येते. संवेदनशील कलावंत आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितीचे अवलोकन, निरीक्षण करीत असतो. त्यातूनच त्याच्या जीवनविषयक जाणिवा समृद्ध होत असतात. अर्थातच कलावंताच्या आत्मचिंतनातून मानवी जीवनाच्या विविध पैलूंना शब्दरूप प्राप्त होते. अशा शब्दरूप साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवाच्या विविध रूपांचा अन्वयार्थ लावणे, त्या अनुभवाची कलात्मक उंची स्पष्ट करून मर्यादा नोंदवणे हा संशोधनाचा एक प्रमुख हेतू असतो.

**संशोधनाचा अर्थ :**

'संशोधन' ही एक व्यापक अशी संकल्पना आहे. मानवी जीवनाच्या विविध रूपांना कवेत घेण्याची क्षमता संशोधन या संकल्पनेमध्ये आहे. समाजजीवनाला अनेक अंगांनी गतिमान, कार्यक्षम बनविण्यात संशोधन प्रक्रियेचा खूप मोठा वाटा आहे.

इंग्रजीतील 'Research' ह्या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून मराठीत 'संशोधन' हा शब्द वापरला जातो. संशोधनाचा अर्थ सांगताना श्री. वसंत जोशी म्हणतात. ''शोधन आणि संशोधन हे search आणि research ह्या शब्दाचे पर्यायी शब्द आहेत. अज्ञानाचा शोध (search) आणि ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन (Research) हे अर्थ त्यात अपेक्षित आहेत.''[१]

ज्ञात माहितीचे किंवा उपलब्ध ज्ञानाचे पुनर्मूल्यांकन संशोधनामध्ये अपेक्षित असते.

'संशोधन' या शब्दाचा मूळ अर्थ सांगताना श्री व. दि. कुलकर्णी म्हणतात. संशोधन या शब्दाचा धात्वर्थ पाहिला तर तो आजच्या रूढार्थाहून वेगळा आहे. 'सं + शुध्' म्हणजे संपूर्णपणे सर्वांगांनी शुद्ध करणे, दोष

काढून टाकून चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध, निर्मळ करणे असा हा मूलार्थ.[२]

अलीकडच्या काळात 'संशोधन' या शब्दाचा अर्थ 'शोध घेणे', 'नवे उपलब्ध करून देणे' असा घेतला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. एखाद्या गोष्टीची चिकित्सा करणे, ती तपासून घेणे ही मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. ह्या प्रवृत्तीचा शास्त्रशुद्ध पद्धतीने विकास घडवून आणणे म्हणजे संशोधनकला होय.

**संशोधनाची व्यापकता :**

समाज जीवनाच्या विविध अंगांना सामावून घेण्याचे सामर्थ्य संशोधन क्षेत्रामध्ये आहे. साहित्य - कला - संस्कृती, विज्ञान-तंत्रज्ञान, धर्म, शिक्षण, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, राजकारण-समाजकारण अशा विविध क्षेत्रांमध्ये होणाऱ्या आमूलाग्र बदलाची - परिवर्तनाची नोंद संशोधन शास्त्रात घेतली जाते. संशोधनाची ही व्यापकता लक्षात घेऊन श्री वसंत जोशी यांनी संशोधनाचे प्रमुख तीन प्रकार सांगितले आहेत. संशोधनाचा हेतू आणि त्याचे प्रकार सांगताना ते लिहितात - भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील विचारांचा वेध संशोधकाला घ्यावयाचा असतो. संशोधन हे तीन प्रकारांनी केले जाते. १) विज्ञान-क्षेत्रातील प्रयोगशाळेतील संशोधन (लॅबोरेटरी रिसर्च), २) समाजशास्त्रातील विविध क्षेत्रात सर्वेक्षण करून, आकडे गोळा करून केलेले संशोधन (फील्ड रिसर्च), आणि ३) ग्रंथाचा अभ्यास, तुलना, संपादन, यांद्वारे ग्रंथालयात किंवा घरबसल्या केलेले संशोधन (डेस्क-वर्क रिसर्च) ह्या सर्व संशोधनाचा हेतू मानवी जीवन संपन्न करण्याचाच असतो.[३] या विवेचनावरून संशोधनाची व्यापकता लक्षात येते.

**संशोधन म्हणजे नवनिर्मितीच :**

मानवी जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील चांगले संशोधन एका अर्थाने नवनिर्मितीच असते. अर्थपूर्ण संशोधनामुळे त्या-त्या क्षेत्रातील अनुभवविश्व समृद्ध होण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर सबंध मानवी जीवनाला अधिकाधिक उन्नत करण्याचे सामर्थ्य सर्जनशील संशोधनामध्ये असल्याचे दिसून येते. साहित्य -कला, विज्ञान-तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे, शिक्षण, धर्म-संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये सातत्याने होणारे संशोधन मानवी जीवनाला नवे परिमाण देणारे असते. यावरून संशोधन क्षेत्राची मौलिकता आणि उपयुक्तता आपल्या लक्षात येते.

संशोधनाचे क्षेत्र खूप व्यापक आणि समृद्ध आहे. साहित्य निर्मितीमुळे संशोधनाला आणि संशोधनामुळे साहित्याच्या विकासाला मदत होत असते. कोणत्याही साहित्याचा विविध अंगांनी अभ्यास करता येतो. त्या साहित्याचे गुण-दोष सांगता येतात. साहित्य संशोधनामध्ये प्रामुख्याने पुढील विषय समोर ठेवून मोठ्याप्रमाणात संशोधन केले जाते.

एका कालखंडाचा अभ्यास, एका वाङ्मयप्रकाराचा अभ्यास, एका लेखकाचा अभ्यास, एका साहित्याकृतीचा अभ्यास,दोन लेखकांचा तुलनात्मक अभ्यास,दोन भिन्नभाषिक लेखकांचा तुलनात्मक अभ्यास, विशिष्ट पंथाच्या - संप्रदायाच्या साहित्याचा अभ्यास,दोन कालखंडाचा तुलनात्मक अभ्यास, लोककलांचा अभ्यास, मानसशास्त्रीय किंवा भाषिक दृष्टिकोणातून अभ्यास, समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून अभ्यास, साहित्यातील विद्रोही परंपरेचा अभ्यास असे साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात अभ्यासाचे अनंत विषय असू शकतात. नावीन्यपूर्ण विषयामुळे संशोधनाला मौलिकता प्राप्त हाते.

साहित्य हा मानवी जीवनानुभवाचा सहजसुंदर आविष्कार असतो. ह्या आविष्कारात जशी उत्कटता, काव्यात्मकता असते, तशीच काळाचा वेध घेण्याची, मानवी जीवन जाणिवा समृद्ध करण्याची क्षमता असते. समाजजीवनातील विविध जाणिवांचा, संवेदनांचा प्रत्ययकारी आविष्कार साहित्यातून होत असतो. या संवेदनांचे - जाणिवांचे स्वरूप उलगडून दाखविणे संशोधनाचे उद्दिष्ट असते. संवेदनशील कलावंताचे भावविश्व, विचारविश्व आणि त्याचा साहित्याच्या आशयावर होणारा परिणाम, त्या-त्या कलावंताची आविष्कार शैली यांचा परस्पर अनुबंध संशोधकाला शोधता आला पाहिजे.

**एका लेखकाचा अभ्यास :**

मराठी साहित्यामध्ये एका विशिष्ट लेखकाच्या साहित्याचा अभ्यास अनेक संशोधकांनी केल्याचे जाणवते. एका विशिष्ट लेखकाचे समग्र-साहित्य डोळ्यासमोर ठेवून किंवा निवडक साहित्याचा आधार घेऊन अशाप्रकारचे संशोधन केले जाते. असे संशोधन करीत असताना प्रामुख्याने पुढील मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

**विषयाची निवड :**

संशोधनाच्या क्षेत्रातील ही अगदी प्राथमिक गोष्ट असली तरी विषय शीर्षकाचा संपूर्ण संशोधनावर मोठा प्रभाव पडत असतो. अर्थातच विषयावरून संशोधनाची दिशा स्पष्ट होत असते. म्हणून प्रथम गांभीर्याने संशोधन विषयाची निवड केली पाहिजे. विषयाची व्याप्ती, मर्यादा लक्षात घेऊन तो पक्का केला

पाहिजे. एका विशेष लेखकाचा अभ्यास करताना त्या लेखकाच्या संदर्भात पूर्वी संशोधनासाठी जो विषय घेतला गेला नाही, तो विषय निवडल्यास संशोधन अधिक नावीन्यपूर्ण होऊ शकते. एका लेखकाचा अभ्यास करताना अनेक अंगांनी विचार करून विषय ठरवता येतो. जसे 'अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय', 'अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक साहित्यातून व्यक्त होणारा परिवर्तनवाद' अशा विविध अंगांनी विचार करून एका विशेष लेखकावर संशोधन करता येते.

संशोधन विषयाच्या शीर्षकामध्ये स्पष्टता असावी. संशोधनाची क्षेत्रमर्यादाही त्यातून नेमकेपणाने व्यक्त व्हावी. विषय निवडताना कोणती काळजी घ्यावी याबद्दल स.गं. मालशे म्हणतात, संशोधनाचा विषय निवडताना काही काळजी घेणे आवश्यक आहे. विस्तृत क्षेत्रमर्यादा असणारा विषय बौद्धिकदृष्ट्या एक आव्हान ठरत असला तरी व्यावहारिक भान ठेवून प्रत्यक्ष संशोधन करताना विषयाचा आवाका सीमित करणे आवश्यक आहे. साधनांची उपलब्धता लक्षात घेऊन विषय निवडावा.[४] एका लेखकाचे बरेच साहित्य असू शकते. त्यामुळे विषय निवडताना तो अतिशय विस्तृत होणार नाही याची काळजी घ्यावी लागते.

**लेखक आणि चरित्र :**

एका विशेष लेखकाच्या साहित्यावर संशोधन करण्याचे ठरल्यानंतर विषयाला अनुसरून आवश्यक माहिती संकलित करणे आवश्यक असते. माहितीचे संकलन आणि वर्गीकरण झाल्यानंतर प्रत्यक्षात संशोधनाला सुरुवात होते. अशा विषयावरील संशोधनात प्रारंभीच संशोधकाला गोंधळात टाकणारा मुद्दा म्हणजे त्या लेखकाचे चरित्र. लेखकाच्या साहित्यावर संशोधन करताना संबंधित लेखकाचे चरित्र विचारात घ्यावे का नाही? याबाबत बरेच वाद दिसून येतात.'विशिष्ट ग्रंथकाराचा अभ्यास' या लेखामध्ये श्री प्र. ल. गावडे लिहितात चरित्रात्मक तपशीलाने वाङमयाच्या आस्वादात व मूल्यमापनात कोणतीही भर पडत नाही, उलट चरित्रात्मक तपशील वाङमयीन आस्वाद व मूल्यमापन यांच्या मार्गात अनेकदा पूर्वग्रह उत्पन्न करून ठेवितो ही सर्वात मोठी अडचण आहे.[५] त्यांच्यामते चिं. त्र्यं. खानोलकर कोकणातले आहेत, हे समजल्यानंतर आस्वादात किंवा मूल्यमापनात कोणतीही भर पडत नाही उलट अडथळा निर्माण होतो. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी 'लेखकाभ्यासाच्या दिशेने' या लेखात अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. संशोधनात लेखकाचे चरित्र विचारात घ्यावे का? या प्रश्नाचे उत्तर देताना ते लिहितात चरित्र्याच्या साहाय्याने साहित्यकृती मधील काही गुंते उलगडू शकतात, हे मला मान्य

आहे; परंतु त्यामुळे साहित्यकृतीच्या बरे-वाईटपणावर कसा प्रकाश पडू शकेल, असा माझ्यापुढे प्रश्न होता आणि आहे. पुष्कळदा एखाद्या लेखकाचे आयुष्य स्वतंत्रपणे अर्थपूर्ण असते. त्याला एक व्यक्ती म्हणून महत्त्व असते. पण साहित्यकृती तेवढ्याच महत्त्वाच्या ठरू शकतील असे काही गणित मांडता येत नाही. म्हणून त्या-त्या लेखकाच्या साहित्याचा स्वतंत्रपणे विचार करणे अधिक बरे असते, असे मला वाटत.[६] अभ्यासकांची ही मते लक्षात घेतल्यानतर संशोधनामध्ये लेखकाच्या चरित्राला दुय्यमस्थान असल्याचे मान्य करावे लागते. कारण संशोधनाचा विषय लेखक नसून त्याचे साहित्यच असते.

त्यामुळे त्या-त्या लेखकाची साहित्यसंपदा डोळ्यासमोर ठेवून संशोधन करणे आवश्यक आहे. हे सर्व मान्य करूनही लेखकाच्या चरित्राचा आणि त्याच्या साहित्याचा कोणत्यातरी स्वरूपात अनुबंध असतोच. लेखक कितीही तटस्थ राहिला तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. म्हणून एखाद्या लेखकाचे चरित्र उपलब्ध असल्यास त्याचा योग्य त्या ठिकाणी उपयोग करायला हवा. ज्यामुळे संशोधन अधिक परिणामकारक होईल. लेखकाच्या चरित्रामुळे त्याची विचारदृष्टी, जीवनदृष्टी आपल्या लक्षात येते. लेखकाचे अनुभवविश्व समजते. त्यामुळे प्रत्यक्ष संशोधन करताना काही नवे संदर्भ हाती येण्याची शक्यता असते. थोडक्यात, संशोधनपूरक माहिती म्हणून चरित्राचा आधार घेतल्यास संबंधित लेखकाच्या साहित्यातील जाणिवांचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यास मदत होते. उदा- अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र आणि साहित्य.

**लेखनामागील प्रेरणा :**

प्रेरणा म्हणजे लेखकाला लेखनासाठी प्रवृत्त करणारी शक्ती किंवा उर्जा होय. लेखक एखाद्या विषयावर कथा-कादंबरी किंवा अन्य प्रकारचे लेखन का करतो? या प्रश्नाचे उत्तर शोधल्यास त्या लेखकाच्या लेखनामागील प्रेरणांचे स्वरूप लक्षात येते. म्हणून एका लेखकाचा अभ्यास करीत असताना त्या लेखकाच्या प्रेरणाही लक्षात घ्याव्या लागतात. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून कष्टकरी - कामगार वर्गाचे प्रश्न का येतात? याचे उत्तर त्यांच्या लेखनामागे असलेल्या मार्क्सवादी प्रेरणेमध्ये आहे. मार्क्सवादाबरोबरच त्यांच्यावर डॉ. आंबेडकरांच्या विचार -कार्याचाही जबरदस्त प्रभाव आहे. म्हणूनच त्यांनी 'जग बदल घालुनी घाव सांगूनी गेले मज भीमराव!' अशी घोषणा केली. अर्थात मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद या अण्णाभाऊंच्या लेखनामागील दोन मुख्य प्रेरणा होत्या. ह्या प्रेरणा नीटपणे समजून घेतल्यास त्यांच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जाणिवांचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

**लेखक आणि काळ :**

माणूस ज्या काळामध्ये जगत असतो त्या काळाचे त्याच्या समग्र जीवनावर काही विशिष्ट असे संस्कार होत असतात. इतिहासाची जाण आणि वर्तमानाचे भान घेऊन माणूस भविष्याचा वेध घेत असतो. याला लेखक-कलावंत तर अपवाद असूच शकत नाही. काळाचे संस्कार घेऊनच लेखक आपले अनुभवविश्व समृद्ध करीत असतो. म्हणून लेखक ज्या काळामध्ये घडला त्या काळाचाही विचार संशोधनामध्ये झाला पाहिजे, असा एक अभ्यासकांचा मतप्रवाह आहे. लेखकाचे चरित्र संशोधनात विचारात घ्यावे का नाही? याबद्दल जसा वाद आहे, तसाच त्या लेखकाचा काळ विचारात घ्यावा का नाही? याबद्दलही वाद आहे. यासंदर्भात श्री प्र.ल. गावडे लिहितात - ग्रंथकाराच्या चरित्राप्रमाणेच ग्रंथकाराच्या काळाचा विचार हाही बऱ्याच मतभेदाचा विषय झालेला आहे. ग्रंथकार ज्या काळात जगत असतो त्या काळाचे, त्या काळातील विचारप्रवाहांचे, समजुतींचे, राजकीय-सामाजिक-धार्मिक परिस्थितीचे त्याच्या लेखनावर परिणाम होत असतात. ते अटळ असतात.[७] यावरून लेखकाचा काळ विचारात घेणे संशोधनासाठी उपयुक्त ठरते.

लेखकाच्या काळातील सामाजिक परिस्थिती जशी महत्त्वाची आहे तशीच वाङमयीन परिस्थिती सुद्धा महत्त्वाची आहे. लेखकाचे लेखन ज्या काळात चालू होते किंवा आहे त्या काळातील वाङमयीन पर्यावरण नेमके कोणत्या गुणांनी युक्त आहे, याचाही विचार करावा लागतो. थोडक्यात, कोणत्याही लेखकाचे साहित्य त्या-त्या काळाचे काही विशिष्ट संस्कार घेऊन येत असते.

**साधार विवेचन :**

कोणत्याही प्रकारच्या संशोधनामध्ये साधार विवेचनाला अतिशय महत्त्व असते. म्हणून विशेष लेखकाचा अभ्यास करताना मुद्दे साधार, पुराव्यानिशी मांडले पाहिजेत. लेखकाच्या कोणत्याही साहित्यकृतीबद्दल मत व्यक्त करताना योग्य तो संदर्भ पुरावा देणे महत्त्वाचे असते. निराधार विवेचनाला उथळ मतांना संशोधनामध्ये जागा असू नये. सखोल व्यासंग, साधार मांडणी, योग्य संदर्भ देऊन मूळचा विषय अधिक प्रभावीपणे मांडता येतो. म्हणून लेखकाच्या साहित्यातील गुण-दोषांची चर्चा संशोधकाने संदर्भासहित केली पाहिजे. संदर्भहीन विवेचन किंवा मांडणी अर्थाचा अनर्थ करू शकते. म्हणून स्पष्ट पुरावे, महत्त्वाचे संदर्भ आधाराला घेऊन केलेले संशोधन अधिक वस्तुनिष्ठ ठरू शकते.

**लेखक आणि साहित्यप्रकार :**

एक लेखक अनेक वाङ्मयप्रकार हाताळू शकतो. आपल्या अनुभवाला योग्य रूप देण्यासाठी तो कथा, कांदबरी, कविता, नाटक किंवा ललित लेख लिहू शकतो. अशा विविध वाङ्मयप्रकारातून व्यक्त होणारे अनुभवविश्व नेमके कसे आहे, याचा शोध संशोधकाने घ्यायला हवा. या अनुभवविश्वात समान सूत्र जसे असू शकते तशी भिन्नताही असू शकते. म्हणून साहित्यप्रकारानुसार त्या-त्या कलाकृतीचे मूल्यमापन करणे आवश्यक असते. ह्या संदर्भात श्री प्र. ल. गावडे लिहितात - मूलत: भिन्न-भिन्न वाङ्मयप्रकारांची स्वतंत्र अंगभूत वैशिष्ट्ये आणि आपल्या क्षमतेनुसार कलावंताने त्या लेखनाला प्राप्त करून दिलेली पृथगात्मता यांचा सविस्तर विचार ग्रंथकाराच्या विशेष अभ्यासाच्या वेळी व्हावयास हवा.[८] प्रत्येक वाङ्मयप्रकारात लेखकाला दर्जेदार कलाकृती निर्माण करता येते असे नाही. किंवा लेखकाची प्रत्येक कलाकृती ही वाङ्मयीनदृष्ट्या सरस असतेच असे नाही. म्हणून संशोधकाने लेखकाच्या साहित्य निर्मितीतील चढउतार नेमकेपणाने टिपले पाहिजेत. लेखकाच्या आशय - अभिव्यक्तीतील भिन्नता शोधत त्यातून व्यक्त होणारे एक समान सूत्रही संशोधकाच्या लक्षात यायला हवे.

**वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध :**

प्रत्येक लेखक एक संवदेनशील माणूस असतो. माणूस म्हणून त्याचे जसे एक व्यक्तिमत्त्व असते तसेच कलावंत म्हणूनही एक व्यक्तिमत्त्व असते. त्याचे साहित्य म्हणजे या कलात्मक व्यक्तिमत्त्वाचाच उत्कट आविष्कार असतो. हा आविष्कार कोणत्या नव्या जाणिवा घेऊन येणारा आहे, याचा शोध संशोधकाने घ्यावा. या संदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात असे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व शोधणे हाच विशेष लेखकाच्या अभ्यासाचा अंतिम हेतू असतो! हा अंतिम हेतू समोर ठेवून केलेले संशोधन अधिक अर्थपूर्ण होऊ शकते.

ह्या सर्व संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये संशोधकाने अतिशय तटस्थ, नि:पक्षपाती राहून अभ्यासकाची भूमिका सांभाळणे आवश्यक आहे. पूर्वग्रह, अभिनिवेश, पक्षपाताच्या आणि एकांगीपणाच्या आहारी न जाता वस्तुनिष्ठपणे संशोधन केले पाहिजे. व्यासंग, सखोल चिंतन, तर्कशुद्ध विवेचनदृष्टी संशोधकाकडे असायला हवी. असा संशोधकच लेखकाच्या जीवन चिंतनाचे स्वरूप उलगडून दाखवू शकतो.

❀❀❀

# कालखंडनिहाय संशोधन

**डॉ. नवनाथ चौधरी**

मराठी भाषेतील संशोधन हा शब्द मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान असलेला शब्द म्हणून मानला जातो. इंग्रजी भाषेतील Research या शब्दाचा मराठीतील अर्थ संशोधन असा असून मराठीतील या शब्दाचा विग्रह केल्यास सं + शोधन अशी फोड आपणास करता येते. सं याचा अर्थ संपूर्ण असा असून शोधन याचा अर्थ जे अज्ञात आहे त्याचे ज्ञान करून घेणे होय. जे अज्ञात आहे आहे त्याला ज्ञात करण्यासाठी जी प्रक्रिया राबविली जाते त्यास संशोधन म्हणतात. ही प्रक्रिया जुने ज्ञान नवीन करण्यासाठी, नवीन ज्ञान निर्मितीसाठी आणि ज्ञानाची उपयोगिता समाजासाठी आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी वापरली जाते. संशोधन या शब्दामध्ये शोध असाही अप्रत्यक्षपणे शब्द वापरला जातो. पण संशोधन Research आणि शोध Discover यात सारखेपणा नाही. शोध Discover या शब्दाचा अर्थ अज्ञाताचा पडदा हटवणे किंवा जाणिवेत भर टाकणे असा आहे. यावरून शोध Discover म्हणजे संशोधन नव्हे असे लक्षात येते.

**संशोधनाच्या विविध व्याख्या :**

१) **इंग्लिश डिक्शनरी :** ''ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्याच्या शोधासाठी काळजीपूर्वक करण्यात आलेल्या तपासणीस संशोधन म्हणतात.''[१]

२) **दि न्यु सेंच्युरी डिक्शनरी :** ''तथ्यांचा किंवा सिद्धांताचा शोध घेण्यासाठी विषयवस्तूचे केलेले अन्वेषण म्हणजे संशोधन होय.''

३) **जॉन बेस्ट :** ''संशोधन ही अशी अधिक क्रिया आहे, की जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला विकसित करते.''

४) **सी.ए. मोझर :** ''नवीन ज्ञानप्राप्तीसाठी इंद्रिय गोचर घडामोडी व समस्येच्या व्यवस्थित केलेल्या मांडणीस संशोधन म्हणतात.''

वरीलप्रमाणे विविध विचारवंतांच्या व्याख्येनुसार नवीन ज्ञानप्राप्तीच्या व्यवस्थित प्रयत्नास संशोधन असे म्हणतात.

**संशोधनाचे प्रयोजन :** संशोधन वैज्ञानिक प्रणालीचा उपयोग करून अनुत्तरीत प्रश्नांच्या उत्तरांना शोधणे हे होय. संकलित केलेल्या तथ्यांची विश्वसनीयता विषयानुरूपता व तार्किकतेचे परीक्षण करण्यासाठी विविध वैज्ञानिक प्रणाली विकसित झालेल्या आहेत. प्रत्येक संशोधनाची सुरुवात एखादा प्रश्न सोडवण्याच्या किंवा समस्येचे निराकरण करण्याच्या उद्देशाने होत असते. विषयवस्तूचे समग्र अध्ययन संशोधनात केले जाते. संशोधनात प्रत्येक प्रश्नाचे उत्तर त्याच्याच प्रकृतीत असते. मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर संशोधनाचा स्तर प्राप्त केला आहे.

वेदपूर्व काळातील ब्रह्म ही कल्पना साम्यवादी स्वरूपाची होती. ती सामूहिक मालकी, सामूहिक निर्णय आणि सामूहिक अधिकारावर अधिष्ठित होती. प्राचीन काळातील मानवी समज आणि जाणीव आजच्या स्थितीला साम्यवाद, समाजवाद आणि लोकशाही यात परिवर्तित झालेली दिसते. निसर्ग आणि पृथ्वी याबरोबर ज्ञानाने भरारी मारलेली आहे. विश्वाची रचना आणि कार्य समजावून घेणे, बदलते वातावरण, प्राणी, वनस्पती, नद्या, समुद्र इ. बाबत अधिक ज्ञान प्राप्त करण्याच्या उद्देशाने संशोधनाची गरज निर्माण झालेली आढळते.

**संशोधनाचे स्वरूप :** निसर्गातील अज्ञाताची माहिती घेऊन अनुभवजन्य ज्ञानात मानवाने रूपांतर केले. परंतु या ज्ञानाच्या प्रकटीकरणासाठी किंवा ज्ञानाला प्रमाणित करण्यासाठी मानवाने विज्ञान ही प्रणाली संशोधनासाठी उपयोगात आणली. समाजात विज्ञानाचा अर्थ वेगवेगळ्या पद्धतीने ग्राह्य धरला जातो. व्यवस्थित ज्ञानाला विज्ञान म्हणतात. निसर्गाचे सिद्धांत व नियमाच्या अध्ययनालाही विज्ञान म्हणतात. विज्ञानाच्या अनेक अभ्यास शाखा असल्यामुळे प्रत्येक विद्याशाखेतील ज्ञानाचे उद्देश वेगळे आढळतात. संशोधनाच्या बाबतीत विषयवस्तूचे तथ्य व सिद्धांत यांना अर्थ देऊन त्याचे वर्गीकरण करणे, वस्तूचे गुणधर्म, स्वरूप बहाल करणे हे विज्ञानाचे संशोधनातील प्रमुख कार्य होय. समाजाच्या दृष्टीने मानवाच्या सामाजिक व्यवहाराशी संबंधित नियमांचे प्रमाणिकरण करणे समाजाच्या परिवर्तनशीलतेला गती देणे, राष्ट्र निर्मितीसाठी समाजात स्थैर्य निर्माण करणे हे विज्ञानाच्या योगे शक्य होते. याच्या मुळाशी संशोधन प्रणाली असते. समाजात जीवन जगणारा मनुष्य अजाणतेपणे वैज्ञानिक पद्धतीचा वापर ज्ञानप्राप्तीसाठी करत आलेला आहे. जमीन, हवा, पाणी, ऊन, पाऊस, वारा, ढग, आकाश, नक्षत्रे, तारे, दिवस, रात्र, ऋतू, प्राणी, पक्षी, वनस्पती इ. चे प्राथमिक ज्ञान त्याला वैज्ञानिक पद्धतीतून प्राप्त झाले आहे. मिळालेल्या

ज्ञानाला जाणिवेद्वारे तपासून या ज्ञानाला मूर्तरूप जेव्हा दिले तेव्हा संशोधनास सुरुवात झाली. म्हणून वैज्ञानिक पद्धती आणि संशोधन महत्त्वाचे होत. वैज्ञानिकता ही संशोधनाची पहिली पायरी मानली तर वावगे ठरणार नाही.

संशोधन संकल्पना समजावून घेताना मानवी जीवनातील उपयोजन या आणि अशा प्रकारच्या येणाऱ्या अनुभूतीद्वारे संकल्पनेची प्राथमिक निर्मिती होत असते. ज्ञानक्षेत्रानुसार संकल्पना आपले रूप बदलते. संकल्पना निर्मितीस कारणीभूत ठरलेल्या अनुभूतीस सविस्तर विशद करून प्रक्रियेला कार्यान्वित करणे हे संशोधकाचे कर्तव्य असते. संकल्पनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे,

१) संकल्पना ही सामान्यीकरण स्वरूपात असते.
२) ती स्वतः घटना नसते. पण घटनेचे प्रकटीकरण करते.
३) ती ज्ञानशाखानुसार रूप बदलते.
४) संकल्पना वर्गीकरण करताना अर्थवाहक असते.
५) संकल्पनेत वास्तविकता, आदर्श, कल्पना इ. चा समावेश असतो.
६) संकल्पनेच्या आधारे मनुष्य परस्पर संबंध प्रस्थापित करतो.

**संशोधन समस्या** : इंग्रजीमध्ये Problem हा शब्द महत्त्वाचा मानला जातो. मराठीत यावरून समस्या या अर्थी शब्द वापरला जातो. समस्या म्हणजे उपलब्ध माहिती आणि साध्य यातील अडसर होय. जीवनात निर्माण झालेल्या अडचणी किंवा समस्या काहीतरी नवे करण्यास मनुष्यास चिंतनशील बनवतात. अशी मानवी जीवनातील कोणतीच समस्या नाही, की जी सोडवली जात नाही. मनुष्य, समाज, संस्था, शासन अशा विविध परिस्थितीची निश्चित बाजू असल्यामुळे यातून मार्ग काढून समस्येचे निराकरण केले जाते. अज्ञान, तार्किक वस्तूला मूर्तरूप देण्यासाठी समस्येचे महत्त्व अनन्यासाधारण असते. संशोधनात समस्येला महत्त्वाचे स्थान असते. समस्या ही क्लेषदायी, वैताग वाढवणारी असते. तिची प्रकृती संशोधनासाठी घेतलेल्या विषयानुरूप असते. याच समस्येतून संशोधकाची विषय निवड ठरते.

**संशोधन परिकल्पना** : परिकल्पना म्हणजे विषयाची गृहीतकृत्ये होय. ज्या विषयाचा शोध घ्यावयाचा आहे. त्याबद्दल विधान करणे म्हणजे गृहीतकृत्ये होत. संशोधन विषयातील सत्यता पडताळून पाहण्यासाठी प्राथमिक स्वरूपात मांडलेल्या मुद्यांना परिकल्पना म्हणतात. संशोधनात ही परिकल्पना दीपस्तंभाप्रमाणे असते.

**संशोधनाचे प्रकार** : संशोधनाची व्याप्ती पाहता आजच्या घडीला संपूर्ण जगात जे संशोधन केले जाते त्या संशोधनास पुढील प्रकारात विभागले जाते.

१) कार्यांतर संशोधन
२) प्रयोगशाळा संशोधन
३) क्षेत्र परीक्षण संशोधन
४) क्षेत्रीय अध्ययन
५) ग्रंथालयीन संशोधन
६) व्यक्तिगत अध्ययन
७) व्यक्ती सूची अध्ययन
८) सर्व्हेक्षण अध्ययन

संशोधन विषयाच्या अनुरोधाने क्षेत्रीय सर्व्हेक्षण आणि संशोधन या प्रकारास सविस्तर मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

**क्षेत्रीय सर्व्हेक्षण किंवा अध्ययन :** क्षेत्रीय याचा इंग्रजी शब्द Field असा असून क्षेत्रात अध्ययन यास Field Studies असा शब्दप्रयोग यासाठी केला जातो. क्षेत्रीय अध्ययन हे सामाजिक कल किंवा सामाजिक बदलाची प्रवृत्ती यावर आधारित असतो. संशोधनात विशिष्ट कालखंड निवडल्यानंतर त्या कालखंडातील प्रादेशिक क्षेत्र महत्त्वाचे असते. बदलती परिस्थिती आणि सामाजिक परिवर्तने या संशोधनात महत्त्वाची असतात. विशिष्ट कालखंड याचा अर्थ असा होतो, की त्याच्या कालावधीत काहीतरी घडले आहे. समाजातील स्वाभाविक बदल यास कालखंड म्हणत नाहीत. समाजातील हे स्वाभाविक बदल लक्षातही येत नाहीत किंवा त्यांची कोणी दखलही घेत नाहीत. पण कालखंडातील बदल दखलपात्र असतात. त्यामुळे विशिष्ट कालखंडातील संशोधन करताना संशोधकास काही बाबी विचारात घ्याव्या लागतात. समाजात वांशिक बदल घडतात. पण ते सामान्यीकरण अवस्थेतील नसतात. त्यामुळे संपूर्ण समाजाला वांशिक बदलाबद्दल ज्ञान असेलच असे नाही. उदा. ग्रामीण भागातील बलुतेदारी पद्धती शहरी भागात काय माहीत असणार? संस्कृतीचे ज्ञान होईल पण काही मानव समूह समाविष्ट होत नाहीत. समाजातील विविध स्तर विचारात घ्यावे लागतात.

१) कालखंडाचा अभ्यास असणे.

२) ज्या कालखंडाचा अभ्यास केला जातो त्या कालखंडातील सामाजिक स्थितीगतीचा अभ्यास असणे.

३) समाजातील सर्व स्तराचे अध्ययन करणे.

४) समाजाच्या जाती-उपजाती, विचार, प्रवृत्ती याचे निरीक्षण करणे.

५) समाजाच्या भोवती असणाऱ्या निसर्गाचे अध्ययन करणे.

६) समाजातील सांस्कृतिक स्थितीचा विचार करणे. संपूर्ण समाजाचा क्षेत्रीय अध्ययनाद्वारे अभ्यास केला जातो. तसा कालखंडातील एका व्यक्तीचा अभ्यासही केला जातो.

# मराठी साहित्याचा वाङ्मयीन इतिहास व दलित साहित्य

प्रा. डॉ. राजाभाऊ भैलुमे

मराठीमध्ये शं. गो. तुळपुळे, वि. ल. भावे या वाङ्मयेतिहासकारांनी अनेक परिश्रम घेऊन प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिलेला आहे. यात साहित्यावरील भाष्यांपेक्षा संकलनाला अधिक प्राधान्य दिलेले दिसते. तर ह.श्री.शेणोलीकर मात्र समकालीन घडामोडींचा साहित्यावर होणारा परिणाम प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संदर्भात स्पष्टीकरणासहित, संदर्भासहित सिद्ध करतात. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास मात्र वेगवेगळ्या दृष्टिकोणातून अधिक परिणामकारक रीतीने संपादित केलेला दिसतो. यात प्र. न. जोशी, ल. रा. नशिराबारकर, अ. ना. देशपांडे, ल. रा. पांगारकर, के. ना. वाटवे, स. गं. मालशे असे अनेक वाङ्मयेतिहासकार आहेत. या बरोबरच प्राचीन, अर्वाचीन व नवप्रवाह या अनुषंगाने महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांनी आतापर्यंत सात खंडात्मक 'मराठी वाङ्मयाचा इतिहास' वेगवेगळ्या लेखकांच्या साह्याने संपादित केलेला आहे.

मराठीमध्ये याबरोबरच विशिष्ट कालखंडांवर, पंथांवर, वाङ्मय प्रकारांवर प्रकाश टाकणारे, लेखन मराठी साहित्यात अत्यंत विपुल प्रमाणात झालेले आहे. परंतु दलित साहित्याची दखल मात्र घेतलेली नाही. महाराष्ट्र साहित्य परिषदने संपादित केलेल्या सातव्या खंडाच्या पहिल्या भागात सर्व वाङ्मय प्रवाहांचा विचार केलेला आहे व दलित साहित्याच्या प्रवाहाचा विचार दुसऱ्या खंडात करू असे प्रस्तावनेत म्हटले आहे. समीक्षा, संशोधनात्मक व वाङ्मयप्रकारानुसार, विशिष्ट कालखंडावर, वाङ्मयेतिहास सदृश्य जे लेखन केलेले आहे. त्यातही दलित साहित्याची उपेक्षाच अनेक ठिकाणी दिसते. कुसुमावती देशपांडे यांनी शतकातील मराठी कादंबरीवर लेखन केले परंतु ३३ कादंबऱ्या लिहिणाऱ्या प्रसिद्ध, लोकप्रिय कादंबरीकार अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाची त्यांनी दखल सुद्धा घेतली नाही. विशेष म्हणजे त्यांच्या बारा कादंबऱ्यांवर मराठी चित्रपट निघाले हे एकमेवाद्वितीयच आहे असे असतानाही असे घडले. ज्या ग्रंथांची दखल घेतली ती मात्र न्याय देणारी नाही. उलट आरोप करत हे साहित्यच नाही असे सूचित करणारी आहे. उदा.मराठीत प्रसिद्ध करणाऱ्या 'प्रदक्षिणा' या अनिरुद्ध कुलकर्णी यांनी

संपादित केलेल्या दुसऱ्या खंडात 'स्वातंत्र्योत्तर आत्मचरित्र', जयंत वष्ट यांचा हा लेख आहे. यात ते दलित आत्मचरित्राविषयी लिहितात. ''गेल्या वीस पंचवीस वर्षात दलित आत्मचरित्र बऱ्याच संख्येने प्रकाशित होऊ लागली आहेत. या दलित आत्मचरित्रांचा 'साहित्य'दृष्ट्या विचार करता जरी त्यांची दु:खे त्यांचे इतरांकडून केले जाणारे शोषण समाजासमोर येत असले तरी त्यांच्या मर्यादाही स्पष्टपणे जाणवतात. चळवळीतील भूमिका येथे आत्मचरित्रात उतरत असल्याने जातीयतेच्या संकुचिततेची प्रबळ जाणीव येथेही दिसते. केवळ स्वत:चे दु:ख व भोगलेल्या यातनांची नोंद सातत्याने सर्वत्र केली गेल्याने अनुभव साचेबंद होतात. 'साहित्यकृती'स आवश्यक सूर तेथे जुळत नाहीत.'' (पृ.क्र.३०८) असे सुरुवातीलाच नकारात्मक पारंपरिक रचनेचे निकष लावत एवढेच विवेचन केलेले आहे व काही आत्मचरित्रांचा आढावा तो ही नकारात्मक दृष्टीने घेतलेला आहे. उदा. 'बलुत' (दया पवार) या विषयी ते लिहितात, ''पवारांनी स्वत:कडे घेतलेली 'दलित लेखक' ही भूमिका दु:खाचा संबंध जातीयतेकडे जोडताना दिसते. आपणास आलेले अनुभव ते कालक्रमाने मांडताना दिसत नाहीत तर सोयीनुसार मागेपुढे नोंदी करतात. परिणामत: हे आत्मचरित्र विसकळीत होते. व्यक्तिरेखांच्या चित्रणात प्रभावीपणा येत नाही. 'बलुतं' च्या दुसऱ्या आवृत्तीत ते स्वत:वरच्या काही आरोपांचे खंडन करू पाहतात. तेव्हा त्यांच्या बदलत्या जीवनदृष्टीतील विरोध वाचकांच्याही लक्षात आल्यावाचून राहात नाही. जातीयतेबाहेर न पडू शकलेले कलावंत म्हणूनच ते त्यांच्या आत्मचरित्रातून जाणवतात.'' (पृ.क्र.३०८-९) दलित लेखक वेगळ्या सौंदर्यशास्त्राची मागणी का करतात हे वरील उदाहरणावरून लक्षात येते. परंतु फक्त नवसौंदर्यशास्त्राची निर्मिती करून चालणार नाही, यासाठी दलित चळवळीची उद्दिष्ट्ये घराघरापर्यंत पोहचली पाहिजेत व स्वतंत्र वाङ्मयेतिहासाची निर्मिती केली पाहिजे.

मराठी साहित्यामध्ये प्रस्थापित वर्गाने वरीलप्रमाणे भूमिका घेतलेली असली तरी दलित समाज व साहित्यासंबंधी आस्था असणाऱ्या सवर्ण व्यक्तींनी व दलित समीक्षकांनी, संशोधकांनी व वाङ्मयेतिहासकारांनी दलित साहित्यास न्याय देण्याची भूमिका घेतलेली दिसते. तसा दलित साहित्याचा वाङ्मयीन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न मात्र प्रामुख्याने दोन व्यक्तींनी केलेला दिसतो. १) डॉ. योगेंद्र मेश्राम- 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास' (१९८९) २) प्राचार्य डॉ. म. सु. पगारे 'दलित साहित्याचा इतिहास' (२००५) याबरोबर दलित साहित्यातील शक्तिस्थानांवर, स्वरूपांवर, वेगळेपणांवर प्रकाश टाकणारी समीक्षात्मक अनेक पुस्तके मराठीत लिहिली

गेली. लिहिली जात आहेत तर काही वाङ्मयेतिहास सदृश्य लेखन ही झालेले आहे. यामध्ये डॉ. भालचंद्र फडके, बाबुराव बागुल, डॉ.गंगाधर पानतावणे, डॉ. चंद्रकमार नलगे, डॉ.प्रकाश पवार, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. मनोहर जाधव, डॉ. शंकरराव खरात, डॉ. गो. म. कुलकर्णी, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. वसंत डोळस, प्रा. दत्ता भगत, डॉ. प्रकाश खरात, डॉ. सदा कऱ्हाडे, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. बाळकृष्ण कवठेकर, गो. म. कुलकर्णी, डॉ. प्रभाकर मांडे अशा असंख्य लेखकांची नावे सांगता येतील. दलित साहित्याला दलित चळवळ, भारताची समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था, संस्कृती कारणीभूत असल्यामुळे एकाच वेळी अनेक सांस्कृतिक, ऐतिहासिक व इतर संदर्भ या साहित्यातून अभिव्यक्त होतात म्हणूनच बहुआयामी दृष्टिकोणातून त्याचे आकलन करता येते म्हणून एवढी मोठी पुस्तके वेगवेगळ्या दृष्टिकोणातून दलित साहित्यावर लिहिली गेली. याबरोबर दलित वैचारिक वाङ्मय मोठ्या प्रमाणावर लिहिले जात आहे. वाङ्मयेतिहासाच्या दृष्टिकोणातून तात्त्विक चिंतन आलेले दिसत नाही. प्राचार्य डॉ. म. सु. पगारे यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत मात्र डॉ. गंगाधर पानतावणे एवढेच म्हणतात की, "दलित साहित्याच्या इतिहास लेखनाच्या संदर्भात सांस्कृतिक व सामाजिक अंगांचा विचार करावाच लागतो. त्यादृष्टीने आणखी एक बाब संभवते की, आंबेडकरवादाची जी सांस्कृतिक व सामाजिक मूल्य आहेत त्यांनाच प्राधान्य देणे इष्ट ठरेल." दलित साहित्यात इतिहास मांडणीवर मात्र कुणीही लिहीत नाही.

दलित साहित्यावर वेगवेगळ्या दृष्टिकोणातून लेखन झालेले आहे. त्यामुळे दलित साहित्याच्या काही घटकांवर प्रकाश पडतो. परंतु समग्र दलित साहित्यावर प्रकाश पडत नाही. त्यामुळे साहित्य इतिहास लेखनाचीच गरज असते. प्राचार्य डॉ.म.सु.पगारे यांनी १६८ पानांमध्ये दलित साहित्याचा इतिहास लिहिला आहे. त्यातील ६६ पाने पार्श्वभूमी स्पष्ट करण्यासाठी दिलेली आहेत व १०२ पानामध्ये इतिहास लेखन केलेले आहे. अगोदर पार्श्वभूमीवर देणे गरजेचेच आहे. परंतु त्या त्या साहित्यकृतीच्या स्पष्टीकरणासंदर्भात देणे हे उत्तम. डॉ. पगारे यांनी वाङ्मयप्रकारानुसार अंशलक्ष्यी वाङ्मयेतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. कविता हा वाङ्मयप्रकार वगळता कथा,कादंबरी, आत्मकथने, नाटक रंगभूमी या प्रकरणांमध्ये मात्र लेखकानुसार लेखन करून पुस्तकाचे प्रकाशन वर्ष दिलेले आहे. त्यामुळे कोणत्या कालखंडात कोण-कोणती अभिव्यक्ती झाली हे लक्षात येते तसेच आत्मकथनांची त्यांनी यादी दिलेली आहे. यात ५८ आत्मकथनांचीच दखल घेतलेली आहे.

❀❀❀

# इतिहासाचे पुनर्लेखन

**प्रा. डॉ. संतोष बनसोड**

प्राचीन काळापासून ग्रीक लोकांनी इतिहासाचा अन्वयार्थ लावला असताना बुद्धिवादी कसोट्यांचा वापर केला. रोमन लोकांनी त्याला राजकीय स्वरूप दिले. तर मध्ययुगातील धर्मसंस्थेने इतिहासामध्ये देव असतो असे मांडले. जर्मन तत्त्ववेत्त्यांनी इतिहासाला तात्त्विक बैठक दिली. मार्क्सने भौतिकवादाला प्राधान्य दिले. फ्रेंच लोकांनी समाजवाद पाहिला. तर ब्रिटिशांना इतिहासामध्ये साम्राज्यवाद दिसू लागला. अरब, चिनी, हिन्दी जपानी लोकांनी इतिहासाकडे आपापल्या दृष्टिकोणातून पाहिले. प्रत्येक युगाचा इतिहासाच्या तत्त्वज्ञानावर परिणाम होत गेला. प्रत्येक युगात होणारे बदल हे भावी काळात टोकास्पद बनले. त्यामुळेच जसजशा कल्पना बदलतील तसतसे इतिहासाचे पुनर्लेखन होण्याची आवश्यकता भासू लागली.

बदल व सुधारणा हा सर्व विश्वाचाच नियम आहे. त्यामुळे इतिहासामध्ये सुद्धा असे बदल व सुधारण आवश्यक असतात. आधुनिक काळात इतिहासाला शास्त्राचे स्वरूप द्यावयाचेच असा इतिहास संशोधकाचा प्रयत्न असल्याने शास्त्राप्रमाणेच इतिहासामध्ये सुद्धा नवनव्या विचारांचा, कल्पनांचा स्वीकार करून इतिहासलेखनाला जास्तीतजास्त अद्ययावत बनविण्याचा प्रयत्न आहे. इतिहासात जरूर तो बदल करून नवे ऐतिहासिक ज्ञान समाजाला पुरविणे याच एका उदात्त्च हेतूने इतिहास पुनर्लेखनाचे कार्य चालू असते.

इतिहासाचे पुनर्लेखन करावे का ? तसे करणे शक्य आहे का ? असे प्रश्न इतिहासाच्या क्षेत्रात उपस्थित केले जातात. ह्या प्रश्नाचा प्रत्यक्ष संबंध इतिहास विषयाच्या स्वरूपाबाबतच्या धारणेशी आहे. इतिहास म्हणजे गत काळातील मानवी जीवनात घडणाऱ्या घडामोडीचा आलेख आहे, आणि गतकाळ अपरिवर्तनीय आहे, तर गतकालीन घडामोडीचा एकदा तयार केलेला आलेख बदलू शकतो का? तो जर बदलणारा आलेख नसेल तर एकाच ऐतिहासिक विषयावर पुन्हा पुन्हा लिहिणे निरर्थक, निरस व अप्रस्तुत ठरणार नाही का? इतिहास लेखनही शास्त्रीय प्रक्रिया आहे, सत्य दर्शन हा इतिहासाचा आत्मा आहे, घडून गेलेल्या गोष्टीचे प्रत्यक्ष सत्य दर्शन हे इतिहासाचे स्वरूप आहे, ही प्रत्यक्षवादी इतिहासकारांची वैचारिक धारणा

पूर्णत: स्वीकारली तर पुनर्लेखनाची गरज नाही असे म्हणावे लागेल. एखाद्या गतकालीन घटनेचे, प्रसंगाचे अगर व्यक्तीचे सर्वांगीण दर्शन घडविल्यानंतर त्याबाबत पुन्हा लिहिण्याजोगे नवे असे काय शिल्लक राहते? तसे करून पुनरुक्तीचा दोष मात्र पदरी पडतो असा युक्तिवाद केला जातो.

परंतु वास्तवात असे घडत नाही. एकाच ऐतिहासिक विषयावर अनेक ग्रंथ लिहिलेले आढळतात. म्हणजे इतिहासाचे पुनर्संशोधन एवढेच नव्हे, तर त्याच त्या विषयावर केलेले लेखन रटाळ अगर नीरस न वाटता वाचनीय व रोचक ठरते. ह्या भूमिकेचे स्पष्टीकरण व समर्थन, इतिहासाच्या क्षेत्रातील विशेषज्ञ प्रस्थापित निष्कर्षाचे तपशील वारंवार, सतत तपासून त्यावर पुनर्विचार करतात व त्यात सुधारणा करतात, ह्या प्रा. जी. एन. क्लार्कच्या मार्मिक विधानात आढळते. रियासतकार सरदेसाई म्हणतात त्याप्रमाणे इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा. हे तत्त्व सिद्ध करण्यासाठी नव्या काळाच्या संदर्भात इतिहासाचे पुनर्लेखन आवश्यक ठरते. इतिहासाचे पुनर्लेखन पुढील कारणास्तव करणे आवश्यक असते.

१) नवी संदर्भ साधने उपलब्ध होतात.
२) जुन्या संदर्भ साधनामध्ये नव्यांची भर पडते.
३) नवनवे विचारप्रवाह उदयास येतात.
४) नव्या दृष्टिकोणांचे संशोधक निर्माण होतात.

**१) नवी संदर्भ साधने उपलब्ध होतात :** इतिहासाचा वर्ण्य विषय भूतकालाशी संबंधित असतो. भूतकाल हा लिखित किंवा अलिखित संदर्भसाधनांमध्ये फरफटून पडलेला असतो. अलिखित संदर्भसाधने ही तर महत्त्वाची आहेतच पण इतिहासलेखन प्रामुख्याने कागदपत्रांवर आधारित असते. त्यामुळे प्रो. लंजीलास व सेनबॉस यांनी म्हटल्याप्रमाणे "No document, no history" या उक्तीबद्दल कोणताही संशय असण्याचे कारण नाही. बऱ्याच वेळा काही अनपेक्षित घटनांच्यामुळे काही संदर्भसाधने उपलब्ध होत असतात.

एखादे वेळेस घराण्याची कागदपत्रे नव्याने उजेडात येतात. अशी संदर्भसाधने इतिहासाच्या एकंदर ज्ञानामध्येच भर घालत असतात. अशा संदर्भ साधनांची संशोधकाने वेगवेगळ्या प्रक्रिया करून त्यांची सत्यता व विश्वासार्हता निश्चित केली पाहिजे. नव्या संदर्भ साधनावरून जी माहिती उपलब्ध होते ती इतर संदर्भसाधनांशी मिळतीजुळती असली पाहिजे. काही वेळा अशी माहिती आश्चर्यकारक सुद्धा असण्याची शक्यता आहे. तेव्हा अशी साधने ही इतिहासलेखन प्रक्रियेला मिळालेले मोठे वरदानच आहे असे समजावयास हरकत नाही. नवी संदर्भसाधने ही संशोधकाच्या दृष्टीने नवी

दालने खुली करून देतात. या नव्या दालनांमध्येच संशोधकाला समाजाला उपयुक्त असे संशोधन करावयाचे असते.

**२) जुन्या संदर्भसाधनामध्ये नव्यांची भर पडते :**अनेक वेळा असेही होते की, एखाद्या कालखंडावर सुरुवातीलाच अनेक संदर्भसाधने उपलब्ध असतात व अशा संदर्भसाधनांमध्ये नव्या साधनांची भर पडते, उदा. सुरुवातीस मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास उपयुक्त अशी संदर्भ साधने होतीच. त्यामध्ये वेळोवेळी मिळणाऱ्या साधनांची भर पडत गेली. अशाप्रकारे जेव्हा नवी साधने उपलब्ध होतात, तेव्हा त्याच त्याच घटनेवर नव्याने प्रकाश पडतो व घटनांचे नवे अर्थ उपलब्ध होतात. काही घटनांच्या बाबतीत जे गैरसमज असतात ते दूर होण्यास अनुकूल अशी परिस्थिती तयार होते. ज्यावेळी अशी संदर्भसाधने उपलब्ध होतात तेव्हा त्या भागाचा इतिहास लिहिणे जास्त सोयीस्कर होते. करवीर रियासतीचा अभ्यास करत असताना पेशवे दप्तरापासून ते आजपर्यंतच्या ताराबाईकालीन कागदपत्रे, जिजाबाईकालीन कागदपत्रे इ. चा चांगला उपयोग होतो. थोडक्यात म्हणजे जेव्हा संदर्भसाधने नव्याने उपलब्ध होतात तेव्हा इतिहास लेखणाची प्रक्रिया जास्त सोपी व सोयीस्कर ठरते.

**३) नवनवे विचारप्रवाह उदयास येतात :**इतिहास लिहीत असताना प्रत्येक इतिहासकारावंर कोणत्याना कोणत्या विचारसरणीचा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे इतिहासकार जेव्हा एखाद्या कालखंडाचा इतिहास लिहीत असतो, तेव्हा एखाद्या विशिष्ट अशा विचारसरणीनुसारच तो लिहीत असतो. इतिहासकारांच्या अन्वयार्थाचे जे अनेक प्रकार आहेत त्यापैकी एखाद्या विशिष्ट तत्त्वानुसार लेखनाचे कार्य सुरू असते. संशोधक जर मार्क्सवादी विचारसरणीचा असेल तर ऐतिहासिक घटनांचा अर्थ आर्थिक दृष्टिकोणातून लावला जाईल. जर एखाद्या संशोधकाच्या विचारसरणीवर सामाजिक मूल्यांचा प्रभाव असेल तर ऐतिहासिक घटनांचा अर्थ लावता असताना तो सामाजिक दृष्टिकोणातून अर्थ लावण्याचा प्रयत्न करेल. एखादे वेळेस असेही होणे शक्य आहे की, संशोधक हा विरोधी विचारसरणीचा असेल तर त्याच ऐतिहासिक घटनांमधून जो विरोधी सूर असेल, त्यानुसार तो इतिहास लिहिण्याचे काम करेल. अशा विरोधी विचारसरणीचे एक उदा. म्हणजे १८५७ चा भारतीय उठाव होय. या भारतीय उठावासंबंधी अनेक विचारप्रवाह आपणास दिसून येतात. १८५७ च्या उठावासंबंधी मुख्य दोन विचारप्रवाह दिसतात आणि ते म्हणजे इंग्रज अधिकाऱ्यांचा उठावसंबंधीचा एक दृष्टिकोण व दुसरा म्हणजे भारतीय इतिहासकांरानी मांडलेला दृष्टिकोण होय. सर्वसामान्य इंग्रजांचा दृष्टिकोण १८५७ च्या उठावाला 'बंड' असे संबोधण्याचा आहे. भारतीय

इतिहासकारांमध्ये सुद्धा मतभिन्नता दिसते. ही मतभिन्नता अगदी स्वातंत्र्ययुद्धापासून ते शिपायांची भाऊगर्दी या मतापर्यंत दिसून येते.

थोडक्यात म्हणजे प्रत्येक काळात जे नवे विचारप्रवाह उदयास येत असतात त्याचेच प्रत्यंतर आपल्याला या इतिहास लेखनामधून दिसत असते. खुद्द शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिताना सुद्धा आपणास अशाच प्रकारचे भिन्न विचारप्रवाह दिसून येतात. सबब आपल्याला ऐतिहासिक घटनेबद्दल वाद उपस्थित झालेला दिसू येतो.

**४) नव्या दृष्टिकोणाचे संशोधक निर्माण होतात :**प्रत्येक काळात नवी संदर्भसाधने उपलब्ध होतीलच असे नाही. तसेच नवे विचारप्रवाह उदयाला येतीलही परंतु इतिहासलेखन प्रक्रियेमध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे नव्या विचारसरणीचे व नव्या दृष्टिकोणाचे संशोधक निर्माण होत असतात. त्याच ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ नव्या दृष्टिकोणातून व नव्या संदर्भामध्ये लावला जात असतो. एखादा संशोधक जुन्या विचारसरणी विरुद्ध दुसराच एखादा विचार मांडण्याची शक्यता असते. प्राचीन भारताचा इतिहास लिहीत असताना आपल्याला याच गोष्टीची जाणीव होते की नव्या दृष्टिकोणाचे नवे संशोधक उदयास आल्याने प्रत्येक काळात त्या इतिहासाचे स्वरूप पालटत गेले. आधुनिक भारताच्या इतिहासाबाबत हाच अनुभव येतो. गेल्या ५-१० वर्षांत अनेक नवे संशोधक निर्माण झाले व त्यांनी त्याच घटनांचा अर्थ वेगवेगळा लावला.

वरील सर्व मुद्यांचा विचार करता, इतिहास विषयाचे आणि इतिहास लेखन प्रक्रियेचे स्वरूप ध्यानात घेता, इतिहासाचे पुनर्लेखन केवळ शक्य आहे एवढेच नसून ते आवश्यक आहे असा निष्कर्ष निघतो. इतिहास संशोधन ऐतिहासिक सत्याचा पुनर्विचार ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे, तसेच इतिहास लेखकाची मानसिकता, वैचारिक बैठक, त्याचे पूर्वग्रह, व्यक्तिग्रह या बाबीही लेखनप्रक्रियेतील महत्त्वाचे घटक असतात आणि म्हणून इतिहासाचा पुनर्विचार आणि पुनर्लेखन करणे प्रा. जी. एन. क्लार्क, रॉबिन कॉलिंगवूड इ व्यासंगी इतिहास समीक्षकांच्या मतानुसार महत्त्वाचे ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात व्यापकता आणि विविधता येते आणि वाचकांच्या ज्ञानाचे क्षितिजही विस्तारते.

इतिहासात राहिलेल्या त्रुटींमुळे पुनर्लेखनाची आवश्यकता आहे. नव्याने चिंतन मनन व्हायला पाहिजे असा एक गट होता. दत्तो वामन पोतदार यांच्या नेतृत्वाखाली पुनर्लेखनाची एक समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या अधिवेशनात समितीला "All India History Congress" हे नाव

दिले गेले. नंतर १९४० च्या अधिवेशनात काही महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. त्यात इतिहासाचे नव्याने लेखन करायचे आणि भारताच्या इतिहासाचे २० ते २५ खंड लिहून पुनर्लेखन करायचे असा ठराव केल्या गेला. नंतर एक केंद्रीय लेखन समिती स्थापन केली गेली. त्यात ३८ खंडामध्ये भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन करायचे हा निर्णय घेतल्या गेला. त्यात १९४३ पासून ते २००७ पर्यंत फक्त तीन खंड प्रकाशित झाले आहेत. भारतीय विद्याभवन संघटनेने भारताच्या इतिहासाचे इंग्रजांनी केलेल विकृतीकरण पुसून टाकायचे आणि नवीन लेखन करायचे असा निर्णय घेतला गेला. त्यानुसार के. ए. मुन्शीच्या अध्यक्षतेखाली भारतीय इतिहासाचे पुनर्लेखनाचे काम सुरू झाले. ते काम १० ते ११ खंडांमध्ये पूर्ण केले. १५००० पृष्ठ असलेला "History and Culture of People" हा ग्रंथ पूर्ण केला. भारतीय इतिहास परिषद सर जदूनाथ सरकार यांच्या अध्यक्षतेखाली जयचंद विद्यालंकार सारख्या इतिहासकारांना निमंत्रण देऊन इतिहासाचे पुनर्लेखन करण्याचा संकल्प त्यांनी सोडला. हिंदी भाषेतून विद्यालंकार यांनी खालील ग्रंथ लिहिले.

१) भारतभूमी और उनके निवासी.

२) भारतीय इतिहास की मिमांसा.

३) इतिहास प्रवेश भाग I, II

भारतीय इतिहास परिषद ह्या व्यतिरिक्त काहीही काम करू शकली नाही.

**व्यक्तिगत पातळीवर केलेले काम :**

अ) डॉ. देवसराय त्रिवेद यांनी व्यक्तिगत पद्धतीने लिखाण केले, ह्या लिखाणावर कोणाचेही नियंत्रण नसते, तसेच आर्थिक अडचणी असतात. तरीही डॉ. त्रिवेदी यांनी ३ ग्रंथाचे लिखाण केले.

१. True History of Bharatvarsha

२. Role of True Indian History

३. भारत का नया इतिहास.

ब) पु. ना. ओक - हे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिन्द सेनेत अधिकारी होते त्यांनी मध्यकालीन इतिहास लेखन केले. ते भाषाशास्त्राचे गाढे अभ्यासक आहेत. सत्य आणि असत्य यांचा मेळ त्यांच्या लिखाणात दिसून येतो.त्यांनी Institute of Relighting History ही संस्था स्थापन केली. मी म्हणते तो खरा इतिहास, अशा प्रकारचे इतिहास लेखन केले, त्यामुळे त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. तरी सुद्धा एक नवीन विचार म्हणून त्यांचा विचार करायला पाहिजे.

❀❀❀

# तौलनिक साहित्य आणि उत्तर वसाहतवाद

प्रा. डॉ. शिरीष लांडगे पाटील

**प्रास्ताविक:**

उत्तर वसाहतवादाचा अभ्यास हा तौलनिक साहित्य, संस्कृती, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, विज्ञान अशा अनेक ज्ञानशाखांशी नाते सांगणारा आहे. म्हणून आंतर्विद्याशाखीय संशोधनात हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. प्रस्तुत निबंधातून उत्तर वसाहतवाद, त्याच्या काही पैलूंचा आढावा घेण्याचा, त्याचवेळी एका व्यापक विषयाचा छोटा भाग स्पष्ट केला आहे. या संदर्भातील विस्तृत लेखन डॉ. आनंद पाटील, डॉ. चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

साहित्यकृतीकडे पाहण्याच्या काही प्रवृत्ती, विचार, धारणा असतात. त्यांची रीतसर मांडणी करणे म्हणजे सिद्धांतन असते. हा समीक्षेचा प्रारंभ मानला जातो. सिद्धांत हे मूल्य निर्माण करीत असतात. तर समीक्षा मूल्यांकन करीत असते. साहित्यसमीक्षेत १९७० - ८० च्या दशकात जागतिक पातळीवर संरचनावाद, विरचनावाद, चिन्हमीमांसा आदी सिद्धांतांनी क्रांती घडविली. तर १९९० च्या दशकात उत्तरसंरचनावाद, उत्तराधुनिक, उत्तरवासाहतवादाचे सिद्धांत उदयाला आले. या सिद्धांतांनी ऐंशीच्या दशकातील सिद्धांतांची कठोर चिकित्सा केली. यातील उत्तरवासाहतवादाविषयी मराठीत गेल्या दहा पंधरा वर्षांपासून लेखन होत आहे. त्याचा विचार करू.

**उत्तरवासाहतवाद शब्द चर्चा व पार्श्वभूमी :**

वसाहत या शब्दाला विशिष्ट अर्थच्छटा आहे. काही देशांनी साम्राज्य निर्माण करण्याच्या लालसेतून अनेक देशांवर आपली सत्ता प्रस्थापित केली. यातून जित - जेते असे नाते तयार झाले. जेत्यांनी सत्ता प्रस्थापित केलेल्या देशांचे वसाहतीकरण झाले. एकदा वसाहतीकरण झाले की, जेत्यांच्या प्रभावातून सुटका करून घेणे अवघड बनते. म्हणून वसाहतीकरण झालेले देश स्वतंत्र झाले पण जेत्यांचा प्रभाव नाहीसा झाला नाही.

युरोपीयन साम्राज्यवादामुळे वसाहतीची समस्या संपूर्ण पृथ्वीची झाली. वसाहतीकरण झालेले देश परावलंबी झाले. त्यांच्या संस्कृतींना दुय्यमतिय्यम समजून केंद्राबाहेर ढकलले गेले. त्यांचे सीमांतीकरण झाले. त्यांचे साहित्यादी कलांतील सौंदर्यविषयक निकष हीणकस समजले गेले.

बहुतेक देश स्वतंत्र झाल्यावर प्रश्न सुटतील असे मानले जात होते. पण प्रश्न न सुटता जटिल झाले. उदाहरणार्थ, आपल्याकडे शाहिरी वाङ्मयात स्त्रीच्या नाकाला चाफेकळीची उपमा दिलेली दिसते. एकेकाळचे हे सौंदर्यमूल्य आजच्या काळात बदलले गेले. बदलेल्या अशा कितीतरी मूल्यांमागे विशिष्ट वसाहतिक दृष्टिकोण असतात.

उदाहरणार्थ, सोवियत युनियनच्या विखंडनाने शीतयुद्धाची समाप्ती झाली. या घटनेचा विशिष्ट अर्थ काढला गेला. हा युरोचा ज्ञानाच, बौद्धिकतेचा विजय मानला गेला. यामुळे युरोपची ज्ञानसत्ता पश्चिमेतर समाजावर स्थापन झाली असा भ्रम विद्वानांनी पसरविण्यास सुरुवात केली. यातून काही संकल्पना पसरविण्यात आल्या. जगं हे ग्रहगोलीय खेडे आहे. सर्व संस्कृती एकाच पातळीवर आल्या आहेत. वेगवेगळ्या भूप्रदेशांची एक सर्वसामान्य संस्कृती उदयाला आली. आंतरराष्ट्रीय समाजाच्या निर्मितीची पार्श्वभूमी तयार झाली. साम्राज्ये लयाला गेली व राष्ट्रवाद निरर्थक ठरले आहे. या सगळ्यातून विश्वसंस्कृती, विश्वव्यापार हे शब्द योजले जाऊ लागले. अशा अनेकविध घटकांची कठोर चिकित्सा करण्यास उत्तरवसाहतवाद सिद्धांत मदत करतो.

मराठीत या संज्ञेला उत्तरवसाहतवाद, वसाहतोत्तरवाद, नववसाहतीय अशी नामाभिधाने मिळाली आहेत. त्यामागे स्वतंत्र अर्थच्छटा आहेत. उत्तर - वसाहतवाद असेही नामाभिधान केलेले आहे. त्यापैकी उत्तर वसाहतवाद हे नाव अधिक उचित मानले गेले. यातील वसाहतवाद म्हणजे जिंकलेल्या स्थानिक लोकांना ताब्यात ठेवणे, त्यांचे शोषण करणे होय. आणि उत्तरवसाहतिक साहित्य याचा अर्थ, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्यानंतर आलेले वाङ्मय म्हणजे उत्तरवसाहतिक साहित्य असा होत नाही. तर वासाहतिक संबंध जे सापेक्षाने तपासते ते उत्तरवासाहतिक साहित्य अशी व्याख्या एल्लेक बोहमेर यांनी केली आहे.[१]

उत्तरवसाहतिक (Post-Colonial) ही संज्ञा वेगवेगळ्या अर्थांनी वापरली जाते.

१) पाश्चात्त्य ऐतिहासिकवादी सर्वंकष रूपबंधाची टीका करायला ती उपयोगी पडते.
२) उत्तराधुनिकतावादी व उत्तरसंरचनावाद यांचे उपघटकही तिच्यात आढळतात.
३) सांस्कृतिक तर्क आणि सांस्कृतिक समीक्षा या दोन संरचनातून उद्भवणाऱ्या अवस्थांशी तिचा संबंध जोडला जातो.

४) स्वातंत्रोत्तर काळात राष्ट्रीय गटांच्या अपेक्षांच्या देशीवादी स्थितीला हे नाव दिले जाते.
५) तिसऱ्या जगातील बुध्दिवंतांच्या अनिवासीपणाची सांस्कृतिक खूण म्हणूनही ते वापरतात.
६) वसाहतवादी शक्तीचे अपरिहार्यपणे मोडलेले व द्विधाभावप्रवण परिभाषित असाही तिचा अर्थ होतो.[२]

**उत्तरवसाहतवाद सामर्थ्य आणि मर्यादा :**

उत्तरवासाहती अभ्यासक्षेत्र हे विविध ज्ञानशाखांचे आणि सिध्दांतांचे मिलनक्षेत्र आहे. तसेच रणक्षेत्र आहे. त्यात वसाहती करणारा आणि वसाहतीकरण झालेला यांच्यातल्या द्वंद्वात्मक संबंधांचा शोध घेतला जातो. उत्तरवासाहतवाद हा इतिहासाची संहितात्मक सुगमता न नाकरता तो वर्तमानाला प्रभावित करणाऱ्या भूतकाळालाच्या वास्तवतेवर लक्ष केंद्रित करतो. वसाहती राष्ट्रे वसाहतोत्तर काळात आपला भूतकाळ विसरण्याचा प्रयत्न करतात. परंतु वसाहतकालीन स्थितींविषयीच्या स्मृती दडपून टाकल्याने मुक्त होता येत नसते. उत्तरवसाहतवाद हा वसाहतोत्तर काळांतील स्मृतिभ्रंशाला विरोध करतो. वसाहतकालीन भूतकाळाची पुनर्निर्मिती करणे, स्मरणोजीवित करणे आणि त्या संदर्भात प्रश्न उपस्थित करणे हे उत्तरवसाहतवादाचे विद्याशाखीय कार्य आहे.

उत्तरवसाहतवादाला एडवर्ड सैदच्या 'ओरिएंटॅलिझम' (१९७८) या ग्रंथाने चालना मिळली. तर ॲशक्राफ्ट, ग्रिफिथ्स, टिफीन यांच्या ' दि एम्पायर राईटस बॅक' या ग्रंथाने चर्चा झाली. त्यानंतर गायत्री चक्रवर्ती - स्पीवाक, होमी भाभा यांच्या लेखनातून सिध्दांत आकाराला आला.

उत्तरवसाहतिक समीक्षा हा समीक्षाप्रकार युरोअमेरिकेत गेल्या चार दशकांपासून तयार झाला. त्याचे मूळ फ्रान्झ फॅननच्या क्रांतिकारी लेखनाशी जोडले जाते. या पंथातील समीक्षक असे मानतात की, सबाल्टर्न लेखकांना स्वत:चा आवाज क्वचितच असतो. सबाल्टर्न याचा अर्थ वसाहतीकरणात तुच्छ, कनिष्ठ, दुय्यम दर्जाचे ठरलेले असा होतो. वसाहतीकरण झालेल्या देशातील मध्यमवर्ग वांझोटा झालेला असतो. तो क्रांतीविरोधी असतो. स्वतंत्र झालेल्या वसाहती आज किती प्रमाणात स्वावलंबी आहेत. असे प्रश्न ही समीक्षा उपस्थित करते.

डॉ. आनंद पाटील या वसाहतिकतेचे मार्मिक उदाहरण देताना ते म्हणतात, कागदोपत्री वसाहतिक राजसत्ता संपुष्टात आली आहे. पण ऐतिहासिक आणि संस्कृतीशी निगडित असे परकीय साम्राज्याचे परिणाम

अजून टिकून आहेत. आपण वसाहतवादी केंद्रात मोठे, श्रीमंत झालो आहोत. परदेशी गुंतवणुकीवर वाढलेला लेखकांचा मोठा वर्ग केंद्रस्थानी आहे. पूर्वी केंद्रातील पाडगावकर - राजाध्यक्ष यांना मिळणारे पुरस्कार आता परिघातील कांबळेंना मिळायला लागले. नामदेव कांबळेंच्या संस्कृतप्रचुर शीर्षकाच्या 'राघववेळ' ला साहित्य अकादेमीचा पुरस्कार मिळतो. या लेखकाची ही पहिलीच कादंबरी आहे. राष्ट्रीय सन्मान मिळविणारा हा पहिला दलित लेखक आहे. पुरस्कार केंद्राकडून परिघाकडे सरकले यामागे वाङ्मयीन पुरस्कारांच्या 'सांस्कृतिक मॅचफिक्सींग' आहेत. समीक्षक कादंबरीपेक्षा कादंबरीकारावर अधिक बोलतात. यामध्ये कांबळेंची ओढाताण होते. भाजपाचा कार्यकर्ता आणि आंबेडकरवादी भूमिका या परस्परविरोधी भूमिकांची सांगड घालताना त्यांची ओढताण होते. केंद्रांचा पुरस्कार परिघाकडे सरकणे हा अपघात नाही तर सांस्कृतिक नेतृत्व टिकवणाऱ्या मराठीच्या उच्चवर्णीय केंद्राचे उत्तरवसाहतिक भारतीय अवतार मानावे लागतील. [३]

उत्तरवसाहतवादाच्या या सिद्धांतावर अनेकांनी आक्षेप नोंदविले आहेत. यात ऐजाज अहमद, आरीफ डार्लीक यांनी आक्षेप नोंदविले आहेत. ऐजाज अहमद म्हणतात -

१) पश्चिमेची पश्चिमेतर जगावर सत्ता गाजविण्याच्या वृत्तीच्या आकांक्षा उत्तरवसाहतवादातून नव्या स्वरूपात व्यक्त होतात.
२) हा सिद्धांत मांडणारे या ठिकाणी काम करतात त्यांचा दबाव म्हणून हा सिद्धांत पुढे आलेला आहे. (स्थलांतरित / तिसरे जग)
३) हा सिद्धांत पुस्तकी ज्ञानावर व वास्तवाच्या अज्ञानावर आधारित आहे.
४) या सिद्धांतासाठी या साहित्यकतींची चर्चा होते ते सर्व स्थलांतरित किंवा आपली मातृभाषा सोडून इंग्रजीत लेखन करणारे आहेत.
५) हे सिद्धांत भारतासारख्या वेगवेगळ्या प्रादेशिक साहित्याकडे दुर्लक्ष करतात. [४]

या सगळ्यातून उत्तरवसाहतवादाचे सामर्थ्य आणि मर्यादा यांची तोंडओळख नक्कीच होईल. साहित्यकृतीकडे पाहण्याची नवी दृष्टी उत्तरवसाहतवादाने दिली आहे. जागतिकीकरणाच्या काळात अनेक साम्राज्यवादी मूल्ये प्रस्थापित होणार आहेत. नववसाहतकाळात अनुकरणवादातून ही मूल्ये नक्कलखोर माणसे स्वीकारतात म्हणून आजच्या काळात उत्तरवसाहतवादी भूमिका कठोरपणे तपासून घ्याव्या लागतात. डॉ. चंद्रकांत पाटील हे या सिद्धांतव्यूहामागील राजकीय - सांस्कृतिक डावपेच ओळखण्याचे आवाहन करतात.

❀❀❀

# तौलनिक संशोधन पद्धती

प्रा.डॉ.अनिल गर्जे

तौलनिक संशोधन पद्धतीस साहित्याच्या संशोधनाची एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून अगदी अलीकडे मान्यता मिळाली आहे. त्यात दोन साहित्यकृतींची तुलना हा मूलभूत आधार आहे. याबाबत डॉ.सबनीस म्हणतात, "मानवी समाजात समान दुवे शोधून तुलना करण्याची प्रवृत्ती आणि परंपरा तशी जुनी आहे."[१] कलाकृती आणि तिच्या बाहेरच्या वास्तवाशी असलेल्या संबंधाचा शोध तौलनिक अभ्यास पद्धतीमुळे घेता येतो. तसेच ललित कलांचा आपसातील संबंधही तपासता येतो. विविध भाषांमधील समानसूत्र असणाऱ्या कलाकृतींचा तौलनिक शोध घेता येतो. एकाच भाषेतील वाङ्मयाची व्यक्तिविशिष्टता आकलन करण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धती उपयुक्त आहे. अर्थात दोन कलाकृती या तुल्यबळ असल्या तरच त्यांची तुलना अर्थपूर्ण होईल. विशिष्ट कलाकृतीवरील प्रभावाची चिकित्सा तुलनेत अपरिहार्य ठरते. त्याशिवाय प्रभावयुक्त अशा स्वतंत्र कलाकृतींच्या जन्माची कारण मीमांसाही या संशोधन पद्धतीने शक्य असते.

जीवनात व साहित्य व्यवहारातही तुलना ही स्वभाविकपणेच अंमलात येणारे वास्तव आहे. पण साहित्य विश्वाला नवे परिमाण देणारी एक संशोधन पद्धती म्हणून तौलनिक साहित्य अभ्यासाची शाखा पाश्चात्त्य जगात १९ व्या शतकात सुरू झाली मॅथ्यू अर्नोल्ड या विद्वानाने 'तौलनिक'[२] या शब्दाचा वापर प्रथम करून तौलनिक अभ्यास पद्धतीचा प्रारंभ केला अशी नोंद आढळते. त्यानंतर साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात तौलनिक पद्धतीचा अभ्यास शास्त्रीय अंगाने करण्याची लाट आली. त्यामुळे या अभ्यास पद्धतीची व्याप्तीही वाढली. एक स्वतंत्र अभ्यास पद्धती म्हणून तौलनिक साहित्याचा प्रथम कोठे आणि केव्हा वापर झाला ते सांगता येत नाही. जर्मन महाकवी ग्यो एथे (इ.स. १८२७), फ्रेंच विदुषी मादाम दस्ताईल, प्रसिद्ध इंग्रज टिकाकार मॅथ्यू अर्नोल्ड (इ.स. १८४८) अशा निरनिराळ्या देशातील थोर, उदार साहित्य चिंतकांच्या उद्‌गारात तौलनिक साहित्याच्या संकल्पनेचा उगम शोधता येतो.

१९ वे शतक महाराष्ट्राच्या जीवनातील संस्कृती संघर्षाचे शतक आहे. पाश्चात्त्य आणि पौर्वात्य संस्कृतीच्या महामंथनातून आधुनिक भारताच्या प्रसव

वेदनांचा हा काळ आहे. त्याचा परिणाम म्हणून येथल्या विचाराला लेखनाला तौलनिक परिमाण प्राप्त झालेले दिसते. गुजराथ देशाच्या इतिहासाला (पुणे १८८५) 'रायतुलना' (पृ. ३२१-३५२) हे परिशिष्ट जोडून लोकहितवादींनी इंग्रजी आणि देशी राजवटींची मर्मवेधी तुलना केली. ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री - पुरुष तुलना' (इ. स. १८८२) हे वादळी पुस्तक शीर्षकापासून तुलनेला महत्त्व देते आणि स्त्रीवादी जाणिवांनी पुरुषी शोषणाविरुद्ध आवाज उठविते. 'तृतीयरत्न' (इ. स. १८५०) सारख्या नाटकापासून वैचारिक लेखनापर्यंत म. फुले, सुप्त-प्रकट रूपात तौलनिक संस्कृतिमीमांसा करीत आहेत असे जाणवते. संस्कृत आणि इंग्रजी यांच्या तुलनेने म. मो. कुंटे, वि. कृ चिपळूणकर, गो. ग. आगरकर, हरिभाऊ आपटे, अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी काव्य नाटकांचा विचार तो याच काळाच्या आसपास केला. बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी थोड्या पुढच्या काळात 'कुमार संभव' आणि 'पॅरडाईज लॉस्ट' या महाकाव्यांचे तौलनिक विश्लेषण केले. कळत नकळत आलेल्या या तौलनिक जाणिवांना इ. स. १९०७ मध्ये महाकवी रवींद्रनाथ टागोरांनी ठसठसशीत उद्गार दिला. त्यांनी 'विश्वसाहित्य' आणि 'तौलनिक साहित्य' या संज्ञा पर्यायी संज्ञा म्हणून वापरल्या आणि तौलनिक साहित्याला एक भूमिका आणि दिशा दिली.

मोजणे, जोखणे, तोलणे, बरोबरीचे मानने, साम्य आणि भेद यांची पडताळणी करणे अशा वेगवेगळ्या अर्थांनी 'तुलना' हा शब्द वापरला जातो. तुलना म्हणताच एकापेक्षा अधिक घटकांची उपस्थिती गृहीत असते. तुलनेची एकके वेगवेगळी असली तरी ती तुल्यबळ असावी लागतात. तसेच त्यांच्यात लक्षणीय संबंध असावा लागतो. तुलनेमध्ये साम्य आणि भेद यांचे एक द्वंद्व असते. त्यात भिन्नतेतील साम्य आणि साम्यातील भिन्नता यांचा शोध घेतला जातो. तुलनेला केवळ साम्यभेदांची नोंद घेऊन थांबता येत नाही. एककांच्या अंगोपांगावर कोणता परिणाम होतो ते शोधावे लागते. त्यांचे स्वरूप आणि कार्य यांच्यावर कोणता व कसा परिणाम होतो, याचाही विचार करावा लागतो. विविध घटकांमधील साम्यभेदाची इंद्रियांना जेव्हा जाणीव होते तेव्हा तुलना संवेदनेच्या पातळीवर असते. अशा जाणिवांना शब्दरूप देण्याच्या प्रक्रियेत तौलनिक विधानांचा जन्म होतो. तौलनिक जाणिवा, विचार यांना जेव्हा संघटित आणि सूत्रबद्ध स्वरूपात व्यक्त केले जाते तेव्हा तुलनेला शास्त्रीय स्वरूप प्राप्त होते. तुलना ही बोध करून देणारी एक शोध पद्धती आहे. ती आपल्याला पद्धतशीरपणे सत्याकडे घेऊन जाते आणि निश्चित निर्णयापर्यंत पोहोचविते. त्यामुळे तुलना ही तत्त्वज्ञानाचा आधार मानली गेली. सैद्धांतिक संशोधनाचे साधन मानली गेली. थोडक्यात, तुलना हे एक ज्ञानसाधन आहे आणि

कोणत्याही ज्ञानसाधनाप्रमाणे त्याची प्रकृती तटस्थ असते. त्याचा वापर अनुकूल आणि प्रतिकूल करता येतो. तुलनेचाही तसा वापर केला गेलेला दिसतो.

तुलना या संज्ञेचे अधिक स्पष्टीकरण करावयाचे झाल्यास साधर्म्य, वैधर्म्य, उद्गम आणि प्रभाव या चार अंगांनी घेतलेला शोध होय़ तुलना दोन किंवा अधिक साहित्यात केली जाते. तुलनेचे क्षेत्र जेवढे मर्यादित असेल तेवढी ती समर्पक आणि सुसंबद्ध ठरण्याची शक्यता असते. दोन किंवा अधिक साहित्यांपुरतीच तुलना मयादित नाही, इतरही मानवी ज्ञानशाखा आणि साहित्य यांतील सापेक्ष संबंधही 'तौलनिक साहित्याभ्यासात येतात' असे काही विद्वान मानतात. हेन्री रेमॉक यांच्या मते, 'तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्याशी केलेली तुलना तसेच साहित्याची इतर किंवा मानवी आविष्कार क्षेत्रांशी केलेली तुलना'[३] हे त्यांचे मत योग्य आहे कारण ही क्षेत्रे म्हणजे साहित्येतर कला, तत्त्वज्ञान, इतिहास, भौतिकशास्त्र, सामाजिकशास्त्र, धर्म इ. होत. कलाविश्वातील प्रत्येक साहित्यकृती ही 'अनन्यसाधारण' मानवी अशी एक भूमिका आहे. तसे मानल्यास तुलना अशक्य होते. परंतु विश्वातील वाङ्मयात काहीतरी समान दुवे आढळतात. या साम्याच्या आधारे तुलनात्मक चिकित्सा शक्यही होते आणि आवश्यकही ठरते. शिवाय एका सीमेपलीकडे कोणतीही कलाकृती ही 'अनन्यसाधारण' राहत नाही.

कलाकृतीच्या अंतर्गत सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या अनेक संशोधन पद्धती आज अस्तित्वात आल्या आहेत. पण साहित्याचा विशाल, व्यापक असा विश्वस्तरीय पट विचारात घेऊन कलाकृतीचा शोध घेणे, तिचे मूल्य निर्धारण करणे हे सुद्धा महत्त्वाचे आहे. हे आवश्यक काम पारंपरिक संशोधन पद्धतीच्या तुलनेत तौलनिक संशोधन पद्धतीद्वारेच अधिक चांगले होईल. म्हणून निदान आज तरी कलाकृतीच्या रसग्रहण, विश्लेषण व मूल्यनिर्णयापर्यतच्या सर्व पातळ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सर्वात चांगला पर्याय म्हणून तौलनिक संशोधन पद्धती महत्त्वाची वाटते. गेल्या काही दशकापासून विद्यापीठीय स्तरावर तौलनिक वाङ्मयाशी संबंधित असे वेगवेगळे अभ्यासक्रम आणि नवे उपक्रम सुरु झाल्याचे दिसत आहे. तेव्हा अस्तित्वात असलेल्या कला विद्याशाखांची पुनर्रचना करण्याचा अंशत: प्रयत्न हळूहळू आपल्याकडे होतो आहे. खरे तर तौलनिक अभ्यास करण्यासाठी भारतीय प्रदेशासारखा वैविध्यपूर्ण देश विरळाच! किंबहुना आपल्या देशालाच सर्व विद्याशाखांच्यामध्ये तौलनिक अभ्यासाची गरजही अधिक आहे. वाङ्मयीन

विश्वातही तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व, सांस्कृतिक एकता टिकविण्यासाठी व विकसित करण्यासाठी अनन्यसाधारणच आहे.

एकूण सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात वाङ्मयीन व्यवहाराची चिकित्सा करताना समीक्षेला व्यापक भूमीवरून प्रवास करावा लागतो. त्यातही विभिन्न देशाच्या प्रदेशाच्या सांस्कृतिक परंपरेतील कलाकृतींच्या तौलनिक अभ्यासाने ही समीक्षा अधिक व्यापक भान पचवून उभी राहताना दिसते. आधुनिक युगातील आधुनिक माणसांचे आपसातील सर्व स्तरीय गुंतागुंतीचे अनुबंध तपासण्याच्या कामी तौलनिक संशोधन पद्धती सर्वाधिक उपयुक्त ठरणार आहे. विश्वात्मक संदर्भात विशिष्ट कलाकृतीचे कला परंपरेचे मूल्य सिद्ध करताना तौलनिक पद्धतीच श्रेयस्कर ठरते.

अस्तित्वात असलेले वाङ्मयीन अभ्यासाचे स्वरूप बदलून घेताना त्यांची व तौलनिक साहित्य अभ्यासाची सांगड कशी घालता येईल, हा एक जटिल प्रश्न असून त्याबाबत संबंधित विद्वानांच्या विधायक व बहु आयामी चिंतनाची गरज आहे. त्याशिवाय तौलनिक साहित्य संशोधनाची नवी शाखा अर्थपूर्ण ठरणार नाही. बदलत्या जगात वाङ्मयाच्या अध्ययनाचा विचारही नव्या संदर्भात व नव्या भूमिकेतून केला जाणे आवश्यक आहे. विशेषत: वाङ्मयाचे अध्यापन आपल्या सामाजिक गरजांशी सांगड घालूनच करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वाङ्मयाची व एकूणच कलात्मक जाणीव प्रगल्भ होऊन सांस्कृतिक संचिताचे शुद्धिकरण होण्याच्या दृष्टीने कलामूल्यांची सुसंगत मांडणीही आवश्यक आहे. या संपूर्ण प्रक्रियेत तौलनिक साहित्याभ्यास केंद्रस्थानी राहून एकूण अभ्यासविश्व समृद्ध करू शकेल.

तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने, अभ्यासकाचा जाणीव विश्वात क्रांती घडून येते. विविध भाषांच्या व वाङ्मयीन कलाकृतीच्या अभ्यासामुळे एक भाषिक संस्कारातून रुजलेल्या संकुचित धारणा नष्ट होऊन व्यापक भान येते. आपला प्रदेश, आपली संस्कृती, आपली भाषा यांच्या अस्मिता बलशाही व ताठर बनलेल्या असतात. तौलनिक साहित्याच्या अभ्यासातून ती ताठर व एकांगी भूमिका गळून पडते आणि एक प्रकारची सांस्कृतिक प्रगल्भता इतर भाषिक वाङ्मयाच्या अभ्यासातून संशोधकात संक्रमित होते. आपले जे जे आहे ते सर्वच श्रेष्ठ मानण्याची प्रवृत्ती अज्ञानातूनच आकार घेत असते. पण आपल्या सांस्कृतिक परंपरेपेक्षाही इतर सांस्कृतिक मूल्यव्यवस्था अधिक श्रेष्ठ असू शकते. याचे भान तौलनिक संशोधन पद्धतीद्वाराच येऊ शकते. किंबहुना आपल्या सांस्कृतिक पर्यावरणातही काही दोष व कुरूपता असल्याची वास्तवता तौलनिक अभ्यासामुळे जागृत झालेल्या विवेकातूनच लक्षात येते.

भिन्न भिन्न भाषांतील वाङ्मयीन कलाकृतींच्या तौलनिक संशोधनातून आपल्या व इतरांच्या संस्कृतीमधील किंवा भाषिक व्यवहारामधील गुण व दोषांची सम्यक जाणीव संशोधकाला होत असते. हा सांस्कृतिक विवेक सार्वजनिक जाणिवेत प्रतिबिंबित होऊन ते देशादेशांतील मानवीय संबंध अधिक मूल्यात्मक होण्यास मदत मिळते. तेव्हा विश्वमानवाच्या सुरक्षिततेसह विकसित संस्कृतीकरणासाठी व्यापक अर्थाने तौलिक साहित्याचे संशोधन महत्त्वाचे ठरते. आज तौलनिक साहित्य संशोधनाला विश्वात्मक मान्यता मिळत असून साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात या संशोधन पद्धतीमुळे एक नवी क्रांती घडून येत आहे आणि विविध देशातील, प्रांतातील आणि भाषेतील साहित्याचे अनुबंध अधिक उजळ होत असून भाषिक आकलनही वाढत आहे.

साहित्याचा वाङ्मयीन दृष्टिकोणातून अभ्यास करण्यासाठी तौलनिक संशोधन पद्धती अतिशय फायदेशीर आहे. दोन कलाकृतीतील काव्यतत्त्व, आशय, अभिव्यक्ती, आविष्कार पद्धती, रूपबंध, रूपके, कल्पनाबंध, उपमा, अलंकार या वाङ्मयीन मूल्यांच्या आधारेही तौलनिक साहित्याभ्यास केला जातो. भाषेतील नव्याने आलेले विविध प्रवाह, भिन्नभिन्न प्रवृत्ती यांचा शोध या साहित्याभ्यासाद्वारे घेता येतो. या संशोधन पद्धतीद्वारे दोन साहित्यात तुलना करताना समान तत्त्वांबरोबरच विरोधी तत्त्वांचाही शोध घेतला जातो. या अभ्यास पद्धतीमुळे साहित्याविषयी असणारे समज-गैरसमज, पूर्वग्रह दूर होतात. त्या त्या भाषेतील साहित्य, सौंदर्य, साहित्य वैभवाचा शोध घेता येतो. सु. रा. चुनेकर यांच्यामते, ''तुलनात्मक साहित्य संशोधन हे राष्ट्रीय संस्कृती, एकात्मता, सौहार्द व सहकार्य यास अत्यंत पोषक आहे. आपल्या शेजारच्या प्रांतातील लोकांविषयी आपले भ्रम दूर होऊन मने स्वच्छ होतील विविध प्रांतातील तसेच अन्य प्रदेशांतील साहित्य समृद्धीचे ज्ञान होऊन आपले स्वभाषेतील साहित्याचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय साहित्याच्या प्रकाशात परीक्षण करता येईल,'' [४] सु. रा. चुनेकरांचे मत अतिशय योग्य वाटते. कारण तौलनिक साहित्य संशोधनातून आपल्या साहित्याविषयी सजगता निर्माण होते. साहित्यातील उणिवा लक्षात येऊन आपण त्ती दूर करण्याचा प्रयत्न करू शकतो. तसेच गुणात्मक साहित्य निर्मिती करू शकतो. हे या संशोधन पद्धतीचे यश आहे.

थोडक्यात दोन भाषा, दोन लेखक, दोन साहित्य प्रकार, दोन कालखंड, दोन प्रवाह ही साधन सामग्री समजून परस्परावरील प्रभावांचा अभ्यास तौलनिक संशोधन पद्धतीत केला जातो.

❀❀❀

# विभाग ‘क’
# आंतर्विद्याशाखीय संशोधन

# साहित्य आणि मानसशास्त्र

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर

**प्रास्ताविक –**

साहित्य आणि इतर सामाजिक शास्त्रे या अंतर्गत या विषयाचा समावेश होतो. साहित्याच्या बाह्यकेंद्री भूमिका विचारात घेताना किंवा आंतर्विद्याशाखीय विचार करताना साहित्य आणि मानसशास्त्राचा अनुबंध तपासावा लागेल.

१९ व्या शतकात अनेक सामाजिक शास्त्राचा  उदय झाला. माणसाच्या बाह्य वास्तवापेक्षा अंतर्मनाचा विचार होऊ लागला. अंतर्मनातील घटनांचाही विचार होऊ लागला. जाणिवेच्या व नेणिवेच्या पातळीवर मनाचा विचार होऊ लागला. कलाकृती आणि मानवी याचा संबंध सांगताना सिंगमंड फ्रॉइडने म्हटले आहे की,  साहित्य व कला एक प्रकारचे दिवास्वप्नच आहे. त्यामध्ये प्रतिमा,प्रतीके,रूपके यांचा सढळ वापर केला जातो. खऱ्या इच्छा त्यात अवगुंठित केल्या जातात व साहित्यिक गुणांकडे अधिक लक्ष दिले जाते. कलाकृतीचा आशय नीट पाहिला की त्यातील अवगुंठित इच्छा कोणत्या हे स्पष्ट होते. जाणीव, नेणीव, स्वप्न, अहम्, स्व, इड, दमन, बोध, अबोध मन इ. सर्वच मानसशास्त्रीय संज्ञा व संकल्पना आहेत. या सर्वच संज्ञा व संकल्पनाचे प्रतिबिंब साहित्यकृतीतून प्रकट होत असते.

कलाकृतीतील वस्तूबद्दल, व्यक्तीबद्दल, प्रसंगाबद्दल, इतर अनेक घटकाबद्दल बारकाईने माहिती मिळविण्याच्या प्रयत्नातून सर्वच सामाजिक शास्त्राचा जन्म झालेला आहे. साहित्य आणि मानसशास्त्राच्या अनुबंधाबद्दल प्राचार्य डॉ. ह. श्री. साने म्हणतात की, होऊन गेलेल्या घटंनाप्रसंगाना मन:पटलावर स्मृतीच्या कुंचल्याने रंगविल्याशिवाय साहित्यसृजन शक्य होत नाही. याच ठिकाणी मानसशास्त्र प्रविष्ट होते. मानवीय आचार-विचारांची उजळणी आणि त्यांचे स्पष्टीकरण जेवढे मानसशास्त्रामुळे शक्य झाले आहे तितके कदाचित अन्य कुठल्याच शास्त्रामुळे नसेल. त्यामुळे मानसशास्त्राचा आणि साहित्याचा किंबहुना इतर सर्वच सामाजिक शास्त्रांचा आणि मानसशास्त्राचा घनिष्ट संबंध आहे.

मानवी मन हे या शास्त्राचे गृहीत तत्त्व आहे. यामुळेच सर्व घटना घडत असतात. माणूस हा सर्व श्रेष्ठ आहे. मानवाभोवतीच सर्व व्यवहार केंद्रित आहे. या व्यवहाराचा योग्य उलगडा या शास्त्रामुळे शक्य झाला आहे. वास्तविक साहित्य आणि मानसशास्त्र या दोन्हींची निर्मिती माणसानेच निर्माण केली आहे. साहित्याच्या माध्यमांतून आचार, विचार, भाव-भावना, कल्पना प्रकट होत असतात. या संदर्भातील विचार सिंगमंड फ्रॉइड, कॉर्लयुंग, कॉर्ल रॉजर्स, एरिक बर्न, फ्रान्सीस गाल्टन इ.नी मांडला आहे. निरीक्षण, विश्लेषण, प्रयोग, संज्ञा व संकल्पना, प्रकृती, प्रवृत्ती इ. मधून मानवी मनाचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे, असे वाटते.

मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून साहित्याचा अभ्यास करताना व्यक्तिरेखा, कथानक, घटना-प्रसंग इ. विचारात घ्यावे लागते. टी. एस. एलिएट म्हणतो की, कलावंत हा आपल्या समकालीनांपेक्षा अधिक आदिम तसाच अधिक सुसंस्कृत असतो. याचेच प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. या संदर्भात कार्ल युंग म्हणतो की, व्यक्तीच्या अबोध मनाच्या तळाशी आपल्या भूतकालीन विशेषत: बाल्यातील व शैशवातील अवरुद्ध अवशेषांच्याही खाली, 'सामूहिक अबोध मन' म्हणजेच आपल्या वांशिक भूतकालाचेच नव्हे - तर मानवजातीच्या अस्तित्वापूर्वीचे अवरुद्ध स्मृतिसंचित असते. या विचाराचे प्रतिबिंब कलाकृतीत उमटत असते. मराठीतील संज्ञाप्रवाही साहित्यात हा विचार विशेष ठळकपणे जाणवतो. विश्राम बेडेकरांची ' रणांगण', बा.सी. मर्ढेकरांची 'रात्रीचा दिवस',' पाणी', वसंत कानेटकरांची नाटके, रा.रं. बोऱ्हाडे यांचे कथालेखन इ.चा या संदर्भात विचार करता येईल, असे वाटते. कलाकृतीतील पात्राच्या मनातील मानसिक प्रक्रिया, भावनिक आंदोलने, मनाची तरलता आकलन होण्यास मदत प्राप्त होते.

**काही निरीक्षणे -**

१) मानसशास्त्रीय विचारामुळे साहित्यिकांच्या लेखनाला वस्तुनिष्ठता प्राप्त होते.

२) मानवी मनाची गूढता, अनाकलनीयता समजण्यास मदत होते.

३) मानसशास्त्रीय संज्ञा, संकल्पना, सिद्धान्त या सर्वांचे यथायोग्य आकलन होण्यासाठी

४) मानसशास्त्रज्ञ व लेखक या दोन्हींचा सहविचार होणे गरजेचा आहे.

५) साहित्य आणि मानसशास्त्र यांचा प्रगल्भ विचार गरजेचा आहे.

# साहित्य आणि सौंदर्यशास्त्र

डॉ. राजेंद्र सलालकर

लेखक जीवन जगत असताना त्याला जे अनुभव येतात, त्यामधून त्याचे त्याच्या जीवनानुभवाचे आकलन तयार होते. भोवतालच्या निरीक्षण आणि चिंतनातून त्याची जीवनदृष्टी तयार होते. लौकिक-अलौकिक जीवनशैलीचा त्याच्या मानसविश्वावर परिणाम होतो. त्यातून त्याचे अनुभवविश्व समृद्ध होत जाते. आपल्या जीवनात ज्या अनुभवांचे तीव्र संवेदन त्याला प्रतित होते, त्याला प्रतिक्रिया म्हणून तो लेखनकृतीसाठी प्रवृत्त होतो. आणि या सर्वांचे प्रतिबिंब त्याच्या साहित्यकृतीत पडत असते. अर्थातच आपल्या तीव्र संवेदनांचा आविष्कार करताना त्या अनुभवाला प्रतिभेचा स्पर्श झालेला असतो. त्यामधून कलाकृती आकार घेते. त्यानंतर ती रसिकांना आस्वादक्रियेसाठी प्राप्त होते. या आस्वादक्रियेमध्ये त्याचे लक्ष कलाकृतींच्या आशयाकडे जाते की आशयाच्या आविष्काराकडे यामधून त्याची साहित्यकृतीच्या मूल्यमापनाची भूमिका तयार होते.

कलाकृतीच्या वाचनामधून रसिकांला काय मिळते? किंवा तो कलाकृती का वाचतो? या प्रश्नाचे 'आनंद' हे एक उत्तर दिले जाते. हा आनंद त्याला सौंदर्यदर्शनामुळे किंवा सौंदर्यानुभूतीमुळे मिळतो, असे मानले जाते. मात्र त्याला आशयाचे सौंदर्य प्रभावित करते की रचनेचे? हा प्रश्न सनातन आहे आणि त्याचे नेमके उत्तर शोधताना मतभिन्नता आढळते.

अक्षर साहित्याबद्दल पाश्चात्त्य टीकाकारांमध्ये प्रथमतः फ्रेंच टीकाकारांनी सत्य, शिव व सुंदर या त्रयीचा उल्लेख केलेला आढळतो. अर्थातच भारतीय साहित्यातही ही सृष्टी जशी त्रिगुणांनी विनटलेली आहे तशी सत्य, शिव व सुंदर या त्रयींनी विनटलेली आहे, अशी समजूत होती. अशा त्रयीचे एकत्र दर्शन ज्या साहित्यात घडते ते श्रेष्ठ दर्जाचे साहित्य अशी ही भूमिका आहे. मात्र या तिन्ही संज्ञा नेमक्या अर्थाने वापरलेल्या दिसत नाहीत. त्यामुळे या संज्ञेबद्दल पुष्कळ मतभेद दिसतात. तरीही कोणताही कलावंत हा सौंदर्यजीवी आणि सौंदर्योपासक असतो, असे मानले जाते त्यामुळे साहित्य आणि सौंदर्य यांचा संबंध मानला जातो.

कला व साहित्याचा सौंदर्यविषयक अभ्यास सौंदर्यशास्त्रात केला जातो. कलाकृतीच्या आस्वादातून रसिकाला कोणत्या प्रकारचा अनुभव येतो? या अनुभवाचे स्वरूप, विश्लेषण सौंदर्यशास्त्रात केले जाते. उदा. भिंतीवरील चित्र सुंदर आहे या चित्राची सौंदर्यमूलक अनुभूती आल्यानंतर या अनुभवाचे विश्लेषण करताना प्रमाणबद्धता, लय, रंगसंगती, उठावदारपणा, समतोल व आकर्षकता या गुणांमुळे चित्र सुंदर बनते, असे विश्लेषणाअंती कळते. मानवाच्या या सौंदर्यविषयक अनुभूतीच्या पद्धतशीर अभ्यासाला सौंदर्यशास्त्र म्हणतात.

कलावंत जेव्हा एखादी मूर्ती घडवितो, तेव्हा त्याच्या भावस्थितीचे प्रतिबिंब त्या मूर्तीत पडत असते. त्याचे प्रत्यंतर रसिकाला आस्वादप्रक्रियेत येत असते. साहित्यकृतीमध्येही लेखकाच्या विविध भावस्थितीची अनुभूती व्यक्तिरेखांच्या उभारणीतून येत असते. जेव्हा साहित्यास्वाद घडत असतो; तेव्हा तो भावनावश होऊन प्रतिक्रिया देत असतो. या अनुभूतीविषयी काही सामान्य नियम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न या शास्त्रात केला जातो. त्यासाठी मनाच्या स्वरूपाचे व क्रियांचे सूक्ष्म ज्ञान असणे गरजेचे आहे. म्हणून सौंदर्यशास्त्रातील नियम हे आदर्शवादी आहेत. मात्र ते कलावस्तुविषयीचे नियम नसून कलावस्तूची अनुभूती घेणाऱ्या मानवी मनाच्या अंतरंगाविषयीचे सामान्य नियम असतात.

हे खरे असले तरी सुंदर कशाला म्हणायचे? सौंदर्याचे अधिष्ठान कोणते? याविषयी कमालीची मतभिन्नता भारतीय आणि पाश्चात्त्य मीमांसकांमध्ये दिसते. वामनाने अलंकारांना काव्यसौंदर्य मानले. कुंतकाच्या मते काव्यातील चमत्कृती म्हणजे सौंदर्य. अभिनव गुप्तासह रससंप्रदायी श्रेष्ठता सौंदर्यनिदर्शक मानतात. जगन्नाथ काव्यातील रमणीयतेला सुंदर मानतो. एलेन शार्प लयबद्धता म्हणजे सौंदर्य मानतो. रीडच्या मते अभिव्यक्ती म्हणजे सौंदर्य. तर कीटसच्या मते सत्य म्हणजे सौंदर्य आणि सौंदर्य म्हणजे सत्य. शरश्चंद्र मुक्तिबोध आशयाचे तर मर्ढेकर अभिव्यक्तीचे सौंदर्य मानतात. थोडक्यात सुंदर या संकल्पनेबाबत पुष्कळ मतभिन्नता आढळते.

नेत्र इंद्रियाद्वारा मनाला जे सुखावह वाटते ते 'सुंदर' या शब्दाने व्यक्त होते. यामुळे कलेच्या संदर्भात सौंदर्याची चर्चा करताना दृक संवेदनेला प्राधान्य मिळाल्याचे दिसते. त्यानुसार पूर्णता, प्रमाणबद्धता, चमकदारपणा, योग्य रंगसंगती ही सौंदर्याची लक्षणे मानली गेली. म्हणूनच संस्कृत साहित्यातही चंद्रासारखे मुख, कमळासारखे डोळे, मोत्यासारखे दात, चाफेकळी नाक अशा नेत्र संवेदना महत्त्वाच्या ठरलेल्या दिसतात.

मात्र नेत्रसुखदता हा केवळ चित्र, शिल्प, नृत्य अशा दृश्य कलांपुरताच मर्यादित राहील. संगीत ह्या श्राव्य कलेला हे लागू पडणार नाही. इंद्रियगोचर संवेदनेपेक्षा वेगळ्या प्रकारची अनुभूती सौंदर्य या शब्दाने सुचविली जाते. म्हणजे साहित्यकृतीचा परिणाम केवळ इंद्रियांना सुखावह होतो, यापेक्षा तो मनाला सुखविणारा ठरतो की नाही, यावर मोजला जातो. काही टीकाकार सौंदर्याची सांगड बुद्धीशी घालतात. तर म. गांधी नैतिकता आणि मानवतेचे अधिष्ठान सौंदर्याचे निदर्शक मानतात. क्रोचेच्या मते सौंदर्य हे वस्तूच्या ठिकाणी नसून पाहणाऱ्याच्या दृष्टीवर अवलंबून असते. तर रिचर्डसच्या मते हे सौंदर्य वस्तुगत असते. सुंदर वस्तू स्वत:कडे कलावंताचे मन खेचून घेते. अर्थात येथे उपयुक्ततेचा संदर्भ नसतो. त्यामुळे तेथे स्वार्थी प्रेरणांना स्थान नसते.

सौंदर्य हे मनोहर असते, चित्तवेधक असते व प्रभावशाली असते, हे मान्य होईल. मात्र सौंदर्याच्या नेमक्या कोणत्या वैशिष्ट्यामुळे आपले मन आकर्षिले जाते याबद्दल एकमत होणे कठीण आहे. भौतिक सृष्टीवरच कलासृष्टीही आधारलेली असते. तरी भौतिक सृष्टीतील जे जे सुंदर आहे ते सर्व कलासृष्टीत जसेच्या तसे सुंदर वाटेलच असे नाही. अर्थात हे कलावंताच्या सौंदर्यानुभूतीवर आणि आविष्कारावर अवलंबून असते. हा आविष्कार प्रमाणबद्ध, सुसंवादी, लयबद्ध व वैचित्र्यपूर्ण करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. या गुणविशेषांनीयुक्त आविष्कारामुळेच ती कलाकृती सुंदर मानली जाते. लेखकाचा कलानुभव, त्याची क्रियाशील कल्पनाशक्ती व त्याचे मांडणी किंवा रचनेचे कौशल्य या सर्वांच्या एकत्रित परिणामाने सौंदर्याची प्रचिती घडत असते. लेखक आपल्या प्रातिभबळाने भौतिक जगातील कुरूपही कलाकृतीत सुंदर करू शकतो. उदा. उकिरड्याचे चित्र सुंदर ठरू शकते. नाटकातील खलनायकी पात्र प्रत्यक्षात आवडणारे नसले तरी नाटकातून त्याचे घडणारे दर्शन मनोहर असते. कारण नाटकात त्या खलव्यक्तीच्या चित्रणाला प्रतिभेचा स्पर्श झालेला असतो. कलावंताच्या अभिव्यक्तीवर सौंदर्य अवलंबून असले, तरी त्याने काय अभिव्यक्त केले यालाही महत्त्व आहे.

सत्य, शिव व सुंदर या त्रयी एकमेकात मिसळून गेलेल्या अशा एकत्रित स्वरूपात कलेच्या द्वारा जाणवतात, असे म्हटले पाहिजे. यातल्या कोणत्या घटकाला सर्वोच्च प्राधान्य द्यायचे ते रसिकाच्या दृष्टिकोणावर व मनोभूमिकेवर अवलंबून असते. त्यांच्या एकमेकांत केवळ द्वैत आहे असे म्हणणे योग्य ठरत नाही. सत्याला जे अग्रक्रम देतात ते जीवनवादी, शिवतत्त्वाचे सर्वोच्च स्थान मानतात ते नीतिवादी व सुंदर या तत्त्वालाच जे

सर्वस्व मानतात ते केवळ कलावादी अशी विभागणी तात्त्विकदृष्ट्या मान्य करता येईल.

परंतु साहित्याच्या मूल्यमापनाचा निकष कोणता मानायचा? कलाकृतीच्या आशयाला महत्त्व देऊन आशयाचे सौंदर्य सर्वोच्च मानायचे की अभिव्यक्तीला प्राधान्य देऊन आविष्काराचे सौंदर्य सर्वोच्च मानायचे? याविषयी प्रचंड मतभिन्नता जाणवते. त्यामुळे हा प्रश्न सनातन आहे, असे म्हणावे लागते. याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

कांटने साहित्यकृतीच्या मूल्यमापनाच्या संदर्भात स्वायत्ततावादाचा पाया घातला. त्याने आपला स्वायत्त सौंदर्याचा सिद्धांत मांडताना सौंदर्य व्यवहार हा ज्ञान, नीती व रोचकता या तिन्हीहून भिन्न आहे, त्याचे मूल्य स्वयंभू आहे असे दाखविले. त्याच्या मते नैतिकता, रोचकता हे लौकिक आनंद त्या त्या गोष्टीच्या प्रत्यक्ष अस्तित्वाच्या अपेक्षेवर आधारलेले असतात. परंतु सौंदर्यवस्तू पासून आपल्याला निरपेक्ष आनंद मिळतो. सौंदर्यानुभवात वस्तूच्या प्रत्यक्ष अस्तित्वाविषयीचे प्रश्न अप्रस्तूत असतात. लौकिक आनंद मिळविण्यासाठी आपल्याला प्रत्यक्ष कृती करावी लागते. सौंदर्यानंद मात्र केवळ तटस्थ अवलोकनाने मिळतो. तो सार्वजनिक असतो. सौंदर्यानुभवात संकल्पना नसल्यामुळे त्याची सार्वत्रिकता कोणत्याही निश्चित संकल्पनेवर आधारलेली नसते. सौंदर्यानुभव हा भावलेल्या संगतीचा, नियमरहित नियमिततेचा प्रत्यय असतो. सुंदर वस्तूच्या रचनेचे कोणतेच नियम स्पष्ट नसतात. असे नियम नसतानाही सौंदर्याचा आनंद हा प्रत्येकाला झालाच पाहिजे. म्हणजेच कलाकृतीचे सौंदर्य स्वायत्त असते.

कांटच्या स्वायत्ततावादी भूमिकेचा प्रभाव पुढे विश्वचैतन्यवाद्यांवर पडलेला दिसतो. हेगेल ते बोंझाकीट - कॉलिंगवूड- कॅरिटपर्यंत सौंदर्यवाद्यांवर कांटच्याच विचारांचा प्रभाव होता. 'कला म्हणजे विश्वचैतन्याचा इंद्रियगोचर माध्यमात आविष्कार.' या गोष्टीला महत्त्व देऊन आविष्कारवादी सिद्धांत मांडले आहे.

कलाकृतीच्या मूल्यमापनाचा विचार म्हणजे मर्ढेकरांचा सौंदर्यशास्त्रीय विचार होय. मराठी समीक्षेत लय मांडल्यानंतर कलाकृतींच्या मूल्यमापनाच्या अनुषांगाने गंभीर चर्चा सुरू झाल्याचे दिसते. कलाकृतीबद्दल ढोबळ टिप्पणी करण्याची पद्धत त्यामुळे मागे पडली आणि समीक्षकांचे ललितकृतीवर प्रत्यक्ष लक्ष केंद्रित होऊ लागले. मर्ढेकरांच्या लयसिद्धांताचा विरोध करणाऱ्या प्रा. शरश्चंद्र मुक्तिबोधांनीही ही गोष्ट मान्य केलेली आहे.

मराठीमध्ये बा. सी. मर्ढेकरांच्या कलावादावर कांटचा प्रभाव आहे. मर्ढेकरांनी कलाकृतीच्या मूल्यमापनाचे सौंदर्यमूल्य हे अंतिम मूल्य मानले आहे. त्यांच्या मते सौंदर्यमूल्य हे स्वयंभू, साध्यात्मक व केवळ असून त्याचा ज्ञान, नीती यांच्याशी काहीही सबंध नाही. कलेला सांस्कृतिक महत्त्व नाही. विशुद्ध संवेदना व लयबद्ध रचना ह्या गोष्टी त्यांच्या सौंदर्यविचारात महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या मते कोणत्याही कलाकृतीत त्या-त्या कलेच्या माध्यमाची, त्यातील विशुद्ध संवेदनांची लयबद्ध रचना झालेली असते. लयबद्ध रचना म्हणजेच सौंदर्य. ही लयबद्ध रचना व्यावहारिक व तार्किक रचनांपेक्षा वेगळी ठरते. कारण व्यावहारिक रचनेचा हेतू तिच्याबाहेर असतो. तार्किक रचना ही तार्किक नियमांनी सिद्ध होते, तर लयबद्ध रचना ही संवाद-विरोध-समतोल या नियमांनी सिद्ध होते. साहित्यात विशुद्ध संवेदना नसल्यामुळे तेथे भावार्थाची लयबद्ध रचना होत असते. साहित्याचा घाट भावनार्थाच्या लयबद्ध रचनेत असतो. त्यामुळे साहित्य हे साहजिकच नीती व ज्ञान क्षेत्रापेक्षा स्वायत्त ठरते.

मर्ढेकरांनी सौंदर्यवाचकं विधानाचे स्वरूप स्पष्ट करून अनुभूतीला शब्दांच्या चिमटीतून सोडवले. 'अजिंठ्याची लेणी सुंदर आहेत' हे विधान प्रत्यक्ष लेणी पाहणाऱ्याने करणे आणि प्रत्यक्ष न पाहणाऱ्याने करणे या दोन्ही वाक्यातील शब्द एकच असले तरी यात अनुभूतीचा मोठा फरक असतो. म्हणून सौंदर्यवाचक विधान हे अनुभवनिष्ठच असू शकते, वर्णनात्मक, तर्कवाचक विधान हे अनुभवनिष्ठ व वर्णनात्मकही असू शकते. मात्र प्रत्यक्ष अनुभवावाचून सौंदर्यवाचक विधानाला गत्यंतर नसते. तर्कवाचक विधान मात्र प्रत्यक्ष अनुभवावाचून करता येते.

यामधून सौंदर्याला अनुभवाशिवाय स्वतंत्र असे अस्तित्व असू शकते काय? सौंदर्याचे अस्तित्व हे अनुभवावर अपरिहार्यपणे अवलंबून असते काय? 'अजिंठ्याची लेणी सुंदर आहेत' या 'मी' म्हणजे अहम केंद्रित विवक्षित विधानातून अनुभवाच्या आधारावर इतर कोणतेही व्यापक विधान करता येणार नाही. परंतु मला सौंदर्यवाचक विधान करायचे झाल्यास मला विवक्षित अहंकेंद्री विधानाच्या पुढे जाऊन वस्तुनिष्ठ विधान करता यायला हवे. म्हणजे एका खाजगी सत्याला सर्वसामान्य वस्तुनिष्ठ सत्याची योग्यता कशी प्राप्त करून द्यायची? याचे उत्तर असे की वस्तुनिष्ठ, सर्वसामान्य अशी जी सुसंवादी, विरोध, समतोलपणा ही लयतत्त्वे यांच्या आधाराने आपण एका खाजगी सत्याला सर्वसामान्य, वस्तुनिष्ठ सत्याच्या पदवीप्रत पोहचवितो. इंद्रिय संवेदनांची सार्वत्रिकता आणि तत्त्वांची सार्वत्रिकता व वस्तुनिष्ठता कोणत्याही

विधानाला लाभणे अशक्य असते. मग ते विधान तर्कनिष्ठ असो की सौंदर्यवाचक.

साहित्यकृती 'संवाद, विरोध व समतोल' अशा तीन तत्त्वांची लयनिष्ठ संघटना असते. हा ललितकृतीच्या रचनेचा विचार त्यांनी मांडला. ज्यावेळी ही तीन तत्त्वे साहित्यकृतीत आढळून येतात तेव्हा ती कलाकृती ठरते. ललित वाङ्मयामध्येही खरे महत्त्व 'घाटा'लाच असते. वाङ्मयाचे लालित्य, त्याची कलात्मकता त्याच्या घाटामध्ये असते. शब्दांच्याद्वारा साकारलेल्या भावार्थाच्या घटकांचाही संवाद, विरोध समतोलयुक्त म्हणजे लयनिष्ठ रचना केली की वाङ्मयीन कलाकृती बनते. हे लयतत्त्व म्हणजे कलाकृतीचा गाभा असते. ते जीवनार्थनिरपेक्ष असे सौंदर्यतत्त्व असते. वाङ्मयीन संघटनेचे घटक हे जरी भावार्थयुक्त असले तरी तिचे सौंदर्य तिच्या लयनिष्ठ संघटनेतच शोधायला हवे, अशी मर्ढेकरांची भूमिका आहे.

प्रा. शरश्चंद्र मुक्तिबोध यांनी याविषयी रस तत्त्वाच्या अप्रस्तुततेबाबत आणि मर्ढेकरादी प्रभूतींच्या कलावादी मूल्यनिकषांच्या विरोधात ठामपणे विरोधाची भूमिका घेतलेली दिसते. त्यांच्या मते लेखक कलाकृतीच्या निर्मितीत आणि रसिक कलाकृतीच्या आस्वाद केवळ आनंद शोधण्यासाठी क्रियाशील होत नसून जीवनाच्या व्यापक, सखोल आणि गुंतागुंतीच्या घट्ट विणेने प्रभावित होऊन जे प्रत्ययाला येते ते त्याची अनुभूती शब्दांच्याद्वारा सगुण व साकार झाल्याचा प्रत्यय येतो म्हणून रसिक तिच्याकडे आकर्षिला जातो. साहित्य व्यवहार हा केवळ एक क्रीडेचा प्रकार नसून ती एक गंभीरपणे लेखनाची व आस्वादण्याची क्रिया आहे. तिचे मानवी जीवनाच्या आंतरिक गतिविधीशी निकटचे नाते असते. म्हणून केवलानंदापेक्षा आशयाची घनता अधिक महत्त्वाची असते असे मुक्तिबोध मानतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनाचे जे भयाण वास्तव समोर आले, त्याचे परिशीलन करण्याच्या प्रवृत्तीतून जे वाङ्मय निर्माण झाले ते केवळ सुंदर रूपरचना करण्यासाठी नव्हते. तर जीवनाचे रहस्य व रूप शोधण्याच्या तळमळीतून उगवलेले होते. म्हणून ती मौलिक लेखनकृती ठरते. जीवनातील गुंतागुंतीचे विश्लेषण करताना कलावंताला प्रखर साधना करावी लागते. ही कलावंताची साधना कलाकृतीचे व्यवच्छेदक लक्षण ठरत नसली तरी लयतत्त्वासारख्या तांत्रिक बाबीचा वापर करून जेव्हा एखादी कलाकृती श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न केला जातो, तेव्हा मुक्तिबोध त्यावर तीव्र आक्षेप घेतात. कलाकृतीमध्ये जीवनाच्या व्यामिश्र अनुभवाचे संघटन केलेले असते. त्याचा रसिकाच्या मनावर सखोल परिणाम होतो. त्याच्या जाणिवेच्या कक्षा

रुंदावल्यामुळे त्याचे जीवनानुभूतीचे आकलन अधिक समृद्ध होते. म्हणून अशा अनुभवदर्शनापासून फटकून असलेले कोणतेही सौंदर्यतत्त्व कसे मान्य करता येईल? असा त्यांचा प्रश्न आहे.

तसेच आधुनिक कालखंडामध्ये जीवनाचे सारे संदर्भ बदलत असताना आणि वाङ्मयाची प्रकृती बदललेली असताना कलाकृतीच्या मूल्यमापनासाठी रस सिद्धांत प्रस्तुत ठरत नाही. कारण कालिदासादी कवींची आणि आधुनिक कवींची उद्दिष्ट्ये भिन्न आहेत. त्यांच्या साहित्यकृतीमधील घटकांची ललितकृतीगत कार्येच भिन्न आहेत. घटकांना एकत्र आणून त्यांच्याद्वारे एक सर्वसामान्य मनोवस्था आस्वाद्य करून देणे हे कालिदासादी कवींचे कलाकृतिगत घटकांचे कार्य तर घटकांना स्वतंत्रपणे एकत्र आणून त्यांच्याद्वारे जीवनाचा एकार्थ प्रतित करून देणे  हे आधुनिक लेखक कवींच्या कलाकृतीगत घटकांचे कार्य आहे. म्हणून आधुनिक वाङ्मयाच्या मूल्यमापनाला रस सिद्धांत प्रस्तुत ठरत नाही अशी मुक्तिबोधांची ठाम भूमिका आहे.

प्रभाकर पाध्ये यांच्या मते सौंदर्यानुभवाचे 'अनुभवपूर्व तत्त्व' केवलास्वाद स्वप्नरंजनात्मक हे आहे. सौंदर्यानुभव स्वरसरंजनात्मक स्वरूपाचा असल्यामुळे त्या अनुभवाच्या बाहेरचे सर्व संदर्भ गैरलागू ठरतात. नैतिकदृष्टी, सत्यदर्शन हे कलेचे निकष म्हणून स्वीकारता येत नाहीत. साहित्यकृती ही अन्यूनअनतरिक्त रचना असते. पाध्यांची ही भूमिका मर्ढेकरांहून भिन्न असली तरी स्वायत्ततावादीच आहे.

साहित्यकृतीच्या मूल्यनिकषाबाबत ही परस्पर भिन्नता विचारात घेतल्यानंतर या निकषांबाबत रा.भा. पाटणकरांची भूमिका काहीशी सम्यक वाटते. त्यांनी द्विध्रुवात्मकतेचा सिंद्धात मांडून साहित्य ही कला लौकिक ध्रुवाकडे झुकलेली असते असे मत मांडलेले आहे. त्यांच्या मते साहित्य कलेत केवळ सौंदर्यात्मक तत्त्वानुसारच नव्हे तर ज्ञानात्मक, नैतिक तत्त्वानुसारही संघटन होत असते. सौंदर्यास्वाद हा आनंदरूपच असतो. त्यामध्ये सौंदर्यानंद लौकिक असतो की अलौकिक हे पाहणे गरजेचे आहे. संवेदनासुख व प्रेरणातृप्तीचे सुख हे लौकिक असते. सुखद मनोवस्था ही लौकिकच असते. परंतु कलानुभवातली आनंदरूपता अलौकिकतेला पोषक ठरतेच असे नाही. मात्र कांटच्या स्वायत्त सौंदर्यामुळे मिळणारा विरागी आनंद हाच फक्त निश्चितपणे अलौकिक असतो असे म्हणता येते.

म्हणून कलामूल्ये ही स्वतंत्र, स्वयंभू, स्वायत्त व केवळ असतात. याउलट लौकिकतावाद्यांच्या दृष्टीने कलामूल्ये व जीवनमूल्ये यात जातीचा भेद

नसून संख्यात्मक असतो. लौकिकतावाद्यांच्या दृष्टीने साहित्यमूल्ये ही केवल नसल्यामुळे ती समाज, संस्कृती व काल सापेक्ष असतात.

पाटणकरांच्या मते लौकिकतावाद व अलौकिकतावाद यांची मुळे एकमेकात गुंतलेली आहेत, की कलेचे व सौंदर्याचे ते दोन स्वतंत्र प्रकार आहेत, असे म्हणण्यापेक्षा या दोन संकल्पना आहेत व त्या द्विध्रुवात्मक आहेत. कारण माणसाच्या सर्वच कृती त्यांच्या लौकिक जीवनस्त्रोतापासून निघालेल्या असतात आणि त्या या स्त्रोताचे पोषण करतात. संगीतासारखी कला ही स्वायत्त आहे मात्र आशयुक्त कलांचा स्वभावच असा आहे की त्या संगीताप्रमाणे पूर्णपणे स्वायत्त व अलौकिक बनू शकत नाहीत. म्हणून ते स्वत:ही लौकिककतावादाचे समर्थन करतात.

❀❀❀

# वैज्ञानिक, सामाजिक व साहित्य क्षेत्रीय संशोधन

**प्रा. डॉ. शारदा मोरे**

मानवी जीवनात काळानुसार वेगवेगळे बदल, स्थित्यंतरे, परिवर्तन होणे अपरिहार्य आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जग झपाट्याने नवीन बदल स्वीकारू लागले आहे. माणसासाठी विविध ज्ञानक्षेत्रांचे दालन खुले झाले आहे. जिज्ञासा ही माणसाची सहज प्रवृत्ती असल्याने तो संशोधनाकडे सहज वळला. त्यामुळे आज मानवी जीवनाचा चेहरा संशोधनाभिमुख बनला आहे. आज जीवनाची सर्व क्षेत्रे संशोधनाने व्यापली आहेत. संशोधन हे आधुनिकतेचा कणा बनला आहे.

संशोधन ही एक प्रवृत्ती असून ती कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित आहे, असे नाही. तिने जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. मानवी जीवनात असे एकही क्षेत्र नाही ज्यात संशोधनाचा उपयोग केला जात नाही. म्हणूनच विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी शोधकवृत्ती, चिकित्सकवृत्ती, जिज्ञासा, कुतूहल असणे आवश्यक आहे.

मानवाच्या सर्व जीवनांगावर संशोधनाचे जाळे पसरले आहे. संशोधनाला इंग्रजीत Research म्हटले जाते. हा इंग्रजी प्रतिशब्द योग्यच आहे. Research म्हणजे पुन्हा शोध घेणे. त्यामुळे संशोधनाचा अर्थ अभ्यासकांनी अनेक व्याख्यांतून सांगितला आहे.

"संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्त्वे परीक्षणासाठी केलेला चिकित्सक व पद्धतशीर अभ्यास." (वेबस्टर कोश)

"एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा साक्षेपी व पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन."

"संशोधन म्हणजे अभ्यासपूर्ण रीतीने केलेली एक चौकशी असते. चिकित्सकपणे सर्वंकष पद्धतीने केलेली ती एक पाहणी असते. त्यात प्रयोगशीलता असते. नव्याने प्रकाशात आलेल्या घटनांच्या प्रकाशात लोकमान्य घटनांचा पुनर्विचार करावयाचे उद्दिष्ट पाहणीच्या मुळाशी असते."

संशोधन ही एक वृत्ती आहे. या वृत्तीला आणि सत्यनिष्ठा या दोन गुणांची गरज असते. व्यासंग व विचार करण्याची शक्ती यामुळेच प्राप्त होते. संशोधन ही एक अतिशय व्यापक आणि सर्वगामी अशी विविध ज्ञानक्षेत्रीय संकल्पना आहे. संशोधनाचा संबंध बुद्धीशी असतो. संशोधन ही देखील एक सर्जनशील निर्मिती असते.

संशोधन हे मूलतः एक शास्त्र आहे. त्याची मूलभूत अशी शास्त्रीय पद्धती आहे. या पद्धतीचा अवलंब संशोधकाला करावा लागतो. मग ते कोणतेही क्षेत्र असो. या शास्त्रीय पद्धतीला विमर्शक विचार पद्धती म्हणतात. शंका उपस्थित होणे, शंकेचे स्वरूप व समस्या, समस्येच्या सोडवणुकीसाठी गृहीतकृत्ये, गृहीतकृत्याचे परिणाम शोधणे, गृहीतकल्पनेचा स्वीकार किंवा नकार करून तिच्या मुलानुभवापर्यंत पोहोचून निष्कर्ष काढणे, ड्युई केलीच्या या पायऱ्या संशोधनात लागू पडतात.

संशोधन हे सर्वव्यापी व सर्वगामी अशी ज्ञानक्षेत्रीय संकल्पना असून लवचीक अशी अभिक्रिया आहे. संशोधन मानवी जीवनाचा अपरिहार्य घटक म्हणून मान्य झाले आहे. संशोधनाने जीवनाची सर्व बदलती आणि परिवर्तनशील क्षेत्रे व्यापून टाकली आहेत. वैज्ञानिक प्रगती, कृषी व्यापार प्रगती, समाज व्यवहार प्रगती, कला व साहित्य क्षेत्रातही प्रगती झालेली दिसते. वैज्ञानिक, सामाजिक आणि साहित्यिक अशा क्षेत्रातील संशोधनही महत्त्वाचे ठरले आहे.

**१. वैज्ञानिक संशोधन :**

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतीशास्त्र, तंत्रज्ञान, इ. विज्ञानक्षेत्रांशी संबंधित जी शास्त्रे आहेत त्यांचे संशोधन विविध शोधपद्धतीच्या साहाय्याने होत असते. विज्ञानात जडवादीशास्त्रे आणि जीववादी शास्त्रे यांचे संशोधन होत असते. भौतिकशास्त्रेही एका अर्थाने प्रायोगिक शास्त्रे आहेत.

वैज्ञानिक संशोधनात भावनेला स्थान नसते. आत्मनिष्ठेला महत्त्व नसते. विज्ञान क्षेत्रातील विषय नियमबद्ध असतात. वैज्ञानिक संशोधन 'वस्तुनिष्ठ' असते. या क्षेत्रातील संशोधनात प्रयोग, पाहणी व सिद्धांत यांना महत्त्व असते. वैज्ञानिक संशोधन हे प्रयोगशाळाप्रधान असते. या क्षेत्रातील नोंदी महत्त्वाच्या असतात. यात निष्कर्ष विश्वासजन्य असतो.

## २. सामाजिक संशोधन :

राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, कायदा, समाजशास्त्र यांच्याबरोबरच मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, शिक्षणशास्त्र, इ. विषयांचा समावेश सामाजिक संशोधनात होतो.

''मानव्यप्रधान जी शास्त्रे असतात, त्यातील संशोधनाला 'सामाजिक संशोधन' असे म्हणतात.'' 'माणूस हा समाजशील प्राणी आहे.' तसेच 'माणूस हा राजकीय प्राणी आहे.' असे माणसाविषयी बोलले जाते. माणसाला व्यापक अशा सामाजिक जीवनाची जाणीव होऊन मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे ही संकल्पना रूढ झाली आहे. माणसाचा माणसाशी, समाजाशी, एका समाजाचा दुसऱ्या समाजाशी संबंध व राष्ट्रराष्ट्रातील संबंध हे समाजशास्त्राचे अभ्यासाचे विषय असतात.

सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात मानवी प्रेरणा, प्रज्ञा, हेतू, उद्दिष्टे, वासना, इ. गोष्टींना कारणे म्हणून महत्त्व प्राप्त झालेले असते. यात माणूस भावनांशी जोडला गेलेला असतो. त्यामुळे सामाजिक क्षेत्रातील कार्यकारणांची पाहणी करताना या गोष्टींना प्राधान्य द्यावे लागते. व्यक्तीचे वर्तन, त्याच्या प्रेरणा, हेतू, उद्दिष्टानुसार बदलत असतात. सामाजिक संशोधनात भावना असलेला विचार व कल्पनाशक्ती असलेला माणूस त्याने निर्माण होणाऱ्या संस्था व समाज हे विषय असल्यामुळे सामाजिक संशोधनातील विषय स्थिर राहत नाही. मानवी समस्या, सामाजिक समस्या एकच एक राहत नाही. बालगुन्हेगारांचे प्रश्न, निराधार महिला, वाढती महागाई, ढासळती कुटुंबव्यवस्था, इ. काळानुसार समस्याही बदलत असतात. कुटुंब, राष्ट्र, राष्ट्रव्यवहार हे परिवर्तनशील असल्यामुळे अशा प्रकारच्या संशोधनात एकलक्षी उत्तर हाती लागत नाही. त्यामुळे अशा संशोधना मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करावे लागते. समूहाचे, जमातीचे किंवा काही घटकांचे विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन दीर्घकाळ सर्वेक्षण चालू ठेवावे लागते. थोडा थोडा कालावधी सोडून सातत्याने केलेल्या सर्वेक्षण एकत्रित करून त्यातून अनुमान काढून निष्कर्ष काढता येतो.

सामाजिक संशोधन वर्णनात्मक, समालोचनात्मक व वस्तुस्थितिदर्शक असते. संशोधकाच्या व्यक्तिमत्त्वाचाही परिणाम संशोधनावर होत असल्यामुळे निष्कर्ष एकच येईल असे नाही. सामाजिक शास्त्रे मानवी हेतू, प्रेरणा, कल्पना इत्यादींना मध्यवर्ती कल्पून मानवी जीवनाच्या विविध अंगाचे अवलोकन करतात.

### ३. साहित्य संशोधन :

मानवी जीवनात साहित्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. मानवी मनाचा, विचारांचा, भावनांचा, आत्म्याचा आविष्कार म्हणून वाङ्मय निर्माण झालेले आहे. मानवी मनाची धारणा, विचारांचे स्वरूप, संवेदनात्मकतेची जाणीव व मानवी आत्म्याला लावलेली कला असून तिची निर्मिती आस्वाद या सूक्ष्म आत्मनिष्ठ प्रक्रिया आहे. साहित्यात आत्मविष्कार असून भावविश्वाशी त्याचा संबंध असतो. साहित्यातून माणसाचे संस्कृतिरूप प्रकट होत असते. साहित्याचा संबंध इतिहास, संस्कृती, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, अध्यात्मशास्त्र इ. सर्व शास्त्रांशी येतो. साहित्याचे संशोधन करताना समीक्षेची दृष्टी बरोबर सहानुभूतीपूर्वक विचार ग्रहण करण्याची ताकद असणे आवश्यक आहे. तसेच साहित्य संशोधनात निःपक्षपातीपणा, अभिरूची असलेली शोधकवृत्ती व प्रखर जिज्ञासा असावी लागते.

साहित्य संशोधन हे ग्रंथालयनिष्ठ व सर्वेक्षणात्मकही असते. भाषाबोलीचा व लोकसाहित्याचा अभ्यास करताना सर्वेक्षण करावे लागते. साहित्य संशोधन हे विशुद्ध संशोधन असते. उपलब्ध नसलेले जेव्हा उपलब्ध करून दिले जाते तेव्हा त्या मराठीतील संशोधन विशुद्ध संशोधन असते. महानुभाव साहित्य, संतांचे साहित्य, बोलीभाषेतील साहित्य व इतर लिपीतील साहित्य संकलित करून संपादित केले जाते. अशा मूलगामी संशोधनावर पुन्हा जे संशोधन होते ते उपयोजित संशोधन मानले जाते. साहित्य हे वर्तनवादी व सामाजिक शास्त्राच्या जवळ असणारी अभिकृती आहे. वाङ्मयाचा अभ्यास विविध दृष्टिकोणातून, विविध पातळ्यांवरून व विविध उद्दिष्टांनुसार केला जातो. ग्रंथकार, कालखंड, धर्मसांप्रदाय, भाषांतरित साहित्य, तौलनिक साहित्याचा अभ्यास अशा कितीतरी विविध दृष्टिकोणातून केला जातो.

भावनात्मक सृष्टीचे मूळ शोधणे आणि त्याच्या शब्दरूप आविष्काराच्या सौंदर्याचे स्वरूप पकडणे हे साहित्याचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारे वैज्ञानिक शास्त्रे ही धोरणाने वस्तुनिष्ठ आहेत. सामाजिकशास्त्रे नावाप्रमाणे समाजाधिष्ठित आहेत तर साहित्य ही अगदी वेगळी मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ व सर्जनप्रधान आहेत.

### निष्कर्ष :

१) संशोधनाने जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. त्यामुळे आज मानवी जीवनाचा चेहरा संशोधनाभिमुख बनला आहे. संशोधनाचा संबंध बुद्धीशी असतो. 'संशोधन' ही देखील एक सर्जनशील निर्मिती

आहे. रिसर्च म्हणजे पुन्हा केलेले शोधन. हे एक प्रकारचे मूल्यांकन असते.

२) वैज्ञानिक संशोधन 'वस्तुनिष्ठ' असते. यात भावनेला व आत्मनिष्ठेला स्थान नसून वैज्ञानिक संशोधन प्रयोगशाळाप्रधान असते. यात निष्कर्ष विश्वसनीय असतो.

३) सामाजिक शास्त्राच्या क्षेत्रात मानवी प्रेरणा, प्रज्ञा, हेतू, उद्दिष्ट्ये, वासना, इ. गोष्टींना कारणे म्हणून महत्त्व प्राप्त झालेले असते. सामाजिक संशोधनाचा विषय माणूस असतो. सामाजिक शास्त्र नावाप्रमाणे समाजाधिष्ठित आहेत.

४) सामाजिक शास्त्राच्या बाबतीत तर विषयाच्या सीमारेषा फार पुसट असतात. सीमारेषांच्या अनिश्चितीमुळे सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रातील संशोधन हे लवचीक असते.

५) साहित्यात आत्माविष्कार असून भावविश्वाशी त्याचा संबंध असतो. साहित्य संशोधनात निःपक्षपातीपणा, अभिरुचीसंपन्न असलेली शोधकवृत्ती असावी लागते.

६) साहित्य संशोधन हे ग्रंथालयनिष्ठ व सर्वेक्षणात्मकही असते. साहित्य संशोधनाचा विषय 'साहित्य' हा असतो. साहित्य हे मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ व सर्जनप्रधान असते.

७) सामाजिक क्षेत्रे आणि वाङ्मय यांची क्षेत्रे एकमेकांना लागून, प्रसंगी एकमेकात मिसळणारी दिसून येतात. वैज्ञानिक, सामाजिक आणि साहित्यक्षेत्रीय संशोधनात साम्याबरोबर भेदही दिसून येतात.

# साहित्य आणि चित्रपट

प्रा. डॉ. राजेंद्र थोरात

**प्रास्ताविक :**

नटरंग, जोगवा, शाळा, मी सिंधुताई सपकाळ, श्यामची आई, बनगरवाडी, चानी, सिंहासन या चित्रपटांमध्ये एक साम्य आहे. ते म्हणजे हे चित्रपट कसदार साहित्यकृतींवर आधारित आहेत. साहित्य आणि चित्रपट या दोनही माध्यमांतून मानवाला प्रदर्शित केले आहे. माणसाच्या विविध वृत्ती-प्रवृत्ती, जीवन जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष साहित्य व चित्रपट या दोनही सशक्त माध्यमांतून अभिव्यक्त होतो. साहित्य हे मानवी जीवनमूल्यांची जोपासना करण्याचे, संस्कृती संवर्धनाचे व वाचकांचे मनोरंजन करता-करता समाजजीवनाचे वास्तव चित्रण करण्याचे कार्य सशक्तपणे करते. चित्रपटातून प्रामुख्याने प्रेक्षकांची करमणूक करताना भांडवलशाही दृष्टिकोण अवलंबिला जातो. आपण वर्तमानपत्रातून पु. ल. देशपांडे यांच्या 'म्हैस' या लोकप्रिय कथेवर एकाचवेळी तीन चित्रपट बनविले जात आहेत याविषयी बातमी वाचली असेलच. म्हणजेच ज्या चित्रपटसृष्टीला आपण 'मायानगरी' म्हणतो, त्यामध्ये कसा व्यवहारीपणा प्रतीत होतो हे आपण पाहत आहोत. मागणी तसा पुरवठा चित्रपटातून केला जातो. साहित्यकृतीचे चित्रपटामध्ये रूपांतर होताना माध्यमांतर होते. या दोन्ही माध्यमांचा आंतरविद्याशाखीय अभ्यास होणे आवश्यक आहे.

**साहित्य आणि चित्रपट :**

'शब्द' हे साहित्याचे माध्यम आहे. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन, प्रवासवर्णन, इ. माध्यमातून समाजजीवनाचे चित्रण विविध परिप्रेक्षातून साहित्यिकांनी केले आहे. साहित्याची निर्मिती करणारा साहित्यिक आपले अनुभवविश्व वाचकांपुढे ठेवतो.

चित्रपटाची निर्मिती ही सामूहिक प्रक्रिया आहे. कथा, पटकथा, संवाद, निर्माता, दिग्दर्शक, संगीतकार, गीतकार, कॅमेरामन, इ. च्या सामूहिक कौशल्यातून चित्रपट निर्मिती होते. दर्जेदार कलावंत, निर्माता, दिग्दर्शक असले तरी चित्रपटासाठी दर्जेदार कथा आवश्यक असते. चित्रपट हा अनेक कलांचा समुच्चय असला तरी चित्रपटाचा मूळ गाभा हा 'साहित्य' हाच आहे. या

ठिकाणी 'श्यामची आई', 'नटरंग' किंवा 'शाळा' या चित्रपटांची उदाहरणे सांगता येतील.

चित्रपटाचा मूळ गाभा 'साहित्य' हा असला तरी कोणतीही कलाकृती चित्रपटकथेची गरज भागवू शकत नाही. कारण चित्रपटाच्या निर्मितीमध्ये पटकथेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पटकथेचे लेखन करत असताना प्रसंग व संवाद यांना दृकश्राव्य रूप द्यावे लागते. शब्दाच्या माध्यमातून दृकश्राव्य माध्यमामध्ये रूपांतर होत असताना मूळ कलाकृतीतील कथासूत्रामध्ये अनेक बदल होतात. 'नटरंग' ही कादंबरी व 'नटरंग' हा चित्रपट याबाबतीत आपणास उदाहरण म्हणून सांगता येईल. कथेचे, पटकथेचे रूपांतर होताना त्यातील निवेदक नाहीसा होतो व निवेदकाच्या माध्यमातून लेखकाने जे निवेदन केले आहे ते दृश्यरूपाने दाखवावे लागते.

भारतीय चित्रपटसृष्टीमध्ये दादासाहेब फाळके यांचे अनमोल योगदान आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक म्हणून त्यांचा गौरव केला जातो. १९३१ मध्ये आर्देसर इराणी यांचा 'आलमआरा' हा पहिला बोलपट निघाला. प्रभातचा 'अयोध्येचा राजा' हा बोलपट अतिशय लोकप्रिय झाला व नाटकाला जाणारा रसिकवर्ग बोलपटाकडे वळला. भालजी पेंढारकर, व्ही. शांताराम, दादा कोंडके यांनी मराठी चित्रपट लोकप्रिय केला.

**मातेच्या महतीला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक :**

आचार्य अत्रे यांनी १९३५ ते १९५४ या कालावधीमध्ये २५ चित्रपट तयार केले. त्यांचे हिंदी चित्रपट लोकप्रिय झाले. मराठीतील 'लपंडाव' (१९४०), 'मोरूची मावशी' (१९४८) हे चित्रपट नावाजले गेले. प्र. के. अत्रे यांच्या 'श्यामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचे राष्ट्रपतींचे सुवर्णपदक १९५४ मध्ये मिळाले. साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या आत्मचरित्रात्मक कादंबरीवर आधारित असणारा हा चित्रपट. कोकणातील गरीब, सात्त्विक कुटुंबाची कहाणी शाश्वत मूल्यांमुळे अमर झाली. श्यामच्या आईची उदात्त शिकवण आचार्य अत्रे यांनी कौशल्याने चित्रपटातून प्रदर्शित केली. कोकणातील दापोलीच्या सुंदर निसर्गरम्य स्थळात या चित्रपटाचे चित्रीकरण झाले. उदात्त विचारांची शिकवण देणाऱ्या या चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाला. मातेच्या महतीला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. सामाजिक जाणिवा जागृत करणाऱ्या आचार्य अत्रे यांच्या 'महात्मा फुले' या चित्रपटाला १९५५ चे राष्ट्रपतींचे रौप्यपदक मिळाले. आचार्य अत्रे यांचा हा शेवटचा चित्रपट. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या आचार्य अत्रे यांना चित्रपटसृष्टी सोडावी लागली. कारण चित्रपट उद्योग हा भांडवलदारांनी जुगाराचा अड्डा

बनविला होता. या भांडवलदारांना कलेचे व सामान्य जनतेचे काही देणे घेणे नव्हते. त्यांना फक्त नफा हवा होता. अत्रे यांनी चित्रपट क्षेत्रातील विदारक वास्तव मांडले.

**उपेक्षितांच्या साहसाचे चित्रण करणारे अण्णाभाऊंचे चित्रपट :**

अण्णाभाऊ साठे यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत व ते लोकप्रियही झाले आहेत. 'फकिरा' ही अण्णांची सर्वाधिक लोकप्रिय कादंबरी आहे. या कादंबरीवर आधारित असणारा 'फकिरा' हा चित्रपट. 'फकिरा' या चित्रपटातून अण्णाभाऊंच्या मामाची वास्तव कहाणी रेखाटली आहे. 'वारणेचा वाघ' या चित्रपटामध्ये दडपशाही, गुलामगिरी करणाऱ्या ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंद करणाऱ्या, वाघासारख्या लढणाऱ्या सत्तू भोसलेल्या संघर्षाची कहाणी चित्रित केली आहे. तमाशा कलावंतांच्या समस्या मांडणाऱ्या 'वैजयंता' या काद्बंबरीवर 'बारा गावचं पाणी' (१९६१) तसेच खंडोबाच्या मुरळीचे अनाथ व दरिद्री जीवन 'मुरळी मल्हारी रायाची' या चित्रपटातून चित्रित केले आहे. 'आवडी', 'अशी ही साताऱ्याची तऱ्हा', 'डोंगरची मैना' हे अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांवर आधारित चित्रपट.

**चित्रपटाकडे व्यवहारी दृष्टिकोणातून पाहणारे व्यंकटेश माडगूळकर :**

व्यंकटेश माडगूळकर यांनी चित्रपटासाठी पटकथा लेखन केले आहे. 'संत नामदेव' (१९४८) हा त्यांचा पहिला चित्रपट. 'सायकल' या कथेवरून 'धाकटी जाऊ' या कौटुंबिक चित्रपटाची पटकथा त्यांनी लिहिली. 'सांगते ऐका' हा त्यांचा तमाशाप्रधान चित्रपट खूप गाजला. माडगूळकरांच्या 'बनगरवाडी' या कादंबरीवर आधारित अमोल पालेकर यांनी दर्जेदार चित्रपट बनविला. माडगूळकर मात्र आर्थिक गरजेपोटी पटकथा लिहीत होते. ते म्हणतात, ''लघुकथा प्रसिद्ध झाली तर सात रुपये मिळत. सिनेमासाठी कथा लिहिली की एक हजार रुपये मिळत. सात रुपये प्रपंचाला कसे पुरणार?''

**सिंहासन, चानी, रीटा वेलीणकर, जैत रे जैत, बोक्या सातबंडे, अत्याचार, कोल्हाट्याचं पोर, इ. :**

मराठी चित्रपटाचा परीघ रुंदावण्याचे महतकार्य मराठी साहित्याने केले आहे. साहित्य हा चित्रपटाचा गाभा आहे, हे यावरून प्रकर्षाने जाणवते.

'सिंहासन' हा चित्रपट गाजला तो विजय तेंडुलकर यांच्या धारदार संवादांनी. 'सामना' व 'सिंहासन' या चित्रपटांची पटकथा ही विजय तेंडुलकरांची आहे. निळू फुले व श्रीराम लागू यांच्या कसदार अभिनयाने हे चित्रपट लोकप्रिय झाले. अरुण साधू यांच्या 'सिंहासन' व 'मुंबई दिनांक' या कादंबऱ्यांवर 'सिंहासन' हा चित्रपट आधारित आहे.

चि. त्र्यं. खानोलकर यांच्या 'चानी' या कादंबरीवर आधारित व्ही. शांताराम यांचा 'चानी' हा चित्रपट लोकप्रिय झाला. परंतु कादंबरी वाचताना जो आनंद होतो, तो चित्रपट पाहताना होत नाही.

शांता गोखले यांच्या 'रीटा वेलीणकर' या कादंबरीवर याच नावाचा चित्रपट आहे. आधुनिक स्त्रीचे भावविश्व या चित्रपटातून प्रदर्शित केले आहे.

दया पवार यांच्या 'बलुतं' या आत्मकथनावर एन.एफ.डी.सी. ने 'अत्याचार' हा चित्रपट तयार केला आहे. तसेच किशोर शांताबाई काळे यांच्या 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनावर याच नावाचा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे.

जब्बार पटेल यांचा 'जैत रे जैत' हा चित्रपट गो. नी. दांडेकर यांच्या 'जैत रे जैत' या कादंबरीवर आधारित आहे. ना. धो. महानोर यांच्या गीतांमुळे हा चित्रपट खूप गाजला. मोहन आगाशे, स्मिता पाटील, निळू फुले यांचा सशक्त अभिनय हे या चित्रपटाचे बलस्थान आहे.

दिलीप प्रभावळकर यांचा 'बोक्या सातबंडे' या कांदबरीवर याच नावाचा चित्रपट आहे. बालविश्व कौशल्य या चित्रपटातून प्रतिबिंबित झाले आहे.

**साक्षरता अभियानाचा उपरोधिकतेने घेतलेला वेध :**

'निशानी डावा अंगठा' ही रमेश इंगळे यांची कादंबरी आहे. निरक्षर लोक साक्षर झाले पाहिजे या उदात्त उद्देशाने शासन गावोगावी साक्षरता अभियानाचा उपक्रम राबविते. या उपक्रमाला उत्सवी स्वरूप प्राप्त होते व हे अभियान कसे अयशस्वी ठरते याचा वेध रमेश इंगळे यांनी 'निशानी डावा अंगठा' या कादंबरीतून घेतला आहे. अशोक सराफ, मकरंद अनासपुरे, निर्मिती सावंत या कलावंतांनी भूमिका केलेल्या 'निशानी डावा अंगठा' या चित्रपटातून लेखकाचा उद्देश सफल झालेला आहे.

**कसदार कथा, दर्जेदार अभिनय व अवीट संगीत यांचा संगम म्हणजे नटरंग**

मराठी चित्रपटसृष्टीमध्ये लोकप्रियतेचे शिखर गाठण्याचे कार्य रवी जाधव यांच्या 'नटरंग' या चित्रपटाने केले. प्रसिद्ध साहित्यिक आनंद यादव यांच्या 'नटरंग' या ग्रामीण कादंबरीवर आधारित कथेमध्ये काही बदल केले आहेत, हे ज्यांनी मूळ कादंबरी वाचली आहे त्यांच्या लक्षात येते. 'गुणा'ची व्यक्तिरेखा अतुल कुलकर्णी यांनी अतिशय संवेदनशीलतेने व अफाट कष्टाने रेखाटली आहे. त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. नव्या उन्मेषाच्या अजय-अतुल या संगीतकार जोडीने या एकाच चित्रपटात खूप काही दिले आहे. पारंपरिक संगीताला आधुनिकतेची जोड त्यांनी दिली आहे.

'खेळ मांडला', 'नटरंग उभा', 'अप्सरा आली', 'वाजले की बारा' ही गीते आजही लोकप्रिय आहेत. सोनाली कुलकर्णी, किशोर कदम यांनीही अप्रतिम अभिनय केला आहे. एकूणच कसदार कथा, दर्जेदार अभिनय व अवीट संगीत यांचा संगम म्हणजे 'नटरंग' चित्रपट!

**माणसाचे माणूसपणा अधोरेखित करणारा चित्रपट म्हणजे जोगवा!**

राजन गवस यांच्या 'भंडारभोग' व 'चौडकं' तसेच चारुता सागर यांच्या 'दर्शन' या कादंबऱ्यांवर राजीव पाटील यांचा 'जोगवा' चित्रपट आधारित आहे. देवदासी व जोगत्यांचे प्रश्न या समस्याप्रधान व सामाजिक वास्तववादी चित्रपटातून दिग्दर्शकाने मांडले आहेत. देवदासी, जोगतिर्णींना 'मुरळी' म्हणून देवाला सोडले जाते. जोगते-जोगतिर्णींची दुरवस्था, अनैतिकता, व्यसनाधीनता अतिशय संवेदनशीलतेने या चित्रपटातून प्रदर्शित केली आहे. कादंबऱ्यांतील वास्तव चित्रण व चित्रपट यात काही भेद जाणवतात. कादंबरीमध्ये प्रेमकथेला स्थान नाही, परंतु चित्रपट हा व्यवसाय असल्यामुळे या माध्यमाच्या गरजेपोटी प्रेमकथेला स्थान देण्यात आले आहे. उपेंद्र लिमये (तायाप्पा), मुक्ता बर्वे, किशोर कदम यांनी कसदार अभिनय केला आहे. अजय-अतुल यांच्या संगीताचा चित्रपटाच्या यशामध्ये मोठा वाटा आहे. या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाले आहेत.

**राष्ट्रीय पुरस्कार विजेता 'बालगंधर्व'!**

बालगंधर्व यांचा जीवनपट चित्रित करणारा नितीन देसाई यांचा 'बालगंधर्व' हा चित्रपट खूपच लोकप्रिय झाला. सुबोध भावे यांच्या अजरामर अभिनयाने या चित्रपटाने यशाचे शिखर गाठले. ५९ व्या राष्ट्रीय पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक (आनंद भाटे), सर्वोत्कृष्ट वेशभूषा (नीना लुल्ला) व सर्वोत्कृष्ट मेकअप (विक्रम गायकवाड) असे मानाचे तीन पुरस्कार मिळाले. विशेष म्हणजे 'देऊळ', 'बालगंधर्व' व 'शाळा' हे तीनही राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले आहेत.

**जीवनसंघर्षाची कहाणी : मी सिंधुताई सपकाळ**

महाराष्ट्रातील ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांचे 'मी वनवासी' हे आत्मचरित्र. सिंधुताई सपकाळ यांची जीवन कहाणी 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटातून सशक्तपणे प्रदर्शित केलेली आहे. या चित्रपटाला अनेक पारितोषिके मिळाली आहेत.

**शाळेत गेलेल्या सर्वांसाठी...शाळा!**

मिलिंद बोकील यांची 'शाळा' ही वाचकवर्गामध्ये लोकप्रिय असणारी कादंबरी आहे. या कादंबरीच्या प्रभावाने झपाटलेल्या सुजय डहाके या २३

वर्षीय युवकाने अतिशय अप्रतिम असा 'शाळा' हा चित्रपट बनविला आहे. प्रत्येकाच्या मनात भावविश्वातील शाळा भरविण्यामध्ये तो कमालीचा यशस्वी ठरला आहे. मूळ कादंबरीशी प्रामाणिक राहून व चित्रपट या माध्यमाच्या गरजा ध्यानात घेऊन सुजयने हा चित्रपट बनविला आहे. 'शाळा' कादंबरीचे वाचन जितके आनंददायी तितकेच किंवा त्याहूनही अधिक आनंददायी 'शाळा' चित्रपट पाहणे आहे. अंशुमन जोशी, केतकी माटेगावकर, दिलीप प्रभावळकर यांनी अप्रतिम अभिनय केला आहे. ५९ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचे पारितोषिक या चित्रपटाला मिळाले. सर्वोत्कृष्ट रूपांतरित पटकथेचे राष्ट्रीय पारितोषिक याच चित्रपटासाठी अविनाश देशपांडे यांना मिळाले. आपल्या यशाविषयी अविनाश देशपांडे म्हणतात, ''मला पटकथेसाठी पुरस्कार मिळाला ही आनंदाची गोष्ट आहे; पण हे मिलिंद बोकील यांच्या कादंबरीचेही यश आहे असे मला वाटते.'' 'शाळा' कादंबरीचे योदान देशपांडे यांनी व्यक्त केले आहे.

**आम्ही चालवू हा पुढे चित्रपटांचा वारसा!**

चित्रपटाचा मूळ गाभा हा साहित्य आहे. साहित्यकृतींवर आधारित चित्रपटांतून चित्रपटांचा बहुआयामी परीघ रुंदावला असून चित्रपट मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाले आहेत. नटरंग, जोगवा, शाळा या परंपरेमध्ये आगामी काळात साहित्यकृतींवर आधारित चित्रपट येत आहेत. पु. ल. देशपांडे यांच्या जीवनावर 'गोळाबेरीज' तसेच 'म्हैस' या कथेवर 'चांदी' व इतर एक चित्रपट येत आहे.

वि.वा. शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' या नाटकावर महेश मांजरेकर यांचा चित्रपट येत आहे. तृतीय पंथीयांच्या वेदना मांडणारा पारू नाईक यांच्या 'मी का नाही' या कादंबरीवर 'आम्ही का तिसरे' हा अलका कुबल यांचा चित्रपट येत आहे. तसेच सुबोध भावे व जितेंद्र जोशी 'संतश्रेष्ठ तुकाराम' आपल्या अभिनयातून साकारत आहेत. लावणी कलावंत विठाबाई नारायणगावकर यांच्यावर दोन चित्रपट येते आहेत. दिग्दर्शक पुंडलिक धुमाळ यांचा 'विठा' व दिग्दर्शक संतोष राऊत यांचा 'विठाबाई नारायणगावकर' हा चित्रपट तयार होत आहे. ना. धो. महानोर यांच्या 'झोंबी' कादंबरीवर व नरेंद्र जाधव यांच्या 'आमचा बाप आन् आम्ही' या कुटुंबकथेवर चित्रपट येणार आहेत. एकूणच साहित्य व चित्रपट यांचा जवळचा संबंध आहे. या दोन्ही सशक्त माध्यमावर आंतरविद्याशाखीय संशोधन होणे साहित्य व चित्रपटाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

❀❀❀

# साहित्यसंशोधनात तंत्र साधनांचे महत्त्व

प्रा. डॉ.दत्ता पाटील

प्रस्तावना :

साहित्य संशोधनाची आजवर परंपरा पाहता साहित्य संशोधनाचे क्षितिज दिवसेंदिवस विस्तारत चाललेले दिसून येते. वैज्ञानिक शास्त्रात वस्तुनिष्ठता तर सामाजिकशास्त्रात समाजनिष्ठता या अनुषंगाने संशोधन होत असते. तद्वतच साहित्य आणि कला ह्या मनोनिष्ठ, प्रतिभनिष्ट आणि विशेषकरून भावनानिष्ट सर्जनप्रधान कला आहेत. त्यातही चित्र, शिल्प, संगीत नृत्य आदि कला ह्यापेक्षाही 'साहित्य' ही एक अधिक कसदार आणि प्रभावी अशी कला आहे. कारण ती आत्मनिष्ठ आहे. त्याद्वारे मनुष्य आपल्या भावना, कल्पना, विचार व्यक्त करीत आला आहे. अर्थात तिला समग्र मानवी जीवनाचा संदर्भ प्राप्त झालेला आहे. म्हणजे मानवी बुद्धी, विचार, कल्पना, भावना आणि निसर्गसृष्टी यांचा नितांत रमणीय आविष्कार साहित्याद्वारा होत आला आहे. साहित्यनिर्मिती ही जरी मानसिक प्रक्रिया असली तरी तिची अभिव्यक्ती ही कधी प्रकट तर कधी इंद्रियगोचर वा संवेदनक्षम या प्रकारची असते. तिचे संशोधन करत असताना तिच्या परंपरेचा शोध घेणे, तिच्या शैलीशास्त्राचा अभ्यास करणे, त्याच्या साहाय्याने आशय समजावून घेणे, आशयाद्वारा त्या कलाकृतीचे सामर्थ्य ठरविणे, अभिव्यक्तीदृष्ट्या तिचा पोत तपासून पाहणे आणि तद्नंतर आपल्या सौंदर्यदृष्टीने तिचे संश्लेषक वा विश्लेषक दृष्टिकोणातून संशोधनाअंती निष्कर्ष मांडणे ही साहित्यसंशोधनापाठीमागची मूलभूत भूमिका असते. ही भूमिका माणसाच्या तत्त्वचिंतनाशी तसेच त्याच्या आत्मिक आनंदाशी निगडित असते. म्हणून तो स्वेच्छेने एखाद्या ग्रंथकाराचा, त्याच्या कलाकृतींचा, किंबहुना वाङ्मयप्रकार, प्रवाह वा वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास करीत असतो.

साहित्याचे संशोधन केवळ पाठसंशोधन वा ग्रंथालयनिष्ठच आहे असे गृहीत धरून चालणार नाही. तसेच मुलाखत, प्रश्नावली, केसस्टडी, सर्वेक्षण पद्धती, प्रयोग आखणी, टिपणे, सारांशलेखन इत्यादी सारख्या कितीतरी गोष्टी सामाजिक वा मानव्य संशोधनापुरत्याच मर्यादित आहेत असे ही म्हणून भागणार नाही. तर त्याचा विचार वा उपयोग साहित्यसंशोधनातही महत्त्वाचा

ठरला आहे. ललित साहित्य, लोकसाहित्य, सांप्रदायिक वाङ्मय / पाठसंशोधन, विशिष्ट जातींचे विधी साहित्य, ताम्रपट, शिलालेखादि कोरीव लेख तसेच भाषाबोलीसंबंध, त्यातून व्यक्त होणारी संस्कृतिनिष्ठता इत्यादी संदर्भात संशोधन करण्यासाठी आज अनेक ज्ञानक्षेत्रीय पद्धतींचा व त्यासाठी आधुनिक तांत्रिक साधन सामग्रीचा वापर वा उपयोग महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे अनेक पातळ्यांवरून शोधक्रिया अधिक सखोल होऊ शकते. साहित्य संशोधन करीत असताना संशोधन विषयाच्या आकलनाकरिता पूरक, उपकारक इत्यादी आवश्यक अशा सर्व प्रकारच्या आधुनिक तांत्रिक साधन सामग्रीचा उपयोग करून घेणे आज साहित्यसंशोधनात महत्त्वाचे ठरले आहे. अशी बरीचसी साधने आहेत. उदा. झेरॉक्स, फोटोप्रिंट, डिजिटल फोटो कॅमेरा, कॉम्प्युटर, इंटरनेट, वर्ल्ड वेबसाईट, व्हिडिओ शुटिंग मशिन इत्यादी आधुनिक तांत्रिक साधनसामग्रीचा उपयोग महत्त्वाचा आहे. विज्ञानामुळे उपलब्ध झालेली ही साधनसामग्री वैज्ञानिक संशोधनाबरोबर साहित्य संशोधनासाठी आता कशी पूरक ठरत आहे याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात अभिप्रेत आहे.

साहित्यसंशोधनासाठी नवनवीन गोष्टी/साधने माहीत करून घेणे, त्यासंदर्भात शिकत राहणे आणि संशोधनासाठी त्याचा उपयोग करून घेणे हे उत्कृष्ट आणि मूलगामी संशोधनासाठी महत्त्वाचे आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्या संशोधकाना संशोधन विषयाची तर्कशुद्ध आणि सुसंगत मांडणी करण्यासाठी तसेच नेमके संदर्भ देऊन संशोधनाअंती योग्य निष्कर्ष नोंदविण्याच्या दृष्टीने या आधुनिक तांत्रिक साधनांचा उपयोग महत्त्वाचा आहे असे वाटते.

**कॉम्प्युटर-संगणक :**

गेल्या पंचवीस एक वर्षापासून आपल्याकडे संगणकाचा वेगवेगळ्या क्षेत्रात भरपूर वापर होत आहे. किंबहुना आज एकविसाव्या शतकात तर हा संगणक अगदी खेड्यापाड्यात-वाडीवस्तीत जाऊन पोहोचला आहे. साहित्यसंशोधन करताना तरी ती आज आवश्यक बाब बनली आहे. संगणक वापरापूर्वी शोधनिबंध वा प्रबंधलेखनासाठी प्रथम हस्तलिखित तद्नंतर टंकलेखन (टायपिंग मशिन) यांचा वापर केला जाई. पण आज ही साधने कालबाह्य होत आहेत. प्रबंध संपादन कामामध्ये संगणकाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. इतकी संगणकाची उपयोगिता आणि उपयोजन आहे. मुद्रण संदर्भात वेळेची बचत तसेच शुद्धलेखनातील दोष, संगणकाच्या पडद्यावर येणाऱ्या मजकुरात हवा तो बदल करणे, आलेख, आकृत्या किंवा छायाचित्रे यांचा योग्य जागी नेमका वापर करणे. शीर्षक, मथळा, उपमथळा

आणि विवेचनात्मक मुद्रणाक्षरे तयार करण्यासाठी व त्यामध्ये काही अधिक भर घालून सुसुत्रता येण्यासाठी संगणकांतर्गत अनेक योजनांचा हवा तसा योग्य अवलंब करून घेता येतो. अखेर सूची तयार करताना ग्रंथकारनाम, ग्रंथनाम, प्रकाशन, स्थळ, काळ, आवृत्ती आणि पृष्ठ क्रमांक इत्यादी गोष्टींच्या सुसंगत नोंदीसाठी संगणकाचा उपयोग महत्त्वाचा ठरतो. यामुळे कामामध्ये अधिक सूक्ष्मता येते. म्हणजे संशोधनासंदर्भातील माहितीचा साठा करणे, त्यावर काही वेळातच योग्य प्रक्रिया करणे हे संगणकाच्या साहाय्याने शक्य होऊ शकते.

कठीणता विश्लेषण अभ्यास हे संगणकाचे वैशिष्ट्य आहे. शिवाय नवनवीन तर्कशुद्ध रीती शोधून काढणे हे याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. संगणकाने करावयाच्या कामासाठी सूचना देण्यासाठी विविध प्रकारच्या संगणक प्रणालीचा (Programming Language) उपयोग करून घेता येतो. यासाठी आपण प्रथम सूचनांची यादी तयार करावी. ह्या यादीलाच "Programming List" म्हणता येईल. संगणक आपल्या संशोधन विषयाच्या अनुषंगाने ह्या यादीनुसार ठराविक क्रमाने ठराविक क्रिया करून अपेक्षित काम योग्यरीतीने वेळेत पार पाडण्यास महत्त्वाचे सहकार्य करील. यासाठी प्रथम संगणकात संशोधन विषयासंदर्भातला डेडस्टॉक असणे ज़रूरीचे असते.

**इंटरनेट/महाजाल :**

मराठीमध्ये इंटरनेटला महाजाल असा शब्द प्रयोग वापरला जातो. महाजाल हे संगणकाच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्कसचे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क-महाजाल आहे. इंटरनेटवरून आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील हर एक माहितीची देवाण घेवाण करता येते. साहित्यसंशोधनाच्या बाबतीत झाले तर माहितीच्या देवाण-घेवाणीबरोबर संशोधनविषयाच्या अनुषंगाने योग्य त्या व्यक्तीशी गप्पा मारणे (Chatting) करता येते. त्यातून संशोधन विषयानुकूल योग्य माहितीचे संकलन करता येते. घरबसल्या ही सोय होऊ शकते. यासाठी आपली भ्रमंती आणि त्यासाठी लागणाऱ्या वेळेची व पैशाची बचत होऊ शकते. परिणामी संशोधन लवकरात लवकर आणि नियोजित वेळेत होण्यास मदत होईल. शिवाय एकापेक्षा अनेक कितीतरी लोकांशी गप्पा मारत येतात. वेगवेगळ्या माहितीचे संकलन करता येते. या महाजालाचा योग्य वापर करण्यासाठी आपल्याला मराठीतील अनेक संकेतस्थळे (Websites) माहिती असणे गरजेचे असते. त्यामळे संशोधनविषयानुषंगाने नेमके संकेतस्थळ पाहिल्यास हवी ती माहिती उपलब्ध होऊ शकते.

**वर्ल्ड वाईड वेबसाईट / संकेतस्थळ :**

आज इंटरनेट गावागावात किंवा आपण कुठेही जगाच्या एखाद्या कोपऱ्यात जेथे कव्हरेज क्षेत्र आहे तेथे असलो तरी तेथेही काही क्षणात ही सुविधा आपल्याला उपलब्ध होऊ शकते अशी स्थिती आहे. या इंटरनेटवर मराठी भाषा आणि तीमधील साहित्य याविषयी अनेक संकेतस्थळे आज उपलब्ध आहेत. त्याद्वारे नियतकालिके, चालू नवीन ग्रंथ, दुर्मीळ ग्रंथ, हस्तलिखिते इ. विविधप्रकारचे प्रचंड माहितीचे साठे उपलब्ध होत आहेत. संशोधनविषयाच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासंदर्भात वा विशिष्ट पद्धतीचे नवीन दुर्मीळ संदर्भ देण्यासंदर्भात ही संकेतस्थळे महत्त्वाची ठरतात. पण त्यासाठी आपल्यासंशोधन विषयानुसंगाने इंटरनेटवर कोणत्या स्थळावर ती माहिती उपलब्ध होऊ शकेल हे माहीत असायला हवे. तसे नसल्यास किमान मराठी भाषा आणि साहित्य या संदर्भातील प्रत्येक संकेतस्थळ तपासत असताना आपल्याला कोणते उपयोगी आहे त्याची निवड करून त्याद्वारे विशेष वा दुर्मीळ माहिती घरबसल्या किंवा एखाद्या सायबर कॅफे मध्ये जाऊन प्राप्त करून घेता येते. यासंदर्भात मराठी भाषा संस्कृती आणि साहित्य या बाबतीत काही संकेतस्थळे पुढील प्रमाणे आहेत.

१) http://www.marathiworld.com
२) http://www.apalimarathi.com
३) http://www.natyasampada.com
४) http://marathimanus.net/links.aspx
५) http://marathi.webdunia.com
६) http://www.mymarathi.com
७) http://www.marathiasmita.org
८) http://www.maayboli.com
९) http://quillpad.in/marathi
१०) http://www.marathipustake.org
११) http://www.marathimati.com
१२) http://www.marathipatra.com
१३) http://www.maharashtraprime.com
१४) http://marathimanus.net/links.aspx
१५) http:/www.aatahavanitli-gani.com
१६) http://www.marathisrushti.com
१७) http://www.gadima.com
१८) http://www.puladeshpande.net
१९) http://www.savarkar.org
२०) http://shivgarjana.com/
२१) http://sanskrutikaladarpan.com/
२२) http://mimarathi.net

२३) http://jagtikmarathiakademy.org
२४) http://www.lokbiradariprakalp.org
२५) http://www.granthali.com
२६) http://www.sahityasammelan2010.org
२७) http://www.marathigazal.com
२८) http://www.marathidarpan.com
२९) http://www.maayboli.com/node/13345
३०) http://www.maayboli.com/node/l 3361
३१) http://rashtramitra.com/
३२) http://www.4shared.eom/u/pgprsrpg/dfe101e7/E_Saahitya_Prakaashan.htm
३३) http://www.netaksharee.com
३४) http://www.sarvottam-marathi-vinod.blogspot.com
३५) http://marathi-quotes-proverbs.blogspot.com
३६) http://www.maayboli.com/node/l1940
३७) http://vishesh.maayboli.com/node/681
३८) http://amazingambedkar.wordpress.com/
३९) http://www.rangkarmi.com
४०) http://www.marathiduniya.com
४१) http://www.marathimaya.com
४२) http://www.marathiwebsites.com
४३) http://navmaharashtra.blog.co.in
४४) http://gamabhana.com/
४५) http://www.tukaram.com
४६) http://www.marathimanoos.com
४७) http://www.marathishabda.com
४८) http://www.sahityabharati.com
४९) http://www.myemagazines.com
५०) http://www.apkpublishers.com

वरील माहिती स्रोताधारे संशोधनविषयानुकूल माहिती उपलब्ध करून घेण्यासाठी मराठी संशोधकाला केवळ संगणकीय साक्षरता यावर विसंबून चालणार नाही. तर प्रत्येक संकेतस्थळाची विविध माहिती केंद्रे आणि त्यांची क्षमता अधिक खोलावर जाऊन समजून घेतली पाहिजे. तरच योग्य आणि अनुकूल माहिती उपलब्ध होऊ शकेल. समाजजीवनाच्या बदलत्या स्थितिगतीच्या पार्श्वभूमीवर मराठी संशोधकाने हे बदल आणि येऊ घातलेले नवे तंत्रज्ञान स्वीकारायला हवे. जेणेकरून आपली भाषा आणि साहित्य प्रादेशिकतेच्या कक्षेतील असले तरी ते आणि त्यासंदर्भात संशोधन वैश्विक स्वरूपाचे होईल.

**डिजिटल कॅमेरा / छायाचित्रण :**

आज डिजिटल क्रांतीमुळे प्रत्येकाकडे डिजिटल शुटिंग कॅमेरा (चलत छायाचित्रण साधन) आला आहे. पूर्वी फिल्म कॅमेरे होते. त्यामुळे बऱ्याचवेळेला त्याबाबत काही अडचणी वा मार्यादा जाणवत होत्या. पण आज फिल्म कॅमेरा मागे पडून त्याठिकाणी डिजिटल शुटिंग कॅमेऱ्याचे युग आले आहे. स्वाभविकच तंत्रज्ञानातील ही क्रांती समाजजीवनातील विविध क्षेत्राबरोबर साहित्यसंशोधन क्षेत्राला वरदान ठरत आहे. विशेषकरून लोकसाहित्य संशोधनाच्या विविध क्षेत्रात, प्रायोगिक लोककलाच्या सादरीकरणातून व्यक्त होणारी संस्कृती आणि साहित्य, मुलाखत किंबहुना साहित्य साहित्यसंमेलनातून व्यक्त होणारा साहित्यविचार यासारख्या साहित्यविश्वातील कितीतरी घटना आणि गोष्टींच्या बाबतीत संशोधन करताना तेथे डिजिटल कॅमेऱ्याचा उपयोग होऊ शकतो. छायाचित्राद्वारे मिळालेली. माहिती आपल्याला पुन्हा पुन्हा पाहता व ऐकता येते. उपलब्ध माहितीचे संशोधनविषयानुकूल वर्गीकरण करून संशोधनात सूक्ष्मता येते. शिवाय संशोधनाअंती हाती आलेल्या निष्कर्षासंदर्भात काही दृकश्राव्य स्वरूपातील पुरावे सी.डी. व डी.व्ही.डी. द्वारे आपल्याला देता येतात. याबरोबर शिलालेखादि कोरीव लेख इत्यादी सारख्या पुरातन साधनांचा मराठी भाषा आणि साहित्यासंदर्भात विचार करताना डिजिटल कॅमेऱ्याचा अधिक उपयोग होऊ शकतो. एकाच माहितीसाठी वारंवार एखाद्या स्थळाकडे वा व्यक्तीकडे जाण्यापेक्षा एकदा त्याचे दृकश्राव्य चित्रण झाले की संशोधनाच्या बाबतीत त्याचा उपयोग होऊ शकतो. याद्वारे संशोधनासाठी सुलभता प्राप्त होऊ शकते. म्हणून साहित्यसंशोधनात डिजिटल कॅमेऱ्याचे महत्त्व विशेष आहे.

एकंदरीत वैज्ञानिक क्रांतीमुळे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मूलगामी बदल होऊन समाजविकास व देशविकासात त्याचे स्थान अढळ झाले आहे. साहित्यसंशोधनाच्या क्षेत्रातही माहिती आणि तंत्रज्ञानाचा उपयोग आज अधिक साहाय्यभूत होत आहे. यादृष्टीने कॉम्प्युटर, इंटरनेट, वेबसाईडस्, डिजिटल कॅमेरा इत्यादी सारख्या कितीतरी तंत्रसाधनांचा उपयोग साहित्य संशोधनात काही नवी क्षितिजे निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. जेणेकरून साहित्यसंशोधन अधिक मूलगामी होईल. त्यातमध्ये सूक्ष्मता येईल.

❀❀❀

# साहित्यक्षेत्रीय संशोधन एक आकलन

**प्रा. डॉ. सुलोचना साळुंखे**

संशोधन - स्वरूप आणि पद्धती : या विषयावरील चर्चासत्रात मी प्रस्तुत शोधनिबंधातून साहित्यक्षेत्रीय संशोधनाचे स्वरूप आणि व्याप्ती सांगण्याचा अल्प प्रयत्न केला आहे. प्रथमत: संशोधन म्हणजे नेमके काय याचा विचार करून साहित्यक्षेत्रीय संशोधन स्पष्ट करणे क्रमप्राप्त ठरेल. यासाठी संशोधनाच्या व्याख्या सुरुवातीला सांगितल्या आहे.

Research या इंग्रजी शब्दासाठी मराठी पर्यायी शब्द म्हणजे 'संशोधन' वेबस्टरच्या शब्दकोशानुसार ''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञान, नवीन तथ्य अथवा तत्त्वे शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये अथवा तत्त्वे यांचे पुन्हा पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक पद्धतशीर अभ्यास होय. नवीन ज्ञानाचे संपदान करणे व जुन्या ज्ञानाचे परीक्षण करण्यासाठीच संशोधन केले जाते.

**जॉर्ज ए. लुण्डवर्ग** - यांच्यामते 'अवलोकित तथ्यांचे व्यवस्थित व वस्तुनिष्ठ वर्गीकरण, सामान्यीकरण आणि प्रमाणिकरण करणे म्हणजे 'संशोधन' होय.

**जे. डब्ल्यु बेस्ट** - यांच्यामते ''संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की, जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते.''

**डॉ. पी. एल. भांडारकर** - यांच्या मते ''नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित, स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांत पुन्हा तपासून पाहण्यासाठी केलेली सखोल चिकित्सक चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन होय.''

**एल. व्ही. रोडमन आणि ए. व्ही. एच. मोरी** - यांच्या मते ''नवीन ज्ञानप्राप्तीच्या व्यवस्थित प्रयत्नाला आपण संशोधन असे म्हणतो.''

**दी ॲडव्हान्सड् लर्नर्स डिक्शनरी ऑफ करंट इंग्लिशनुसार** - ''ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्यांच्या शोधासाठी काळजीपूर्वक करण्यात आलेल्या अन्वेषणास किंवा तपासणीस संशोधन'' असे म्हणतात.

**दी न्यु सेंच्यचुरी डिक्शनरीनुसार** - ''तथ्यांचा किंवा सिद्धांतांचा शोध घेण्यासाठी अत्यधिक काळजीपूर्वक विषयवस्तूचे विषयात केलेले अन्वेषण किंवा तपासणी म्हणजे संशोधन होय.''

संशोधनासंदर्भात वरीलप्रमाणे विद्वानांनी विविध व्याख्या केल्या आहेत. या सर्व व्याख्यांचा परामर्श घेऊ जाता - संशोधन म्हणजे ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्यांच्या शोधासाठी काळजीपूर्वक केलेले अन्वेषण किंवा परीक्षण होय. संशोधन म्हणजे अरूपाला रूप देणे.

संशोधन म्हणजे अज्ञाताला ज्ञात जगतात ओढून आणणे. नवीन ज्ञानप्राप्तीचे व्यवस्थित प्रयत्न म्हणजे संशोधन होय. संशोधन ही सतत चालणारी एक बौद्धिक प्रक्रिया आहे.

सत्य शोधून काढणे हाच संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. म्हणून असे म्हणता येते की, संशोधन प्रक्रिया म्हणजे विद्याक्षेत्रीय गरज होय. संशोधन हा एक बुद्धिप्रधान संपर्कसाधन असा व्यवहार आहे. ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात - शाखेत संशोधन होत असते. प्रत्येक संशोधनाची सुरुवात एखादा प्रश्न सोडविण्यासाठी किंवा एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी होत असते. का, कसे, कधी, कुठे, कुणी, केव्हा, कशास यापैकी कोणत्यातरी एक प्रश्नाने संशोधनाची सुरुवात होत असते.

साहित्यक्षेत्रीय संशोधनाचे स्वरूप पाहताना हे प्रज्ञाव्यापाराचे तिसरे क्षेत्र आहे असे म्हणता येते. विज्ञानाशास्त्रांचे क्षेत्र सामाजिक शास्त्राचे क्षेत्र साहित्य कलांचे क्षेत्र (प्रयोगशास्त्र) (सोशल रिसर्च) (ग्रंथालय इ. स्वरूप) वैज्ञानिक व सामाजिक क्षेत्रातील संशोधनाबरोबर तिसऱ्या प्रज्ञाव्यापाराचे क्षेत्र म्हणजे साहित्य व कलांचे संशोधन क्षेत्र होय.

. साहित्यक्षेत्र मात्र आपले वेगळेपण दाखविणारे आहे. साहित्याच्या प्रयोजनातच समाजामध्ये माणूसपणाची जाणीव वृद्धिंगत होणे महत्त्वाचे आहे. सामाजिक शास्त्रांपैकी वर्तनवादी शास्त्राशी साहित्य जवळचे नाते सांगणारे आहे. साहित्यक्षेत्रीय संशोधनाची मूलभूत भूमिका इतर क्षेत्रीय संशोधनाप्रमाणेच कोणतातरी एखादा प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करणे हीच आहे. जवळपास सर्वच संशोधनाला हे समान सूत्र लागू पडते.

वाङ्मयीन संशोधनात तथ्ये निर्माण करावी लागत नाही. तर ती ग्रंथालयातील ग्रंथात अथवा इतरत्र कोठेतरी असतात. साहित्यक्षेत्रीय संशोधनात ती फक्त शोधून काढून तिचा योग्य तो उपयोग करून घेणे हे काम महत्त्वाचे असते. म्हणूनच या संशोधनात ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. साहित्य मानवी जीवनाच्या प्रतिबिंबाचा आरसा असल्याने साहित्यातील

परिवर्तन लक्षणीय आहे. साहित्य प्रतिभानिर्मित असून तो एक विश्वसनीय असा सामाजिक दस्तेवज आहे. समाजाच्या सांस्कृतिक धनात साहित्याला स्वतंत्र महत्त्वाचे स्थान निर्माण झालेले असते. श्रेष्ठ साहित्य शतकांनी अस्तित्वात आलेल्या विचारांच्या कल्पनांच्या व संकेतांच्या आधारे नवा अर्थ, नवा आशय धारण करु शकते. समकालीन संस्कृतीवर आणि एकूणच मानवी विचारांवर वेगळा प्रकाश टाकू शकते. साहित्य केवळ सामाजिक दस्तऐवज वा साधन नाही तर ते संस्कृतिरूपच आहे. मानवी संस्कृती, साहित्य व कला यांच्या रूपाने, माध्यमाने साकार होते. या अर्थाने साहित्यक्षेत्रीय संशोधन महत्त्वाचे ठरते.

साहित्यक्षेत्रीय संशोधनाच्या दृष्टीने साहित्याची विविधताही लक्षात घ्यावी लागते. इतर शास्त्रांप्रमाणे साहित्यशास्त्र काळाशी सुसंवादी आहे. प्रारंभी जुन्या हस्तलिखितांची संहिता प्रकाशित करण्यापुरते हे शास्त्र मर्यादित होते. पण पुढे संहितेच्या शुद्धिकरणातून पाठभेद नोंदणी होऊ लागली. प्रतिपाद्य विषयाचे चिंतनही होऊ लागले. कठीण शब्दांचे अर्थ, दुर्बोध विषयांचे स्पष्टीकरण इ. मुळे संशोधनशास्त्राचे मूल्य वाढले आणि साहित्याचा अभ्यास बहुआयामी बनत गेला. परिणामी साहित्याचा अभ्यास आणि संशोधन अत्यंत गुंतागुंतीचे झाले आहे. कारण साहित्य सामाजिक परिस्थितीतून निर्माण होत असले तरीही ते जीवनाला संपन्नता प्राप्त करून देते, संस्कृतीचा विकास घडवून आणते आणि मानवाचे भावविश्वही समृद्ध करते. समाजाला संदेश देण्याची, मार्गदर्शन करण्याची तळमळी साहित्यलेखनामागे असते. परिणामी साहित्य संशोधनातील गुंता वाढतो. साहित्य हे निरनिराळ्या शास्त्रांची व कलांची संयोगभूमी आहे. साहित्य संशोधनासाठी हा अतिशय महत्त्वाचा विचार लक्षात घ्यावा लागतो.

साहित्यक्षेत्रीय संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करताना आणखी एक मुद्दा लक्षात घेणे गरजेचे आहे. साहित्य व समीक्षा याबाबत संशोधकाला पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे. साहित्य ही निरनिराळ्या शास्त्रांची व कलांची संयोगभूमी आहे. साहित्यक्षेत्राचे संशोधन करताना साहित्याचे वेगळेपण प्रथमतः लक्षात घ्यावे लागते. साहित्यक्षेत्र मनोनिष्ठ, प्रतिभानिष्ठ आणि सर्जनप्रधान असे क्षेत्र आहे. शास्त्रीय संशोधन ज्या पायऱ्यांच्या अंगाने जाते त्याच अंगाने साहित्य संशोधन कार्य सुरू होते. 'भाषा व वाङ्मय' हे साहित्यक्षेत्रीय संशोधन अभ्यासाचे व्यापक व स्थूल क्षेत्र आहे. मध्ययुगीन वाङ्मय, आधुनिक वाङ्मय, भाषा विज्ञान अशी याची व्यापक उपक्षेत्रे आहेत. लेखकानुसार वाङ्मयप्रकारानुसार किंवा प्रवाहानुसार यात अभ्यासाच्या अनेक

पद्धती येतात. तसेच क्षेत्रीय संशोधन व ग्रंथालयीन संशोधन अशा दोन पद्धतींनी साहित्यक्षेत्रीय संशोधन होत असते.

विषयाची निवड व निर्मिती संशोधनाची रूपरेषा तयार करणे, शीर्षकाची निश्चिती करणे, अभ्यासाची निकड, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन पद्धती व नियोजन अशा क्रमाने साहित्यक्षेत्रीय संशोधनाला सुरुवात होते. साहित्यक्षेत्रीय संशोधनात ग्रंथालय हेच खरे अभ्यासक्षेत्र असते. संशोधनासाठी वापरले जाणारी अभ्यासपद्धती आणि आपल्याकडे उपलब्ध असलेला वेळ याचा विचार करून संशोधनाचे नियोजन करावे लागते. ही पूर्व तयारी म्हणजेच संशोधनाची सुरुवात होत. विषय कोणताही असला तरी संशोधनाची मूळ तत्त्वे मुख्यत: सारखीच असतात. मुख्य आधारग्रंथ साहाय्यक ग्रंथ यांचे बारकाईने वाचन केल्यास संशोधन प्रक्रियेला गती प्राप्त करून देते. संदर्भग्रंथविभागात निरनिराळे शब्दकोश असतात. प्रस्तुत संशोधनासाठी शब्दकोश हा अभ्यासाचा मूलभूत पाया आहे. संदर्भ ग्रंथ, साहाय्यक ग्रंथ, आधारांची विश्वसनीयता व उपयुक्तता पडताळून पाहण्याचे काम या संशोधनाला करावे लागते. समोर आलेल्या मजकुरातून नेमका महत्त्वाचा भाग निवडण्याचे कौशल्य मात्र सततच्या सरावानेच संशोधकाला प्राप्त होत असते.

साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात आवश्यक सामग्रीचे संकलन, महत्त्वाच्या मुद्यांचे आकलन, उलटसुलट मतांचा विचार, मार्गदर्शकाशी साधक बाधक चर्चा झाल्यानंतर संशोधक निष्कर्षाप्रत येत असतो. संशोधनाची गरज, संकेत आणि विशिष्ट प्रकारची तरतूद यांच्या आधारे प्रबंधलेखन विविध प्रकारांनी साकार होते. साहित्य संशोधनात वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग केला जातो. औपचारिक स्वरूपाच्या प्रमाण भाषेत संशोधक प्रबंधलेखन करीत असतो. एकूणच साहित्यक्षेत्रीय संशोधनपद्धती मागील भूमिका वेगळी असून त्यातील समस्या इतर क्षेत्रापासून भिन्न आहेत, असेच म्हणावे लागते.

साहित्यक्षेत्रीय संशोधनाचा पहिला व्यापक विभाग वा वाङ्मयेतिहास अधिष्ठित अशा विविध विषयांचा आहे. वाङ्मय इतिहासकालीन असले तरी ते विविध संकल्पना संकेताप्रमाणे स्वतंत्रप्रकृती, स्वयंभू व स्वयंनिष्ठ असे आहे. एखादा कालखंड वा इतिहास यांचा शोधदृष्टीने विचार करता स्वत:चे असे चिंतनमूलक, अवलोकमूलक व मूल्यमापनमूलक वेगळेपण दाखविल्यास अभ्यासकाला संधी किंवा वेळ असतो. साहित्य संशोधन क्षेत्रात एखाद्या लेखकाचा किंवा त्यांच्या लेखनाचा अभ्यास हा दुसरा विभाग येतो. वाङ्मयीन संशोधनाचे तिसरे परिक्षेत्र समीक्षाक्षेत्रीय विषयाचे आहे. समीक्षाक्षेत्रात विविध

नाद, विविध प्रवृत्ती, विविध संकल्पनांचे चिकित्सक, मूलग्रही, शक्यतर अनाग्रही आकलन महत्त्वाचे असते. समीक्षेच्या बाबतीत सौंदर्यशास्त्रापासून नीतिशास्त्र मानसशास्त्रापर्यंत विविध संकेत, संकल्पनांचा आधार घ्यावा लागतो. विषयपरत्वे स्थलकाल सीमित करावा लागतो.

साहित्य संशोधनाचे महत्त्वाचे परिक्षेत्र म्हणजे भाषा होय. एक शास्त्रीय व दुसरे अवलंबनीय अशा दोन प्रवर्गात असणारे भाषेचे क्षेत्र व्यापक आहे. आज भाषा विज्ञानाचे स्वतंत्र पण वाङ्मयसंबद्ध वाङ्मयाभ्यासाला समांतर असे शास्त्र विकसित होत आहे. एकूणच साहित्यसंशोधनाचे काम या चार परिप्रेक्षात दृग्गोचर होते. तरीही साहित्य संशोनाचा विकास आणखी वेगळ्या दिशेने होतांना दिसतो. जवळपास चौदा राष्ट्रीय भाषा असलेल्या भारतात तुलनात्मक अभ्यासाचे व्यापक क्षेत्र अभ्यासकांना भरपूर वाव देणारे आहे. विविध कलाकृती, व्यक्ती, भिन्नभाषिक, समकालीन वा समप्रवृत्ती लेखक इ. विषयांवर अभ्यास शक्य आहे. वाङ्मयीन संशोधनात स्तरीकरणाचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. संशोधनक्रिया तथ्य व साधन जमविणे, तिचे अव्वलपण सिद्ध करून व्यवस्थापन करणे, वर्गीकरण, पृथ्थकरण, अनुबंधन शोधन - सूत्र सांगणे अशा अवस्थांमधून होत असते. वाङ्मयक्षेत्राच्या विशिष्ट अशा शोधपद्धती नाहीत. वाङ्मयाच्या विवेचनाची प्रथा, पद्धती, परंपरा प्राचीन कालापासून चालत आली आहे. हा एक ज्ञानसंचय असून त्याला समीक्षा असे म्हटले जाते.

साहित्यक्षेत्रीय संशोधन साधनशोधक या वर्णनप्रधान अवस्थेतून झाले आहे. वर्गीकरण, पृथ्थकरण सर्वसाधरणीकरण इ. शोधमूलक मानसिक प्रवृत्तींचेच दर्शन येथे घडते. या प्रवृत्ती विकसित झाल्यावर नवसंदर्भ निर्माण करून नावार्थदर्शन घडविणे, उपलब्ध अशा घटकांचे नवसंबंधन दाखवून देणे, एखाद्या सिद्धांत, सूत्र, तत्त्व व्यवस्थितपणे मांडणे शक्य होते. वाङ्मयाभ्यासात प्रत्यक्षावलंबीसमीक्षा (प्रॅक्टिकल क्रिटीसिझम) ही संकल्पना इंग्रजी भाषेत स्थिर होत आहे. इतर भाषांत ही हळू हळू ही समाविष्ट होईल. साहित्यक्षेत्रीय संशोधन विकसनप्रधान आहे. भाषांतरित साहिंत्य, स्त्रीवादीसाहित्य, ख्रिस्ती साहित्य, तुलनात्मक साहित्याभ्यास, लोकसाहित्य संशोधन अशा कितीतरी क्षेत्रात क्षेत्रीय संशोधनाच्या नव्या दिशा दग्गोचर होत आहेत. साहित्याची व्याप्तीच मुळात मोठी असल्यामुळे त्याच्या संशोधनाची क्षेत्रे ही अनेक आहेत. प्रस्तुत लेखनात जागेच्या मर्यादा सांभाळून साहित्यक्षेत्रीय संशोधनाचा अल्पसा धांडोळा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

❀❀❀

# साहित्य आणि मानसशास्त्र

प्रा. डॉ. लक्ष्मण देवरे

साहित्य आणि मानसशास्त्र यांचा जवळचा संबंध आहे. विविध साहित्यप्रकार भाषेच्या माध्यमातून आविष्कृत होत असतात. भाषा हे मानवाच्या वर्तनाचे अविभाज्य अंग आहे. भाषेशिवाय मानवी वर्तनाची कल्पना करणे केवळ अशक्य आहे. भाषा हे मानवाच्या कर्तृत्वाचे सर्वोच्च शिखर होय. Language is the crowning glory of man. तीन दशलक्ष वर्षांपासून मानवाने बोलीभाषा आत्मसात केली. लेखन कलेचा इतिहासही सहा हजार वर्षांचा आहे. पाश्चात्त्य संशोधकांच्या मते रामायणाचा काळ दहा हजार वर्षांपूर्वीचा तर वेदांचा काळ त्याहूनही जुना आहे. मानसशास्त्रात भाषा-मानसशास्त्र (Psycholinguistics) ही एक अभ्यास शाखा आहे. भाषा-मानसशास्त्र म्हणजे आपण भाषा कशी शिकतो. तिचे संप्रेषणासाठी उपयोजन कसे करतो याचे शास्त्र आहे.

विविध बोधात्मक प्रक्रियांच्या (Cognitive Processes) परस्पर संबंधाचे भाषा हे उत्कृष्ट उदाहरण आहे. आपल्याला इतरांच्या बोलण्याचे, लिखाणाचे म्हणजेच भाषिक व अभाषिक संप्रेषणाचे संवेदन कसे होते? स्मृतीमध्ये विविध पातळ्यांवर संस्कार होऊन माहिती कशी साठवली जाते व प्रसंगानुरूप कशी आठवली जाते?

भाषेला सामाजिक अंग असल्यामुळे आपण बोलताना इतरांच्या अपेक्षा व आपले हेतू यांचा मेळ घालत बोलत असतो.

वाचन आणि लेखन या भाषेच्या दोन अंगांना आधुनिक काळात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. वाचताना, लिहिताना आपणास विविध शब्दांचे अर्थ आठवावे लागतात. त्यांच्या परस्पर संबंधांचा विचार करावा लागतो. त्यामुळे वाचन व लेखन या दोन्ही क्रिया कष्टदायक असतात. भाषेच्या अनेक साधनांतून आपले ज्ञानभांडार तयार होत असते. जसे ध्वनी, शब्द, भाषिक नियम, इ. समृद्ध ज्ञानभांडारातून साहित्यनिर्मिती होत असते.

मानसशास्त्र मानवी वर्तनाचा अभ्यास करते. वर्तन हे बाह्य व आंतरिक उद्दिपकांनी (घटकांनी) प्रभावित होत असते.

वर्तनाचे सूत्र S-O-R

S = Stimulus

O = Organism

R = Response

वरील तीन घटकांच्या अनुषंगाने वर्तनाचे विश्लेषण करता येते.

साहित्य हे मानवी वर्तन प्रभावित करणारे आंतर व बाह्य उद्दिपक आहेत. येथे उद्दिपक या शब्दाचा अर्थ समजून घेतल्यास वर्तन व साहित्य यातील संबंध अधिक स्पष्ट होईल. मानसशास्त्रात उद्दिपक या शब्दाचा अर्थ आहे, की मानवाच्या आंतरिक व बाह्य परिस्थितीतील जे जे घटक वर्तन प्रभावित करतात त्यांना उद्दिपक असे संबोधले जाते. त्या उद्दिपकांना प्रतिक्रिया वर्तनाच्या माध्यमातून दिल्या जातात. वर्तन म्हणजे तरी काय? क्रिया-प्रतिक्रियांची साखळी होय. त्या साखळीतील प्रत्येक कडी म्हणजेच क्रिया-प्रतिक्रिया. वर्तनाच्या सूत्रातील Organism म्हणजे (O) साहित्य निर्माण करणारी व आस्वाद घेणारी व्यक्ती. त्यात कवी, लेखक, समीक्षक, श्रोते, वाचक, प्रेक्षक, इ. लेखकाच्या भाव, भावना, प्रेरणा, बुद्धी, सर्जनशीलता, त्याचे व्यक्तिमत्त्व सर्व काही साहित्यात प्रतिबिंबित होत असते.

मानसशास्त्रीय संशोधनात व्यक्तीच्या वर्तनाचे मापन केले जाते. त्यासाठी उपकरणे, प्रश्नावल्या, चाचण्या, प्रक्षेपण तंत्रे, मुलाखती, इ. साधने वापरली जातात. मिळालेल्या माहितीवरून वर्तनासंबंधी सामान्य व विशेष असे नियम / तत्त्वे तयार होत असतात. मानसशास्त्राची स्वतःची गृहीतके मांडली जातात. प्रातिनिधिक नमुना निवड करून नियंत्रित व अनियंत्रित परिस्थितीत मानसशास्त्रीय साधनांद्वारे माहिती संकलित केली जाते. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून सांख्यिकीय मापनांच्या साहाय्याने निष्कर्ष काढले जातात.

संशोधनाच्या दृष्टीने साहित्य व मानसशास्त्र यांचा जवळचा संबंध आहे. कोणत्याही साहित्य कलाकृतीतून मानवी वर्तनाची उकल अत्यंत प्रभावीपणे होते. विविध कलाकृतींतून लेखकाची आंतरप्रज्ञा व्यक्ती किंवा समूहावर कशा पद्धतीने प्रभाव पाडत असते याचा संशोधनातून शोध घेता येतो. साहित्यावरून मानवी वर्तनाचे सामान्यीकरण करणे मात्र अवघड असते कारण साहित्य आणि मानसशास्त्र यातील संबंधांचे अनेक आयाम (dimensions) आहेत. साहित्याच्या सामान्य वाचकावर होणारा परिणाम, त्यावरून कलाकृतीचे मूल्यमापन किंवा अभ्यासण्याचे उद्देश विभिन्न असतात. समीक्षक हा रसज्ञ व मर्मज्ञ असतो. तो साहित्याचे वेगवेगळ्या अंगाने मूल्यमापन करत असतो.

एका संशोधनात विदर्भ साहित्य संघातर्फे निघणाऱ्या 'युगवाणी' या मासिकातील कवितांचा व कवींचा अभ्यास करण्यात आला. काव्यातील शब्दप्रतिमा वाचकांना कशा प्रतित होतात याचा अभ्यास करण्यात आला. कवीला आपल्या कवितेतून इष्ट भावात्मक विचार सांगायचे असतात. वाचकांना ते कितपत कळतात, हृदयाला भिडतात, त्याचा वर्तनावर किती प्रभाव पडतो याचे अचूक निदान करणे अवघड असते. कारण प्रत्येक व्यक्तीची (वाचक) संदर्भ चौकट भिन्न असते. प्रस्तुत संशोधनात वाचकांच्या प्रतिक्रियांमध्ये खूपच संदिग्धता होती. कवीला जो अर्थ अभिप्रेत असतो, तोच वाचकांना कळतो का? कारण कवी, लेखक, नाटककार, कादंबरीकार, श्रोते, प्रेक्षक, समीक्षक, वाचक यांच्या बोधात्मक प्रक्रियांचे (cognitive processes) संदर्भ वेगवेगळे असतात.

मानसशास्त्रामध्ये व्यक्तिमत्त्व मापनासाठी चित्र अवबोध चाचण्या (Thematic Appreciation Test) मध्ये व्यक्तीला चित्राच्या आधारे कथा लिहिण्यास सांगितली जाते. व्यक्तीने लिहिलेल्या कथेच्या विश्लेषणातून त्या व्यक्तीमधील प्रेरणा, भाव-भावना, महत्त्वकांक्षा यांचा शोध घेतला जातो.

एका संशोधनात विविध वयोगटातील / शिक्षणाच्या विविध स्तरातील (शालेय, महाविद्यालयीन) ज्यांची मातृभाषा एकच आहे अशा प्रयुक्तांनी सांगितलेल्या कवितेच्या अर्थात भिन्नता होती. मानसशास्त्रातील संशोधकांनी सिद्धी प्रेरणेचा अभ्यास करताना वेगवेगळ्या समाजातील (धर्म, देश, कालखंड) व्यक्तींचा त्यांच्या संशोधनात समावेश केला. ज्या समाजातील साहित्यामध्ये लहान मुलांसाठीच्या गोष्टीत (बालसाहित्य), धार्मिक वाङ्मयात लोककथात, साहसकथा, शौर्यगाथा (रामायण, महाभारत), आर्थिक घडामोडी व सामाजिक घटना यांचे प्रसारमाध्यमातून (वर्तमानपत्रे, मासिके, कथा-कादंबऱ्या) होणारे प्रसारण, इ. मुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व जडणघडणीत फार मोठा प्रभाव दिसून येतो. ज्या समाजाच्या साहित्यामध्ये सिद्धिप्रेरणा निदर्शक घटना, प्रसंग अधिक असतात, त्या समाजातील, धर्मातील लोकांमध्ये उच्च सिद्धिप्रेरणा दिसून येते.

पूर्वीच्या काळातील विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तीबद्दलच्या माहितीतून आत्मचरित्र, व्यक्तिचित्रे, विनोदी साहित्य, काव्य इ. मधून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व गुणांचा शोध घेतला जातो. त्यांच्या कर्तृत्वातून, सामाजिक कार्यातून, संशोधनावरून त्यांच्या बुद्धिमत्तेचा (बुद्धिगुणांक) अंदाज केला जातो.

साहित्य हे समाज मनाला (वर्तनाला) प्रभावित करीत असते. सानेगुरुजींचे 'श्यामची आई', ऐंशीच्या दशकांतील नेमाडेंच्या कादंबऱ्यांनी झपाटलेली तरुण प्राध्यापक मंडळी, आनंद यादव, द. ता. भोसले, शंकर पाटील यांच्या ग्रामीण साहित्यात गुंगणारी, नवशिक्षित खेड्यातील शेतकऱ्यांची पोरं, दया पवार, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने यांच्या साहित्याने मांडलेले जळजळीत समाज वास्तव त्यामुळे दिङमूढ व सैरभैर झालेले समीक्षक या सर्व गोष्टी मानवी वर्तनावर परिणाम करणाऱ्या आहेत. परंतु संशोधनातून मानवी वर्तनासंबंधी सामान्यीकरणाचे नियम मांडणे धोक्याचे असते. तीच मानवी वर्तनासंबंधीच्या संशोधनाची मर्यादा आहे.

आजही साहित्यातील संशोधनात एखाद्या लेखकांच्या काही कादंबऱ्या घेऊन त्यांच्या अभ्यासावरून संशोधन केले जाते. लेखकाच्या बोध-अबोध मनाच्या पातळीवर घडणाऱ्या घटना (फ्रॉईडच्या संकल्पना) शेक्सपिअरची नाटके इ. व त्यासंबंधीचे विचार लेखकाची आंतरप्रज्ञा, सुप्तइच्छा, कवी-नाटककार यांची प्रतिभा, त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, भौगोलिक पार्श्वभूमी इ. शोध व बोध घेता येतो. मानसशास्त्रात शेक्सपिअरच्या नाटकातील पात्रांच्या वर्तनावरून, त्यांचे मनोविश्लेषण, कुसुमाग्रज, बालकवी, केशवसुतांच्या कवितांसंबंधी मानसशास्त्रीयदृष्ट्या संशोधने झाली आहेत.

❀❀❀

# साहित्य आणि राजकीय संस्कृती

प्रा. अभिजीत पाटील

**प्रास्ताविक :**

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. त्यामुळे साहित्यातून समाज आणि त्या समाजाची संस्कृती प्रतिबिंबित होत असते. कारण राजकीय संस्कृतीला जशी अतिप्राचीन काळापासूनची प्रदीर्घ परंपरा आहे. तशीच साहित्यालाही मोठी परंपरा आहे. त्यामुळेच जगामध्ये राजकीय संस्कृतीच्या आश्रयानेच साहित्य निर्मिती होत असते. अगदी सुरुवातीच्या काळामध्ये मौखिक स्वरूपात लोकगीते आणि लोककथेच्या अनुषंगाने राजकीय संस्कृतीच्या माध्यमातून साहित्याचे प्रतिबिंब उमटले. म्हणून साहित्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी संस्कृतीचे आकलन होणे अगत्याचे ठरते. संस्कृतीच्या आकलनासाठी समाजाचे स्वरूप समजून घ्यावे लागते. कारण व्यक्तीशिवाय समाज निर्माण होऊ शकत नाही - समाजांशिवाय राज्यनिर्माण होऊ शकत नाही. राज्यशिवाय राजकीय संस्कृतीची निर्मिती होऊ शकत नाही - राजकीय संस्कृतीशिवाय - साहित्य धारणा तयार होऊ शकत नाही.

**संस्कृती :**

संस्कृती हा शब्द इंग्रजीतील Culture या शब्दाचा पर्यायी शब्द आहे. कारण मानवी मनावर वर्षानुवर्ष होणा-या अनेक संस्कारांनी संस्कृती घडत असते. म्हणून संस्कार व संस्कृती यांचे परस्पर संबंध अतिशय जवळचे आहे. तसेच असे संस्कार निर्माण करण्यासाठी प्रत्येक राजकीय व्यवस्थेस विशिष्ट प्रकारच्या राजकीय प्रवृत्तीच्या पर्यावरणात कार्य करावे लागते. ही राजकीय प्रवृत्ती मूळ स्वरूपात रुजलेली असते. तिलाच राजकीय संस्कृती म्हटले जाते. त्याचबरोबर सम् + कृ या संस्कृत धातुपासून हे दोन्ही शब्द तयार झालेले आहेत. जसे जीवन तसे संस्कृती असते. राजकीय संस्कृतीचे स्वरूप ठरते. कारण जशी संस्कृती तसे साहित्य म्हणणे वावगे ठरत नाही. त्यामुळेच संस्कृतीच्या संदर्भात डॉ.इरावती कर्वे म्हणतात, "संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देश, काल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती होय."

कारण मानव प्राणी हा समाजातील मुख्य घटक असून तो समाशील आहे. (Man is a Social Animal) म्हणजे मनुष्य समाजात राहून स्वतःची प्रगती करून आपल्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो. त्यामुळे मानवाशिवाय समाज अस्तित्वात येऊ शकत नाही. राज्याशिवाय समाजाचे अस्तित्व टिकू शकत नाही. त्यामुळे समाजाचा विकास हा राज्यातच होतो, तेव्हाच समाज विकसित झाला तरच मानवाचा विकास होऊ शकतो.

कारण समाजातील अनेक घटक प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मानवाचे व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी कारणीभूत ठरतात.




कारण वरील चार घटकांमुळे मानवाच्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होते. म्हणजेच भाषा ही मानवनिर्मित आहे. तसेच मानवाजवळ असलेल्या प्रतिभा सामर्थ्याचा शब्दरूप आविष्कार म्हणजे साहित्य असते. त्याचबरोबर मानवी मनाप्रमाणे समाजाशिवाय व्यक्ती अस्तित्व निर्माण होऊ शकत नाही. तसेच व्यक्तीला संस्कृतीची पार्श्वभूमी असल्यामुळेच विचार प्रगल्भता येते. त्यामुळे व्यक्तीच्या साहित्यमनाचा शोध घेण्यासाठी आणि साहित्यत्त्व शोधण्यासाठी राजकीय संस्कृतीचा आधार गरजेचा आहे.

**राजकीय संस्कृती आणि साहित्य :**

साहित्याचा संस्कृतीशी असलेला संबंध अविभाज्य असून ते एकमेकांचा आश्रय घेत असतात. व एकमेकांचे संवर्धनही करतात. कारण साहित्यामुळे राष्ट्राच्या, देशाच्या संस्कृतीचे रक्षण(जतन) करता येते. आणि त्याचबरोबर आपल्या राष्ट्राच्या राजकीय संस्कृतीच्या वरदहस्तामुळेच साहित्य अबादित राहिले आणि त्याचा विकास झाला.

त्याचबरोबर अक्षर वाङ्मयापर्यंत पोहचणारी  वाङ्मयीन कलाकृती ही त्या-त्या विशिष्ट अशा युगाच्या प्रत्यक्ष ऐतिहासिक प्रक्रियेच्या विविध तऱ्हेच्या घटनांचा दस्ताऐवज ठरतो. विशेषतः भारतीय काळातील रामायण,

महाभारत या ग्रंथातून आर्य संस्कृतीचे दर्शन घडते. राजकीय संस्कृतीचा वारसा लक्षात येतो. तर इतिहासातील सिंधू संस्कृतीचे दर्शन मोहोंजोदडो, हडप्पा या अवशेषावरून समजून घेता येते. लक्षात येते की त्यावेळेस राजकीय प्रगल्भता असलेली राजकीय संस्कृती अस्तित्वात होती, त्यामुळेच अशी सुंदर शहरे वसू शकली. साहित्यामुळे त्याचे स्थान कळू शकले. त्याचप्रमाणे यादवकालीन राजकीय परिस्थितीचे संस्कृतीचे दर्शन 'लीळाचरित्र' या ग्रंथातून घडते. तर बखरीतील ऐतिहासिक अशा प्रसंगातून तात्कालीन राजकीय परिस्थितीची स्थिती लक्षात घेता येते.

साहित्याच्या स्वरूपासंदर्भात विचार करत असताना साहित्याचे स्वरूप हे व्यापक असल्यामुळे त्यामध्ये विविध वाङ्मय प्रकारांचा अंतर्भाव होतो. त्या-त्या कालखंडामध्ये निर्माण झालेल्या उत्कृष्ट मानवी मनातील कल्पनांबरोबरच राजकीय संस्कृतीचे दर्शन होत असते. त्यामुळेच मराठी साहित्यामध्ये संत साहित्य, पंत साहित्य आणि तंत साहित्य यांची उदाहरणे देता येतात.




एकूणच मानवी मनाचे व जीवनाचे चढउतार साहित्याच्या माध्यमातून प्रतिबिंबित होत असतात. म्हणून उदा. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या माध्यमातून आपणांस मध्ययुगीन राजकीय संस्कृती, राजकीय व्यवस्था, राजकीय उद्दिष्ट्यांचे स्वरूप समजून घेणे शक्य झाले.

**राजकीय संस्कृती आणि आधुनिक साहित्य :**

समाज हा परिवर्तनशील असतो. त्याचप्रमाणे राजकीय संस्कृती ही देखील परिवर्तनशील होत असते. कारण परंपरेने चालत आलेल्या या संस्कृतीवर नवीन विचारांच्या, संकल्पनाच्या आणि विज्ञानाच्या नव्या-नव्या शोधांचे आघात झाले. परिणामी संस्कृतीविषयी नव्या जाणिवा निर्माण होऊ लागल्या. त्यातून आधुनिक साहित्याचे स्वरूप बदलले. विज्ञानाच्या संस्कृतीवर झालेल्या परिणाम साहित्यातून प्रतिबिंबित होऊ लागला व १९

व्या शतकात आधुनिक मराठी काव्याची सुरुवात करणारे केशवसुत आपल्या तुतारी या कवितेत अशा बदलत्या संस्कृतीचे दर्शन घडवत असतांना म्हणतात की,

एक तुतारी दया मज आणूनी
फुंकिन मी जी स्वप्रणाने
भेदूनी टाकीन सगळी गगणे।
दीर्घ तिच्या त्या किंकाळीने
अशी तुतारी दया मज आणूनी।।

तर 'नवा शिपाई' या कवितेत नव्या संस्कृतीला नवा शिपाई साकार करताना ते म्हणतात.

नव्या मनुतील नव्या दमाच्या शूर शिपाई आहे.
कोन मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे ।
ब्राम्हण नाही हिंदुही नाही न मी एक पंथाचा ।
तेच पतित के जे अखंडीती प्रदेश साखल्याचा।।

अशा प्रकारे आधुनिक युगातील राजकीय व्यवस्थेची चाहूल केशवसुतांच्या प्रस्तुत कवितेतून प्रकट होते. त्यातून बदलत्या राजकीय व्यवस्थेचे, राजकीय संस्कृतीचे पडसाद साहित्यात कसे दिसून येतात याचा प्रत्यय येतो. त्यांच्या काव्यलेखनामुळे संबंध मराठी साहित्यात क्रांती घडून आली. १९४० ते ४५ या कालखंडातील मराठी साहित्यात नवसाहित्य जन्मास आले व नवसंस्कृतीचे बिजारोपण झाले.

**भाषा साहित्य आणि राजकीय संस्कृती :**

मानवप्राण्याची अनुभव प्रकट करण्याची सहज प्रवृत्ती साहित्यनिर्मितीसाठी प्रेरक ठरते. ही साहित्यनिर्मिती भाषेच्या माध्यमातून प्रकट होते. प्राचीन काळी मौखिक परंपरेने लोकसाहित्याच्या स्वरूपामध्ये ते अस्तित्वात होते. कालानुरूप त्यामध्ये बदल होऊन त्यातून जसे लोकसंस्कृतीचे दर्शन घडते तसेच लिखित साहित्याच्या माध्यमातून बदलत्या राजकीय संस्कृतीचे दर्शन घडते. इंग्रजांच्या राजवटीमध्ये मुद्रणकलेची सोय झाली. प्रारंभी केवळ पद्यात्मक असणारे मराठी साहित्य त्यामुळे गद्यात्मक झाले. सर्व वाङ्मयप्रकार नव्याने रूढ झाले. इंग्रज आमदानीत प्रामुख्याने लोकजागृतीसाठीनिबंध वाचन मोठ्या प्रमाणात झाले. त्यानंतर काव्य कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र साहित्यात काळ ओघात आले. ऐतिहासिक राजकीय जीवनचित्रण यामधून घडू लागले. आपल्या अनुभव भाषेच्या माध्यमातून व्यक्त करणे. जुने ज्ञान नव्या पिढीपर्यंत पोहचवणे नवे ज्ञान

शोधून त्याचसाठी करणे हे भाषेच्या माध्यमातून शक्य होते. म्हणून साहीत्य हे भाषेशिवाय अस्तित्वात येऊ शकत नाही. हा ज्ञानगंगेचा प्रवाह अखंडितपणे चालू ठेवण्यासाठी समाजजीवन प्रगतशील बनवण्यासाठी भाषेची भूमिका महत्त्वाची ठरते.

कारण मानवी जीवनाच्या व्यवस्थेत आवश्यक व मान्य अशा सवयीचा आविष्कार राजकीय संस्कृतीच्या माध्यमातून घडतो कारण राजकीय संस्कृती ही भाषेच्या माध्यमातून व्यक्त होते. म्हणून भाषा, साहित्य, आणि संस्कृती हे तिन्हीही घटक अविभाज्य आहेत.




कारण राजकीय संस्कृतीही परिवर्तनशील असते. त्यामुळे राजकीय संस्कृतीमधील सामाजिक मूल्य बदलतात,तसेच जगण्याच्या सवयी बदलतात. जगणे कमी अधिक तीव्र होते. त्यातुन राजकीय पद्धती बदलते आणि व्यक्ती, ग्रीक राजकीय विचारवंत ॲरिस्टॉटलच्या राजकीय व्यवस्थेच्या गतिचक्रांच्या सिद्धांतानुसार






40807

व्यक्तीच्या विचारात परिवर्तन होत असते. राजकीय संस्कृतीमध्ये परीवर्तन घडत जाते. परिणाम स्वरूप साहित्य निर्मितीमध्येसुद्धा त्या-त्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटते. हा बदल अतिशय हळूवारपणे होत असतो. या सर्व परिवर्तनाचे चित्र भाषा साहित्य आणि राजकीय संस्कृतीच्या माध्यमातून प्रकट होणे स्वभाविक आहे. जीवन आणि जीवनाचे विशिष्ट रंग, प्रवृत्ती यांना मूर्त स्वरूप देण्याचे काम भाषा करते. म्हणून भाषा हीच संस्कृतीची वाहक ठरते. त्यामुळे एखाद्या समाजाविषयीची सखोल माहिती आपण कितीही मिळविली, किंवा मिळाली तरी त्यांच्या जीवनमानाचे निरमन केले तरी त्या समाज घटकाची भाषा शिकल्याशिवाय त्या समाजाची संस्कृती आपणांस समजून घेता येणार नाही ते सत्य आहे. आणि त्याशिवाय त्यासमाजाचे राजकीय व्यवस्थेतील महत्त्व कळणार नाही.

❀❀❀

# समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती

प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे

एकविसावे शतक हे संशोधन युग आहे. विविध ज्ञानशाखांमध्ये नवनवीन संशोधन पद्धती आता निर्माण होत आहेत. भाषेचा अभ्यास करणाऱ्या 'भाषाविज्ञान' या ज्ञानशाखेत तर गेल्या शतकापासून आधुनिक पद्धतीने संशोधन केले जात आहे. ऐतिहासिक, वर्णनात्मक, संरचनात्मक आणि उपयोजित अशा विविध पद्धतीचा त्यामध्ये समावेश होतो. १९६० नंतरचा हा आधुनिक भाषाविज्ञानात उपयोजित भाषाभ्यासाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. भाषा आणि जीवन यातील परस्परसंबधाच्या अभ्यासातून उपयोजित भाषाविज्ञानाच्या दिशा विस्तारल्या. समाजशास्त्र, मानवशास्त्र, मानववंशशास्त्र, माहितीविज्ञान यांच्या साहाय्याने भाषेचा आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास उपयोजित भाषाविज्ञानात होऊ लागला. यातूनच मनोवैज्ञानिक भाषाविज्ञान, समाज मनोवैज्ञानिक, भाषाविज्ञान चिन्हविज्ञान, गणिती भाषाविज्ञान आणि समाज भाषाविज्ञान इत्यादी भाषाभ्यास शाखांचा उदगम होऊन आधुनिक भाषा विज्ञानाला नवा आयाम मिळाला. समाजभाषा विज्ञान अथवा सामाजिकविज्ञान ही त्यामधील महत्त्वाची शाखा असून अलीकडील आधुनिक भाषाविज्ञानात ती केंद्रवर्ती संशोधन शाखा म्हणून मान्यता पावत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीची स्वरूपतत्त्वे मांडण्याचा अभ्युयगम स्वीकारलेला आहे. मात्र तत्पूर्वी समाजभाषाविज्ञान या अभ्यास शाखेचे स्वरूप लक्षात घेणे गरजेचे आहे. कारण कोणत्याही अभ्यास शाखेची एक स्वतंत्र संशोधन पद्धती असते.

**समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप** : समाजभाषाविज्ञान याल इंग्रजी 'Sociolinguistics' असे म्हणतात. ही संज्ञा हेव्हर क्युरी यांनी १९५२ मध्ये सर्वप्रथम वापरली.-.[१]; ह्यालाच सामाजिक भाषाविज्ञान असेही म्हटले जाते. समाजाचा अभ्यास करते ते समाजविज्ञान आणि भाषेचा अभ्यास करते ते भाषाविज्ञान या दोहोंच्या परस्पर अध्ययन प्रक्रियेतून समाजभाषाविज्ञान उदयास आलेले आहे. भाषेचा सामाजिक दृष्टिकोणातून अभ्यास करणे हा समाजभाषाविज्ञानाचा मुख्य हेतू होय. आधुनिक भाषाविज्ञानातील फर्दिना-द-

सोस्युरच्या भाषाविभागातील पुढे दुर्लक्षित राहिलेली भाषाव्यवहार ही संकल्पना समाजभाषाविज्ञानात केंद्रवर्ती आहे. भाषाव्यवहाराची सामाजिक बाजू प्रभावीपणे मांडून भाषाभ्यासाची नवी दिशा समाजभाषाविज्ञान या अभ्यास शाखेत सुस्पष्ट केली. त्यामुळे आधुनिक भाषाविज्ञानाला पूर्णत्व मिळाले हे सूर्यसत्य कोणीही नाकारू शकणार नाही.

समाजभाषाविज्ञान या संकल्पनेचे बीजसूत्र मांडताना रमेश वरखेडे लिहितात, 'भाषाव्यवहार आणि सामाजिक संरचना यात परस्परावलंबित्वाचे नाते आहे. लौकिक जीवनात भाषेचा उपयोग व्याकरणिक नियमांनी होत नसून सामाजिक संकेतांनी होत असतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास हा एका अर्थाने समाजाचाच अभ्यास होय. समाजभाषाविज्ञानाची ही नवी दिशा भाषेच्या पारंपरिक अध्ययनाला छेद देणारी आहे.'[२]; भाषेचा फक्त व्यवस्थाकेंद्री पारंपरिक अभ्यास इथे नाकारून भाषाव्यवहाराला प्राधान्य दिले गेले, यात भाषा आणि समाज यातील अनुबंध मांडला ही भाषाभ्यासाला मिळालेली नवी दिशा होती. त्यामुळे समाजभाषाविज्ञान हे आधुनिक भाषाविज्ञानातील महत्त्वाचे अभ्यासक्षेत्र ठरते. समाजभाषाविज्ञानाचे स्वरूप अधिक स्पष्ट होण्यासाठी काही भाषाभ्यासकांच्या व्याख्या विचार घेणे महत्त्वाचे ठरेल. आर हडसन यांच्या मते, 'समाजभाषाविज्ञान म्हणजे भाषा आणि समाज यातील अंत:संबंधांचा अभ्यास होय.'[३] इथे हडसन भाषेचे सामाजिक संदर्भान्वये अभ्यास अशी भूमिका घेतो. डेल हाईम्स यांच्या मते, 'समाजभाषाविज्ञान ही भाषाव्यवहारातील ध्वनी शब्द रूपांच्या मागे सांस्कृतिक पार्श्वभूमी उभी असते. तिचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला जातो.'[४]; डेल हाईम्स यांच्या व्याख्येमध्ये भाषा आणि संस्कृती या सूत्राची मांडणी केलेली आहे. कल्याण काळे यांच्या मते, 'मानवी समाज, लिंग, वय, व्यवसाय, परंपरा इ. अनेक कारणांनी विभागला जात असतो. असे निरनिराळे सामाजिक गट तयार झालेले असतात. त्यांच्यामुळे भाषाव्यवहारातही अनेक भेद निर्माण होतात. त्यामागची सामाजिक, सांस्कृतिक कारणे समजून घेऊन करण्यात येणारा भाषाभ्यास म्हणजे समाजभाषाविज्ञान होय.'[५] कल्याण काळे यांच्या व्याख्येतून समाजभाषा विज्ञानाचे स्वरूप अधिक स्पष्ट होते. उपरोक्त व्याख्यांवरून भाषा, समाज आणि संस्कृती यातील अंतरसंबंधाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला जाते हे लक्षात येते.

समाजभाषाविज्ञानामध्ये उपरोक्त मर्मदृष्टी घेऊन अनेक समाजभाषावैज्ञानिकांनी सिद्धांत मांडलेले आहेत. समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीत त्यांना विशेष महत्त्व आहे. त्यामध्ये सपीर-वोर्फ यांचा 'भाषिक

सापेक्षतावादाचा सिद्धांत, मॅलिनोवस्कीचा' समाजधिष्ठित संदेशवहन क्षमता सिद्धांत, जॉन गम्पर्झ यांचा 'भाषिक भांडार व लघुक्षेत्र सिद्धांत, ब्राझील बर्नस्टीनचा 'न्यून सिद्धांत, विल्यम लबवचा 'भाषाभेद सिद्धांत, जोशुआ फिशमन यांचा 'भाषेचे समाजशास्त्र आणि मिखाईल बाख्तिनचा साहित्यकेंद्री 'भाषिक संज्ञापन सिद्धांत' यांचा समावेश होतो.

एकूणच समाजभाषाविज्ञान ही आधुनिक भाषाविज्ञानातील महत्त्वाची भाषा शाखा आहे. तिचे स्वरूप आंतरविद्याशाखीय असून त्यामध्ये समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि भाषाशास्त्र या तीन संशोधन शाखांमधील तत्त्वान्वये भाषेचा अभ्यास केला जातो. समाजभाषाविज्ञानाच्या उपरोक्त स्वरूपाचा विचार करता याची संशोधन पद्धती आपल्या लक्षात येते. उपरोक्त मांडणीतूनच 'समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीची तत्त्वे आपणास, मांडता येतील. ती खालीलप्रमाणे आहेत. त्यातूनच 'समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीची तत्त्वे आपणास, मांडता येतील. ती खालीलप्रमाणे आहेत.

**समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती :** संशोधन या प्रक्रियेला Re-search' असे म्हणतात. पुन्हा एखाद्या घटनेचा शोध घेणे या व्यापक भावनेला संशोधन म्हटले जाते. मानव, समाज, संस्कृती आणि भाषा या क्षेत्रातील संशोधनही निरंतन चालणारी प्रक्रिया आहे. कारण परिवर्तनशीलता हा या घटकांचा गुणधर्म असतो. मात्र असे असले तरी या संशोधनाची विशिष्ट पद्धती Methodology' असते. समाजभाषाविज्ञान या शाखेचे स्वरूप बहुआंतरविद्याशाखीय आहे. त्यामुळे इथे संशोधन करताना केवळ भाषावैज्ञानिक संशोधन पद्धती माहिती असून चालत नाही तर त्याबरोबरच समाजशास्त्र, मानवशास्त्र, मानववंशशास्त्र इ. शाखांमधील ज्ञानही आवश्यक ठरते. त्यामुळे समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती ही इतर पद्धतीपेक्षा वेगळी व व्यापक आहे.

'भाषाव्यवहार' हा समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीचा मुलाधार आहे. हा भाषाव्यवहार व्यक्ती-व्यक्तींमधील संबंध व्यक्ती-समाज यामधील संबंध, व्यक्ती स्वभाव, त्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, आणि संदेशनाचे स्वरूप इ. घटकांनी निर्धारित होतो. जे. ए. फिशमन या समाजभाषावैज्ञानिकाने भाषाव्यवहार आणि मानवी वर्तनाची सामाजिक घडण यातील परस्परप्रक्रियांचा अभ्यास हे सूत्र स्वीकारून समाजभाषावैज्ञानिक संशोधनाचे तीन पैलू मांडले. ते पुढील प्रमाणे, अ) वर्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) एखाद्या भाषिक समाजात भाषेच्या सामाजिक वापराची घडण कशी आहे याचे वर्णन येथे होते. कोण, कुणाशी, कोणत्या वेळी, कोणत्या कारणांसाठी कोणती भाषा बोलतो, यांचा

थोडक्यात, भाषिक वापराची सामाजिक प्रमाणके कोणती याचा विचार होतो. आ) गतिशील (डायनॅमिक) : एकाच भाषिक समाजात वेगवेगळ्या संदर्भात वा परिस्थितमध्ये वेगवेगळे भाषाभेद का उपयोगात आणले जातात, याचा अभ्यास. इ) उपयोजित (अप्लाईड): भाषाध्यापन व भाषा अध्ययन, भाषांतर, लिपिव्यवस्था, भाषा-नियोजन, (लँग्वेज प्लॅनिंग) इ. संबंधीच्या प्रश्नांना विचार या अंगाने होतो.[६] उपरोक्त फिशमन यांच्या विवेचनात भाषाव्यवहार केंद्रवर्ती धरलेला आहे. त्याचबरोबर भाषाभेद हा घटकही त्यात आस्थाविषय आहे. भाषाभेद अथवा भाषाबदलाचे परिवर्तनीय घटक जे भाषेत असतात. ज्यांचा वापर भाषिक समाज करतो. त्या परिवर्तनीय घटकांचा संबंध. सामाजिक असून या घटकांचे विश्लेषण समाज-भाषावैज्ञानिक संशोधनात महत्त्वाचे मानले जाते या संदर्भात रमेश धोंगडे लिहितात, 'परिवर्तनीय घटक शोधणे, त्यांच्या वापराच्या भाषेचे नमुने ध्वनिमुद्रित करणे, भाषितांमागच्या सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करणे, सामाजिक विश्लेषणातून मिळणारे विविध प्रवाह आणि भाषकांचे संबंध तपासणे आणि त्यातूनच मग कोणता परिवर्तीत पर्याय कोण, कुठे, केव्हा वापरतो याचे अनुमान करणे या पद्धतीने सामाजिक भाषावैज्ञानिकाला काम करावे लागते.[७] समाजभाषावैज्ञानिक संशोधनातील ही महत्त्वाची पायरी आहे कारण प्रत्यक्ष भाषावापराचे नमुने येथे महत्त्वाचे आहेत.

जेनिफर बायर यांनी "Methodology of Data Collection and Data Analysis in Sociolinguistic Research"[८] या लेखामध्ये समाजभाषाविज्ञान हे भाषिक समाजाच्या व्यवहाराचे प्रत्यक्ष परिशीलन सामाजिक संदर्भात करणारे अभ्यासक्षेत्र आहे यात भाषाभेदांची सामाजिक, सांस्कृतिक घटकान्वये चिकित्सा केली जाते. यामध्ये दोन मुख्य हेतू असतात एक वेगवेगळे भाषिक समूह कसा भाषाव्यवहार करतात आणि दोन एकाच भाषिक समाजात होणारे वैविधपूर्ण भाषिक उपयोजन या दोन्ही प्रकारांना बायर अनुक्रमे इंन्ट्रक्शनल आणि को-रिलेश्नल असे म्हणतात. समाजभाषावैज्ञानिक संशोधनामध्ये प्रश्नावली तयार करून भाषासामग्री गोळा करण्याचा पद्धती वापरली जाते विल्यम लबव्ह याने प्रथमत: तिचा वापर केला आहे. अशा स्वरूपाची प्रश्नावली Central Institute of Indian Languages (CIIL) यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेली आहे. एम.व्ही. श्रीधर, एच.आर. दुआ, आणि के.एस. राजश्री सुब्रय्या यांनी संपादित या ग्रंथाचे नाव Questionnaire Bank for Sociolinguistic Surveys in India असे

आहे. यातून भाषेचा सामाजिक संदर्भात अभ्यास करताना समाज आणि भाषा या दोहोंतील कोणकाणत्या घटकांवर भर द्यायचा याचे दिशादर्शन होते.

अशा प्रकारे समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धतीतील बारकावे आपण लक्षात घेतले. हे संशोधन पायऱ्या पायऱ्यांनी केले जाणारे असल्यामुळे निरीक्षण, व्यवस्थापन आणि विश्लेषण ही वैज्ञानिक संशोधन पद्धती इथे मुख्यत: केंद्रवर्ती धरलेली आहे.

**समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती : महत्त्व व मर्यादा :** समाजभाषाविज्ञान या भाषाभ्यास शाखेचे महत्त्व आणि तिच्या मर्यादेसंदर्भात डॉ. मिलिंद मालशे लिहितात, 'सामाजिक दृष्टिकोण स्थिरावले आहेत. असे काही आज म्हणता येणार नाही. परंतू इथे दोन गोष्टी स्पष्ट व्हाव्यात एक म्हणजे भाषाभ्यासाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण या अभ्यासक्षेत्रात पुरविला आहे. व तो फलदायी ठरण्याची शक्यता बरीच आहे. दुसरे म्हणजे भारतासारख्या बहुभाषिक तसेच आर्थिकदृष्ट्या विकसनशील देशामध्ये ज्या भाषिक समस्या निर्माण होतात. त्यांचे स्वरूप नीट लक्षात येण्यासाठी समाजभाषावैज्ञानिकांच्या संशोधनाची बरीच मदत होण्यासारखी आहे. शासकीय व्यवहाराचे माध्यम, उच्च शिक्षणाचे माध्यम, संशोधनपर लिखाणाचे माध्यम, भिन्न राज्यांमधील माणसांना जोडणारा दुवा इत्यादी कार्ये आपल्या देशात कोणती भाषा करणार? वेगवेगळ्या भाषा व त्यांच्या उपभाषा वा 'बोली' यांची व्यवस्था कशी लावायची? शालेय व विद्यापीठाने शिक्षणपद्धतीमध्ये कोणती व किती भाषा शिकवाव्या? भारतातील भाषा व इंग्रजी या भाषांचे परस्परसंबंध काय व एकंदर सामाजिक व्यवहारात त्यांना स्थान कोणते द्यायदे? या सारखे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. या पूर्वतयारीचा एक भाग म्हणून सामाजिक भाषाविज्ञानातील मूलभूत संकल्पना व त्यांचा परिचय करून घेणे महत्त्वाचे आहे.[१०] मिलिंद मालशे यांचे संपूर्ण विवेचन समाजभाषाविज्ञानाचे महत्त्व आणि मर्यादा मांडते.

एकविसाव्या शतकातील आधुनिक भाषावैज्ञानिक संशोधनामध्ये 'समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती' ही अत्यंत महत्त्वाची आहे. मानव, समाज, संस्कृती आणि भाषा यातील आंतरसंबंधाचा शोध यात घेतला जात असल्यामुळे एकूणच मानवी जीवन शोध आणि विकासासाठी या संशोधन पद्धतीची आवश्यकता कालातीत ठरणारी आहे. त्यामुळे समाजभाषावैज्ञानिक संशोधन पद्धती ही जागतिक स्तरावरील संशोधनात महत्त्वाची ठरते. हेच तिचे वेगळेपण आणि व्यापकता सिद्ध करते.

❀❀❀

# आदिवासी पौराणिक लोककथागीतांचा अभ्यास

**प्रा. मंदा नांदूरकर**

'लोककथागीते' ही लोकसमूहातील परंपरा प्राप्त कथांचे आविष्करण होय. 'लोककथागीते' ही दीर्घ विस्तृत आढळतात. लोककथागीते ही भूतकाळातून वर्तमानकाळापर्यंत पिढ्यान्पिढ्या परंपरेने चालत आलेले आहेत. लोककथागीते ही स्थानिक स्वरूपाची असतात, त्याचा कर्ता अज्ञात दिसून येतो , ही कथागीते मौखिक परंपरेने चालत आलेली दिसतात. लोककथागीतांमध्ये चरणांची पुनरावृत्ती दीर्घ कथानक दिसून येते.

आदिवासी जमातीपरत्वे भाषा, शब्द, शैली व कथानक इत्यादीमध्ये फरक दिसून येतो. घटनांचे वास्तव चित्रण लोककथागीतांतून आढळते. लोकथागीतांत प्रामुख्याने **प्राचीन लोककथागीते, कौटुंबिक लोककथागीते, पौराणिक लोककथागीते** आढळतात.

प्रस्तुत शोधनिबंधात आदिवासी पौराणिक लोककथागीतांचा अभ्यास केला आहे.

**पौराणिक लोककथागीते :**

आपल्या आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यांनी गोंडांच्या सांस्कृतिक जीवनाचे हे अंत:प्रवाह सतत स्वत:चे वेगळेपण सिद्ध करीत आलेले आहेत. गोंडामध्ये जी समाजरचना आढळून येते ती प्राय: देवपद्धतीवर आधारित आहे, ह्या देवपद्धती अनुसरूनच गोंडांचे लग्नविधी पार पडत असतात.

देवपद्धती कोणी व कधी निर्माण केली, त्यामागची भूमिका काय ? इत्यादी प्रश्नांची उत्तरे त्यांच्या धर्मकथेत मिळतात. गोंडांची धर्मकथा गीतरूपाने आढळते, ह्या कथागीताची सुरुवात जंगो आणि लिंगो ह्यांच्या नावाने झालेली आढळते.

श्री हर जंगो, श्री हर लिंगो ।
कोयावंशी जन्मे माता । पदमालपुरी काको मावा ।
कलिपुट आंदोर । आको मावोर ।।
यादराहूट तादो मावोर । सोनेदेवी बापी मावा ।
जुगाव राहूट बाबो मावोर । सोनेदेवी आवाल मावा ।

ह्यावरून कंकालकालीचा वंश हा कोया वंश, तिचे वडील जुगाद राहूड, आई सोनादेवी, आजोबा यादराहूड, आको कालिपूट व काको म्हणजे आईची आई पद्मामाल पुरी इत्यादींच्या नावांचा बोध होतो.

महादेव कोळयांची बहुतेक लोककथा ही पौराणिक कथांवर रचलेली आढळतात. त्यात शिवचरित्रातील कथा, कृष्णजन्माच्या कथा, त्याच्या बालपणातील खोड्या इत्यादी कथाविषय असतात. शिवचरित्र व कृष्णचरित्र महादेव कोळ्यांना चांगल्या रीतीने ठाऊक असते, ही त्यांच्या कथागीतांवरून सहज लक्षात येते.

गौरी सणाच्या वेळी महादेव कोळी स्त्रियांनी म्हणावयाच्या एका कथागीतात गणपती जन्माची कथा सांगितलेली आहे.

शिवचरित्रातील कथानकाप्रमाणे गणपती हा शिव-पार्वतीचा मुलगा होय. परंतु त्याला मानवी शीर नसून हत्तीचे शीर आहे, हे शीर कसे आले? ह्या लोककथागीतात सांगितलेले आहे. मूळ कथानकाशी काहीसा विसंगत असा कथाभाग ह्या गीतात आलेला आहे. कथागीत दीर्घ आहे. महादेव एकदा वनवासाला गेले असताना, पार्वती एकटीच घरी असते, ती एके दिवशी अंघोळीला बसली असता आपल्या अंगाचा मळ काढून त्याचा गणपतीबाळ बनवते असे अद्‌भूत वर्णन ह्या गीतात आले आहे. गणपतीचा हा अनैसर्गिक जन्म आहे.

तीनं अंगीचा मळ काढीला अंगीचा मळ
त्याचा बनविला बनविला देवगणराजा

ह्या देवगणराजाला (गणपतीला) ती रखवालदार म्हणून दरवाजावर ठेवते. काही दिवसानंतर वनवासाहून महादेव परत येतो. गणपतीला दरवाजाजवळ पाहून त्यांना आश्चर्य वाटते, हा नवीनच गृहस्थ दारावर कोण असावा व तो इथे कशाला बसला असावा? ह्याचे कुतूहल तर त्यांना वाटतेच, परंतु मनात क्रोधाग्नी उठतो, म्हणूनच ते आल्याआल्याच पार्वतीला विचारतात,

पार्वती हे बाळ गं बाळ कोणाचा

पार्वती म्हणते,

मी त बैसले बैसरे रे न्हायाला
म्या त अंगीला मळ काढीला
त्याचा बनविला बनविला देवगणराजा

पार्वतीचे हे उत्तर ऐकताच शिवाचा क्रोध अनावर होतो. कंबरेची तलवार काढून तो गणपतीचे शीर धडावेगळे करतो. गणपतीचे धड धाडकन

जमिनीवर कोसळते, परंतु शीर मात्र आकाशात उडून जाते असे काहीसे अतिशयोक्तीपूर्ण व चमत्कारिक वर्णन पुढे आलेले आहे.

धड ग काय धरणीला धरणीला पाडला
शिर काय शिर काय आकाशी उडाला

गणपतीचे उडालेले शीर आकाशात देवगणांशी बोलू लागते, असे वर्णन गीताच्या शेवटी आलेले आहे. अशीच कथा आदिवासेतर जातींमध्ये आढळते.

महादेव कोळ्यांच्या दुसऱ्या कथागीतात, कृष्णजन्माची कथा सांगितलेली आहे. कृष्णाचा जन्म देवकीच्या पोटी कंसाच्या बंदीखान्यात होतो, हे मूळ कथानक, महादेव कोळ्यांनी ही गीतरचना केलेली आहे. कृष्ण-जन्माचा वृतांत गीताच्या प्रारंभी आलेला आहे.

देवराबाई बाळंवतीन वल्या वल्या कुशी
जल्मला किसनदेवू गोकूळ अष्टमीच्या दिशी

देवकीच्या बाळंतपणातील स्थितीचे वर्णन पुढे आलेले आहे. कृष्णजन्माच्या मूळ कथानकाशी विसंगत असे हे वर्णन आहे.

देवराबाई बाळंवतीण रक्ताभरली पायली
नऊ लाख सोना इना देवाला वाह्यली

कृष्णाच्या जन्मामुळे वसुदेव-देवकी ह्यांना चिंता पडते. सूर्योदय होताच, ठरल्याप्रमाणे कंस कृष्णाला ठार मारणार ही त्यांना भीती असते. परंतु कृष्णाची लीला अद्भूत! बंदीगृहाची कुलुपे आपोआप उघडतात आणि बेडीबंद वसुदेव मुक्त होतो. कृष्णचरित्रातील ह्या अद्भूततेने महादेव कोळ्यांच्या काव्यप्रतिभेला प्रभावित केलेले दिसून येते.

पावरा या जमातीतील एका कथागीतात राजा इंद्र, त्याची बहीण पुरमा, पुरमाचा नवरा ओलाविहाण व भोजराज नावाचा एक चोर ह्यांच्याशी संबंधित त्यातील पौराणिक कथाभाग आहे. पुरमा आणि ओलाविहाण हे पती-पत्नी असून त्यांचे वास्तव्य जंगलात असते. एकदा भोजराज नावाचा एक चोर जंगलात येतो व संधी साधून रात्रीच्या वेळी तो पुरमाच्या घरी चोरी करून सर्व मालमत्ता घेऊन जातो. त्यानंतर तो पुन्हा चोरी करावयास येतो व पुरमाला खांबाला बांधून चाबकाने झोडपून काढतो. जीवाच्या भयाने ती त्याला उरल्यासुरल्या मालमत्तेचे गुपित रहस्य सांगून टाकते. मालमत्तेचा पत्ता मिळताच तो चोर लागोपाठ सात वेळा त्यांच्या घरी चोरी करून माल हिसकावून घेतो व तिला घराबाहेर हाकलून देतो. पावऱ्यांच्या कथागीतात हे वर्णन खूप सुरेख आहे. ते पहा-

''इंदिवाप्य राजा कोय इंदो राजा कोय तेरी बोने काई
पुरमा वांजण बालपण वाजी परमा वांजीण चाडी बोरी रोयलो
भोई राजा मालमत्ता ला गयलो भोई राजा खांबा टेका बांदीने
पुरमा वांजणे चित बोंदा मारोन मारे देनलो कोथ भाई राजा
माल कुबली रोयली पुरमा वांजणे मालमत्ता ली गयलो भोई राजा
हात फेरा लुटाय गयलो वली बिहाण विराणी निका बाते
बाल बचे रतो ते नेय जातो
कमरेन लुगडं, सोडाली लेदलो नांगी भोगी वाली काडली राणीले
ओली विहाणं बाल नेयने बच्चो नेय आंखो माल लुटाय गयो
इंदा राजा गोरी कयली पुरमा वांजण''

**'कोरकू'** हे रावण व मेघनाथाला पूजनीय मानतात. त्यांना आपले पूर्वज मानतात. त्यांच्याबद्दल कोरकूंच्या अंत:करणात वसत असलेली असीम श्रद्धा शब्दरूप घेऊन लोककथागीतात व्यक्त झालेली आढळून येते. रामायणात, रावणाने साधूचा वेश धारण करून सीतेला पळवून नेल्याचा करुण प्रसंग आहे. हे मूळ कथानक कोरकूंच्या लोककथागीतात उलटापालट झालेले आढळते. कोरकूंच्या 'रावणा सिरीज' ह्या लोककथागीतात, सीताच जोगीच्या वेशातील रावणावर लुब्ध होऊन त्याच्यासोबत निघून गेली असे वर्णन केलेले आहे. सीतेला रावणाने चोरून नेली नाही तर ती स्वत:च त्याच्याबरोबर गेली असे कोरकूंचं म्हणणे आहे. परंतु स्वत:च ती का गेली ह्याची कारणे त्यांच्या कथागीतात दिलेली आहेत. साधूच्या वेशातील लंकेच्या रावणाचे तू काय पाहिलेस अशी सीतेला उद्देशून कथागीताची सुरुवात आहे.

लंका रावणा जुगी चोजमा डोयेम जोय
लंका रावणा जुगी चोजम डोये

तेव्हा सीतेला रावणाच्या कोणकोणत्या गोष्टी आवडल्या ह्याचे वर्णन पुढील कथाभागात आलेले आहे.

लंका रावना सीर-टुपी डोएम जोय
लंका रावना जुगी टाऊटेन ओलेन
लंका रावना जुगी टाऊटेन ओलेन जोय
लंका रावना टीका ठेंगा डोएम जोय
लंका रावना जुगी टाऊटेन ओलेन
लंका रावना पॉय का पिंजना डोएम जोय

**'कोकणा'** आदिवासींचे एक पौराणिक कथागीत रामायणातील एका प्रसंगावर आधारित आहे. सीता गर्भवती असताना अरण्यातील ऋषींच्या

आश्रमात जाऊन काही दिवस राहण्याची इच्छा ती रामाजवळ व्यक्त करते. परंतु रावणाच्या लंकेत राहिल्यामुळे सीतेच्या पावित्र्याबद्दल एका परिटाने व्यक्त केलेली शंका रामाला आधीच कळलेली असते व तो सीतेचा त्याग करण्याचा निश्चय करतो. सीतेने ऋषी-आश्रमात जाण्याची इच्छा व्यक्त केलेली असतेच. तेव्हा तिला अरण्यात सोडून तिचा त्याग करण्याची हीच वेळ योग्य आहे, असा विचार करून राम, लक्ष्मणास सीतेला रानात सोडण्यास सांगतो. राम आपला त्याग करीत आहेत ह्याची तसूभरही कल्पना बिचाऱ्या सीतेला नसते. आपण अरण्यातील ऋषी-आश्रमात राहावयास जाणार ह्या आनंदाने ती लक्ष्मण दीरास रथाच्या धुरीसाठी लाकडे आणावयास आंब्याच्या वनात जाण्यास सांगते.

आर आ-र लक्ष्मीमन देरा । जाय आंब्याच्या वनी
तोडी आंब्याचा फोक । त्याची धुरी बनावली
त्याचा रथ बनवला ।

भावजयेच्या आदेशानुसार लक्ष्मण रथ तयार करून सीतेस रथात बसावयास सांगतो.

आव सीता भावजयी ।
तुम्ही बसा रथामंदी ।

सीता लक्ष्मणास रथाच्या धुरीवर बसावयास सांगते,

आ-र लक्ष्मीमन देरा ।
तुमी बसा धुरीवर ।

लक्ष्मण रथारूढ होतो व रथ अरण्याच्या वाटेने घेऊन जाऊ लागतो. ती वाट तिच्या माहेराची नसते. तेथे नारळाची दाट बने नसतात. आंब्याची गर्द आमराई नसते. तेथे असते नुसते किर्रर दाट जंगल. हिंस्र श्वापदांनी गजबजलेले. उदास, भकास वातावरणात न्हाऊन निघालेले, नुसते जंगल, हे सर्व दृश्य पाहून मात्र सीता मनात जे समजायचे ते समजून जाते व रडू लागते. तिचा क्षणापूर्वीचा आनंद पार मावळून जातो.

रथ चालं वनामधी । सीता रडं मनामंदी ।
माझे माहेराचे वाट । नारळाचा बन दाट ।
माझे माहेराचे वाट । अंबाईचा बन दाट ।

करुण रसाने परिपूर्ण असा हा प्रसंग आहे.

आदिवासींच्या लोककथागीतांची व लोकगायकांची प्रथा जुनी व उज्ज्वल आहे.

❀❀❀

# संस्कृती आणि संशोधन व्याप्ती व मर्यादा

प्रा. सुभाष अडावतकर

**संस्कृती :**

संस्कार पूर्ण संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती. संस्कृतीची उत्पत्ती जतन व संक्रमण भाषेच्या द्वारे होते. भाषा हे संस्कृतीचे एक प्रभावी अंग आहे. भाषेशिवाय संस्कृतीची निर्मितीही होणार नाही व संक्रमण होणार नाही. संस्कृती व्यक्तीच्या जीवनक्रमात संस्कृतीची निर्मिती होणे अशक्य आहे.

**संस्कृतीची निर्मिती :**

सांसारिक उपाधीतूनच संस्कृतीची निर्मिती होते. मनुष्य आपली सर्व भौतिक व मानसिक संपत्ती ठेवून जातो व ती पुढच्या पिढीला उपयोगी पडते हेच संस्कृतीचे मुख्य बीज आहे. मानव इतर ज्ञानापासून परपरागत वस्तूचा व मूल्याचा वारसदार होऊ शकतो. म्हणून संस्कृती निर्माण होते. जतन होते व वाढीस लागते.

**संस्कृतीचे स्वरूप :**

संस्कृतीचे एक अंग दृश्य व हस्तग्राह्य असते घरे. कपडेलत्ते, खाण्यापिण्याचे पदार्थ हे डोळ्यांना दिसतात. हातात धरता येतात किवा चाचपून पाहता येतात. जी व्यक्ती या सर्वाचा उपभोग होते ती क्वचितच त्याची निर्मिती असते. काही भाग मागील पिढ्यांनी निर्माण करून हक्काने येतो म्हणजे बापाकडून मुलाकडे जातो. त्याप्रमाणे व्यक्तिगत वारशाने नव्हे तर सामाजिक वारशाने येतो. तर काही इतर व्यक्तीच्या श्रमाने निर्माण होऊन देवघेवीच्या सारे आपणास मिळतो व्यक्तीला स्वत:च्या शक्तीने जेवढे निर्माण करता आले असते. त्याच्या कितीतरी पट जास्त वस्तूंचा उपयोग संस्कृतीच्या वारसाने त्याला मिळतो हा मोठा फरक माणसात व इतर सर्व प्राण्यात असतो. इतर सर्व प्राणी स्वत:च्या श्रमाने मिळेल तेवढेच खातात.माणूस पिढ्यानपिढ्याच्या श्रमाचे खातो व उपभोगात मनुष्य भोवताच्या सृष्टीतून आपल्या उपयोगाचे पदार्थ निर्माण करतो. ती कला इतरांना शिकवतो. अशा पद्धतीने मानव जीवनात विविधता आणि संपन्नता आणतात.

संस्कृतीचे दुसरे अंग ज्ञानेन्द्रियाच्याव्दारे बुद्धिगम्य झालेले असे आहे. हे अंग म्हणजे मनुष्याने सामाजिक जीवन जगण्याची रीत होय एकमेकांशी वागणे बोलणे संघटित जीवन जगणे याच ठराविक साच्यात तो अडकतो संस्कृतीच्या आंतरिक असा नियम आहे की ती एकमेकांना बळकटी आणतात. वाड्मय, धर्म, तत्त्वज्ञान ही सर्व संस्कृंतीचे अंगे संस्कृतीला उचलून धरतात.

संस्कृतीत बदल व्हावयास त्या संस्कृतीत जन्मलेल्या व्यक्तीचे गुण व वर्तन असे कारणीभूत होते.

**संस्कृती आणि बदल :**

संस्कृतीत बदल व्हावयास त्या संस्कृतीत जन्मलेल्या व्यक्तीचे गुण व वर्तन असे कारणीभूत होते. तसेच इतर संस्कृती संबंध आला म्हणजे ही परिर्वतनास मदत होते मानवांच्या समतेबद्दल भारतात बुद्धापासून वैष्णवापर्यंत निरनिराळ्या व्यक्तीनी व ग्रंथानी चळवळ केली पण त्या चळवळीचा म्हणावा तसा उपयोग झाला नाही.कारण यांची मानव समतेची कल्पना मोक्षमार्गाबद्दल होती. सामाजिक व्यवहाराबद्दल नव्हती. पाश्चिमात्त्य आणि मिशनरींची धर्मपरिर्वनाची चळवळ आणि लोकसत्तेच्या कल्पना यामुळे जातिभेद व अस्पृशता ह्या प्रश्नाला चालना मिळाली व संस्कृतीचा प्रभाव जास्त निर्माण झाला. परंतु संस्कृती बदलत जाते. म्हणजे बद्दल झाला की संस्कृती बिघडली असे नव्हे काही बदल चांगल्यासाठी होतात. तसेच वाईटासाठीही होतात. बदल झाला म्हणून ओरडून फायदा नाही व बदल झालाच पाहिजे असे ही नाही काही राजकारणी व समाजसुधारक सांस्कृतिक प्रवाह बदलत समाजाला वळण लावण्याचा प्रयत्न करीत असतात. पण या लोकांना स्वत:च्या स्वार्थासाठी आवश्यक असलेल्या बदलाची जरुरी असते म्हणून हे सुधारक वर्तमान पत्रातून , रेडीओद्वारे, आपल्याला सतत एकच प्रकारचा सुधारणाचा प्रसार व प्रचार करतात. त्यामुळे सुधारणा करण्याच्या पद्धतीमुळे सर्वसामान्य व्यक्तीचे आचार विचाराचे स्वातंत्र्य नष्ट होऊन संस्कृती संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण होते म्हणून सुधारकांनी आणि राजकारणांनी एक छाप संस्कृती बदलण्याचा प्रयत्नच करू नये.

एखाद्या समाजातील चांगल्या वाईटाचे वाटेकरी सर्वच असतात. व बदल करताना सर्वनाच बदलावे लागते. एखाद्या देवदासी वेश्यांचा प्रश्न हाती घेतला म्हणजे फक्त वेश्यांचीच सोडवणूक करून चालणार नाही तर त्यांच्यावर पोसणाऱ्या व त्यांचा उपयोग करणाऱ्या सर्वांचीची सोडवणूक करण्याच्या मार्गाला लागले पाहिजे. कारण संस्कृतीबाबतच्या कोणत्याही प्रश्नाचा विचार समदृष्टीने करावयास पाहिजे.

भारतीय संस्कृती प्रत्येक पाऊल बुद्धिपूर्वक टाकावयास सांगत आहे. विचार सर्वत्र घेऊन जा धर्म म्हणजे काय? धर्म म्हणजे प्रत्येक क्रिया डोळस पणे करणे फक्त संध्या करणे म्हणजेच धर्म नाही. धर्म म्हणजे डोळसपणा, धर्म म्हणजे कर्म करणे. धर्म हा देवघरापुरता नसतो. तो सर्वत्र असला पाहिजे. तुम्ही जे जे कराल ते ते धर्ममय पाहिजे.
निर्मळ विचार व शुद्ध दृष्टी यांची आज नितांत आवश्यकता आहे. सखोल अभ्यासाची आवश्यकता आहे. प्रयत्न व कष्ट यांची जरुरी आहे समाजाबद्दल प्रेम व कळवळ यांची जरुरी आहे.

## संस्कृती आणि संशोधन

**संशोधनाचा प्रारंभ** : आपल्या देशात आधुनिक काळात संशोधनाची पायाभरणी ब्रिटिशानीच केलेली असावी. 'विल्यम जोन्स' यांनी इ.स. १७८४ मध्ये एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ही संस्था स्थापन केली. तिचे उद्दिष्ट आशियाचा प्राचीन इतिहास, प्राचीन अवशेष कला, शास्त्रे व वाङ्मय इत्यादीचा अभ्यास करणे हे होते. आशियातला हा पहिलाच संशोधनविषयक उपक्रम होय असे म्हणता येते.

स्वत:च्या इतिहास संस्कृतीसंबधी औत्सुक्य ठीक आहे. पण आशियाच्या इतिहास संस्कृतीविषयी या व्यापाऱ्यांना एवढे प्रेम असण्याचे कारण काय? त्याचे उत्तर प्रबोधनाच्या चळवळीच्या दुसऱ्या वैशिष्ट्यात आहे व ते वैशिष्ट्य म्हणजे एक प्रकारचा मानवता वाद होय ब्रिटिश व्यापारी ह्या दोन वृत्तींनी संस्कारित झालेले होते आणि म्हणून त्यांना प्रथम आशियाचे लोक व संस्कृती समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच पुढे जेव्हा शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा एतद्देशीयास त्यांच्याच भाषांत व त्यांच्याच संस्कृतीचे शिक्षण द्यावे असे प्रारंभी ठरले होते. त्याचप्रमाणे प्रमुख शहरी पाठशाला व मदरसे स्थापन ही झाले होते. ब्रिटिश राज्यकर्ते राजकीय वा आर्थिक दृष्टीने जरी निष्ठुर होते. तरी संस्कृती प्रेमाचा ज्ञानसाधनेचा ओघ त्यांच्या अंतरंगातून अखंडपणे वाहत होता असे दिसून येईल. स्वत:च्या साम्राज्यशाही धोरणाबद्दल व करडेपणाबद्दल ख्यात असलेल्या आणि त्यामुळेच भारतीय जनतेत अप्रिय झालेल्या लॉर्ड कर्झनने इ.स. १९०४ मध्ये भारतीय पुराण वस्तू संशोधन खाते स्थापन केले प्राचीन वास्तुकलेचे त्याला विलक्षण आकर्षण होते.

१८५७ मध्ये नवी विद्यापीठे स्थापन झाल्यानंतर सुशिक्षितांच्या ज्या पिढ्या पुढे येऊ लागल्या त्यांचे लक्ष प्रामुख्याने इतिहासाकडेच वळले न्या. रानड्यांनी प्राचीन संताच्या कार्याचे मूल्यमापन केले व मराठी सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ याच दृष्टीने लिहिला. महाराष्ट्रात संशोधनास सुरुवात जरी श्री. नी. ज.

किर्तने यांच्या ग्रँट-डफच्या इतिहासावरील निबंधाने इ.स. १८६७ मध्ये झाली तरी काव्येइतिहाससंग्रह ह्या इ.स. १८७८ त निघालेल्या व अकरा वर्षे चाललेल्या मासिकाने संशोधनाचे नवेच युग महाराष्ट्रात निर्माण केले. युरोपमध्ये ज्याप्रमाणे मुद्रणकला संशोधकांच्या मदतीस आली तसाच प्रकार येथेही झाला. निर्णयसागर प्रेसमधून बहुसंख्य संस्कृत ग्रंथ छापून बाहेर पडले. तसेच काव्यतिहाससंग्रहामधून मुद्रित झाल्या व इतर ५०१ जुनी पत्रे प्रकाशित झाली. साने, खरे, पारसनीस व राजवाडे यांनी महाराष्ट्रात इतिहास संशोधनाचे नवे युग निर्माण केले यानंतर संशोधकाची एक परंपराच महाराष्ट्रात तयार झालेली दिसते. व्यक्तिगत प्रयत्नाप्रमाणे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या स्थापनेचे संस्थारूप प्रयत्नही झाले अशाप्रकारे महाराष्ट्रात संशोधनाची परंपरा प्राय: राष्ट्रीय अभिमानातून निर्माण झाली पाहीजे पहिले म्हणजे बखरीपर्यंतचे संशोधन तर केवळ राष्ट्रीय अभिमानाच्या तीव्र जाणिवेतून होत होते.

संशोधन ही एक प्रवृत्ती असून ती कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित आहे असे नव्हे तिने जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहेत इतकेच नव्हेतर संशोधन हे जीवनाच्या सर्व क्षेत्राचा कणा झालेले आहे. आज जीवनाचे असे एकही क्षेत्र नाही की ज्यात संशोधनाचा उपयोग केला जात नाही. म्हणूनच विद्यापीठांतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठिकाणी एक प्रकारची संशोधन मानसिकता असावयास हवी अशी आवश्यकता आज निर्माण झालेली आहे.

पाश्चात्त्य देशात त्याच्या अगदी उलट परिस्थिती आहे. आपल्याकडे संशोधन म्हणजे ऐतिहासिकचा पुराणवस्तू संशोधन असा संकेत रूढ झाला होता. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे संशोधन म्हणजे औद्योगिक वा यांत्रिक संशोधन असाच संकेत प्रामुख्याने रूढ झाला होता. अर्थात वैज्ञानिक व प्रायोगिक संशोधनाची पार्श्वभूमी त्याला आहे हे खरे आहे. याचे एक गमक म्हणजे - ब्रिटानिका या व इतर विश्वकोशात संशोधन या सदराखाली एकदम औद्योगिक संशोधन संबधीचीच माहिती दिली आहे. ज्याला ऐतिहासिक संशोधन म्हणतो त्याचे त्यांनी हिस्टॉरिऑग्रफी असे स्वतंत्र शास्त्रच मानले आहे. संशोधनासंबधीच्या कल्पनामध्ये मूलभूत असा किती महत्त्वाचा बदल घडून आलेला आहे. त्याची यावरून कल्पना येऊ शकेल संशोधन ही पाश्चात्त्य जीवनाशी अगदी एकजीव झालेले आहे. निरनिराळया वस्तूचे उत्पादक कारखानदार, इत्यादी आपल्या मालाचा दर्जा व खप नुसता तोच न राहता एकसारखा वाढत राहावा म्हणून या संशोधनास वाहिलेल्या प्रयोगशाळा चालवितात. त्यांच्याद्वारे तत्त्वक्षेत्रीय लहान मोठ्या अडचणीचा परिहार केला जातो. एखादी अडचण जर मूलभूत स्वरूपाची असेल तर एखाद्या

विद्यापीठाच्या संशोधन विभागाची मदत मागविली जाते व विद्यापीठही ती मोठ्या आनंदाने देते. निरनिराळ्या शिक्षण संस्था नगरपालिकांसारख्या तसेच व्यापार व अर्थक्षेत्रीय संस्था, सहकारी संस्था, बँका इ. सर्वांना आपल्या अडचणीचा परिहार करून घेण्यासाठी संशोधनाची मदत घ्यावीशी वाटते. या सर्व व्याप्तीमुळे संशोधने हे जीवनात पूर्णपणे मिसळून गेले आहे संशोधनावर होणारा खर्च हा वाया जाणारा खर्च नाही. तो एक भांडवली स्वरूपाचा आहे सर्व समाजाच्या सर्व क्षेत्राची गती अविरत राहण्याचे मुख्य साधन म्हणजे संशोधन होय.

**संशोधन व विविध शास्त्रे :** ज्ञानाच्या शाखेतील बदलाबरोबर संशोधनाचे स्वरूपही बदलते आजच्या ज्ञान शाखांचे वर्गीकरण सामान्यत : पुढीलप्रमाणे केले आहे. पहिली विज्ञान शास्त्रे यात पदार्थ विज्ञान रसायन यासारखी शुद्ध शास्त्रे येतात. त्याचप्रमाणे वनस्पतीशास्त्र व प्राणिशास्त्र वैद्यक यासारखी जीवनशास्त्रेही येतात. ही ज्ञानाची पहिली महत्त्वाची शाखा, दुसरा मोठा विभाग म्हणजे सामाजिक शास्त्राचा ह्यात इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इत्यादी सारखी सामाजिक शास्त्रे मोडतात. ह्या शिवाय व्यक्तिगत भावना, विचार, तत्त्वज्ञान, आविष्कार इ. प्राधान्य असणाऱ्या शास्त्राचा एक तिसरा गट मानला जातो. त्यात प्राय, साहित्य कला तत्त्वज्ञान मानसशास्त्र इ. समावेश होतो. ही सारी शास्त्रे आजकाल बरीच विकसित झालेली आहेत. व प्रत्येकात नव्या नव्या संशोधनाची भर पडत आहे. किबंहुना नव्या संशोधनाच्या बरोबरच ही शास्त्रे अद्ययावत ठेवली जातात. अलीकडे ह्या निरनिराळ्या वैज्ञानिक शास्त्रामधील सीमारेषा पुसट होऊन सर्व समावेशक अशा प्रकारचा तंत्रविधी हा एक नव्याच शब्दाप्रमाणे व नवेच क्षेत्र अस्तित्वात आलेले आहे. संशोधनाचे क्षेत्र किती व्यापक झाले आहे. आणि संशोधन म्हटल्यांनतर निरनिराळ्या क्षेत्रात त्याचा किती विविध प्रकाराचा अर्थ होतो याची कल्पना ह्यावरून येऊ शकेल.

**आजकालच्या संशोधनाचे स्वरूप :** आजकालाचे संशोधन हे विविध घटकांकडून व संस्थाकडून विविध प्रकारांनी पार पाडले जाते आगदी पायथ्याशी औद्यगिक व यांत्रिक संशोधनासारखा मोठा व सर्व समावेशक विभाग आहे. त्यात चालू असलेले संशोधन विशिष्ट उपयुक्ततावादी उद्देशाने चाललेले असते विशिष्ट क्षेत्रात आलेल्या विविध अडचणींचा परिहार करण्यासाठी हे केले जाते हे प्राय: खाजगी व सरकारी उत्पादक संस्थाकडून होते व संशोधन रोजच्या जीवनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असेल तरी त्याला तात्त्विक व सार्वकालिक अधिष्ठान वा महत्त्व फारसे नसते.

दुसरा विभाग म्हणजे तात्त्विक व मौलिक संशोधन हे उच्च संशोधन संस्था व प्रयोगशाळा यांच्याकडून होते या ठिकाणी अतिशय मूलभूत स्वरूपाचे व तात्त्विक संशोधन केले जाते. ह्या संशोधनाचा रोजच्या जीवनाशी संबंध दूरचा असतो. तथापि त्या क्षेत्राची प्रगती होण्यासाठी हे संशोधन अत्यावश्यक असते पंडित मेहरूंनी मोठ्या आग्रहाने अशा स्वरूपाचा संशोधन करण्याची ''राष्ट्रीय प्रयोगशाळा'' ची जी उभारणी केली ती ह्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

ह्या शिवाय लष्क री, यांत्रिकी, शेतकी आरोग्य इ. क्षेत्रात सरकारी प्रेरणेने व पुढाकाराने पुष्क ळसे संशोधन चालू असते. हे राष्ट्रीय संरक्षण, संवर्धन इ. दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते ह्याला ॲप्लाईड संशोधनाचाच एक भाग म्हणता येईल.

**साहित्यकलाचे क्षेत्र संशोधन :** संशोधनाचे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे कलांचे व वाङ्मयाचे. मानवी जीवनात कलेचे आणि वाङ्मयाचे स्थान अतिशय, वैशिष्ट्यपूर्ण आहे. मानवी मनाचा विचाराचा, भावनांचा आत्म्याचा आविष्कार म्हणून वाङ्मय व कला निर्माण झालेल्या आहेत. मानवी मनाची धारणा विचारांचे स्वरूप हे जेवढे सामाजिक आहे तितकेच त्या व्यक्तिगत ही आहेत.

अल्पविकसित किंवा अविकसित अशा सर्व देशात सर्व प्रकारच्या संशोधनाबद्दल एक प्रकारची उत्सुकता निर्माण झालेली असते. त्यासाठी मोठमोठ्या योजना आखल्या जात आहेत. जगातले आजचे वातावरण हे चढा ओढीवर आधारलेले असले तरी कोणतेही राष्ट्र हे उपप्रगत असू नये याबद्दल सर्व राष्ट्राचे एकमत झालेले आहे.

**संशोधनांची सर्व सामान्य वैशिष्टे :** कोणत्याही क्षेत्रातील संशोधन असेल तरी त्यांचे काही सर्व सामान्य वैशिष्टे लक्षात घेणे जरूरीचे आहे. संशोधनामध्ये एक प्रकारची योजकता व आणखी असते ही त्याच्या मथळ्यातून व्यक्त होते.

संशोधन सजीव प्राण्याप्रमाणे स्वयंपूर्ण व स्वयंभू आहे. तिचे पृथक्करण, गृहीत धरलेला विशिष्ट्य कल्पितपक्ष विविध घटकामधील परस्पर पूरकता या गोष्टी योग्यतेने पाहता आल्या पाहिजेत.

जी माहिती मिळविली असेल ती पुस्तकातील किंवा पाहणी पद्धतीने जमविलेली असेल किंवा इतर मार्गाने ती गोळा केलेली असेल तरीही ती माहिती संशोधनाचा पाया आहे. त्याशिवाय संशोधनाचे यंत्र हे पुढे जाऊ शकत नाही.

माहिती सर्व सामान्य वास्तव असली तरी निर्जीव वाटले तरी संशोधकामुळे त्या माहितीला गतिशीलता प्राप्त होते व त्यातून काही निष्कर्ष निघू शकतात.

प्रत्येक क्षेत्रामधील संशोधनात ही वैशिष्टे दिसतात किंवा दिसणे आवश्यक आहे. याच दृष्टिकोणातून संशोधकाने प्रयत्नशील राहावयास हवे.

**संशोधनाच्या विविध अवस्था :** संशोधन हे एक पद्धती शास्त्र आहे शोध घेणे नव्याचा शोध घेणे पुराव्याद्वारे एखादी गोष्ट सिद्ध करणे किंवा सिद्ध गोष्टीचे नव्या संदर्भात उपयोजन करणे. चिकित्सा करणे असे अनेकविध अर्थ व प्रक्रिया आहेत. संशोधनात अनेक प्रक्रियेचा समावेश होतो. यासाठी संशोधन या प्रक्रियेशी तुलना करून साम्यभेद शोधणे सीमारेषा ठरविणे हे आवश्यक असते.

संशोधन करणाऱ्याला आपण नेमके काय करीत आहोत आपली कार्यकक्षा कोणती याचा विचार करावा लागतो. संशोधकाने आपल्याला कोणता प्रश्न पडला आहे कोणतीही समस्या निर्माण झाल्या आहेत या सर्व गोष्टी प्रामुख्याने लक्षात घेतल्या पाहिजेत या शिवाय संशोधकाने संशोधन विषयाला अनुसरून संशोधन पद्धती निश्चित करून तया अनुरोधाने पुरावे गोळा केले पाहिजे कारण ते पुरावे ग्रांथिक, मौखिक व प्रयोगात आलेले निष्कर्ष असतात. कारण वैज्ञानिक संशोधनात प्रयोग आणि निष्कर्ष याला महत्त्व असते. परंतु वाङ्मयीन संशोधनात नेहमीच प्रयोग करणे शक्य नसते. कारण प्रयोगावरून वाङ्मय कृतीची परिणामकारकता मोजता येणार नाही. सशोधनात आरंभ प्रस्ताव माडता येणार नाही. संशोधनात आरंभ प्रस्ताव, पारख आणि लिबंधत अशा पायऱ्या दिसल्या पाहिजेत.

**साहित्य संशोधनाचे क्षेत्र, भाषा :** साहित्य हे खऱ्या अर्थाने 'वाङ्मय' म्हणजे भाषारूप असते. भाषा ही एक अतिशय महत्त्वाची मानवी संस्था आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर ती उत्क्रांत झालेली आहे. साहित्याचे माध्यम हे ग्रंथ ते भाषारूप असतात. भाषा ही अतिगुढ मानवी निर्मिती आहे. ती सामाजिक निर्मिती असून सामाजिक ठेव आहे. संस्कृतीचे वाहन भाषा हेच आहे. ह्या भाषेचा अभ्यास हा एक चिरंतन महत्त्वाचा वाङ्मयीन संशोधनाचा विषय आहे. वाङ्मयाच्या संशोधनात प्राचीन ग्रंथालयाचा खालोखाल भाषा अभ्यासाला महत्त्व आहे. भाषाअभ्यासामध्ये अनेक विषय येतात. भाषेच्या स्वरूपाविषयी काही तात्त्विक स्वरूपाचे संशोधन हा पहिला विभाग भाषाचे दुसरे अंग म्हणजे विशिष्ट ग्रंथातील व विशिष्ट भाषा व तिचे स्वरूप पाहणे हे होय. मराठीत य क्षेत्राचे बरेच काम झालेले आहे. राजवाड्यांनी ज्ञानेश्वरीचे व्याकरण लिहिले तर डॉ. तुळपुळे यांचा यादवकालीन मराठी भाषेसंबधीचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. तरीही भाषिक संशोधनास या दिशेने अद्यापही बराच अवसर आहे असे वाटते. भाषेतले शब्द निरनिराळ्या शास्त्रात संदर्भात कसे वापरले

जातात. हा ही खरे म्हटले तर एक अभ्यासाचा विषय आहे व तो बराच दुर्लक्षित झाल्यासारखा वाटते. भाषेबरोबर व्याकरणाचाही आजपर्यंत मराठीची व्याकरणे लिहिली आहोत. ऐतिहासिक दृष्टीतून त्या सर्वांचा अभ्यास व्हावयास हवा. अलीकडे व्याकरणाकडे वेगळ्याच व आधुनिक दृष्टिकोण लक्ष जात आहे. मराठीचे एक सर्वकला वं प्रमाणभूत व्याकरण अद्यापी सिद्ध व्हायचे आहे. विशिष्ट कालखंडातील तसेच विशिष्ट बोली भाषेचे व्याकरण इ. कडे लक्ष जावयास लागले आहे ते योग्य आहे. तथापि ते केवळ संकल्पनाच्या व पाहणीच्या स्वरूपाचे न राहता त्यात अधिक व्यापकपणा, चिकित्सकपणा व आधुनिक दृष्टीने शास्त्रीयपणा यावयास हवा. साहित्य हे शब्दाचे बनलेले असते. भाषाही शब्दाची बनेलेली असते. त्यामुळे वाङ्मयीन संशोधनात भाषाविषयक अभ्यासाला प्राधान्य मिळावे हे स्वाभाविक आहे.

वाङ्मय क्षेत्रीय संशोधनाचा पहिला व्यापक विभाग म्हणजे वाङ्मय इतिहास अधिष्ठित अशा विविध विषयाचा होय. ह्या कालखंड ग्रंथकार प्रवृत्त्ची व संप्रदाय इ. विषय समाविष्ट होतात.

वाङ्मय क्षेत्रीय संशोधनाच्या बाबतीतला. दुसरा लोकप्रिय विषय म्हणजे एखादा ग्रंथकार व त्याच्या लेखनाचा अभ्यास हा होय या ठिकाणी विषयाचे स्वरूप पाहिले तर ते ''व्यक्तिअभ्यास'' स्वरूपाचे म्हणजे लेखक त्याचे जीवन लेखन त्याच्या लेखन आदीचे आपल्या दृष्टींनी विविध अंगोपंगाचे विवरण होय.

वाङ्मयीन संशोधनाचे तिसरे परिक्षेत्र म्हणजे समीक्षा - क्षेत्रीय विषयाचे या बाबात समीक्षा क्षेत्रात विविध नाद आहेत. विविध प्रवृत्त्ची आहेत त्याचे विवेचन हे प्राय: संकल्पनाप्रधान असणे अपरिहार्य आहे. म्हणजेच विविध संकल्पानाचे चिकित्सक मूलग्राही शक्यतो आकलन महत्त्वाचे असते पण हे संकल्पनाचे चिंतन वाङ्मयक्षेत्रीय असल्याने त्याला निरनिराळ्या वाङ्मयकृतीच्या आधारे अधिष्ठान असते. हे कोणत्या दृष्टिकोणातून दिलेले असते. हे महत्त्वाचे असते.

**तत्त्वज्ञान आणि संशोधन संबंध :**

**तत्त्वज्ञान :**

तत्त्वज्ञान म्हणजे कोणत्याही गोष्टीकडे त्यात गढून न जाता तटस्थपणे पाहण्याची रीत तत्त्वज्ञानाला इंग्रजीत Philosophy असे म्हणतात. Philodophy म्हणजे प्रेम व Sophia म्हणजे शहाणपणा शहाणपणा म्हणजे नुसता माहितीचा संग्रह नव्हे. शहाणपणा म्हणजे कोणत्याही गोष्टीचा सर्व

बांजूनी विचार करून योग्य तो निर्णय घेण्याची क्षमता शहापणात विवेक बुद्धीची पक्कता असते.

तत्त्वज्ञान म्हणजे सिद्धांताकडे जाण्याची एक कृती होय. संपूर्ण विश्वाचा दृष्टीने विचार करता अंतिम जे काही टिकून राहिले ते तत्त्व या तत्त्वासंबधीचे ज्ञान ते तत्त्वज्ञान तत्त्वज्ञान म्हणजे दृश्य विश्वाचा बुडाशी असलेल्या अंतिम सत्याविषयीचा अभ्यास तत्त्वज्ञानात सत्याचा अतीतीचा आणि तत्त्वाचा अभ्यास होतो.'' तत्वज्ञान म्हणजे विश्वाचे एकत्रित अवलोकन''.

ज्याप्रमाणे जीवनातील विविध क्षेत्राचे काम निरनिराळ्या विज्ञानाने करतात. तसेच माणसाच्या सर्वच अनुभवाची व्यवस्था लावण्याचे काम तत्त्वज्ञानाचे आहे. पण विज्ञान व तत्त्वज्ञान यात फरक आहे. विज्ञान अनुभवाच्या विविध क्षेत्रात तपशीलात जाऊन तथ्ये गोळा करते. एखादी घटना कशी घडली त्याचे वर्णन करते. अनुभवनिष्ठ ही विज्ञान पद्धती असते.

एका पांघरुणाखाली आणण्याचा प्रयत्न करते. त्याची पद्धती चिकित्सक असते. चिकित्सा न करता ती काहीच गृहीत धरत नाही. त्याची पद्धती बुद्धिविलासी असते. 'ड्युरट' म्हणतो समग्र अनुभवाचा अभ्यास किंवा अनुभवाच्या एखाद्या भागाचा समग्रतेचा संदर्भात अभ्यास म्हणजे तत्त्वज्ञान.

तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेल्या व्यक्तीच्या विचारात शिस्त व स्पष्टता येते, जीवनाला सधन आशय प्राप्त होतो. इतरांविषयी आस्था प्रामाणिकपणा मूल्यभाव वाटू लागतो. या सर्वाचे समर्थन ही तत्त्वज्ञानानेच होऊ शकते.

**साहित्याचे तत्वज्ञान :**

साहित्याचे तत्त्वज्ञान याचा अर्थ सर्व प्रकारच्या सर्व भाषेतील सर्व लेखकांच्या सर्व कलाकृतींना लागू पडेल असे तत्त्व होय. अशा सर्वमान्य तत्त्वाचा शोध तत्त्वज्ञ घेत असतात. साहित्याचे तत्त्वज्ञान सौंदर्यमीमांसेप्रमाणे नेहमीच असमाधानकारक असते. कारण साहित्यातील संकल्पना या लवचीक असतात. वाङ्मयाकडे पाहण्याच्या इतरांच्या दृष्टिकोणात जसजशी भर पडेल तसतसा पुष्कळ शब्दांचा अर्थ बदलत असतो. आपण फक्त स्वत:चा व इतरांच्या अनुभव शैक्षणिक व सांस्कृतिक पातळीवर विसंबून कला व वाङ्मय याचा आस्वाद घ्यावा कोणतीही कलाकृती ही व्यक्तीचीच निर्मिती असते. त्यामुळे त्या व्यक्तीचे गुणदोष बौद्धिक पातळी अनुभवाच्या मर्यादा यांचा परिणाम कलाकृतीवर होतच असतो. म्हणूनच सर्व भाषातील वाङ्मयाचे तत्त्वज्ञान एकच असले पाहिजे असा आग्रह धरणे चूक आहे. साहित्यावर सामाजिकतेचाही अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. आज बऱ्याचशा कला

सामाजिक आश्रयावर अवलंबून आहेत. उदा. सिनेमा, नाटक, नृत्य, रेडिओ, टि.व्ही, वर्तमानपत्रे इ.पण सर्वच साहित्यिक वाचकावर अवलंबून नसतात. हे ही तितेकच खरे आहे. साहित्य इतकी विविधता आणि समृद्धी दुसऱ्या कोणत्याही कलेत नाही.

साहित्य व मानसशास्त्र यांची उद्दिष्टेच वेगळी आहेत त्याची पद्धतीही वेगवेगळी आहे. मानसशास्त्राची दृष्टी वैज्ञानिक असते. तर साहित्याची भावनिक दोघांचा अभ्यास विषयक माणूस त्याचे मन त्याचे विचार त्याच्या वर्तमानावर झालेला परिणाम हाच आहे. पण साहित्यात संश्लेषणात्मक विचार असतो. तर शास्त्रात विश्लेषणात्मक. साहित्यातील विचार प्रतीकांच्या सोबतीने आलेला असतो. पण शास्त्रातील विचार तार्किक कल्पनेच्या अंगानी केलेला असतो म्हणजे साहित्यातील अनुभवांची तात्त्विक बैठक मानसशास्त्रात आहे आणि मानसशास्त्रातील सिद्धान्ताची व्यावहारिक उपयुक्तता साहित्यात प्रतिबिंबित होते.

मानसशास्त्रात माणसांच्या वर्तना मागची कारणे शोधली जातात. तर साहित्यात मानसिक भावनिक, सामाजिक आर्थिक कौटुंबिक अशी विविध कारणे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सुचविले जातात.

मानसशास्त्रात सर्जनशील व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये शोधली जातात.

मानसशास्त्रात अध्ययन प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे. सूक्ष्म अवधान, धारणा निर्मितीक्षमता व प्रेरणा यांना अध्ययनातील मूलघटक मानले जाते हेच घटक साहित्याशी संबंधित आहेत. साहित्यनिर्मिती याचीच गरज असते.

मानसशास्त्रात मानवाची शरीर रचना शरीरातील विविध अवयव अत:स्त्रावी ग्रंथी याचा वर्तनाशी खूप जवळचा संबध आहे. म्हणूनच मानवी वर्तनाचा अर्थ लावण्यासाठी शरीरशास्त्राचा अभ्यास मानसशास्त्रात केला जातो.

**समारोप :**

अशा रीतीने आपण संस्कृती तत्वज्ञान आणि संशोधन व त्याच्यातील मानसशास्त्रीय कार्ये आणि संशोधनातील विविध अंगोपंगातील मौलिकतेची पाहणी केली.

❀❀❀

# समाजशास्त्रीय संशोधन पद्धती

प्रा. सुवर्णा गुंड-चव्हाण

सामाजिक शास्त्रे आणि साहित्य दोन्हींचे लक्ष मनुष्यच असेल तर काय? आणि कसे? ही पण परस्परांना पूरकच असली पाहिजे. ''साहित्याला मानवतावादी चे अधिष्ठान असते. साहित्य हे मानव्यसापेक्ष असल्यामुळेच मानवतावादाच्या दृष्टिकोणातून साहित्याचा अभ्यास झाला पाहिजे आणि मानवतावाद ही मानव आणि सामाजिक जीवन या विषयाची विचारप्रणाली असल्यामुळे साहित्याचा समाजशास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे'' हे सदा कऱ्हाडेचे मत समर्पक वाटते.

गो. म. कुलकर्णी संत साहित्याचा संदर्भात म्हणतात, ''संतसाहित्याचा परामर्श समाजनिरपेक्ष अशा कलामूल्यांनी करणे शक्य असले तरी इष्ट ठरत नाही. कारण असे केल्यास या साहित्याचे सारे रहस्य हाती लागणे अशक्य आहे'' यातून सामाजिक अंगाचे महत्त्व विशद होते. ''साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वत:ची वैशिष्ट्ये पूर्णत: ती जपत असते हे खरे आहे. पण याचवेळी ज्या काळात व ज्या परिस्थितीत निर्माण होते त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा ती पूर्णपणे ओलांडू शकत नाही.'' ''मानवी सामर्थ्यांवरचा विश्वास प्रकट करणे सामाजिक जाणिवेत महत्त्वाचे असते.'' साहित्यातील सामाजिक संदर्भाला नव्याने प्राधान्य येऊ लागले आहे. आजचे दलित व ग्रामीण साहित्य निर्मितीत याचे प्रत्यंतर येते.

साहित्याचा अभ्यास जेव्हा समाजशास्त्रीय अंगाने केला जातो. तेव्हा सर्वेक्षण संशोधन पद्धती उपयुक्त ठरते. सर्वेक्षण म्हणजे एखादा प्रश्न सर्व बाजूंनी पाहणे असा येतो. सर्वेक्षणातून सामाजिक प्रगती, रचनात्मक कार्यक्रम, समाजाची परिस्थिती, गरजा, समाजाची मते त्याची अभिवृत्ती यांचा सखोल अभ्यास केला जातो. त्यामुळे साहित्य संशोधनातही ही पद्धती उपयुक्त ठरते.

समाजजीवनातील प्रमुख प्रवृत्तींचा रोख कोणाकडे आहे? तो का आहे? त्याची कारणामीमांसा करणे हे या पद्धतींचे कार्य आहे. एखाद्या कलाकृतीचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून जसा केला जातो. तसाच तिचा अभ्यास तिच्यातील कलात्मक सत्याच्या अंगानेही आपल्याला करता

येतो. साहित्य हे समाजाच्या सर्जनशीलतेचे एक सुंदर रूप आहे. शक्तीरूप आहे व ते समाजाचे श्रद्धास्थानही आहे.

कलावंताच्या निर्मितीच्या प्रेरणेपक्षा त्याच्या आविष्कार करण्याच्या पद्धतीशी सामाजिकतेचा घटक अधिक निगडित असतो. कारण कोणतीही शैली व्यक्तिसापेक्ष असली तरी समाजनिरपेक्ष नसते. समाजशास्त्रीय समीक्षा करणारे प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी सांगितलेले १२ घटक नजरेसमोर ठेवून अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तसेच साहित्य आणि समाज यांचा विचार करणारी एक महत्त्वाची पद्धती म्हणून मार्क्सवादीकडे पाहता येते.

या समीक्षा पद्धतीचे पहिले सिद्धांत हिपोलिन तेन या फ्रेंच समीक्षकाच्या लेखनात झाले आहे. तेनच्या मते, कोणतेही साहित्य हे वंश आणि परिस्थिती यांची निर्मिती असते. जॉ मारी-गिया हा फ्रान्समधील विचारवंत त्याने या विषयाची अधिक शास्त्रशुद्ध चर्चा केली. त्याने कलेतून सामाजिक एकात्मतेचा आविष्कार होतो. कलाकार हा समाजाच्या सामूहिक जीवनाचे आणि भावनांचे प्रतिनिधित्व करतो. तर डॉ. रविंद्र ठाकूर यांनी साहित्य समीक्षा आणि संवाद या ग्रंथात साहित्याच्या समाजशास्त्रीय समीक्षेचे स्वरूप सविस्तर सांगितले आहे. साहित्य आणि समाज यांच्यातील अतूट परपस्परसंबंध ही एक महत्त्वाची बाब असून अधिक सखोल व परिपूर्ण होण्यास मदत होते. ही समाजशास्त्रीय समीक्षेची दृढ धारणा समाजशास्त्रज्ञ आणि कला अभ्यासक या दोहोचे दृष्टिकोण या अभ्यास पद्धतीत एकत्र येतात.

ह्युज डी डंकन आपल्या ग्रंथातून म्हणतात की, लेखक आणि वाचक एका पातळीवर असलेले दिसतात. साहित्य हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक असतो. संत साहित्य या प्रकारात मोडते.

जेथ रुथ आणि जेने वुल्प यांच्या विवेचनाच्या आधारे साहित्याच्या समाजशास्त्र विषयीच्या दृष्टिकोणाची वर्गवारी खालीलप्रमाणे केली आहे.

१) समाजशास्त्रीय जाणिवेतून साहित्याचा अभ्यास करणे. साहित्याच्या समीक्षेत सामाजिक संदर्भ लक्षात घेणे.

२) साहित्याच्या एक प्रकारचे समाजशास्त्र म्हणून वापर करणे समाजशास्त्रज्ञांना अन्यत्र सहज साध्य नसणारे दुवे साहित्याद्वारे शोधून माहिती मिळवणे.

३) साहित्याच्या सामाजिक उगमस्थानांचा शोध घेणे. सामाजिक घटिते व विसंगती या स्वरूपात साहित्याचा विचार करणे.

४) सामाजिक निर्मिती आणि सामाजिक शक्ती म्हणून साहित्याचा विचार करणे. विचारसरणी आणि समाजरचना यांच्या ऐतिहासिक विकासातील विरोधविकासीनात्याचा शोध घेणे.
५) समाजावर परिणाम घडवू शकेल. सामाजिक बदलांना चालना देऊ शकेल असे साधन म्हणून साहित्यावर प्रकाश टाकणे.

यामुळे अनेक नवीन संदर्भ मिळू शकतात. बदलत्या समाजाचे स्वरूप कळू शकते. साहित्याचा अनुबंध स्पष्ट होईल. शास्त्रीय पद्धतीने समाजात सार्वत्रिक आढळणाऱ्या व्यक्तींच्या वर्तमानातील परस्पर संबंधातील समानसूत्र शोधण्याचा प्रयत्न होईल.

साहित्याच्या समाजशास्त्राविषयी ॲलन ख्रिजवूड यांनी वेगवेगळ्या पद्धतीने वर्गवारी दिली आहे.

१) साहित्याकडे संशोधनाचे साधन म्हणून पाहण्याचा साहित्याला युगदर्पण मानण्याचा साहित्याचे खाजगी जग विशिष्ट सामाजिक अर्थामध्ये रूपांतरित करण्याचा दृष्टिकोण.
२) साहित्य निर्मितीची बाजू विशेषत: लेखकाची सामाजिक परिस्थिती लक्षात घेणारा दृष्टिकोण
३) साहित्यकृतीचे स्वागत विशिष्ट काळात समाजाने कसे केले याचा अभ्यास करण्याचा दृष्टिकोण

डॉ. सुधीर रसाळ यांच्या मते, ''लेखकाचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या जीवनविषयक जाणिवा त्यांच्या वाङ्मयातील आशय, वाङ्मयाची शैली, घाट इ. सर्वच गोष्टी या सामाजिक वास्तवातून घडतात. सामाजिक वास्तवातून कसे घडले हे पाहणे. ते सामाजिक ध्येयांशी व आशा आकांक्षाशी किती संवादी आहे. ते तपासणे म्हणजे वाङ्मयाचा अभ्यास करणे. म्हणजे वाङ्मय ही एक सामाजिक संस्था आहे. म्हणून वाङ्मयाचा अभ्यास केला जातो.'' ललित वाङ्मयाच्या आशयाची ऐतिहासिक मीमांसा करणे, सामाजिक वास्तव, लेखकाचे चरित्र व त्याच्या कलाकृती यांचे संबंध शोधणे, वाङ्मयप्रकार व वाङ्मयीन परंपरा यातील बदलामागील सामाजिक प्रेरणा व घडामोडी तपासणे. सामाजिक विकासाच्या दृष्टिकोणातून वाङ्मयाचे मूल्यमापन करणे येथे महत्त्वाचे आहे. म्हणून समाजशास्त्रीय दृष्टीने साहित्याचा अभ्यास वरील विचारांनुसार करावा लागेल.

# समाजशास्त्रीय संशोधन अभ्यासपद्धतीचे स्वरूप

प्रा. डॉ. गोपीनाथ बोडके

माणूस हा सामाजिक प्राणी आहे असे माणसाविषयी नेहमी बोलले जाते, अनुभवले जाते. हे वास्तव सत्य आहे. माणसाचे एक खाजगी अनुभवविश्व असते. त्याचबरोबर सामाजिक अनुभव त्याच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. एखाद्या व्यक्तीला केवळ व्यक्ती म्हणून संपूर्ण स्वायत्त अस्तित्व नसते. ती व्यक्ती समाजाचा एक घटक असते. सामाजिक संस्कार, सामाजिक नीतिमूल्य व सामाजिक संस्कृती त्याच्या जीवनाला मानवी आकार देत असते. माणूस सहजीवन जगतो. स्त्री-पुरुष, आई-मूल, बाप-मुलगा/मुलगी, आजोबा-आजी, भाऊ-बहीण, मामा-भाचे/भाची, काका-मावशी, दाजी-वहिनी इत्यादी अशा नातेसंबंधांचे सहजीवन तो जगत असतो. त्यामध्ये सामाजिक नीतिमूल्य, सामाजिक कर्तव्य हाही भाग महत्त्वाचा असतो. तसेच शिक्षक-विद्यार्थी, मालक-नोकर, व्यापारी-ग्राहक, नेता-अनुयायी अशा प्रकारच्या सामाजिक संबंधांचे एक सामाजिक जीवन तो जगत असतो. कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, न्यायसंस्था, सांस्कृतिक संस्था, वाङ्मयीन संस्था तसेच अलीकडील काळात रूढ झालेले प्रसार माध्यमे व माहिती तंत्रज्ञान संस्था इत्यादी संस्थांची एक नियम व व्यवस्थेची चौकट स्वीकारून माणूस जीवन जगतो. त्याबरोबर ती या सर्व संस्थेच्या व्यवस्थेचा सदस्य म्हणून संस्थात्मक मानवी जीवन जगत असतो. म्हणून व्यक्ती आणि समाजाच्या या संस्थात्मक मानवी जीवनाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र म्हणतात. सामाजिक मानवी जीवनाच्या संबंधाचा अभ्यास हाच समाजशास्त्राचा विषय असतो. समाजशास्त्र म्हणजे काय? हे नेमकेपणाने माहीत व्हावे म्हणून पुढीलप्रमाणे काही समाजशास्त्राच्या व्याख्या दिलेल्या आहेत. यावरून आपणास समाजशास्त्राच्या अभ्यासाविषयी व्याप्ती लक्षात येईल.

१) मानव आणि मानवनिर्मित वातावरण यामधील संबंधाचा अभ्यास करणारी अध्ययन शास्त्र म्हणजे समाजशास्त्र. - फेअर चाइल्ड

२) सामाजिक संघटनांचे अंतर्गत स्वरूप समूहाचे संघटन टिकवून ठेवण्याच्या पद्धती, समूहात परिवर्तन घडवून आणणाऱ्या सामाजिक प्रक्रिया

आणि समूहामधील परस्पर संबंधाचे अध्ययन करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र - हॅरी जॉन्सन.

[समाजशास्त्राचा अभ्यास मानवनिर्मित सामाजिक संस्थातील आंतरक्रिया, व्यक्ती-व्यक्तीमधील परस्परसंबंध, सामाजिक रूढी, परंपरा, सामाजिक बदल अशा विविध अंगांचा अभ्यास यामध्ये सामावलेला असतो. आदिवासी लोकजीवन, ग्रामीण लोकजीवन, शहरी लोकजीवन यामधील विविध सामाजिक रचनांचा, सामाजिक प्रक्रियांचा आणि जीवनात बदल घडविणाऱ्या सामाजिक घटकांचा अभ्यास समाजशास्त्र करीत असते.

लोकसाहित्यामध्येही लोकजीवनाचा अभ्यास केला जातो. लोकसमूहाचे सामाजिक रीतिरिवाज, रूढी-परंपरा, विधी-कर्म, सण-उत्सव, मानापानाचे संकेत, विविध नात्यांचे स्वरूप आणि त्यानुसार ठरविले गेलेले कर्तव्य व्यवहाराचे नियम व संकेत यांचा अभ्यास लोकसाहित्यात केला जातो. लोकरूढी-परंपरा, यामधून लोकनीती तयार होत असते. ज्याप्रमाणे शिकार करून उपजीविका भागविणे हा आदिम संस्कृतीची ही एक परंपरा किंवा त्यांचा तो लोकाचार होता. त्याप्रमाणे नरमांस खाणे मात्र काही लोक परंपरेत (लोकाचारमध्ये) त्याज्य मानण्यात आले आहे. हा रूढी-परंपरा यामधील तपशील अभ्यासणे हा लोकसंस्कृतीच्या अभ्यासविषयाचा भाग आहे. काही समाजगटात गोमाता ही पवित्र मानले जाते. तर काही समाजात त्याबाबत कोणत्याही विधिनिषेध पाळण्याची परंपरा नाही. त्या-त्या समाजातील लोकनीतीनुसार वर्तन व्यवहार होत असतो. विवाहातील विधीचे, सण-उत्सवातील मिरवणूक मुंजीपासून श्राद्धापर्यंतच्या कर्मकांडाचे आनंद व्यक्त करण्याचे आणि शोक (दु:ख) व्यक्त करण्याचे लोक संस्कृतीतील परंपरागत रूढीनुसार चालत आले आहे. तसेच स्त्री पेहराव, पुरुष पेहराव आणि पोषाख करण्याचे, देवांची भक्ती आणि उपासना करण्याचे नियम, संकेत यांच्या अभ्यासामधून लोक संस्कृतीचे स्वरूप स्पष्ट होते. या प्रकारच्या अभ्यासपद्धतीला समाजशास्त्रीय अभ्यास पद्धती म्हटले जाते.]

लोकसाहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासपद्धतीमध्येही अनेक सांप्रदाय विशिष्ट हेतुनुसार आहेत. लोकसमूहाच्या कार्यानुसार (काम किंवा कर्म) व सांस्कृतिक पद्धतीनुसार अभ्यास केला जातो.

कार्यानुसार किंवा कार्यान्वयी अभ्यासपद्धतीमध्ये लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रयोग, मंत्र-तंत्र, रूढी-विधी या सर्व लोकाविष्कारांना लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत काही विशिष्ट कार्य असते. हेतू असे मानणाऱ्या अभ्यासकांनी ही पद्धत विकसित केली आहे. उदा. दैवतकथा किंवा

लोकगीते हा माणसाच्या श्रद्धा जतन करतात. नीतिमूल्यांची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे काम करतात. विधीकर्माचे महत्त्व विशद करतात. त्याचबरोबर त्यांचे स्पष्टीकरण पुरवतात. सामाजिक आस्थांना स्थैर्य प्राप्त करून देण्यात या उपासना विधींचा फार मोठा वाटा असतो. लग्नगीतांनी विवाहसंस्थेची परंपरा पुढे चालू ठेवली. धर्मगीतांनी माणसाच्या मनातील श्रद्धा ताज्या ठेवल्या. दीपोत्सव, होलित्सव, इत्यादीविषयीच्या सामाजिक रूढी-परंरपरांना आणि समाजातील आंतरसंबंधांना स्थैर्य प्राप्त करून दिले. या अर्थाने लोकसाहित्यात कथांना, लोकगीतांना, म्हणी-वाक्प्रयोगांना एक सांस्कृतिक कार्य आहे असे मानून त्यांच्या सांस्कृतिकतेचा शोध घेण्यात येतो. हे कार्यान्वयी अभ्यासपद्धतीचे स्वरूप असते.

आदिवासी लोककथांमधून त्यांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब घडते, म्हणून लोककथांच्या माध्यमातून आदिवासी लोकजीवनाचे दर्शन घडविणे हे कार्यान्वयी अभ्यासपद्धतीचे नमुना उदाहरण म्हणून सांगता येईल.

लोकसाहित्य हे प्रयोजनमूलक साहित्य असते. ह्या साहित्याला केवळ मनोरंजन करणे एवढे एकच कार्य नसते. तर लोकश्रद्धांचे जतन करणे, सामाजिक संस्था, नीतिमूल्य, रूढी-परंपरा आणि लोकेतिहासातील अस्मिता स्थळांचा दिव्येतिहासाचा वारसा संरक्षित ठेवणे हे कार्य लोकसाहित्यामुळे साधले जाते. लोक-समाजाचा इतिहास जाणून घेण्यासाठी, समाजातील वर्गसंघर्षाचे स्वरूप उलगडण्यासाठी, मूल्यांची परंपरा स्पष्ट करण्यासाठी लोकसाहित्याचा संबंध जोडणारी, अर्थ उलगडणारी वर्णनात्मक अभ्यासपद्धती म्हणजे कार्यान्वयी अभ्यासपद्धती होय. समाजशास्त्रीय अभ्यास परंपरेतील हे एक सर्वात प्रभावी अभ्यासपद्धती आहे.

समाजशास्त्रीय अभ्यासपद्धतीमध्ये सांस्कृतिक पद्धती ही एक आहे. प्रत्येक संस्कृती आपली स्वतःची खास वैशिष्ट्ये घेऊन अवतरत असते. दुसऱ्या अन्य सांस्कृतिक गटापेक्षा आपले वेगळेपण राखण्याचा प्रयत्न संस्कृतीमध्ये दिसून येतो. त्यामुळेच एक संस्कृती दुसऱ्या संस्कृतीपासून वेगळी होते. हे समजावून घेऊन लोकसाहित्याच्या सांस्कृतिक गुणविशेषांचा अभ्यास करणाऱ्या पद्धतीला आंतरसांस्कृतिक पद्धती म्हणतात.

सर्वसाधारणपणे सांगायचे तर संस्कृती म्हणजे जगण्याची पद्धत होय. समाजात घटक म्हणून व्यक्तीने कोणत्या सवयी लावून घ्याव्यात? कोणती कौशल्ये शिकून घ्यावीत? आपला दैनंदिन वर्तन व्यवहार करताना कोणते संकेत पाळावेत? कोणती पथ्ये सांभाळावीत? या संबंधीचा एक नियमांचा संच त्या-त्या समाजगटास अनुसरून असतो. कळत-नकळत समाजातील सर्व

सदस्य त्यानुसार आपले जीवनव्यवहार करीत राहतात. उदा. स्त्रियांनी डोक्यावरून पदर घेणे, तोंडावर बुरखा ओढणे किंवा सलवार कुडत्याबरोबर ओढणी पांघरणे ह्या प्रकारच्या सवयी ह्या त्या विशिष्ट समाजाच्या संस्कृतीचा भाग असतो. बंजारा आदिवासी स्त्रियांमध्ये अंगभर चांदीचे दागिने परिधान करणे, केसात काढी खोवणे हा रिवाज असतो. हिंदू विधवा स्त्रियांनी कुंकू न लावणे, सधवा स्त्रियांनी कुंकू लावणे अशा प्रकारच्या सौभाग्यलेण्याचे संकेत रूढ असतात. कृषिप्रधान संस्कृतीत बैलांचा पोळा सण साजरा करण्याची पद्धत आहे. नागरसंस्कृतीत ती असण्याचे कारण नसते. थोडक्यात समाजाची सांस्कृतिक ओळख ज्या घटकांवरून पटते त्यांचा अभ्यास करणाऱ्या, स्थानविशिष्ट, जातिविशिष्ट, लिंगविशिष्ट अशा संस्कृतीच्या विशेषांचा अभ्यास करण्यावर भर देणाऱ्या अभ्यासपद्धतीला आंतर-सांस्कृतिक अभ्यासपद्धती असे म्हणता येईल.

समाजशास्त्रीय अभ्यासपद्धतीमध्ये मानववंशशास्त्रीय अभ्यासपद्धती ही एक होय. मानववंशशास्त्र माणसाच्या विविध वंशाच्या उत्पत्ती त्यांचा प्रसार आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करते. फ्रांझ बोआम ह्या अमेरिकन अभ्यासकाने सांस्कृतिक मानववंश शास्त्र पद्धतीचा पाया रचला या अभ्यासपद्धतीमध्ये व्यक्तिनामांचा, वंशावळीचा, गोत्रांचा अभ्यास केला जातो. व्यापार, युद्ध, धर्म, जादुटोणा आणि लोकजीवनातील विविध व्यवस्थांच्या रचना तपासण्याचे कामही ह्या अभ्यास केले जाते. क्षेत्रीय सर्वेक्षण आणि पाहणी अहवालाच्या माध्यमातून हा अभ्यास केला जातो. लोकसंस्कृतीच्या अभ्यासात मानवी समूहांनी आपल्या मूलभूत भौतिक गरजांचे समाधान करताना व्यक्तींच्या दैनंदिन आचरणासाठी आचारधर्म निर्माण केला. सभ्यतेचे व नीतितत्त्वांचे संकेत निर्माण केले आणि त्यातून टिकाऊ स्वरूपाची संस्कृती उभी राहिली. या सांस्कृतिक जडणघडणीचा मागोवा लोकविद्येच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न मानववंशशास्त्रीय अभ्यासपद्धतीद्वारे केला जातो.

सारांश, लोकसाहित्यातून लोकसमाजाचे दर्शन कसे घडते यावर भर देणारी अभ्यासपद्धती होय. समाजातील विधिनिषेध, रूढी-परंपरा, सण-उत्सव, लोकनीती उपासनापद्धतीच्या आकलनावर हा अभ्यास आधारलेला असतो. लोककथा, लोकगीते, म्हणी-वाक्प्रयोग, मंत्र-तंत्रांना लोकसंस्कृतीत विशिष्ट कार्य असते. हे कार्य स्पष्ट करणारी कार्यान्वयी अभ्यासपद्धती होय. अन्य संस्कृतीपेक्षा आपल्या संस्कृतीचे वेगळेपण राखण्याचा प्रयत्न लोकसाहित्याच्या आधारे विशद करणारा आंतरसांस्कृतिक अभ्यास होय.

❀❀❀

# मानसशास्त्रीय संशोधन पद्धती

डॉ. अशोक लिंबेकर

विसाव्या शतकाच्या आधीपासूनच जागतिक स्तरावर विविध ज्ञानशाखेमध्ये (ज्ञानक्षेत्रामध्ये) अनेकविध संशोधकांनी मूलगामी संशोधन करून अनेक महत्त्वपूर्ण विचार मांडलेले दिसून येतात. अशा संशोधकांमध्ये कार्ल मार्क्स, आईनस्टाईन, सिग्मंड फ्रॉइड, ॲडलर, कार्ल युंग इत्यादींचा समावेश होतो. या संशोधनाचा आणि त्यांनी मांडलेल्या संकल्पनांचा प्रभाव जागतिक स्तरावरील साहित्य आणि कलानिर्मितीवर पडला. याच कालखंडामध्ये सिग्मंड फ्रॉइडने केलेल्या मानसशास्त्रीय संशोधनाचा, 'मानवी मनाच्या विश्लेषणाचा 'सिद्धांत खूप गाजला. डार्विनच्या उत्क्रांतीवादानंतर जी परिस्थिती निर्माण झाली, तीच परिस्थिती सिग्मंडच्या संशोधनाने झाली. याबद्दल विविध मतमतांतरे , विविध चर्चा, ग्रंथ लेखनही घडून आले. मानवी मनाच्या संशोधनाबरोबरच फ्रॉइडने- साहित्य आणि कलानिर्मितीच्या संदर्भात महत्त्वाचे प्रतिपादन केले. त्याच्या मते 'साहित्य हे दुसरे तिसरे काही नसून ते मानवी अंतर्मनाच्या खळबळीचे चित्रण आहे.' व्यक्तीच्या जाणीव आणि नेणिवेतल्या विविध भावभावनांचे आविष्करण अत्यंत कलात्मकतेने साहित्य कलेतून होत असते. मानवी वर्तनाच्या मुळाशी तिच्या जाणीव नेणिवेतल्या, अबोध मनातल्या असंख्य गोष्टी कारणीभूत असतात. म्हणूनच व्यक्तीच्या कोणत्याही वर्तनाचा, त्याच्या विविध भावावस्थेचा शोध जसा बाह्य परिस्थितीच्या अनुषंगाने घेता येतो.तसाच तो मानसशास्त्रीय भूमिकेतूनही घेता येतो. किंबहुना त्यापेक्षाही या वर्तनाशी अधिक निगडित असते ते त्याचे अबोध मन, म्हणूनच कलाकृतीत अभिव्यक्त झालेल्या व्यक्तिचित्रणांचा, विविध घटना प्रसंगाचा, पात्रांच्या मानसिकतेचा वेध, मानसशास्त्रीय संकल्पनांच्या आधारे मानसशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून घेता येतो. मानवी जीवनाच्या आणि मानवी मनाचा शोध घेण्यासाठीच साहित्याची निर्मिती होत असते.

''फ्रॉईडच्या लैंगिक भावनांच्या व्यापक अभ्यासाचे ज्ञान होताच तो विचार व अर्थ बरोबर नाही. याची विदारक जाणीव फ्रॉइडने करून दिली, मनोविश्लेषणाची एक नवी बाजू आपल्या वर्तन विचाराला लाभली. त्यामुळे व्यक्ती जीवनाचा बोध वेगळ्याच प्रकारे करण्याची गरज निर्माण झाली.''

रा. ग. जाधव यांच्या या मतानुसार मराठी संशोधकांचे लक्षही फ्रॉईडच्या मानसशास्त्रीय विश्लेषणाकडे गेले. एकूणातच नवसाहित्याच्या निर्मितीलाही हाच दृष्टिकोण प्रभावीत करणारा ठरला. कथा, कविता, कादंबरी, नाटक या सर्वच साहित्यप्रकारातून वरवरच्या सुंदर, गोंडस रूपाऐवजी जीवनातील भीषणतेचा मानवी मनातील कुरूपतेचा, क्रौर्याचा, लैंगिकतेचा वेध घेतला गेला. साहित्यातील या नव आविष्काराने तत्कालीन समीक्षा व संशोधन क्षेत्रालाही नवे आव्हान मिळाले. यातूनच नव समीक्षेची, नव संशोधन पद्धतीची निकड भासू लागली आणि मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून साहित्याच्या संशोधन पर्वाला प्रारंभ झाला. फ्रॉईडने मांडलेल्या मानसशास्त्रीय संकल्पनेमुळे कलावंताची, संशोधकांची साहित्याकडे बघण्याची दृष्टी बदलली. यातूनच विविध कलासंप्रदाय, साहित्यप्रवाह उदयास आले. मानवी मनात दबलेल्या सुप्त वासनांचे प्रकटीकरण आपल्या साहित्यकृतीतील पात्रांच्या आविष्कारातून लेखक करू लागले. साहित्य कलेच्या माध्यमातून मानवी अस्तित्वांचे, त्यांच्या मनातील अबोध जाणिवांचे, दडपल्या गेलेल्या नेणिवेतल्या इच्छा, आकांक्षेचे प्रतिबिंब साहित्यकृतीतील पात्रांच्या वर्तनातून उमटू लागले. त्यामुळेच अशा साहित्यकृतीतील पात्रांच्या मनांचे त्यांच्या अंतरंगाचे शोधनही संशोधनाच्या माध्यमातून होऊ लागल्याचे दिसते. साहित्याच्या मूल्यमापनासाठी पात्रांच्या क्रिया प्रतिक्रियांचा व वर्तनाचा शोध घेण्यासाठी, मानसशास्त्रीय संशोधन पद्धती निर्माण झाली. साहित्य निर्मिती व साहित्य संशोधन (साहित्य समीक्षा) या दोन्ही वाङ्मयीन व्यवहारावर मानसशास्त्रीय संकल्पनेचा परिणाम झाला. या संदर्भात डॉ. सुषमा जोगळेकर म्हणतात - ''विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विविध ज्ञानक्षेत्रामध्ये घडणाऱ्या घडामोडीमुळे माणसांच्या जगाविषयीच्या आकलनामध्ये देखील झपाट्याने बदल घडून येत होता. फ्रॉइडच्या मानसशास्त्रीय सिद्धांतानंतर माणसाची त्याच्या कृतीकडे बघण्याची दृष्टीच बदलली. माणसाच्या एखाद्या कृतीचे मूळ हे बाह्य परिस्थितीत असते असे नाही, तर अनेकदा त्याची कारणे त्याच्या अबोध मनामध्येही असू शकतात याची जाणीव झाली.'' या जाणिवेतूनच साहित्याच्या माध्यमातून साहित्यकृतीतून आविष्कृत झालेल्या मानवी मनोव्यापारांचा शोध घेण्यात आला. १९४५ नंतरच्या साहित्याने व आधुनिक नवसमीक्षेने साहित्य विश्वाला हे नवतेचे परिमाण दिले. जागतिक महायुद्ध, औद्योगिकीकरण, इत्यादीमुळे मानवी मूल्यांची पडझड झाली. मानवी अस्तित्वाचा गंभीर प्रश्न विचारवंताना, कलावंतांना सतावू लागला. या अस्वस्थ चिंतनातूनच नवसाहित्य उदयास आले. बदलत्या परिस्थितीचा प्रभाव, मानवी मनावर

त्याच्या वर्तनावर, लैंगिक व्यवहारावर, कसा पडतो याचे भीषण चित्र नवसाहित्यातून उमटले. त्यामुले मानवी अंतर्मनाचा वेध घेणे हे नवसाहित्याचे व्यवछेदक लक्षण बनले. गाडगीळ, मर्ढेकर, गोखले, पु.भा. भावे, भाऊ पाध्ये, तेंडुलकर, खानोलकर, एलकुंचवार, इ. चे साहित्य या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे. गंगाधर गाडगीळ या संदर्भात म्हणतात. ''मानवी मनाच्या ह्या स्वरूपाचे ज्ञान मानसशास्त्रज्ञांना अर्थातच आधीपासून झालेले आहे. तेव्हा ह्या लेखकांना हे ज्ञान ह्यात लेखकांना मनाचे स्वरूप जाणवलं, मानवी मनाच्या त्या स्वरूपाच्या अनुभूतीतून कलाकृती निर्माण केल्या.''

मानसशास्त्रीय संशोधन पद्धतीमध्ये फ्रॉइड, युंग, ॲडलर, इत्यादींच्या मानसशास्त्रीय सिद्धांताचे उपयोजन करून साहित्याचे संशोधन करता येते. त्या संदर्भात फ्रॉइडचा मनोविश्लेषण, सिद्धांत, युंगचा विश्लेषणवादी सिद्धांत, ॲडलरचा न्यूनत्व, श्रेष्ठत्व सिद्धांत, महत्त्वाचा ठरतो. फ्रॉइडच्या मनोविश्लेषणामुळे मानवी वर्तनावर प्रभाव गाजवणाऱ्या मानसतत्त्वाच्या परिप्रेक्ष्यातून साहित्याकडे पाहिले जाते. अबोध मन हे प्रतीक प्रतिमांच्या माध्यमातूनही बोलत असते. हे मनाचे व्यापार गुढ असतात. मानवी मनातील ज्ञात अज्ञात क्षेत्रातून , जाणीव-नेणिवेतून साहित्यकृती आकार घेत असते. म्हणूनच अशा साहित्यकृतीतील मनोव्यापार समजून घेण्यासाठी मनोविश्लेषण तंत्र उपयोगी ठरते. डॉ. अर्नेस्ट जोन्स यांच्या 'हॅम्लेट ॲन्ड इडिपस' या ग्रंथाचा उल्लेख या संदर्भात करता येईल. तर नवसाहित्यातील, मर्ढेकरांच्या कादंबऱ्या, खानोलकरांचे नाटक एकशून्य बाजीराव, अवध्य, विजय तेंडुलकरांचे गिधाडे, बाईंडर, बेबी, एलकुचवारांचे पार्टी, वासनाकांड, गार्बो आळेकरांचे महानिर्वाण, जयवंत दळवींचे महासागर, इत्यादी साहित्यकृतींचे शोधन केवळ, आस्वादक अथवा समाजशास्त्रीय भूमिकेने परिपूर्ण होणार नाही. कारण या सर्व कलाकृतीतून मानवी मनातील विकार विकृतीचा, लैंगिकतेचा, क्रौर्याचा, मानवी मनातील विविध गंडाचा आविष्कार झाला आहे. उदा. एक शून्य बाजीराव या नाटकातून न्यूनगंडाच्या जाणिवेतून मानसिक पातळीवर तीव्रपणे उफाळून आलेल्या क्रौयाचे दर्शन घडले आहे तर गिधाडे मधून - मानवी मनातील गिधाडपणाचे हिंस्रतेचे, क्रौर्याचे, माणसाच्या नैसर्गिक गरजांचे दर्शन घडले आहे, ध्यानीमनी, पुत्रकामेष्टी सारख्या नाटकातून अपत्यहीन स्त्रीचे भावविश्व व अपत्याच्या वंचनेतून निर्माण झालेल्या मानसिक समस्येचे चित्रण झाले आहे. तेव्हा अशा साहित्यकृतीच्या संशोधनासाठी मूल्यमापनासाठी मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून केलेले संशोधन त्या साहित्यकृतीच्या अर्थनिर्णयनासाठी, अन्वयार्थासाठी उपकार ठरू शकते.

❀❀❀

# विभाग 'ड'
# मराठीतील संशोधन परंपरा

# लोकसाहित्य संशोधन व अभ्यास

**प्रा. डॉ. सुभाष आहेर**

**प्रास्ताविक:**

लोकसाहित्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भाषाविष्काराचा समावेश होतो. लोकसाहित्यात सांस्कृतिक विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थांचे दर्शन घडते. पारंपरिकता हा लोकसाहित्याचा महत्त्वाचा विशेष असतो. लोकसाहित्य हे पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेषरूपाने समाजजीवनात प्रचलित आहे. वर्तमानकालीन जीवनाच्या संदर्भात त्याला अर्थपूर्णता असते. त्यामुळेच या अवशेषांना दुर्गा भागवतांनी 'सजीवावशेष' म्हटलेले आहे. जोनास बॅलिस यांनी लोकसाहित्याची व्याप्ती व्याख्येतून सांगितलेली आहे. लोकसाहित्य हे आदिमानव निर्मित असून परंपराप्राप्त असते. त्याचप्रमाणे ते सुसंस्कृत मानवाने निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास लोकभ्रम, रूढी, लोककलाप्रकार त्याचप्रमाणे नाटय, नृत्य इ. चा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे समूहाच्या आविष्काराचे शास्त्र नाही तर लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे. लोकसाहित्याभ्यास हा केवळ भूतकालीन संस्कृतिघटकांचा अभ्यास नसून मानवी संस्कृती, लोकभाषा, लोकजीवन आदी घटकांचाही अभ्यास असतो. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या संस्कृतीचा अभ्यास करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात; ''लोकसाहित्य ही आमच्या संस्कृतीची संपत्ती आहे व तिचे जतन आणि संवर्धन आम्हाला केले पाहिजे ती तर अत्यंत प्राचीन काळापासून सहृदयपूर्वक सांभाळून ठेवलेली मूल्यवान ठेव आहे.

**लोकसाहित्याचे संशोधन व अभ्यास:**

संशोधन म्हणजे अत्यंत पद्धतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञाताचा शोध होय ''जिज्ञासूवृत्तीने एखाद्या प्रश्नाची सत्यान्वेषी भूमिकेवरून चिकित्सा करून अंतिम अथवा निर्णायक उत्तर शोधण्याची अथवा तथ्यानिर्णय करण्याची जी प्रक्रिया तिला संशोधन म्हणता येईल''१ लेखन तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमांच्या प्रगत काळातही लोकसाहित्याचा अभ्यास होत आहे. लोकसाहित्य हा मूळात सांस्कृतिक मानवशास्त्राचा एक भाग आहे. क्षेत्रीय व

स्तरीय संकलनपद्धतीबरोबरच आधुनिक अभ्यासपद्धतींचा उपयोग अभ्यासकाने केला पाहिजे. लोकसाहित्याचे संशोधन म्हणजे फक्त संकलन नव्हे. आलेच्या माध्यमातून मानवी जीवनाचे, समाजसंस्कृतीचे जे चित्रण आलेले आहे, त्याचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. लोकसाहित्याच्या संकलित सामग्रीतून माहितीची निवड करता येणे आवश्यक आहे. अनेक वेळा एकाच प्रकारच्या रचनेत कथा, गीत, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, लोकोक्ती अशी अनेक प्रकारची सामग्री समाविष्ट झालेली असते. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा आधार मौखिक परंपरेने चालत आलेली शब्दसामग्री असणे आवश्यक आहे. कारण साहित्याचा अभ्यास करणाऱ्यांचे माध्यम भाषा हे असते. कल्पनावगुंठित रचनेवरील कल्पनेची पुटे हळुवारपणे बाजूला सारून त्या त्या काळातील सामाजिक वास्तवाचा शोध लोकसहित्याद्वारा घेणे शक्य असते. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकवाड्मयाचे कृती उक्तीतून आविष्कृत होणाऱ्या लोकमानसाचे संकलन करून त्याचा शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक आहे. लोकसाहित्याचे संकलन म्हणजे अभ्यास नव्हे. तो या अभ्यासातील एक पायाभूत टप्पा आहे. अभ्यासकाजवळ वाड्मयीन दृष्टीबरोबर धर्मशास्त्र समाजशास्त्र, मानसशास्त्र, इ. शास्त्रविषय ज्ञान गरजेचे आहे १८६८ मध्ये मिस मेरी फ्रियर यांनी "Old Deccan Days" हा संकलित लोककथासंग्रह प्रकाशित केला. हा महाराष्ट्रातील लोकसाहित्यासंबंधी संकलनाचा पहिला प्रयत्न आहे. राजारामशास्त्री भागवत हे महाराष्ट्रातील लोकसाहित्यासंबधी शास्त्रीय दृष्टीने लिहिणारे पहिले लेखक. १८७७ मध्ये विविध ज्ञानविस्तारातून गोंडी भाषा व गीते असा लेख लिहिला. हा एक लोकसाहित्यावरील समाजशास्त्रीय व स्वतंत्रपणे केलेल्या चर्चेचा आरंभ होय, ‘‘महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या अभ्यासाची प्राणप्रतिष्ठा इतिहासाचार्य राजवाडे यांनी केली’’२ लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी प्रत्यक्ष सर्वेक्षण, संकलन, वर्गीकरण, चिकित्सा, पर्यायनिश्चिती, तुलना, स्पष्टीकरणे इ. गोष्टी करणे आवश्यक आहे. लोकसाहित्याचा लोकसाहित्यशास्त्रीय अभ्यास करणे हे लोकसाहित्याच्या संशोधनाचे सर्वश्रेष्ठ व अनिवार्य प्रयोजन आहे.

लोकसाहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती फार मोठी आहे. लोकसाहित्याच्या संशोधकाजवळ क्षेत्रीय पद्धतीच्या वापराचे व उपयोगितेचे कौशल्य असणे फार आवश्यक आहे.

**लोकसाहित्याचे संशोधन व अभ्यास - घ्यावयाची दक्षता :**

लोकसाहित्याचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करणाऱ्या अभ्यासकास संकलनाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संकलन म्हणजे संशोधन नव्हे.

संकलित माहितीचे वर्गीकरण विश्लेषण व अन्वयार्थ लावता आला पाहिजे. अध्ययनसामग्रीचे विश्लेषण करताना इतिहास, भूगोल, परिसर, संस्कृती, लोकसमूह परंपरा, भाषा, रूढी, विधी, सणोत्सव, देवदेवता, जीवनमान इ. घटकांचा विचार करणे आवश्यक आहेत्र दुर्दैवाने संकलनसामग्रीची मांडणी करणे एवढ्याच सीमित अर्थ काही संशोधक घेतात.

स्वत: संकलन न करता पूर्वसंकलित सामग्री मिळविणे व त्यावर आधारित संशोधन करणे हे संयुक्तिक नाही. क्षेत्रीय पद्धतीने हे संकलन स्वत: अभ्यासकाने केल्यास संशोधनाचा कस लागतो व आनंदही मिळतो.

लोकसाहित्यातील शब्दरुपे अर्थात भाषारूपे लोकबंध प्रकट करीत असतात. त्यातूनच समग्र लोकजीवन प्रगट होत असते. विशिष्ट वेळी, विशिष्ट प्रसंगी भाषारूपे, चिन्हे हीच का वापरली? त्याचे कारण हे लोकमानसाची भावनात्मक अपरिहार्यता हे आहे. नैसर्गिक, भौतिक, सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, शारीरिक, मानसिक अशा विविध पर्यावरणातून लोकबंध निर्माण होत असतात. शब्दरुपाच्या आधारे आकलन व आस्वादपूर्वक मूल्यमापन होणे आवश्यक आहे. लोकतचीक अभ्यासपद्धती व आदिबंधात्मक अभ्यासपद्धतीचा अवलंब केला पाहिजे.

दुर्गा भागवत यांच्या मते लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास असतो. लोकजीवन व लोकसंस्कृतीत असणारी पारंपरिक व परिवर्तनशीलता अभ्यासकाने लक्षात घेतली पाहिजे "लोकसाहित्याच्या माध्यमातून संस्कृतीचा गाभा आपल्यापर्यंत आलेला आहे लोकसाहित्याने मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधनाचेही काम केले आहे"३

लोकगीतातून आधुनिकतेचे उल्लेखही येतात, लोकसंस्कृतीच्या उपासकांची लोकगीते तर समाजव्यवस्थेवर भाष्य करतात. उदा पर्यावरण, वृक्षसंवर्धन, कुटुंबनियोजन, एड्स, गावतंटा, स्वच्छता, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन, आदी विषयावर गीतरचना दिसते. लोकसाहित्यातील अनेक घटक हे ललित साहित्याचा विषय झालेले आहेत. लोकवाङ्मय हे विदग्ध साहित्याचे गर्भाशय आहे. लोकसाहित्यातून विदग्ध साहित्य जन्माला येते लोकसाहित्य विदग्ध साहित्याचा पूर्वेतिहास असतो."४ लोकसाहित्याचा अभ्यास रचनाप्रकारबंध लक्षात घेऊनही करता येतो. आकार, आशय, मात्रावृत्त्च, गेयतेनुसार, कालक्रमानुसार, आद्याक्षरानुसार, कथाबीजानुसार त्याचे वर्गीकरण करता येते.

❀❀❀

# महानुभावीय चरित्रग्रंथ संशोधन : नव्या दिशा

डॉ. अण्णा वैद्य

**प्रस्तावना :**

बाराव्या शतकात निर्माण झालेले मराठी भाषेतील आद्य वाङ्मय म्हणून महानुभावीय वाङ्मयाला मान्यता आहे. मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ 'लीळाचरित्र' हा अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. लीळाचरित्रामधून प्रेरणा घेऊन पंथातील विद्वान लेखकांनी परमेश्वरीय अवतारावर व आचार्यांवर चरित्र लेखन केले आहे. ही ग्रंथ निर्मिती गद्य रूपामध्ये असल्याने समाजशास्त्रीय दृष्टीनेही त्यांचे विशेष महत्त्व आहे. पंथीय मंडळींनी परकीय लोकांपासून आपले तत्त्वज्ञान सुरक्षित राहावे म्हणून सर्व लिखित संहिता ह्या 'सकळा' लिपीमध्ये रूपांतरित केल्या. १९१० नंतर ह्या सर्व पोथ्यांचा अभ्यास व्हायला लागला आणि जाणकार विद्वानांच्या साहाय्याने हे सर्व वाङ्मय भांडार मराठीत उपलब्ध झाले. यामध्ये अनेक संशोधकांचे मालाचे कार्य आहे. या चरित्रग्रंथाच्या संशोधनानंतर हे वाङ्मय कालसापेक्ष असल्याने यातून अनेक नव्या संशोधनाच्या दिशा मिळू लागल्या. पुढे मिळतील. यामुळे संशोधनाला चालना मिळेल. या चरित्रग्रंथाचे समीक्षेचे व विश्लेषणाचे काही नवीन पैलू शोधता येतील.

**महानुभावीय चरित्रग्रंथ प्रेरणा व प्रयोजन :** महानुभाव पंथ संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांची 'स्मरणभक्ती' ही एकमेव प्रेरणा महानुभावीय वाङ्मयाच्या मुळाशी आहे. चक्रधरांचे अवतार कार्य, त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व हाच मुळात कुतूहलाचा विषय आहे. या कुतूहलाला चक्रधराच्या तत्त्वज्ञानाने वास्तवतेचे अधिष्ठान प्राप्त करून दिले आहे. आपल्या अवतार कार्याचे प्रयोजन त्यांनी आपल्या शिष्यांना सांगितले. त्यातून अनेक गूढ तत्त्वांची उकल झाली. त्यांनी जीवांना आपले प्रेमदान दिले. चक्रधरांमुळे श्री गोविंदप्रभूचे कार्य पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचू शकले; श्री चक्रपाणीच्या अवताराचा अन्वय लावल्या गेला. 'श्रीकृष्ण' व 'श्री दत्तात्रय' यांच्या आद्यप्रयोजकांची ओळख समग्र जीवांना झाली. चक्रधरांचे कार्यकर्तृत्व हे महान आहे. असा अलौकिक, ईश्वरी पुरुष म्हाईंभटाने लीळाचरित्रात आपल्या लेखणीने बांधला आहे.

'जीव उद्धरण' ह्या कार्याच्या पूर्ततेसाठी ईश्वर अवतार घेतो. प्रत्यक्ष चक्रधरांनी अनेक सूत्रातून याची साक्ष तत्कालीन शिष्यांना पटवून दिली. म्हाईंभट हे विद्वान असल्याने त्यांनी चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार जवळून परिचय करून घेतला. नागदेवाच्या प्रेरणेने पुढच्या पिढ्यांकरिता स्वामींच्या आठवणी संग्रही राहाव्या म्हणून लीळाचरित्र लिपिबद्ध केले. यासाठी म्हाईंभटाने संशोधक म्हणून प्रचंड मेहनत घेतली. नागदेव आचार्यांनी त्या लीळांचे परीक्षण केले. असा हा लीळाचरित्र ग्रंथ इ.स. १२७८ मध्ये रिद्धपूर या गावी अत्यंत पवित्र भावनेतून साकार झाला.

डॉ. उषा माधव देशमुख यांनी म्हटल्याप्रमाणे ''सर्व ज्ञान शाखांना आणि ज्ञान शिस्तींना आव्हान देण्याचे सामर्थ्य लीळाचरित्रात एकवटलेले आहे. लीळाचरित्राचा अनुभव, आशय, आविष्करण, अर्थनिर्णयन, मांडणी, संरचना या पाठीमागे चक्रधर - भक्तिसूत्र प्रधान आहे''१ लीळाचरित्र ग्रंथानंतर पंचकृष्णापैकी श्री गोविंदप्रभू यांचे चरित्र 'ऋद्धिपूर-लीळा' हे म्हाईंभटानी लिहिले. यालाच 'ऋद्धिपूर चरित्र' असे म्हणतात. हा ग्रंथ इ.स. १२८८ मध्ये लिहिला गेला.

म्हाईंभट गोविंदप्रभू यांच्या सानिध्यात जास्तीत जास्त काळ राहिले. त्यामुळे श्री प्रभू विषयी त्यांना माहिती गोळा करण्याचे श्रम पडले नाही. हे चरित्र ही ईश्वरभक्ती 'स्मरण' ह्या एकाच हेतूने निर्माण झाले. 'स्मृतिस्थळ' (इ.स.१३१३) या ग्रंथातही पंथाची धुरा यशस्वीरित्या सांभाळणारा पहिला आचार्य म्हणून नागदेव आचार्यांच्या व इतर पंथीय कट्टर शिष्यांच्या आठवणींचा संग्रह आहे. या ग्रंथाची प्रेरणा ही ईश्वर भक्तांच्या उत्कट भक्तीची, समपर्णाची व त्यागाची नोंद घेणे ही आहे.

**महानुभावीय चरित्रग्रंथाचे स्वरूप :** लीळाचरित्रातील पूर्वाध, उत्तरार्ध व एकाक मधून साकल्याने चक्रधरांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व साकार झाले आहे. एकाकामध्ये स्वामींच्या अज्ञातवासातील एकाकी अवस्थेतील लीळांचा समावेश आहे ज्यातून चक्रधरांच्या ईश्वरी सामर्थ्यांचा व बोध दातृत्वाचा परिचय होतो. पूर्वाधामधून चक्रधरांचा शिष्यपरिवार, भ्रमंतीतील गावे, व्यक्ती, परिसर, दिनचर्या, शिष्यांसोबतची चर्चा, सहवासातील गमतीदार प्रसंग, पंथीय मंडळींची पंथाप्रती असलेली निष्ठा व मनोनिग्रह आदिंचा विस्तृत उल्लेख येतो. ''लीळाचरित्र म्हणजे चक्रधर स्वामींच्या भक्तजनांची एक चित्रशाळाच आहे''....'' पुढील सर्व महानुभावीय वाङ्मयाचे बीज या ग्रंथात आहे. त्यातूनच पुढे 'सूत्रपाठ', 'दृष्टांतपाठ' व 'रत्नमालास्तोत्र' इत्यादी ग्रंथ निर्माण झाले व अनेक ग्रंथकारांना स्फूर्ती मिळाली.''[२] चरित्र म्हणून एका व्यक्तिमत्त्वाच्या

आयुष्याची बांधणी लीळाचरित्रात तंतोतंत येत नाही. त्यामध्ये चक्रधरांच्या आठवणी (म्हणजेच लीळा) सांगितल्या आहेत. डॉ. वि. भि. कोलते यांनी "लीळाचरित्राला तर श्री चक्रधर स्वामींची दैनंदिनी म्हणता येईल"३ असे म्हटले आहे. लीळांमधून यादवकालीन महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटले आहे हे नक्कीच. श्री गोविंदप्रभू चरित्रात गोविंदप्रभूच्या चमत्कारिक व अलौकिक व्यक्तिमत्त्वाचा अत्यंत जवळून परिचय होतो. याचे श्रेय म्हाईंभट यांच्या लेखन कौशल्याला जाते. भाषेच्या बाबतीत गोविंदप्रभूचरित्राचे वेगळेपण असे की, गोविंदप्रभूचा कार्यप्रांत पश्चिम विदर्भ असल्यामुळे त्यांच्या लीळांमधील अस्सल मराठी भाषा विद्वान म्हाईंभट यांनी आकलित केलेली दिसते. तसेच विदर्भाच्या भौगोलिक मर्यादेत ह्या चरित्रनायकाची घडण आहे याचेही भान म्हाईंभट्टानी ठेवले आहे. श्री गोविंदप्रभू चरित्रात "एकीकडे चरित्रनायकाचे ईश्वरीपण अभिव्यक्त होत असते तर दुसरीकडे संपूर्ण प्रसंगच परिपूर्ण होऊन अवतरत असतो."[४] मराठीतील हा दुसरा चरित्रग्रंथ म्हाईंभटांनी लीळाचरित्राच्या लेखनानंतर दहा वर्षांनी लिहिला.

'स्मृतिस्थळ' या ग्रंथाची स्वतंत्र व वेगळी अशी वैशिष्ट्ये आहेत. या ग्रंथाचा लेखक कोण? काळ कोणता? हया दोन प्रश्नांची उत्तरे निश्चित रूपात अजूनही देता येत नाही. संशोधकांमध्ये याबाबत मतभिन्नता असली तरी, ग्रंथाचा आशय हा पंथीय शिष्यपरिवाराच्या आठवणी, त्यांची कर्तृत्वे, पंथासाठी त्यांचे योगदान, निष्ठा, लेखनाचे कष्ट, तत्कालीन परिस्थिती या ग्रंथात चित्रित झाली आहे. नायक नागदेवाचार्य यांच्या आठवणी यात जास्त आहेत. त्या तुलनेने इतर शिष्यांच्या कमी आहेत. ईश्वरी कार्य पूर्ण झाल्यानंतर या शिष्यमंडळींनी श्रम करून पुढील पिढ्यांकरिता जतन करून ठेवलेले संचित यांची परिपूर्ण माहिती स्मृतिस्थळातून होते. स्मृतिस्थळातील भाषाशैलीच्या संदर्भात डॉ. वा. ना. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे "साधे व मोजके शब्द आणि वर्णनातील कमालीचा संयम यामुळे लीळाचरित्र व सूत्रपाठ या दोन ग्रंथांच्या भाषाशैलीच्या दरम्यान स्मृतिस्थळची भाषा घोटाळते"[५] महानुभावीय चरित्रग्रंथ हे तत्त्वज्ञान, व्यक्तिविशेष, तत्कालीन, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, भौगोलिकस्थितीचे दर्शक आहेत. म्हणूनच ते बहुमोलाचे आहेत. या ग्रंथाची रूपे आणि आशयातून होणारे संस्कार हे समाजनिती स्थैर्याकरिता आवश्यक ठरू शकतात. म्हणून या चरित्र ग्रंथाला मूल्य प्राप्त झाले आहे.

**महानुभाविय चरित्रग्रंथाचे संशोधन : नव्या दिशा :** महानुभावीय वाङ्मयाचे दालन खुले झाल्यानंतर या वाङ्मयाचे अनेक संपादने प्रकाशित झालीत,

गद्यग्रंथ, काव्यग्रंथ, टीकाग्रंथ, भाष्यग्रंथ इत्यादी ग्रंथांची पुनर्मांडणी होऊ लागली. गेल्या शंभर वर्षामध्ये या वाङ्मयाला केंद्रावर्ती ठेवून सात हजार ग्रंथाची निर्मिती झाली. अजूनही बऱ्याच घटकांचा साकल्याने विचार झालेला नाही. तो सुरू आहे. महानुभावीय चरित्र ग्रंथाची संपादने प्रकाशित झालीत त्यावर विस्तृत प्रस्तावना आहेत. हे तीनही ग्रंथ पंथीयांना मोलाचे आहे. महानुभावीय साहित्य संशोधनाच्या क्षेत्रात येणाऱ्या नवसंशोधकांसाठी महानुभावीय साहित्याचे अभ्यासक डॉ. रमेश आवलगावकर यांनी महत्त्वाचे सूत्र सांगितले आहे. ''सौंदर्यदृष्टीने साहित्यातील जीवनार्थ व रूप सौंदर्य यांच्या परस्पर संबंधाचा उलगडा करणे म्हणजे साहित्यकृतीचा वाङ्मयीन अभ्यास करणे होय''.....''केवळ महानुभाव साहित्याचा अभ्यासक असून चालणार नाही तर, त्याला त्या तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यासही हवा आहे कारण महानुभाव साहित्यात तत्त्वज्ञानाचा स्पर्श झालेले शब्दच आलेले आहेत''[६] या साहित्याचे सखोल चिंतन, तत्त्वज्ञानावर श्रद्धा, निष्ठा आणि भक्तीचे सूत्र असेल तर नव्या संशोधनाची गुंफण यातून होऊ शकते. काही नवे विषय चरित्रग्रंथामधून संशोधनाकरिता शोधता येतील. यातून नवी दिशा मिळेल. १२ व्या शतकात लिहिल्या गेलेल्या या ग्रंथांचे वर्तमानकालीन संदर्भ शोधता येतील. त्याची तपासणी करून त्यातील मूल्य संचिताचा शोध घेता येईल. अशा नव्या संशोधन विषयाची यादी खालीलप्रमाणे–

१) श्री चक्रधर व श्री प्रभू यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तौलनिक अध्ययन
२) लीळाचरित्रातील श्री चक्रधरांची संवादशैली
३) लीळाचरित्रातील चक्रधरांचा स्त्रीवादी विचार
४) श्री चक्रधर एक लोकशिक्षक, तत्त्वज्ञ व समाजसुधारक
५) श्री चक्रधरांची नैतिकता
६) श्री प्रभूंच्या वर्तणुकीचे मनोविश्लेषक अध्ययन
७) श्री चक्रधरांचे मराठी भाषा प्रेम
८) लीळाचरित्रातील तत्त्वविचाराचा तत्त्वज्ञान व समाजविज्ञान ज्ञान शाखांशी अन्वय
९) श्री गोविंदप्रभू चरित्रातील वऱ्हाड संस्कृती व समाजदर्शन
१०) श्री गोविंदप्रभू चरित्र : वऱ्हाडी बोलीचे प्राचीन संदर्भ
११) श्री चक्रधरांच्या तत्त्वज्ञानातील पदार्थविज्ञानविषयक तत्त्वांची चिकित्सा
१२) स्मृतिस्थळमधील महानुभाव पंथाच्या शिष्यपरिवाराची ईश्वरनिष्ठा व भक्ती

१३) स्मृतिस्थळमधील नागदेव आचार्यांचे व्यवस्थापन कौशल्य व नेतृत्वगुणांची मीमांसा
१४) महानुभावीय चरित्र ग्रंथातील लोकशाही व समाजवादी विचारांची मीमांसा
१५) लीळाचरित्रातील तात्त्विक संज्ञाकोश
१६) श्री गोविंदप्रभू चरित्रातील चमत्कारांची मीमांसा
१७) लीळाचरित्रातील मराठवाडा-विदर्भ लोकसंस्कृतीचे तौलनिक अध्ययन
१८) लीळाचरित्रातील वंचित समूहाची चित्रणांचा अभ्यास
१९) चरित्रग्रंथातील पंथीय विधी व संस्कृतीचे अध्ययन
२०) श्री गोविंदप्रभू चरित्रातील लोकतत्त्वे
२१) महानुभावीय चरित्रग्रंथातील पर्यावरणवादी विचार
२२) श्री चक्रधरांची कथन शैली
२३) श्री चक्रधरांचे भक्तप्रेम व आर्तता
२४) श्री चक्रधरांचे वादविवाद कौशल्य
२५) स्मृतिस्थळातील शिष्यपरिवाराची साधना, संयम, नैतिकता व गुरूप्रेमाचे अध्ययन
२६) श्री चक्रधरांच्या सृष्टीरचना व प्रलया संदर्भातील विचारांची मीमांसा
२७) महानुभावीय चरित्रग्रंथातील कृषी जीवन
२८) लीळाचरित्रातील एकाक, पूर्वाध व उत्तरार्ध मधील श्री चक्रधराच्या व्यक्तिमत्त्वाची तौलनिक चिकित्सा
२९) महानुभावीय चरित्रग्रंथातील व्याकरण विचार
३०) महानुभावीय चरित्रग्रंथात उल्लेखित मूलभूत गरजांची समाजशास्त्रीय चिकित्सा
३१) श्री चक्रधरांचे तत्वज्ञान व भगवतगीतेतील विचार - साम्यभेद
३२) श्री गोविंदप्रभूंचा समतावादी दृष्टिकोण
३३) म्हाइंभट्टाचे व्यक्तित्व वाङ्मयीन कर्तृत्व
३४) संतसाहित्य व महानुभावीय चरित्रग्रंथ साम्यभेद
३५) श्री चक्रधरांच्या परिवर्तनवादी कार्याची चिकित्सा
३६) वर्तमान समाजवास्तवात श्री चक्रधरांच्या वर्तन विचाराची अपरिहार्यता
३७) महानुभावीय चरित्रग्रंथ : एक मूल्यसंचित
३८) महानुभावीच चरित्रग्रंथातील समतेचा व स्त्री मुक्तीचा विचार
३९) श्री चक्रधरांच्या सूत्रांची वैज्ञानिक चिकित्सा
४०) महानुभावीय चरित्रग्रंथातील तात्त्विक, धार्मिक व सामाजिक संज्ञा कोश

इत्यादी अनेक नवे विषय महानुभावीय चरित्रग्रंथाच्या आधारे संशोधनासाठी निवडता येतील व त्यातून पुढील संशोधनाच्या दिशा मिळेल. या साहित्याची समाजसापेक्षता, संस्कारक्षमता, नैतिकता, तत्त्वमीमांसा ही कालातीत असून यावर पुढच्या अनेक पिढ्यांचे भरणपोषण होणार हे मात्र नक्की.

**निष्कर्ष:**

१) महानुभावीय वाङ्मय हे मराठी भाषेतील आद्यलिखित वाङ्मय आहे.
२) श्री चक्रधरांची 'स्मरणभक्ती' ही महानुभावीय वाङ्मयाची प्रेरणा आहे.
३) श्री चक्रधरांच्या आठवणी पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हेच लीळाचरित्र लिहिण्यामागील प्रयोजन आहे.
४) लीळाचरित्र व गोविंदप्रभू चरित्र या चरित्रग्रंथात परमेश्वर अवतराच्या आवठणींचा चरित्रात्मक तपशील नोंदविला आहे.
५) 'लीळाचरित्र', 'श्री गोविंदप्रभू चरित्र' व 'स्मृतिस्थळ' या तीनही चरित्रग्रंथातून संशोधनाकरिता अनेक नव्या दिशा सूचित होतात.
६) महानुभावीय चरित्रग्रंथाची खोली आणि विस्तार व्यापक असल्याने संशोधनाकरिता या विषयात भरपूर संधी आहे.
७) महानुभावीय चरित्रग्रंथातील आशय व विषय हे कालातीत असून त्याविषयीचे संशोधन हे पुढच्या पिढ्यांकरिता 'मौलिक संशोधन' ठरणार आहे.

**संदर्भसूची:**

१) डॉ. उषा माधव देशमूख - 'लीळाचरित्र : चरित्र आणि आत्मचरित्र', 'ज्ञानमोचक', दिवाळी विशेषांक २००३, पृ.२६
२) डॉ. शं. गो. तुळपुळे, 'महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय', व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १९७६, पृ.१५३
३) डॉ. वि. भि. कोलते, 'श्री गोविंदप्रभु चरित्र', प्रस्तावना, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती २०००, पृ.२६
४) डॉ. उषा माधव देशमुख, 'महानुभाव साहित्य दर्शन' माया प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २००५, पृ.६९
५) डॉ. वा. ना. देशपांडे, 'स्मृतिस्थळ' - प्रस्तावना, व्हीनस प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती १९८५, पृ.१३
६) डॉ. रमेश आवलगावकर, 'महानुभाव साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा', मराठी साहित्य संशोधन : नव्या दिशा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००६, पृत्र ९९, १०१

❀❀❀

# संत साहित्याचे संशोधन : स्वरूप आणि दिशा

प्रा. सौ. मंगल डोंगरे

साहित्य संशोधनामागे मानवी मन आणि मानवी जीवन समृद्ध करण्याची, परिपूर्ण, स्वयंपूर्ण करण्याची प्रभावी प्रेरणा असते. त्यातून मानवी जीवन संपन्न होते. जीवनाच्या कक्षा रुंदावतात, साहित्याच्या संशोधनात साहित्य हाच दस्तऐवज प्रमेयसिद्धांत ठरतो व त्यामधून मौलिक, चिरंतन व सर्वसमावेशक असे संशोधन होऊ शकते. साहित्य ही निर्मितीशील अभिकृती असल्यामूळे आणि ती मानवीय कला असल्यामूळे ती अतिशय गुंतागुंतीची आणि विविध प्रेरणा आणि संस्कार यांनी संकुल झालेली असते. साहित्य आत्मविष्कार असून बुद्धी, भावना आणि संवेदनशीलतेचा नितांत रमणीय विलास आहे. ते मानवी जीवनमूल्ये व संस्कृतीशी अनुबंधित झालेले असते. साहित्य संशोधनात प्रतिपाद्य विषयाचा सांगोपांग अभ्यास, समीक्षेची सार्थ दृष्टी, विचार करण्याची ताकद, विषयाची आवड, अध्ययन, मनन, चिंतन आणि निर्भेळ शोधकता प्रकट होते. म्हणून संशोधन ही अर्थपूर्ण, अन्वर्थक आणि बुद्धिपुरस्कर अशी अभिक्रिया ठरते.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सर्वच विषयांवर आजपर्यंत व्यापक संशोधन झाले आहे. वारकरी संप्रदाय हा मराठी संस्कृतीचा एक अनन्यसाधारण विशेष ठरला आहे. गेल्या ७०० वर्षापासून अखंडपणे प्रवाहीत झालेला, समाजाच्या सर्व स्तरात पोहचलेला सर्व भाषांत व सर्व देशांत पोहचलेला वारकरी संप्रदाय आहे. संतसाहित्य हे सांप्रदायिक व समृद्ध वाचकांपुरते मर्यादित राहू शकत नाही. सौंदर्यवृत्तीने त्याला सामोरे जाणाऱ्या वाचकालाही ते समाधान व आनंद देऊ शकते. हे सामर्थ्य संत साहित्याला कोठून व कसे प्राप्त झाले याचा शोध आणि बोध संशोधनातून घेतला जात आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारणाच्या उलथापालथीचा कोणताही परिणाम होता एका विशिष्ट प्रसंगी माणसे एकत्र येतात, स्वातंत्र्य, समता, बंधुभावाने भक्तिसुखाचा आनंद घेतात. त्यात स्वयंशिस्त असते. हा एक सांस्कृतिक क्षेत्रातील चमत्कारच म्हणाला लागेल.

संतसाहित्याचा विचार प्रेरणा, प्रयोजनाच्या, प्रवाह, काव्य आणि जीवनदृष्टी तत्कालीन धारणांच्या प्रकाशात झाला आहे. श्रेष्ठ अध्यात्ममूल्य

आणि विशुद्ध सौंदर्यमूल्य या दृष्टीने आध्यात्मिक सौंदर्यशास्त्र उलगडत गेले आहे. संतसाहित्यातील जीवनमूल्यांची संघटना एकजिनसी, गतिशील, काव्यकतापूर्ण असल्याने ती सौंदर्यमूल्यांची निर्मिती करते ही परिणामकारक, कार्यक्षम व शक्तिशाली मूल्ये रसिकांच्या जाणिवेत परिवर्तन घडवितात आणि समाजजीवनावर खोल संस्कार करतात, सौंदर्यानंदाबरोबर एक नैतिक जीवनदृष्टीही देतात. म्हणून संत साहित्याचे स्वरूप, सौंदर्य व कार्य यांचा उलगडा उचित साहित्यदृष्टीने करता येईल असे र.बा. मंचरकर म्हणतात. संतसाहित्याचे संशोधन वेगवेगळ्या दृष्टिकोणातून झालेले आहे. कारण मराठी साहित्यसृष्टीत संत साहित्याचे योगदान अपूर्व आहे. संतसाहित्याने सामाजिक परीवर्तन व सांस्कृतिक जडणघडणीत नवचैतन्य निर्माण केले आहे. वाङ्मयीन, धर्म, राजकारण, समाजकारण, भाषा, संस्कृती, तत्त्वज्ञान अशा अंगाने आणि हिंदी, मराठी, इंग्रजी या भाषांमध्ये झालेले दिसते.

१९०३ पासून संत साहित्याचे संशोधक वि.ल.भावे, आजगावकर, पांगारकर, बा.अ.भिडे, चिपळूणकर, न्यायमूर्ती रानडे, डॉ.भांडारकर, सर अलेक्झांडर ग्रँट यांनी संतसाहित्यातील पुरोगामी पारमार्थिक आशयाकडे समाजाचे लक्ष वेधले. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, महात्मा फुले या आधुनिक काळातील राजकीय पुढाऱ्यांनीही राष्ट्रकार्यासाठी लोकांची मने तयार करण्यासाठी भगवद्गीता व संत तुकारामगाथेचा आधार घेतलेला आहे. संतसाहित्याचा राष्ट्रवादी दृष्टिकोनातून अभ्यास, प्रा. न. र. फाटक, वि. का. राजवाडे, डॉ. शं. दा. पेंडसे, अ. ना. देशपांडे यांनी केला. १९०९ वा. ब. पटवर्धन सौंदर्यवादी दृष्टिकोणातून संत कवितेला 'रोमान्स ऑफ भक्ती' असे संबोधले.

**संत साहित्यावर १९९१ पर्यंत झालेल्या संशोधनाचा आढावा**

**समग्र संतसाहित्य**

संत साहित्य व लोकसाहित्य : रा. चि. ढेरे, वा. ब.पटवर्धन-रोमान्स ऑफ भक्ती, रा. द. रानडे - संत साहित्यातील साक्षात्कारवाद १९३३, प्रा. गं. बा. सरदार -संत साहित्याची सामाजिक फलश्रुती १९५०, स. रा. गाडगीळ - प्राचीन व मध्ययुगीन धर्मकल्पना आणि मराठी संत-१९७८, डॉ. मा. गा. देशमुख - मराठी साहित्यशास्त्र १९४०, प्रा. ह. श्री. शिनोलीकर - मराठी संत तत्त्वज्ञान संज्ञाकोश १९९४, मुजुमदार अनिता-प्राचीन मराठीतील लोकतत्त्व, चतुरकर शंकर - संतांचे आध्यात्मिक विचार, कोलते प्रद्युन्म - चार प्रमुख गीताभाष्ये, पंडीत पु. द. - भागवत-धर्माची तत्त्वमीमांसा, लोखंडे भा. बा. - मराठी संतविचारावर बौद्ध धर्माचा प्रभाव, मनमाककर दा. ना. -

वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान, प्र. न. जोशी - मराठी वाङ्मयातील मधुराभक्ती, वरसावडे दाजीबा - मराठी अभंगवाङ्मयातील शांतरस, कुलकर्णी अनुराधा-प्राचीन मराठीतील स्फुट आख्याने, पाठक यशवंत-किर्तनसंस्था उद्गम व विकास, देशमुख माधव-ज्ञानेश्वर ते रामदास काव्यशास्त्राच्या तत्त्वांचा अभ्यास, खेरडे सुनंदा-ज्ञानेश्वर ते तुकडोजी, दीक्षित लीला-प्राचीन मराठी वाङ्मयातून दिसणारे स्त्रीजीवन, कान्हेरी अंजली-मध्ययुगीन मराठी वाङ्मयातून घडणारी संस्कृती, कळवे जयसिंह-प्राचीन मराठी साहित्यातील सामाजिक जीवन, उपासे शिवशंकर-प्राचीन शिवदैवते, देशपांडे बाळकृष्ण-संत वाङ्मयद्वारा अनौपचारिक शिक्षण.

## संत ज्ञानेश्वर

रा. र. वाळिंबे : ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ती, गं.बा.सरदार-ज्ञानेश्वरांची जीवनदृष्टी १९७१, ज्ञानेश्वरीतील श्रोतुसंवाद-१९७५, द.भि.कुलकर्णी, ज्ञानेश्वरांचे काव्यशास्त्र-१९९३-व.दि.कुलकर्णी-लौकिक ज्ञानेश्वर-१९७८ देविदास बागूल-ज्ञानेश्वरी-स्वरूप, तत्त्वज्ञान व काव्य १९८०-म.वा.धोंड-ज्ञानेश्वरांचे साहित्यसृष्टी आणि दृष्टी १९९३ गो.म.कुलकर्णी-ज्ञानेश्वरी सर्वस्व, न. चि. केळकर १९४०, श्री. ज्ञानेश्वर वाङ्मयकोश-डॉ. भ. प. पेठे-१९९४, जोशी न. नि.-अमृतानुभव, पेठे म.प.-संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचे ऐतिहासिक समालोचन, चांदोरकर तु. धा.-ज्ञानेश्वरीतील सांस्कृतिक व सामाजिक दर्शन, काठमंडन सरोज-ज्ञानदेवांची अभंगगाथा, पाटील सुशीला-ज्ञानेश्वरीतील ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व, राजवाडे शैलजा-ज्ञानेश्वरांचे अभंग, सौ. रजनी-ज्ञानेश्वरांचे अभंग, दादोगावकर पद्माकर-ज्ञानेश्वरीतील रससिद्धांत, तुलनात्मक हिंदी : पाटील कुमुदिनी-संत ज्ञानेश्वर आणि तुळशीदास, भिंगारकर कृष्णाजी-कबीर आणि ज्ञानेश्वर, अर्थविज्ञान-दामोदर-ज्ञानेश्वरीतील महत्त्वपूर्ण शब्दांच्या अर्थपरिवर्तनाची ऐतिहासिक समीक्षा, इंग्रजी पानसे मुरलीधर-लिंग्विस्टिक स्टडी ऑफ ज्ञानेश्वरी.

## संत नामदेव

दीक्षित अरुणा-संत नामदेव-व्यक्तित्व एवंम कवित्व (हिंदी), हे. वि. इनामदार-संत नामदेवांचा चिकित्सक अभ्यास, सासवडे मंगल-संत नामदेव, गणोरकर कमला-कबीर और नामदेव दर्शनिक विचार(हिंदी), देवा सुशीला-सुरदास आणि नामदेव (हिंदी), आर्य सुरेंद्रकुमार-मध्ययुगीन हिंदी काव्य साधनोंमें संत नामदेव का योगदान (हिंदी), आडकर शंकर-हिंदी निर्गुण काव्य का प्रारंभ और नामदेव की हिंदी कविता (हिंदी)

### संत एकनाथ

वसंत जोशी-संत एकनाथकृत भावार्थ रामायण, कुलकर्णी श्रीरंग-एकनाथप्रणीत भागवतधर्म, खडसे ललिता-संत एकनाथांच्या भावार्थ रामायणाचा अभ्यास, बाळ शरयू-एकनाथांचे तत्त्वज्ञान, जाधव प्रफुल्लता-संत एकनाथ काव्यातील भक्तिभाव, पायमोडे गुरुप्रसाद-संत एकनाथांच्या अभंगगाथेचा अभ्यास, कुलकर्णी दामोदर-एकनाथी भागवत, वैद्य कमल-एकनाथी भागवत १९८६, गोसावी कुमुद-संत एकनाथांचे स्फुटलेखन, नेटके कमल-संत एकनाथांचे भावार्थ रामायण व तुळशिदासांचे रामचरीतमानस, कुंटे श्रीधर-संत एकनाथ व सूरदास, सोनारे शामराव-एकनाथ और तुळशिदास, शिंगटे लीला-एकनाथ व सूरदास कृष्णभक्ती भावना, जवळगेकर विदुला-संत एकनाथ-तुळशीदास-भक्ती और काव्यसाधना, आवलगावकर रमेश-कवी नरेंद्र, एकनाथ, सामराज-रुक्मिणी स्वयंवर.

### इतर संत

यशवंत साधू-संत निळोबा चरित्र व वाड्मयीन कार्य, भिंगारकर दामोदर-संत जनाबाई, घारगे वसंत-संत चोखामेळा, नेऊरगावकर-संत जनाबाई, बेलसरे किशोरी-संत निवृत्तीनाथ, मोडक उषा-ज्ञानेश्वर पंचकाचे अभंग वाड्मय.

### संत कवयित्री

प्राचीन मराठी संत कवयित्रींचे वाड्मयीन कार्य - १९८० - सुवासिनी इर्लेकर,(तौलनिक हिंदी) कोतवालीवाले प्रतिभा-मराठी एवंम् हिंदी कवयित्री.

### संत रामदास

य.दी.पेंढरकर-रामदासांच्या कवितेचे विश्लेषण १९६४, मा.श्री.परांजपे-रामदास साहित्यशास्त्र १९७३, टिल्लू समिता-संत रामदास सामाजिक व राजकीय तत्त्व, लिमये इंदू-समर्थ रामदास चिकित्सक अभ्यास, डिंबळे उषा-समर्थ रामदास ऐहिक जीवन, जोशीराव नीला-दासबोधातील भक्तिमार्ग, तेंडुलकर उमेश-दासबोधांची समीक्षा, चिटणीस रामचंद्र-रामदासांची काव्यदृष्टी, देशमुख उषा-रामदासांचे काव्यविषयक विचार, जोशी उषा-रामदासांच्या कवितेतील आकृतिबंध, हर्ष नलिनी-रामदास आरि कबीर, दुबे दुधनाथधर-तुळशीदाससमर्थ रामदास, शेळके ख्रिस्तीफर-संत रामदास व इम्नातिद लायलो, कानडे मुकुंद-दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास.

### संत तुकाराम

संत तुकोबांचे संतसंगती-बा.सी.बेंद्रे, आनंदाचा डोह-रा.ग.जाधव १९७८, सर अलेक्झांडर ग्रँट  तुकाराम अ स्टडी ऑफ हिंदुस्थान १९६७, पाटील मालती-तुकारामांची काव्यात्मशक्ती व प्रतिमानसृष्टीचे मूल्यमापन, पटवर्धन द.वा.-संत

तुकारामांचे काव्य, कुलकर्णी निलमणी-तुकारामांच्या अभंगगाथेच्या संपादन पद्धती, गोडबोले राधा-संत तुकारामविषयक मराठीतील वाङ्मयाचे सर्वांगीण समालोचन, टिळक गजानन-तुकारामांचे संतपण, धोंडगे दिलीप-संत तुकारामांच्या अभंगाचा शैलीवैज्ञानिक अभ्यास,

**तौलनिक मराठी** : पाटल सुभाष-संत तुकाराम व रेव्ह टिळकांच्या काव्यातील भावानुबंध, घोडे रामदास-संत तुकाराम व संत तुकडोजी-काव्य व कार्य, दाभोळकर ललिता-संत तुकाराम व रामदास , मधुकर पाटील-ज्ञानेश्वर तुकाराम. **हिंदी** : शेठ रमेश-तुकाराम एवंम् कबीर, जोशी सुशीला-कबीर और तुकाराम, नुर्ले व्यंकटेश-तुकाराम और कबीर के काव्य मे सामाजिकता. **इंग्रजी** : कर्वे श्रीकृष्ण-ए लिंग्विस्टिक स्टडी ऑफ तुकाराम

**हिंदी संशोधकांचे संशोधन**

देशपांडे भीमराव-भक्ती साहित्य आणि आधुनिक साहित्य, गुंठे गोविंद-हिंदी और मराठी भक्तिकाव्य, आहुजा आदर्श-हिंदी मराठी निर्गुण काव्य में गुरू का स्वरूप, पंडित प्रभाकर-वारकरी संतोंके हिंदी काव्य का अध्ययन, तिवारी सुखदेव-हिंदी का मराठी संतोंकी देन, कामत अशोक-महाराष्ट्र के नाथपंथीय कवियोंका हिंदी काव्य, औटी वासुदेव-वारकरी संप्रदाय के कवियोंकी हिंदी रचनाओंका अनुशीलन, पोंछे विनायक-मराठी संतोंके हिंदी भारूडगीत.

**संतसाहित्य संशोधनाचे स्वरूप व सारांश**

संत साहित्यावर संत ज्ञानेश्वरांपासून तर संत तुकाराम निळोबांपर्यंत वेगवेगळ्या दृष्टिकोणातून हिंदी, मराठी, इंग्रजीतून संशोधन झालेले दिसून येते. संत साहित्यातील साक्षात्कार, संतांची सामाजिक दृष्टी, संत साहित्याची वाङ्मयीन व सामाजिक फलश्रुती, धर्म कल्पना, संतांचे तत्त्वज्ञान, प्राचीन मराठीतील लोकतत्त्व, गीताभाष्य, भागवत धर्माची तत्त्वे, वारकरी संप्रदाय आणि मधुराभक्ती, संत साहित्यातील रसांचा अविष्कार, स्फुट आख्याने, कीर्तन, भारुडे, स्त्रीजीवन, संस्कृतिदर्शन, संतसाहित्याने प्रभावित झालेला बौद्धधर्म, मराठी संतांचे हिंदी योगदान, हिंदी व मराठी संतांच्या काव्यातील साधर्म्य दिसून येते.

**१. संत ज्ञानेश्वर**

वारकरी संप्रदायाचे प्रणेते संत ज्ञानेश्वरांच्या कर्तृत्वावर, व्यक्तिमत्त्वावर वाङ्मयीन आणि सांस्कृतिक मूल्यांवर संशोधन झाले आहे. संत ज्ञानेश्वरांची जीवनदृष्टी, त्यांचे काव्य, लौकिक ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरांचा दृष्टिकोण याबरोबरच त्यांच्या काव्यातील रसाविष्कार, तत्त्वज्ञान, समाजजीवन, संस्कृती, त्यांची ज्ञानेश्वरी, अभंग यातील वाङ्मयीन मूल्यांचे

संशोधन झाले आहे. तसेच ज्ञानेश्वरांच्या काव्याची तुलना तुळशिदास व कबीर या हिंदी कवींबरोबर केली आहे.

## २. संत नामदेव

संत नामदेवांच्या काव्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे संशोधन, त्यांचे काव्याचे विशेष याची चिकित्सा झाली आहे. कबीर, सुरदास या हिंदी कवींबरोबर तौलनिक अभ्यास आणि हिंदी काव्यातील त्यांचे योगदान यांचे संशोधन सखोल झाले आहे. ज्ञानेश्वर समकालीन संतांमध्ये निवृत्तिनाथ, संत जनाबाई, संत चोखामेळा व ज्ञानेश्वरपंचक यांच्याही काव्याचा अभ्यास झाला आहे. संत कवयित्रींच्या वाङ्मयीन कर्तृत्वावर तसेच हिंदी कवयित्रींबरोबर तौलनिक संशोधन झाले आहे.

## ३. संत एकनाथ

संत एकनाथांचा भागवतधर्म अभंग, त्याचें भावार्थ रामायण, एकनाथी भागवत, रुक्मिणीस्वयंवर यावर संशोधन झाले आहे. एकनाथांचे काव्य, तत्त्वज्ञान, भक्ती या मूल्यांवर अभ्यास झाला आहे. एकनाथांचा तौलनिक अभ्यास तुळशिदास, सूरदास या हिंदी संतांशी झाला आहे. हिंदी संशोधकांनी एकनाथांवर संशोधन पुष्कळ केले.

## ४. संत रामदास

संत रामदास तत्त्वज्ञ, कवी, भक्त संत म्हणून अभ्यास झाला आहे. तत्कालीन राजकीय विचार, साहित्यशास्त्र व भाषाशास्त्रीय दृष्टिकोणातून दासबोधाचा अभ्यास झाला आहे. हिंदी अभ्यासकांनी रामदासांची तुलना कबीर व तुळशिदास यांच्याप्रमाणेच ख्रिस्ती ग्रंथकार इम्नातिद लापलो यांच्या बरोबर केलेली दिसून येते.

## ५. संत तुकाराम

संत तुकारामांच्या अभंगगाथेचा अभ्यास अनेक विचारवंत, तत्त्वज्ञ, समीक्षक संशोधकांनी केला आहे. मराठीतच नाही तर हिंदी व इंग्रजी संशोधकांनीही त्यांच्या काव्याचे संशोधन केले आहे. संत तुकोबांचे संतसांगाती, त्यांचे काव्य, वाङ्मयीन कर्तृत्व, साक्षात्कारी संत, समाजजीवनातील संत, तत्कालीन संस्कृती, त्यांचे संतपण, त्यांची काव्यशैली, त्यांची प्रतिमानसृष्टी, तुकोबांचे चरित्र उलगडले आहे. त्यांच्या काव्याची तुलना संत तुकडोजी, ख्रिस्ती कवी रे.टिळक यांच्याबरोबरही संशोधकांनी केली आहे. संत रामदास, संत ज्ञानेश्वर यांच्याशी काव्याचे साधर्म्य शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची दिशा**

संत साहित्याचे संशोधन करताना अध्यात्माबरोबर सौंदर्यमूल्यांचाही अभ्यास झाला आहे. संतांच्या काव्याचा तुलनात्मक अभ्यास झालेला आहे. हिंदी व मराठी संतांची तुलना करताना एकाच विषयावर दोन संशोधकांनी संशोधन केल्याचे दिसून येते. (संत एकनाथांचे भागवत) तसेच हिंदी संशोधकांनी सूरदासांबरोबर तुलना करताना संशोधनाची पुनरावृत्ती झाली आहे. संत एकनाथकालीन समाजजीवन यावर संशोधन झाले नाही. समर्थ रामदासांच्या दासबोधावर अनेकांनी संशोधन केले आहे. पण त्या करूणाष्टके, मनाचे श्लोक व तत्कालीन संस्कृती यावर प्रकाशझोत पडलेला नाही. संत तुकोबांची तुलना संत कबीराबरोबर करताना हिंदी संशोधकांनी पुनरावृत्ती केली आहे.

समान आशयसूत्रे असलेल्या संतसमीक्षेत पुनरावृत्ती आढळून येते. पंढरपूर, आळंदी, पैठण, देहू या तीर्थक्षेत्रांचा उल्लेख संशोधनात झाला आहे पण नेवासे हे तीर्थक्षेत्र दुर्लक्षित आहे. प्रबोधनाचे शिल्पकार किंवा प्रबोधनाचे प्रणेते म्हणून संतांच्या कर्तृत्वावर संशोधन झाले नाही. संत साहित्याने केलेले परीवर्तन, जातीयता किंवा दलित संवेदना यावर संशोधन होणे आवश्यक आहे. संतकाव्याचा राजकीय अंगाने अभ्यास झालेला नाही. संतकाव्यातील रामायण व महाभारताचे संदर्भ केव्हा व कोणी कसे वापरले आहे, संत साहित्यातील वैज्ञानिक दृष्टीचा अभ्यास झालेला नाही. संत साहित्यातील तात्त्विक विचार, मानसशास्त्रीय विचार, वैश्विक विचार यांची चिकित्सा होणे आवश्यक आहे. विविध भाषांतील रचनाबंध आणि संत साहित्य असा तौलनिक अभ्यास करता येईल.

❀❀❀

# लोकसाहित्याचे पाश्चात्त्य अभ्यासक

प्रा. डॉ. सीताराम निघूट

युरोपात १८ व्या शतकाच्यां शेवटी आणि १९ व्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाला सुरुवात झाली. तत्पूर्वी होमर या ग्रीक कवीच्या काव्यात दैवतकथांचे संकलन झाले होते. नॉर्वेमध्ये सेमुंड (१०५६-११३३) या धर्मोपदशकाने नॉर्वेच्या लोककथांचे संकलन केले. त्यानंतर त्यांचा नातू स्नॉरी स्टर्लसन (११७९ ते ११८१) याने एडा हे दैवतकथांचे गद्य पद्यमय अशा लोकसाहित्याचे संपादन केले. डॅनिश इतिहासकार सॉसो यांनी लोककथा, दंतकथा आणि अद्‌भुतकथांचे संकलन संपादन केले. व्हिक्टर रिडबर्ग यांनी ट्युटॅनिक पंरपरेतील लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास करून ट्युटॉनिक आयथॉलॉजी लोकसाहित्याच्या विश्लेषणाचे काम केले. १८ व्या शतकात युरोपमध्ये ग्रीम बंधूंनी लोकसाहित्याचा अभ्यास करून लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. १८११ साली जेकब लुडविन आणि विल्हेम कार्ल या बंधुंनी प्राचीन जर्मनीची श्रेष्ठगीते आणि १८१२ साली बालकांच्या व कौटुंबिक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. या कथांना खूप लोकप्रियता मिळाली. त्यांनतर १८१४ साली त्यांनी जर्मन कहा यांचे पुस्तक प्रसिध्द केले. यातूनच पुढे जर्मन दैवतकथा शास्त्र हे पुस्तक १८३६ साली प्रसिध्द झाले. यातून ट्युटॅनिक लोकपंरपरा, लोकभ्रम, लोकरुढी, लोकधर्म यांचा परिचय करून दिला. ग्रीम बंधुनंतर ब्रेल, मॅक्स म्युलर, कुहन यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाची परंपरा पुढे नेली.

**१. मॅक्स म्युलर (१८२३-१९००) :**

मॅक्स म्युलर यांनी दैवतकथाशास्त्राचा तौलनिक अभ्यास करून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे एक नवे पर्व सुरु केले. त्यांनी उपनिषदे, ऋग्वेदाचा अभ्यास केला. १८४४ साली हितोपदेशाचे जर्मन भाषेत रूपांतर केले. १८९५ साली दैवतकथा विज्ञान (Science of Mythology) हा ग्रंथ लिहिला. दैवतकथा हा भाषेला जडलेला रोग आहे व त्यामुळे भाषेचा मूळ अर्थ दुर्बोध झाला असा सिद्धांत त्यांनी मांडली. तर मिथक कथा हया बदलत

जाणाऱ्या कथा आहेत. सतत विकास पावणाऱ्या कथा आहेत हे अप्रत्यक्षपणे सूचित केले.

**२. जॉर्ज ग्रियर्सन :**

जॉर्ज ग्रियर्सन यांनी १८८४ साली 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' हा ग्रंथ १८८४ साली लिहिला. या ग्रंथातून त्यांनी भाषाशास्त्रीय दृष्टिकोण मांडला. १८८५ साली गोपीचंदाच्या दोन पाठातील भोजपुरी व मागधी भाषेतील पर्यायांमुळे गीतांत कसा बदल होत होतो याचे भाषाशास्त्रीय विश्लेषण करून तौलनिक अभ्यासाची दिशा स्पष्ट केली.

**३. थिओडोर बेनेफ :**

थिओडो हे लोकसाहित्याच्या अभ्यासाचे पाश्चात्य पंडित होते. त्यांनी भारतीय लोककथांचा अभ्यास केला. १८५९ साली त्यांनी पंचतंत्राचे भाषांतर करुन त्यास प्रस्तावना लिहिली. 'सर्व लोककथा भारतातून युरोपात आल्या' असा भारतमूलक सिध्दांत (इंडियानिस्ट थिअरी) त्यांनी मांडला. व्यापारी व भटक्या लोकांनी व्यापारनिमित्त भटकंती करतांना या कथा भारतातून युरोपात नेल्या असा थिओडोर बेनेफ यांचे म्हणने अनेक युरोपिय कथा पंचतंत्रातून कशा आल्या आहेत हे त्यांनी दाखवून दिले.

**४. डॉ. गुंथर सोंथायमरे :**

डॉ. गुंथर सोंथायमरे हे जर्मनीत हायडेबर्ग विद्यापीठात धर्मशास्त्र या विषयाचे अभ्यासक होते. त्यांनी डॉ. कोसंबी यांच्या प्रेरणेतून महाराष्ट्रातील खंडोबा, विरोबा, म्हसोबा या लोकदैवतांचा अभ्यास केला. 'भारत मजलिस' या सांस्कृतिक मंडळाचे ते सभासद होते. १९५८ ते १९६१ या काळात ते पुण्यात आले डॉ. कोसंबी यांच्याकडून लोकजीवनाच्या क्षेत्रीय अभ्यासाचे महत्त्वं समजावून घेतले. 'संयुक्त हिंदू कुटुंब : एका कायदेशीर संस्थेची क्रांती' हा त्यांचा संशोधन विषय होता. ते म्हणतात, संस्कृतीच्या अभ्यासासाठी विविध ज्ञानशाखांचा समन्वय साधून, आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोन बाळगला पाहिजे. डॉ. सोंथायमरे यांनी महाराष्ट्रातल्या लोकदैवतांचा अभ्यास केला. त्यांनी मिथके, विधी, नृत्य-नाटय-संगीत, जत्रा, वाऱ्या, दिंडी या सर्वांचा अभ्यास केला. श्री. दिलीप चित्रे त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना म्हणतात, डॉ. गुंथर सोंथायमरे हे पांडित्यापलीकडे जाणारा संशोधक आहे.

खंडोबाची जत्रा, पंढरपूरची वारी, हंगामानुसार, ऋतुनुसार भरणाऱ्या जत्रा यांचे वेजळेपण त्यांनी विशद केले.

५. इमॅन्यूएल कॉसकिन :

या फ्रेंच अभ्यासकाने भारत मूलक सिद्धांताला विरोध करत जिप्सी लोकांनी भारतातून युरोपात लोककथा नेल्या असा आपला निष्कर्ष मांडला. बौद्धकथा ह्या जागतिक मूलकथा आहेत. त्या बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबर त्या भारतातून अन्य देशात पसरल्या असे इमॅन्यूएल कॉसकिन मत आहे. त्यांच्या या मतास प्रो. हिस डेव्हिडस यांनीही दुजोरा दिलेला आहे.

६. डॉ. ॲन फेल्डहाऊस :

डॉ. ॲन फेल्डहाऊस या अमेरिकन विदुषीने महाराष्ट्रातील नद्यांकाठच्या लोकसंस्कृतीचा अभ्यास केला. "Water and Womanhood" हा त्यांचा १९९५ साली ग्रंथ प्रसिद्ध झाला. नदीकाठच्या संस्कृतीचा लोकधर्मीय अभ्यास त्यांनी केला. तसेच महाराष्ट्रातील लोकपरंपरांचा आणि मौखिक लोकसाहित्याचा शोध त्यांनी घेतला. त्या म्हणतात, भारतातल्या लिखित आणि मौखिक साहित्य पंरपरांमध्ये 'अभिजात' आणि 'लोक' परंपरांमध्ये कथनपद्धती आणि शैलीच्या दृष्टीने भेद असला तरी धार्मिक नैतिक मूल्यदृष्टीत मात्र कमालीचे साम्य आढळते. संपत्ती, सौदर्य, दीर्घायुष्य, आरोग्य, अन्नपदार्थ, प्रेम, अपत्यनिर्मिती याबाबत अभिजन आणि लोकपरंपरागत एकजिनसीपणा आढळतो.

७. विल्यम कूक :

विल्यम कूक यांनी 'उत्तर भारतातील लोकसाहित्य आणि लोकधर्म' हा ग्रंथ १८६६ साली प्रसिध्द झाला. "North Indian Notes and Queries" हे नियतकालिक त्यांनी सुरू केले. त्यांनी आपल्या शोध ग्रंथातून लोकश्रद्धा, अंधविश्वास, लोकदेवता यांच्या विषयीच्या समजुतीचे संकलन व विश्लेषण केले. उत्तर भारतातील जाती, जमातींचा अभ्यास करणारा ग्रंथ लिहिला.

८. रिचर्ड टेंपल :

रिचर्ड टेंपल यांनी "Wide Awake Stories" हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून लोककथांचे त्यांनी शास्त्रीय वर्गीकरण केले. हे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले.

१. पात्रे (Actors) - सावत्रआई, चेटकिण, साधू, राजस, बदलेली माणसे, दुजावलेली माणसे, नाटक, नायकांचे सोबती, लहान पात्रे.

२. कथेची अभिवृद्धी (Progress) - नशीब काढायला निघणे, युक्त्या, स्वप्ने.

३. अभिवृध्दीला पूरक साधने (mean) - दैवी सहाय्य, निषिद्ध गोष्टी, प्रसंगाची फोड करण्यासाठी कथाकथन.

८. संकीर्ण घटना (Miscelleny) - लग्नाचे मुद्दे, सुडाची तऱ्हा, संख्या इ.

**९. जी.एच. डेमेंट :**

जी. एच. डेमेंट 'Bengalli Folklore from Dainipur' हा बंगाली लोककथांचे संकलन ग्रंथ लिहिला. १९ व्या शतकातील अभ्यासाचे प्रारंभीचे रूप ह्या नियतकालिकांतील लेखांनी व परिचयात्मक ग्रंथांनी सिद्ध केले.

**१०. ॲलेक्झांडर क्राप :**

लोकसाहित्याचा अभ्यास ही सांस्कृतिक इतिहासाची अध्ययन शाखा असून वेगवेगळ्या संप्रदायांचा समन्वय साधून लोकसाहित्याचा अभ्यास करता येतो असे त्यांनी मांडले.

याशिवाय पाश्चात्त्य अभ्यासकात आर्चर टेलर, वॉरन रॉबर्टस, जेकब ग्रीन, टेंपल, मिस मेरी फ्रियर, चार्लस इ. ग्रोवर,डॉल्टन, मिस स्टोस, श्रीमती प्लोरा एन. स्टील, जी.एच.डेमेंट यांनीही मोलाची भर घातली आहे.

❀❀❀

# मराठीचे पाश्चात्त्य संशोधक

प्रा.सौ.अपर्णा पांडे

साहित्य संशोधनात जे अनुपलब्ध ते उपलब्ध करून देणे, त्यावर संस्कार करून संपादित रूपात टीका, टिप्पणी करून ते प्रकाशित करणे या गोष्टी असतात तसेच विदग्ध साहित्यकृतीचे नवे अर्थसौंदर्य उलगडून दाखविणे त्याचे साहित्य कलादृष्ट्या पुनर्मूल्यमापन करणे हाही महत्त्वाचा भाग असतो.

मराठीतील संशोधन परंपरेचा विचार करताना पाश्चात्त्य संशोधकांचा प्रवाहही महत्त्वाचा आहे. संस्कृत भाषा, समाजशास्त्र, धर्मशास्त्र इ. अनेक विषयांवर विदेशी अभ्यासकांनी आपले योगदान दिलेले आहे. याठिकाणी मराठीच्या पाश्चात्त्य संशोधकांचा धावता आढावा घेतलेला आहे. वेळेच्या मर्यादेचा विचार करता विवेचनातील विस्तार मर्यादित केलेला आहे.

मराठीच्या अभ्यासकांची पूर्वपरंपरा : महाराष्ट्रात आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांना आपले धर्मतत्त्वज्ञान सांगण्यासाठी तसेच युरोपिअन नोकरदारांना दैनंदिन कामकाजासाठी सामान्य माणसांची भाषा अवगत करणे आवश्यक होते. यातूनच सुरुवातीचा मराठी भाषाभ्यास हा दृष्टिकोण आला मिशनऱ्यांचे सुरुवातीचे व्याकरण, कोश. आदि वाङ्मय याच प्रेरणेतून आलेले दिसते. येथे सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने सामाजिक, शास्त्रीय, भौगोलिक, वैद्यकीय आदि विषयांवरही लेखन केलेले दिसते त्यांना इथल्या मराठी भाषिक पंडितांचे सहकार्य वेळोवेळी मिळाले. एलफिस्टनच्या शैक्षणिक  धोरणामुळे इंग्रजीतील उत्तमोत्तम ग्रंथांची भाषांतरे व्हावीत हा विचार पुढे आला. १८२२ ते १८३२ या पर्यंतच्या काळात कोशकार्य भरीवपणे झालेले दिसते. पहिला ग्रंथ कॅप्टन केपिन यांनी लिहिलेला दिसतो. तसेच केरी, केनडी, मोल्सवर्थ यांनी कोशाची निर्मिती केलेली दिसते. एलफिस्टन यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र भाषेचा कोश' तयार झाला.

१८३१ साली मोल्सवर्थचा मराठी इंग्रजी शब्दकोश प्रसिद्ध झाला त्याच्या प्रथम आवृत्तीत ४०,००० शब्दांचा समावेश आहे. यादृष्टीने या कोशाचे आजही तितकेच महत्त्व आहे. अनेक मराठीचा पाश्चात्त्य अभ्यास करणारे तसेच इतरही संशोधक याच कोशाचा वापर करताना दिसतात. या कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीत १८५७ शब्दसंख्या ६०,००० वर आहे असे

दिसते. कोश सिद्ध करण्यासाठी लागणारी चिकाटी व तळमळ,निष्ठा मोल्सवर्थच्या ठायी होती इतरांच्या सहकार्याने इंग्रजी लोकांसाठी होती. त्यामुळे इंग्रजी शब्दांचे अर्थ व मराठीत त्याचे अर्थ मराठी वाक्प्रचार लक्षात घेऊन इंग्रजी अर्थ असे याचे स्वरूप आहे.रे. स्टीव्हन्सन यांनी मराठी भाषेत वेदविषयक ग्रंथ आणले "The Principles of Marathi Grammar" हे पुस्तक १८३३ साली लिहिले मराठी भाषा शिकण्यासाठी टर्नर,साऊथवर्थ यांनी शैक्षणिक व्याकरण लिहिले. फादर स्टीफन यांनी मराठीचे व्याकरण लिहिले. ग्रिअर्सन यांनी ४० बोलींचा अभ्यास केला व यातून 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' हा ग्रंथ सिद्ध झाला. प्रा. झुक ब्लोक यांनी फ्रेंच भाषेत प्रकाशित केलेल्या ग्रंथाचे मराठी भाषेचा विकास या नावाने प्रा. वा. गो. परांजपे यांनी मराठीत भाषांतर केले. आधुनिक आर्य भारतीय भाषांचा अभ्यास करताना महत्त्वाचे साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. भाषेचा शास्त्रोक्त, वस्तुनिष्ठ अभ्यास कसा करावा याचा हा ग्रंथ उत्तम साधन आहे.

जस्टिन एडवर्डस् ॲबट हा कट्टर मिशनरी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात संतसाहित्य आणि संतचरित्रात रममाण झाला संतवाङ्मय इंग्रजी भाषांतर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. लंडनच्या 'स्कूल ऑफ ओरिएन्टल स्टडीज' शी संबंधित डॉ. रेसाइड यांनी महानुभावीय मराठी ग्रंथांची वर्णनात्मक सूची तयार केली. अभ्यासकांना ती अतिशय मोलांची असून महानुभावपंथ, त्याचा इतिहास, तत्त्वज्ञान, सकळा लिपी या विषयावर त्यांनी लेखन केलेले आहे. अभ्यास करत असताना त्यांची दृष्टी केवळ साहित्य वा भाषेपुरतीच मर्यादित नाही तर श्रीधराच्या पाडुरंग माहात्म्यवर लेख स्वतः हिंडून पाहिली. 'दत्तात्रया'च्या लेखातून महानुभाव पंथातील पंचकृष्णातील श्रीदत्तप्रभूच्या अवताराचे मर्म आलेले दिसते. याबरोबरच इटालियन भाषेत त्यांनी प्राचीन व अर्वाचीन मराठी वाङ्मयाची ओळख करून दिली.

कोणत्याही परकीय भाषेचा अभ्यास करत असताना त्या समाजाचा, संस्कृतीचा परिचय असणे/ करून घेणे महत्त्वाचे असते. डॉ. फ्रॅकलिन साऊथवर्थ, डॉ.मॅक्सिन बर्न्टसन यांनी मराठीच्या अभ्यासासाठी तयार केलेली पुस्तके त्यांची आखणी यासाऱ्या गोष्टीचा विचार करून झालेली आहे. लेनिनग्राड विद्यापीठातील प्रा. तातियाना कातेनिया यांनीही मराठी-रशियन शब्दकोश तयार केलेला आहे. तसेच रशियन लोकांना मराठी शिकण्यासाठी मार्गदर्शक ठरेल असे मराठीचे व्याकरण लिहिले आहे.

जर्मनीतील डॉ. गुन्थर सोन्थायमर यांनी महाराष्ट्रातील धनगर समाज, खंडोबा याविषयावर अभ्यास केला. डॉ. रा. चि. ढेरे यांच्या मार्गदर्शनाखाली

त्यांनी भागवत धर्माचा अभ्यास केला. विठोबाचा इतिहास त्यांनी लोकसाहित्याच्या लोकसंस्कृतीच्या अंगाने मांडला. खंडोबा आणि धनगर जमात यावरचा त्यांचा अभ्यास चालू असताना जेजुरी परिसरात त्यांनी भ्रमंती केली. प्रत्यक्ष धनगरांशी ते त्यांच्या भाषेत संवाद साधत. त्यांचे रीतीरिवाज, सण, त्यांची लोकगीते इ. साऱ्यांचे ध्वनिमुद्रण व चित्रण त्यांनी करून घेतले. त्यांनी स्वतः वेगवेगळ्या विषयात संशोधन केले पण संशोधनाची मराठी संतांच्या अभ्यासाची विद्यार्थी परंपरा त्यांनी सुरू केलेली दिसते. डॉ. स्कॉयहॉक यांनी एकनाथांचा अभंगाचा अभ्यास करून ज्ञानदेवांच्या अभंगाची चिकित्सक आवृत्ती प्रकाशित केली. अशी अनेक उदाहरणे देता येतील.डॉ. सेन्थायमर यांचा खंडोबा संप्रदायाचा गाढ व्यासंग होता. त्यांनी Bairoba, Mhaskoba and Khandoba हा ग्रंथ जर्मन भाषेत लिहिला.

डॉ. वोदविल या फ्रेंच विदुषीने मराठीतील संतकाव्याचा अभ्यास केलेला आहे. खर तर त्या तुलसी काव्याच्या अभ्यासक पण त्या ज्ञानेश्वर तुकाराम आदिंकडे वळल्या. त्यांनी ज्ञानेश्वराच्या हरीपाठाचे चिकित्सक संपादन केले आहे. तसेच पंढरपूर, संत व संतवाणीचे महत्त्व, पंढरपूरची वारी यासाऱ्याचे महत्त्व त्यांच्या लेखनातून आलेले आहे.

डॉ. एलिनॉर झेलिएट यांनीही संतसाहित्याचा अभ्यास केलेला आहे. एकनाथांच्या भारुडांवर त्यांनी काम केले. त्या खरं तर इतिहासाच्या प्राध्यापिका. त्यामुळे त्यांच्या अभ्यासाला ऐतिहासिक व सामाजिक दृष्टी आहे. त्यांनी अनेक परिषदा, चर्चासत्रे यामधून शोधनिबंधाचे वाचन केलेले आहे. संत चोखामेळा यांच्यावर संशोधन करीत असताना त्यांनी परिवाराशी संबंधित गावांचा इतिहास, त्यांची स्मारके दलित तरुणांच्या कैफियती, दलितांमधील सुशिक्षित समाजाला काय वटते. चोखोबा, अजामेळा इ. दिंड्या या दिंड्यातील तरुणांचा सहभाग पंढरपूर, मंगळवेढा, आळंदी या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी दिल्या यातूनच 'संत चोखामेळा विविध दर्शन' हे पुस्तक सिद्ध झाले. यामधून आपले विचार अतिशय स्पष्टपणे मांडलेले आाहेत. दलित साहित्याबद्दल त्यांना विशेष ओढ आहे. आधुनिक मराठी साहित्याच्या इंग्रजी अनुवादांची व त्या साहित्यावरील इंग्रजी लिखाणाची सूची तयार करण्याचे कार्य त्यांनी केले आहे.

अमेरिकेच्या ॲरिझोना विद्यापीठातील भारतीय विद्याशाखा संबंधित असलेल्या डॉ.ॲन फेल्डहाऊस यांनी फिलाडेल्फियातील पेनसिल्व्हानिया विद्यापीठातून महानुभावांचा 'सूत्रपाठ' या विषयावर पीएच.डी. प्राप्त केली. त्यांचे मार्गदर्शक डॉ. फ्रँकलिन साऊथवर्थ होते आणि त्यांना डॉ. शं. गो.

तुळपुळे, कै. डॉ. वि. भि. कोलते यांचे मार्गदर्शन लाभले. महानुभवांच्या सांकेतिक लिप्या त्यांनी शिकून घेतल्या. विविध पोथ्या मिळवून त्यातले पाठभेद नोंदविले. त्यांना उत्तम मराठी बोलता येते. त्यांनी आपल्या Bahinabai: Wife and Saint या निबंधात बहिणाबाईच्या जीवनातील प्रांपचिक व पारमार्थिक जीवनातील साधलेला तोल दाखविला आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या 'श्री विठ्ठल : एक महासमन्वयक' या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर त्यांनी केले. गोविंद प्रभू चरित्राचे भाषांतर त्यांनी केले. डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ओल्ड मराठी डिक्शन्री' हा प्रकल्प हाती घेतला व पुढील अभ्यासकांसाठी महत्त्वाचा संदर्भ निर्माण केला. डॉ. ॲन फेल्डहाऊस म्हणजे विदेशी अभ्यासक व मराठी संस्कृती यामधला दुवा आहेत. अनेक अमेरिकन विद्यार्थ्यांना त्यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्या सतत कार्यमग्न असतात. सध्या मराठी हस्तलिखितांवर त्याचे काम चालले आहे असे कळते. भक्ती परिषद व महाराष्ट्र कल्चर ॲण्ड सोसायटीच्या त्या संस्थापक आहेत. या दोन्हीमार्फत मराठी संशोधनाला गती व दिशा देण्याचे काम आजच्या काळात होताना दिसते. नॉर्थ कॅरोलायना विद्यापीठातील डॉ.पॉल कोर्टराईट यांनी महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचा चिकित्सक विचार केला आहे. तसेच रामदासाचा अभ्यास केलेला आहे. लॉरेन्स विद्यापीठातील डॉ. जॉन स्टॅन्ले यांनी एकनाथांची भारुडे व खंडोबाचा संप्रदाय यावर काम केले आहे. फादर जी. ए. दलरी यांनी 'द कल्ट ऑफ विठोबा' हा ग्रंथ लिहिला.

· डॉ. एलिझाबेथ स्टॅडबर्ग यांनी स्वतः मोडी लिपीचे धडे घेतले आणि कोपनहेगेन येथे लिपीतील ऐतिहासिक कागदपत्रे पडून होती. त्याचा अभ्यास केला ती कागदपत्रे म्हणजे तंजावरचे मराठी राजे व डेन्मार्कचे गव्हर्नर यांच्यातील पत्रव्यवहार होता. तो समजून घेऊन त्या मागचा इतिहास जाणून घेण्यासाठी त्यांनी मोडी लिपी आत्मसात केली. अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठातील मेरी मॅक्गीने स्त्रियांच्या व्रतवैकल्याचा अभ्यास केला. लोकसाहित्यातील स्त्रीजीवन यासाठी डॅा.सरोजनी बाबर यांचे मार्गदर्शन लाभले. मुलाखती, फोटो, कॅसेट यासर्यांचा उपयोग तिने आपल्या संशोधनात करून घेतला. स्त्रियांची गाणी, खेळ, उखाणे, म्हणी इ. साऱ्या माहितीचे संकलन तिने केले.

डॉ. रेमंड क्रोव्ह यांनी डॉ.यु.म.पठाण आणि प्रा.वेलपॉल यांच्या मार्गदर्शनाखाली एकनाथांच्या भारुडाचा अभ्यास केला. नाथांच्या दिर्डींतून पंढपूरला जाण्याचा अनुभव त्यांनी घेतला.

डॉ. एरिक संण्ड यांनी स्वतः पंढरपूरची वारी केली. वारकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेऊन वारीमागचा हेतू परंपरा श्रद्धा इ. फिल्डवर्क त्यांनी केले. याचबरोबर ॲना शुल्टस् यांची महाराष्ट्राच्या कीर्तन परंपराचा अभ्यास केलेला दिसतो. डॉ.ख्रिश्चन नोवेट्स्की यांनी नामदेवाचा अभ्यास केला. उत्तरकालीनांच्या स्मरणातील नामदेव असे त्यांच्या अभ्यासाचे स्वरूप होते.

जपानमधील मराठी अभ्यासकांनी संतसहित्याचा अभ्यास केलेला दिसतो. मास्को विद्यापीठातील डॉ. इरिना ग्लुष्कोव्हायाचाही संतसहित्याची आवड आहे. संत तुकाराम यांचा अभ्यास त्यांनी डॉ. सदानंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली केला. वीस वर्षाहून अधिक काळ त्या संताच्या अभ्यासात रममाण झालेल्या आहेत. भक्ती परिषद व महाराष्ट्र कल्चर ॲण्ड सोसायटीच्या त्या एक संस्थापक सदस्य आहेत.

वरील अभ्यासकांचा विचार करताना जाणवते त्यांचा मूळ अभ्यास विषय वेगळा असून मराठीतील संतसाहित्याबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा, आपुलकी, आवड यामुळे ते याकडे वळले. आज मराठीचा अभ्यास पाश्चात्त्य देशात पीएच.डी. पदवी प्राप्त करण्यासाठी प्रामुख्याने होताना दिसतो. विविध विद्यार्थ्यांशी संपर्क साधला असता त्यांचाही ओढा संत सहित्याकडे दिसतो. पण संतसाहित्याच्या अभ्यासाला वेगळे आयाम दिलेले दिसतात. प्रत्येक विद्यापीठानुसार अभ्यासाचे प्रारूप बदलेले दिसते. विविध संपर्क माध्यमामुळे जग जवळ येत चालले आहे. विविध संस्थामार्फत विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी उपलब्ध होत आहे. असोसिएटेड कॉलेजेस ऑफ मिडवेस्ट या संस्थेमार्फत चाळीस वर्षाहून अधिक काळ विदेशी विद्यार्थ्यांना मराठीचे धडे दिले जातात. छोट्या प्रकल्पांमधुन त्यांच्या लेखन कौशल्याबरोबर संशोधनवृत्ती जोपासली जाते. तसेच पीएच.डी. साठी प्रबंधक लिहिण्याची पूर्वतयारी आपोआप यातून होत जाते. हे करत असताना या अभ्यासकांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. पण त्यातूनही निष्ठेने ते आपले काम करत आहेत. डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या शब्दात म्हणायचे झाले तर पाश्चात्त्य अभ्यासकांपासून कामाची निष्ठा, शिस्त, पद्धतशीरपणा, टापटीप, परिश्रमसिद्धता, पूर्वग्रहांपासून अलिप्तता, वस्तुनिष्ठता इ. गुण घेण्यासारखे आहेत यात शंका नाही. पाश्चात्त्य अभ्यासक मराठी भाषेची आणि साहित्याची निरलसपणे सेवा करतात हे पाहून त्यांचा विषयाचा प्रेमादर दुणावतो. (भाषा व साहित्य : संशोधन खंड २, पृ.१२८)

❀❀❀

# लोकसाहित्यविषयक संशोधन

**प्रा. डॉ. महादेव देशमुख**

लोकसाहित्याचा अभ्यास जागतिक पातळीवर आता सर्वमान्य झाला आहे. याचा अभ्यास होणेसाठी भाषाशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वविद्या, वैद्यकशास्त्र, इतिहास इत्यादी शास्त्रांनी साहाय्यच केलेले आहे. लोकसाहित्य ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून पुढे येऊ लागली आहे असे मात्र अजूनही दिसत नाही. लोकसाहित्याच्या या अभ्यासाचे महत्त्व वाढत आहे. मानवी जीवनाशी संलग्नित असलेल्या ज्ञानशाखांना साधनसामग्री पुरविणे इत्यादी बाबी ध्यानात घेता लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचा एकूणच दृष्टिकोण बदलत आहे असे दिसून येते.

मराठी लोकसाहित्याचे संकलन आणि विश्लेषण, विवेचन हे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात झालेले आढळते. मात्र हे संकलन फक्त लोकगीताचेच केलेले दिसते. म्हणून लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपाचेच असते अशी धारणा बनत गेली. हे मौखिक वाङ्मय स्वातंत्र्यानतंर संकलनचे या भूमिकेतून होत गेलेले दिसते. या संकलित साधनसामग्रीला दुर्गा भागवतांनी 'लोकवाङ्मय' आणि 'लोकसाहित्य' हे संकल्पनात्मक मराठी शब्द सुचविलेले आहेत. या साधनसामग्रीचा अभ्यास हा शास्त्रीय दृष्टीने होत असताना, महाराष्ट्रातील जुन्या लोकपरंपराचे संकलन झालेले दिसते. पण या सामग्रीचा अभ्यास तर्कसंगत आणि शास्त्रीय पद्धतीने त्याचे विश्लेषण होणे अपेक्षित होते, एवढेच नव्हे तर लोकसाहित्यविषयक सैद्धांतिक मांडणीही अगदी अल्पप्रमाणात झालेली आहे. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

मराठी लोकसाहित्यामध्ये सुरवातीला लोकगीतांचेच संकलन झाले हे पाहिले आहे. ही लोकगीते प्राधान्याने स्त्रीगीतेच होती. स्त्रीगीतांच्या माध्यमातूनच लोकगीताचे वाङ्मयीन स्वरूपाचे विवेचन अधिक प्रमाणात झालेले पाहावयास मिळते. कमलाबाई देशपांडे, डॉ.ना.गो. नांदापूरकर, डॉ. सरोजिनी बाबर या अभ्यासकांनी आस्वादात्मक पद्धतीनेच त्याचे स्वरूप पाहिलेले दिसून येते. लोकसाहित्याच्या साधनसामग्रीतील लोकगीतांच्या आधारे विश्लेषण झालेले आहे. त्याआधारे एक शास्त्रीय पद्धतीने विचार आणि सैद्धांतिक मांडणी करण्यासाठी त्याचा उपयोग झालेला दिसतो. हे सत्य आपणाला नाकारता येणार नाही कारण लोकसाहित्याचा अभ्यास करताना ज्या

अनावश्यक बाबी घडल्या. त्याच पुढे संशोधन करतानाही घडलेल्या दिसतात. हे सर्व धोके ध्यानात घेऊन, संशोधनाची दिशा स्पष्ट होण्यासाठी विविध घटकांचे काटेकोर आणि सूक्ष्मपणे काम होणे गरजेचे वाटते आहे.

**लोकसाहित्याचे संशोधन :**

१९६० नंतर मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी संशोधनात्मक दृष्टीने जे लोकांमध्ये गैरसमज होते. ते दूर करण्यासाठी इतर विद्याशाखांचा अभ्यास करून त्याची सैद्धांतिक लेखन करणे हे त्यांच्यापुढे आव्हानच होतेत्र या सगळ्या गोष्टींचा परिणाम असा झाला की, लोकसाहित्याच्या संशोधनाला शास्त्रीय बैठक भक्कमपणे साथ देणारी ठरली. एवढच नव्हे तर संशोधनाची व्यापक कक्षाही सीमित राहिली नाही. म्हणूनच या भूमिकेतून डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, डॉ. सुदाम जाधव, डॉ. शिवाजीराव चव्हाण, डॉ. शरद व्यवहारे, डॉ. धोंडिराम वाडकर, डॉ. साहेब खंदारे, डॉ. प्रकाश खांडगे यांची संशोधनात्मक लेखनाची कामगिरी सरस ठरली आहे.

लोकवाङ्मयाचे संकलन करताना लोकांना प्रत्यक्ष भेटावे लागते. ते लोक अशिक्षित, निरक्षर आणि शहरी संस्कृतीपासून कोसो दूर असतात. एकूणच त्यांच्याशी संवाद साधण्यात खूप अडचणी येतात. लोकवाङ्मय हे मौखिक असल्याने संकलनात परिस्थितीनुसार बऱ्याच प्रमाणात अडचणींना सामोरे जावे लागते. विधिगीतांचे संकलन करताना प्रत्यक्ष साधनसामग्रीसहित हजर रहावे लागते. विधी हा मुहुर्तप्रसंगीच ठरविलेला असतो. तो विधी सादर करणारे उत्स्फूर्तपणे सादर करतात. (उदा. लग्नविधी, बारसे, डोहाळे इत्यादी). लोकसाहित्याच्या संकलनासाठी प्राथमिक तयारी पूर्वीच करावी लागते. त्याशिवाय संकलन व्यवस्थित होऊ  शकत नाही. लोकसाहित्याच्या विविध घटकांचे संकलन करताना काही बाबी निश्चित करणे गरजेचे असते. (लोकगीत, लोककथा, लोककथागीते, लोकनाट्य, म्हणी व वाकप्रचार, उखाणे, आहाणे, प्रहेलिका, कोडी, कुटे इत्यादी). संकलनाच्या प्राथमिक अशा पूर्वतयारीत संकलनाचा आराखडा तयार करण्यालाही खूप महत्त्व आहे. हे संकलन करताना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व वाडमयीन बाबींचा विचार करावा लागतो. सदरहू संकलन प्रामुख्याने क्षेत्रीय पद्धती, आणि स्तरीय पद्धतीने करावे लागते.

**लोकसाहित्याच्या संशोधन पद्धती :**

लोकवाङ्मयाचे संकलन क्षेत्रीय पद्धतीचा अवलंब करून करणे हेच अधिक सोयीस्कर आहे. कारण यामध्ये विशिष्ट क्षेत्राचीच संकलनासाठी निवड

करावी लागते. उदा. मराठवाड्यातील लोकवाङ्मय, खानदेशातील लोकवाङ्मय, खडीगंमत इत्यादी संकलन करताना विशिष्ट क्षेत्राची निवड करावी लागते. त्यामुळे तेथील क्षेत्राचे लोकजीवन, भौगोलिकता इत्यादी वैशिष्ट्ये पाहण्यासाठी उपयोग होतो. तर स्तरीय पद्धतीमुळे लोकसमूहाचा स्तर आणि त्यांच्या लोकवाङ्मयातील अंतर्गत घटकाचे विशेष पाहता येतात. उदा. ठाकर आदिवासींचे लोकसाहित्य या सर्व समाज घटकांतील लोकसाहित्याची वैशिष्ट्ये पाहता येतात.

लोकसाहित्याचे संकलन हे विधी, क्रियांशी निगडित असते. यातील सर्व क्रिया घडत असतानाच त्या संकलित करणे गरजेचे असते. कारण त्या विधी व क्रिया त्या त्या घटनाशी संबंधित असतात. जसे गोंधळ, जागरण, भराड इत्यादी विधिनाट्य संकलित करावे लागतात. तर सण- उत्सव,जत्रा यात्रा किंवा कौटुंबिक आणि सार्वजनिक स्वरूपाचा विधी त्या त्या वेळेतच संकलित करणे आवश्यक असतात. कारण त्यांचे स्वरूप आणि विशेष दिसून येतात. थोडक्यात त्या त्या लोकसमूहात प्रचलित असलेल्या रूढी, परंपरा, प्रथा, आचार, विचार, लोकविश्वास, लोकश्रद्धा किंबहुना त्यानिमित्ताने विधी विधाने यांचेही संकलन करणे आवश्यक आहेत.

**संशोधकाची पूर्वतयारी :**

लोकसाहित्याचे संकलन करण्यासाठी आधुनिक उपकरणे वापरली जातात. जसे ध्वनिमुद्रक, व्हिडिओ कॅमेरा याच्या साहाय्याने त्या त्या कलाप्रकारांचे जसेच्या तसे आविष्करण नेमकेपणाने टिपता येते. पण कधी कधी लोकांकडून लोकसाहित्याचे करताना खूप जिकरीचे प्रयत्न करावे लागतात. ते लोक शहरापासून दूर, ग्रामीण भागात, दऱ्या-खोऱ्यातून किंवा डोंगराळ कपारीमधून, माळरानावर राहणारे असतात. त्याच्यापर्यंत पोहचणेच महाकठीण असते. अलीकडे दळणवळणाची साधने उपलब्ध असल्याने सुकर झाले आहे. पण त्या त्या कलावंतांची मनोअवस्था महत्त्वाची असते. कधी रिकाम्या हाती परतावे लागते. पुरुष कलावंताच्या बाबतीत पाठपुरावा केल्याने फरक पडतो. परंतु स्त्री कलावंतांच्यामुळे अनेक अडचणी येतात. स्त्री मुळात लाजणारी, संकोचणारी, आपल्याकडील लोकसाहित्याचा अमोल ठेवा देतीलच अशी खात्री नाही. उपलब्ध साहित्य मौखिक किंवा लिखित अशा स्वरूपाचे असते. पण त्यामध्ये भाषेची अडचण येते. प्रत्यक्ष ऐकले असेल तर उच्चारणांवरून समजते. व्हिडिओ कॅमेरा, ध्वनिमुद्रकांमुळे तर अधिकच अडचण येते. हे सर्व साहित्याचे विश्लेषण करताना भाषेचा अडसर येतो. यावर मात म्हणून सीमावर्ती भागातील साहित्य विविध भाषेत असते, ती भाषा समजून

घेणे महत्तप्रयासाचे असते. कारण मराठी लोकसाहित्य आणि द्राविडीयन भाषेतील लोकसाहित्य यामध्ये खूपच साम्य आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेतील अनुबंध सारखेच आहेत. याचा शोध घेणे क्रमप्राप्तच आहे.

**लोकसाहित्य आणि आंतर्विद्याशाखांचे संशोधन :**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचे संकलन होऊन बराचसा अभ्यास झाला आहे. हे आता त्याच्या विविध ज्ञानशाखांच्या व्याप्तीवरून ध्यानात आलेच आहे. या विस्तृत ज्ञानाशाखाविषयी तारा भवाळकर लिहितात, 'कोणत्याही संस्कृतीचा सर्वांगीण अभ्यास लोकजीवनातील लोकपरंपरेतील सर्व शब्द साहित्य (उदा. कथा गाथा, गीते, म्हणी, उखाणे इत्यादी) तसेच सर्व प्रकारच्या धर्मश्रद्धा, विधि विधाने, समजुती चालीरीती, रूढी, लोकभ्रम, अन्न, वस्त्र आणि दैनंदिन जीवनातील परंपरेने आलेल्या सर्व कला, कारागिरी, वस्तू या सर्व घटकांचा समावेश होतो. या सर्वांचा समग्रपणे अभ्यास करण्यासाठी इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, दैवतकथाशास्त्र या सर्व शास्त्राचा प्रसंगपरत्वे उपयोग केल्याखेरीज याचा अभ्यास परिपूर्ण होऊ शकत नाही.'[१] विविध आतंरविद्याशाखांचा अभ्यास म्हणजेच लोकसाहित्याचा समग्रपणे विशलेषण करून शोध घेणे अस आहे. यामधूनच इतर विद्याशाखा वजा करता येत नाही. कारण त्या शाखामधूनच लोकसाहित्यातील विविध संदर्भ मिळतात. हे निश्चितपणे सांगता येते, या आंतरविद्याशाखाच्या अभ्यासामध्ये पुष्कळ प्रमाणात विशेष आढळतात. यासंदर्भात डॉ. प्रकाश मेदककर म्हणतात, 'लोकसाहित्याचे आंतरविद्याशाखीय संशोधनाचे महत्त्व प्रस्थापित झाल्यामुळे लोकसाहित्याला स्वतंत्र ज्ञानशाखा व समन्वित ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.'[२] याचाच अर्थ असा आहे की, लोकसाहित्याला ज्ञानशाखा म्हणून मान्यता मिळाली आहे. या क्षेत्रामध्ये आंरतविद्याशाखांचे संशोधनाची व्याप्ती वाढली आहे. लोकसाहित्याच्या संकलनातील महत्त्व विशद करताना ज्या विविध ज्ञानशाखा आहेत त्याच्यातील एक प्रोत्साहन मिळते. यासंदर्भात डॉ. विद्या व्यवहारे म्हणतात, 'लोकवाङ्मयाच्या संहिता संपादनात भाषिक विशेष संदर्भाची नोंद लोकवाङ्मयाच्या शास्त्रीय अभ्यासाला, संशोधनाला एक नवी दिशा देणारी असते आणि याचमुळे लोकवाङमयाचा अभ्यास विविध अंगांनी करता येऊ शकतो'.[३] या विविध घटकांच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेता त्यातील सांस्कृतिक, सामाजिक संदर्भाचा शोध घेता येतो ही वस्तुस्थिती आहे.

**लोकसाहित्यातील लोकजीवन :**

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे भिन्न असे दृष्टिकोण असले तरी त्याच्यातील संदर्भ जवळपास सारखेच आहेत. कारण लोकसाहित्य हे संस्कृती वाहक असते. त्यामुळे जीवन संदर्भात साम्य आहेच. लोकसाहित्याचे संशोधनाची तत्कालीन युगधर्माचे चित्र आपणांस दिसते. म्हणजेच लोकसाहित्य अभ्यासण्यासाठी ज्या अभ्यासपद्धती वापरलेल्या असतात. त्याचा हेतू मानत असले तरी त्यामध्ये फरक जाणवतोच. यासंदर्भात डॉ. गंगाधर मोरजे यांचे प्रतिपादन ध्यानात घेऊ, 'रशियनांच्या मते त्यातून तो युगधर्म डोळ्यासमोर आला पाहिजे. तसे झाले नाही, तर कल्पनारम्य अभ्यासपद्धती वापरून लोकसाहित्य संशोधन अभ्यास करणे रशियन अभ्यासकांना मान्य नाही. त्यांच्या दृष्टीने तत्कालीन युगधर्म आणि प्रदेशाधिष्ठित लोकसाहित्याचे संशोधन करणे, गरजेचे ठरते.'[४] यावरून आपल्या लक्षात येईल की युगधर्म तपासणे त्याच्यातील नेमकेपणाचा शोध घेणे हेच गरजेचे वाटते. कल्पनारम्य कथांचाही शोध घ्यावा लागतो. त्यातून जे संदर्भ मिळतात ते लोकजीवन समृद्ध करण्यासाठी येतात असे स्पष्टपणे दिसते.

लोकसाहित्याचे संशोधन करताना अनेक गोष्टींचेही भान ठेवावे लागते. त्यामध्ये आदिम काळापासून परंपरेने चालत आलेल्या गोष्टींचे संकलन व वर्गीकरण करताना लोकमानसात रुजलेल्या विविध बाबींचाही तपशीलाने शोध घ्यावा लागतो. यामध्ये लोकगीते, उखाणे, म्हणी यांच्या माध्यमातून भावना, विचार आणि जीवन अनुभवाचे घटक नवे संदर्भ घेऊन येतात. त्यामुळेच लोकजीवनाला जगण्यासाठी एक नवी दिशा प्राप्त होताना दिसते. म्हणजेच लोकसाहित्य हे बदलत्या लोकजीवनचा आरसा म्हटले आहे ते संयुक्तिकच आहे.

लोकसाहित्य हे व्यक्तिनिर्मिती असले तरी ती समूहमनाशी एकरूप झाली आहे. त्याचा आविष्कारही शब्दातूनच होतो असे नाही तर रूढी, परंपरा, लोकविश्वास, लोकाचार, लोकभ्रम इत्यादी शब्देतरातूनही होतो. म्हणून आपणास कथा, गीते, म्हणी, उखाणे, कोडी, कुटे, लोकप्रचलित मंत्र, शब्दबद्ध साहित्यात समावेश करता येईल आणि शब्दतेतर मध्ये लाकप्रचित धर्मविधी, श्रद्धा, देवदेवता, रूढी, चालीरीती, धारणा, व्रतवैकल्ये आणि उपासना तसेच सर्व कलाकारागिरी, क्रीडा, वैद्यक, अन्न, वस्त्र इत्यादी वस्तूंचा अंतर्भाव केला जातो. या सर्व बाबीचा विश्लेषण करता येते.

लोकविश्वास आणि लोकसमजुती या दोनही गोष्टी समाजमानावर प्रभाव गाजवित आल्या आहेत. त्याचा अजूनही प्रभाव जाणवतोच. यामध्ये लोकमानसाचे आकलन होते. याबाबत दिनकर कुलकर्णीचे मन पुढील प्रमाणे, 'एका विसाव्या शतकातील आजचा माणूस यातून मुक्त झाला आहे असे म्हणता येत नाही. असे असते तर लोक अंगारे धुपारे, बुवा, नवस, सायास, भूमीपूजन यांच्या मागे लागले नसते.'[५] लोकविश्वासावर लोकांचा भक्कम असा विश्वास आहे. अशा गोष्टींमधून त्यांचे मानसिक समाधान होताना दिसते. काहीअंशी लोकरूढी म्हणून बाबींचा सहजगत्या वापर होतो हेही दिसून येते. यासंदर्भात आपणाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार' या लेखाचा आधार घेता येईल हे लोकसाहित्य जतन केले पाहिजे त्यामधील सांस्कृतिक संदर्भ पाहून त्याचा लोकोपयोग कसा झाला आहे. याचा शोध घेताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'लावणी आणि गाऱ्हाणे ही कमी प्रतीची असे जरी मानले तर लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीने अशा प्रकारच्या वाङ्मय प्रकाराला कमी मानता येणार नाही.'[६] जुन्या वाङ्मयाचे अत्यंत निष्ठेने जपणूक व्हायला पाहिजे आणि तो आपला संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे हा विचार मांडला आहे.

**संदर्भ**


१. तारा भवाळकर : लोकसंचित पुणे - १९८९ पृ. ३८
२. प्रकाश मेदककर : साहित्य विचार : प्रदेश आणि परिसर पुणे-१९८९ पृ. ९१
३. विद्या व्यवहारे : लोकपरंपरा लोकधाटी, औरंगाबाद - २००२ पृ. १६९
४. गंगाधर मोरजे : लोकवाङ्मयशास्त्र पुणे - २००३ पृ. ८०
५. दिनकर कुलकर्णी : लोकपरंपरा, लोकधाटी औरंगाबाद - २००२ पृ. ९१
६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : 'जनता' ऑगस्ट १९५२ चा लेख (जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार)

# मराठी लोकसाहित्याच्या संशोधनाची परंपरा

डॉ.लक्ष्मीकांत येळवंडे

'संशोधन' या शब्दाचा विचार केल्यास 'सं+शुध्' म्हणजे संपूर्णपणे सर्वांगाने शुद्ध करणे, दोष काढून टाकून चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध, निर्मळ करणे असा मुलार्थ आहे.[१] अलीकडे मात्र संशोधनाचा अर्थ शोध घेणे, नव्याने शोधणे, नवे उपलब्ध करून देणे या दृष्टीने प्रचलित झाला आहे. लोकसाहित्यात तर मोठ्या प्रमाणावर विविध समूहजीवनाचे परंपरागत संदर्भ संशोधन म्हणून विचारात घेतले जातात. खरे तर सभोवती हजारो वर्षांच्या परंपरेपासून प्रचलित असणारे लोकजीवन हे अस्तित्वात असतेच मात्र आधुनिक जीवनपद्धतीत या सर्वांपासून आपण अलिप्त असल्याने या घटकांचा विचार संशोधन म्हणून आपण करतो. अर्थात परंपरेतील वैविध्यामुळे भारतात तर मोठ्या प्रमाणावर समूह व त्यांचे जग उजेडात आलेले नाही. आदिवासी, भटके-विमुक्त यांच्याही कित्येक परंपरा आजही दुर्लक्षित आहेत हे नाकारता येत नाही. या सर्व पार्श्वभूमीवर मराठी लोकसाहित्याच्या संशोधनाची परंपरा विचारात घेणे क्रमप्राप्त आहे.

मराठी भाषेत लोकसाहित्याचा अभ्यास / संशोधन सुरू होण्यास जवळ जवळ विसावे शतक उजाडले. सुरुवातीला मेरी फिअर यांनी लिहिलेल्या 'ओल्ड डेक्कन डेज' (१९५८) या पुस्तकाच्या लेखनानंतर मराठीतील लोकसाहित्याच्या संकलनाला प्रारंभ झाला.[२] व लोकसाहित्य अभ्यासाची पायाभरणी झाली. त्यानंतर संज्ञा, स्वरूप, संकल्पना या अनुषंगाने लोकसाहित्याचा विचार अनेकांनी मांडला. त्यामुळे येथे त्याचा उहापोह न करता जे संशोधनाचे संदर्भ सापडतात त्यातच विचार करणे महत्त्वाचे ठरेल. प्रारंभीच स.का. छत्रे यांनी केलेले इसापकथांचे भाषांतर, राजाराम शास्त्री भागवतांनी 'गोंडी भाषा व गीते' हा लोकगीतांवर लिहिलेला चर्चात्मक लेख १८७७ साली प्रसिद्ध झाले. लोकसाहित्यावरील समाजशास्त्रीय दृष्टिकोण स्वतंत्रपणे या लेखाच्या रूपाने मांडला गेला. कमी-अधिक प्रमाणात जुनी गाणी, लग्नगीते, धार्मिकता, रूढी अशा विषयाच्या संबंधाने विष्णुशास्त्री चिपळूणकर, म. मा. कुंटे आणि का. वा. लेले यांनी आपले लेखन सुरुवातीच्या काळात प्रसिद्ध केले.

१९१५ पासून लोकसाहित्याच्या संकलन संशोधनाचे कार्य अधिक गतिमान झाले. राजवाडे यांनी लोकसंस्कृती विषयक अभ्यासाची पायाभरणी केली. खऱ्या अर्थाने इथून पुढे लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झाला. चिकित्सक विचार करून लोकगीत, लोककथा हे पारिभाषिक शब्द राजवाडे यांनी रूढ केले. त्यांनी अंगीकारलेल्या बुद्धिनिष्ठ प्रणालीनुसार लोकसंस्कृती विषयासंबंधी त्यांचे मत प्रतिकूल असले तरीही सांस्कृतिक अभ्यासाच्या दृष्टीने त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. मंत्र, तंत्र, जादू-तोडगे, पिशाच्च-भूत, प्रेताविषयी समज, अंगात येणे, तांत्रिक चित्रकला, मंत्रभाषा, मंत्रगान, तोडग्याची सरळ व वक्ररेषाकृती, यंत्रे, स्वस्तिक वगैरे, डौर कुडमुडे ही वाद्ये, कळसूत्र, लोकदेवतांचे पूजोपचार, पूजासाधने अशा अनेक घटकांचा विचार त्यांनी प्रथमच केला. आदिधर्म, लोकधर्म यातून उत्क्रांत झालेला उच्चधर्म यांच्यातील अनुबंध राजवाडे यांनी प्रथमच स्पष्ट केला. त्याबरोबरच विविध देवतांची नावे, गावांची नावे यांचाही अभ्यास त्यावेळी राजवाडे यांनी केला. ''डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीही सामाजिक दृष्टिकोणातून संस्कृतीचा अभ्यास केला. मानवसमूहांच्या चालीरीती, कला यांचा त्यांनी केलेला अभ्यास लोकसाहित्यास पूरक ठरणारा आहे.''[३] एकूणच या काळात परंपरागत संकल्पनांचा व संस्थांचा विचार राजवाडे यांनी केला तर सामाजिक दृष्टिकोनातून संस्कृतीच्या अभ्यासासंबंधीची भूमिका डॉ. केतकर यांनी मांडली.

पुढे ना. गो. चाफेकर यांनी 'आमचा गाव' हे पुस्तक लिहिले. लोकतत्त्वीय अभ्यासाचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या लेखनाकडे पाहता येते. विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या परंपरा, रूढी, कला व धार्मिकता डोळ्यासमोर ठेवून हे विश्लेषण त्यांनी केले. प्रारंभीच्या संज्ञा-संकल्पनांच्या अन्वयार्थापेक्षा ही संशोधनाची भूमिका वेगळी होती. अशाच प्रकारे विशिष्ट जातीचा लोकतत्त्वीय अभ्यास करण्याच्या दृष्टीनेही त्यांनी या काळात लेखन केले. त्यांच्या प्रमाणेच कोशकार शं. ग. दाते व चि. ग. कर्वे यांनीही विविध कोशांना लिहिलेल्या प्रस्तावना पाहिल्या तर त्यातूनही लोकतत्त्वीय भूमिकेतून भाषाविषयक अभ्यासाची भूमिका समोर ठेवली आहे. भाषेचा व लोकसाहित्याचा निकटचा संबंध कल्पून भाषिक अंगाने लोकसाहित्याचा विचार आपल्याकडे झाला. यामध्ये मराठवाड्यातील लोकसाहित्याचे अभ्यासक ना. गो. नांदापूरकर यांनी हैद्राबाद सारख्या अमराठी प्रदेशात राहूनही तेथील मराठी भाषिकांच्या जवळील लोककथा-लोकगीतांचे संकलन केले व त्यासंबंधीचे विश्लेषणही केले.[४] अशाच पद्धतीने लोकसाहित्याचे

संकलन करण्यासाठी आयुष्यभर परिश्रम घेऊन अनेक ग्रंथांचे संकलन संपादन करण्याचे काम डॉ. सरोजिनी बाबर यांनी केले.

लोकसाहित्य अभ्यासाची साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर संकलित झाली. त्यानंतर शास्त्रीय दृष्टिकोणातून लोकसाहित्याच्या स्वरूपासंबंधीची मांडणी करून त्याच्या सैद्धांतिक अभ्यासाची सुरुवात दुर्गाबाई भागवत यांनी केली. 'लोकसाहित्याची रूपरेखा आणि लोकसाहित्यासंबंधी त्यांनी केलेले लेखन यांच्यामागे मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांची भक्कम बैठक आहे.[५] या १९५६ साली लिहिलेल्या ग्रंथात जगातील लोकसाहित्याच्या अभ्यासपरंपरा व संप्रदाय यांचा परामर्श त्यांनी घेतला. शिवाय भारतीय लोकपरंपरांचे स्वरूप व विशेष यांची सर्वांगीण चर्चा करून लोकसाहित्याची संकल्पना त्यांनी विशद केली. लोकसाहित्याची रचनात्मक मांडणी करणारा हा पहिलाच ग्रंथ होता. त्यांनी लोकसाहित्याचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून विचारात घेतला. धर्म, प्रतीके यामध्येही सामाजिकतेचे प्रतिबिंब पडलेले असतेच या अनुषंगाने त्यांनी हा अभ्यास पुढे नेला. त्यांची भूमिका समोर ठेवूनच लोकसाहित्याची सैद्धांतिक मांडणी करण्याचे काम ज्येष्ठ अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी केले. पाश्चात्त्य अभ्यासपद्धतींचा परिचय करून देण्याबरोबरच 'भटक्या-विमुक्तांच्या जीवनपद्धतीतील पारंपरिक घडामोडी, लोकभाषेतील सांकेतिक भाषारूपे, लोककलाविष्कार असे विविध संदर्भ त्यांनी आपल्या संशोधनात मांडले. डॉ. मांडे यांच्यानंतर डॉ. गंगाधर मोरजे यांनीही सैद्धांतिक स्वरूपात लोकसाहित्य या विषयाला समोर आणण्याच्या हेतूने मोठे परिश्रम घेतले. प्रयोगात्मक कला या दृष्टीने लोकसाहित्याचा विचार करून त्याची आस्वादक समीक्षा व सादरीकरणासंबंधी विवेचन केले.

साहित्यशास्त्राप्रमाणेच लोकसाहित्याचाही शास्त्रीय विचार करणे शक्य असल्याचे मत त्यांनी नोंदविले. त्यासाठी लोकवाङ्मयशास्त्र हे महत्त्वाचे पुस्तकही त्यांनी लिहिले. त्यांची ही भूमिका लोकसाहित्य हे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र म्हणून कसे समर्थ आहे हे सांगण्याचीच आहे. एकूणच आस्वाद समीक्षेच्या दृष्टीने लोकसाहित्याचे विश्लेषण त्यांनी केले. त्यानंतर लोकतत्त्वीय दृष्टिकोण समोर ठेवून लोकसाहित्याचा अभ्यास मधुकर वाकोडे यांनी केला. विविध लोककथांचा अभ्यास करून व साहित्यकृतींचे संबंध तपासून त्यातील लोकतत्त्वे त्यांनी मांडली. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती या संबंधी लोकतत्त्वीय समीक्षा रूढ करणे हे त्यांच्या संशोधनाचे वैशिष्ट्य आहे.

लोकपरंपरेच्या अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करण्याबरोबरच लोकदैवते व देवताविषयक अभ्यासाची एक नवी परंपरा निर्माण करून सांस्कृतिक इतिहासातील सामाजिक परंपरांचे आकलन करून देण्याचे काम ज्येष्ठ अभ्यासक रा. चिं. ढेरे यांनी केले. चिकित्सक लेखन पद्धतीमुळे त्यांचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण ठरले आहे. लोकपुराणे, लोकव्युत्पत्ती, लोककथा, लोकगीते, लोकनाट्य, शिव्या, व्यक्तिनामे, स्थलनामे यांचा आढावा घेऊन लोकतत्त्वीय अध्ययनाच्या दृष्टीने सांस्कृतिक परंपरा आपल्या समोर स्पष्ट करणे, हे या लेखनाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यांच्यासमवेत 'महामाया' हा ग्रंथ लिहिणाऱ्या डॉ. तारा भवाळकर यांचेही लोकसाहित्याच्या संशोधनात महत्त्वाचे स्थान आहे. लोकसाहित्यातील स्त्रीप्रतिमा व लोकनागर रंगभूमी हे महत्त्वाचे ग्रंथ त्यांनी लिहिले.

लोकसाहित्यातील शब्द आविष्कार म्हणजेच लोकवाङ्मयासंबंधीचे संशोधन डॉ. शरद व्यवहारे यांनी केले. लोकवाङ्मायाच्या स्वरूपाचा विचार करताना लोकनाट्य, म्हणी, उखाणे, कथा, गीते यांचे स्वरूपही त्यांनी स्पष्ट केले आहे. त्याबरोबरच द्रविड, आर्य, निशाद, कुराण अशा विविध सांस्कृतिक प्रवाहात दैवतविषयक संकल्पना व लोकविश्वास यांचे स्वरूप लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह या ग्रंथातून त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या समकालीन अभ्यासकात डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. डॉ. शिंदे यांनी लोकसाहित्याचा अभ्यास संस्कृती, साहित्य व मानवी जीवनमूल्यांसाठी उपयुक्त कसा आहे या संदर्भात आपली भूमिका मांडली आहे. त्याबरोबरच लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशाही सूचित केल्या आहेत. डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी लोकजीवनात परंपरेने चालत आलेल्या धर्मश्रद्धा आणि लोकसाहित्य यांचा अन्वयार्थ स्पष्ट करण्याबरोबरच डांगाण परिसरातील आदिवासींच्या धर्मश्रद्धांचा, पारंपरिक लोकाविष्कारांशी असलेला अनुबंध स्पष्ट केलेला आहे. त्यांनी लोकसाहित्याच्या चिरंतनत्वाची चर्चा आणि या अनुषंगाने केलेली परिवर्तनाची मीमांसा महत्त्वाची आहे.

डॉ. धोंडिराम वाडकर यांनी गोल्ला या आदिवासी जमातीचे लोकजीवन व लोकवाङ्मयासंबंधी संशोधन केले असून विविध विधिनाट्यांच्या स्वरूपासंबंधीची चिकित्सा केली आहे. सुरुवातीपासूनच लोकसाहित्य या अभ्यासक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संकलन झाले. नवे उपलब्ध होणे या दृष्टीने विचार केला तर त्यांना संशोधन समजता येईल. अशी संकलकांची अनेक नावे सांगता येतील. मात्र ज्यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाची चिकित्सा केली व संशोधकीय भूमिका घेतली त्यांचा परामर्श वर घेतलाच आहे. पुरुषोत्तम

कालभूत, कृ. पा. कुलकर्णी, तारा परांजपे अशी अनेक नावे यात महत्त्वाची आहेत. नंतरच्या पिढीतील अभ्यासकांच्या संशोधनाचा विचार करता महाराष्ट्रातील आदिवासी जमाती व त्यांचे लोकसाहित्य या संदर्भात डॉ.माहेश्वरी गावीत यांनी विशेष संशोधन केले आहे. तर भटक्या-विमुक्तांच्या लोकपरंपरांचा अभ्यास करण्याबरोबरच पारंपरिक भेदिक रचनेसंदर्भात डॉ. महादेव देशमुख यांनी केलेले संशोधन महत्त्वपूर्ण आहे. विद्यापीठीय पातळीवर भाषिक अभ्यासात लोकसाहित्याचा समावेश झाल्यानंतर लोकसाहित्याच्या संशोधनात झपाट्याने वाढ झाली. परंतु मोठ्या प्रमाणावर हा अभ्यास विशिष्ट जाती-जमातींचे लोकजीवन व लोकवाङ्मय यापुरताच मर्यादित राहिला. लोकसाहित्य हे व्यापक असून आजही विविध दुर्लक्षित जातिसमूह, विशिष्ट समूहात परंपरेने प्रवाही असणारे विधी, देशोदेशीच्या लोकवाङ्मयाचा तौलनिक अभ्यास, संज्ञापन साधने व लोकवाङ्मय यांचा अनुबंध, जागतिकीकरण व पारंपरिक लोकजीवन, प्राचीन लोकवैद्यक, पारंपरिक व्यवसाय प्रविष्ट कला असे विविध विषय लोकसाहित्याच्या संशोधनाची व्याप्ती वाढविणारे ठरू शकतात. या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे. जागतिक पातळीवरील लोकसाहित्यविषयक संशोधनाचा विचार केल्यास अनेक देशांमध्ये कार्यरत असणाऱ्या लोकसाहित्य मंडळाद्वारे परंपरागत दुर्लक्षित संकल्पनांचा पुनर्विचार होताना दिसत आहे. बदलत्या काळानुसार वाढलेले प्रसारमाध्यमांचे प्रस्थ विचारात घेता त्यातील प्रत्यक्ष सादरीकरणाच्या कार्यक्रमांवर दिला जाणारा भर व त्यातून होणारा सादरकर्ता आणि प्रेक्षक यांच्यातील संवाद ही बाब पूर्वीच्या प्रत्यक्ष सादरीकरणाचेच पुढचे रूप आहे का या दृष्टीनेही मागोवा घेणे आवश्यक वाटते. एकूणच मराठी लोकसाहित्याच्या संशोधन परंपरेमध्ये गेल्या शंभर वर्षात विविध संकल्पना मांडल्या गेल्या व परंपरांच्या अभ्यासाबरोबरच वर्तमानाशी त्याचे असणारे अनुबंध स्पष्ट करण्याचेही प्रयत्न झाले, होत आहेत हे सहजतेने लक्षात येते.

**संदर्भ :**

१) जोशी वसंत : भाषा व साहित्य संशोधन खंड पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, आवसी दुसरी सप्टेंबर २००६, पृ.२५

२) मांडे प्रभाकर : लोकसाहित्याचे स्वरूप, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती चौथी डिसेंबर २०००, पृ.१४८

३) शिंदे विश्वनाथ : लोकसाहित्य मीमांसा, भाग-१, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, आर्वृत्ती पहिली १९९८, पृ. २३

४) तत्रैव, पृ.२१

५) उनि.मांडे प्रभाकर, पृ.१५५

# लोकसाहित्य संशोधन : नव्या दिशा

प्रा. नवनाथ शिंदे

मानव्यविद्या, साहित्य, कला आणि विज्ञान या ज्ञानक्षेत्रांचा सूक्ष्म, विशेष आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास ही काळाची गरज झालेली आहे. तद्वतच अशा या काळात वैज्ञानिक दृष्टीला सार्वत्रिक मान्यता मिळत असून त्याच्या अपरिहार्यतेतून संशोधनाची क्षितिजे अधिकाधिक विस्तारित होत आहेत. परंतु कला आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात तसेच काही प्रमाणात मानव्यविद्याखांमध्ये वैज्ञानिकतेऐवजी पारंपरिक विचारांचाच अवलंब केला जात असल्यामुळे तत्त्वहीन, अवास्तव, अशास्त्रीयतेमुळे वर्तमानाशी संवाद होणे दुरापास्त झाले आहे. तर दुसरीकडे तत्त्वांपेक्षा व्यवहारिकतेला महत्त्व येऊन मानव्यविद्या, कला आणि वाङ्मयाच्या अभ्यासापेक्षा व्यावसायिक विद्याशाखांकडे विद्यार्थी अधिकांशाने आकर्षित होत आहे. व्यावसायिक ज्ञानामुळे आपल्या गरजांची पूर्तता होते आणि मानव्याविद्या, कला आणि वाङ्मयाचे ज्ञान जीवन जगण्यासाठी उपयोगी नाहीत हा वृद्धिंगत होणारा दृष्टिकोण चिंतनीय आहे. वस्तुत: मानव्यविद्या, कला आणि वाङ्.मय हे मानवी जीवनाला तात्त्विक अधिष्ठान देणाऱ्या ज्ञानशाखा आहेत. तत्त्वहीन जीवन पशुवत वर्तनाची नांदी ठरू शकते, वैश्विक स्तरावर वाढत असलेली हिंसक प्रवृत्ती अनुभवली की या ज्ञानशाखांच्या अभ्यासाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे अशा बदलत्या काळात अभ्यासक, संशोधकांनी पारंपरिकते ऐवजी वैज्ञानिक अथवा शास्त्रीय दृष्टिकोण स्वीकारणे या ज्ञानशाखांची अपरिहार्यता वृद्धिंगत होऊ शकते. मानवी स्वास्थ्यासाठी तरी ही दृष्टी गरजेची वाटते.

मध्ययुगीन काळात मराठी साहित्याचा उदय झालेला असला तरी साहित्य संशोधनाचा दृष्टिकोण आधुनिक काळात म्हणजे इंग्रजी अमदानीत स्वीकारला गेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात विद्यापीठांची संख्या वाढत गेली तसे साहित्य संशोधनाचे क्षेत्रही विस्तारत गेले. मात्र या विस्ताराच्या तुलनेत संशोधनाचे सिद्धांतन करणाऱ्या ग्रंथांची संख्या अत्यंत मर्यादित असल्याचे दिसून येते. त्यामध्ये सं. ग. मालशे यांचे 'शोधनिबंधाची लेखन पद्धती' दु.का. संत यांचे 'संशोधन: पद्धती, प्रक्रिया, अंतरंग',

जोशी/जोगळेकर संपादित 'भाषा : साहित्य आणि संशोधना'चे तीन खंड, वा.सि. बेंद्रे यांचे 'साधन चिकित्सा' आदी ग्रंथांचा निर्देश करता येईल.

**१. संशोधन सिद्धांतन व प्रक्रिया :**

संशोधन प्रक्रियेची चिकित्सा करणाऱ्या उपरोक्त ग्रंथकारांनी इंग्रजी आणि हिंदीतील ग्रंथसाधनाच्या आधारे आपली भूमिका मांडलेली आहे. डॉ. व दि. कुलकर्णी[१] यांनी संशोधन संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की, 'Research' (Re-search) हा शब्द 're-cerchier' या संशोधन धातूपासून आला असून त्याचा अर्थ 'to search or sake again' म्हणजे पुन्हा पाहणे, आणखी शोधणे असा आहे. ह्या भूमिकेशी समांतर भूमिका वसंत जोशी,[२] दु. का. संत[३] आणि अन्य अभ्यासकांनी मान्य केली आहे. तसेच इंग्रजीतील 'Research' या शब्दाला पर्याय म्हणून 'संशोधन' हा शब्द परिपूर्ण असल्याच्या सर्वांची भूमिका असून तीच मराठीमध्ये रूढ असल्याचे दिसून येते. डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी संशोधन शब्दाची व्युत्पत्ती मांडताना हाच दृष्टिकोन स्वीकारलेला आहे. त्यांनी "सं+शुध् म्हणजे संपूर्ण सर्वांगीण शुद्ध करणे, दोष काढून टाकणे, चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुद्ध निर्मळ करणे." [४] असे प्रतिपादिले आहे, तर वसंत जोशी यांनी "शोध हा व्यापक व गंभीर अर्थदर्शक शब्द शुध् या धातूपासून व्युत्पादिला जातो. तर धा या धातूस सम हा उपसर्ग लावून संधान ह्या शब्दाचा प्रयोग केला जातो. त्यात संशोधन आणि निरीक्षण ह्या कल्पना अंतर्भूत आहेत."[५] अशी भूमिका मांडली आहे. मराठी आणि हिंदी भाषांतील शब्दांची व्युत्पती प्रामुख्याने संस्कृत भाषेच्या आधारे मांडण्याची प्रवृत्ती आहे. वस्तुत; देवनागरी लिपीचा अवलंब करणाऱ्या संस्कृतप्रमाणेच प्राचीन प्राकृत भाषांही आहेत. त्याकडे अभ्यासक पूर्णपणे दुर्लक्ष करतात. परिणामी व्युत्पत्ती 'अन्वेषण' शोध प्रक्रिया अचूक होऊ शकत नाही.

संशोधन म्हणजे गंभीरतेने, वैचारिक दृष्टीने, संशोधनाचा शिस्त पाळून केलेले प्रबंधस्वरूपी लेखन. त्यात लेखन (Methodology), तंत्र (Technology) यापैकी methodology महत्त्वाची, पण तांत्रिक बाजूही दुय्यम नव्हे. या दोन्हींची कोणत्याही प्रकारच्या वैचारिक पातळीवरच्या लेखनाला गरज असंते. पण इतर वैचारिक लेखनापेक्षा प्रबंधलेखन थोडे फार वेगळे आहे. गांभीर्याने केलेल्या कोणत्याही लेखनामध्ये १. अभ्यास, २. संशोधन व ३. समीक्षा या पद्धतीच्या लेखनांचा समावेश होतो. संशोधनातही हे तीन घटक असावे लागतात. पण ही तीन क्षेत्रे एक नव्हेत हे लक्षात घेऊन संशोधनाचा विचार होतो. अभ्यास (संशोधनाची बैठक), समीक्षा

(समीक्षात्मक दृष्टीची मदत) यांच्या आधारे संशोधन आकारास येते. अर्वाचीन काळातील संशोधन पुष्कळदा केवळ समीक्षात्मक रूप धारण करते. मध्ययुगीन काळातील साहित्य संशोधन - पाठचिकित्सा-संहिता-निश्चिती याकडे अधिक लक्ष पुरविणारे असल्याने त्यामध्ये संशोधनाचे विशेष स्पष्टपणे दिसतात. त्याकाळच्या साहित्य संशोधनाची ती प्राथमिक गरज होती. आजही संपादन, परिष्करण या मार्गाने या प्रकारचे संशोधन होत आहे. पण एखाद्या साहित्यिकाच्या साहित्याचे साहित्य-निश्चित करणे एवढाच संशोधनाचा अर्थ नाही.

संस्कृत भाषेतील 'सं+शुध्' पासून संशोधन शब्दाची व्युत्पती मांडलेली असली तरी पाली भाषेतील त्याचे मूळरूप अचूक अन्वेषणासाठी पूरक ठरणार आहे. पाली भाषेमध्ये अर्थाला विशेषता येण्यासाठी वीस उपसर्ग आहेत, त्यापैकी 'सं' हा एक उपसर्ग आहे. तसेच, श, ष, व्यंजनासाठी पालीमध्ये 'स' चे उपयोजन केले जाते. त्यामुळे संशोधनातील 'शुध्' या धातूचे पाली भाषेतील मूळ रूप 'सुध्' हे असून 'सं + सुध' पासून 'संशोधन' हा शब्द व्युत्पन्न झाल्याचे दिसून येते, ज्याचे अर्थ परिशोध, अन्वेषण, अनुसंधान, शोधप्रबंध ह्या अर्थानी सर्वमान्य होऊन हिंदी व मराठी भाषेत त्या अर्थासह रूढ झाल्याचे प्रमाणित करता येते. संस्कृत भाषेपेक्षा पालीसह प्राकृत भाषा प्राकृतिक म्हणजे मूळरूपातील अथवा पुरातन मानल्या जातात. वैदिक व इतर प्राचीन वाङ्मयाचे ख्यातनाम अभ्यासक राजारामशास्त्री भागवत यांनी या संदर्भात मांडलेले मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात की, "जी भाषा प्रकृतिप्रत्येयाची खटपट करावी तेव्हा येते ती 'संस्कृत', जी भाषा प्रकृतिप्रत्ययाच्या खटपटीत न पडता उपजत येते ती पाअड (प्राकृत)"[६] होय. ह्याचा अर्थ असा की, संस्कृत भाषेवर शुद्धतेच्या नावाने अधिक संस्कार होत गेल्याने या भाषेचे मूळ अस्तित्वाविषयी प्रश्न निर्माण होतो. प्राकृत भाषा लोक बोली आहेत. लोकपरंपरा प्राचीन अवशेषासाठी महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळे संस्कृत भाषेपेक्षा प्राकृत अथवा पाली भाषा व्युत्पत्ती मांडण्यासाठी प्राचीन अवशेष म्हणून अधिक ग्राह्य ठरते. तसेच प्राकृत भाषा बोलणारा मानवी समूह अनार्य, शूद्र, द्रविड, असूर, राक्षस या नावाने संबोधले जातो. वैदिक ग्रंथातून सदर मानवी समूहाचे देवनिंदक म्हणून निर्देश आलेले आहेत. वैदिक ग्रंथ देववाणी संबोधलेल्या संस्कृत भाषेत लिहिलेले आहेत. वैदिक ग्रंथात ज्या अर्थी प्राकृत भाषा बोलणाऱ्या मानवी समूहांचा निर्देश येतो. त्या अर्थी वेद निर्मितीच्या अगोदर प्राकृत बोलणारे व प्राकृत भाषा अस्तित्वात होत्या हे मान्य करावे लागते. तात्पर्य मराठी व हिंदी भाषेतील शब्द

व्युत्पत्तीसाठी पाली व अन्य प्राकृत भाषांचा आधार पूरक ठरू शकतो हे संशोधन शब्दावरून निश्चित करता येते.

संशोधनाच्या संदर्भात दुसरी एक भूमिका महत्त्वाची वाटते. व्युत्पत्तीप्रमाणेच सैद्धांतिक मांडणीच्याबाबतीत अभ्यासक प्रमाणबद्धतेसाठी केवळ इंग्रजीतील अथवा पाश्चात्त्य मीमांसेवर अधिक भर देतात. मात्र भारतीय जीवनप्रणालीमध्ये संशोधन प्रवृत्तीला काही स्थान होते का, या विषयी ते भाष्य करत नाहीत किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतात असे दिसून येते. वस्तुत: इ. स. पूर्व सहाव्या शतकात भारतात विद्यापीठं अस्तित्वात होती हे वास्तव सत्य दुर्लक्षिता येणार नाही. तक्षशीला, नालंदा आणि विक्रमशीला या विद्यापीठांच्या लौकिकाने जागतिक समूहाचे लक्ष केंद्रित केले होते. या विद्यापीठात दहा हजार देशी-परदेशी विद्यार्थी शिकत होते व एका गुरूच्या अधिपत्याखाली १०० ते ५०० विद्यार्थी ज्ञानग्रहण करत होते. कौशलचा राजा प्रसेनजित, प्रसिद्ध व्याकरणकार कौटिल्य, सम्राट चंद्रगुप्त, आणि मगधचा विख्यात वैद्य जीवक हे या विद्यापीठातील नावलौकिक विद्यार्थ्यांपैकी काहींची नामावली होय. या विद्यापीठात धर्म तत्त्वज्ञानाबरोबरच तर्कशास्त्र, व्याकरण, गणित, खगोल, चित्रकला, मूर्तिकला, शिल्पकला, स्थापत्य, आयुर्वेद, रसायन, सर्जरी आणि धनुर्विद्यासारख्ये अभ्यासक्रम शिकवले जात होते. या विद्यापीठात संशोधनालाही अतिशय महत्त्व होते. आर्युवेदाचा विख्यात वैद्य म्हणून ख्याती मिळवलेल्या जीवकाची घेतलेली शोधपरीक्षा या संदर्भातील महत्त्वाचा पुरावा होय. या परीक्षेत जीवकाला तक्षशीला नगरीला मध्यवर्ती बिंदू कल्पून सभोवतालच्या पंधरा मैलाच्या परिसरातील वेली, झुडपं, गवत, कंदमुळासह सर्व वनस्पतींचे निरीक्षण करून औषधी गुणधर्म नसलेल्या वनस्पतीचा अहवाल सादर करण्यास सांगितले होते. त्यानुसार जीवकाने अथक प्रयत्न करून विद्यापीठाला अहवाल सादर केला, ज्यात त्यांनी निष्कर्ष नोंदविला की जीवसृष्टीवर औषधी गुणधर्म नसणारी वनस्पती अस्तित्वात असणे शक्य नाही. आयुर्वेदामध्ये वैद्य जीवक लिखित 'चरकसंहिता' हा ग्रंथ अजरामर व मौलिक मानला जातो. या प्रमाणेच भारतात इतर क्षेत्रातही संशोधन होत होत. त्या संदर्भात ज्येष्ठ अभ्यासक डॉ. सुमन मुरंजन[७] यांनी म्हटले आहे की, युरोपखंडामध्ये वैज्ञानिक शोध लागणाऱ्या एक हजार वर्ष अगोदर भारतात खगोल व गणिशास्त्रातील आर्यभट्टीय ग्रंथ लिहिणारा महान शास्त्रज्ञ आर्यभट्ट व पंचसैद्धांतिक प्रसवणारा वराहमिहीर उदयास आलेले हाते. तसेच दशांक शरीरविच्छेदनशास्त्र, गणनाशास्त्र, वसिष्ठ सिद्धान्त, रोमक सिद्धान्त, पौलिक सिद्धान्त, धातुशास्त्राबरोबरच, कला वाङ्मय आणि तत्त्वज्ञानाच्या प्रांतात ही

संशोधन आणि प्रयोग चालू होते. ही त्यानी मांडलेली भूमिका दुर्लक्ष करता येणारी नाही. मात्र भारतीय मानसिकता याचे विश्लेषण, विवेचन अथवा अन्वेषण करून त्यांच्या सिद्धांतन मांडत नाही. वस्तुत: विश्वस्तरावर वैज्ञानिक जग अस्तित्वात येण्याच्या अगोदर संशोधनासाठी आवश्यक अशी सैद्धांतिक बैठक भारतात, अस्तित्वात असतानाही ते अंधारातच निद्रिस्त अवस्थेत पडून आहे. त्याला प्रकाशमान केल्याने भारतीय सांस्कृतिक संचितांची उकल करणे सुलभ होऊ शकेल. संशोधन विषयाचा आवाका आणि आवश्यकता विचारात घेऊन अभ्यासकाने व्यापक दृष्टिकोण, तटस्थता, भौतिकता आणि मूल्यात्मकता याचे नियमन केले तर संशोधन क्षेत्रावर ठसा उमटवणारे व्यक्तिमत्त्व उदयास येऊ शकते. यासाठी परिश्रम करण्याची तयारी असणे महत्त्वाचे ठरते.

**२. दिशा–**

दिशा म्हणजे एक कल्पना किंवा तत्त्व.

**३. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व :**

कोणत्याही भाषेत लिखित साहित्याची निर्मिती होण्यापूर्वी मौखिक परंपरेने चालत आलेले लोकसाहित्य अस्तित्वात असते. त्यामुळे लिखित साहित्याबरोबर मौखिक परंपरेतील लोकसाहित्याचाही अभ्यास आवश्यक ठरतो, लिखित आणि मौखिक अशा दोन्ही परंपरेतील साहित्याभ्यासानेच साहित्याचा समग्र अभ्यास होईल. म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. लोकसाहित्यातून लोकमानस आणि लोकसंस्कृतीची अभिव्यक्ती झालेली असते. तसेच संस्कृतीच्या विकासाच्या खुणा लोकसाहित्यातून प्रत्ययाला येतात. माणसांच्या मनावर संस्कार केलेला असतो. लोकसाहित्याच्या अभ्यासाने वाङ्मयाच्या परंपरेबराबेरच त्यातून प्रकट होणाऱ्या अनेक रचनाबंधाचे आकलन होते, त्यामुळे आपले वाङ्मयीन आकलन वाढण्यास लोकसाहित्याचा अभ्यास उपयुक्त ठरतो. तसेच आपल्या अभिरुचीचा विकास होऊन ती अधिकाधिक संपन्न होत जाते आणि एकूणच आपल्या जीवनाला संपन्नता प्राप्त होऊ शकते, म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठात आता पदव्युत्तर पातळीवर मराठी विषयांतर्गत 'लोकसाहित्य' या विषयाचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन सुरू आहे. इंग्रजी भाषेत ज्याला  (लोकविद्या) म्हणतात. त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. तिची कक्षा लोकसंस्कृती, पुराणपरंपरा, भाषा, साहित्य याबरोबरच मानवशास्त्र, मानसशास्त्र, इतिहास, पुरातत्त्व अशा तऱ्हेच्या अनेक सामाजिक शास्त्रांशी निगडित असलेली दिसते. लोककथा, लोकगीते, विधिनाट्ये, लोकनाट्ये, म्हणी, वाक्प्रचार, कोडी, प्रहेलिका, उखाणे अशा प्रकारच्या शब्द

सामग्रीबरोबरच विधी, परंपरा, रूढी, विविध कौशल्याच्या कला, लोकशैलीतील चित्र, शिल्प याशिवाय लोकवैद्यक, अश्वपरीक्षा अशा विविध प्रकारच्या गोष्टींचा अंतर्भाव लोकविद्येत होतो.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचा प्रारंभ १७ व्या शतकात झालेला आढळतो. आज जगभर या अभ्यासाला स्वतंत्र स्थान प्राप्त झालेले दिसते. युरोप-अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये आणि उच्चशिक्षण देणाऱ्या अनेक संस्थांमध्येही हा अभ्यास सुरू आहे. भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यात त्या त्या भाषेत लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झालेला आहे. महाराष्ट्रातील जवळजवळ सर्वच विद्यापीठांतून पदव्युत्तर पातळीवर मराठी विषयांतर्गत लोकसाहित्याचे अध्ययन आणि अध्यापन- संशोधन सुरू झालेले आहे.

लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचा एक भाग असला तरी समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र अशा सामाजिकशास्त्राच्या लोकसाहित्याची सामग्री उपयुक्त ठरते. त्यामुळे सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्यांबरोबर भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास करणाऱ्यांचे लक्ष लोकसाहित्याकडे वेधले गेले. भारतासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशात तर लोकसाहित्याचे अध्ययन-अध्यापन आणि संशोधन होणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय जीवनाच्या गतकाळाचे आकलन करून घेण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास जसा साहाय्यभूत होईल, तसेच वेगवेगळ्या प्रदेशातील लोकसाहित्याच्या अभ्यासाने तौलनिक अभ्यासाची साधनेही या अभ्यासातून हाती लागतील. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही लोकसाहित्याचा अभ्यास भाषेची परंपरा ध्यानात घ्यावी लागते. ही परंपरा मौखिक साहित्यात सापडते. लोकसाहित्यात आढळणारे अनेक रचनाबंध आणि जीवनचित्रण यांच्या अभ्यासामुळे आपले सांस्कृतिक जीवनाचे आकलन वाढते व साहित्यिक जाणीवही वृद्धिंगत होते. तसेच आपली वाङ्मयाभिरुचीही विकसित होते म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

पाश्चात्त्य अभ्यासकांनी केलेल्या लोकसाहित्याचा अभ्यास संकलनाच्या स्वरूपाचा आणि वेगवेगळ्या सामाजिक शास्त्रांच्या दृष्टिकोणातून केलेला आढळतो. हा अभ्यास करताना लोकसाहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचा प्रयत्न झालेला आढळत नाही. किंबहुना ती त्यांची भूमिकाही नाही. ग्रिमबंधूचा भाषाशास्त्रीय अंगाने केलेला अभ्यास काहीकाळ जर्मनी आणि युरोपपर्यंतच मर्यादित राहिला. तर जेम्स फ्रेझरच्या अभ्यासाची कक्षा जगभर पसरलेली होती. १९ वा शतकात पाश्चात्त्य अभ्यासकांनी धार्मिक कथागीते,

रूढी, लोकविश्वास, आचारविचार या लोकसाहित्यातील सामग्रींचे संकलन केले. संस्कृतीच्या अभ्यासाची सामग्री म्हणूनच त्यांनी त्याचा विचार केला. लोककथा, लोकगीते , म्हणी, प्रहेलिका अशा शब्द सामग्रीचा अभ्यास प्रामुख्याने लोकसंस्कृतीच्या आणि मानवशास्त्राच्या अंगाने झाला. अशा तऱ्हेने लोकसाहित्याचा अभ्यास जगभर सुरू झाला. तरीही अभ्यासाचे केंद्र मात्र इंग्लंडमध्ये होते असे दिसते.

महाराष्ट्रात प्रारंभी जो लोकसाहित्याचा अभ्यास झाला तो बराचसा संकलनाच्याच स्वरूपाचा आहे. त्यातही प्रामुख्याने हे संकलन स्त्रीगीते आणि लोकगीतांचेच झालेले दिसते. मराठीतील लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रारंभ १९ व्या शतकात झाला. मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाची जाणीवपूर्वक मांडणी करण्याचा प्रयत्न १९१६ ते १९६८ या काळात झालेला दिसतो. भावुकतेच्या आवर्तामधून लोकसाहित्याच्या अभ्यासाला बाजूला काढून वेगळी आणि शास्त्रीय दिशा देण्याचा पहिला प्रयत्न मराठीत दुर्गा भागवतांनी केला. 'लोकसाहित्याची रूपरेखा' या ग्रंथात लोकसाहित्याच्या अभ्यासाची सैद्धांतिक मांडणी त्यांनी केली आहे. त्यानंतर डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' आणि 'लोकसाहित्याचे स्वरूप' असे दोन लोकसाहित्याची शास्त्रीय मीमांसा करणारे ग्रंथ लिहून या अभ्यासाला काहीएक दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या अभ्यासाला क्षेत्रियतेची जोड असल्याने हा अभ्यास मौलिक स्वरूपाचा झाला आहे. डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. तारा भवाळकर यांनीही अशाप्रकारे अभ्यास केला आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, डॉ. श्री. व्यं. केतकर, साने गुरुजी, डॉ. ना. गो. नांदापूरकर, महादेवशास्त्री जोशी, सत्येन्द्र, कृष्णदेव उपाध्याय, डॉ. वासुदेवशर अग्रवाल, मालतीबाई दांडेकर, कमलबाई देशपांडे, डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. रा. चिं. ढेरे, दुर्गा भागवत, ना. गो. नांदापूरकर, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. तारा भवाळकर, डॉ. गंगाधर मोरजे, नामदेव व्हटकर, डॉ. यू. म. पठाण, डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. शरद व्यवहारे, डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. तारा परांजपे, डॉ. वैदेही कोळेकर, डॉ. विनायक खेडकर, डॉ. अरुणा ढेरे, डॉ. अमिता मुजुमदार, डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, प्रा. शैला लोहिया, डॉ. यशवंत पाठक, विश्वनाथ खैरे. ना. धों महानोर, डॉ. अशोक रानडे, डॉ. धोंडीराम वाडकर, डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. सुदाम जाधव, प्रा. उदय खानोलकर, डॉ. विद्या व्यवहारे, डॉ. सुभाष शेकडे, ग.ह. खरे, रूस्तुम अचलखांब, प्रतिभा इंगोले, चिं.ग. कर्वे, डॉ. प्रकाश खांडगे, डॉ. शिवाजीराव चव्हाण, डॉ. रोहिणी

तुकदेव, लक्ष्मीनारायण बोल्ली, डॉ. मिलिंद कसबे, डॉ. दिलीप कसबे, डॉ. बाळकृष्ण लळीत या मान्यवर पूर्वसुरींच्या अभ्यासामुळेच मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासाची कक्षा बरीच वाढलेली आहे. आज वेगवेगळ्या प्रदेशातील नवे-जुने अभ्यासक लोकसाहित्याचा अभ्यास करत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे आणि लोकसाहित्य संशोधन मंडळ, औरंगाबाद या संस्था तसेच विविध नियतकालिके लोकसाहित्याच्या अभ्यासात साहाय्य करताना आढळतात.

**४. लोकसाहित्याचे संशोधन : नव्या दिशा :-**

मराठी लोकसाहित्याचे संकलन आाणि प्रकाशन विपुल झाले आहे. मात्र संकलन करताना शास्त्रीय दृष्टी ठेवली आहे असे दिसत नाही. हे संकल्प प्रामुख्याने स्त्री-गीतांचेच आहे. लोकगीतांतून व्यक्त झालेल्या समूहमनाचा, तसेच त्यातून आढळणाऱ्या वेगळेपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न कोणी केला नाही एवढेच नव्हे तर लोकसाहित्यविषयक व्यापक दृष्टी ठेवून एका विशिष्ट भूप्रदेशातील लोकसाहित्याचे संकलन करून त्याच्या वाङ्मयीन अभ्यास करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. लोकवाङ्मय हे लोकसाहित्याचे एक अंग असून लोकसाहित्यात लोकवाङ्मयाबरोबर इतर अनेक अंगांचा समावेश होतो याची जाणीव संशोधन करताना अभ्यासकांनी बाळगणे गरजेचे आहे. लोकसाहित्य अभ्यासामधील अनेक त्रुटींची जाणीव डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' या ग्रंथात करून दिली आहे. लोकसाहित्य ही व्यापक संज्ञा आहे. लोकसाहित्यात ज्या कृतींमधून आणि उक्तींमधून लोकजीवन अभिव्यक्त होते त्या सर्वांचा समावेश होतो. ग्रामीण जनतेच्या ७० टक्के लोकांचे प्रतिनिधित्व लोकसाहित्य करते. लोकवाङ्मयाची भाषा समाजाचे, संस्कृतीचे संदर्भ घेऊन उभी राहत असते. अशा लोकवाङ्मयाच्या नव संशोधन दिशा पुढीलप्रमाणे :

१) भारतीय नृत्यशैलीच्या शास्त्रशुद्ध तंत्राचा संशोधनात्मक अभ्यास करणे.
२) सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट आणि बदामीचे चालुक्य, यादव व त्यानंतरचे इस्लामी आक्रमण अशा विविध राजकीय बदलाला सामोऱ्या जाणाऱ्या विविध वसाहती शिल्पे, लेण्या तसेच विविध स्थळांचा संदर्भ पुन्हा नव्याने शोधणे गरजेचे आहे.
३) शिल्पशैली, मंदिर स्थापत्य, मूर्तिशिल्पे, शिखरे, शिल्पपट यांचाही ऊहापोह होणे आवश्यक आहे
४) विविध तीर्थक्षेत्रांचा संशोधनात्मक अभ्यास करणे.

५) उत्खननात मिळालेल्या विविध वस्तूंच्या आधारे इतिहासाची पुनर्मांडणी करणे.
६) ग्रांथिक, लिपिबद्ध तसेच प्रचलित आख्यायिकांचा सामाजिक, वाङ्मयीन दृष्टीने अभ्यास करणे.
७) विविध लोककलांच्या संवर्धन, संशोधना सोबतच लोककलावंताच्या पडदया मागील वास्तव समाजजीवन आणि संस्कृतीचा अभ्यास करणे.
८) दैनिक वृत्तपत्रामधील दैनंदिन परिपाठामधील कोडी, उखाणे, जात्यावरची ओवी, म्हणी तसेच बोधकथांचा वाङमयीन दृष्टीने अभ्यास करणे.
९) आदिम जनजातींच्या मौखिक वाङ्मयावर आणि सांस्कृतिक समाजजीवनावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.
१०) महाराष्ट्रात विखुरलेल्या व नाहीशा होत चालेल्या अनेक लोकपरंपराची चिकित्सा, संशोधन करणे.
११) आदिवासींची चित्रशैली.
१२) महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश येथील लोक दैवताविषयक माहितींची सांस्कृतिक चिकित्सा करणे.
१३) पूर्वोपलब्ध, पूर्वसंपादित आणि नवोपलब्ध असे सर्व कोरीव लेख आशयानुरुप एकत्रितरित्या स्वतंत्रपणे संपादन होणे आवश्यक आहे.
१४) 'विविधतेतील एकात्मते'चे दर्शन आपणास विविध उत्सवांमध्ये दिसते. (उदा. नवरात्र, महाशिवरात्र, वारी, विधी इ. प्रसंगी) या उत्सवकालीन लोकमानसाचा अभ्यास संशोधनीय असा आहे.
१५) विविध जमातींच्या लोकसाहित्याचा चिकित्सक अभ्यास करणे.
१६) तालुकानिहाय लोकवाङ्मयाचा अभ्यास करणे.
१७) विविध बोलीभाषेतील लोकवाङ्मयाचा भाषिक दृष्टीने अभ्यास करणे.
१८) संगीत आणि नृत्य कलेच्या सध्याच्या नव्या प्रवाहांबद्दल अभ्यास आणि चर्चा होणे गरजेचे आहे. नर्तिकांची अदाकारी अभ्यासनीय आहे. (परिक्रमा महोत्सव, वर्ष तिसरे, पुणे, दि. २७ व २८ नोव्हेंबर २०१०.)

अशा महोत्सवातील सादरीकरण म्हणजे केवळ मनोरंजन नव्हे तर पारंपरिक नृत्यप्रकारांचे समकालीन संदर्भ शोधणे, त्यात नावीन्य आणता यावे या हेतून तसेच नृत्याबद्दल मूलभूत विचार व्हावेत यासाठी असे अनेक महोत्सव देशभर भरवण्यात येतात. उदा. महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील दरवर्षी होणारा लावणी महोत्सव. अशा विविध महोत्सवातील

सादरीकरणातून नृत्य प्रवाह, गीतरचनांची संहिता या विषयक संशोधन घडवून येणे गरजेचे आहे.

लोकवाङ्मय संशोधनाचे असे असंख्य विषय आजही अंधारात आहेत. त्या सर्वांचा प्रामाणिकपणे विचार, चिंतन, संकलन, विश्लेषण आणि संशोधन होणे महत्त्वाचे आहे. आज रूढ असलेल्या विज्ञानप्रणीत विश्वकल्पनेचा प्रभाव जनमानसावर झपाट्याने पडत आहे. समाजजीवन परंपरागत चालत आलेल्या जीवनपद्धतीचा त्याग करून नव्या जीवनपद्धीचा अवलंब करीत आहे. प्राचीन प्रथा, परंपरागत चालत आलेल्या रूढी यांवरील विश्वास वेगळे ढासळत आहे. धर्मविधीचे स्वरूपदेखील पालटत असल्याचे दृश्य दिसते. आणखी काही वर्षांनी या प्रथा संपूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता आहे. त्यांच्याऐवजी नव्या विश्वकल्पनेवर आधारित नवीन प्रथा लोकजीवनात येतील. त्यापूर्वी मानवी जीवन ज्या विचारविश्वासाने भारावलेले होते. सर्व कृतींच्या आणि उक्तींच्या मुळाशी जे प्रमुख तत्त्व होते. त्याचा विचार करून त्याचे मूळ शोधणे हे आजच्या संक्रमणाच्या काळातच शक्य आहे. लोकसाहित्याचा हा अंत:प्रवाह शोधणे आवश्यकही आहे. 'जुन ते सोनं' अस म्हणतच न बसता 'नवं तेवढं हवं हवं...' या उक्तीप्रमाणे नावीण्यपूर्ण बदलांचा आढावा घेणे, त्याचे पुन:पुन्हा सिंहावलोकन करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ –**


१. डॉ. व. दि. कुलकर्णी, विशिष्ट साहित्यकृतीचा अभ्यास, भाषा व साहित्य संशोधन, खंड १, संपा- वसंत जोशी, म.सा.प. पुणे, आवृत्ती १९९०, पृ ३५७.
२. वसंत जोशी, विषय परिचय, भाषा व साहित्य संशोधन, खंड १, संपा-वसंत जोशी, म.सा.प. पुणे, आवृत्ती १९९०, पृ. १.
३. दु. का. संत, साहित्य समीक्षा आणि संशोधन, भाषा व साहित्य संशोधन, खंड १, संपा-वसंत जोशी, म.सा.प. पुणे, आवृत्ती १९९०, पृ. ३३४-३३५.
४. डॉ. व. दि. कुलकर्णी, संशोधन: स्वरूप आणि पद्धती, भाषा व साहित्य संशोधन, खंड.१, संपा-वसंत जोशी, म.सा.प. पुणे, आवृत्ती १९९०, पृ. २५.
५. वसंत जोशी, विषय परिचय, भाषा व साहित्य संशोधन, खंड १ संपा- वसंत जोशी, म.सा.प. पुणे, आवृत्ती १९९०, पृ. १,२.
६. राजाराम रामकृष्ण भागवत, प्राकृत भाषेची विचिकित्सा, भागवत रा. रा. व्हिन्सेंट क्रॉस रोड, दादर मुंबई, आवृत्ती १९३०, पृ. ३.
७. डॉ. सुमंत मुरंजन, पुरोहितवर्गवर्चस्व व भारताचा सामाजिक इतिहास, प्रज्ञा पाठशाळा मंडळ, वाई, आवृत्ती १९९०, पृ. ८०, ८१.

# ग्रामीण साहित्याच्या संशोधनाचे स्वरूप आणि अपेक्षा

**प्रा. वामन जाधव**

ग्रामीण साहित्याचे दालन काव्य, कथा, कादंबरी, ललित गद्य, आत्मकथने या प्रकाराने समृद्ध झाले आहे. ग्रामीण साहित्याची सुरुवात साधारणपणे १९२५ पासून मानली जाते. १९२५ ते १९४५ या दरम्यानचे साहित्य प्रामुख्याने स्वप्नरंजनपर होते. तसेच काही साहित्य बोधवादी ही होते. श्री. म. माटे सारखे अपवादात्मक लेखक गंभीरपणे लेखन करीत होते. काही तरी सांगण्यासाठी आपण लिहीत आहोत ही त्यांच्या लेखनामागची जाणीव होती. १९४५ पर्यंत कविता, कथा, कादंबरी हे सर्वच वाङ्मय प्रकार स्वप्नरंजनपर लिहिले जात होते. त्यात ग्रामीण जीवन जाणिवा कमी आणि नागर जाणिवांचे प्रकटनच जास्त होते. १९४५ नंतरच्या साहित्यात ग्रामीण जीवनाचे वास्तव येऊ लागले. ग्रामीण जीवनातील सुख-दुःख, तेथील समस्या, कुटुंबातील नाती-गोती, नातेसंबंधातील ताणतणाव, सण-समारंभ, रूढी-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, खेड्यातील निसर्ग, बोलीभाषा, एकूणच कृषी संस्कृतीचे जगणे ग्रामीण साहित्यात येऊ लागले. ग्रामीण जीवनाचा वेध १९४५ नंतरचे साहित्य घेऊ लागले. मुळातच हे लेखक शेतकरी कुटुंबातील होते. त्यांचे हात मातीत राबले होते. शेती व्यवसाय त्यांनी केला होता. शेतातील यश-अपयश त्यांनी पाहिले होते. त्यामुळे त्यांच्या हातून वास्तव व कलात्मक साहित्य लिहिले जाऊ लागले.

१९८० नंतरचे ग्रामीण साहित्य तर अनेक अर्थाने महत्त्वाचे आहे. १९८० नंतरचे ग्रामीण साहित्य हे जागतिकीकरणानंतरचे साहित्य आहे. मानवी मूल्याचा ऱ्हास, भकास होत चाललेली खेडी, राजकारणातील गट-तट, बेकारीचे वाढते प्रमाण, जातीयवाद, वाढत चाललेला चंगळवाद, शेती व्यवसायाकडे नव्या पिढीचे दुर्लक्ष, तोट्यात आलेली शेती, कर्जाचा वाढत चाललेला डोंगर, त्यामुळे कुटुंबात होणारा कलह, त्यातून शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या, सेजसारखे संकट, त्यातून शेतकऱ्याच्या हडप होत चाललेल्या जमिनी, वाळूची तस्करी, कमी श्रमात मिळालेला अमाप पैसा, त्यानू खून-मारामाऱ्या, खेड्यातील हरवत चाललेली संस्कार केंद्रे हे सर्व बदलते ग्रामीण जीवन भरभरून १९८० नंतरच्या ग्रामीण साहित्यात येत आहे.

१९८० नंतरच्या लेखकांनी ग्रामीण शोषकाचा चेहरा गडद केला आहे. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव या साहित्यावर जाणवतो. थेट प्रश्नाला भिडण्याचे सामर्थ्य या साहित्यात आहे. शोषणाची कारणे सांगून अन्यायाविरुद्ध हे साहित्य जाब विचारते. असे क्रांतिदर्शक साहित्य १९८० नंतर अवतरत आहे. अशा ग्रामीण साहित्याती निर्मिती विपुल प्रमाणात होत असली तरी ग्रामीण साहित्याची समीक्षा मात्र फारशी झालेली दिसत नाही.

आनंद यादव यांचा 'ग्रामीण साहित्य -स्वरूप आणि समीक्षा', द. ता. भोसले यांचा 'ग्रामीण साहित्य -एक चिंतन', नागनाथ कोतापल्ले 'साहित्य शोध आणि बोध', भास्कर चंदनशिव 'भूमी आणि भूमिका', वासुदेव मुलाटे 'ग्रामीण कथा-स्वरूप आणि विकास', हेमलता गायकवाड 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता', गो. म. कुलकर्णी 'मराठी ग्रामीण साहित्य परिसर आणि प्रवाह', रविंद्र ठाकूर 'मराठी ग्रामीण कादंबरी', चंद्रकुमार नलगे 'ग्रामीण साहित्य -उपेक्षा आणि अपेक्षा', गणेश देशमुख 'ग्रामीण समाज जीवन व साहित्य', डॉ.बाबाराव उपाध्ये 'ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण', वामन जाधव 'ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन', रमेश जाधव 'ग्रामीण कथा -वास्तवता आणि रंजकता' असे बोटावर मोजता येतील इतके समीक्षा ग्रंथ निर्माण झालले आहेत.

विद्यापीठ पातळीवरही साचेबद्धपणे ग्रामीण साहित्यावर संशोधन झाले आहे. एका विशिष्ट चौकटीतच हे संशोधन अडकून पडले आहे. एखादा लेखक घेऊन त्याच्या साहित्याच्या अभ्यास बऱ्याच विद्यापीठात झाला आहे. चंद्रकुमार नलगे यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास, महादेव मोरे यांच्या साहित्याच्या सर्वांगीण अभ्यास, महात्मा फुले यांच्या साहित्याच्या वाङ्मयीन अभ्यास, महात्मा फुले यांच्या समग्र कवितेचा चिकित्सक अभ्यास, उद्धव शेळके यांच्या कादंबरी वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास, व्यंकटेश माडगुळकर यांच्या साहित्याच्या लोकतत्त्वीय अभ्यास, आनंद यादव यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास, द. ता. भोसले यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास, भास्कर चंदनशिव यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास, व्यंकटेश माडगुळकर यांच्या कादंबरी साहित्याचा चिकित्सक अभ्यास असे लेखक मानून त्यांच्या साहित्यकृतीवर संशोधन झाले आहे. शिवाय एखाद्या वाङमयीन प्रवाहावर कालखंड मानून अभ्यास झाला आहे. एखाद्या वाङमयीन प्रवाहातील स्त्री-जीवन, निसर्ग, प्रादेशिकता यावरही संशोधन झाले आहे.

रा. रं. बोराडे यांच्या साहित्यातून प्रकट होणारे ग्रामवास्तव आणि स्त्री-जीवन, ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन, मराठी ग्रामीण कवितेचा चिकित्सक अभ्यास असे रूढ-परंपरेने ग्रामीण साहित्यावर संशोधन झाले आहे. अपवाद म्हणून गणेश देशमुख यांचे सांगता येईल. ग्रामीण समाज जीवन व साहित्य हे त्यांचे ग्रामीण साहित्यावरील संशोधन वेगळ्या वाटेने जाणारे आहे. ग्रामीण साहित्याचा मूळ धागा अलिखित साहित्यात पाहावयास मिळतो. अलिखित साहित्याच्या मागे भक्कम अशी ग्रामीण संस्कृती उभा असते. अलीकडच्या काळात अशा लोकसंस्कृतीवर लेखन होताना दिसते. मात्र त्यावर संशोधन झालेले दिसत नाही. तौलनिक पद्धतीनेही ग्रामीण साहित्यावर समाधानकारकपणे संशोधन झाले नाही. शिवाय भाषाशैलीच्या दृष्टीने ग्रामीण साहित्यावर संशोधन होण्यासारखे आहे. संशोधनातील या नव्या वाटा नव्या संशोधकांनी शोधायला हव्यात. असे झाल्यास ग्रामीण साहित्याचा प्रवाह समीक्षेच्या दृष्टीनेही समृद्ध होईल.

❀❀❀

# साहित्य संशोधनातील स्त्रीवादी सिद्धांकनाची वाटचाल

प्रा.शोभा तितर

'आरपार लयीत प्राणांतिक' ही प्रज्ञा पवारांची अलीकडची दीर्घ कविता या कवितेतील पहिल्याच दोन ओळी अशा आहेत,

'इथं कुणीच नाही विमुक्त
नि तुझं तर घुंगराच्या वेदनेशी सख्खं नातं'

माणसाचं मुक्त अथवा बंदिस्त असणं-नसणं, विमुक्त (?) नि घुंगराची वेदना म्हणजे कुणाची अन् कसली वेदना अशा अनेकानेक विचारांची आवर्तने - वादळं सुरू होतात ही दीर्घ कविता संपेपर्यंत! भालचंद्र नेमाडेंची 'हिंदू' वाचताना २० व्या शतकाच्या मध्यावरचे पण अगदी आजचे वाटावे असे ग्रामीण स्त्रीजीवन समजून घेतानाही विचारांची ही वादळं सुरूच राहतात.

जे अज्ञात आहे ते ज्ञात करू देणे, अनुपलब्ध आहे ते उपलब्ध करून देणे अथवा एखादे नवे तत्त्व शोधून काढणे, एखादा नवा सिद्धांत माडणे अथवा एखादे रहस्य उलगडणे असा संशोधनाचा अर्थ घेतला जातो. संशोधनाच्या या पारंपरिक मार्गाने जाताना स्वतंत्र स्त्रीवादी सिद्धांकन आणि त्यामगील विविध दृष्टिकोण समजून घेणे ही भूमिका या निबंधामागे आहे.

भारतीय स्त्री आज थोड्याप्रमाणात तरी सक्षम, खंबीर, स्वकल्पनेनुसार स्वतःचे जीवन जगू लागली आहे. हा छोटासा गट विवाहातील रूढिप्रधानता, पितृप्रधान मूल्यव्यवस्था यांच्या काचातून बाहेर पडून मनासारखे आनंदी, निर्भय जीवन जगू लागलेला आहे. त्यामुळे भारतीय जीवन शैलीत अंशतः स्त्रीवादोत्तर दृष्टिकोण रूळताना दिसत आहे. मराठी साहित्यातून स्त्री जीवनाचे असेही चित्रण थोडेफार आले आहे. पण आजही बहुसंख्य भारतीय स्त्रिया रूढी-परंपरा आणि पितृप्रधानतेच्या काचातून सुटलेल्या नाहीत. १९-२० व्या शतकातील किंवा आजच्या कोणत्याही प्रवाह वा प्रकारातील साहित्य असो; जात -वर्ग -पितृसत्ता यांच्या प्रभावातून दडपलेले स्त्रीजीवन प्रत्ययास येते म्हणून साहित्याचे अर्थनिर्णयन करताना स्त्रीवादी दृष्टिकोण महत्त्वाचा ठरतो स्त्रीवाद ही पाश्चात्त्य विचारप्रणाली आहे. पण भारतीय संदर्भात ती महत्त्वाची ठरते. जगभरातील स्त्रियांचे प्रश्न वेगवेगळे आहेत, परिस्थिती वेगवेगळी आहे, लढ्यांचे स्वरूप वेगवेगळे आहे, असे असले तरी जगाचा अर्धा हिस्सा

असलेली स्त्री दुय्यमतेचा अनुभव घेत दडपलेले जीवन जगत आहे, साहित्यातही याचे पडसाद उमटलेले आहेत. स्त्रियांनी भयग्रस्त, परावलंबी आयुष्य जगावे अशीच जणू पितृसत्ताक व्यवस्था आहे. म्हणूनच कालचे आणि आजचे साहित्य समजून घेण्यासाठी स्त्रीवाद ही विचारप्रणाली महत्त्वाची ठरते. साहित्य संशोधनातील एक महत्त्वाचा दृष्टिकोण म्हणून या विचारप्रणालीकडे पाहिले पाहिजे. यासंदर्भात प्रा. स. ग. मालशे यांचे 'समीक्षा आणि संशोधन' या लेखातील विचार महत्त्वाचे वाटतात. ते लिहितात, ''पाश्चात्त्य समीक्षा सूत्रे स्वीकारताना त्या सूत्रामागे असलेली समग्र उत्कांती आपण ध्यानात घेत नाही. पाश्चात्त्य समीक्षेला संशोधन कार्याची सतत जोड मिळत आलेली असते. या परस्परपूरक प्रक्रियातील नाते आपण जाणलेले नसते.'' समीक्षा व संशोधन यातील फरक स्पष्ट करताना ते लिहितात, ''संशोधन प्रक्रिया हे साधन असून ते पायाभूत ठरणारे साधन आहे तर समीक्षा हे अंतिम फलित होय. संशोधन कार्यासाठी लागणारे गुण आणि साहित्य समीक्षेसाठी लागणारे गुण यांची जात काहीशी भिन्न असते. संशोधनाला चिकाटीची आणि साक्षेपाची तर समीक्षेला एक प्रकारच्या आलोक तारतम्याची, आंतरदृष्टीची आवश्यकता असते. तरीसुद्धा या उभय क्षेत्रांचे विभक्तीकरण करता येणार नाही.'' प्रा. मालशे याचे संशोधन प्रक्रियाबाबताचे वरील विधान समीक्षा पद्धती, समीक्षकांचे कार्य आणि संशोधन प्रक्रिया या तिन्ही बाजूंनी स्त्रीवादाबद्दलही महत्त्वाचे ठरू शकते. स्त्रीवादी साहित्य समीक्षेला भारतीय संदर्भातील उपयोजनपद्धतीची जोड देऊन संशोधन प्रक्रियेत सातत्य राखल्यास असे संशोधन अधिक महत्त्वाचे ठरेल.

स्त्रीवादी सिद्धांकनाला स्त्रियांच्या विविध चळवळींची, लढ्यांची पार्श्वभूमी आहे. म्हणून ही पार्श्वभूमीही समजून घेणे आवश्यक ठरते. समाजशास्त्रीय अंगाने, पाश्चात्त्य स्त्रीवाद समजून घेत डॉ. विद्युत भागवत, डॉ. शर्मिला रेगे, इ. नी स्त्री-अभ्यासाच्या संदर्भात अशी मांडणी केली आहे. त्यातून स्त्रीवादी संकल्पनेची दिशा स्पष्ट होते. पुणे विद्यापीठाच्या स्त्रीअभ्यास केंद्राने मराठीतून स्त्रीवादावरील स्वतंत्र वाचन साहित्यही उपलब्ध करून दिले आहे.

**स्त्रीवादाची जागतिक पार्श्वभूमी :** १९२० च्या सुमारास मतदानाचा हक्क, शिक्षण, संपत्ती व समान कायदा यासाठी इंग्लड-अमेरिकेतील कष्टकरी व मध्यमवर्गीय स्त्रियांनी अत्यंत लढाऊ चळवळ उभी केली. या चळवळीनिमित्त घराबाहेर, तुरुंगात स्त्रिया गेल्या आणि मुख्य म्हणजे 'आम्ही माणूस आहोत' असे समूहात, मोठ्या आवाजात बोलू लागल्या. १९६० च्या आसपास शिक्षण

व तत्सम सुविधा मिळूनही आपण केवळ शोभेच्या वस्तू म्हणून वावरत आहोत हे पाश्चिमात्त्य स्त्रियांना जाणवू लागले. या काळातील अमेरिकेतील युद्धविरोधी जहाल चळवळी व विचार, काळ्यांची चळवळ, पॅरिसमधील विद्यार्थ्यांचे बंड याही चळवळींचा परिणाम स्त्री चळवळीवर पडला. बेट्टी फ्रीडनने 'फेमिनाइन मिस्टिक' मधून व्यक्तिवादी विचारसरणी मांडली. व्यक्तीने स्वतःचे आयुष्य व भविष्य घडविण्यातूनच मानवी स्वातंत्र्य सिद्ध होते, ह्या चौकटीतून फ्रीडनने मांडणी केली. जर्मन ग्रिअर, फायर स्टोन, केट मिलेट आदींनी जहाल स्त्रीमुक्तीवादी विचारांची मांडणी केली जर्मन ग्रिअरचे 'द फिमेल युनक', केट मिलेटचे 'दि सेक्शुअल पॉलिटिक्स' या ग्रंथातून लैंगिकतेच्या राजकारणाची चर्चा येते.

समाजवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद याही विचारसरणी निर्माण झाल्या. ज्युलिएट मिचेलने जहाल स्त्रीवाद व उदारमतवादी मार्क्सवाद यांना जोडण्याचा प्रयत्न केला. मार्क्स, फ्राईड यांच्या विचारांचाही अभ्यास करून कुटुंबसंस्था, विवाह संस्था, उत्पादन व्यवस्थेतील सहभाग, कुटुंबनियोजनाची साधने, भांडवलशाहीतील स्त्रियांचे स्थान इत्यादींवर व्यापक चर्चा घडून सध्याचे स्त्रीवादी विचारप्रवाह पुन्हा पुन्हा असे मांडतात की, स्त्रियांच्या दुय्यमस्थानाचे कारण शारीरिक भिन्नता नसून या भिन्नतेला पुरुषप्रधान व्यवस्थेने दिलेले अर्थ आहेत. शीला रॉबॉथमच्या मते समाजपरिवर्तनाच्या चळवळीत स्त्रियांचा खऱ्या अर्थाने सहभाग हवा असेल तर उत्पादनाचा अर्थ व्यापक केला पाहिजे. घरामध्ये स्त्रिया जे उत्पादन करतात, मुले जन्माला घालून माणसांचे उत्पादन करतात त्याची दखल घेतली पाहिजे. त्यांच्या मते स्त्रीवादी चळवळीसमोर सर्वात महत्त्वाचे काम आहे ते स्त्रियांवरील सांस्कृतिक दडपण दूर करण्याचे व त्यांची जाणीव वाढविण्याचे!

पाश्चात्त्य देशातील विविध स्त्रीवादी विचार प्रवाहात भांडवलशाहीला, उपभोगवादी वृत्तीला विरोध दिसतो. आपल्याला मिळालेल्या देहाचा श्रेयपूर्ण उपयोग व्हावा यासाठी स्वतःच्या देहावर नियंत्रण व ताबा हवासा वाटतो.

**भारतीय संदर्भात स्त्रीवाद** : भारतीय समाजात पुरुषी वर्चस्वाइतकेच जातीय व वर्गीय प्रश्नांचे जळजळीत वास्तव आहे. सर्व धर्मात, जातीत, थरात वेगवेगळ्या रूपाने बायका माणूसपणापासून वंचित जिणे जगत आहेत. सार्वत्रिक दडपणूक अनुभवत आहेत. भारतीय समाजात धड पूर्ण औद्योगिकीकरण नाही, धड विभक्त कुटुंबाची चाकोरी नाही म्हणून भारतीय संदर्भातील स्त्रीवाद म्हणजे आपला इतिहास नव्या दृष्टिकोणातून पाहण्याचा, त्यातील स्त्री - जीवनाचा अदृश्य सहभाग उलगडून पाहण्याचा प्रयत्न तसेच स्त्रिया आणि पुरुष एकाच

प्रकारच्या अनुभवांना भिन्न अर्थ कसे देतात हेही शोधण्याचा प्रयत्न होय. जातीच्या उतरंडीची चिकित्सा करणे, विवहित स्त्रियांना जी कोंडी अनुभवावी लागते, त्यासाठी कुटुंब ही संरचना तपासणे आवश्यक वाटते.
स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात स्त्रियांची सामाजिक सुधारणेची चळवळ, जातीविरोधी चळवळ, साम्यवादी-समाजवादी स्त्रियांची चळवळ अस्तित्वात होती.

१९६० नंतर आणि आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष १९७५ नंतर स्त्रियांचा असंतोष स्फोटक स्वरूपात व्यक्त होऊ लागला.भारतीय महिला फेडरेशन, समाजवादी महिला सभा, श्रमिक महिला संघ इ. संघटना स्त्रियांच्या चळवळीत आल्या. स्त्रियांवरील अत्याचार, त्यांचे आर्थिक प्रश्न, आरोग्याचे प्रश्न, कायदेशीर व घटनात्मक हक्क असे अनेक प्रश्न हाती घेऊन 'जाणीव जागृतीला' महत्त्व दिले गेले. आज अनेक स्त्रीसंघटना कार्यरत आहेत.

**स्त्रीवादी विचारातून विकसित झालेल्या संकल्पना :**

**१. पुरुष प्रधानता किंवा पुरुषशाही समाजव्यवस्था -**

पाश्चिमात्त्य देशात १९६० सालानंतर उदयाला आलेल्या स्त्रीमुक्तीवादी चळवळीने 'पितृप्रधान' वा 'पुरुषप्रधान' वा 'पितृसत्ताक' समाजव्यवस्था ह्या शब्द प्रयोगाला नवा अर्थ दिला. पुरुषशाही म्हणजे लिंग नावाच्या जन्मबद्ध कसोटीच्या आधारावर ठरविली गेलेली श्रेणीबद्ध समाजव्यवस्था. अशा व्यवस्थेत भिन्न वर्ग, वंश, किंवा संस्कृती ह्यामधील पुरुष भिन्न-भिन्न पायऱ्यांवर असतात. परंतु आपापल्या स्त्रियांवर वर्चस्व टिकविण्यासाठी मात्र त्यांच्यात एकजूट व समान हितसंबंध असतात. या व्यवस्थेत स्त्रियांच्या श्रमाला हमखास कनिष्ठ दर्जा दिलेला असतो.

**२. लैंगिकतेवर आधारित श्रमविभागणी -**

आज जगात दिसणारी स्त्रियांचे काम, पुरुषांचे काम ही विभागणी 'नैसर्गिक' नाही. यासाठी घरकाम पूर्णपणे स्त्रियांचे क्षेत्र कधी आणि कसे झाले हे समजून घ्यावे लागेल. तसेच स्त्रियांना सार्वजनिक क्षेत्रात येण्यास किंवा घराबाहेर काम करण्यास कधी उत्तेजन दिले जाते हेही पाहिले पाहिजे.

**३. लिंग आणि लिंगभाव -**

स्त्री वा पुरुष असणे हा निसर्गदत्त भाग आहे. पण या नैसर्गिक भिन्नतेचे पुढे विषमतेमध्ये रूपांतर होते.ही विषमता सामाजिक प्रक्रियेत घडविली जाते. मूल जन्मले की त्याला मिळणारे नाव आणि कपडे, सर्व तऱ्हेचे संस्कार ह्यातून लिंगभाव घडविला जातो. ह्यातच भर पडते ती आपण ज्या जातीत जन्मलो त्याची. उदा. उच्च वर्गीय स्त्री, दलित स्त्री इ.

## ४. स्त्रीमुक्तिवाद -

अमेरिका,जपान आणि युरोपातील अनेक देशांमध्ये १९६२ नंतर आधुनिक काळातील स्त्री प्रश्नांसंबंधी चळवळ सुरू झाली.या चळवळीत मांडल्या गेलेल्या विचारांना 'स्त्रीवाद' किंवा 'स्त्रीमुक्तिवाद' असे नाव पडले.एलेन शोवॉल्टर ने साहित्य शास्त्राची रूपरेषा मांडली. ह्या चळवळीत विविध वैचारिक छटा असल्या तरी स्त्रियांना स्वतःचे आयुष्य स्वायत्तपणे घडविण्याचा अधिकार आहे, हे मूळ सूत्र दिसते.

स्त्री - पुरुषांमध्ये असणाऱ्या शारीरिक भिन्नतेमुळे स्त्रिया दुय्यम झाल्या नाहीत तर इतिहासात व आजही ही भिन्न समाज व्यवस्थांनी स्त्री पुरुषांच्या शारीरिक भिन्नतेला जे अर्थ दिले, जे मूल्य चिकटविले त्यामुळे स्त्रियांची दडपणूक होते हा विचार आहे. हा विचार राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांना आव्हान देतो.

स्त्री-पुरुषांमध्ये येणारा लिंगाधिष्ठित साचेबंदपणा, पुरुषांच्या स्त्रीविषयक प्रतिमा, स्त्रियांना परंपरेने मिळणारी भूमिका, पुरुषशाही इ. अनेक मुद्यांना या विचाराने हात घातला.

**मराठी साहित्य क्षेत्रातील समीक्षकांचे प्रयत्न** : डॉ. शोभा पाटील यांनी मराठीतील स्त्रीवादी प्रयत्नांचा मागोवा घेत समीक्षा विचारांची मांडणी केली आहे. त्या लिहितात, पं. रमाबाई, ताराबाई शिंदे, म. गांधी, डॉ. आंबेडकर, म. फुले इ. विचारवंतानी प्रत्यक्ष कृती आणि संघर्ष करतच विचारांची मांडणी केली. त्यातूनच मराठीतील 'स्त्रीमुक्ती' विचारांची पायाभरणी प्रारंभीच्या काळात झाली आहे. १९७५ नंतर पाश्चात्य स्त्रीवादी विचारांचा प्रभाव जाणवतो.

स्त्रीवादी साहित्य समीक्षा ही स्त्रीवादी चळवळीची परिणती आहे. साहित्याच्या क्षेत्रात पुरुषप्रणीत सौंदर्य शास्त्रही नाकारून, समीक्षा विचारांची नवीन मांडणी करणे हे स्त्रीवादींचे उद्दिष्ट आहे. स्त्री वा पुरूष लेखकांच्या साहित्यात व्यक्त झालेली पुरुष प्रधान संस्कृती, विषममूल्यव्यवस्था इ.चा दंभस्फोट करणे, 'स्त्री' निर्मित साहित्यातील स्त्रीविशिष्ट अनुभव विश्व, स्त्री संस्कृती, स्त्री भाषा इ. चे स्वरूप पाहणे, त्यांचे अर्थनिर्णयन व मूल्यमापन करणे हे स्त्रीवादी समीक्षेतून घडताना दिसते

इतिहास, मनववंशशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, चिन्हमीमांसा इ. ज्ञान शाखांचे साहाय्य घेऊन स्त्री साहित्य निर्मिती मागील प्रेरणा, स्त्री साहित्याची परंपरा, वाङमयेतिहासाची व परंपरेची पुनर्रचना, साहित्याचे लिंगसापेक्ष वाचन, स्त्रीभाषा - स्त्रीकेंद्री ज्ञानमीमांसा अशा

विषयांच्या दिशा स्त्रीवादी समीक्षेला मिळालेल्या दिसतात, हे डॉ. शोभा पाटील आपल्या विवेचनात स्पष्ट करतात.

**स्त्रियांचे कथालेखन:** 'नवी दृष्टी नवी शैली' या ग्रथात डॉ. मंगला वरखेडे यांनी स्त्रियांविषयीच्या साहित्य अभ्यासाची नवी दृष्टी स्पष्ट करताना पाश्चात्त्य स्त्रीवादी अभ्यासक एलेन शोवॉल्टरने सुचविलेले फेमिनाईक क्रिटिक (पुरुषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन) व गायनोक्रिटिक (स्त्री- साहित्याची समीक्षा विश्लेषण) हे दोन प्रकार विशद करतात ह्याच लेखात त्यांनी स्त्री साहित्याची भाषा विशिष्टता, स्त्रियांची शैली विशिष्टता यांचे विश्लेषण केले आहे. त्यांचा 'स्त्रीवादी समीक्षा, संकल्पना आणि उपयोजन' हा ग्रंथही प्रसिद्ध झाला आहे.

'स्त्रीवादी समीक्षा - स्वरूप अणि उपयोजन' या ग्रंथातून डॉ. अश्विनी धोंगडे यांनी स्त्रीवादी समीक्षेचे स्वरूप स्पष्ट करताना पाश्चात्त्य स्त्रीवादी समीक्षेची मांडणी केली आहे. स्त्रीवाद आणि स्त्रीप्रधानता यातील भेद सांगून स्त्रियांचे लिखाण स्त्रीवादी असेलच असे नाही, स्त्रीवादी समीक्षा पुरुषांची पुस्तकेही हाताळू शकते, हे त्या स्पष्ट करतात. एलेन शोवाल्टरने पाश्चात्त्य समीक्षेला दिलेली तात्त्विक बैठक त्यांनी नेमकेपणाने मांडली आहे. स्त्रीवादी विचारसरणीमागील गृहीतके म्हणून मांडणी करताना त्या लिहितात, स्त्रियांच्या स्वभावाकडे पुरुषी चष्म्यातून न पाहता पुरुषनिरपेक्ष अभ्यास करावा लागेल. लिखाणाच्या पद्धतीचा लिंगाधारित डावपेचांशी संबंध येतो म्हणून वाङ्मयीन संस्कृतीच्या परंपरेत पुरुषी मानकांचा वापर करून स्त्रियांच्या विद्‌वत्तेला व लिखाणाला वगळण्यात येते वा दुय्यमस्थान दिले जाते. स्त्रीवादी समीक्षेचे उपयोजन म्हणून पुराणांतील कथा-कहाण्या, स्त्रियांच्या कविता, कांदबरी, आत्मचरित्रलेखन इ. मधील निवडक कलाकृतींचे स्त्रीवादी दृष्टिकोणातून पुनर्वाचन त्यांनी केले आहे.

'विभावरी शिरूरकर यांचे वाङ्मय - स्त्रीवादी आकलन' या ग्रंथातून डॉ. उषाताई शिंदे यांनीही स्त्रीवादी समीक्षेचे स्वरूप व व्याप्ती स्पष्ट करून पुरुषसत्ताक समाजातील स्त्रीचे स्थान, ताराबाई शिंदे यांची जहाल भूमिका, गांधीवादी दृष्टीतून स्त्रीवाद इ. मुद्यांची मांडणी केली आहे. वेगळेपण म्हणजे डॉ. बाळकृष्ण कवठेकर व प्रा. गो.मा. पवार इ. मराठी समीक्षकांची स्त्रीवादाचा प्रतिवाद करणारी भूमिकाही त्यांनी मांडली आहे.

डॉ. मनोहर जाधव संपादित 'समीक्षेतील नव्या संकल्पना' या ग्रंथात डॉ. मंगला वरखेडे यांचा स्त्रीवाद व अरुणा दुभाषी यांचा भारतीय स्त्रीवाद हे स्त्रीवादावरील दोन लेख समाविष्ट आहेत. अरुणा दुभाषी यांनी भारतीय स्त्रीवाद

आकाराला येऊ शकेल का? यादृष्टीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय समाजातील सांस्कृतिक लिंगभेद, जैविक लिंगभेद, इथल्या पुरुषप्रधान व्यवस्थेचे राजकारण, प्राचीन भारतीय समाजातील स्मृतिग्रंथानी निश्चित केलेल्या आचारधर्मातून स्त्रियांना दिलेले शूद्रांप्रमाणे स्थान, अर्थ-धर्म-काम-मोक्ष इ. पुरुषार्थ, ब्रह्मचर्याश्रम-गृहस्थाश्रम-वानप्रस्थाश्रम-संन्यासाश्रम इ. मधील पुरुषकेंद्रितता तसेच प्राचीन भारतीय संस्कृत वाङ्मय, शिल्पकला, देवदासी प्रथा इ. मधून स्त्रीची भोगवस्तू म्हणूनच मांडणी कशी झाली इ. मुद्यांची त्यांनी चर्चा केली आहे. शाक्तदर्शन, तंत्रमार्ग, महानुभाव, वारकरी, लिंगायत इ. विविध पंथांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोणाची चर्चा करून संत कवयित्री व भारतीय/महाराष्ट्रीय राजकारणातील जिजाबाई, ताराबाई, उमाबाई दाभाडे, अहिल्याबाई होळकर यांच्या व्यक्ती म्हणून कार्याचा परामर्श त्या घेतात. भारतीय समाजकारणातील गांधी-आंबेडकरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोणही त्यांनी स्पष्ट केला आहे. भारतीय विवाहपद्धती पातिव्रत्य, सतीत्व, पुनर्जन्म संकल्पना, उत्पादन प्रक्रियेत स्त्रीला स्थान नसणे. इ. मुद्यांवरही या लेखात चर्चा येते. तसेच १९७५ नंतरच भारतात स्त्रीवादी विचारसरणी खऱ्या अर्थाने दिसू लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. भांडवलशाहीत स्त्री देहाला क्रयवस्तूचे रूप प्राप्त झाल्याचे त्या लिहितात.

डॉ. माया पंडित यांनी 'आरपार लयीत प्राणांतिक' या प्रज्ञा पवारांच्या दीर्घ कवितेला लिहिलेली प्रस्तावनाही यादृष्टीने लक्षणीय आहे. कष्टकरी-दलित स्त्रीवादी मांडणी करताना समाजाच्या सर्वात खालच्या पायरीवर जगणाऱ्या बहुजन समाजातल्या बाईच्या जीवनसंघर्षाचे सर्जक आलेख संत, दलित आणि कामगारवर्गाच्या साहित्य निर्मितीच्या पायवाटांवर मिळतात. पण वर्तमानात जागतिकीकरण, नवभांडवलशाही, नवा साम्राज्यवाद, माणसाचे आणि निसर्गाचे रूपांतर क्रयवस्तुत करणारी भांडवलशाही इ. मधून श्रमिक बाईच्या शोषणाचे नवनवे मार्ग उभे राहिल्याचे त्या सांगतात. जातसत्ता-वर्गसत्ता-धर्मसत्ता-पितृसत्ताकता इ. समाजातील सत्ताकारणातील प्रभाव क्षेत्रांमध्ये सर्व पुरुष, सर्व स्त्रिया समान असू शकत नाहीत. त्यातही दलित स्त्रीच्या स्थानाची त्यांनी चर्चा केली आहे.

'स्त्रीवादी प्रश्नांची वाटचाल' या ग्रंथातून विद्युत भागवत साहित्याचे स्त्रीवादी वाचन कसे करावे हे सांगतात आणि संत कवयित्रींची कविता, रणांगण, मला उद्ध्वस्त व्हायचंय, रंग-२ इ. मराठी कलाकृतींचे स्त्रीवादी वाचन आणि कमल देसाई व गौरी देशपांडे यांच्या साहित्याची स्त्रीवादी दृष्टिकोणातून चर्चा त्यांनी केली आहे.

❀❀❀

# बालसाहित्याच्या संशोधनाचे स्वरूप

प्राचार्य डॉ. सौ. शोभा इंगवले

**प्रास्ताविक:**

मराठी साहित्य संशोधनाच्या क्षेत्रामध्ये विविध साहित्यप्रकारांवर संशोधन झालेले आहे. अर्वाचीन काळामध्ये अनेक संशोधकांनी विविध प्रेरणा आणि प्रवृत्तींमधून संशोधनक्षेत्राचा विकास साधलेला आहे. प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय प्रेरणेतून संशोधन कार्याला सुरुवात झालेली आहे. विशेषत: ज्ञानप्राप्तीच्या जिज्ञासेतून विविध साहित्यप्रकारासंदर्भात संशोधकांनी परिश्रमपूर्वक संशोधन केलेले आहे. बालसाहित्य हा मराठी वाङ्मयप्रकारांपैकी अत्यंत महत्त्वाचा असा साहित्यप्रकार आहे. बालसाहित्यावरही काही संशोधकांनी महत्त्वपूर्ण संशोधन केलेले आहे. बालसाहित्याचे क्षेत्र संशोधकांना आवाहन आणि आंव्हान करण्याइतपत व्यापक आहे. आजच्या काळातही बालसाहित्यावर मोठ्या प्रमाणावर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणूनच त्यासंदर्भातील माझी काही निरीक्षणे प्रस्तुत लेखात मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

बालसाहित्य हा साऱ्या साहित्याचाच एक भाग आहे. परंतु बालसाहित्याबद्दल अनेक अपसमज निर्माण झालेले दिसतात. बालसाहित्य निर्मितीला प्रतिभेची गरज नसते असा गैरसमज आहे. पण कोणतीही अस्सल कलाकृती हे प्रतिभेचेच अपत्य असते हे विसरून चालणार नाही.

बालसाहित्याकडे विशुद्ध कलाकृती म्हणून स्वयंपूर्ण साहित्यप्रकार म्हणून पाहिले जात नाही. बालसाहित्याची मोठ्या प्रमाणावर समीक्षा होऊ शकली नाही. कुठल्यातरी साध्याचे एक साधन म्हणूनच बालसाहित्याकडे पाहिले गेले. बालसाहित्याकडे 'संस्कार साहित्य' म्हणूनच पाहिले गेले हा हेतू महत्त्वाचा आहे आणि आवश्यकही आहे. कोणतेही साहित्य कळत-नकळत 'संस्कार' करत असते हे मान्य केले पाहिजे. प्रौढांच्या साहित्याप्रमाणे हा सिद्धांत बालांच्या साहित्यातही खरा आहे हे समजून घेतले पाहिजे. बालसाहित्य ही गौण साधनसृष्टी नसून ती प्रौढ साहित्याइतकीच स्वतंत्र, महत्त्वाची व स्वायत्त सृष्टी आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

बालसाहित्य म्हटले की, नकळत एक थोडीशी कमी प्रतीची भावना मनात उद्‌भवते. जी गोष्ट बालसाहित्याची तिच गोष्ट बालसाहित्याच्या संशोधनाकडे पाहण्याची आहे. बालसाहित्याच्या संशोधनाचे महत्त्व मी पीएच्.डी. साठी मराठी बालकवितांचा शोध घेतलाना मला विशेष जाणवले. प्रस्तुत लेखामध्ये ते विशद करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

बालसाहित्याचा अभ्यास करताना मला जाणवले की बालसाहित्य व बालसाहित्यकार यांना कमी लेखणे योग्य नाही. कारण मुलांची मने कळल्याशिवाय बालसाहित्य लिहिताच येत नाही. मुलांच्या मनातले, मुलांच्या मनासारखे करायला आधी त्यांच्या मनात प्रवेश करावा लागतो. त्यांचे चालणे-बोलणे, वागणे, खेळणे, खाणे-पिणे हे सारे त्यांच्यात मिसळून अखंडपणे पाहिल्यास निरर्थक म्हणून जे आपण पाहातही नाही त्यातच अपरंपार भरलेला अर्थ आणि तुडुंबलेला आनंद ज्यांना कळतो अशा प्रतिभावांनाच बालसाहित्य लिहिता येते. मुलांच्या प्रत्यक्ष वास्तवसृष्टीतून मुलांचे साहित्य निर्माण होत असते. हीच बालसाहित्याची आधारभूमी असते.

मुलांची कल्पनासृष्टी व भाषा आत्मसात करून ज्याला प्रौढवयात बालमनाशी समरस होता येते अशा प्रतिभावंतांकडूनच उत्तम बालसाहित्याची निर्मिती होते. हे लक्षात घेता बालसाहित्य निर्मिती ही एक अवघड कला आहे हे लक्षात येते. अशा बालसाहित्याला बालविश्वात अनन्यसाधारण असे स्थान असल्याने या बालसाहित्याच्या अभ्यासाची आवश्यकता आहे असे मला वाटते. मराठी साहित्याच्या क्षेत्रामध्ये बालसाहित्याने आपले वेगळे अस्तित्व सिद्ध केलेले आहे. त्यामुळेच अनेक संशोधक या विषयाकडे आकर्षित झालेले आहेत. पुणे विद्यापीठात सुलभा शहा यांनी बालसाहित्याचा अभ्यास केलेला आहे. लीला पुरंदरे यांनी 'आनंद' मासिकावर तर सुनिल शिंदे व विद्यागौरी टिळक यांनी 'बालबोधमेवा' या बालमासिकावर संशोधन केले आहे.

बालसाहित्यातील एक एक साहित्यप्रकार अभ्यासाला घेऊन त्यावर संशोधन होण्याची गरज आहे. त्यामुळे मी आधुनिक मराठीतील बालकविता हा संशोधनासाठी विषय निवडला. या संशोधनातून बालकविता हा एक वैशिष्ट्यपूर्ण काव्यप्रकार आहे असे मला वाटले. मराठीतील बालसाहित्याचा उगम व स्वरूप, बालकवितेची संज्ञा व स्वरूप वैशिष्ट्ये, बालकवितांचे सन १८८५ ते १९२०, १९२० ते १९५०, १९५० ते १९८५ असे कालखंडानुसार वर्गीकरण करून महत्त्वाच्या बालगीतकारांच्या विशेषत: रे. टिळक, भा.रा. तांबे, माधव ज्युलियन, बालकवी, वा.गो. मायदेव, कवी यशवंत, ग.ह. पाटील, भ.श्री. पंडित, गोपीनाथ तळवळकर, कुसुमाग्रज,

लीलावती भागवत, सरिता पदकी, शांता शेळके, वि.म. कुलकर्णी, राजा मंगळवेढेकर, विंदा करंदीकर यांच्या बालकवितांची वैशिष्ट्ये विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. बालकवितांचे वर्गीकरण स्वरूपानुसार व विषयानुसार केले आहे. मी अभ्यासलेल्या कवितांचीही वर्गवारी त्यानुसार केलेली आहे आणि त्याचे वेगळेपण स्पष्ट केले आहे. स्वरूपानुसार वर्गीकरणामध्ये अंगाई गीते, क्रीडा गीते, नृत्य गीते, बडबड गीते, कथात्म गीते, समूह गीते, अभिनय गीते, सैनिक गीते, संवाद गीते यांचा समावेश होतो तर विषयानुसार केलेल्या वर्गीकरणामध्ये सृष्टी, प्राणी, वनस्पती, शाळा, बाई, नातेवाईक इत्यादी बालविश्वाशी संबंधित सर्व विषयांचा समावेश होतो. अनेक बालगीतकारांच्या विविध विषयांवरील कवितांमधून जाणवलेल्या विशेषांचे स्पष्टीकरण करताना नाद, लय, ताल व ठेका, कल्पना सौंदर्य, बालभावनांचे यथार्थ चित्रण, विषयाचे वैविध्य, विनोदमयता, अभिनयप्रेरकता, चित्रमयता, रसपरिपोष, साधी, सोपी, अर्थपूर्ण शब्दयोजना इत्यादीतून बालकवितेतील सौंदर्याचा प्रत्यय येतो.

एकूणच गेल्या दीडशे वर्षात मराठी बालसाहित्य नवनवी वळणे घेत समृद्ध होत आहे. आता अवघे जगच एका नव्या टप्प्यापाशी येऊन उभे ठाकले आहे. आधुनिक विज्ञानाने नवी परिस्थिती निर्माण केली आहे. जगाच्या जाणिवांचे क्षेत्र रुंदावत आहे. विज्ञानामुळे मुद्रणकलेत लागलेल्या विविध शोधांमुळे दूरदर्शन, संगणक यांच्या वाढत्या वापरामुळे बालसाहित्यातही लक्षणीय बदल होत आहेत. अशा बालसाहित्याचा विविध अंगाने अभ्यास होण्याची आवश्यकता वाटते. या विषयावरील संशोधन कशाप्रकारे होऊ शकेल हे येथे मांडणे महत्त्वाचे वाटते.

१) सन १९७५ नंतरच्या बालसाहित्याचा अभ्यास
२) कथा, बालनाटके, बालकादंबऱ्या, विज्ञानकथा अशा एक एक वाङ्मय प्रकाराचा अभ्यास
३) लोकसाहित्यातील बालगाणी व बालकथांचा अभ्यास
४) बालकुमार साहित्यसंमेलनातील अध्यक्षीय भाषणांचा अभ्यास
५) खेळगडी, बालोद्यान, मुलांचे मासिक, शाळापत्रक, इत्यादी खास बालांसाठी प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचा अभ्यास
६) आंतरविद्याशाखीय पद्धतीने बालसाहित्याचा अभ्यास (अ) पाठ्यपुस्तकातील बालसाहित्य, (ब) मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून बालसाहित्याचा अभ्यास
७) भारतीय भाषांमधील बालसाहित्याचा तौलनिक अभ्यास.

थोडक्यात बालसाहित्यावर संशोधन करण्यासाठी संशोधकांना बरीच संधी आहे. संशोधनासाठी विषयाची वानवा नाही. मात्र निष्ठावंत संशोधकांची गरज आहे. परिश्रमाची तयारी असेल, अभ्यासाचा ध्यास असेल व चिकित्सक दृष्टी असेल तर संशोधन क्षेत्रात भरीव कामगिरी होईल असे मला वाटते.

**समारोप :**

मराठी साहित्य संशोधनाच्या क्षेत्रामध्ये एकूणच झालेल्या संशोधनापैकी बालसाहित्य काहीसे दुर्लक्षित राहिलेले जाणवते. बालसाहित्यावर मोठ्या प्रमाणावर संशोधन होणे गरजेचे आहे. साधारणत: ११व्या शतकापासून मराठीमध्ये वाङ्मयनिर्मितीला सुरुवात झाली. तथापि लोकसाहित्याला प्राचीन परंपरा लाभलेली आहे. मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्यामध्ये बालसाहित्यविश्वाला विशेष प्रमाणात प्राधान्य दिलेले जाणवते. विशेषत: बालगीते आणि बालकथा यावर फारसे संशोधन झालेले दिसत नाही. लोकसाहित्यातील बालसाहित्याकडे संशोधकांचे लक्ष वेधले जावे तसेच आधुनिक काळातील मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रामध्ये बालसाहित्य लिहून ज्यांनी मोलाची भर घातलेली आहे त्या समग्र बालसाहित्याचा अभ्यास आणि संशोधन होणे आजच्या काळात महत्त्वाचे वाटते. कारण ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या या युगामध्ये संस्कारक्षम बालमनावर अपेक्षित संस्कार व्हावेत आणि बालवाचकांची वाचनाभिरुची अधिक संपन्न आणि सकस व्हावी व राष्ट्राची भावी पिढी सुजाण व्हावी यासाठी हे संशोधन फलदायी ठरेल असा विश्वास वाटतो.

❀❀❀

# दलित साहित्य संशोधन

डॉ. शशिकांत साळवे

संशोधन प्रक्रिया अगदी मानवाच्या अस्तित्वापासून निर्माण झालेली, चालत आलेली प्रक्रिया आहे. परंतु खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, बाजारीकरण आणि आधुनिकीकरण या काळात या संशोधन प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामधून ज्ञानाचे एकही क्षेत्र अलिप्त राहू शकत नाही. विकसित देशात या संशोधन प्रक्रियेचा वेग झपाट्याने वाढत चालला आहे. त्या तुलनेत विकसनशील देशात हा वेग थोडासा कमी पण विचार करायला लावणारा असाच आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये संशोधन कार्य चालू आहे. मग ते नैसर्गिक शास्त्र असो वा भौतिक, सामाजिक अथवा मानव्य विज्ञान असो. या सर्वच विद्याशाखांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात संशोधन कार्य चालू आहे. अगदी साहित्यक्षेत्र देखील यापासून अलिप्त राहू शकले नाही. मानवी जीवन व्यवहारात साहित्य आणि कलेला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्याद्वारेच मानवाच्या भाव-भावना मुक्रर झाल्या आहेत. त्याचा जीवनसंघर्ष, विचार, भावना आणि मनाचा आविष्कार साहित्यातून झाला आहे. मानव शेवटी समाजात वावरत असल्याने त्याने निर्माण केलेल्या साहित्याचा सामाजिक अंगानेही विचार होणे क्रमप्राप्त आहे.

साहित्य-विज्ञान-कला यांना मानवी जीवनात विशेष स्थान लाभले आहे. उपरोक्त तीनही घटकांमुळे मानवी विकास तर झालाच आहे, परंतु मानवाला 'स्व'च्या अस्तित्वाची देखील जाणीव झालेली आहे. विज्ञानाने मानवात भौतिक बदल घडवून आणले. बुद्धीला चालना दिली. पण साहित्याने मानवाच्या भावनेलाच हात घातला, आव्हान दिले. साहित्य केवळ मनोरंजन करीत नाही, तर मनोरंजनाबरोबरच समाजप्रबोधन आणि सामाजिक परिवर्तन देखील घडवून आणते ही बाब संशोधन प्रक्रियेमुळे निदर्शनास आली.

संशोधन प्रक्रियेमुळे साहित्याचे सखोल चिंतन वाढले, दुर्बोध विषयाचे आकलन सोपे व्हावयास मदत झाली. साहित्य समीक्षणाबरोबच संशोधन प्रक्रिया महत्त्वाची कशी आहे तेही समजले. परिणामी साहित्याचा अभ्यास बहुआयामी झाला.

साहित्याचे संशोधन करताना केवळ कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र यांचे कथानक सांगणे नव्हे अथवा पात्रपरिचय करून देणे नव्हे किंवा मूल्यमापन नव्हे तर साहित्यनिर्मिती प्रक्रियेत तत्कालीन, समाजजीवन संस्कृती, परंपरा, काळ या सर्वच बाबींना विशेष महत्त्व प्राप्त होते. एवढेच नव्हे तर त्या काळची समाजरचना आणि संस्कृतिविशेषांचाही अभ्यास करणे सोयीस्कर होते. नव्याने एखाद्या गोष्टीचा अन्वयार्थ लावणे सोपे जाते. विज्ञानात जसा सत्याचा शोध घेता येतो. अगदी त्याच पद्धतीने साहित्यात देखील सत्यापर्यंत जाता येते. म्हणजेच साहित्य हे देखील एक प्रकारचे शास्त्र असू शकते हे संशोधनामुळेच आधुनिक युगात मानवाला समजण्यास मदत झाली आहे.

या पार्श्वभूमीवर दलित साहित्याचे संशोधन आजपर्यंत कसे झाले आहे? हे संशोधन करताना कोणते निकष वापरावेत त्याचबरोबर काळाचा संस्कृतीचा या साहित्यावर कितपत परिणाम झाला आहे हाही विचार तितकाच महत्त्वाचा आहे. महाविद्यालयीन आणि विद्यापीठ स्तरावर दलित साहित्याचा खूपच विस्तृत अभ्यास झाला आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर या साहित्याने नावलौकिक मिळविला आहे. प्रस्थापित मराठी साहित्याची जितकी दखल जागतिक पातळीवर घेतली गेली, त्याच्या दहापट दलित साहित्याची दखल विश्व साहित्यात घेतली गेली. संशोधनाच्या पातळीवर जाऊन विचार करता दलित साहित्य हेच विश्वसाहित्य आहे असे वाटायला लागले. दलित साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित, प्रवासवर्णन, वैचारिक आणि समीक्षात्मक या सर्वच पातळ्यांवर लेखन झाले आहे. वेगवेगळ्या भाषांमध्ये दलित साहित्याचे भाषांतर झाले आहे. अगदी 'ज्ञानेश्वरी' हा मराठी भाषेतील महत्त्वाचा ग्रंथ, त्याची जितकी दखल घेतली गेली, त्याच्या हजारोपट जास्त दखल दलित साहित्याची घेतली गेली आहे. म्हणूनच दलित साहित्याचे संशोधन करताना अगदी आर्य-अनार्य संबंध पडताळून पाहणे गरजेचे आहे. त्याचबरोबर या भारतातील मूळ वंशजांचे म्हणजेच नाग लोकांचाही विचार होणे अभिप्रेत आहे. इ.स. पूर्व विचार करता संपूर्ण भारत बौद्धमय होता. म्हणजेच आर्य सोडून येथील आजही सर्वच रहिवासी समाज बौद्धमयीच आहे. परंतु दलित साहित्याच्या अभ्यासकांनी आणि संशोधकांनी प्रभावीपणे या बाबी अधोरेखित न केल्यामुळे या समाजाला आपल्या अस्तित्वाचे वेगळेपण लक्षात येत नाही.

म्हणूनच दलित साहित्य संशोधन हे अगदी सूक्ष्म पातळीवर जाऊन झाले पाहिजे. दलित साहित्याचे उद्गाते-प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर

हे तर आहेत, परंतु त्याचबरोबर फुले, शाहू, वि. रा. शिंदे हेही समाजसुधारक समजावून घेणे मला महत्त्वाचे वाटते. तरच दलित साहित्याचे मूलगामी संशोधन होऊ शकते. त्याचबरोबर बुद्ध धर्मातील प्रमाण ग्रंथ म्हणून 'त्रिपिटक' या ग्रंथाचा बारकाव्याने अभ्यास करून दलित साहित्य संशोधनात हा ग्रंथ मैलाचा दगड ठरू शकतो. हाही विचार झाला पाहिजे. शिवाय प्रस्थापित मराठी साहित्यनिर्मितीच्याही अगोदर 'अश्वघोष' या बौद्धकालीन विद्वान पंडिताने साहित्यनिर्मिती केली आहे. उदा. 'बुद्धचरित्र', 'लंकावतारसूत्र', 'अवदानकल्पकता', 'ज्ञानोदय' याही ग्रंथांचा या संशोधनात विचार झाला पाहिजे. दिग्नाक याही विचारवंताचा या साहित्य संशोधनात विचार होणे अभिप्रेत आहे. चिनी प्रवासी हुएन-त्सांग याने म्हटले आहे, "चार सूर्यांनी सगळे जग प्रकाशित करून सोडले आहे. त्यापैकी एक सूर्य अश्वघोष हा होय." ह्यावरून दलित साहित्य संशोधनात अश्वघोष हा विचारवंत किती महत्त्वाचा आहे, हे सहज लक्षात येते.

दलित साहित्य संशोधनामध्ये बौद्ध धर्माची तत्त्वे, वैशिष्ट्ये समजणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. ईश्वर-आत्मा या संकल्पना हा धर्म नाकारतो. माणुसकी हे मूल्य शिरोधार्य मानतो. 'त्रिपिटक' या ग्रंथाद्वारे लोकांची बुद्धी, नीती व शास्त्रे यांचाही विकास बौद्धधर्माने करून सोडल्यामुळे मानवजातीच्या सुधारणेच्या बहुतेक साऱ्या ठळक अंगांचा तो इतिहास आहे. धर्म आणि नीती यांची सुरेख सांगड घालून देणारा, धर्म तत्त्वांना व्यावहारिक रूप देणारा, उदारमतवादी व अर्वाचीन शास्त्रीय तत्त्वांच्या कसोटीस पूर्णपणे उतरणारा असा हा पहिलाच धर्म आहे. एवढेच नव्हे तर धर्मसंबंधात नीतीचे महत्त्व विशद करणारा जगातला एकमेव असा हा धर्म आहे. म्हणून दलित साहित्य संशोधनात तो केंद्रवर्ती असणे आज क्रमप्राप्त झाले आहे.

दलित साहित्य संशोधनात डॉ. बाबासाहेबांनी लिहिलेला 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' त्याचबरोबर त्यांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सामरिक आणि वैचारिक ग्रंथलेखनाचा अभ्यास केल्याखेरीज दलित साहित्य संशोधन होऊच शकत नाही. त्याचबरोबर त्यांचा 'शूद्र पूर्वी कोण होते?' हाही ग्रंथ दलित साहित्य संशोधनात आगळावेगळा ठरणारा असाच आहे.

सारांश, दलित साहित्य संशोधनात उपरोक्त बाबी विशेष महत्त्वाच्या आहेत आणि त्या अंगाने दलित साहित्य हे संशोधन न राहता संशोधन हे समाज परिवर्तनाचे महत्त्वाचे साधन बनणे आवश्यक ठरते.

❀❀❀

# लोकसाहित्य व लोककलांचे संशोधन

**प्रा.डॉ. दिलीप कसबे**

मराठी लोकसाहित्य मराठी साहित्याचाच एक भाग आहे. पण लोकसाहित्याचा अभ्यास व संशोधन केवळ साहित्यिक दृष्टिकोणातून होते असे नाही. कारण त्याचा संबंध जीवनाच्या सर्व अंगांशी आहे. उदा. शेतकऱ्याची चारा रचन्याची पद्धत, सुतारकाम, लोहारकाम, चर्मकाराची चप्पल तयार करण्याची पद्धत, मांतंगाची दोरी तयार करण्याची पद्धत इ. या सर्व कौशल्यांचा विचार लोकसाहित्यात होतो. यांचा अभ्यास व संशोधन साहित्याच्या अंगाने होईलच असे नाही. लोकसाहित्यातील लोक-वैद्यक हा भाग तर वैद्यक शास्त्राच्या अंगाने तपासल्याशिवाय त्याचे संशोधन परिपूर्ण होणार नाही. म्हणजे लोकसाहित्याचे संशोधन हे व्यापक स्वरूपाचे आहे. व्यामिश्र स्वरूपाचे आहे. म्हणून तर पाश्चात्त्य देशात स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून केला गेला. भाषाशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र आणि संस्कृती अशा पद्धतीने संशोधन झाले व त्यातून संशोधन पद्धती व संप्रदाय उदयाला आले.

मराठीतील अभ्यासक आणि संशोधक आता लोकसाहित्याकडे वळाले आहेत. पण मराठी लोकसाहित्याचे संशोधन हे लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार अशा काही ठरावीक प्रकारांचेच प्रामुख्याने होत आहे. ''संशोधन म्हणजे ज्ञानाच्या एखाद्या शाखेत नवीन तथ्ये किंवा तत्त्वे शोधण्यासाठी किंवा जुनी तथ्ये किंवा तत्त्वे तपासण्यासाठी काळजीपूर्वक, पद्धतशीर व नेटाने केलेला अभ्यास होय.'' असा अर्थ वेबस्टरच्या शब्दकोशात दिला आहे. लोकसाहित्याचे संशोधन करताना पारंपरिक तथ्यांचा, तत्त्वांचा अभ्यास करून, शोध घेवून नवीन संदर्भानुसार त्याच्या स्वरूपाचा अभ्यास करावा लागेल. विविध समाजातील, मानसामानसातील संबंध, संघर्ष, संकल्पना, समज, गैरसमज, आधुनिक काळातील विचारसरणी, विचारप्रवाह, इ. ''समाजजीवनाबाबतीत नवी तथ्ये शोधण्यासाठी किंवा जुनी तपासण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे संशोधन.'' - पी. व्ही. यंग.

समाजाची जीवनशैली, संस्कृती, प्रतीके, तत्त्वज्ञान, जगण्याची पद्धती, परंपरागतता, एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले शास्त्रीय कौशल्य, ज्ञान यांचा विचार वरील व्याख्येत दिसतो.

लोकसाहित्याचा अभ्यास व संशोधन साहित्याच्या अंगाने झालेले आहे, होत आहे. पण कलेच्या अंगाने फारच कमी दिसते. लोककथा, लोकगीते, लोककथागीते, म्हणी, वाक्प्रचार, इ. भाषिक घटकांबरोबरच लोककला हा लोकसाहित्याचा घटक आहे, असे सर्वच अभ्यासकांनी आणि संशोधकांनी मान्य केले आहे. पण त्याच्यावर संशोधन होताना दिसत नाही. संशोधक लोककलेतील जागरण, गोंधळातील गीते, कलगीतुऱ्यातील आध्यात्मिक काव्य, वासुदेवाची गीते, दैवतकथा, लोककथेतील लोकजीवन, इ. शाब्दिक अंगाने होणे आवश्यक आहे. कलेच्या सर्व घटकांचा संशोधन अभ्यासात विचार व्हावा. पुन्हा नव्याने शोध घेणे, मांडणी करणे म्हणजे 'रि-सर्च' होय. लोककलांचे शास्त्रीय, मानवी, कला, अर्थ, सामाजिक, सांस्कृतिक या दृष्टीने संशोधन होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात अनेक लोककला प्रकार आहेत. त्या कला सादर करणारे कलाकार आहेत. त्या कलाप्रकारांचे सादरीकरण ज्या साधनांच्या माध्यमातून होते, ती साधने आहेत. कलाकारांचा स्तर, ज्यासमोर सादर केले जाते त्यांचा स्तर, त्यांची कलाकारांकडे बघण्याची दृष्टी, मानसिकता, वेळ, काळ, घटना, प्रसंग, धार्मिक, मनोरंजन, प्रबोधन, ज्ञानात्मक अशा अंगाने अभ्यास होणे गरजेचे आहे. कलाप्रकारांमध्ये काही साम्य-भेद असतात. कधी वाद्ये समान असतात. कधी बदललेली असतात. वाद्ये जरी समान असली तरी सादरीकरणाची पद्धत वेगळी असते. मढवण्याची पद्धत वेगवेगळी असते. याचा संबंध वेगळेपणात तपासावा लागतो. नंदीवाले आणि मरीआईवाले यांच्याकडे 'गुबूगुबू' हे वाद्य असते. पण नंदीवाल्याकडे असणारे सनई, सूर व इतर वाद्ये मरीआईवाल्याकडे नसतात. त्यांच्याकडे कडाख्याचा आवाज असतो. मरीआईचा नाचणारा पोतराज आणि नंदीवाला यांची वेशभूषा वेगळी असते. देवीचा पोतराज आणि मरीआईचा पोतराज यांच्यातही फरक असतो. नंदीवाला आणि पोतराज एखाद्या गावात जेव्हा जातात, तेव्हा विशिष्ट अशा मानाच्या घरी जातात. ते उच्च जातीतील मानाचे असते असे नाही तर बहुधा खालच्या जातीतील असते. जागरण, गोंधळ, भराड या लोककला प्रकारांचा विचार केला तर त्यांच्यामध्येही संबंध शोधता येईल. जागरण खंडोबाचे, गोंधळ देवीचा तर भराड भैरवनाथाचे असे परंपरागत चालत आले आहे. खंजिरी किंवा दिमडी व तुनतुने ही वाद्ये जागरण, गोंधळ, भराड करणाऱ्या लोककलावंतांच्याकडे असतात. पण वेगळी वाद्येही असतात. जागरण सादर करण्याकडे खंजिरी, घाटी, तुनतुने असेल; गोंधळ सादर करणाऱ्याकडे खंजिरी, तुनतुने, संबळ असेल (संबळ हा लग्न वाजवणाऱ्या वाजंत्र्याकडेही

असतो, परंतु गोंधळ्याचा संबळ आणि वाजंत्र्याचा संबळ भिन्न असतो.) तर भराड सादर करण्याऱ्याकडे 'डवर' हे वाद्य असते. सापाचा खेळ करणाऱ्या गारुड्याकडे जसा डमरू असतो, तसे हे वाद्य आहे. गारुड्याची आणि भराड्याची वाजवण्याची पद्धत वेगळी आहे. वाद्यातही थोडा फरक आहे. जागरण सादर करणारे वाघ्या-मुरूळी एकाच समाजातील, जातीतील असतीलच असे नाही. काही ठिकाणी खंडोबाच्या जागरणाला मुरूळी चालते. काही ठिकाणी चालत नाही. गोंधळ्यांच्यामध्येही रेणूराई गोंधळी आणि कदम गोंधळी असा फरक आहे. देवीचा गोंधळ घालणरे आणि सांकेतिक भाषेत नावे ओळखून गीत सादर करणारे जे शिवाजी महाराजांच्या काळात हेरगिरीचे काम करत होते, असा फरक दिसतो. भराडी, गोंधळी आणि जागरण करणारे लोक प्राचीन काळापासून कलेचे सादरीकरण स्वतंत्रपणे सादर करतात. पण आज जागरण गोंधळाला जोडून भराड सादर केले जाते. जागरण-गोंधळ दोन्हीही सादर करणारी एकच पार्टी असते. हा आजच्या काळात झालेला बदल यांचाही अभ्यास करावा लागेल.

सर्व कलांचे एकत्रिकरण असलेल्या तमाशा या कलाप्रकाराच्या संदर्भात तर खूप गोष्टींचा शोध घेता येईल. तमाशावर बरेच संशोधन झाले आहे. पण खूप बाकीही आहे. कारण या प्रकारात साहित्याची प्रचंड निर्मिती झाली आहे. शाहिरांची निर्मिती झाली आहे. एका शाहिराचा स्वतंत्र संशोधन विषय होईल, एवढे साहित्य शाहिरांनी निर्माण केले आहे. भाऊ फक्कड, अर्जुन वाघोलीकर, दगडोबा साळी, हरिभाऊ वडगावकर हे कवन करणारे तर जगताप पाटील, राजा पाटील, भांडे सरकार, नाथा मास्तर, घोडेगावरकर, शरद मुसळे सुरेश काळे आणि तमाशात तंत्र आणि वगनाट्यात बदल घडविणारे गणपत व्ही. माने चिंचणीकर अशा काही निवडक लेखकांचे स्वतंत्र संशोधनाचा अभ्यास होऊ शकेल एवढे साहित्य उपलब्ध आहे. गणपत व्ही. माने यांनी १४५ वगनाट्ये लिहीली आहेत.तमाशा कलाप्रकारात अभिनयाच्या अदाकारीच्या अंगानेही अभ्यास करता येऊ शकतो. तुकाराम खेडकर, दत्तोबा तांबे, दत्ता महाडिक पुणेकर, गुलाबराव बोरगावकर, काळू-बाळू, चंद्रकांत ढवळपूरीकर हे फडमालक गणपतराव सविंदणेकर, अनंत पांगारकर, जगन्नाथ शिंगवीकर अशा काही लोकांची नावे घेता येतील, ज्यांचे अभिनय कौशल्य, भाषा व सादरीकरणामुळे ते कायम मनात राहतात. पवळाबाई, विठाबाई, कांताबाई, चंद्राबाई, आजच्या काळातील सुरेखाबाई यांच्या गायनाची आणि अदाकारीची पद्धत यांचाही अभ्यास करता येऊ शकतो. खूप नावे सांगता येतील. चार-पाच पाने नुसती नावेच होतील इतकी नावे आहेत. तमाशावर

संशोधन झाले आहे. तरीही सर्व घटकांचा परिपूर्ण समावेश झालेला नाही. खानदेशी तमाशा, वायदेशी तमाशा, खडीगंमत ठाकरांचा तमाशा अशा प्रकारेही संशोधन करता येईल. लोककलांचे संगीत, त्यातील लय, ताल, ठेका, चाली, गती, तोडा, शब्द-शब्दांचे वजन, त्याला घेतलेला तोडा, कलाकाराचे चंद्रबळ या सर्व बाबींचा अभ्यास व संशोधन केले तर लोकसाहित्याचे आणि लोककलांचे सौंदर्य अधिकच खुलून येईल. त्याची नजाकत वाढेल. त्याचा आस्वाद अधिक सकस पद्धतीने घेता येईल. त्यासाठी त्या कलाप्रकारांविषयी जाण असणे गरजेचे आहे. केवळ संशोधन पदवीसाठी अभ्यास करून संशोधन केले तर ते परिपूर्ण होणार नाही. एम.फिल., पीएच.डी. पदवी मिळाल्यानंतर संशोधक या विषयात परत येत नाहीत.

लोककलेमध्ये काम करण्यासाठी खूप विषय आहेत. आदिवासी लोककला हा स्वतंत्र निबंधाचा विषय होईल. खूप कलाप्रकार आहेत. मी काही निवडक कलाप्रकारांची जुजबी माहिती दिली आहे. लोककलांतून शास्त्रीय कलांची निर्मिती झाली आहे. त्यामुळे शास्त्रीय कलांचे मूळही शोधता येईल. अनेक चित्रपट लोककला आणि लोक-कलावंत यांच्यावर तयार झाले आहेत. राम जोशी, पिंजरा, जोगवा, नटरंग, इ. गाढवाचं लग्न हा चित्रपट म्हणजे हरिभाऊ वडगावकरांचे वगनाट्यच आहे. चित्रपट व लोककला, चित्रपट व तमाशा, लोककलेचा प्रसार, माध्यमावरील प्रभाव, प्रसारमाध्यमांचा लोककलेवरील प्रभाव व परिणाम यांचाही अभ्यास होणे आवश्यक आहे. इतर राज्यांतील कला प्रकारांचा व महाराष्ट्रातील लोककला प्रकार यांच्यातील साम्यभेद शोधता येईल. जगताप पाटील व दत्ता महाडिक यांनी महाराष्ट्राबाहेरही तमाशाचे सादरीकरण केले आहे. लोककला सादर करणाऱ्यांच्या जाती, त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध, समाजातील लोकांची त्यांच्याकडे बघण्याची दृष्टी, त्यांचे होणारे शोषण, स्त्रियांच्या समस्या, दारिद्र्य, व्यसनाधीनता, कौटुंबिक स्थिती या सर्वांचा आजच्या उदारीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या, आधुनिकीकरणाच्या काळात अभ्यास होणे गरजेचे आहे. त्यासाठी कष्ट, जिद्द, चिकाटी, दक्षता, व्यासंग, तर्कशक्ती, नेमकेपणा, प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता, बौद्धिक क्षमता, आत्मविश्वासाने संशोधन केले पाहिजे. प्रबोधनात्मक, ज्ञानात्मक, विचारात्मक, तसेच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व प्रकारचा ठेवा आपल्याला सापडेल. लोकसाहित्य व लोककलांचे संशोधन म्हणजे आंतरविद्याशाखीय आहे. हा छंद बेधुंदपणे जोपासला तर उत्तुंग असे संशोधन त्यातून होईल, असे मला वाटते.

❀❀❀

# विभाग ‘इ’
# संकीर्ण

# संशोधन : - मानवी जीवनाला समृद्ध करणारी अभिक्रिया

**प्रा.डॉ. लता देशमुख**

आपल्या भोवतालच्या जगाशी माणसाचे असणारे अनेकपदरी व गुंतागुंतीचे नाते जाणून घेण्याच्या मूलभूत जिज्ञासेतूनच शोधवृत्तीचा उगम होतो .**'मानवी जीवनाला समृद्ध करणारी अभिक्रिया म्हणजे संशोधन'** अशा भूमिकेतून **डॉ. र. बा. मंचरकर** संशोधनाकडे बघतात.

साहित्याचे सर्जनशील असे प्रकृती वैशिष्ट्ये आणि मूल्ये यामुळेच साहित्याच्या संशोधनाकडे अभ्यासक वळत असतो. संशोधनाचा पाया हा साहित्याचे समीक्षायुक्त आकलन आणि संवेदनशील आस्वादन यावरच उभारला जात असतो. तार्किक चिकित्सा, जिज्ञासा आणि शेवटी मूल्यमापन अशा टप्प्यातून संशोधनप्रक्रिया घडत असते,विकसित होत असते.

**संशोधन प्रक्रिया :**

विज्ञान आणि सामाजिकशास्त्रे यांच्या स्वतंत्र अभ्यासपद्धती आहेत. तशी साहित्य संशोधनाची स्वतंत्र अशी खास पद्धती नाही. कारण साहित्य हे विशिष्ट स्वरूपी असते. साहित्याच्या संशोधनासाठी इतर विषयातील शोधपद्धतींचाच कौशल्याने वापर करावा लागतो. त्यामुळेच मराठी साहित्य संशोधन हे वेगवेगळ्या विषयांच्या पद्धतींनी प्रभावित झालेले दिसते.

संहिताचिकित्सा, पाठशोधन, पाठनिश्चिती हेच वैज्ञानिक पद्धतीचे साहित्य संशोधनातील योग्य क्षेत्र आहे. साहित्य आणि वंशदाय, युगमानव, काळ, सामान्य पर्यावरण यांच्या परस्पसंबंधांचा शोध या पद्धतीने घेतला जातो. साधनसंकलन व तथ्यशोधन पुरेशा वाङ्मयविवेकाने यात करावयास हवे. संशोधन जेव्हा तथ्यशोधनाच्या पातळीवर राहते तेव्हा त्याचे स्वरूप वर्णनविधानांचे असते. संशोघन जेव्हा तत्त्वशोधनाच्या पातळीवर जाते, तेव्हा त्याचे स्वरूप मूल्यविधानांचे होते.

**संशोधनाची उपयोगिता :**

साहित्य हे स्वभावत:च वादग्रस्त संकलनाचे क्षेत्र आहे. हा अनुभव संशोधकांना तर पदोपदी येत असतो. कारण साहित्य हा अभ्यासाचा विषयच होऊ शकत नाही येथपासून साहित्याच्या अभ्यासाला विज्ञानाचा दर्जा दिला पाहिजे अशी परस्परविरोधी मते आंदोलत राहतात. तसेच साहित्याची

व्यावहारिक उपयोगिता निश्चितपणे, ठामपणे निर्देशित करता येते किंवा नाही या प्रश्नाच्या भोवऱ्यातही साहित्य आंदोलन राहते. विज्ञानातल्या संशोधनाचा उपयोग जसा जीवनाच्या भौतिक सोयी-सुविधांसाठी करता येतो. तसा साहित्य संशोधनाचा उपयोग काय? असा प्रश्न उपस्थित केला जातो.

साहित्य समाजाचे प्रतिबिंब असते. असे आपण मान्य करतो. त्याचवेळी साहित्यातून मानवी हिताला उपयोगी पडतील अशा दुरुस्त्याही या प्रतिबिंबातून सूचित होतात,ध्वनित होतात. मानवी जीवनात मूल्यात्मकता टिकविण्याचे,जोपासण्याचे तसेच समृद्ध करण्याचेही भान वाचकाला साहित्यातून येत असते. तद्वतच संशोधनातून साहित्यातील मूल्यांची सूचकता, गर्भितता ही अधोरेखित केली जाते. तिला सुस्पष्टता येते.साहित्याचे ते सरगर्भ विश्लेषण असते. साहित्यातील मर्मस्थाने संशोधनातून उलगडून सांगितली जातात. साहित्यगत कलात्मकता, रसवत्ता यांचा उलगडा व भान संशोधनातून येते. साहित्यातील ही अनुभूती बुद्धिगम्य परिभाषेत तर्कशुद्धरीतीने एखाद्या संगतवार योजनेत बसवता आली म्हणजेच साहित्याच्या संशोधनाचे स्वरूप पूर्ण होते. या अभ्यासाला तथ्यशोधन, अनुबंधाचा उलगडा, सांकल्पनिक परिमाण लाभले की संशोधनमूल्य प्राप्त होते.

लेखक, वाचक, साहित्यगत विश्वरूप आणि भाषा ही साहित्याची अंगे आहेत. त्याचे स्वरूप आणि संबंध याविषयी वेगवेगळे दृष्टिकोण संभवतात. संशोधक आपआपल्या दृष्टिकोणानुसार विविध प्रकारे साहित्याचा अभ्यास करीत असतो. संशोधक स्वत:च्या सर्जनशील प्रतिभेने विविध पद्धतींचे उपयोजन करीत असतो. संशोधकाच्या प्रतिभेप्रमाणे एकाच पद्धतीचे उपयोजन वेगवेगळ्याप्रकारे घडू शकते. त्या उपयोजनामागे संशोधकाच्या साहित्यविषयक विशिष्ट भूमिकांचा स्वीकार असतो.

लौकिकतावादी आणि अलौकिकतावादी अशा दोन्ही पातळ्यांमधील कोणत्याही वाङ्‌मयीन भूमिकांवरून साहित्याचे संशोधन केले जाते. आस्वादन, वर्णन-विश्लेषण, तुलना-वर्गीकरण, विगमन-निगमन ही वाङ्‌मयाच्या संशोधनाची साधने आहेत. तर आकलन, विश्लेषण, अर्थनिर्णयन, संशोधन, मूल्यमापन, शब्दांकन अशा प्रक्रियांमधून साहित्याचे संशोधन जात असते, घडत असते.

साहित्य संशोधन हे साहित्यकृतीच्या आंतररचनेचा शोध घेणारे (स्वरूपनिष्ठ), कधी निर्मितीच्या अंगाने (लेखकनिष्ठ), कधी आस्वाद व परिणाम (वाचकनिष्ठ), तर कधी साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाचा (अनुबंधलक्ष्यी) वेध घेणारे असते. म्हणजेच साहित्यकती,

लेखक, वाचक आणि समाज या चतु:सीमेच्या परिघात साहित्याचे संशोधन केले जाते.

## वाङ्मयीन तारतम्य - संशोधन विवेक :

साहित्याची कारणमीमांसा करण्यासाठी कधी उत्पतीमार्गाने तर कधी अनुबंधकृती मार्गाने जावे लागते. साहित्यचिकित्सेपासून विरचनेपर्यन्तच्या (आशय-अभिव्यक्ती) अनेक पद्धतींचा वापर करून साहित्याचा अभ्यास करावा लागतो. साहित्यातील अनुभवाची तरलता शब्दगम्य करणे हे संशोधकाचे खरे काम आहे.

संहिता आणि वाचक यांच्या सहसर्जक प्रतिसादातून सौंदर्यवस्तू आकारला येते,अस्तित्वात येते. अलीकडे लेखकनिष्ठ संहिताकेंद्री विचारातून वाचकनिष्ठ प्रतिसादकेंद्री विचाराकडे जाण्याची गरज जाणवते आणि त्यानुसार कलाकृतीचे वस्तुनिष्ठ, वाचकनिरपेक्ष अस्तित्व आणि वाचकाची व्यक्तिनिष्ठ संज्ञा यांच्या द्वंद्वावर, त्यातील आंतरक्रियेवर संशोधकाला लक्ष केंद्रित करावे लागते. या अर्थाने साहित्य संशोधन म्हणजे दोन ध्रुवांमधील आंतरिक द्वंद्व आहे.व्यक्तिनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा या दोन ध्रुवांमध्ये अभ्यासकाची संज्ञा आंदोलत राहते. म्हणूनच साहित्याच्या संशोधनाला पूर्ण विज्ञानाचा दर्जा देता येत नाही. त्याचबरोबर त्यातील वस्तुनिष्ठ दृष्टिकोणही नाकारता येत नाही, असा पेच अभ्यासकासमोर असतो.

## संशोधन: साहित्यकृतीची प्रतिसंहिता :

ह्या पेचातून बाहेर येण्यासाठीच संशोधकाला विविध ज्ञानशाखांचा व विविध विषयातील पद्धतींचा खुल्या मनाने तसेच अभ्यासपूर्वक स्वीकार करावा लागतो. यातच विदेशी साहित्यप्रणालींना आपल्या साहित्यक्षेत्रात कितपत वा कोठवर प्रवेश द्यावा याचा विवेक बाळगणे आवश्यक ठरते. संशोधकाच्या भावलक्ष्यी प्रतिसादाला विचारलक्ष्यी करण्याइतपत यांचा वापर व्हावा आणि विशुद्ध वाङ्मयदृष्टी प्राप्त व्हावी वाङ्मयदृष्टीत तारतम्य यावे हेच संशोधनाचे फलीत ठरते. अशाप्रकारे साहित्यकृतीला दिलेला सर्जक प्रतिसाद शब्दबद्ध झाला की प्रतिसंहिता निर्माण होते आणि वाङ्मयाच्या संशोधनाला त्या अभ्यासविषयापुरते पूर्णत्व प्राप्त होते.

❀❀❀

# शिलालेखातील मराठी

**प्रा. डॉ. गणेश मोहोड**

भाषा ही मानवाला मिळालेले वरदान आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात विविध प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. भारतावर इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केले. सत्ताधीश इंग्रज असल्यामुळे आपल्या वर्चस्वाखाली असलेल्या भारतीयांवर त्यांनी आपली संस्कृती लादली. राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण या क्षेत्रांवर ब्रिटिशांनी आपला प्रभाव निर्माण केला. साहजिकच भारतीय जनमानसावर इंग्रजी संस्कृतीचा प्रभाव पडला. १९४७ ला ज्यावेळी भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी भारतापुढे अनेक आव्हाने होती. त्यातीलच एक म्हणजे प्रत्येक राज्यातील भाषेला उर्जितावस्था येऊन तिचा वापर राज्यकारभारात व्हावा. याकरिता भाषावार प्रांतरचना व्हावी. १९६० मध्ये ज्यावेळी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली व मराठी भाषिक राज्याचा जन्म झाला.

आज मराठी ही जगातील १० व्या क्रमांकाची भाषा आहे. कृ. पा. कुलकर्णी यांच्या मते, मराठी भाषा ही १३००-१४०० वर्षांपूर्वी अस्तित्वात आली होती. मराठी भाषेचा उद्‌गम नेमका केव्हा झाला, याबाबत ते आपल्या 'मराठी भाषा उद्‌गम व विकास' या ग्रंथात लिहितात, ''सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे समाज निरनिराळ्या काळी आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथेचे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या मिश्रणाने तयार झाली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोत्तर ६००-७०० च्या सुमारास झाली.''[१]

मराठी भाषेतील आद्य ग्रंथकर्तृत्वाचा मान मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर या दोन्हींपैकी एकास दिला जात असे. मुकुंदराजांनी लिहिलेला 'विवेकसिंधु' आणि ज्ञानेश्वरांनी लिहिलेली 'ज्ञानेश्वरी' या दोहोंपेक्षा कोणताही प्राचीन ग्रंथ मराठीत झाला नाही. तशी आवश्यकता कुणालाही भासली नाही, असे म्हणणे अप्रशस्त

आहे. असे मत वि. ल. भावे हे आपल्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात नमूद करतात. आपल्या मताचे स्पष्टीकरण करताना ते म्हणतात की, कोणताही अभिजात किंवा प्रतिभासंपन्न ग्रंथ एकाएकी निर्माण होणे कठीण आहे. पराक्रमी पुरुषाच्या पराक्रमाचा प्रारंभ ज्याप्रमाणे साम्राज्य स्थापना होऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे 'विवेकसिंधु' किंवा 'ज्ञानेश्वरी' सारखे अलौकिक ग्रंथ केव्हाही ग्रंथरचनेचा प्रारंभ असू शकणार नाही. 'विवेकसिंधु' आणि 'ज्ञानेश्वरी' प्रमाणेच म्हाईंभट याने लिहिलेला 'लीळाचरित्र' हा ग्रंथही जवळपास त्याच काळात लिहिला गेला. अशा प्रकारे मराठीच्या प्रारंभकाळातच असे अक्षरग्रंथ मराठी भाषेत लिहिले गेले आहेत. बाराव्या शतकापासून पुढे खऱ्या अर्थाने मराठी भाषा विकासाचा कालखंड सुरू झाला.

कोणत्याही भाषेचा नक्की जन्मकाळ सांगणे कठीण आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेची सुरुवात कधी झाली, हेसुद्धा निश्चित सांगता येत नाही. शालिवाहन शकाच्या नवव्या किंवा दहाव्या शतकापर्यंत पूर्णपणे मराठी असा एकही लेख उपलब्ध नाही. महाराष्ट्रीय अपभ्रंश भाषा ही मराठी भाषेची जननी असल्याचे आज संशोधनाअंती सिद्ध झाले आहे.

महाराष्ट्रामध्ये प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण ही सातवाहनांची राजधानी होती. या काळात स्त्रियांच्या तोंडी मराठी भाषा होती. या काळात लिहिले गेलेले साहित्य आणि कोरण्यात आलेले शिलालेख यात मराठीच्या अस्तित्वाचे पुरावे सापडतात, असे मत प्रख्यात भाषातज्ज्ञ व इतिहास संशोधक डॉ. मोरवंचीकर आपल्या अभिलेखातील मराठी या लेखात नमूद करतात. सातवाहन काळाप्रमाणे वाकाटक, चालुक्य आणि राष्ट्रकुट यांच्या राजवटीतही या भाषेचे अस्तित्व कुठे कुठे जाणवते. त्यानंतरच्या यादवकाळामध्ये तर ही भाषा वैभवसंपन्न म्हणूनच नावारूपाला आली.

**शिलालेख व मराठी :**

शिलालेख हे इतिहासाचे मूलभूत साधन आहेत. शिलालेखांची विश्वसनीयता अधिक आहे. कोरीव लेखांची गद्य भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे लेख महाराष्ट्राच्या निरनिराळ्या प्रदेशांत विखुरलेले आहेत. लेखातील मजकुरात कोणीही फेरफार करू शकत नसल्यामुळे तत्काली भाषेचे यथार्थ चित्रण त्यातून होते. शिलालेख हे इतिहासाच्या अभ्यासाचे एक विश्वसनीय साधन आहे. इतिहासाचा अभ्यास करीत असताना साधनांचे महत्त्व निर्विवाद आहे. लिखित साधन आणि भौतिक साधन असे ढोबळमानाने साधनाचे वर्गीकरण करता येईल. साहित्याला ज्यावेळी मर्यादा पडते, त्यावेळी अभ्यासकाला भौतिक साधनाची कास धरावी लागते. शिलालेख भौतिक

साधन आहे. पण तरीही अनेक काळात शिलालेखांभोवती गुढ वलय निर्माण झाले, गैरसमजुती निर्माण झाल्या आहेत. पण जसजशा विषयाच्या आणि अभ्यासकांच्या अभ्यासाच्या कक्षा विस्तृत होत गेल्या तसतसे शिलालेखांना महत्त्व प्राप्त झाले. जिचा गौरव ज्ञानदेवांनी,

"माझा मराठीचीं बोलु कौतुकें
परि अमृतातेही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिकें मेळविन।।"

असा केला त्या ज्ञानश्वरांच्या पूर्वीही मराठी अस्तित्वात होती का? असल्यास तिचे स्वरूप कसे होते? हे अभ्यासणे आवश्यक ठरेल आणि ते जर अभ्यासावयाचे झाल्यास त्यावर प्रकाश टाकतात ते हे शिलालेख. शिलालेखांमध्ये राजांचा किंवा राजघराण्याचाच इतिहास दिलेला नसून तत्कालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबींचा तपशील त्यात असतो. मराठी भाषेतही असे अनेक शिलालेख यादव काळात कोरले गेलेत.

इ.स. ९०५ श्रवणबेळगोळ, कर्नाटक येथील शिलालेख मराठी भाषेतील पहिला लिखित शिलालेख आहे. राजमल्लगंग नावाच्या राजाच्या कारकिर्दीत बाहुबली किंवा गोमटेश्वराचा ५२ फूट उंचीचा पुतळा प्रधान चामुण्डराय याने उभारला. त्याच्या निर्मितीमागील माहिती पुढील लोकांना कळावी या हेतूने पुतळ्याखाली निरनिराळ्या प्रचलित भाषांतील वाक्ये कोरविली. त्याचे वाचन 'श्री चामुण्डराये करवियले श्री गंगराजे सुत्ताले करवियले' असे आहे. त्यानंतर मराठी भाषेतील अनेक शिलालेख आढळतात. या शिलालेखांच्या वाटचालीतील काही महत्त्वपूर्ण शिलालेख पुढीलप्रमाणे;

इ.स. १०१२ मधील अक्षी, जि. कुलाबा येथील शिलालेख
इ.स. १०६० मधील दिवेआगार, जि. रत्नागिरी येथील शिलालेख
इ.स. १२०६ मधील सिंधन यादवच्या पाटण जि. जळगाव येथील शिलालेख
इ.स. १२२७ व १२४० मधील आंबाजोगाई येथील दोन शिलालेख
इ.स. १२३९ मधील नेवासेचा शिलालेख
इ.स. १२७२ ते १२७७ या दरम्यानच्या काळातील पंढरपूर येथील मंदिरातील चौऱ्यांशीचा शिलालेख
इ.स. १२८९ चा मराठवाड्यातील उनकेश्वरचा शिलालेख[२]

नवीन संशोधनानुसार दिवेआगार शिलालेख सर्वात आद्य कोरीव लेख आहे. वरील शिलालेखांतून संबंध वाक्य रचले आणि लिहिले जाण्याइतकी मराठी भाषा अस्तित्वात होती. यासंबंधी पुरावे मिळतात. प्रस्तुत लेखात काही

महत्त्वाच्या शिलालेखातील संदर्भ तर काहींचा केवळ उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे.

शके १०५१ मध्ये चालुक्य वंशातील सोमेश्वर याने लिहिलेल्या 'मानसोल्लास' किंवा 'अभिलाषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात मराठी शब्द ठिकठिकाणी आलेले आहेत.

उदा. जेणे रसातळ मत्स्यरूपे वेद आणियले

मनुशिवक वाणियेले तो 'संसारसायरतारण' मोहंता रावो नारायणु।।[३]

वरील ओळीचा उल्लेख वि. ल. भावे आपल्या ग्रंथात देतात की, जो त्यांना भांडारकर इन्स्टिट्युटमधील जुन्या पोथीवरून संदर्भाकरिता मिळाला आहे. 'अभिलाषितार्थ चिंतामणी' या ग्रंथात सोमेश्वराने निरनिराळ्या रागांची माहिती दिलेली आहे.

शके १०७९ मधील एक शिलालेख गारदौंडापासून ६ मैलांवरील पळसदेव या गावी एका मंदिराच्या खांबावर कोरलेला आहे. या शिलालेखांतील अक्षराचे वळण फार जुने आहे. हा लेख चालुक्य काळातील असावा. कारण ज्या मंदिरात तो आढळला ते मंदिर चालुक्य मांडणीचे आहे. कदाचित चालुक्य वंशातील राजे राज्य करीत असताना त्यांच्या एखाद्या मांडलिक राजाने ते मंदिर बांधले असावे. चालुक्याचे मांडलिक राष्ट्रकुट होते. त्यांच्या काळातच हे मंदिर आणि शिलालेख कोरण्यात आला. यावरून राष्ट्रकुटांच्या काळात मराठी भाषा प्रगत होती.

शके ११०९ मध्ये परळ येथे मराठी भाषेतील शिलालेख आढळला. हा शिलालेख इमारतीचे बांधकाम करण्याकरिता जे खोदकाम करण्यात येत होते, तेथे सापडला. या शिलालेखाच्या जवळपास साडेचोवीस ओळी आहेत. त्यातील मजकुराची भाषा संस्कृत आहे. मात्र दोन ओळींची भाषा मराठी आहे. त्या दोन ओळी अशा आहेत;

''अथ तु जो कोणु। हुवि ए शासन लो-पी तेया श्री

वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबियआ पडे।। तेव्हाची माय गाढवे झविजे।।[४]

शके ११३० मधील एका शिलालेखावरून मराठी भाषा त्या काळात किती प्रगत होती हे लक्षात येते. अनेक मराठी वाक्ये त्यावर आढळतात.

शके ११९६ चा ठाणे येथील शिलालेखही संस्कृतमध्ये असून त्यात मराठी ओळी आहेत. शिलेवर कोपऱ्यात सूर्यचंद्र काढलेले असून मध्ये काढलेले चित्र अस्पष्ट आहे. लेख लहान आहे. पण अभ्यासकांकरिता महत्त्वाचा आहे.

**चौऱ्यांशीचा शिलालेख :**

मराठी भाषेचे वेगळेपण आणि कालकर्तृत्वाच्या दृष्टिकोणातून अतिशय महत्त्वाचा असणारा पंढरपूर येथील हा शिलालेख आहे. या शिलालेखाला चौऱ्यांशीचा शिलालेख म्हणतात. कारण मोठे गंमतीदार आहे. या शिलेला पाठ लावली असता चौऱ्यांशी लक्ष योनी हिंडण्याचा प्रसंग टळतो, अशी भाविकांची समजूत आहे. ज्या लोकांनी देवालयास दानधर्म केला त्यांची नावे व त्यांनी दिलेल्या देणगीच्या नामनिर्देश या शिलालेखात केला आहे. या लेखावर एक प्रशस्तिश्लोक कोरण्यात आला आहे. तो श्री. वि. ल. भावे त्यांच्या ग्रंथात देतात,

> ''स्वस्ति श्री सकु ११९५ श्रीमुख संवस्तरे फागनिपुर
> श्री विठ्ठलदेवरायासि तिसासिती फुले दांडे आच्रंदार्क
> चालावेआ नाना भक्तमालिआं दत्त पैकांचा विवरू।।''

अशा प्रकारे विठ्ठलमंदिराला दिलेल्या दानांचा तपशील अशा मथळ्याखाली दान देणाऱ्याचे नाव, ग्रामनाम आणि दानाची रक्कम या शिलालेखावर नमूद आहे. ८४ चा फेरा याला आध्यात्मिकदृष्ट्या बरेच महत्त्व असल्याने वारकरी या शिलालेखाला आपली पाठ घासत. त्यामुळे लेखाची झीज झाली आहे. ती होऊ नये याकरिता आज उपाययोजना झाली आहे.

अशा प्रकारे मराठी शिलालेखांची वाटचाल झाली आहे. हे शिलालेख मराठीच्या उद्‌गम विकासावरील अभ्यासाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. मराठी आणि इतिहास यांचा परस्परसंबंध उलगडून दाखविण्याचे सामर्थ्य या लेखांमध्ये आहे, असे म्हणणे इष्ट ठरेल.

# जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेली मराठी कविता

**प्रा.विनोद कांबळे**

'हे विश्वची माझे घर' अशी विश्वव्यापक जागतिक संकल्पना मांडणाऱ्या ज्ञानेश्वरासारख्या संत कवीपासून निर्माण झालेली मराठी कवितेची परंपरा १९२० पर्यंत वेगवेगळे विषय व आयाम घेऊन चित्रित होत होती. १९६० पर्यंतचे तिचे स्वरूप पारंपरिकतेचे होते. १९६० नंतर मराठी साहित्यामध्ये बदलाची एक मोठी प्रक्रिया घडली. यामध्ये दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, जनवादी, विज्ञानवादी, आदिवासी इ. वाङ्मयप्रवाहांनी आपले स्वतंत्र अस्तित्त्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील साहित्यिकांनी वेगवेगळ्या वाङ्मयप्रकाराबरोबरच कविता या वाङ्मयप्रकाराच्या माध्यमातून आपले अनुभवविश्व उलघडण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणून १९९० नंतर मराठी साहित्यामध्ये आधुनिकतेच्या प्रभावातून वाङ्मय निर्मिती होऊ लागली. १९९० नंतरच्या मराठी कवितेमध्ये याचा प्रभाव विशेष करून जाणवतो.

जागतिकीकरणाच्या प्रभावातून निर्माण होणाऱ्या कवितेमध्ये बहुजन वर्गातील व सर्वसामान्य समाजाचे जीवन चित्रण आपल्या काव्याच्या माध्यमातून प्रभावीपणे प्रकट करणाऱ्या कवींचा एक मोठा वर्ग समाजामध्ये निर्माण झाला. यामध्ये अरुण फाळे, उत्तम कांबळे, नामदेव ढसाळ, प्रज्ञा पवार, अजिम नवाज राही, हेमंत दिवटे, मंगेश नारायण काळे, वर्जेश सोळंकी, अजय कांडर, लोकनाथ यशवंत महेंद्र भवरे, चंद्रकांत पोतदार, सुनिल अवचार, गौरी भोगले, नीरजा यांसारख्या कवींचा यामध्ये समावेश होतो.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये उपरोक्त कवींच्या कवितेतून चित्रित होणारा जागतिकीकरणाचा प्रभाव मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**मराठी कवितेतील जागतिकीकरणाचा प्रभाव :** जागतिकीकरण या संकल्पनेने पृथ्वीवरील सर्व मानवी जीवनाला व्यापले आहे. मराठी कवितेत ते वैश्विक खेडे, माहिती तंत्रज्ञानाचे युग, संपत्तीचे विकेंद्रीकरण, भांडवलदाराचा सहज विकास, मुबलक व्यक्तिस्वातंत्र्य, खासगीकरण, उदारीकरण, औद्योगिकीकरण अशा विविध नावांनी जागतिकीकरण या

संकल्पनेला ओळखले जात आहे. १९९० नंतरच्या मराठी साहित्यामध्ये जात, धर्म, पंथाच्या पलीकडे जाऊन साहित्य मांडणी करत असल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाची ही प्रक्रिया १९९० नंतर भारतात जोर धरू लागली. याबद्दल माहिती देताना Bosworth आणि Gordon हे अभ्यासक म्हणतात,

"Over the past decade globalization has been driven by technological advances.... but globalization has also been driven by policies and ideas."[1]

जागतिकीकरण हे मागच्या दशकापासून सुरू झाले आहे. त्यामध्ये तंत्रज्ञान असल्याने त्याला आधुनिकतेचे स्वरूप प्राप्त झाले असून या जागतिकीकरणात नवनवीन योजनांची माहिती विकसित होत आहे. असा सकारात्मक दृष्टिकोणही या अभ्यासकांनी मांडला आहे.

मराठीतील प्रसिद्ध कवी डॉ. यशवंत मनोहर हे या जागतिकीकरणाकडे एका व्यापक दृष्टीने पाहतात. जागतिकीकरण या गोष्टीकडे ते समग्र मानव समूहाच्या दृष्टीतून पाहताना फुले-शाहू-आंबेडकरी विचारांच्या नजरेतून याची मांडणी करतात. इथला बहुजन समाज आजपर्यंत सातत्याने विविध शक्तीशी लढत आला आहे. आजदेखील आम्हांला या जागतिकीकरणाची भीती लोक कशी दाखवितात याबद्दल ते म्हणतात,

''हे जागतिकीकरणा!
तुझी भीती आम्हाला दाखवणारे काही छद्मी लोक आहेत
ते स्वत:ला जागतिकीकरणाचे हुशार नागरिक समजतात
ते स्वत:चे धर्म निष्ठेने पाळतात.''२

या जागतिकीकरणात दलित, उपेक्षित लोक विविध प्रश्नांनी ग्रासलेले आहेत. या लोकांना पुन्हा इथले धर्मवादी लोक जागतिकीकरणाची भीती मुद्दामच दाखवत आहेत. हे समाजकंटक धर्माच्या नावाखाली स्वत:ला हुशार समजतात. असे धर्माच्या नावाखाली इथल्या लोकांना छळले जात आहे.

जागतिकीकरण म्हणजे, ''मूठभर लोकांना कळतील, समजतील, काही लोकच वापरतील अशा ई-भाषांचा शोध लावणे होय''३ अशी व्याख्या साहित्यिक आणि संपादक उत्तम कांबळे यांनी केली आहे. जागतिकीकरणाच्या साहित्याचा अभ्यास करत असताना इथली पारंपरिक भाषा बदलली आहे आणि ई संकेताची भाषा जम बसविताना दिसून येते. भाषा मानवी जीवनाचा आविष्कार आहे. मानवाच्या भावना भाषेद्वारे प्रकट होताना दिसतात. पण या जागतिकीकरणात प्रेमाची भाषा माणूस विसरला आहे असे सांगताना अरुण काळे लिहितात,

"शब्दांचा व्यापार उदिम करताना
प्रेमाची विसरलात तुम्ही व्याख्या
शब्दांचा विनिमय करताना
प्रेमाला तुम्ही कुंपन घातलत."४

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात तो समूहाने राहणे पसंत करतो. परंतु जागतिकीकरणाच्या या काळात माणसाने प्रेमाची व्याख्या विसरली आहे. आणि आपल्या जगण्याभोवती खाजगीकरणाचे कुंपण घालून घेतले आहे. यातून त्याला बाहेर पडणे कदापि शक्य नाही. अशी चिन्हे इथे दिसत आहेत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे जगभरात विविध गोष्टींवर आक्रमण होत आहे. त्यामध्ये माणसाची वेशभूषा, केशभूषा, मनोरंजन तसेच अन्नावर हे आक्रमण सुरू आहे. यामध्ये इथल्या देशी गोष्टी नष्ट करून परदेशी वस्तूची आयात केली जात आहे. जगभरात भांडवलदारांनी पिझ्झा, बर्गर यांची उपहारगृहे उभी करून भाकरीला नष्ट करण्याचे षड्यंत्र इथे सुरू आहे. यातच इथल्या किराणा माल दुकानावर पिढ्यान-पिढ्या जगणाऱ्या दुकानदारावर शॉपिंग नावाचे भूत बसवून त्यांच्या दुकानाची वाट लावली जात आहे. या दुकानात ज्या वस्तू नाहीत त्या या मॉलमधून एकाच ठिकाणी काही टक्के सूट देऊन खरेदी करा अशी आमिषेही दाखविली जात आहेत. त्यामुळे हेमंत दिवटे सारख्या कवीला वाटते,

"तर या मेगा शॉपिंग मॉलमध्ये शॉप करताना
अतिमायक्रो विचार येत राहतात."५

या मेगा शॉपिंग मॉलमध्ये खरेदी करायला गेलेल्या मध्यमवर्गीय लोकांना हा शॉप बघून भोवळ यावी अशी स्थिती आहे. इथे काडीपेटीपासून, मटण-चिकनपर्यंत सर्व वस्तू एकाच छताखाली मिळतात. अनेक वस्तूवर सूट आहे. त्यामुळे आपल्या मनात सूक्ष्म अनैतिक विचार येणे साहजिकच आहे अशी भावना दिवटे व्यक्त करतात. सध्या साऱ्याच क्षेत्रात जागतिकीकरणाबद्दल चर्चा सुरू आहे. याच्या फायद्या-तोट्यापासून ते परिणामापर्यंत तर्क वितर्क अनेक तज्ज्ञ आपल्या पद्धतीने लावत आहेत. त्याबद्दलच अजीम नवाज राही म्हणतो,

"मानावे मानणाऱ्यांनी भाबड्या समजुतींना
लक्षणे मागासलेपणाची खुशाल
करावी डिजीटल जमान्याची चर्चा
परिसंवादातून घसा फाटेस्तोवर"६

जागतिकीकरणाबद्दल अनेक अभ्यासक, तज्ज्ञ मंडळी, व्याख्यान, परिसंवाद, चर्चासत्र, शिबिर यामधून घसा फोडून चर्चा करत आहेत. ही चर्चा आजच्या काळात साधी-सुधी चर्चा नसून डिजीटल जमान्याची चर्चा आहे. याला कुणी भाबडे समजतील, मागासलेपणाही समजतील त्याची चर्चा करण्याची ही वेळ नव्हे. कारण जागतिकीकरण आता घरा-दारात आले आहे. त्याचा स्वीकार केल्याशिवाय आपल्याला पर्याय नाही हा संकेतही कवी देतो आहे.

वस्तुत: जागतिकीकरण ही प्रक्रिया १९९० नंतर गॅट करारानंतर भारतात मोठ्या प्रमाणात आली. जागतिकीकरण हा शब्द अधिक मोठ्या प्रमाणात ऐकू येतो तो रशियन महासत्ता कोसळल्यानतर. कारण ''स्थूल मानाने रशियन महासत्ता ही विघटन होण्यापूर्वी जग दोन प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये विभागलेले होते. एक भांडवलदारी अर्थव्यवस्था व दुसरी अर्थव्यवस्था म्हणजे साम्यवादी अर्थव्यवस्था होय.'' ७ या अनुषंगाने विचार करता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे 'अर्थव्यवस्था' या गोष्टीभोवती जागतिकीकरण हे सतत फिरत राहिले आहे. भारतात ही अर्थव्यवस्था 'मिश्र' स्वरूपाची असल्यामुळे भारताचा कल रशियाकडे होता. हे उघडच आहे. मात्र जागतिक कल पाहता आता अमेरिका हे राष्ट्र आमचे आदर्श आहे अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर व्यापारी मंडळी सांगत आहेत. या जागतिकीकरणाच्या वातावरणात आपल्या विचार, भावनांचा बक्ष्याबोळ कसा झाला आहे याबद्दल सुनिल अवचार म्हणतात,

''या ग्लोबल वर्तमानात
भावना झाली आहे जाहिरात
आणि
मेंदूचे झाले आहे कंम्प्युटर
तत्त्वज्ञान झाले आहे
संस्कृती झाली आहे रखेल.''८

जागतिकीकरणाच्या युगात आपल्या सामाजिक, वैयक्तिक भावनांना जाहिरातीचे स्वरूप येत आहे. आणि कंम्प्युटर सारखा वापर इथली भांडवली व्यवस्था आपला करून घेत आहे. ज्या तत्त्वज्ञानावर ही संस्कृती उभी आहे तिलाच Use & Throw असा वस्तुसारखा वापर केला जातोय. आणि ज्या संस्कृतीचे आपण गुणगान गातोय तिला रखेल म्हणून या व्यवस्थेने ठेवले आहे. त्यामुळे जागतिकीकरण हे एक मृगजळ असून

या मृगजळात आपण माशासारखे सापडलो आहोत अशी खंतही व्यक्त झालेली दिसते.

१९९० नंतरच्या मराठी कवितेत जागतिकीकरणाबद्दलचा एक आकस प्रकर्षाने अनेक कवींच्या कवितेत आलेला आपणांस पाहावयास मिळतो. जागतिकीकरणामुळे जगभर काय घडते आहे याचा परिणाम काय होतो आहे याबद्दल मंगेश नारायण काळे म्हणतात.

''तुमच्या माझ्यामध्ये आहे
बिसलेरी भिंत
कारण माझ्या जगावर भल्या मोठ्या अक्षरात
मला बिसलेरी असं उलट लिहिलेलं दिसत.''९

माणसाच्या जगण्यामध्ये, नात्यामध्ये, जागतिकीकरणाने एक भांडवली भिंत उभी केली आहे. तिला 'बिसलेरी भिंत' अशी उपमा देण्यापाठीमागे कवीला असे वाटते की, दुधाच्या किंमतीपेक्षा पाण्याच्या बाटलीची किंमत इथे जास्त आहे. आपल्या मूलभूत जगण्यामध्ये पाण्याची उपयुक्तता खूप महत्त्वाची आहे. पण कवीला बिसलेरी हा शब्द उलटा लिहिलेला दिसतोय. याला कारण प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने ही जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे.

माहितीच्या या महाजालात आपल्याला हव्या त्या गोष्टी हव्या त्या वेळेला मिळू शकतात. त्यामुळे अलीकडे ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या जात आहेत असे सांगितले जाते. चुटकीसरशी एखादी माहिती, बातमी क्षणात आपल्याला कळते. याबद्दलच वर्जेश सोलंकी म्हणतो,

''स्फोट स्फोट स्फोट
माहिती तंत्र ज्ञानविज्ञानाचा स्फोट
नवं रूप नवीभाषा.''१०

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात प्रत्येक गोष्टीचा स्फोट झाला आहे. त्यातच कॉल सेंटर, बीपीओ, आयटी झोन यांसारख्या कंपन्यामधून चुटकीसरशी माहिती आपणाला मिळत आहे. माहितीचे हे प्रचंड मोठे महाजाल आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाची अनेक रूप तसेच नवीन भाषाही आपल्या अनुभवास पचनी पडत नसेल तरीही येत आहे.

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमधून जात असताना आपण आपल्या जगण्याची केंद्रे बदलली पाहिजेत तसेच आपले स्वत्त्व आपल्याला गवसण्यासाठी आपल्या परीने प्रयत्न केला पाहिजे. तरच या प्रक्रियेत आपण उभे राहू असा आशावाद व्यक्त करताना कवयित्री नीरजा म्हणते,

''माणसं हरवत चालली आहेत एकमेकांतून
जगण्याची केंद्रे बदलताहेत वेगानं
फिरतो आहोत आपण आपल्याच आसाभोवती
भेलकांडल्यासारखे''११

जागतिकीकरणामध्ये आपण एकमेकांपासून हरवत चाललो आहोत. आपल्या नियमित जगण्याची केंद्रे गावापासून बदलून शहरात गेलेली आहेत. आणि एका विशिष्ट धुंदीत आपण आपल्याच भोवती फिरतो आहोत. आपल्याला आपली जगण्याची दिशाही कळू नये इतकी भयाण अवस्था या जागतिकीकरणात आपल्या वाट्याला आल्याचे चित्रण नीरजा करते.

जागतिकीकरण या विषयाची मांडणी करत असताना एकूणच मराठी कवितेत अनेक कवींनी आपली जहाल आणि मवाळ मते नोंदविली आहेत. जागतिकीकरणात माणसाचा चेहरा हरवला आहे असे सांगितले जाते. पण आज अखंड माणूस हरवल्याची खंतही व्यक्त होतानाचे दिसते. जागतिकीकरणाचा परिणाम शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाल्याचे चित्रणही पाहावयास मिळते. मराठी कवितेत १९९० नंतर जागतिकीकरणाच्या झळीचे वर्णन प्रभावीपणे चित्रण झाल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळते.

सारांश, जागतिकीकरणाच्या प्रभावातून जगभरात मानवी जीवनावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून येते. साहित्यही त्यास अपवाद नाही. मराठी कवितेत जागतिकीकरणाचा परिणाम झाल्याचे १९९० नंतरच्या अनेक कवींच्या कवितेतून पाहावयास मिळते. यामध्ये अरुण काळे, यशवंत मनोहर, मंगेश नारायण काळे, वर्जेश सोलंकी, नीरजा, अजीम नवाज राही, चंद्रकांत पोतदार, इंद्रजीत भालेराव, बालाजी मदत इंगळे, महेंद्र गायकवाड, सुनिल अवचार इ. कवींच्या कवितेचा यामध्ये समावेश करता येईल. उपरोक्त सर्वच कवींच्या कवितेतून वर्तमान समाजाचे बदलते जीवन वास्तव स्पष्टपणे चित्रित झाले आहे. मराठी साहित्यात इतर वाङ्मयप्रकारापेक्षा कविता या वाङ्मयप्रकारात जागतिकीकरणाबद्दलचे चित्रण बऱ्या प्रमाणात आले आहे. साधारणतः १९९० नंतर मराठी साहित्यामध्ये जागतिकीकरणामुळे असंख्य आव्हाने उभी राहिली आहेत. या आव्हानांना सामोरं जाताना समाजाची मानसिकता कोणत्या पद्धतीची असायला हवी. याविषयीचे अनुमान अनेक कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून केलेले दिसते.

❁❁❁

# कादंबरीविषयी विद्यापीठीय प्रबंधांमधील संशोधन

प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील

महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील अनेक विद्यापीठांमध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकारचे संशोधन मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळते. विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात अनेक विद्यापीठांची स्थापना झाली. अनेक मानव्यविद्यांमध्ये भाषा व साहित्य यांचा अभ्यास सुरू झाला. संशोधनाची गरज आणि समीक्षा या अनुषंगाने भाषा व साहित्यक्षेत्रात संशोधन सुरू झाले. या साहित्याच्या संशोधनाचाच एक भाग म्हणून कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे संशोधनही विपुल प्रमाणात झाले. कादंबरी हा वाङ्मयप्रकार विस्तृत कालअवकाश, व्यामिश्र आशयसूत्रे व एखाद्या पोटसमूह - संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर घडणारा वाङ्मयप्रकार आहे. या वाङ्मयप्रकाराचे विस्तृत रूप व विस्तृत रचनाही आढळते. साहजिकच तिच्या रूप-रचनेप्रमाणे तिची विस्तृत समीक्षा व तिच्यावरील संशोधन विद्यापीठीय प्रबंधांमध्ये जाणवते. या संशोधनाचे स्थूल स्वरूप प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

विद्यापीठीय संशोधनातील कादंबरीविषयी संशोधन व समीक्षा यांचे स्वरूप पाहताना प्रातिनिधिक स्वरूपात पाच विद्यापीठांतील कादंबरीविषयक समीक्षा प्रबंधांचे आढावात्मक स्वरूप पाहण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये मुंबई विद्यापीठ, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठांमधील कादंबरीविषयी संशोधन - समीक्षा प्रबंधांचे स्वरूप लक्षात घेतले आहे. प्रस्तुत निबंधात प्रबंधांचे केवळ नामोल्लेख करून प्रबंधांच्या प्रकारांचे गट लक्षात घेतले आहे. विस्तारभयास्तव व केवळ स्वरूप लक्षात घेणे हे या निबंधाचे उद्दिष्ट असल्याने वर्गीकरणात्मक व विषयानुसार या संशोधन प्रबंधाचे गट व स्वरूप लक्षात घेतले आहेत.

मराठी कादंबरीविषयी विद्यापीठीय संशोधनामध्ये प्रामुख्याने 'व्यक्ती आणि वाङ्मय' या संशोधन प्रकाराचा एक मोठा गट लक्षात येतो. कादंबरीचे घटक अवयव लक्षात घेऊन त्यांचे निकष एखाद्या कादंबरीकाराच्या कादंबऱ्यांना लावून अभ्यासात कादंबऱ्यांची व्यवस्था लावणे हा दुसरा प्रकार

कादंबरी समीक्षेत आढळतो. तसेच विशिष्ट कालखंड डोळ्यासमोर ठेवून अथवा कादंबरीचे विशिष्ट प्रवृत्ती-प्रवाह लक्षात घेऊन त्यांचा ऐतिहासिक आढावा घेणे हा तिसरा प्रकार. याशिवाय साहित्यातील प्रवाह, प्रकारानुसारही संशोधन आढळते. यामध्ये ग्रामीण, दलित, आदिवासी इ. समूहनिष्ठ प्रकारांबरोबरच ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक इ. रचनानुसार प्रकार तसेच सामाजिक, राजकीय, इ. कादंबरीचे वेगवेगळे प्रकार अभ्यासाच्या सोयीसाठी करून या कादंबऱ्यांची चर्चाही या प्रबंधामध्ये झालेली दिसते. काही कादंबरीकारांची तुलनात्मक समीक्षाही क्वचित प्रमाणात झाल्याची दिसते. विशिष्ट कादंबरी प्रकारातील व्यक्तिरेखा, स्त्रीपात्रे, ग्रामीण जीवन, सामाजिकता, राजकारण, इ. काही पोटप्रकारही अभ्यासासाठी करून त्यांची संशोधनात्मक मांडणी करण्याचा प्रयत्न करणारे काही क्वचित प्रबंध या विद्यापीठीय समीक्षेत आढळतात. याशिवाय स्त्रियांचे कादंबरीलेखन, रंजनप्रधानता, वास्तवता, वाङ्मयीनवाद, कलावाद, जीवनवाद अशा काही वादांच्या व विचारप्रणालीच्या अनुषंगाने कादंबऱ्यांचा अभ्यासही क्वचित प्रमाणात झाल्याचेही विद्यापीठीय प्रबंधात आढळते. या सर्वांची मांडणी खालीलप्रमाणे आहे.

**१. व्यक्ती आणि वाङ्मय या अनुषंगाने झालेली कादंबरी समीक्षा :**

विद्यापीठीय संशोधनातील अत्यंत लोकप्रिय व सहज, सुलभ संशोधनाचा मार्ग म्हणून हा संशोधन प्रकार मोठ्या प्रमाणात आढळतो. एखादा कादंबरीकार अथवा लेखक डोळ्यासमोर ठेऊन त्याचे व्यक्तिमत्त्व व साहित्यिक कर्तृत्व लक्षात घेणे हा या संशोधनप्रकाराचा मुख्य उद्देश दिसतो. यामध्ये प्रामुख्याने एक लेखक, त्याची जडणघडण, त्याचे बालपण, सामाजिक जडणघडण, त्याचा प्रदेश आणि त्याचे साहित्य या गोष्टी लक्षात घेऊन त्याच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा, कथानक, भाषा शैली या घटकांच्या अनुषंगाने कादंबऱ्यांचे आशयात्मक विश्लेषण या प्रकारात केल्याचे दिसते. बहुतेक विद्यापीठात हाच फॉर्म्युला संशोधकांनी वापरल्याचा दिसतो. अभ्यासासाठी सहज सुलभ मांडणी या प्रकाराद्वारे होत. अशा प्रबंधाचा आढावा प्रथम घेता येईल.

**१.१ मुंबई विद्यापीठ :**

या प्रकारातील सर्वात जुना किंबहुना पहिलाच प्रबंध म्हणून ल. म. भिंगारे यांचा 'A Critical Study of Hari Narayan Apate and his Literary Tradition' हा प्रबंध होय. ''कै. हरि नारायण आपटे यांच्या सर्व उपलब्ध वाङ्मयाचा कालानुक्रमी अभ्यास'' या शीर्षकाने हे संशोधन झाले

असून पुढे दहा वर्षांनी या संशोधन प्रबंधाचे 'हरिभाऊ' या नावाने ग्रंथरूपाने प्रकाशन झाले आहे. प्रारंभी हरिभाऊंच्या पूर्वकालीन टीका व चरित्रे यांचा परामर्श घेऊन उपलब्ध टीकेचा व चरित्राचा साधनसामग्री म्हणून उपयोग केला आहे. कालानुक्रमी अभ्यासामध्ये पूर्वसूत्र मांडून हरिभाऊंचे चरित्र विस्तृतपणे मांडले आहे. हरिभाऊंचा कालखंड हा वाङ्मयीनदृष्ट्या प्रयोगकाळ आहे, असे भिंगारे यांनी नमूद केले असून 'आत्माविष्कार' व 'कथाविष्कार' असा त्यांचा जीवनपट व त्यांच्या जडणघडणीचा पट मांडला आहे. 'विश्लेषण' या पुढच्या प्रकरणात हरिभाऊंच्या कादंबरी वाङ्मयाची भूमिका स्पष्ट केली आहे. 'परंपरा' व 'उपसंहार' अशी अखेरची प्रकरणे मांडून पुढीलांची परंपरा सांगत हरिभाऊंचे मोठेपण कशात आहे, याची चर्चा अखेरीस केली आहे. अशा प्रकारे एक आदर्श विस्तृत व स्पष्टीकरणात्मक असे संशोधन या प्रबंधात पाहायला मिळते.

व्यक्ती आणि वाङ्मय या अनुषंगाने हरिभाऊंच्या कादंबऱ्यांची व त्यांच्या कादंबरीतंत्राची मांडणी करणारी याच विद्यापीठातील आणखी एक प्रबंध म्हणून कृ. रा. सावंत यांचा १९७४ चा "ह. ना. आपटे यांचे कादंबरी तंत्र" हा प्रबंध होय. एकूण पाच प्रकरणाचा हा प्रबंध असून पहिल्या प्रकरणात हरिभाऊंचे कादंबरीविषयक विचार, दुसऱ्या प्रकरणात त्यांच्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यातील समकालीन राजकीय विचारांच्या अनुषंगाने त्यांच्या कादंबऱ्यांच्या कथा विषयांचा परिचयात्मक परामर्श, तिसऱ्या प्रकरणात त्यांच्या कादंबऱ्यांतील मुख्य व दुय्यम कथानक रचनांचा परामर्श, चौथ्या प्रकरणात त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखाटने व पाचव्या प्रकरणात हरिभाऊंच्या कादंबरीतील निवेदन व शेवटी उपसंहार असा घटक अवयवानुसार संशोधनाचा प्रयत्न सावंत यांनी केलेला दिसतो.

एक कादंबरीकार या अनुषंगाने आणखी काही प्रबंध या विद्यापीठात पाहावयास मिळतात. यामध्ये माधुरी पणशीकर यांचा "दि. बा. मोकाशी यांच्या कथा-कादंबऱ्यांचा आणि ललित लेखनाचा समीक्षणात्मक अभ्यास" (१९८६) या शीर्षकाने प्रबंध आढळतो. दि. बा. मोकाशी यांच्या साहित्याच्या समीक्षणात या प्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात कथा-दीर्घकथा, लघुकादंबरी-कादंबरी व दि. बा. मोकाशी यांची कादंबरी अशी मांडणी केलेली आहे. शुभलक्ष्मी भावे यांनी "गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांचा रचनात्मक अभ्यास" (१९८८) या शीर्षकाने गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्या व त्यांचे स्वरूप, रचना, कथानक, पात्रे, वातावरण, निवेदन, संवाद असे घटक अवयवानुसार विश्लेषण केले आहे. याच प्रकारे "जयवंत दळवी यांच्या

कादंबऱ्यांचा एक चिकित्सक अभ्यास'' (१९८८) हा सौ. वसुंधरा तारकर यांच्या प्रबंधामध्ये सहा प्रकरणात जयवंत दळवी यांच्या कादंबऱ्यांचे आशय विश्लेषण, त्यांच्या कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरणे, इतर साहित्य व त्या अनुषंगाने जयवंत दळवी यांच्या साहित्यामागचे अनुभवबीज, जयवंत दळवी समकाली चार प्रमुख कादंबरीकारांची तुलनात्मक मांडणी करून दळवींच्या कादंबऱ्यांवर आजपर्यंत झालेल्या समीक्षा, परीक्षण-निरीक्षणांचे स्वरूप मांढले आहे. कादंबरी समीक्षेच्या पारंपरिक घटक अवयवानुसार समीक्षेपेक्षा थोडा वेगळा विचार या प्रबंधात दिसतो. वासंती वसंत नांदेडकर यांचा ''ग. त्र्यं. माडखोलकरांच्या कादंबऱ्या - एक चिकित्सक अभ्यास'' (१९९२) हा आणखी एक या प्रकारातला मुंबई विद्यापीठातील प्रबंध होय. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत आलेले विविध वाद, विचार, समस्या, प्रेम, शेवटी निवेदन इ. घटकानुसार मांडणी केली आहे.

**१.२ एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई :**

'व्यक्ती आणि वाङ्मय' या प्रकारच्या अनुषंगाने एस.एन.डी.टी. विद्यापीठात काही प्रबंध पाहावयास मिळतात. त्यामध्ये १९८३ ला सादर केलेला ''व्यंकटेश माडगूळकर - एक चिकित्सक अभ्यास'' हा सुप्रिया मधुकर अत्रे यांचा एकूण सात प्रकरणात प्रबंध आढळतो. माडगूळकरांच्या सर्व साहित्याच्या अभ्यासाबरोबर तिसऱ्या प्रकरणात 'कादंबरीकार माडगूळकर' या घटकात पूर्वपीठिका, प्रादेशिकता व माडगूळकरांच्या कादंबरीतील प्रादेशिकता व वेगळेपण स्पष्ट केले आहे. ''विभावरी शिरूरकर एक चिकित्सक अभ्यास'' (१९९४) या शीर्षकाने अंजली सरदेसाई यांच्या प्रबंधात एकूण नऊ प्रकरणांत वैचारिकता आणि कथात्मकता, मराठी कादंबरी परंपरेतील समाज, स्त्रीजीवन, वैचारिकता यांची चर्चा करून यात चौथे व पाचवे प्रकरण हे विभावरीच्या कादंबऱ्यांची चिकित्सा करणारी प्रकरणे आहेत. मोहिनी प्र. पेटकर यांचा ''कादंबरीकार गो. नी. दांडेकर'' (१९९३) हा प्रबंध याच विद्यापीठात पाहावयास मिळतो. एकूण पाच प्रकरणांमध्ये दांडेकरांची प्रादेशिक कादंबरी, सामाजिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, चरित्रपर व पौराणिक कादंबरी असे गट करून आशयात्मक मांडणी केली आहे. या संशोधन प्रकारातला एक पोटप्रकार म्हणून विजया रामचंद्र निफाडकर यांचा ''ना. स. इनामदार यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची चिकित्सा'' (२००४) हा प्रबंध पाच प्रकरणांत मांडला असून जीवनचित्रण, स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासिक कादंबरी व त्यातील वास्तव, इनामदारांच्या समग्र ऐतिहासिक कादंबऱ्यांचा परामर्श,

कथानक, उपकथानक, व्यक्तिचित्रणे व त्यांच्याविषयी इतरांच्या मतांचा परामर्श घेतला आहे.

### १.३ पुणे विद्यापीठ :

पुणे विद्यापीठातही 'व्यक्ती आणि वाङ्मय' या गटात बरेच संशोधन झाले आहे. यामध्ये बाबा पद्मनजी यांच्या कादंबरीविषयी दोन संशोधन प्रबंध आढळतात. यापैकी १९७५ चा केशव सीताराम कऱ्हाडकर यांचा ''बाबा पद्मनजी काल व कर्तृत्व'' हा प्रबंध आढळतो. या पंधरा प्रकरणांतील प्रबंधामध्ये जीवनचित्रण, निबंधविचार व तिसऱ्या प्रकरणात 'यमुनापर्यटन' या कादंबरीचे सखोल विवेचन आहे. ''यमुनापर्यटन - समग्रलक्षी अभ्यास'' (२000) हा समता सीताराम बांदिवडेकर यांचा बाबा पद्मनजींच्या साहित्यावरचा आणखी एक प्रबंध आढळतो. प्रबंधात जीवनचित्रण, चरित्र, आत्मचरित्र व 'यमुनापर्यटन' यांचा संबंध, 'यमुनापर्यटना'च्या समीक्षेची समीक्षा काळ, समाज, १९ वे शतक या गोष्टी ठेवून 'यमुनापर्यटन' या एकमेव कादंबरीचे समीक्षण झाले आहे. यानंतर माधवी वैद्य यांचा 'चि. त्र्यं. खानोलकरांच्या साहित्याची चिकित्सा करणारा प्रबंध पाहावयास मिळतो. एकूण ९ प्रकरणांमध्ये पाचव्या प्रकरणात खानोलकरांच्या कादंबऱ्यांचा परामर्श घेतलेला दिसतो. ''र. वा. दिघे यांच्या कादंबरी वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास'' हा रविंद्र ठाकूर यांनी १९८८ ला सादर केलेला प्रबंध असून पाच प्रकरणात कादंबरी संकल्पना, दिघ्यांच्या कादंबरीतील सामाजिक वास्तव, निसर्ग, परिसर, भाषा, प्रादेशिकता, समकालीन जाणिवा, तंत्र विचार व रचनाविचार अशा घटकांच्या अनुषंगाने परामर्श यात घेतलेला आहे. ''ग. ल. ठोकळ यांच्या वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास'' (१९९0) या रामदास सर्जेराव रसाळ यांच्या प्रबंधात प्रारंभी ग. ल. ठोकळ यांचे मराठी वाङ्मयातील स्थान निश्चित केले आहे. त्यांच्या एकूण कविता, कथा यांचा परामर्श घेऊन चौथ्या प्रकरणात ठोकळ यांच्या कादंबऱ्यांचा विचार केला आहे. व्यक्ती आणि वाङ्मय या प्रकारात पुणे विद्यापीठात आणखी काही प्रबंध पाहायला मिळतात. यामध्ये भास्कर धोंडिबा खांडगे यांचा ''रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास'' (१९९२) या प्रबंधात एकूण आठ प्रकरणात जीवनपरिचय, कथांचा परामर्श व चौथ्या प्रकरणात त्यांचे योगदान असा सविस्तर पट मांडला आहे. निंबा देवराम नांद्रे यांचा ''श्री. उद्धव ज. शेळके यांच्या कांदबरी वाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास'' (१९९९) हा याच प्रकारातील पुढचा प्रबंध आहे. सात प्रकरणांमध्ये कादंबरी वाङ्मयप्रकार संकल्पना, जीवनचरित्र, त्यांच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे कथामूल्य, ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप आणि मूल्यमापन, इतर

ग्रामीण कादंबऱ्यांशी तुलना, शेळके यांच्या चरित्रात्मक कादंबऱ्या अशी सखोल चर्चा केली आहे. याच प्रकारातला पोटप्रकार म्हणून उज्ज्वला शिवाजी दवेरे यांचा "गो. नी. दांडेकरांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखांचा चिकित्सक अभ्यास" (२००१) हा एक प्रबंध पाहायला मिळतो. एकूण सात प्रकरणांमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा, कादंबरीचा धावता आढावा, तंत्रात घडत गेलेले बदल, १८५७ ते १९५७ पर्यंत कादंबरीचा आढावा, तिसऱ्या प्रकरणात ऐतिहासिक पौराणिक कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा, स्त्री व्यक्तिरेखा, चरित्रात्मक ऐतिहासिक कांदबऱ्यांतील व्यक्तिरेखा, सामाजिक कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा, स्त्री व्यक्तिरेखा व शेवटी भाषाशैली, उपसंहार अशा पारंपरिक संशोधनाच्या धाटणीचा हा प्रबंध आहे. अगदी अलीकडेही पुणे विद्यापीठात असे प्रबंध आढळतात. यामध्ये जयराम पांडुरंग खाडे यांनी सन २००२ साली सादर केलेला "साहित्यिक रंगनाथ पठारे" हा प्रबंध होय. पठारेंचे जीवनचित्रण, वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व, त्यांच्या कथांचा परामर्श, तिसऱ्या प्रकरणात पठारे यांच्या कादंबरी वाङ्मयाची चिकित्सा असून पुढील प्रकरणांमध्ये त्यांच्या कथा - कादंबऱ्यांतील प्रयोग व त्यांची समीक्षा असे या प्रबंधाचे स्थूल स्वरूप आहे. याच प्रकाराचा आणखी एक प्रबंध म्हणून ज्ञानेश्वर नारायणराव सोनवणे यांचा "महादेव मोरे यांचे कादंबरीलेखन - एक चिकित्सक अभ्यास" हा २००३ साली सादर केलेला प्रबंध होय. एकूण सात प्रकरणांत त्यांचे वाङ्मय, जीवनचित्रण, त्यांचे अनुभवविश्व, जीवनानुभूती, त्यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा व त्यांचे वर्गीकरण व शेवटी त्यांचे लेखन, भाषा व मराठी कादंबऱ्यांशी त्यांच्या कादंबऱ्यांची तुलना असा पट मांडला आहे. अगदी अलीकडे सादर केलेला बालाजी घारूळे यांचा "राजन गवस यांच्या साहित्याचा चिकित्सक आढावा" (२००४) हा एक प्रबंध आढळतो. या प्रबंधात राजन गवस यांच्या लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देऊन १९८० नंतर त्यांची कविता, कथावाङ्मयाची पूर्वपीठिका सांगून त्यांच्या कथांचे आशयानुरूप वर्गीकरण व पुढे त्यांच्या कादंबरीचा विचार, त्यांची समाजचिंतकाची भूमिका, आशयसूत्रे, कथानक, पात्रे, भाषाशैली यांचा परामर्श घेतला आहे. शेवटी इतर साहित्याचा परामर्श घेऊन मूल्यमापन केले आहे.

**१.४ डॉ. बी. ए. एम. विद्यापीठ, औरंगाबाद :**

संख्येने अधिक असणारे 'व्यक्ती आणि वाङ्मय' या प्रकारातील संशोधने औरंगाबाद विद्यापीठात अधिक दिसतात. अगदी विद्यापीठाच्या प्रारंभीपासून ही संशोधने आढळतात. यामध्ये कादंबरी वाङ्मयप्रकाराच्या

अनुषंगाने १९७७ साली गो. ग. कुलकर्णी यांचा "बी. रघुनाथांच्या साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास" हा प्रबंध आढळतो. एकूण आठ प्रकरणांत प्रारंभी जीवनचित्रण, बी. रघुनाथकालीन मराठवाड्याची परिस्थिती व तिसऱ्या प्रकरणात बी. रघुनाथ यांचे कादंबरीलेखन, यात स्थल-काळ-व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या अनुषंगाने विवेचन आले असून पुढे इतर साहित्याचा परामर्श आला आहे. शेवटी त्यांच्या साहित्यातील प्रादेशिकता या घटकाची चर्चा आली आहे. यानंतर नागनाथ कोतापल्ले यांचा १९८० ला सादर केलेला "शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" हा प्रबंध आला असून यात नऊ प्रकरणात ग्रामीण साहित्याची पूर्वपीठिका, १९२० ते १९४५ व १९४५ च्या पुढे असे विवेचन आले आहे. त्यांच्या कथालेखनाचे स्वरूप मांडल्यानंतर पाचव्या प्रकरणात 'टारफुला' या कादंबरीचे विवेचन आले आहे. "गो. नी. दांडेकर व्यक्ती आणि वाङ्मय" (१९८२) या प्रबंधात दादा गोरे यांनी सहा प्रकरणात प्रारंभीच प्रास्ताविकानंतर गो. नी. दां.चे कादंबरीलेखन या प्रकरणात विषयानुसार कादंबऱ्यांचे वर्गीकरण व आशयात्मक आढावा घेतला आहे. ऐतिहासिक, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांच्या आवलोकनाबरोबरच गो. नी. दांडेकर हे प्रादेशिक कादंबरीकार कसे याचे विवेचन केले आहे. देवकर्ण तुळशीराम मदन यांनी "शरच्चंद्र मुक्तिबोध व मार्क्सवादी साहित्य विचार" हा प्रबंध मांडला आहे. त्यांची कविता व चौथ्या प्रकरणात त्यांचा कादंबरीविचार आला आहे. मानवी जीवनातले दुःख, समाजाची स्थितिगती व त्यांच्या टीकाकाराचा परामर्श घेतला आहे. पुढे त्यांच्या समग्र साहित्याची मीमांसा आली आहे. "शिवाजी सावंत व्यक्ती आणि वाङ्मय" या १९८९ च्या एम. बी. शेळके यांच्या प्रबंधात एकूण दहा प्रकरणे आली आहेत. शिवाजी सावंत यांचे व्यक्तिगत, वाङ्मयीन जीवन यांच्या परिचयानंतर त्यांच्या कादंबऱ्यांची पार्श्वभूमी व परिचय, त्यांच्या कादंबऱ्यांतील सुसंगती व विसंगती, सामाजिक विषय, त्यांच्या कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा व वाङ्मयीन अभ्यास मांडला आहे. यात आकृतिबंध, भाषाशैली, वातावरणनिर्मिती, आशय अभिव्यक्ती यांचा परामर्श आला आहे. प्रादेशिकतेचा परामर्शही त्यांच्या काही कादंबऱ्यांच्या अनुषंगाने घेतला गेला आहे. याच प्रबंधाप्रमाणे "विभावरी शिरूरकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास (१९३३ ते १९६३ पर्यंत)" हा १९८९ ला सादर करण्यात आलेला हेमलता पाटील यांचा प्रबंध एकूण सात प्रकरणांत विस्ताराने मांडलेला आहे. प्रस्तावनेत भूमिका, स्वरूप, विस्तार मर्यादा, दुसऱ्या प्रकरणात समकालीन लेखक-लेखिका यांचा धावता परिचय, नंतर कथा वाङ्मय व चौथ्या प्रकरणात

विभावरींच्या कादंबऱ्यांचा परामर्श, स्वरूप, प्रेरणा, प्रयोजन व त्यांच्या कादंबऱ्यांवरील टीका याचा परामर्श घेतला आहे. एस.एस. खामकर यांनी "र. वा. दिघे यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास" १९९१ साली मांडला आहे. याही प्रबंधात वरीलप्रमाणेच मांडणी असून चौथ्या प्रकरणात दिघ्यांच्या कादंबऱ्यांचा विचार विविध दृष्टिकोणातून केला आहे. कथानक, व्यक्तिचित्रण, पात्रांचे स्वभाव, प्रदेशचित्रण, समाजजीवन, इ. गोष्टींचे विश्लेषण केले आहे. शेवटी दिघ्यांना प्रादेशिक ठरविण्यासाठीचा प्रयत्न केला आहे. व्यक्ती आणि वाङ्मय या प्रकारात या विद्यापीठात अनेक प्रबंध आढळतात. याचप्रमाणे "रा. रं. बोराडे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" (२000) या आणखी एका प्रबंधात उज्ज्वला शिवराम जगताप यांनी एकूण सहा प्रकरणांमध्ये बोराडेंच्या साहित्यातील ग्रामवास्तव पकडण्याचा प्रयत्न केला आहे. एकूण मराठी ग्रामीण साहित्य, बोराडेंचे ग्रामीण साहित्य व चौथ्या प्रकरणात 'रा. रं बोराडे यांच्या कादंबरीतील ग्रामवास्तव व स्त्रीचित्रणांची विविध रूपे' अशी मांडणी आहे.

यापुढे या विद्यापीठात 'लेखक आणि त्याची कादंबरी' या वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने काही प्रबंध येतात. या प्रकारामध्ये मीना बी. चाटे यांचा "जयवंत दळवी यांच्या कादंबरीवाङ्मयाचा चिकित्सक अभ्यास" (१९९५) हा प्रबंध कालानुक्रमे पहिला येतो. एक लेखक व त्याचे समग्र साहित्य या अभ्यासाची व्याप्ती मर्यादित करणारा एक लेखक व त्याचा प्रमुख वाङ्मयप्रकार असे हे संशोधनाचे स्वरूप दिसते. या प्रबंधात एकूण आठ प्रकरणांत आधुनिक कादंबरी वाटा व वळणे, जयवंत दळवी काळ-चरित्रसंस्कार, व्यक्तिमत्त्व, वाङ्मयस्वरूप, आशय अभिव्याक्ती, कादंबरी आशय, अभिव्यक्ती स्वरूपरचना व चिकित्सक मूल्यमापन असे चित्रण केले आहे. याप्रकारे "व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास" (१९९८) या आर. पी. राजणीकर यांच्या प्रबंधात एकूण सहा प्रकरणांमध्ये मांडणी केली असून माडगूळकरांच्या मागील व समकालीन कादंबऱ्या व तिसऱ्या प्रकरणात 'माडगूळकरांच्या कादंबऱ्या' यात कादंबऱ्यांच्या विस्ताराने परिचय दिला आहे. पुढे नेहमीच्याच धाटणीने वातावरण, पात्रयोजना, प्रादेशिकता, संवाद भाषा इ. घटकांची चर्चा केली आहे. "अरुण साधू यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास" (२00३) हा अरुण साधूंच्या कादंबऱ्यांची चिकित्सा करणारा रामदास प्रल्हाद इंगळे यांचा आणखी एक प्रबंध आढळतो. एकूण सात प्रकरणात कादंबरी व मराठी कादंबरी, समकालीन कादंबऱ्या,

अरुण साधूंच्या कादंबऱ्यांचा परिचय, पात्र, वातावरण, प्रादेशिकता, संवाद भाषा इ. घटकांच्या अनुषंगाने चिकित्सा केली आहे.

'व्यक्ती आणि वाङ्मय' या अनुषंगाने औरंगाबाद विद्यापीठात बरेच संशोधन झालेले दिसते. यामध्ये आणखी काही प्रबंध आढळतात. संशोधनाची पद्धती व प्रकरणांची मांडणीही एकाच प्रकारे दिसते. यातील प्रबंधाचा थोडक्यात उल्लेख करता येईल. यामध्ये विमल सदाशिव देठे यांचा "शंकरराव खरात यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास" (१९९४), दीपक गोपाळराव कासराळीकर यांचा "लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास" (१९९६), इच्छा विजय शिंदे यांचा "दुर्गा भागवत यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" (१९९७), सुरेश नारायण पैठणकर यांचा "उत्तम बंडू तुपे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' (२000), स्मिता कमलाकर भगवान यांचा "सौ. सरोजिनी बाबर : चिकित्सक अभ्यास" (२00१), बी. बी. मांगदरे यांचा "ना. धो. महानोर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" (२00१), इ. प्रबंध या प्रकारातले एकाच धाटणीचे प्रबंध या विद्यापीठात आढळतात.

याशिवाय व्यक्ती आणि वाङ्मय याच प्रकारातले काही पोटप्रकार म्हणून शारदा देशमुख यांचा "वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-चित्रण" (२00२) हा प्रबंध एकूण सहा प्रकरणांत विस्तारला असून खांडेकरपूर्व कादंबरीतील स्त्रीचित्रण, खांडेकरांच्या कादंबरीतील सामाजिक स्थिती, खांडेकरांच्या कादंबऱ्यांतील विषयदृष्ट्या विवेचन, नायिकांचे चित्रण, इ. घटकाद्वारे स्त्रीचित्रण मांडण्याचा प्रयत्न केला आहे. "आनंद यादव यांचे गद्य लेखनः स्वरूप आणि चिकित्सा (२00२) हा कांचन पद्माकर परळीकर यांचा प्रबंध याच प्रकारातील थोडा फार विषयांतरांच्या अनुषंगाने मांडलेला आहे. आनंद यादव यांच्या कथा, कादंबरी, आत्मचरित्र, वगनाट्य, इ. गद्य वाङ्मयप्रकारांची चिकित्सा यात केली असून चौथ्या प्रकरणात कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने विवेचन आले आहे.

### १.५ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर :

शिवाजी विद्यापीठाच्या प्रबंधसूचीतही 'व्यक्ती आणि वाङ्मय' या गटातील प्रबंध आढळतात. एका लेखकाच्या वाङ्मयाची चिकित्सा करताना यातील काही प्रबंधामध्ये त्या-त्या लेखकाच्या कादंबऱ्यांचा विचार एखाद्या प्रकरणामध्ये केलेला दिसतो. यामध्ये मंगला आठलेकर यांच्या पु. भा. भावे यांच्या साहित्याची चिकित्सा करणाऱ्या प्रबंधाचे आवलोकन करताना "पु. आ. भावे - कथाकार, कादंबरीकार व नाटककार" (१९८0) या शीर्षकाने

तीन विभागात चार प्रकरणांत भावे यांची कथाकार, कादंबरीकार व नाटककार म्हणून चिकित्सा केली आहे. यापैकी तिसऱ्या प्रकरणामध्ये भाव्यांचा कादंबरीकार म्हणून विचार करताना त्यांच्या कादंबऱ्यांचे सूत्र, आशय, व्यक्तिरेखा व आकृतिबंध या घटकांच्या अनुषंगाने विश्लेषण आले आहे. राजेंद्रकुमार गोपालराव बीडकर यांनी वा.म. जोशी व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय (१९८१) या प्रबंधात आठ प्रकरणात वामन मल्हारांच्या साहित्याची चिकित्सा केली असून त्यांच्या जडणघडणीपासून त्यांच्या शैली-निष्कर्षापर्यंत चर्चा केली आहे. प्रस्तुत प्रबंधातील दुसऱ्या प्रकरणात वामन मल्हारांच्या कादंबरीची चिकित्सा व कादंबरी घटकांची चर्चा केली आहे. श्री. ना. पेंडसे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास या प्रबंधात एकूण दहा प्रकरणांपैकी ३ ते ८ प्रकरणांमध्ये पेंडशांच्या कादंबऱ्यांचा परामर्थ घेतला असून १९८१ साली हा प्रबंध सादर केला गेला आहे. या प्रबंधात वि.रा. तोडकर यांनी त्यांच्या कादंबऱ्यांत दिसणारे पेंडस्यांचे आत्मचरित्र व चरित्राचे पैलू सांगून गारंबीचा बापू, यशोदा, हत्या, कलंदर इ. कादंबऱ्या तर ६,७,८ व्या प्रकरणात रथचक्र ते आक्टोपस येथपर्यंतच्या पेंडशांच्या कादंबऱ्यांतील गुणदोषांची चर्चा केली आहे. १९९३ साली सादर केलेल्या आनंद यादव यांच्या वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास या तानाजी राऊ पाटील यांच्या प्रबंधात कविता-कथेबरोबर यादवांची ग्रामीण पार्श्वभूमीवर येणारी जीवनाची व्यक्तिश्रता, सेंद्रिय अनुभूती व त्यातील चिंतन यांची चिकित्सा करून आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या या घटकात, त्यांच्या कादंबऱ्यांतील ग्रामीणता, ग्रामीण संवेदनशीलता, प्रादेशिकता यांची चर्चा केली आहे. अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन (१९८४) या प्रबंधात बाबुराव रामचंद्र गुरव यांनी अण्णा भाऊच्या साहित्याची चिकित्सा समाजविचाराच्या अनुषंगाने केली आहे. पाच विभागात व दहा प्रकरणात अण्णाभाऊंच्या व्यक्तिचरित्रापासून त्यांच्या साहित्यामागील सामाजिकदृष्टीचा विचार व तिसऱ्या व चौथ्या प्रकरणात अण्णाभाऊंच्या कादंबरीरचनेचा विचार केला आहे. विजय हणमंतराव निंबाळकर यांनी सादर केलेला वि.स. खांडेकर यांचा साहित्यविचार हा १९९० चा खांडेकरांच्या साहित्याची चिकित्सा करणारा महत्त्वाचा प्रबंध आहे. एकूण नऊ प्रकरणांपैकी चौथ्या प्रकरणात खांडेकरांच्या कथात्मक साहित्याचा विचार मांडला आहे. यात खांडेकरांच्या कादंबरीवर भाष्य केले आहे. उदयसिंह रामचंद्र जाधव यांनी विभावरी शिरूरकर: एक चिकित्सक अभ्यास या १९९४ ला सादर केलेल्या प्रबंधात एकूण आठ प्रकरणांमध्ये जीवनपरिचय इतर साहित्य, याचबरोबर तिसऱ्या प्रकरणात त्यांच्या कादंबरीवाङ्मयाचा विचार केला आहे.

भाऊ पाध्ये यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास १९९४ या डॉ. राजन गवस यांच्या प्रबंधामध्ये पहिल्या प्रकरणात पाध्येपूर्व कथा व साहित्य यांचा विचार केला आहे. १९६० पूर्वीच्या कथात्मक वाङ्मयाचे स्वरूप, मर्यादा स्पष्ट करून, तिसऱ्या प्रकरणात पाध्यांच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिचित्रणांचा विचार, त्यांचे वर्गीकरण, व्यक्तिचित्रणशैलीचे विशेष नमूद केले आहेत. चौथ्या प्रकरणात त्यांच्या कथात्मक साहित्यातून चित्रित झालेले महानगरीचे जीवन व अन्य विशेष, नायक नायिका इ. चे चित्रण आले आहे. जीवनचित्रण व घटकअवयव अशी मांडणी न करता वेगळ्या दृष्टिकोणातून या प्रबंधाची रचना दिसते. बाळकृष्ण वि. चौगुले यांनी दि.बा. मोकाशी यांच्या साहित्याचा अभ्यास हा १९९६ साली प्रबंध सादर केला असून, एकूण पाच प्ररकणात दि.बा. मोकाशीपूर्व कथा-कादंबऱ्यांचे स्वरूप सांगून तिसऱ्या प्रकरणात त्यांच्या कादंबरीवाङ्मयाचा आढावा घेतला आहे. स्वरूप, वैशिष्ट्ये, हेतू, व्यक्तिचित्रणे, निवेदन इ. घटकांचा परामर्श यात घेतला आहे. ह.मो. मराठे एक चिकित्सक अभ्यास या प्रबंधात २००५ साली हणमंत राजाराम भाट यानी सहा प्रकरणात ह.मों. ची जडणघडण इतर साहित्य व चौथ्या प्रकरणात त्यांच्या कादंबरीवाङ्मयाचा वेध घेतला आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील वास्तवाचा वेध व तडजोड न करता मांडलेली भाषा हे विशेष मांडले आहेत. याचे स्वरूपविवेचन तिसऱ्या प्ररकणात आले आहे. चंद्रकुमार नलगे यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास या २००२ साली सादर केलेल्या राजाराम बंडू पोवार यांच्या प्रबंधात चौथ्या प्रकरणात चंद्रकुमार नलगे यांच्या कादंबऱ्याचा क्रमश: परिचय देऊन त्यांच्या कादंबऱ्यांविषयी विविध अभ्यासकांच्या मतांचा आढावा घेतला आहे. १९९५ ला सादर केलेल्या शंकरराव खरात यांच्या वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास या जयवंत नामदेव व्हटकर यांच्या प्रबंधात तिसऱ्या प्रकरणात खरातांच्या कादंबऱ्यांचा उहापोह केला आहे. वास्तवदर्शी समाजाचे प्रतिबिंब, खरातांची सामाजिक जाणीव या घटकांआधारे कादंबऱ्यांची चर्चा केली आहे. डॉ. राजन गवस यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदुराव बाबुराव पाटील यांनी श्याम मनोहर यांच्या· साहित्याचा समग्रलक्षी पद्धतीने अभ्यास (२००४) या प्रबंधात तिसऱ्या प्रकरणात मनोहरांच्या चार कादंबऱ्यांची चिकित्सा केली आहे. यात आशयसूत्रांचा शोध, व्यक्तिचित्रणे, निवेदन या घटकांआधारे चिकित्सा केली आहे. धम्मपाल भूपाल रत्नाकर यांच्या नामदेव ढसाळांच्या साहित्याचा अभ्यास (२००१) या प्रबंधात ढसाळांच्या कवितेचा विस्तृत परामर्श घेऊन शेवटी ढसाळांच्या 'हाडकी हडवळा' व 'निगेटिव्ह स्पेस' या कादंबऱ्याचा

आढावा घेतला आहे. इक्बाल जानीसो तांबोळी यांच्या लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या साहित्यातील जीवनानुभवांचे दर्शन-एक अभ्यास (२००२) या प्रबंधात चौथ्या प्रकरणात तांबोळी यांच्या सामाजिक आणि पौराणिक कादंबऱ्यांचा परामर्श घेऊन, त्यावरील समीक्षकांची मतेही लक्षात घेतली आहेत. महादेव मोरे यांच्या साहित्याचा सर्वांगीण अभ्यास (२००२) या प्रबंधात संजय दशरथ पाटील यांनी आशयात्मक पद्धतीने दुसऱ्या प्रकरणात महादेव मोरे यांच्या कथात्मक साहित्याचा आढावा घेतला आहे. जीवनाच्या विविधांगी अनुभवाने चित्रण करणारी त्यांची कादंबरी व आशय मांडले आहेत. शिवाजी पाटील यांनी वसुधा पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास (२००२) ला केला असून तिसऱ्या प्रकरणात त्यांच्या कादंबऱ्याची चिकित्सा करून कादंबऱ्यांचे विशेष नोंदवले आहेत.

**२. ऐतिहासिक व कालिक अभ्यास मांडणारे प्रबंध :**

मराठी कादंबरीवाङ्मयाच्या विद्यापीठीय संशोधनामध्ये व्यक्ती आणि वाङ्मय या विस्तारलेल्या संशोधनप्रकारानंतर कादंबरीच्या अभ्यासाचा संख्येने अधिक असणारा संशोधनप्रकार म्हणून मराठी कादंबरीचे ऐतिहासिक आढावे व कालिक अभ्यास मांडणारे प्रबंध आढळतात. यामध्ये विशिष्ट कालखंड अभ्यासाच्या सोयीनुसार गृहीत धरले आहेत. या कालखंड निवडीमागे कोणतेतरी सूत्र अथवा विचार लक्षात घेतलेला दिसतो. विशेषत: मराठी वाङ्मयीन इतिहासात विशिष्ट कालिक टप्प्यांवर जे बदल झाले हे बदल गृहीत धरेलेले दिसतात. त्याचबरोबर राजकीय, वैचारिक अथवा सामाजिक स्थित्यंतरांचा कालखंडही लक्षात घेतला गेला आहे. अशा प्रबंधांचे स्वरूप खालीलप्रमाणे-

**२.१ मुंबई विद्यापीठातील ऐतिहासिक व कालिक अभ्यास मांडणारे कादंबरीविषयीचे प्रबंध :**

मुंबई विद्यापीठात कालानुक्रमे १९७३ ला सादर केलेला ''मराठी कादंबरी : १९२० ते १९४५ एक अभ्यास'' हा प्रतिभा गोविंद पेंडसे यांचा प्रबंध प्रथमतः आढळतो. एकूण पाच प्रकरणांमध्ये १९२० च्या कालखंडापर्यंतच्या कादंबऱ्यांचा आढावा पहिल्या प्रकरणात घेऊन १९२० नंतरचे प्रमुख कादंबरीकार, १९२० नंतरची आशय अभिव्यक्ती, सामाजिक व व्यावहारिक जीवन घेऊन लिहिलेल्या कादंबऱ्या, १९२० ते १९४५ या कालखंडातील जीवनप्रवृत्ती, या कालखंडातील लक्षवेधी कादंबरीकार इ. चा ऐतिहासिक आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

ऐतिहासिक दृष्टिकोणातून स्त्रीजीवनाचे दर्शन घडविणारा या विद्यापीठातील प्रबंध म्हणजे ''स्वातंत्र्यपूर्व मराठी कादंबरी आणि स्त्रियांच्या आत्मचरित्रातील स्त्रीजीवनाचे दर्शन १८५७ ते १९४७'' हा प्रबंध १९९५ साली शैलजा जोशी यांनी सादर केला असून एकूण नऊ प्रकरणात हा प्रबंध आहे. मराठी स्त्रीच्या कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक जीवनाचा सविस्तर आढावा घेऊन पहिल्या पाच प्रकरणांत प्रमुख कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन कालानुक्रमे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ऐतिहासिक आढावा घेणारे हे दोन प्रबंध मुंबई विद्यापीठात आढळतात.

**२.२ एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई :**

या विद्यापीठात ऐतिहासिक आढावा घेणारा एकही प्रबंध आढळत नसला तरी मराठी कादंबऱ्यांच्या नाट्यरूपांतरांचा तौलानिक अभ्यास-१८८८ ते १९८० हा १९८७ साली सादर केलेला कल्पना कामत यांचा तौलानिक ऐतिहासिक प्रबंध आढळतो. एकूण सहा प्रकरणात विस्ताराने मांडलेल्या प्रबंधात नाटक व कादंबरी यांचा तौलानिक विचार, नाट्यरूपांतरणाची संभवनीय कारणे, फायदे, मर्यादा या दोन वाङ्मयप्रकारांची जवळीकता यांचा उहापोह, इतिहास, कल्पनाशक्ती, सामाजिक विषय इ. अनुषंगाने मांडून तिसऱ्या प्रकरणात १९२० ते १९५० या कालखंडातील लोकप्रिय कादंबऱ्यांची विपुल नाट्यरूपांतरणे या अनुषंगाने विवेचन झाले आहे. पेंडसे व दळवी यांच्या कादंबऱ्या व नाट्यरूपांतरणाच्या विशेषत्वाने उल्लेख आला आहे. १८७० ते १९७० या शतकातील मराठी ऐतिहासिक कादंबरीतील शिवप्रतिमा हा १९७९ साली सादर केलेल्या उषा गोपाल शिराळकर यांच्या प्रबंधात एकूण नऊ प्रकरणात ऐतिहासिक कादंबरी व उपलब्ध असलेल्या काही ग्रंथांआधारे शिवचरित्रांचा परामर्श, हरिभाऊ, नाथमाधव, रणजित देसाई इ. कादंबरीकारांच्या कादंबऱ्यातील शिवप्रतिमांचा परामर्थ घेतला आहे.

**२.३ पुणे विद्यापीठातील ऐतिहासिक आढावात्मक प्रबंध :**

वरीलप्रमाणे याच शीर्षकाने ऐतिहासिक मराठी कादंबरीतील शिवाजी आणि शिवकालाचे चित्रण - १८७१ ते १९८१ या गिरदेव गायकवाड यांच्या पुणे विद्यापीठातील १९८३ च्या प्रबंधात ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या अनुषंगाने ऐतिहासिक आढावा घेतला आहे. दहा प्रकरणात ऐतिहासिक कादंबरीचे अंतरंग, इतिहासलेखन करणाऱ्या कादंबऱ्यांचे अंतरंग, शिवकालाचे कादंबरीमय चित्रण करणारे लेखक, शिवाजी महाराजांचे प्रत्यक्ष चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या व महत्त्वाच्या व्यक्तिरेखा असणाऱ्या कादंबऱ्यांचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे.

पुणे विद्यापीठातील या शिवकालीन ऐतिहासिक कादंबऱ्यानंतर कालिक अभ्यास करणारा व ऐतिहासिक विषय मांडणारा प्रबंध म्हणजे गंगाधर शिवाजी नामगवळी यांचा पानिपत विषयक कादंबरीवाङ्मय- ऐतिहासिकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता (२००२) हा पाच प्रकरणातील प्रबंध असून इतिहास, बखर व कादंबरी यांतील साम्यभेद, पानिपत लढाईचा ऐतिहासिक आलेख व चौथ्या प्रकरणात पानिपतविषयक कादंबऱ्यांचा विचार व प्रत्येक कादंबरीचे वेगळेपण साम्यभेद शोधण्याचा प्रयत्न यात दिसतो. ऐतिहासिक विषयाच्या या कादंबऱ्यांच्या कालिक अभ्यासानंतर विशिष्ट वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास मांडणारे काही प्रबंध पुणे विद्यापीठात आढळतात. यामध्ये विनया विजय डोंगरे यांचा द्वितीय महायुद्धोत्तर मराठी कादंबरीचे स्वरूप १९४५ ते १९७० हा या कालखंडातील कादंबऱ्यांचा परामर्श घेणारा प्रबंध आढळतो. प्रथम अभ्यासाचे स्वरूप मांडून, द्वितीय महायुद्धोत्तर कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, चरित्रात्मक, पौराणिक, अस्तित्ववादी इ. प्रकारातल्या कादंबरीवाङ्मयाचा परामर्श एकूण १३ प्रकरणांत घेतला आहे.

मराठी कादंबरी प्रेरणा, प्रवृत्ती आणि स्वरूप इ.स. १८०० ते १९२० हा १९८८ साली सादर केलेला किरण चित्रे यांचा प्रबंध असून आठ प्रकरणात, कादंबरीचर्चा १८०० ते १८९० व १८९० ते १९२० असे कालखंड कल्पून या कालखंडातील ऐतिहासिक, अद्भुतरम्य, सामाजिक, पौराणिक, भाषांतरित असे कादंबऱ्यांचे वर्गीकरण करून त्यांचा परामर्श घेतला आहे. प्र.ना. अवसरीकर यांनी १९७९ साली कादंबरीमालांनी प्रकाशित केलेल्या स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्यांचा एक अभ्यास (१९१० ते १९३५) या काळातील कादंबऱ्यांचा परामर्श घेतला आहे. मालाकरांनी कादंबरी प्रकाशाला लावलेला हातभार, रचनेच्या अंगाने मालाकारांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप, कादंबरी घटक, निवेदन, समाजदर्शन, सामाजिक कादंबऱ्या, स्त्रियांचे प्रश्न, जातीय संघर्ष, भाषाशैली अशा विविध घटकांच्या अनुषंगाने चिकित्सा केली आहे. १८४० ते १९५० या कालखंडातील मराठी कादंबरीतील सामाजिक प्रेरणा या शीर्षकाने कलिका देशपांडे यांनी प्रबंध सादर केला असून मराठी सामाजिक कादंबरीचे या कालखंडातील स्वरूप व समस्या, सामाजिक कादंबऱ्यांच्या प्रेरणा, सामाजिक स्थिती आणि प्रश्न इ. ची चर्चा केली असून १८८५ ते १९२० व १९२० ते १९५० अशा दोन कालखंडात नऊ प्रकरणात ही चर्चा केली आहे. याच विषयाच्या अनुषंगाने मराठी सामाजिक कादंबरीवाङ्मयातील स्त्रीजीवन १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रीजीवनाचा आढावा सरस्वती पुरंदरे यांनी घेतला आहे. ३३ प्रकरणात व ४

खंडात विस्तृतपणे सादर केलेला हा प्रबंध असून पहिला खंड मुक्तामालापर्यंत, दुसरा खंड हरिभाऊंपासून १९१५ पर्यंत, तिसरा खंड १९२५ ते १९५० आलेल्या स्त्रीसमस्या, सामाजिक जीवन, राजकारणातील १९१५ पर्यंत, तिसरा खंड १९२५ ते १९५० आलेल्या स्त्रीसमस्या, सामाजिक जीवन, राजकारणातील स्त्री, स्त्रियांविषयीच्या प्रथापरंपरांच्या अनुषंगाने उहापोह केला आहे. स्त्रियांच्या कादंबऱ्यांविषयी इ.स. १९६५ ते १९९० या कालखंडातील निवडक मराठी लेखिकांच्या निवडक कादंबऱ्यातील नायिकांच्या प्रतिमा (१९९७) हा आणखी एक प्रबंध मंदाकिनी दिनकर पाटील यांनी सादर केला असून सात प्रकरणात काही प्रमुख स्त्रियांच्या कादंबरीतील नायिका त्यांची विविधता यांची चर्चा केली आहे.

कादंबरीच्या ऐतिहासिक अभ्यासामध्ये साठोत्तर मराठी कादंबरी एक चिकित्सक अभ्यास १९६० ते २००० पर्यंत (२००५) या अलीकडेच सादर केलेल्या प्रबंधामध्ये १९६० ते २००० पर्यंत कादंबऱ्यांचा आशयनिष्ठ अभ्यास १९६० ते १९७५, १९७५ ते १९८५, १९८५ ते २००० या कालखंडातील कादंबऱ्यांचा अभ्यास भास्कर विनायक निफाडे यांनी मांडला आहे.

**२.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद :**

या विद्यापीठातील ऐतिहासिक दृष्टिकोणातून मांडलेल्या कादंबरीविषयी प्रबंधांमध्ये १९८७ साली सादर केलेल्या प्रभाकर सीताराम गळेगावकर यांचा "१८५७ ते १९२० या कालखंडातील कादंबरी विचार" हा प्रबंध महत्त्वाचा आहे. एकूण आठ प्रकरणांत अव्वल इंग्रजी कालखंड, हरिभाऊ कालखंड या दोन टप्प्यांत हा प्रबंध मांडला आहे. स्त्रीवादाच्या अनुषंगाने १९७० ते २००० या कालखंडातील प्रमुख कादंबरी लेखिकांच्या संदर्भात मराठी लेखिकांच्या कादंबरीतील स्त्रीवाद हा विंदा विद्यासागर भुस्कुटे यांनी २००४ ला प्रबंध सादर केला असून स्त्री कादंबरीकारांचा मागोवा, स्त्रीवाद व स्त्रीवादी साहित्य, स्त्रीवादी कादंबरीची चिकित्सा, स्त्रीवादी व्यक्तिमत्त्वे या अनुषंगाने प्रकरणांची मांडणी केली आहे.

**२.५ शिवाजी विद्यापीठ :**

या विद्यापीठामध्ये ऐतिहासिक दृष्टीने समग्र कादंबऱ्यांचा अभ्यास झाल्याचा दिसत नाही. परंतु विविध प्रवाह व विचारांच्या अनुषंगाने ही चर्चा दिसते. कृष्णा जो. इंगोले यांनी "मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन १८९८ ते १९२०" या १९८१ साली सादर केलेल्या प्रबंधात १९२० पूर्वीच्या अनुषंगाने प्रबंधाची मांडणी केली आहे. "मराठीतील महानगरीय

कादंबरी'' या प्रबंधात १९६० ते १९८५ या कालखंडातील महानगरीय जीवनाचा आढावा सुप्रिया राजीव जोशी यांनी घेतला आहे. सहा प्रकरणांत कादंबरी म्हणजे काय? येथपासून या कालखंडातील महानगरीय कादंबऱ्यांच्या आशयसूत्रांचा शोध घेतला आहे.

''मराठी कादंबरी आणि प्रीतिभावना'' १८५७ ते १९७१ या कालखंडातील मराठी कादंबरीतील प्रीतिभावनेचे चित्रण एस. एस. भोसले यांनी केले आहे. प्रागैतिहासिक काळापासून अलीकडे अद्‌भुत युग, हरिभाऊंचे युग, फडके खांडेकर युगातील कादंबऱ्यांमधील प्रीतिभावनेची चर्चा केली आहे.

''१९६० नंतरच्या मराठी नवकादंबरीचे स्त्रीवादी भूमिकेतून आकलन'' २००३ साली सादर केलेल्या प्रबंधामध्ये शोभा अनंत नाईक यांनी भारतीय स्त्रीवादाची संकल्पना मांडून आधुनिक युगातील साठोत्तर काळातील काही प्रमुख कादंबरीकार व स्त्रीकादंबरीकारांच्या अनुषंगाने स्त्रीवादाचे स्वरूप मांडले आहे. अशा प्रकारे या विद्यापीठात ऐतिहासिक दृष्टिकोणातून मांडलेले प्रबंध आढळतात.

**३. ग्रामीण, प्रादेशिक आणि दलित कादंबऱ्यांविषयी प्रबंध :**

**३.१** मुंबई विद्यापीठातील प्रबंधांमध्ये वृंदा सुभाष कौजलगीकर यांचा ''१९६० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी'' हा ग्रामीण कादंबरीवरचा प्रबंध आढळतो. १९९८ साली सादर केलेल्या या प्रबंधामध्ये आठ प्रकरणात कादंबरीतत्त्वचर्चा, कथानक, घटना, प्रसंग, संघर्ष, संवाद, वर्णने, निवदेन, इ. पारंपरिक घटकांच्या अनुषंगाने ग्रामीण कादंबरीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. १९८८ साली प्रादेशिक विषयावर ''कोकणच्या पार्श्वभूमीवरील मराठी कादंबरी वाङ्मय'' १९२५ ते १९८० या कालखंडातील कादंबरी वाङ्मयाची परामर्श नेताजी य. पाटील यांनी घेतला आहे. एकूण सात प्रकरणांत कोकणची पार्श्वभूमी, या पार्श्वभूमीवरील कादंबऱ्या, भावूक वृत्तीने घडविलेले कोकणचे दर्शन व पेंडसे, खानोलकर, कर्णिक, हमीद दलवाई या काही महत्त्वाच्या कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांचा परामर्श घेतला आहे.

**३.२** पुणे विद्यापीठाच्या प्रबंधांमध्ये भास्कर शेळके यांचा ''मराठी कादंबरीतील प्रादेशिकता (निवडक कादंबऱ्यांचा आधारे १८२५ ते १९९०)'' १९९५ साली सादर केलेला एकूण सहा प्रकरणांतला हा प्रबंध आहे. 'प्रादेशिकता' ही संकल्पना स्पष्ट करून कोकण, पश्चिम महाराष्ट्र, घाटमाथा-मावळ, माणदेश, गोवा, मराठवाडा, इ. प्रदेशातील कादंबऱ्यांचा परामर्श त्यांनी घेतला आहे.

३.३ औरंगाबाद विद्यापीठामध्ये विष्णू साळुंखे यांचा "स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी ग्रामीण कादंबरी - एक चिकित्सक अभ्यास" हा प्रबंध ग्रामीण कादंबरीवर असून यात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोरोडे या कादंबरीकारांच्या संदर्भात ग्रामीणतेची चर्चा केली आहे. उज्ज्वला शिवराम जगताप यांनी "रा. रं. बोरोडे यांच्या साहित्यातून प्रकटणारे ग्रामवास्तव आणि स्त्रीचित्रण : एक चिकित्सक अभ्यास" या शीर्षकाने सात प्रकरणांत ग्रामदर्शन, मराठी साहित्य व बोरोडे यांच्या कादंबऱ्यांमधील ग्रामवास्तवाचे चित्रण व स्त्रीदर्शनाचा विचार केला आहे. "ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन" (२००४) या वामन मुरलीधर जाधव यांच्या प्रबंधात सात प्रकरणांत वैचारिक कालखंडातील शेतकरी जीवन, कथा, कादंबरी, ललित कविता, इ. वाङ्‌तयप्रकारात येणारे शेतकरी जीवन शोधले असून चौथ्या प्रकरणात कादंबरीतील शेतकरी जीवनाचा उहापोह केला आहे.

३.४ शिवाजी विद्यापीठाच्या प्रबंधामध्ये तरूजा भारत भोसले यांचा "मराठी कादंबरीतील कोकणी जीवनाचे चित्रण" (२००२) हा प्रादेशिक विषयावरचा प्रबंध दिसतो. सहा प्रकरणांत मराठी कादंबरीतील ग्रामवास्तवाचा परिचय, कोकणच्या पार्श्वभूमीचे चित्रण, कादंबरीच्या अनुषंगाने आलेले जीवन, मराठी कादंबरीतील कोकण जीवनाची अभिव्यक्ती, स्वभावचित्रण, जीवनचित्रण अशा पारंपरिक घटकांची चर्चा यात आली आहे. मोहन बाळकृष्ण पाटील यांचा "मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री जीवनाचे चित्रण - एक चिकित्सक अभ्यास" (२००३) हा एक महत्त्वाचा प्रबंध आढळतो. ग्रामीण कादंबरी आणि स्त्रीजीवनाचे स्थान, मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीजीवनचित्रणाचा सामाजिक अंगाने अभ्यास, मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्रीमनाचें चित्रण व निवेदन इ. घटकांनुसार या प्रबंधाची मांडणी केंली आहे.

३.५ ग्रामीण कादंबऱ्यांच्या संदर्भात झालेल्या प्रबंधांनंतर 'दलित' या प्रवाहाच्या अनुषंगानेही काही प्रबंध आढळतात. अगदी अलीकडेच सादर केलेले हे प्रबंध असून मुंबई विद्यापीठामध्ये नंदा केशव मेश्राम यांचा "दलित कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" (२००३) हा प्रबंध आढळतो. सात प्रकरणांत कादंबरी संकल्पना, दलित संकल्पना मांडून कथानक, पात्रे, भाषा, इ. पारंपरिक घटकांनुसार मांडणी केली आहे. पुणे विद्यापीठात 'दलित' विषयावर एकही प्रबंध आढळत नाही. दलित कादंबरीच्या संदर्भात औरंगाबाद विद्यापीठातही प्रबंध आढळत नाही.

शिवाजी विद्यापीठात मात्र या विषयावर प्रबंध आढळतात. यामध्ये विलास गणपती कांबळे यांचा "फुले आंबेडकर विचारप्रणाली आणि

मराठीतील दलित कादंबरी'' या १९९९ साली सादर केलेल्या प्रबंधात पाच प्रकरणांत वैचारिक कादंबरी व दलित कादंबरी, १९६० नंतरची वैचारिकता, दलित कादंबरीतील जीवनदर्शन व कादंबऱ्यांतून आढळणारा फुले-आंबेडकरी विचार शोधण्याचा प्रयत्न केला आहे. १९९० साली सादर केलेल्या बाबुराव दत्तात्रय गायकवाड यांच्या ''दलितेतर लेखकांच्या कथात्मक साहित्यातील दलितांचे चित्रण'' या प्रबंधात पाच प्रकरणांत दलित साहित्याच्या प्रेरणा, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील कथात्म साहित्य व त्यातील दलितेतर लेखकांच्या कथात्मसाहित्यातील दलित चित्रण असे स्थूल स्वरूप मांडले आहे. ''साठोत्तरी मराठी कादंबरीतील दलित समाज जीवनाचे चित्रण'' या विषयावर २००३ साली दगडू तुकाराम पाटील यांचा सहा प्रकरणांतला प्रबंध आहे. साठपूर्वीचा दलित समाज व कादंबरी यांचा आढावा घेऊन साठोत्तरी दलित, भटके, विमुक्त, आदिवासी यांच्याविषयीच्या कादंबऱ्यांचा आढावा घेतला आहे.

**४. कादंबरी या वाङ्मयप्रकाराविषयीचे प्रबंध :**

कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या अनुषंगाने झालेलेही काही प्रबंध विद्यापीठांमध्ये आढळतात. यामध्ये प्रामुख्याने मुंबई विद्यापीठामध्ये हरिश्चंद्र थोरात यांचा १९९४ ला सादर केलेला ''कादंबरी एक साहित्यप्रकार - मराठी कादंबरीच्या विशेष संदर्भात''हा प्रबंध या वाङ्मयप्रकाराची चर्चा करणारा प्रबंध असून चार प्रकरणांत कादंबरी संकल्पना, पाश्चात्त्य-पौर्वात्यांच्या अनुषंगाने तिचे स्वरूप, वास्तव कल्पित, कथनात्मकता, कादंबरी व समाज, भाषा याची चर्चा आली आहे. कादंबरीचे साहित्यशास्त्र, रचना यात पारंपरिक घटकांचा परामर्श घेतला असून चौथ्या प्रकरणात तिच्या सर्वसमावेशकतेची विस्तारित चर्चा आली आहे.

पुणे विद्यापीठामध्येही या वाङ्प्रकाराविषयी काही प्रबंध आढळतात. यामध्ये एकनाथ श्रावण पगार यांचा ''मराठी कादंबरीची संरचना चिकित्सक अभ्यास'' (१९९९) या दोन खंडात सादर केलेल्या प्रबंधात पहिल्या दोन प्रकरणांत कादंबरी संकल्पना व संरचना याविषयी चर्चा असून या संरचनेत कथानक व व्यक्तिचित्रणे या अनुषंगाने चर्चा केली आहे. वातावरण व कादंबरीचे घडणे, भाषा व कादंबरी संरचना इ. घटकांच्या अनुषंगाने व इतर घटकांचा उहापोहही येथे विस्ताराने केला गेला आहे. कादंबरी वाङ्मयप्रकारातील उपप्रकार म्हणजे लघुकादंबरी ''लघुकादंबरीची संकल्पना व मराठी लघुकादंबरी'' (१९९६) हा स्वाती कर्वे यांच्या प्रबंधात चार विभागत लघुकादंबरी निर्मितीसंबंधी चर्चा, मराठीतील प्रमुख लघुकादंबरीकार इ. च्या

अनुषंगाने हा प्रबंध मांडला आहे. "मराठी कादंबरीतील व्यक्तिरेखाटन - एक तांत्रिक अभ्यास" हा १९८२ साली प्रभा नातू यांनी सादर केलेला प्रबंध कादंबरी वाङ्मयप्रकारातील एका घटकाची चर्चा करणारा आहे. कादंबरी तत्त्वचर्चा यात कादंबरी घटकांची चर्चा करून वाङ्मयप्रकाराचे स्वरूप मांडले आहे. व्यक्तिरेखांचा परामर्श घेताना, घटना, प्रसंग, अभिव्यक्ती, मनोविश्लेषण, व्यक्तिरेखांचे विश्व व जीवनशोध, समाज व व्यक्तिरेखा, व्यक्तिरेखाटन प्रकार, व्यक्तिरेखाटन घटित, काल्पित, इ. घटकांची चर्चा या प्रबंधात झाली आहे.

या वाङ्मयप्रकाराच्या समीक्षेचे स्वरूप व तात्त्विक चर्चा करणारा, एकूण १५ प्रकरणात मांडलेला एकमेव महत्त्वपूर्ण प्रबंध कृ. के. कडवे यांनी सादर केला आहे. मराठी कादंबरीच्या समीक्षा वाङ्मयाचे स्वरूप आणि विकास १८६५ ते १९३५ असा हा प्रबंध आहे. विषयविवेचन, अव्वल इंग्रजीतील टीकाजाणिवा, इंग्रजी संस्कृत दृष्टीची सरमिसळ व त्याची चिकित्सा, कादंबरीकारांची वाङ्मयीन भूमिका, समीक्षा, नियतकालिकातील अभिप्राय व परीक्षणे, प्रतिभावंतांची वाङ्मयीन चिकित्सा, कादंबरी विकास, श्रीपाद कृष्ण, राजवाडे, ऐतिहासिक कादंबरीसमीक्षा, हरिभाऊ, वामन मल्हार, केतकर, माडखोलकर यांची टिका-चिकित्सा व समीक्षेचे प्रवृत्तीप्रवाह अशा प्रकारे या प्रबंधाची मांडणी केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रबंधांमध्ये महेंद्र सुदाम कदम यांचा कादंबरीची संकल्पना आणि मराठी कादंबरी-स्वरूप चिकित्सा हा १९९८ साली सादर केलेला प्रबंध असून या वाङ्मयप्रकाराविषयी चर्चा यात आली आहे. कादंबरी वाङ्मयप्रकार व वेगळेपण, संकल्पना, स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप, रंजनप्रधान, सामाजिक, ऐतिहासिक, ग्रामीण, प्रादेशिक, नवकादंबरी नवकादंबरीची अविष्कारतंत्रे, स्त्रीवादी, अस्तित्ववादी इ. कादंबरी वाङ्मयप्रकार व संकल्पना यांचा विचार येथे मांडला आहे. या वाङ्मयप्रकाराच्या संकल्पना आणि संरचना यांचा विचार करणाऱ्या प्रबंधानंतर कादंबरीविषयी आणखी काही प्रबंध आढळतात.

**५. कादंबरी व इतर वाङ्मयप्रकार यांच्याविषयी तुलनात्मक प्रबंध :**

विशेषत: नाटक या वाङ्मयप्रकारामध्ये रूपातंरित झालेल्या कादंबऱ्यांची व नाटकांची तौलानिक दृष्टीने मांडणी काही प्रबंधात आढळते. कादंबरी हा वाङ्मयप्रकार नाटक या वाङ्मयप्रकारामध्येच रूपांतरित होणे शक्य असल्याने अशा काही रूपांतरित कादंबऱ्या व नाटके यांचा अभ्यास मांडलेला दिसतो. यामध्ये मुंबई विद्यापीठात शुभदा खाडिलकर यांचा मराठी वाङ्मयातील

कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरे व त्यांची चिकित्सा (१९८२ पर्यंत) हा प्रबंध आढळतो. एकूण आठ प्रकरणात प्रारंभी नारूपांतराचा हेतू व शक्यता, अशा रूपांतराची गरज का भासते. याची चर्चा, तिसऱ्या प्रकरणात कादंबऱ्यांची नाट्यानुकूलता व नाटकाच्या रूपबंधांच्या वैशिष्ट्यांचा तुलनात्मक अभ्यास, चौथ्या प्रकरणात आधारभूत कादंबऱ्याचे विश्लेषण, नाट्यरूपांतरांची स्वाभाविकता, समर्थनीयता अशा मुद्यांचा अभ्यास केला आहे. एस्.एन्.डी.टी. विद्यापीठामध्ये कल्पना तारानाथ कामत यांचा एक प्रबंध आढळतो. मराठी कादंबऱ्यांच्या नाट्यरूपांतरणाचा तौलानिक अभ्यास १९६० ते १९८० या १९८७ ला सादर केलेल्या प्रबंधामध्ये सहा प्रकरणात दोन वाङ्मयप्रकारांच्या रूपांतरणाची संभवनीय कारणे, कायदे, मर्यादा, जवळीकता इ. घटकांची चर्चा, १८८८ ते १९२० व १९२० ते १९५० व नंतर जयवंत दळवी, श्री.ना. पेंडसे इ. महत्त्वाच्या लेखकांच्या नाट्यरूपांतरणाचा विचार केला आहे.

पुणे विद्यापीठातही असे प्रबंध आढळतात कलांतर रूप स्वरूप आणि समस्या (मराठी कथाकादंबरीला दिलेल्या नाट्यरूपांच्या संदर्भात) १९८७ हा वीणा देव यांचा प्रबंध आढळतो. सहा प्रकरणात कादंबरी व नाटक रूपचर्चा, कलांतराची समस्या आणि नाट्यरूपांची चिकित्सा, नाट्यरूपांतर यांच्या विविध प्रेरणा, आशय, अभिव्यक्ती व विचारांची समीक्षेत झालेली चर्चा, कादंबऱ्यांच्या नाट्यरूपांतरासाठीचे निकष, कादंबरीकथांची नाट्यरूपे त्यांचा विकास व निवडक नाट्यरूपांची चिकित्सा आदी प्रकरणात मांडणी केली आहे. नाटक आणि कादंबरी संदर्भात औरंगाबाद विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ येथे तौलानिक प्रबंध आढळत नाहीत.

याशिवाय तौलानिक साहित्यअभ्यास अंतर्गत मराठी ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबरी तुलनात्मक अभ्यास (१९८६) हा पुणे विद्यापीठात लीला गोविलकर यांचा प्रबंध आढळतो. सात प्रकरणात इतिहास गौरवाचा पुनराविष्कार, चरित्र व त्यांची तुलनात्मक मांडणी येथे केल्याची दिसते. याच अनुषंगाने औरंगाबाद विद्यापीठामध्ये हरिभाऊ देवराव पाटील यांचा हरिनारायण आपटे आणि मुन्शी प्रेमचंद यांच्या सामाजिक कादंबऱ्यातील मौलिक चिंतन या शीर्षकाने १९९७ साली सादर केलेला एक प्रबंध आढळतो. सहा प्रकरणात कादंबरी स्वरूपविवेचन, मराठी-हिंदी कादंबरीचा विकास, दोन्ही कादंबरीकारांचा व्यक्तिपरिचय व चौथ्या प्रकरणात कादंबरीत अनेक पातळ्यांवर सामाजिकता मांडली आहे.

याशिवाय आणखी काही वेगळ्या विषयांवरचे त्रोटक प्रबंध आढळतात. यामध्ये स्त्रियांच्या कादंबऱ्यांविषयी 'व्यक्ती आणि वाङ्मय' हा

प्रकार सोडून एकूण स्त्री साहित्यप्रवाहाची नोंद घेणारे काही प्रबंध आढळतात. यामध्ये पुणे विद्यापीठात मराठी कादंबरीत लेखिकांनी घातलेली भर- १८५७ ते १९४७ या कालखंडावरील प्रमिला घनशाम भिरूड यांचा प्रबंध दिसतो. दोन विभागात पाच प्रकरणात स्त्रियांच्या कादंबरीलेखनाचे स्वरूप, ऐतिहासिक आढावा १८८५ पूर्व स्त्रियांचे कादंबरीलेखन, १८८५ ते १९२०, १९२० ते १९३५, १९३५ ते १९४७ येथपर्यंत स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा ऐतिहासिक आढावा यात दिसतो. यात विद्यापीठामध्ये मराठी स्त्री कादंबरीकारांच्या नायिका : एक स्त्रीवादी शोध १९८५ ते २००० या कालखंडातील (गौरी देशपांडे, सानिया, अंबिका सरकार, आशा बगे या स्त्री कादंबरीकारांच्या विशेष संदर्भात) सहा प्रकरणात हा प्रबंध मांडला आहे. स्त्रीवाद संकल्पना ते स्त्रीवादी दृष्टिकोणातून नायिकांचा विचार यात केला आहे. याशिवाय मराठी सामाजिक कादंबरीवाङ्मयातील स्त्रीजीवन १८५० ते १९५० हा १९८४ साली सादर केलेला सरस्वती पुरंदरे यांचा प्रबंध महत्त्वाचा आहे. ३३ प्रकरणात ४ खंडात विभागलेल्या या प्रबंधात आपण या आधी ऐतिहासिक आढाव्यात घेतला आहे. ऐतिहासिक आढाव्यातील प्रबंधाचे स्वरूप लक्षात घेताना आणखी काही स्त्रियांविषयीचे प्रबंध लक्षात घेतले आहेत.

शिवाजी विद्यापीठामध्ये कादंबरी संदर्भात वेगळ्या विषयाचे आणखी काही प्रबंध आढळतात. यामध्ये मराठी कादंबरीचा मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून चिकित्सक अभ्यास- १९६० नंतरच्या निवडक कादंबरीकारांच्या कादंबऱ्यांसंदर्भात हा एक वेगळ्या विषयाची मांडणी करणारा सन २००० साली सादर केलेला प्रबंध आढळतो. सात प्रकरणात मानसशास्त्र आणि मराठी साहित्य, कादंबरीची मानसशास्त्रीय संरचना, मानसशास्त्रामुळे आलेले प्रवाह नवप्रवाह, संज्ञाप्रवाह इ., नवकादंबरीतील लैंगिकता, ऐतिहासिक कादंबरीतील मानसशास्त्र, प्रादेशिक आणि दलित कादंबरीतील मानसशास्त्रीय स्वरूप इ. घटकांची चर्चा केली आहे. गजानन आप्पासाहेब पाटील यांनी हा प्रबंध सादर केला आहे.

मराठी कादंबरीतील वास्तववाद आणि अतिवास्तववाद यांचे स्वरूप (१९७५) हा एक महत्त्वाचा प्रबंध शिवाजी विद्यापीठात आढळतो. प्रभाकर धोंडो गुमास्ते यांचा १२ प्रकरणातला हा प्रबंध असून कलानिर्मिती आणि वास्तव यात वास्तववादाचे स्वरूप, वास्तववादातील वास्तवतेचे स्वरूप, अतिवास्तववाद संकल्पना व प्रारंभीपासून मराठीतील वास्तवादी व अतिवास्तववादी कादंबऱ्यांचा परामर्श येथे घेतला गेला आहे.

## ६. सारांश :

विद्यापीठीय संशोधनातील कादंबरीविषयी प्रबंधांचे स्थूल स्वरूप वरीलप्रमाणे आहे. या विद्यापीठीय प्रबंधांमध्ये अधिकाधिक प्रबंध आढळतात ते एक लेखक व त्यांच्या साहित्याचा/कादंबऱ्यांचा अभ्यास मांडणारे प्रबंध व्यक्ती आणि वाङ्मय या गटात हे प्रबंध आपणास वर्गीकृत करता येतील. यात लेखकाचे चरित्र त्याच्या कादंबऱ्यांचा घटकचर्चा असे पारंपरिक पद्धतीने संशोधन या प्रबंधांमध्ये दिसते. केवळ पदवीसाठी सादर केलेले व अपवाद वगळता दर्जेदार नसणारे हे प्रबंध आहेत. सर्वच विद्यापीठांमध्ये अशा प्रबंधाचा भरणा अधिकाधिक दिसतो.

दुसरा संख्येने आढळणारा प्रबंधाचा प्रकार म्हणजे कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा ऐतिहासिक आढावे घेणारे प्रबंध यामध्ये विशिष्ट कालखंडातील कादंबऱ्या समोर ठेवून त्याच्या प्रवृत्ती मांडणे, आशयात्मक आढावा घेणे, व्यक्ती, कथानक, निवेदन हे पारंपरिक निकष लावून संरचनात्मक घटकांची चर्चा करणे, असा प्रकार आढळतो. सर्वांनीच प्रारंभी या वाङ्मयप्रकाराचे संकल्पनात्मक स्वरूप मांडून कालिक पद्धतीने ऐतिहासिक, दलित, ग्रामीण, प्रादेशिक, वास्तववादी इ. प्रवाहांच्या अनुषंगानेही ऐतिहासिक आढावे घेतलेले दिसतात. याशिवाय, स्त्रियांच्या कादंबऱ्यांचा इतिहास, स्त्रीवादी दृष्टिकोनातून इतिहास असेही काही प्रबंध आढळतात.

ऐतिहासिक कादंबऱ्यातील चरित्रे, चरित्रात्मक कादंबऱ्या यांचा अभ्यास करणारेही काही प्रबंध आढळतात.

कादंबरी आणि इतर वाङ्मयप्रकार या अनुषंगाने तौलानिक अभ्यास मांडणारे जे प्रबंध आढळतात त्यात कादंबरीची नाट्यरूपांतरे, नाटक आणि कादंबरी याप्रकारे नाटक या वाङ्मयप्रकारशी जवळीकता असणाऱ्या कादंबऱ्या व कादंबरीची नाट्यरूपांतरणे हा एकच विषय बहुधा बऱ्याच संशोधकांनी मांडलेला दिसतो. इतर वाङ्मयप्रकाराबाबतील चरित्रवाङ्मय वगळता कथा, कविता यांच्या अनुषंगाने कादंबरीचा अभ्यास मांडता गेला नाही. कारण इतर वाङ्मयप्रकाराच्या तुलनेला अनुकूल असा हा वाङ्मयप्रकार फारसा दिसत नाही.

तौलानिक साहित्याभ्यासाच्या दृष्टीने कादंबरी हा वाङ्मयप्रकार अनुकूल असला तरी तसा प्रयत्न क्वचितच विद्यापीठीय संशोधनात आढळतो. नाटक आणि कादंबरी, ऐतिहासिक आणि चरित्रात्मक कादंबरी, ऐतिहासिक आणि चरित्रात्मक कादंबरी, मराठीतील एखादी कादंबरी व हिंदी कादंबरी वगळता इतर भाषेतल्या कादंबऱ्यांचा तौलानिक अभ्यास झाल्याचे दिसत

नाही. इतर भारतीय भाषा आणि आंग्ल भाषेतील कादंबऱ्या यांच्या तौलानिक अभ्यासाकडे फारसे लक्ष गेल्याचे दिसत नाही.

दलित, अदिवासी, भटक्या जमाती इतर मानवी समूहांचे जीवनदर्शन घडविणाऱ्या कादंबऱ्यांचा अभ्यास क्वचित प्रमाणात दिसतो. याशिवाय वेगळे विषय मांडणारे म्हणून मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून संज्ञाप्रवाह आणि मराठी कादंबरी याविषयी क्वचित प्रबंध आढळतात. आधुनिक समकालीन साहित्यातील अनेक प्रवाह, संकल्पना, प्रवृत्ती या दृष्टीने संशोधन बऱ्याच विद्यापीठात सुरू असल्याचे दिसते. उदा. अस्तित्त्ववाद, सरंचनावाद, रूपवाद, आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकतावाद इ. संकल्पनांचा व पाश्चात्य संकल्पनांच्या आधारे मराठी कादंबरीचे संशोधन अजून सुरू असल्याचे दिसते.

**प्रबंधांचे संदर्भ :**

- मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- एस्.एन. डी.टी. विद्यापीठ, मुंबई.
- पुणे विद्यापीठ, पुणे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
- शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# मराठी कादंबरी समीक्षा आणि संशोधन

श्री. कैलास दौंड

**प्रास्ताविक :**

महाराष्ट्रात प्रामुख्याने मराठी भाषा बोलली, लिहिली व वाचली जाते. ही इथली मातृभाषा आहे. भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या परिशिष्टात मान्यता प्राप्त भाषा म्हणूनही मराठीला महत्त्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रातील बहुतांशी शाळांमध्ये मराठी हेच शिक्षणाचे माध्यम आहे. खेड्यापाड्यात मराठी भाषा बोलली जात असली तरी तिच्या रूपात विविधता आहे. त्यातूनच वऱ्हाडी, अहिराणी, मालवणी, मराठवाडी अशा मराठीच्या विविध बोली भाषा मानल्या जातात.

मराठीच्या साहित्य प्रांतात कथा, कविता, नाट्य, ललितलेख यांच्या जोडीने कादंबरी लेखनही जोमाने केले जाते. कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा आवाका मोठा असतो. अनेक घटना, प्रसंग यांची वैशिष्ट्यपूर्ण गुंफण देखील त्यात असते. त्यामुळे कादंबरी या वाङ्मयप्रकाराला वाचक देखील मोठ्या प्रमाणात असतात. 'खरोखर एखाद्या भावकवितेप्रमाणेच कुठल्याही ललित साहित्यकृती प्रमाणेच कादंबरीचे कादंबरीपण तिच्या शब्दाशब्दात, प्रत्येक शब्दांच्या उच्चारात, स्थानात आणि व्यंगार्थाची लयतत्त्वानुसार होणाऱ्या संघटनेचे घटक म्हणून वावरणारे दृश्य आकार, श्राव्य नाद, कालतत्त्व, तर्कतत्त्व या साऱ्यांचे पूरकस्थान आणि प्रयोजन इत्यादींचा शोध म्हणजे खरोखर कादंबरी समीक्षा होय.'[१] या डॉ. द.भि.कुलकर्णी यांच्या व्याख्येनुसार आजची कादंबरी समीक्षा सर्वव्यापी आहे का? साहित्यकृतीच्या प्रयोजनाचा शोध घेताना समीक्षेचे प्रयोजन काय? या महत्त्वाच्या बाबी देखील मराठीत कादंबरी समीक्षेच्या संदर्भात लक्षात घ्यावा लागतात. मराठीत खरोखर इतक्या विविध अंगाने कादंबरी समीक्षा झालेली नसली तरी मराठी कादंबरी समीक्षेच्या पुढीलप्रमाणे दिशा ठरवता येतात.

**मराठी कादंबरीचे स्वरूप :**

मराठी कादंबरीचे विश्व विविधांगी आहे. मनोरंजनापासून प्रबोधनापर्यंतची प्रयोजने कादंबरी निर्मितीमागे प्रबळ तर होतीच, परंतु वास्तवाचे दर्शन घडविणे, व्यामिश्र जीवन दर्शन घडविणे हेही काही

कादंबरीकारांचे प्रयोजन असल्याचे दिसते. कल्पित वास्तवाचे दर्शन घडवणाऱ्या कादंबऱ्या मात्र त्यांचे कादंबरीपण जपण्याचा प्रयत्न करताना दिसतात. डॉ. द. भि. कुलकर्णी सारखे कादंबरी समीक्षक कुठल्याही कादंबरीला 'सामाजिक कादंबरीच' मानतात. त्या दृष्टीने त्यांचे पुढील मत पाहणे आवश्यक आहे, ''वास्तविक कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा उदयच मुळी एका सामाजिक जाणिवेतून झाला आहे. मानवाला स्वत:च्या समाजसापेक्ष सुखदु:खाबद्दल जेव्हा उत्कृष्ट आणि स्वान्त आस्था निर्माण झाली. त्यानंतरच्या काळात, त्या मागोमाग कादंबरी प्रकाराचा उदय झाला. जोवर मानव व्यक्तींच्या आध्यात्मिक सुखदु:खात रमला होता. तोच त्याच्या आस्थेचा विशय होता. तोवर जपानचा अपवाद वगळता कादंबरी हां प्रकारच निर्माण झाला नव्हता. अठराव्या शतकात इंग्लडमध्ये आणि एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात कादंबरीचा उदय झाला. त्यामागे ही एक निश्चित सामाजिक प्रक्रिया होती. या अर्थाने प्रत्येक कादंबरी मग ती रम्याद्भूत असो, पौराणिक असो, मनोविश्लेषणात्मक असो, मूलत: सामाजिक कादंबरीच असते.''[२] म्हणजे कादंबरीत सामाजिकता ही अंगभूत असतेच. तरी कादंबरीचे तिच्या रूपावरून, विषयवस्तूवरून पुढील प्रकार पडतात.

१. सामाजिक कादंबरी
२. संज्ञाप्रवाही कादंबरी
३. ऐतिहासिक कादंबरी
४. प्रादेशिक कादंबरी
५. ग्रामीण कादंबरी
६. दलित कादंबरी
७. महानगरी कादंबरी
८. स्त्रीवादी कादंबरी
९. मनोविश्लेषणात्मक कादंबरी
१०. समस्याप्रधान कादंबरी
११. अदभूतरम्य कादंबरी
१२. गुढ कादंबरी
१३. विज्ञान कादंबरी
१४. चरित्रात्मक कादंबरी
१५. आत्मचरित्रात्मक कादंबरी
१६. भाषांतरित कादंबरी
१७. भाषा वैज्ञानिक दृष्टिकोणातून केलेली समीक्षा

जर मराठी कादंबरीच्या रूपात इतकी विविधता आहे, तर कादंबरी समीक्षेतही ती असणे क्रमप्राप्त आहे. एकाच मापाने भिन्न भिन्न प्रवृत्तीच्या आणि प्रवृत्तीच्या कादंबऱ्यांना तोलणे हे त्या साहित्यकृतीवर अन्याय करणारे तर ठरेलच, पण कादंबरीकडे पाहण्याचा वाचकाचा दृष्टिकोण बदलवणारे ही ठरेल. कारण समीक्षेचा उद्देश वाचकांना प्रस्तुत साहित्यकृतीचा परिचय करून देणे हा असतो.

**मराठी कादंबरी समीक्षेच्या दिशा :**

मराठी कादंबरीची समीक्षा देखील मोठ्या प्रमाणात होताना दिसते. तरीही कित्येक कादंबऱ्या दुर्लक्षित राहतात. साधारणत: मनोरंजनासाठी लिहिल्या जाणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या मराठी भाषेत मोठी असून मनोरंजन या प्रयोजनामुळेच समीक्षक अशा कादंबऱ्यांच्या समीक्षेकडे वळत नाहीत, असे म्हणण्याला वाव आहे.

कादंबरी समीक्षेत वा.ल.कुलकर्णी, उषा माधव देशमुख, चंद्रकांत बांदिवडेकर, द. भि. कुलकर्णी, प्र. ना. अवसरीकर, डॉ. नागनाथ कोतापल्ले, डॉ. भास्कर शेळके, डॉ. पंडित टापरे, उषा हस्तक, नरहर कुरूंदकर, श्री. कृ. कोल्हटकर, श्री.के. क्षीरसागर, गंगाधर गाडगीळ इत्यादी समीक्षकांनी मोठी भर टाकली आहे. पूर्वसुरींच्या समीक्षेमधूनच मराठी कादंबरीच्या समीक्षेच्या अनेकांगी दिशा स्पष्ट होतात.

**कादंबरी समीक्षेच्या पद्धती :**

१. आस्वादक समीक्षा
२. रूपबंधात्मक समीक्षा
३. आदिबंधात्मक समीक्षा
४. मनोविश्लेषनात्मक समीक्षा
५. अधिवास शास्त्रीय समीक्षा
६. भाषांतरित कादंबरीची समीक्षा
७. विशिष्ट साहित्य प्रवाहातील कादंबरी समीक्षा
८. विशिष्ट कालखंडातील कादंबरीची समीक्षा

**१. आस्वादक समीक्षा :** रसास्वाद ही संकल्पना आस्वादक समीक्षेच्या मुळाशी आहे. 'आस्वादक समीक्षा पद्धतीने साहित्याची समीक्षा करणारा समीक्षक हा कलाकृती उलगडून पाहतो व स्वत: तिची हवी तशी मांडणी करतो.'[३] आस्वादक समीक्षेतून कलाकृतीच्या आस्वादाच्या विविध खिडक्या उघडल्या जातात. त्यासाठी समीक्षकांकडे चिंतनाच्या पातळीवर जाणारी आस्वादकता असणे क्रमप्राप्त असते. आस्वादक समीक्षा ही रसग्रहण तर करतेच, परंतु अपूर्णतेचाही षोध घेते. समीक्षेसाठी ध्यानस्थ आणि तटस्थवृत्ती आस्वादक समीक्षेचे मूल्य वाढवत असते व इतरांना मूळ कलाकृतीचा आस्वाद घ्यायला प्रेरित करीत असते.

**२. रूपबंधात्मक समीक्षा :** रूपबंधात्मक स्वरूपाच्या कादंबरी समीक्षेमध्ये कादंबरीच्या रूपाची चिकित्सा करणेच अभिप्रेत असते. आज मितीला रूपबंधात्मक समीक्षा अधिक प्रमाणात होताना दिसते. कथानक रचना,

निवेदन पद्धती, स्वभावलेखन, समाजदर्शन, भाषाशैली, उपसंहार, निष्कर्ष अशा रूपघटकांच्या अनुषंगाने कादंबरीची समीक्षा करणे याला रूपबंधात्मक समीक्षा म्हणता येईल. रूपबंधात्मक समीक्षा पद्धती ही आस्वादक समीक्षा पद्धतीप्रमाणेच सर्वसमावेशक समीक्षा पद्धती ठरते. केवळ रूपबंध महत्त्वाचा की आशय महत्त्वाचा की, रूपबंध आणि घटना प्रसंगाच्या माध्यमातून येणारी आशयनिष्ठ समाजदर्शनाची विण महत्त्वाची ? याचा देखील विचार रूपबंधात्मक समीक्षा करतांना करणे क्रमप्राप्त ठरते.

**३. आदिबंधात्मक समीक्षा :** मानवाच्या (व मानवेतर प्राण्यांच्या सुद्धा) रोजच्या जगण्यात त्यांच्या आदिमतेच्या काही खुणा, वृत्ती, प्रवृत्ती आढळून येत असतात. कधी त्या सहजदृश्य स्वरूपात असतात. तर कधी त्या रूपांतरित होऊन प्रतिबिंबित होतात. (माणसाला असणारी निसर्गाची आवड ही आदिमतेचीच खूण आहे) कादंबरी मधील अशा प्रकारच्या आदिबंधाचा शोध घेऊन त्यांची सांगड घातली जाते किंवा नाही याची पडताळणी आदिबंधात्मक समीक्षेत करता येते. आदिबंधात्मक समीक्षेतून पात्रांच्या माध्यमातून घडणाऱ्या घटनांचा कादंबरीकाराने लावलेल्या अन्वयार्थाचा धांडोळा घेता येतो व त्यानुसार कादंबरीचे मूल्यमापन करता येते.

**४. मनोविश्लेषणात्मक समीक्षा :** कादंबरी समीक्षा करताना पात्रांचे वर्तन त्या त्यावेळी तसेच का घडले? याचा एक सुसंगत अंदाज कलाकृतीतून प्रतित होणे आवश्यक असते. पात्रांचे वर्तन, त्यांचे पूर्वानुभव, घटना काळातील ताणतणाव, मनस्थिती यांचा प्रभाव पात्रांच्या जीवनावर व कार्यावर पडत असतो. कादंबरीचे सौंदर्य मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून उलगडून दाखवणारी समीक्षा पद्धती मधून मनोविश्लेषणात्मक समीक्षेकडे निर्देश केला जातो.

**५. अधिवासशास्त्रीय समीक्षा :** कादंबरीतील पर्यावरण हे वास्तव किंवा पूर्णत: कल्पित असू शकते. खूपदा ते वास्तव आणि कल्पित यांचे मिश्रण असते किंवा भिन्न भिन्न ठिकाणाच्या वास्तवाचेच मिश्रण असते. कादंबरीचा भवताल किंवा पर्यावरण समजून घेताना ते सुसंगत आहे ना ? त्या त्या अधिवासात आढळणाऱ्या घटकांचा समावेश कादंबरीत आवश्यकतेनुसार व सुसंगत आला आहे ना ? याचा मागोवा अधिवासशास्त्रीय समीक्षा घेते. उदा. पावसाळ्याचे दिवस होते. म्हादूने नांगर जुंपला. असे वर्णन कादंबरीत असेत तर म्हादू हा कोरडवाहू, घाटावरचा शेतकरी निश्चित नसणार, तर तो अधिक पावसाच्या प्रदेशातील सह्याद्रीच्या अवतीभवतीचा असणार. म्हादूच्या अधिवासाची मांडणी यथायोग्य आहे का? किंवा म्हादूचे वर्तन प्राप्त परिस्थितीत उचित आहे का? याचा उलगडा अधिवासशास्त्रीय समीक्षेतून होईल.

**६. विशिष्ट साहित्य प्रवाहातील कादंबरीची समीक्षा :** ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, महानगरी, प्रादेशिक इत्यादी विशिष्ट साहित्य प्रवाहातील कादंबरीची समीक्षा ही दृष्टिकोण ठेवून केली जाते. समीक्षेसाठी घेतलेली साहित्यकृती विशिष्ट साहित्यप्रवाहात सामील होणारी साहित्यकृती आहे की नाही या पासून या प्रकारच्या समीक्षेची सुरुवात होते तर त्या त्या प्रवाहाची वैशिष्ट्ये लक्षणे तिच्यातून प्रतिबिंबित होऊन वाचकांना नवे काही देते का ? याचा शोध या प्रकारची समीक्षा घेते. उदा. बनगरवाडी ही कादंबरी ग्रामीण की प्रादेशिक ? 'प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, ग्रामसंस्कृतीला फारसे महत्त्व देत नाही. तर ते महत्त्व देते एका विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला. कधी ग्रामजीवन असेल तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते येते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा भाग बनून. समूह केंद्रितता हे या साहित्याचे वैशिष्ट्य असते.' [४]

**७. विशिष्ट कालखंडातील कादंबरीची समीक्षा :** ठराविक कालखंडातील कादंबरीची समीक्षा करण्याची पद्धती देखील आपल्याकडे रूढ आहे. त्या-त्या कालखंडातील समाजजीवन, वैशिष्ट्यपूर्ण घटना, लेखन पद्धती, वृत्तीविशेष यांचा कादंबरीत दिसून येणारा आढळ कितपत योग्य आहे? असल्यास उचित आहे का? याचा मागोवा घेऊन कादंबऱ्यांची समीक्षा करण्याची ही पद्धती आहे.

**८. भाषांतरित कादंबरीची समीक्षा :** भाषांतरित कादंबरीची समीक्षा करताना मूळ कलाकृती समीक्षकांना माहीत असावी लागेल. भाषांतर करताना भाषा, लकबी, कथावस्तू, पात्रे ही कितपत भाषांतरित झालेली आहेत आणि परिणामकारक झालेली आहेत. भाषांतरित कादंबरी कोणत्या दर्जाची वाटते, ते सकारण समोर ठेवणे हा या समीक्षेचा उद्देष मानला पाहिजे.

वरील प्रमाणे मराठी कादंबरी समीक्षेच्या विविध दिशा निर्देशित करता येतात. तथापि चांगला समीक्षक एकाच साहित्यकृतीचा विविध समीक्षा पद्धतीच्या सुरेख मिश्रणाने जेव्हा समीक्षा करून त्या साहित्यकृतीचे स्थान ठरवेल तेव्हा ती समीक्षा अधिक उपयुक्त आणि फायद्याची ठरेल.

❀❀❀

# भारतीय खेडी आणि मराठी-हिंदी ग्रामीण कविता

डॉ. कैलास सार्वेकर

प्रस्तुत लेखात मराठी आणि हिंदी कवितेतून आलेल्या खेड्यातल्या जीवनाची माहिती घ्यायची आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे आणि बहुसंख्य जनता खेड्यापाड्यात राहते, ही स्थिती आजही आहे. स्वाभाविकच मराठीच्या महाराष्ट्राबरोबरच हिंदी ज्या प्रदेशात बोलली जाते त्या उत्तर भारतातील खेडी कशी आहेत, त्या त्या भागातील साहित्यात ती कसकशी येत गेली ते पहावं त्या निमित्ताने या दोन भाषांतील ग्रामीण कवितांचा विचार व्हावा हे या लेखाचं प्रयोजन आहे.

सुरवातीस थोडी पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. प्रस्तुत अभ्यासकाने पुणे विद्यापीठांत एम.फिल. व पीएच.डी. साठी ग्रामीण कवितेवर संशोधन कार्य केले होते. 'मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास' हा ग्रंथही मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणेतर्फे १९९९ ला प्रसिद्ध झाला होता. थोडक्यात मराठी ग्रामीण कवितेचा १९९० पर्यंतचा अभ्यास या निमित्ताने झालेला होता. हिंदीतील या प्रकारच्या कवितेची स्थिती कशी आहे याचा शोध घेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली तर्फे 'मराठी आणि हिंदी ग्रामीण कवितेचा तौलानिक अभ्यास (इ.स.१९६० ते २००५)' हा विषय दीर्घ संशोधन प्रकल्पासाठी घेतला, त्याचे साररूप संक्षिप्त निष्कर्ष असे या लेखाचे स्वरूप आहे, असे म्हणता येईल.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपर्यंत तरी मराठी साहित्य शिक्षणक्षेत्र बहुजनांपर्यंत पोचले नव्हते. असेच इंग्रज येण्यापूर्वीच्या संत-पंत-तंत आणि नंतरच्या साहित्यावरून म्हणावे लागते. आधुनिक मराठी साहित्यातून सर्वसामान्यांचे जीवनानुभव साहित्यांचे विषय झाले असे आपण म्हणत असलो तरी बहुजन समाजातील लेखकवर्ग शिकला लिहू लागला होता. तिथपर्यंत तरी शिक्षण आणि साहित्यक्षेत्र विशिष्ट वर्गाची मक्तेदारी मराठीत होती ही स्थिती जशीच्या तशी हिंदी प्रेदशात मात्र दिसत नाही. या काळात ग्रामीण जीवनावर 'प्रादेशिक वाङ्मय' या नावे गद्य व 'जानपद गीते' या नावे पद्य साहित्य लिहिले गेले. यातील 'प्रादेशिक साहित्या'त प्रदेशाला महत्त्व होते. तर 'जानपद कविता'* शहरी कवींनी ग्रामीण जीवनानुभवाच्या अभावाने लिहिल्याने त्यात

कृत्रिमता, खोटेपणा, नटवेपणा अधिक होता. त्यामुळेच की काय ग्रामीण कविता पर्यायाने ग्रामीण साहित्य हा मराठी साहित्यात एक चेष्टेचा विषय बनला होता. महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' हा संदेश स्वातंत्र्य आंदोलकांना दिला होता साहित्यिकही या संदेशानुसार खेड्याकडे वळले. पण प्रत्यक्ष अनुभवाच्या अभावाने त्यांची कविता प्रत्ययकारी होऊ शकली नाही.

जानपद कवितेच्या काळात ('सुगी'-१९३३) हिंदीत १९३३ ला प्रगतिवादाची धारा सुरू झाली. १९३५ ला लंडनमध्ये प्रगतिशील लेखक संघाची बैठक झाली. १९३६ ला प्रेमचंदांच्या अध्यक्षतेखाली लखनौला अशी बैठक झाली. प्रेमचंदांच्या साहित्यातून 'यथार्थ' ग्रामजीवन हिंदीत येत गेले. पुढे हिंदी कवी नागार्जून यांनी बिहार मध्ये शेतकरी आंदालनाचे नेर्तृत्व केले. १९३९-४० मध्ये दोन वेळ त्यांनी तुरुंगवास भोगला. मराठीतील जानपद कवितेचा काळ आणि हिंदीतील प्रगतिवादाची धारा व नागार्जून यांच्या शेतकरी चळवळीतील सहभाग या भारतातीलच पण वेंगवेगळ्या ठिकाणी साधारणपणे समांतर घटना घडताना दिसतात. एकीकडे मराठीत जानपद कविता नटवे जीवन मांडत होती तर दुसरीकडे हिंदी गद्यात प्रेमचंद व पद्यात नागार्जून वास्तवजीवन रेखाटत होते.

१९४७ चे स्वातंत्र्य, १९५० चा प्रजासत्ताक, राज्यघटना, १९६० ला भाषावार प्रांतरचना, घटनेने मागासवर्गीयांना विशेष सवलती दिल्या. महाराष्ट्र शासनाने आर्थिक दुर्बलांना शिक्षणासाठी सवलत दिली. त्यामुळे तळागाळातल्या जाती-जमाती बरोबरच शेतकरी कष्टकरी यांची मुलंही शिकू लागली. या नवशिक्षित तरुण पिढीला आत्मभान आले. आपले खरे जीवन मराठी साहित्यात आले नाही. ते योग्य तऱ्हेने आले पाहिजे ही जाणीव झाली. १९६० नंतर दलित, ग्रामीण नंतर स्त्रीवादी चळवळी मराठी साहित्यात उभ्या राहिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा घेऊन दलित साहित्याची चळवळ उभी राहिली. आनंद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोतापल्ले, द.ता.भोसले, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव अशा मंडळींनी ग्रामीण साहित्याची चळवळ उभारली. या साहित्याची तात्त्विक मांडणी केली. दलित साहित्याने मराठी साहित्याला कलावादाकडून जीवनाकडे झुकविण्यात यश मिळवले. कविता नंतर आत्मकथनांनी मराठी साहित्य ढवळून निघालेच पण मराठी साहित्याला आँतराष्ट्रीय स्तरावर पोहचविण्याचे काम आत्मकथनांनी केले. हिंदी साहित्यात हे जीवन अगोदर पासूनच येत राहिले. त्यामुळे अशी चळवळींची आवश्यकता भासली नाही. दलित जीवन जसे आले तसे ग्रामीण-शेतकरी-कष्टक यांचेही आले.

स्वातंत्र्यानंतरची दोन/अडीच दशकं भारताला चांगली गेली स्वातंत्र्य, प्रजासत्ताक, भाषावार प्रांतरचना, उदार शैक्षणिक धोरण, स्थानिक स्वराज्यसंस्था, पंचवार्षिक योजना, सहकार चळवळ, धरणं अशा अनेक लोकोपयोगी घटना या काळात घडल्या. शिक्षणाचा प्रचार सर्व घटकांत झाला. राजकारणात सहभाग आला. पंचवार्षिक योजनांमुळे खेड्यापाड्यांचा पालट होईल. रोजगारहमीमुळे कामधंदा मिळेल, धरणांमुळे शेतीला पाणी मिळेल. हरित क्रांतीने देशाचं रूप पालटून जाईल असा आशावाद निर्माण झाला.

सुरुवातीला या योजनांचा थोडाबहुत फायदा काही राज्यांना झाला. उदा. उत्तर भारतात अनेक ठिकाणी धरणांचा उपयोग तेथील पंजाब-हरयाणा सारख्या प्रांतांना झाला. शिक्षणाने नवी पिढी शिकली. साहित्यादी क्षेत्रात ती लिहू-बोलू लागली वगैरे. पण हे चित्र फार काळ टिकलं नाही. राष्ट्रभावनेने प्रेरित पहिली पिढी राजकारणात असेपर्यंत भ्रष्टाचार फारसा नव्हता. पण नंतर तो वाढत गेला. आम्हाला सत्तेत सहभाग मिळेल. सर्वसामान्यांचं कल्याण होईल हे आम जनतेचं स्वप्न होतं. पण राजकारणात भ्रष्टाचार शिरला त्यानं आपला स्वार्थ पाहिला. कारण राजकारण हा नंतर सेवाभाव न राहता धंदा झाला. विशेषत: आणीबाणी (१९७७-७८) नंतर इथले राजकारण, अर्थाभिमुख झाले. त्यामुळे भ्रष्टाचार, बेकारी, बेरोजगारी, पिळवणूक या गोष्टी आल्या.

कवितेत त्याचे प्रतिबिंब उमटले. विठ्ठल वाघांच्या कवितेत स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जनतेची अवस्था 'मेंढरा' सारखी झाली. वारंवार 'ढगामुचुक आभाय' (दुष्काळ) पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली. पंचवार्षिक योजनेची 'म्हैस' दारोदार येईल. सर्वांच्या मुलाला दूध देईल असं वाटत होतं. पण तसं कधी झालच नाही. शेती तोट्यात गेली. म्हणून 'साहेबराव पाटील' या कास्तकाराला बायको मुलांसह फाशी घ्यावी लागली.

हिंदीतील शेतकऱ्यांच्या हालाखीच्या जीवनाचे चित्रण नागार्जून करतात. 'तंग आ गये है। किसान' असं ते म्हणत असले तरी 'स्वातंत्र्य संघटन बनाने की प्रेरणा' ते देतात 'खुद ही झंडा लाल उडाते है' असा पक्षविचार धारेचा रंग त्यांच्या रचनेत मिळतो तथापि "कागजपर खेती होती है। कलम हुआी रहे अखबार। असेंब्ली की छत पर फसलें उगा रही सरकार ('नागार्जुन रचनावली -२' पृ. ३५२) शेती आणि शेतकऱ्यांची स्थिती, सर्वत्र पसरलेला भ्रष्टाचार यामुळे स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताकाचा सर्वसामान्यांना काय उपयोग?"

किसकी है जनवरी किसका अगस्त है?

कौन यहा सुखी है और कौन मस्त है?

(नागार्जुन रचनावली -२ पृ. १८९)

हा सवाल मराठी विद्रोही कवी नामदेव ढसाळांच्या 'स्वातंत्र्य कोणत्या गाढवीचं नाव आहे' या विधानाशी जुळणारा आहे.

मराठी कवी विठ्ठल वाघांच्या एका कवितेत पंचवार्षिक योजनेसाठी 'म्हशी'ची प्रतिमा येते तर हिंदी कवी सर्वेश्वर दयाल सक्सेना यांच्या कवितेत 'म्हैस संपूर्ण राजनौतिक भ्रष्टाचाराच्या/संवेदनशीलतेच्या रूपात येते.' 'यह खेतीहर मजदूर भूक से मर गया', 'यह चौपाये के साथ बाढ मे बह गया' अशी शेतकऱ्यांची स्थिती येते. ('स.द.स.ग्रं.' पृ. २३-२४)

स्वातंत्र्यानंतरच्या पंचवीस वर्षात सत्ताधारी, बुद्धिजीवी, कलाकार या साऱ्यांची पाठ काळीशार, संवेदनशून्य चमकदार, चारिबाजूला 'गोबरैल' पसल्यासारखी झाली आहे. ''पचीस वर्षोसे लगातार। यही देखते-देखते। लगता है हम सब गोबरैल में बदल गये है'' ('स.द.स.ग्र.-२' पृ.४६)

शेतकऱ्यांची जी मुलं शिकली. नोकरीला लागली, शहरात स्थिरावली, त्यांची संवेदनशीलता मात्र खेड्याशीच जुळलेली राहिली. गावापासून तुटलेपणाची ही भावना मराठी व हिंदी दोन्ही भाषेतून येत राहिली. आनंद यादवांच्या कवितेपासून हे दिसते. कवी जेव्हा शहरातून आपल्या शेतीमातीकडे येतो तेव्हा हळहळतो. तो स्वत:च 'बघ्या पाव्हणा' झाल्याचा प्रत्यय त्याला येतो. रक्ताचं नातं तुटल्यासारखं वाटतं ('म.मा.' पृ. ७९) नोकरीने आपल्याला 'पांढरी घर कोंबडी' बनवली.' शेतातील बाळपीकं, केळी, सुरवणी, गाळ, लोळाघाट, गुऱ्हाळाचा रस या साऱ्याच आठवणी त्याला अस्वस्थ करतात. 'ध्यायीची माती त्या मातीत मिसळून जावी' ही कवीची इच्छा मातीशी असलेले नाते टिकून रहावे अशी अपेक्षा व्यक्त करणारी आहे.

' यादव (१९६०) ते अलीकडे ज्यांच्या 'खुंट्यावर टांगलेली दु:ख' (२००९) संग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्या एकनाथ पाटील यांची कविता अशा अनेक कवींच्या कवितातून हा भाव येतो. पैकी 'शोध यात्रा' हे माझ्या प्रिय गावा मध्ये त्याला येणारी आठवण अधिक तीव्र आहे. एखादं झाड गुळासकट फेकलं जावं तसं कवीचं गावच त्याला नाकारतय. ते त्याला सामावून घेत नाही. गावाची तीव्र आठवण - तो त्याच्याजवळ जाऊ शकत नाही. आणि शहराने त्याला पूर्ण जखडून टाकलंय. त्याच्या चौकात उभा राहून तो त्याला साद देतो. उत्तरप्रदेश, गुजरात, दिल्ली अशा विविध राज्यात स्थलांतरित होत गेलेल्या रामदरश मिश्रांचं गावाची असलेलं नातं मात्र वेगळं आहे. ''मै जहाँ कही गया, गाँव मेरे साथ रहा/वह माँ है, पिता है, भाई बहन है, पडोसी है''

(क.क.इ.दि. पृ. १३५) म्हणूनच तर त्याला एकटेपण जाणवतं, संवादहीनता त्रासदायक वाटते, तेव्हा गावच हसून म्हणतं '''मै हूँ ना' (क.क.इ.दि. पृ. १२७) मात्र कधीतरी गावा कडचं आपलं घर विकून तो येतो. सर्वस्व गमावल्याचं दु:ख त्याला होते.'' क्या सच मूच छूट गया वह?/फिर इस दर्द को क्या नाम दूँ?'' असं तो म्हणतो.

खेड्यातून शहरात आलेल्या मजुराचं चित्र हिंदीतील रामदशरत मिश्र यांच्या 'बचपन आणि सुरेश कुसुंबीवाल यांच्या 'सरनू' या व्यक्तिचित्रणपर कवितेतून येतं, ते चटका लावणारं आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तर कृषिप्रधान देशातला सर्वात महत्त्वाचा हादरवून सोडणारा प्रश्न आहे. 'साहेबराव पाटील' ही विठ्ठल वाघांची शेतकरी आत्महत्येवरची कविता. त्यानंतर इंद्रजित भालेरावांनी या आत्महत्यांवर अनेक कविता लिहिल्या. शंकरराव दिघे यांच्या दीर्घ कवितेत 'आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जागरणा' वर सुमारे सहा पानं लिहिली. ही काही ठळक उदाहरणं, पण ग्रामजीवनाबद्दल आस्था असणाऱ्या १९९० नंतरच्या जवळ जवळ प्रत्येक कवीने आत्महत्येचा प्रश्न हाताळला.

११ मार्च १९८६ ला साहेबराव पाटील या कास्तकाराच्या आत्महत्येची दुर्दैवी घटना घडली. ती विठ्ठल वाघांच्या काव्यनिर्मितीला कारणीभूत ठरली. याच दरम्यान जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. गॅट करार झाला. १९९० नंतर जागतिकीकरणाचे परिणाम दिसू लागले.

इंद्रजित भालेराव आणि समकालीन कवींची कविता आजुबाजूची परिस्थिती आणि तिचे ग्रामीण जनतेवर, त्यांच्या व्यवसायावर होणारे परिणाम सहभावनेने अनुभवत होती. आपल्या कवितेतून तिचे भावचित्र रेखाटत होती. भालेरावांनी वेगवेगळ्यर विषयांवर अनेक कविता लिहिल्या पण आत्महत्या-जागतिकीकरणासंदर्भात त्यांच्या कविता लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. 'शिक बाबा शिक लढायला शिक' ('पेरा' पृ.५८) 'भुंमाते घे प्रणाम शेवटचा' ही कविता भू मातेला, आभाळबापाला, सरकारला आणि चिल्या पिल्यांना उद्देशून लिहिली आहे. 'सांग माझ्या बापानं नाही केला पेरा तर तुम्ही काय खाल धर तुरा' ('पेरा' पृ. ५२) हा तमाम पांढरपेशांना केलेला सवाल, 'माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' ही गावाची शहरी मित्राला करून दिलेली ओळख, 'पेरा' संग्रहातल्या या विषयावरच्या अशा अनेक कवितांची उदाहरणं सांगता येतील.

उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरण या विषयावर एक प्रातिनिधिक कवितासंग्रह काढला. स्वत:सह सुमारे सत्तावीस कवींच्या तीस-पस्तीस कविता या संग्रहात आहे. ते स्वतः ''बळीराजाला कधी कुणी, पावलाखाली

गाडलं, कुणी व्याजाखाली गाडलं, कुणी बाजारात मारलं, कुणी तो बाजारात जाण्यापूर्वीच मारलं.'' ('जा.क.म.क.' पृ. ७३) अशी पुराणकालीन वामन, आताचे सावकार-व्यापारी, सरकार अशा अस्मानी सुलतानी संकटाची मालिका शब्दात सांगतात. ''विरोधकांनी सत्य समजून न घेता, त्याच्या डेड बॉडीवर, कफनाऐवजी राजकारण पांघरले'' ('जा.क.म.क.' पृ. १२) असे त्याच्या आत्महत्येचे राजकारण करणाऱ्या इथल्या सत्ताधारी व विरोधी दोन्हीही नेत्यांच्या दांभिकतेवर प्रकाश टाकतात.

एकनाथ पाटील यांच्या 'पडझडीच्या काळात' या कवितेत जागतिकीकरणाचं समर्थन करणारा शहरी मित्र, ''जागतिकीकरणाच्या लाटेत सर्वांचच वैश्विकीकरण होणार आहे. गावचा माणूस आपोआप ग्लोबल होत जाईल. तेव्हा परिवर्तनात गावावर लिहिलेली तुझी कविता टिकेल का?'' असा प्रश्न करतो. त्यावर ''अगदी सर्व नष्ट झालं तरी चालेल, पण मातीत राबणारा माणूस जगला पाहिजे या पडझडीच्या काळात.'' ('खु.टां.दु.' पृ. ५३) अशी राबणाऱ्यांबद्दलची कळकळ व्यक्त करतो. या दशेला ''पुढारी, भांडवलदार, माफिया, नोकरशहा साऱ्यांची मुलं परंपरा सांभाळतील पण शेतीची व्यवस्था वाईट होईल. शेतकऱ्यांचा वंश नाश होई तेव्हा शेतकऱ्याच्या पोराने काय करावे आता?'' ('खु.टां.दु.' पृ. ७७) असा अस्वस्थ करणारा प्रश्न उभा करतो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जागतिकीकरण-उदारीकरण या संदर्भात भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, भा. ल. भोळे, उत्तम कांबळे, जेम्स पेत्रास, एजाज अहमद हिंदीतील रामशरण जोशी, गिरीश मिश्र या विचारवंतांची अवतरणं नेमका प्रकाश टाकतात. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यातही शेतकऱ्यांची-ग्रामीणांची आजची आणि त्यापेक्षाही उद्याची परिस्थिती किती वाईट आहे याची कल्पना येते. शेतकऱ्यांच्या या अवनतीबद्दल हा शेतकरीपुत्र विद्रोहही प्रकट करू लागला. कुणब्याच्या पोराला परिस्थितीविरुद्ध लढायला, घेतलेली कर्ज बुडवायला, निवडून दिलेल्याला पाडायला, स्वतः न मरता इतरांना मारायला शिकवणारी इंद्रजित भालेरावांची कविता हा विद्रोह पेरते. त्या अगोदर नारायण सुमंत यांच्या कवितेत दौलती, भैरू आणि हैबती 'आटलेल्या विहिरीचे कनेक्शन तोडू नका' हे सांगण्यासाठी तालुक्याच्या गावाला जाणार आहेत. त्यानेही उपयोग होणार नसेल तर 'उद्या ते संसदेच्या दिशेने जोडेही भिरकावतील.' अशी उद्याच्या संघर्षाची शक्यता व्यक्त केली जाते. अमोल बागुलसारखा नवीन कवी आत्महत्याग्रस्तांना आरक्षण मागतो. शेतकऱ्याच्या बायकोला 'सरकारी

विधवा' म्हणून पेन्शन मिळावे. एवढेच नव्हे तर, ''फक्त एक एक पुढारी करा आमच्या हवाली, पिकावर आम्ही त्याचं रक्त फवारू'' (परिवर्तनाचा वाटसरू' जुन २००८, पृ. ८ ते २०) अशी क्रांतिकारी विद्रोहाची भाषा वापरतो.

हिंदी कवितेतही हा विद्रोह आहे. याचे मुख्य कारण केवळ शेतकऱ्यांच्या आत्महत्या एवढेच नाही तर शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न, तोट्यात जाणारा, बुडू पाहणारा शेती व्यवसाय हाही आहे. केदारनाथसिंह यांच्या 'कुदाल' या कवितेचा प्रतीकात्म शेवट ह्या दृष्टीने निश्चित विचार करायला लावणारा आहे. शहरी मध्यमवर्गीयांच्या घरातील ही कुदळ, तिचा आकार मोठा होत जाणे, तिला घरात दरवाजाजवळ सोडणं खतरनाक आणि सडकेवर ठेवणं असंभव ठरतं. कृष्ण मोहन झा यांनी या कवितेवर लिहिले आहे, ''यह (कविता) बताती है की उनमेंसे (प्रेमचंद की कथा के पात्र) कुढ पढ लिखकर जाविकोपार्जन के लिए और फिर न कभी लौटने के लिए शहर चले गए। शेष प्रगति की प्रतियोगीतामें पिछढ गए। यह छुटी हुअी सुनसान अंधेरी जगह जिसे हम ग्रामीण भारत के नाम से जानते है। अशिक्षा और अभावमें डूबा भारत आत्महत्या के उद्योग में शामिल किसानों का भारत - प्रगती के नामपर हमारे गाँव शहर की कॉलोनी बन गये। अब गाँव का मतलब है आलू, प्याज, टमाटर, फल और मजदूर। शहरमें गाँवका मजदूर विघटित होकर कुदाल बन जाता है।'' ('वागर्थ' फरवरी २०११ पृ. १०३) ग्रामीण शोषितांचे संघटित होत जाणाऱ्या, वाढत जाणाऱ्या शक्तीचे हे रूप कुणालाही न परवडणारे म्हणूनच क्रांतिकारक आहे.

सुरेश कुसंबीवाल यांच्या 'उसके आत्महत्या के बाद' या कवितेत गावात एकूण अकरा आत्महत्या घडल्याहेत. कोणी भेटायलाही येत नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची बायको व तिची आई एकमेकीला भेटतात. या दोन विधवांमध्ये चाळीस वर्षाचं अंतर मिटल आहे. तेजपाल चौधरींच्या 'और होरी मर गया' या कवितेत शेतकरी आत्महत्येचं हृदयद्रावक चित्रण आहे. या दृष्टीने उपायही या कवितेत आहेत. प्रश्नाबरोबर उत्तर सुचवणं हे हिंदी कवितेत नागार्जून, सर्वेश्वर दयाय सक्सेनांपासून तेजपाल चौधरींपर्यंत दिसते.

मराठी कवितेत ना. धों. महानोर, इंद्रजित भालेराव, संतोष पवार, प्रकाश किनगावकर, कल्पना दुधाळ अशा अनेक कवींच्या कवितांतून वेगवेगळ्या पद्धतीने आले. त्याचप्रमाणे हिंदी कवींच्या कवितांतूनही आले. सुरेश कुसुंबीवाल यांच्या कविता हे याचे ठळक उदाहरण सांगता येईल.

इतर भाषांतून भाषांतरित झालेल्या कवितांवरून त्या भाषेतील व देश-प्रदेशातील ग्रामजीवन आणि या जीवनावरील कवितांची कल्पना येते.

उदा. तेलगू भाषेतील साहित्य आणि त्यावरून तामिळनाडूतील सध्याची स्थिती कळते. विशेषतः तेलगू भाषा प्रदेश जागतिकीकरणामुळे कसा होरपळला जातो आहे, याची कल्पना येते. 'समकालीन भारतीय साहित्य' न. दि. २०१० च्या अंगातील द्वा. ना. शास्त्री यांचे एक टिपण आहे. त्यातून तामिळनाडूचे दर्शन घडते. रेमिका थापा यांनी भारताशेजारच्या नेपाळमधील ग्रामजीवन आपल्या कवितांमधून उभं केले आहे. उपरोक्त 'समकालीन ....' च्या अंकात सुवास दीपक यांनी रेमिका थापांच्या सोळा कवितांचे हिंदी रूपांतर केले आहे. त्यातून हे दिसते. अभिव्यक्तीबाबत बोली, लोकवाङ्मय आणि ग्रामीण प्रतिमा या घटकांचा समावेश मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषेतील ग्रामीण कवितेत दिसतो. विशेषतः हिंदीत बोलीला आणि लोकवाङ्मयाला अगोदरपासून प्रतिष्ठा आहे. मराठीत त्यासाठी १९५२ पर्यंत (बहिणाबाईंची गाणी) चा काळ जावा लागला. समर्पक ग्रामीण प्रतिमांचा वापर दोन्ही भाषांत दिसतो. उपरोक्त तिन्ही वैशिष्ट्यांमुळे दोन्ही भाषांतील ग्रामीण कवितांचे पृथकत्व दाखविता येते.

या कृषिप्रधान देशात सर्वात वाईट स्थिती शेतकऱ्याची आहे. आपल्या देशात संख्येने तो अधिक आहे. पण कर्जबाजारीपण, अस्मानी आणि सुलतानी संकटे, सावकार, व्यापारी, सरकार, निसर्ग या सर्वांकडून त्याची मुस्कटदाबी होते. असंघटित असा हा वर्ग उपरोक्त अनेक कारणांमुळे संघटित होऊ शकत नाही. संघटित नसल्यामुळे 'गठ्ठा मतदान' हे लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचे हत्यारही त्याच्याजवळ नाही. त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा नाही. शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव नाही. म्हणूनच, "गाव सोडतो तो प्रतिष्ठित, आणि गावच्या मातीला चिकटून राहतो तो अप्रतिष्ठित." ('खु.टा.दु.' पृ. ५२) अशी वस्तुस्थिती आहे. "....शेतकरी सोडल्यास...., सुखी असणाऱ्या जाती इथं खूप आहेत." ('या.श.सा.हो.को.' पृ. ३९) ही या देशाची शोकांतिका आहे.

**लेखातील संक्षिप्त रूपे व संग्रहाची शीर्षके :**

१) स.द.स.ग्र.२ - सर्वेश्वर दयाल सक्सेना ग्रंथावली-२, सर्वेश्वर दयाल सक्सेना.
२) म.मा. - मळ्याची माती - आनंद यादव
३) क.क.इ.दि. - कभी कभी इन दिनो - रामदरश मिश्र
४) जा.क.म.क. - जागतिकीकरणात मराठी कविता - उत्तम कांबळे
५) खुं.टा.दु. - खुंट्यावर टांगलेली दुःख - एकनाथ पाटील
६) या.श.सा.हो.को. - या शतकाचा सातबराच होईल कोरा - शंकरराव दिघे

❀❀❀

# महादेवकोळी आदिवासींची लोकगीते

प्रा. एस. डी. लांडे

महाराष्ट्रातील आदिवासी जमातींत प्रामुख्याने महादेवकोळी, भिल्ल, ठाकर, कातकरी, पावरा, वारली, गोंड, आंध, कोलामा, पारधी, कोरकू, राठवा इत्यादी जमातींचा समावेश होतो. त्यामध्ये सह्याद्री विभाग, सातपुडा विभाग, गोंडवना विभाग असे विभाग दिसून येतात, त्यापैकी सह्याद्री विभागात बहुसंख्येने महादेवकोळी जमात आढळून येते. या जमाती आजही प्रगत नागर संस्कृतीपासून दूर राहत असल्याने त्यांची जीवनपद्धती वेगळी असल्याची दिसते. म्हणजेच त्यांची विशेष अशी संस्कृती आहे. धर्म, कला, साहित्य आणि भाषा मिळून आदिवासींच्या संस्कृतीची जडण घडण झाली आहे. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाची जडण घडण अभ्यासताना प्रथम डोळ्यासमोर येते ते त्यांचे पारंपरिक लोकसाहित्य लोकगीते, लोककथा, वाक्प्रचार, म्हणी, उखाणी इत्यादी या आदिवासी लोकसाहित्याचा अभ्यास अलीकडे सुरू झाल्यामुळे बरेच लोकसाहित्य उजेडात आले नाही. म्हणजे अलिखित आहे. म्हणून त्यांचे प्रामुख्याने लिखित आणि अलिखित असे भाग करतात.

यापैकी परंपरेने चालत आलेले मौखिक साहित्य हे अनेक पिढ्यांचा वारसा आहे. यात शंका नाही प्रत्येक आदिवासी जमातींची विशेष संस्कृती प्रामुख्याने लोकगीतांतून पुढे येताना दिसते. त्यापैकी महादेवकोळी या जमातीशी विशेष अशी लोकगीते आहेत. कारण निसर्गाशी जमवून घेत राहणारे आदिवासी आजही निसर्गपूजक आहेत. आकाश, सूर्य,चंद्र, नदी, नाले, डोंगर, वृक्ष, पशू,पक्षी, पाणी सर्वांनांच ते पूजनीय मानतात. त्यामुळेच निसर्गातील शक्तींना ज़वळ घेतले तर आपले जगणे आनंदी होईल. यावर त्यांची श्रद्धा आहे. या श्रद्धेतून सणवार, व्रताचार, विधी, व्रत वैकल्य पार पाडताना दिसतात. महादेवकोळी लोक हिंदुप्रमाणे सर्व सण साजरे करतात. त्यामुळे त्यांच्या लोकगीतात विविधता आढळत नाही. ही सर्व लोकगीते त्यांच्या बोलीभाषेत असून त्यात त्यांच्या भावभावनांचे प्रतिबिंब दिसते. 'गवळीणीचे गाणे' हे महादेवकोळी जमातीत पारंपरिक गीत असून गोकुळाष्टमी, रामनवमी, ही गाणी प्रामुख्याने पाचविला, बारश्याला म्हटली जातात. त्याच बरोबर स्त्रियांची गीते, पुरुषगीते, देवधर्मावर, लग्नसमारंभातील, सण उत्सवाची, शेती,

पाऊसपाणी या स्वरूपाची असल्याची दिसतात. त्यापैकी काही महादेवकोळी आदिवासी गीतांचा परिचय करून घेऊ.

**गवळणीचे गीत :**

गवळण बोले गवळणीला
बाळ झाले यशोदेला
झोका देण्या दाशा दोन्ही
बाळ घाला पाळण्यामधी

महादेवकोळी जमातीमध्ये गवळणीचे गाणे हे पारंपरिक गीत आहे. याशिवाय विठ्ठल, राम, हनुमान, कृष्ण, सत्यनारायण आणि गणपती ही सर्व हिंदू दैवतांनाही ते भक्ती भावाने पूजतात. त्याविषयी गाणे गातात. वरील गवळणीमधून कृष्ण जन्माचा सोहळा वर्णन करताना कृष्णाचा जन्म होतो. परंतु जनी दु:खी आहे कारण तिला कोणी नाही. तेव्हा तिला पाणी ठेवून अंघोळ घालणे, डोके विचरणे, वेणी घालणे तिच्या पुढे दिवा लावल्याने सर्व देवांना प्रकाश मिळेल व मदत होईल या भावनेतून हे गीत गातात. प्रामुख्याने महादेवकोळी हे गीत मुलाच्या पाचवीला व नाव ठेवण्याच्या (बारशाला) कार्यक्रमाला ही गवळण म्हणतात.

हा क्रिष्ण देवू हा क्रिष्ण देवू
यशोदे यशोदे सांग तुझ्या कार्ट्याला

या गवळण गीतातून कृष्णाला उपहासात्मक दुषणे दिली आहेत. कृष्णाला कार्ट, गारुडी, चोर, अशी दुषणे देवून काहीसी आदर युक्त निर्भत्सना केलेली दिसून येते. पण परमेश्वराला श्रद्धेपोटी भक्ताच्या शिव्या देखील सहन कराव्या लागतात. परमेश्वर भक्त याचे नाते पुढे येते.

**देवधर्माविषयक गीते :**

विठ्ठलाची रुक्मिणी याव नारळ फोडाया
भरली चंद्रभागा नालाचा घोडा बुड
विठ्ठलाची रुक्मिणी पतिव्रता हो पुढे
भरली चंद्रभागा पाणी पांगले गावात

महाराष्ट्राचे आद्यदैवत पंढरीचा विठ्ठल या विठ्ठलाबरोबर रुक्मिणीलाही तेवढेच भक्तांच्या मनामध्ये स्थान आहे. विठ्ठल दर्शनाचा सोहळा, चंद्रभागेचे दुथडी भरून वाहणे, घोडा बुडण्याचा प्रसंग यामुळे विठ्ठलाचे भक्तांना दर्शन होणे अशक्य होते. तेव्हा पतिव्रता रुक्मिणी येऊन नारळ फोडावा म्हणजे पाणी कमी होऊन दर्शन घडेल पण रुक्मिणीची त्याही -विठ्ठलाचा शेला धुण्याची अडचण होते. शेला पायावर धुते शेल्यावरील विठ्ठलाचे नाव, पिवळा पितांबर,

विठ्ठल रुक्मिणीचे रूसणे, फुगणे, विठ्ठलाची प्रती भक्तांची श्रद्धा या गोष्टीचे मनोहरी दर्शन घडते.

गोकुळाष्टमीच्या दिवशी कोन्होबा(कृष्ण) तुझा मान
वडाच्या झाडाखाली वेताळबाबा तुझ ठाण
रे ऐक गोरेबाई
वेताळकाई बाबा आहे सत्वाचा पुरूष
चैत्र महीन्यात तुझा भरतो ऊरूस ना
रे ऐक गोरेबाई

गाव म्हटलं की गावची काळी, पांढरी त्याचा रक्षणकर्त्या देवदेवतापैकी वेताळबाबा हा या गावच्या पांढरीचा रक्षणकर्ता आहे. म्हणजे ग्रामदेवता गावची प्रतिष्ठा या गीतांतून व्यक्त होते. गोकुळाष्टमीत कृष्णाला जरी आदराचा मान असला तरी गावचे श्रद्धास्थान वेताळबाबा आहे. वर्षानुवर्षे वडाच्या झाडाखाली त्याचे स्थान आहे. वेताळबाबा म्हणजे सत्वाचा पुरुष आहे. त्याची चैत्र महिन्यात होणारी जत्रा. सर्वाचा पाठीराखा म्हणून दर्शनासाठी होणारी गर्दी गावातील तरूण पोर म्हणजे पांडव याचे प्रत्ययकारी दर्शन घडते. कृष्णाबरोबर वेताळबाबावर या महादेवकोळी लोकांची असलेली श्रद्धा, निष्ठा आणि विश्वास दिसून येतो.

अंजनीबाईचे पोट दुख डाव्या कुशी
जलमीला मारुती चैत्रपुनवच्या दिवशी
आता तरी बाई...

या लोकगीतातून पुन्हा एकदा मारुती आणि वेताळबाबा याची तुलना होताना दिसते. मारुतीचा जन्म चैत्रपुनवच्या दिवशी अंजनीच्या पोटी जन्म होतो. त्याच्या सोहळ्याचे वर्णन आणि गावच्या पांढरीचा प्रथमलक्षी रक्षणकर्ता मारुती आहे. त्याचे गावच्या वेशीतील स्थान, गावच्या दृष्टीने महत्त्वच्या सर्व गोष्टी असल्या तरी दुसऱ्या बाजूला सुर्यासमोर मात्र वेताळाचे स्थान आहे म्हणून या गावाच्या लोकांसाठी मारुतीइतकेच वेताळबाबाचेही महत्त्व असल्याचे दिसून येते.

**सण उत्सव गीते :**

आली वरशाची पंचमी ग
पंचमीचे लेहत व्हते चित्रा गं
पंचमीने केला डोळा गं... जूऽ जूऽ

या लोकगीतातून महादेवकोळी हिंदू प्रमाणेच सण-उत्सव साजरे करतात. पंचमीच्या सणाच्या निमित्त्याने महादेवकोळी स्त्रिया प्रामुख्याने घर

भिंतीसारवून त्यावर नाग, गवळण, शेतकरी, नांगर यांचे चित्र काढून त्याची मनोभावे पूजा व सण साजरा करताना दिसतात.

मोरी गाय येली गेणुबा
मोरीला झालाय गोऱ्हा (वासरू) गेणुबा

या गीतातून महादेवकोळी जमातीमध्ये दिवाळीचा सण मोठ्या पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. या समाजात शेती आणि गायीला जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी गायी ही लक्ष्मी मातेसमान असते. त्यामुळे दीपावलीच्या दिवशी गुराखी हातात पंती घेऊन मोठ्या मनोभावे गायीची पूजा करतो व हे गाणे म्हणतो. यामुळे गायी, वासरू, शेती यावरील श्रद्धा व्यक्त करताना दिसतो.

**विवाह गीते :**

पुनवच पडल चांदण, लता तुला आलय मागण
आईच एक सांगण, सासूसंग नीट वागणं
पुनवच पडल चांदण, लता तुला आलय मागण
बापाच एक सांगण, सासऱ्यासंग नीट वागणं

महादेवकोळी समाजात मुलीला बघण्याचा कार्यक्रम होतो. मुलगी पसंत पडल्यावर तिला सौभाग्याचे प्रतीक म्हणून साडी-चोळी देऊन कुंकू लावतात. त्यास कुंकू मागणं असे म्हणतात. मग लग्नानंतर ती सासरी जाणार म्हणून तिने नवीन नाती, गोती, संबंध कसे सांभाळावेत म्हणून सासू सासरा, नंद, दीर यांच्याशी कसे वागावे याचे बाळकडू माहेरची माणसे देतात. एक प्रकारचे संस्कार मूल्य शिकवले जाते.

हळंदई, शिळदई, शिळंदई रानामधी
हळंदई मळ्याामधी

या गीतातून महोदव कोळी समाजात लग्नापूर्वी हळदीचा कार्यक्रम असतो. हळद लावण्यापूर्वी हळद फोडण्याचा किंवा दळली जाते. तेव्हा ही हळद मळ्याात आहे, शिळंदई रानात आहे, शेतातील हळद पितळी हांड्याप्रमाणे शिंपी घरच्या शालू आणि सुर्याच्या तेजासारखी असल्याचे वर्णन आणि महत्त्व व्यक्त होताना दिसते.

हळदीन भरलय पातळ बाईच पातळ ग लग्नाचं
दोन दिवसांची आई, माझी सासूच ग जन्माची
हळदीनं भरलय पातळ बाईच पातळ ग लग्नाचं
दोन दिवसाचे बाबा माझे सासरेच ग जन्माचे

या गीतातून नवरी मुलीला हळद लागल्यानंतर ती हळद आणि माझे आई वडील माहेर फक्त दोन दिवसाचे आहे याची तिला जाणीव होते. यानंतर मात्र सासू सासरे, दीर, नंद, पती हेच माझ्या जन्माचे सोबती आहेत हे व्यक्त होताना दिसतो.

चापा फुलेला, चापा फुलेला, वाऱ्याने डोलेला
ताई तुझ लग्न तुला आनंद
आईच्या डोळ्यांना धारा

या गीतातून लग्न झाल्यानंतर नववधुला चाप्याची उपमा देऊन ती त्याप्रमाणे आनंदी आहे पण आई, वडील, भाऊ, बहीण यांच्या डोळ्यात पाणी कसे येते याचे वर्णन येते.

एकूणच महादेवकोळी लोकगीते मौखिक स्वरूपात असलेली आणि स्वतंत्र लिपी नसलेली केवळ पाठांतराच्या बळावर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे लोकपरंपरेने चालत आलेली दिसतात. गवळणीचे गीत, देवधर्म विषयक गीते, सण-उत्सवाची गीते, विवाह गीते ही सार्वजनिक जीवनात त्या त्या प्रसंगी म्हटली गेलेली दिसतात. याचाच अर्थ ही गीते सामूहिक पद्धतीने गाईली जातात, शिवाय महादेवकोळी लोकगीतात लोकतत्त्व आढळते. कारण एखादे गीत गाण्यामागे लोकांची काहीतरी धारणा असते. म्हणून राम, कृष्ण, मारुती, शंकर, विठ्ठल यासारख्या देवदेवतांना प्रसन्न करून घेताना दिसतात. कारण देवाचा कोप होऊ नये किंवा इच्छा प्राप्तीसाठी विधी करतांना दिसतात.

सण-उत्सवापैकी, गोकुळाष्टमी, पंचमी, दिवाळी, अक्षयतृतीया, होळी, पाडवा, शिमगा असे काही पारंपरिक पद्धतीचे सण साजरे करताना दिसतात. यातून त्यांच्या रूढी-परंपरा. विधी -संकेत, सण-उत्सव, धर्म, नीती, चाली-रीती, कला यांचे दर्शन तर घडतेच पण आदिवासी आपल्या परंपरा टिकवून ठेवत असल्याचे वेगळेपण लगेच जाणवते. कौटुंबिक जीवनात विवाह संस्थेला असलेले महत्त्व, विवाह प्रसंगी अजूनही महादेवकोळी समाजात वराकडील लोकांनी वधुकडील लोकांना जी मदत केली जाते तिला दयाज म्हणतात. परंतु मुलींकडून कुठल्याही स्वरूपात मदत किंवा हुंडा घेतला जात नसल्याचे वेगळेपण दिसते. लग्नविधी प्रसंगी कुंकू, हळद, ओटी भरणे, मांडव, देवक, आहेर, लग्न यासारख्या छोट्या विधीतून वधु-वरावर केलेले संस्कार आणि प्रस्थापित नाती-गोती, संबंध रूढ अर्थाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे कसे सुपूर्द करतात व पाळले जातात यातून महादेवकोळी जमातीची एक वेगळी संस्कृती समाजा पुढे येताना दिसते.

❀❀❀

# साहित्य आणि बदलते सामाजिक वास्तव

**प्रा.राजेंद्र खंदारे**

साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे व साहित्य निर्मित भाषा हे त्याचे माध्यम आहे. मानवी जीवन व साहित्य या दोन्ही गोष्टी सामाजाधिष्ठित आहेत. काव्याचा उगमच मुळी सामूहिक धार्मिक विधीतून झालेला आहे. 'साहित्यविचार आणि समाज चिंतन' या ग्रंथातील 'साहित्य - साहित्यिक व समाज' या आपल्या लेखात प्रा. स.शि. भावे यांनी आरंभीच म्हटले आहे की, 'साहित्य म्हणजे भाषेच्या माध्यमाने केलेली कला निर्मिती ; साहित्यिक म्हणजे कलानिर्मितीची क्षमता असलेली व कलानिर्मिती करणारी व्यक्ती; आणि समाज म्हणजे पारंपरिक व नव्याने निर्माण होणाऱ्या हितसंबंधाच्या संदर्भात एकत्र आलेला व एकत्र राहणारा मानव समूह' या विधानावरून साहित्य आणि समाज याचे संबंध स्पष्ट होतो.

साहित्यातील समाजवास्तव ही एक गतिमान प्रक्रिया आहे. साहित्य स्वभावतःच समाज सन्मुख असते. पण श्रेष्ठ लेखकांच्या साहित्यात समाजाचे स्वभावतःच समाज सन्मुख असते. पण श्रेष्ठ लेखकांच्या साहित्यात समाजाचे स्थिरचित्रण असत नाही तर सामाजिक परिवर्तनांचे दर्शन त्यातून घडते. समाजातील परस्परविरोधी घटकांचे संबंध द्वंद्वात्मक असतात या घटकांतील अंतर्विरोध आणि संघर्ष यातून समाजाचा विकास होत असतो. लेखकाच्या साहित्यातून त्या-त्या काळातील अंतर्विरोधाची व या अंतर्विरोधामागील सामाजिक गतिमानतेची कल्पना येते. साहित्यावरून समाजाच्या इच्छा, आकांक्षा, ताणतणावांचा बोध होतो. साहित्यावरून समाज जीवनाचे निष्कर्ष काढायचे झाले तर निर्माण करणाऱ्या साहित्यिकाचा निर्मिती हेतू विचारात घेणे आवश्यक आहे.

साहित्य हे जसे एक जिनसी नसते तसाच समाजही एक जिनसी नसतो. साहित्यिक ज्या वर्गात जन्मतो त्या वर्गाचे संस्कार घेऊनच तो साहित्य निर्माण करीत असतो. त्याने समाजातील स्वेतरवर्गाची दखल घेतली तरी तो स्वतःच्या वर्गीय दृष्टिकोणातून घेत असतो त्याचे साहित्य हे मुख्यतः समसंस्कारी वाचकाकरिताच असते. त्यातील वास्तव सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक घटनेशी संवादी असते.

सामाजिक व सांस्कृतिक बदलांचा परिणाम केवळ साहित्याच्या आशयावरच होतो असे नाही. तर साहित्याच्या अभिव्यक्तीवरही आकृतिबंधावरही तो होत असतो विशिष्ट सामाजिक परिस्थितीत काही वेळा नवे आकृतिबंधही निर्माण होतात. १९६० च्या सुमारास मराठीतील वास्तववादी कादंबरी क्षीण झाली होती. समाजजीवनात मात्र मोठी परिवर्तने होत होती. ज्यांच्यापाशी सांगण्यासारखे खूप आहे अशा तरुणांनी आत्मनिवेदनाचा नवा आकृतिबंध रूढ केला.

**साहित्याचा समाजावर काही परिणाम होत असतो का ? होत असल्यास कोणत्या स्वरूपाचा ?**

हॅरिएट बीचर स्टोव्हच्या 'अंकल टॉम्स कॅबिन' (१८५२) या कादंबरीने नियो गुलामांच्या स्थितीची विदारक जाणीव होऊन अमेरिकेत १९६१ - ६५ मध्ये यादवी युद्ध झाले व गुलामगिरी नष्ट झाली किंवा व्हॉत्तेअर (१६९४-१७७८) रूसो (१७१२-७८) यांच्या लेखनामुळे फ्रान्स मध्ये राज्यक्रांती (१७८९-१७९९) साली झाली असे म्हटले जाते. गटेचे सॉरोज ऑफ वर्दर किंवा मस्केटिअर्स असेल साहित्य आपल्या वाचकवर्गावर कसा परिणाम करते ? हा प्रश्न अनुभव सापेक्ष आहे.

सामाजिक साक्षीपुराव्याची साधने म्हणून - सामाजिक वास्तवाचे गृहीत चित्रण म्हणून साहित्याचा उपयोग करून घेणे कितपत योग्य? टॉमस् वॉर्टन ने 'आपल्या काळाची वैशिष्ट्ये' प्रामाणिकपणे नोंदविणे व चित्रमयी आणि बोलक्या स्वरूपात त्या काळच्या चालीरीतीं चे प्रस्तुतीकरण चिरस्थायी करणे हे साहित्याचे खास गुणधर्म आहेत.' असे म्हटले आहे. वैचारिक, सामाजिक सिद्धांत आणि वाड्मयीन परिवर्तन ह्या गोष्टी समांतर असतात असे नाही. वैचारिक, राजकीय व सामाजिक घटनेचा परिणाम वाङ्मयावर होतोच असे नाही भारत हादरवून टाकणारी आणीबाणीची घटना घडून गेली, आविष्कार स्वातंत्र्याच्या संदर्भात चर्चा झाली पण प्रत्यक्ष पाहिले तर आणीबाणीतल्या कविता, जनाचा प्रवाह चालीला या शिवाय आणीबाणीचा वाङ्मयावर परिणाम दिसत नाही.

इंग्रजांनी आणलेली नवी व्यक्तिस्वातंत्र्यवादी मूल्ये रुजण्याजोगी आर्थिक सामाजिक परिस्थिती महाराष्ट्रात नव्हती (त्या काळात) व नजिकच्या काळात निर्माण होण्याची शक्यता नसल्यामुळे मराठी साहित्यात वास्तववादी प्रेरणा जोमदारपणे वाढ शकली नाही अशी मीमांसा भालचंद्र नेमाडे करतात. पाश्चात्त्याकडून आयात करण्यात आलेल्या मूल्यांचा साहित्यात

उद्घोष होत असला तरी आर्थिक परिवर्तनाअभावी सामाजिक परिस्थिती फारशी बदलली नाही. जसा समाज तसे त्याचे साहित्य.

१९४५-६० या कालखंडात सामाजिक पातळीवर दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम जाणवायला लागले. महागाई, बेकारी, शहरीकरणाचे व औद्योगिककरणाचे प्रश्न यांनी जीवनाला अवकळा आली होती. मानवी संबंध तुटक व यांत्रिक होण्याची प्रक्रिया सुरू झाली उदा. मर्ढेकर, गंगाधर गाडगीळ.

**संत साहित्य** : भक्ती - पंथीयविचार प्रसार, धर्म सुधारणा - ५०० वर्षे मुस्लीम राजवटीत भरडला जात होता. संतांनी आपल्या लेखनातून समाजाला जागे करण्याचे कार्य केले. समाजासमोर आपल्या कृतीतून आदर्श - उदा. तुकाराम, एकनाथ. बखर, लावणी, पोवाडे - शाहिरानी मराठी माणसाला चेतविले पराक्रमासाठी तयार केले. थकल्या भागल्यांचे मनोरंजन केले - अनिष्ट रूढीपरंपरेवर प्रहार केले, जागृती केली. आनंद फंदी चे फटके समाजाचा नैतिक समीक्षाच होय.

**पंडित साहित्य** : समाजाशी नाळ कधी जमली नाही. सर्व माणसांच्या सुख-दुःखाचा स्पर्श यात आढळून येत नाही. भाषेचे जडत्व, काव्यातील, अलंकाराचा अतिरेक इ. दोषयुक्त काव्यानी समाजात रुजले नाही.

१८१८-१८७४ या काळात बदलाची प्रक्रिया घडून आली. याचे परिणाम तत्कालीन निबंध लेखनावर, वैचारिकतेवर झाला. पूर्वी भक्तीने प्रेरित होऊन साहित्य लेखन होत. पण इंग्रजांच्या आगमनामुळे वाङ्मयाचे रूपच बदलले. नाटक, कथा, कादंबरी, निबंध, आत्मचरित्र, आटीपशीर काव्यरचना असे नवे प्रकार पुढे आले. अंधश्रद्धेकडून विवेकाकडे समाज वळला.

१८७४ निबंधमाला - चिपळूणकर साहित्याचा हेतू व स्वरूप बदलून गेले. सामाजिक व राजकीय परिवर्तनासाठी साहित्याचा फार चांगला उपयोग होऊ शकतो हे निबंधमालेने सिद्ध केले. आगरकर, हरिभाऊंच्या कादंबऱ्या, गोविंदाग्रजांची कविता खाडिलकरांची नाटके यामुळे साहित्य उजळून निघाले.

१९२० गांधी युग - गांधी विचाराचा प्रभाव समाज-साहित्यावर पडला. राष्ट्र आमि समाज यांच्या हितासाठी साहित्य निर्मिती होऊ लागली.

१९४७ स्वतंत्र (भारत) ग्रामीण / दलित प्रवाह - स्थूलतेकडून सूक्ष्मतेकडे सौंदर्यवादा रमलेले साहित्य वास्तववादाच्या पातळीवर उतरले. मानवी जीवनातली सुख-दुःखे शोधू लागली. खरे सामाजिक वास्तव स्त्रीवादी आदिवासी ग्रामीण दलित साहित्यामधून दिसते. उदा. - दया पवार, साठे -

खरात यादव. थोडक्यात समाजही बदलला असता साहित्यही बदलले. आध्यात्मिकाकडून भौतिकतेकडे, परलौकिकाकडून इहलोकाकडे, अंधश्रद्धेकडून डोळस विवेकाकडे समाज वळला त्या अनुषंगाने साहित्यातही बदल झाले.

साधारणपणे १९८० नंतरच्या गेल्या वीस वर्षात साहित्य क्षेत्रातील सामाजिकतेचे अतिस्वर कमी होत चालल्याचे दिसते. असामाजिकतेचे किंवा स्वायत्ततेचे हट्टी सूर ही उणावत चालल्याचे दिसते. तुकड्या तुकड्याच्या वास्तवाला सामोरे जाणारा आजच माणूस एकटा निराधार, पोरका आहे. जीवनाची अर्थ संबंधता निराधारता, अमानवीकरण, व्यक्तित्व लोप, नैराश्य, पेचरूपी जाणिवा त्याच्या जीवनात अधिक आहेत यामुळे स्वत:विषयी आकलन पूर्णपणे बदलले.

जागतिकीकरणामुळे व्यक्ती स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. पूर्वीची बंधने स्थानिक होते पण आजचे नियंत्रण वैश्विक स्वरूपाचे आहे. या व्यवस्थेच्या चक्रात आडकलेला समाज स्वातंत्र्याच्या आभासात वावरतो आहे. या बदलाविषयी साहित्यामध्ये प्रतिक्रिया उमटताना दिसत नाही. मी पासून मी विकसीत झालेला आहे. मी पणातील 'स्व' ही विघटित झाले आहे. या सर्व बदलाविषयी साहित्यिक कोणती भूमिका घेतात. बदललेल्या समाजातील वास्तवाविषयी प्रश्न कोणते? वर्तमानकालीन साहित्याची सामाजिक पार्श्वभूमी लक्षात घेण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. शेवटी साहित्य हा केवळ सामाजिक कारणांचा परिणाम नसतो. तर ते सामाजिक परिणामांचे कारण ही असते. हे हॅरी लेविनचे विधान आजच्या समाज व साहित्यं या संदर्भात स्वीकारावे लागेल.

❀❀❀

संशोधन ही संकल्पना अत्यंत व्यापक आणि दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. संशोधनामध्ये स्पष्टीकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असते. विशेष म्हणजे संशोधनामध्ये जर एखादे तथ्य शोधून काढले तर त्याचा अनुभव सर्वांना सारखाच येणे आवश्यक असंते. उदा. चिंच हा पदार्थ आंबट आहे किंवा मीठ हा पदार्थ खारट आहे. संशोधनाअंती निर्णय प्रक्रियेत प्रत्येक व्यक्तीला या पदार्थांची सारखीच चव लागणे आवश्यक आहे. परंतु प्रत्येक संशोधकाने वेगवेगळे अनुमान काढले तर ते संशोधन वस्तुनिष्ठ न होता व्यक्तिनिष्ठ ठरेल आणि संशोधन प्रक्रियेत अडथळा निर्माण होईल. थोडक्यात संशोधनात वैयक्तिक आवडी-निवडीला अजिबात स्थान नसते तर वस्तुनिष्ठतेला अनन्यसाधारण महत्त्व असते.

ISBN 978-81-924997-1-0

9 788192 499710 >

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर